# " न्यायमूर्ती म. गो. रानडे आणि प्राचार्य गो. ग. आगरकर यांचा तौलनिक अभ्यास "

पुणे विद्यापीठाच्या पी. एच. डी. (इतिहास) पदवी परीक्षेकरीता सादर केलेला

# शोध प्रबंध


**शोध प्रबंधक**

सौ. मंदा किशोर आठमाने एम. ए. एम. फिल.

**संशोधन मार्गदर्शिका**

डॉ. रेखा रानडे

व्याख्याता इतिहास विभाग

पुणे विद्यापीठ, पुणे.

पदव्युत्तर इतिहास विभाग

पुणे विद्यापीठ, पुणे.



नोव्हेंबर १९९५

## प्र मा ण प त्र

प्रमाणित करण्यात येते की, सौ. मंदा किशोर आदमाने यांनी माझ्या मार्गदर्शनाखाली पी.एच्.डी. (इतिहास) परिक्षेसाठी "न्यायमूर्ती म.गो. रानडे आणि प्राचार्य गो.ग. आगरकर यांचा तौलनिक अभ्यास" हा शोध प्रबंध पूर्ण केला असून संपूर्ण लिखाण त्यांचे स्वतःचे आहे.

29-11-95

डॉ. रेखा रानडे

दिनांक : 29-11-95

पुणे ४

# प्रास्ताविक

भारतीय इतिहासाचा चिकित्सकपणे अभ्यास करीत असतांना एकोणिसाव्या शतकातील उत्तर कालखंडातील घडामोडींविषयी कुतूहल निर्माण झाले. या कालखंडात ब्रिटिश साम्राज्य भारतात स्थिरावले होते. पण भारतीय समाजातील विचारवंतांचा या परकीय राजवटीकडे बघण्याचा दृष्टिकोन काय होता ? या काळातील भारतीय विचारवंतांना पारतंत्र्या विषयी आणि या वेगळ्या प्रकारच्या परकीय आक्रमकाविषयी काय वाटत होते. देशातील परिस्थिती विषयी त्यांची विचारसरणी काय होती ? हे जाणून घेण्याची उत्सुकता निर्माण झाली. ब्रिटिशांनी इतर आक्रमकापेक्षा वेगळी भूमिका घेऊन राजकीय, आर्थिक दृष्टीने भारतीय वसाहत आपल्या नियंत्रणात ठेवण्यासाठी ध्येय धोरणे राबविली होती. स्वकीयांच्या गलथान, अंदाधुंदी कारभारापेक्षा ब्रिटिशांची राजवट प्रभावी व कार्यक्षम असल्याने या राजवटीचे स्वागतच सामान्य जनतेने केले होते. जुन्या अंधरूढी, परंपरा यांचा पगडा समाजावर असल्याने सामाजिक, धार्मिक जीवनात अराजकता निर्माण होवुन एक प्रकारची शिथिलता आली होती. समाज आपले "स्व"त्व हरवुन बसलेला होता. अशा समाजाला जागृत करण्याचे कठीण कार्य त्या काळात विचारवंताना, सुधारकांना करायचे होते. या निद्रिस्त समाजात स्वधर्म, स्वराज्या विषयी अभिमान निर्माण करुन त्याचप्रमाणे त्याला अंतर्मुख करुन आपले दोष दाखवुन पारतंत्र्याची जाणीव करुन देणे, असे दुहेरी कार्य प्रतिकूल परिस्थितीत करण्याचे आव्हान या विचारवंतांसमोर होते. पाश्चात्य ज्ञानाने प्राप्त झालेल्या नवीन आधुनिक दृष्टीने समाजाचा विचार करतांना या विचारवंतानी, सुधारकांनी समाज प्रबोधनाचे कार्य वेगवेगळ्या पातळीवरुन केलेले आहे.

एकोणिसाव्या शतकाच्या उत्तरार्धात भारतात जे धार्मिक, सामाजिक राजकीय प्रबोधन घडुन आले ते राष्ट्राच्या उत्थानाकरीता उपयुक्त ठरले. या

प्रबोधनाच्या काळात ज्या सुधारकांनी समाज प्रबोधनाचे कार्य केले होते त्यांचा उद्देश देशाचा सर्वांगीण विकास घडवून आणणे हा होता. त्या दृष्टीने त्यांनी सामाजिक व धार्मिक जीवनात बदल घडवून आणण्यासाठी आपल्या लेखणीचा आणि वाणीचा प्रभावी उपयोग करून समाजात चैतन्य निर्माण करण्याचे कार्य केले. महाराष्ट्रात या समाजसुधारकांची परंपरा बाळशास्त्री जांभेकरां पासून सुरू होऊन लोकहितवादी, फुले, रानडे, आगरकरांपर्यंत निर्माण झालेली दिसते. या सुधारकांमध्ये रानडे आणि आगरकरांच्या कार्याचे महत्त्व आजच्या काळातही विशेषत्वाने जाणवत असल्याने त्यांनी केलेल्या प्रबोधन कार्याची आणि विचारांची ओळख व्हावी या दृष्टीने मी प्रबंधासाठी या दोन सुधारकांच्या विचाराचा व कार्याचा तुलनात्मक अभ्यास करण्याचे ठरविले आणि त्यांच्या विचारातील समानतत्व शोधण्याचा प्रयत्न केला.

रानडे आणि आगरकरांनी समाज प्रबोधनाचे कार्य करतांना आपल्या समोर अखिल मानवी समाजाचे चित्र अभिप्रेत ठेवले होते. या दोन्ही सुधारकांनी ज्ञानप्रसार व लोकशिक्षणाचा मार्ग अनुसरून समाज प्रबोधनाचे कार्य केले होते. पाश्चात्य ज्ञानाचे महत्त्व दोघांनीही ओळखून पाश्चात्य उदारमतवादाचा पुरस्कार केला होता. पण रानड्यांनी ईश्वरवादी उदारमतवादाला आपल्या विचारात प्राधान्य दिले होते तर आगरकरांनी बुध्दी प्रमाण्यवादी विवेकवादावर भर दिलेला होता. त्यामुळे वैचारिक दृष्टीने दोघांमध्ये मतभेद असलेले आढळत असले तरी दोघांनीही सामाजिक व धार्मिक सुधारणेला अग्रक्रम दिला होता. समाजात वैचारिक जागृती योग्य मार्गाने झाली तरच राजकीय स्वातंत्र्यासाठी प्रयत्न करणे योग्य ठरेल असे त्यांना वाटत होते. कमकुवत समाजाने जर स्वातंत्र्य मिळविले तर ते सुदृढरित्या स्वातंत्र्य टिकवून ठेवण्यात यशस्वी होणार नाही याची त्यांना जाणीव होती. सर्वांगीण सुधारणातत्वांचा पुरस्कार करतांना त्यांनी राजकीय आर्थिक सामाजिक, धार्मिक, वाङ्‌मयीन, सांस्कृतिक या सर्वक्षेत्रांचा

विचार केलेला होता. आणि सशक्त नव समाजाचे चित्र रेखाटले होते. त्यांचे विचार आजही उपयुक्त आणि आवश्यक वाटत असल्यामुळे त्यांच्या सारख्या प्रमाणिक, निःस्पृह, त्यागी समाजचिंतकांची सुधारकांची गरज भारताला आजही भासते आहे. त्यांची स्वराज्यवादी भूमिका त्यांच्या विचारातून कधीच सुटलेली नाही हे त्यांच्या विचारतत्वामध्ये सतत जाणवते. त्यांच्या विचारांची व त्यांच्या कार्याची जाणीव शंभर वर्षांनंतर ही प्रकर्षाने व्हावी एवढे त्यांचे कार्य दूरदृष्टीचे ठरले होते. अशा दूरदृष्टीच्या सुधारकांच्या कार्याचे पुनर्लोकन करण्याचा प्रयत्न केलेला आहे. हा प्रबंध रानडे व आगरकरांच्या व्यक्तिमत्वाचा शोध घेण्याचा एक नम्र प्रयत्न आहे. त्यांचे कार्य आणि व्यक्तिमत्व इतके विशाल आहे की, सर्व बाजूंनी त्यांच्या व्यक्तिमत्वाविषयी परिपूर्णतेने शोध घेणे अशक्य असल्याची जाणीव सतत होत आहे. तरीपण मला समजलेले रानडे आणि आगरकर या प्रबंधात मांडण्याचा प्रयत्न उपलब्ध साधनांच्या द्वारे मी केलेला आहे.

त्यांच्या सामाजिक आणि धार्मिक विचार व कार्यावर मी जास्त भर दिला आहे. त्या प्रमाणात राजकीय व आर्थिक विचार व कार्यावर विशेष भर दिलेला नाही. या प्रबंधाच्या निमित्ताने माझे वैचारिक विश्व व्यापले गेले एवढेच समाधान मला मिळाले.

# ऋण निर्देश

या प्रबंधाचे संशोधनात्मक लेखन करतांना ज्या अनेक व्यक्तींनी आपुलकीने आणि तत्परतेने मदत केली, त्यांच्या विषयी कृतज्ञता व्यक्त करणे हे माझे कर्तव्य आहे. या प्रबंधासाठी ग्रंथ, वृत्तपत्राचे अंक आणि मासिकांचे अंक उपलब्ध करून दिल्याबद्दल खालील ग्रंथालयातील ग्रंथपाल आणि त्याचे सहकारी यांची मी अत्यंत आभारी आहे.

१) जयकर ग्रंथालय, पुणे विद्यापीठ, पुणे
२) नागपूर विद्यापीठ मध्यवर्ती ग्रंथालय, रामदास पेठ, नागपूर
३) शासकीय ग्रंथालय, सिटी पोस्ट, पुणे
४) शासकीय ग्रंथालय, विश्रामबाग, पुणे
५) गोखले ग्रंथालय, भारत सेवक संस्था, पुणे
६) भारत इतिहास संशोधक मंडळ ग्रंथालय, पुणे
७) नरसिंगदास मोर कॉलेज ग्रंथालय, तुमसर
८) मॉडर्न कॉलेज ग्रंथालय, शिवाजीनगर, पुणे
९) टिळक स्मारक ग्रंथालय, पुणे
१०) केसरी कार्यालय ग्रंथालय, पुणे
११) महाराष्ट्र साहित्य परिषद, पुणे
१२) दापोडी कॉलेज, ग्रंथालय, पुणे

माझे माननीय गुरु व्याख्याता डॉ. रेखा रानडे यांच्या सहकार्यपूर्ण व स्नेहशील मार्गदर्शनामुळे मी प्रबंधाचे लेखन कार्य यशस्वीपणे करू शकले. याबद्दल त्यांची मी ऋणी आहे. पुणे विद्यापीठाचे इतिहास विभाग प्रमुख (माजी) डॉ. चिटणीस, आणि (आजी) प्रमुख डॉ. नलावडे यांचे अमूल्य मार्गदर्शन लाभले, त्याबद्दल त्यांची मी आभारी आहे. तुमसर कॉलेजचे प्रिन्सिपल आणि गोंदिया एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्ष यांनी ही मला प्रबंधाच्या संशोधन कार्याकरीता सहकार्य केल्याबद्दल त्यांची मी आभारी आहे. आमच्या

मॉडर्न कॉलेजचे इतिहास विभाग प्रमुख प्रा.म.आ. कुलकर्णी यांच्या कडून मिळालेल्या सहकार्याबद्दल त्यांची मी आभारी आहे.. माझ्या मैत्रिणी चित्रा श्रीधर आणि माणिक कुलकर्णी यांचीही मदत मिळाल्याने त्यांची आभारी आहे. सर्वात शेवटी माझे यजमान श्री. किशोर आदमाने व मुलगा चिन्मय यांच्या सहकार्या शिवाय, प्रेरणेशिवाय मी प्रबंध लेखनाचे काम करु शकले नसते, त्यांच्या अमुल्य सहयोगाबद्दल कृतज्ञता व्यक्त करते. तसेच ह्या ग्रंथाच्या टंकलेखनाचे काम संजय कमर्शियल इन्स्टिट्युट, कर्वेरोड चे संचालक श्री. संजय साळुंखे व त्यांचे सहकारी श्री. गणेश शिंदे व इतर सहकारी कु. अनिता हसरमणी व कु. स्वप्ना गरुड यांचीही मी आभारी आहे. आणि या ग्रंथाचे आकर्षक स्वरुपात प्रकाशन करुन दिल्याबद्दल डी.जी. कॉपीयर्स व भारत बुक बाईंडर, नारायण पेठ, त्यांची ही मी आभारी आहे. अनेकांनी अप्रत्यक्षरित्या मला मदत केल्याबद्दल त्यांचीही आभारी आहे.

पुणे 25/11/95

सौ. मंदा आदमाने

Mandak

# अनुक्रमणिका


| | | पृष्ठ क्रमांक |
|---|---|---|
| १) | पार्श्वभूमी | १ - २३ |
| २) | प्रकरण पहिले<br>न्या. म.गो. रानडे आणि गो.ग. आगरकर यांचे जीवनचरित्र | २४ - ८४ |
| ३) | राजकीय आणि आर्थिक विचार व कार्य | ८५ - १६० |
| ४) | सामाजिक विचार आणि कार्य | १६१ - २६६ |
| ५) | धर्म सुधारणा विषयक विचार | २६७ - ३३७ |
| ६) | समालोचन | ३३८ - ३८० |
| | संदर्भ ग्रंथ सूची | ३८१ - ३८९ |

# प्रकरण पहिले

## पार्श्वभूमी

१९ व्या शतकापासून भारतीय समाजात ज्या सामाजिक, धार्मिक सुधारणा चळवळी निर्माण होवू लागल्या त्याचे मुलसूत्र म्हणजे ब्रिटिशांकडून मिळालेले प्रभावी पाश्चात्य ज्ञान होय. अनादी कालापासून भारतावर अनेक आक्रमणे झाली, परंतु ब्रिटिशांची सत्ता मिळविण्याची प्रवृत्ती इतरांकडून वेगळी व वैशिष्ठ्यपूर्ण ठरली. या आक्रमकांजवळ प्रगत समाजव्यवस्था, वैज्ञानिक दृष्टी, सुसंघटित प्रशासनाची योग्यता आणि दुस-यांना प्रभावित करण्याची क्षमता अतुलनीय होती. त्यांनी सावधपणे व चातुर्याने भारतातील एकेक प्रांत गिळंकृत करुन तेथे कायदयाचे प्रभावी राज्य निर्माण करुन भारताला राजकीय एकसूत्रेत बांधले होते. (राज्य व्यवस्था, आर्थिक व्यवस्था, सामाजिक संबंध, कौटुंबिक कर्तव्य, नीतीतत्वे, ज्ञानोपासना, ग्रंथ निर्मिती इ. सर्व गोष्टी धर्माशी निगडीत राहिलेल्या होत्या. धर्मजीवनाची एक चाकोरी भारतीय समाजात निर्माण झाल्याने स्थितीशीलता हा समाजाचा स्थायी भाव बनलेला होता.) सार्वजनिक जीवनात एकात्मतेची जाणीव क्षीण राहिल्याने सतत परकीय आक्रमणे झाली तरी समाजव्यवस्थेवर त्याचा फारसा परिणाम झालेला नव्हता.

पेशवाईच्या शेवटच्या काळात राजकीय, धार्मिक, आर्थिक दृष्टीने समाज रसातळाला पोहचलेला होता. ब्रिटिशांनी अशा निष्प्राण झालेल्या पेशवाईवर शेवटचा आघात करुन ३ जुन १८१८ मध्ये महाराष्ट्रात आपली सत्ता प्रस्थापित केली. आतापर्यंत राजेशाहीतील स्वैर, गलथान राज्यकारभाराची सवय झालेल्या जनतेला या आधुनिक राज्य पध्दतीने प्रभावित केले होते. त्यामुळे काही काळ भारतीय समाज ब्रिटिश राजवटीपुढे नत मस्तक झालेला होता. ब्रिटिश राजवटी विषयी लोकांच्या भावना पुढील शब्दात व्यक्त होतात. "हिन्दुस्थानातील बहुतेक भाग अनेक शतका पर्यंत मुसलमानांच्या प्रभुत्वाखाली होता. येथील मूळच्या रहिवाशांचे नागरिक हक्क व धार्मिक हक्क वारंवार पायाखाली तुडविले जात होते. जेते लोकांच्या या नित्याच्या जुलुमाविरुध्द दख्खनमधील "मराठे" नावाने प्रसिध्दीस आलेल्या लोकांना आणि ज्यांना

सध्या शीख म्हणतात त्या पश्चिम हिन्दुस्थानातील लोकांना दंड करणे भाग पडले, आणि जेव्हा मुसलमानांची सत्ता दुर्बल झाली त्यावेळी आपले स्वातंत्र्य स्थापन करण्यात त्यांना यश आले. परंतु बंगाल मधील लोकांत शारिरीक जोम नसल्याने व त्यांची कष्टाने प्रयत्न करण्याकडे प्रवृत्ती नसल्याने, जरी त्याचे रक्त वाटेल तसे सांडिले जात असे तरीही मुसलमानी अमदानीच्या अखेरपर्यंत प्रस्थापित राजसत्तेशी एकनिष्ठच राहिले. शेवटी परमेश्वराने आपल्या अमर्याद दयेने इंग्लीश राष्ट्राला या जुलमी राज्यसत्तेचे जोखड फेकून देऊन बंगाली प्रजाजनांना त्यापासून मुक्त करण्याची व त्यांना आपल्या संरक्षणाखाली आणण्याची प्रेरणा दिली".१

भारतीय जीवनाच्या सर्व क्षेत्राला धर्माने प्रभावित केले असले तरी धर्मासाठी स्वराज्य संरक्षणाची आवश्यकता असते याची जाणीव संत रामदास, शिवाजी महाराजांचा अपवाद सोडता इतर राज्यकर्त्यांमध्ये नसलेली आढळते. म्हणूनच राजकीय क्षेत्रात परकीय सत्तेचे नियंत्रण प्रस्थापित होत असले तरी समाजाने त्याचा प्रखर विरोध केलेला दिसून येत नाही पण, स्वधर्मामध्ये दुसऱ्या धर्माचे आक्रमण सहजासहजी स्विकारलेले नाही. त्यासाठी समाजातूनच धर्मरक्षक संत निर्माण झाले ज्यांनी आपल्या धर्मातील अनुष्ट आचरण बाजूला सारून मानवतावादी धर्माचा पुरस्कार केला पण अशी परंपरा राजकीय, आर्थिक क्षेत्रात निर्माण झालेली दिसत नाही. त्यामुळे भारतीय समाजाला जडत्व शतकानुशतके प्राप्त झालेले दिसते.

ब्रिटिश ईस्ट इंडिया कंपनीने सत्ता मिळविल्यानंतर भारतीय मानसिकतेचा विचार करून शिक्षणाच्या माध्यमातून वैचारिक क्रांतीने समाजव्यवस्थेतील बदल घडविण्याचा प्रयत्न केला. ब्रिटिश गव्हर्नर माउंट स्टुअर्ट एलफिन्स्टनने ईस्ट इंडिया कंपनीकडून सात कलमी शैक्षणिक योजना पास करून भारतात इ.स. १८२३ पासून अनेक शिक्षण संस्था स्थानीय व इंग्रजी माध्यमातून ज्ञान प्रसारासाठी सुरु केल्या. एलफिन्स्टनचा भारताकडे पाहण्याचा दृष्टिकोन स्पष्ट करतांना सर टॉमस मन्रोने इ.स. १८२२ मध्ये लिहिले होते की, "सर्व जगात कधीही कोणी केली नाही, असा एक प्रयोग आम्ही करीत आहोत, तो म्हणजे जीत राष्ट्रातील लोकांच्या सैन्याच्या

आधारावर आपले प्रभुत्व गाजविणे हा होय. त्याच वेळी मुद्रण स्वातंत्र्य उपभोगून त्यांनी आम्हाला हाकलून द्यावे व आपला देश स्वतंत्र करावा हा धडा आम्ही त्यांना शिकवित आहोत. स्वतंत्र वृत्तपत्रांत हृदय पावणारी एक भयंकर क्रांती आमची सत्ता अकाली उलथून पाडण्याचा कट करू लागेल." २ एलफिन्स्टन, मेटकॉफ हे मुंबई प्रांताचे गव्हर्नर उदारमतवादी दृष्टीकोनाचे होते. त्यांच्या मते समाजात सुधारणा होणे आवश्यक आहे त्यासाठी पाश्चिमात्य शिक्षण व नवीन मूल्ये स्वीकारणे आवश्यक आहे. तरी पण अस्तित्वात असलेल्या संस्थांचे महत्त्व कायम ठेवले पाहिजे.

ब्रिटिशांकडून मिळालेल्या शिक्षणाच्या प्रभावामुळे सुशिक्षितांच्या पहिल्या पिढीने ब्रिटिश साम्राज्याचे स्वागत केले. ब्रिटिश सरकारचे पाश्चात्य ज्ञान भारतीयांना देण्याचे उद्देश वेगवेगळे असले तरी या ज्ञानाच्या परिचयामुळे त्यांच्या विचारामध्ये परिवर्तन येण्यास मदत झाली. सुरुवातीला हा बदल अंधानुकरणाकडे वळलेला असला तरी पाश्चात्य ज्ञानाचे महत्त्व एतद्देशीय लोकांना पटू लागले. सरकारी नोकरीत प्रवेश मिळविणे हे पहिल्यापिढीतील अर्धशिक्षित उच्चवर्णीयांचे ध्येय बनले होते. "दोन बुके वाचता आली व चार चिर गुड्या ओढता आल्या म्हणजे कानावर पागोटे, खिशात रुमाल आणि हातात सोटा असे वेश पुष्कळ घेतात"३ असे लोकहितवादींनी त्याचे वर्णन केले आहे. पाश्चात्य शिक्षणामुळे भारतीय समाजात नवचैतन्याचे वारे निर्माण होवू लागले. या ज्ञान प्रसाराच्या कार्याला तत्कालीन धर्ममार्तंडांचा उपद्रव होत असला तरी नोकरी मिळविण्याचे उपयुक्त साधन म्हणून हळूहळू इंग्रजी शिक्षणाकडे समाज वळू लागला. नवशिक्षित तरुण युरोपिय राष्ट्रांच्या जीवनाची तुलना आपल्या समाज जीवनाशी करू लागले तेव्हा त्यांना आपल्या समाजातील दोष, गतीहीनता प्रकर्षाने जाणवू लागली. त्यांच्या मध्ये आत्म परिक्षणाची दृष्टी पाश्चात्य ज्ञानाने प्राप्त झाल्याने धर्म, समाजकारण, राजकारण, अर्थकारण, साहित्य वाङ्मय, स्त्री, परंपरा या सर्व दृष्टिकोनातून पाश्चात्यांशी तुलना करतांना आपल्या समाजात परिवर्तन घडून आले पाहिजे असे त्यांना वाटू लागले. १९ व्या शतकापासूनच भारतीय

समाजात पाश्चात्य शिक्षणाच्या प्रभावामुळे वैचारिक प्रबोधनाला, पुनरुज्जीवनाला सुरवात होवू लागली. या काळात जी विचार जागृती होवू लागली ती केवळ धार्मिक समाजापुरती मर्यादित न राहता आर्थिक व राजकीय बाबतीतही निर्माण होवू लागली. पण सामाजिक धार्मिक दृष्टया हा प्रबोधनाचा काळ महत्वपूर्ण ठरला. शिक्षण आणि दळणवळणाच्या साधनांमुळे धर्मभावनेला तडा जाण्यास सुरवात होऊन परिस्थितीनुसार होणारे परिवर्तन भारतीय समाजाला वैचारिक संघर्षात गुरफटू लागले. समाजावर होणाऱ्या ज्ञान प्रसाराच्या प्रभावाबद्दल न.र. फाटक लिहितात की, "इंग्रजांनी चोहोंकडे शाळा स्थापन करून विद्येचा ओघ समाजाच्या अगदी कनिष्ठातल्या कनिष्ठ स्तरापर्यंत पोहचविण्याची व्यवस्था केली. ब्राम्हण वर्गाच्या जातिविशिष्ठ मुखात वावरणाऱ्या प्राचीन षट्शास्त्रादि कर्णगोचर विद्येऐवजी लिहिण्या वाचण्याचे संस्कारोपयोगी दृष्टीगोचर ज्ञान प्रत्येकास मिळण्याची सोय झाल्याने धर्माच्या रूढ कल्पनांविषयी लोकांचा विश्वास उडत चालला होता." धर्मातील श्रद्धास्थाने पारलौकिक दृष्टी परंपरा कर्मकांड, ऐहिक जीवनाविषयी उदासीनता, उद्योगहीनता या सर्वांवर आघात होऊन विज्ञानप्रणीत समाजाचा पुरस्कार करणारा वर्ग समाजात निर्माण होवू लागला. आधुनिक शिक्षण घेतलेल्या सुशिक्षितांना आपल्या समाजरचनेतील अवनती स्थितीप्रियता लक्षात आल्यानंतर त्यांनी मुद्रणकलेचा उपयोग करून नियतकालीकाच्या आधारे आपले प्रगत विचार समाजापुढे मांडण्यास सुरवात केली. परंतु या सुरवातीच्या काळात विचारवंतांना वैचारिक संघर्ष मोठया प्रमाणात करावा लागला त्यातूनच भारतात सामाजिक प्रबोधनाला सुरवात झाली.

ब्रिटिशांच्या सुरवातीच्या काळात त्यांच्या व्यापारी व शोषणिक धोरणामुळे भारतात नव्याने व्यापारी व सुशिक्षित मध्यम वर्ग निर्माण होऊ लागला. इ.स. १८३० च्या सुमारास या वर्गाने ब्रिटिश साम्राज्याचे श्रेष्ठत्व मान्य करून त्याचे गुणगान करण्यात धन्यता मानली व त्यांची राजनिष्ठेने सेवा केली आणि सामाजिक व धार्मिक बंधनाविरुध्द बंड करण्यात अग्रेसर झाला "ब्रिटिशांना हिन्दुस्थान जिंकताना आणि तो जिंकल्यावर आपली सत्ता सुस्थिर

करतांना या देशात एका सामाजिक क्रांती घडवुन आणिली होती व एका वर्गाला जिंकतांना दुसऱ्या वर्गाला हाताशी धरुन वर आणल्याचा आभास तरी उत्पन्न केला होता. अर्थात हिन्दुस्थान जिंकुन केवळ राज्य क्रांतीच केली नाही, तर सर्वांगीण समाजक्रांती करण्याचे बिजारोपण केले."¹]

भारतात समाज प्रबोधनाचे कार्य एकोणिसाव्या शतकाच्या सुरवातीपासुन झाले असले तरी त्या काळात राष्ट्रीयत्वाची भावना आजच्या प्रमाणे प्रज्वलीत झालेली नव्हती. राजाराम मोहन रॉय यांच्या कार्यापासुन समाज प्रबोधनाला सुरवात होऊन न्यायमुर्ती रानडे यांच्या काळापर्यंत भारतीय राष्ट्रवादाची भावना सुप्तावस्थेतच होती.] या सुधारणा वादी लोकांनी समाजाच्या सर्वांगीण सुधारणेचे कार्य करतांना आपल्या विचारांमधून आधुनिक भारतीय राष्ट्रीयत्वाला जन्म दिला होता. त्यांच्या प्रचार कार्यातुन आणि ब्रिटिशांच्या एकसंधी साम्राज्यवादी धोरणामधून हळुहळु राष्ट्रीयत्वाची भावना जोपासली गेली. त्यांनी सुरु केलेल्या समाज प्रबोधनामुळे, सुधारणावादी विचारांनी भारतात विचारक्रांतीची बीजे रोवली जाऊन सर्वांगीण विकासाने नव्या विशेष समाजाची उभारणी करण्याचे ध्येय या सुधारकांनी आपल्या समोर ठेवले होते. त्यांनी समाजाला अंधारयुगातुन बाहेर काढुन नवी दिशा दाखविण्याचे महान कार्य केले.]

राजा राम मोहन रॉय (इ.स. १७७२-१८३२) हे भारतातील आद्य समाज सुधारक मानले जातात. त्यांच्या काळात समाज जुन्या झुरटलेल्या विचारांनी, कर्मकांडाने आणि अंधविश्वासाने भारलेला होता, अशा समाजाला आपले पुरोगामी विचार सांगण्याचे धाडस त्यांनी केले होते.] अनिष्ट ते टाकाऊ आहे. समाजामध्ये एकात्मता निर्माण करण्यासाठी पाश्चात्य ज्ञानाची आवश्यकता आहे, धर्मविचारांमध्ये विचार क्रांती घडवुन आणली तर ख्रिश्चन धर्माचे हिन्दु धर्मावरील आक्रमण थोपवुन धरणे शक्य होईल, असे विचार लोकांना पटवुन देण्याचा प्रयत्न केला. त्यांनी धर्म सुधारणेवर भर देवुन समाजाचा सर्वांगीण विकासाच्या दृष्टीने आपल्या कार्याचे ध्येय निश्चीत केले होते.] डॉ. भांडारकरांच्या शब्दात राजाराम मोहन रॉयचे विचार मांडायचे

झाल्यास, "जी गोष्ट व्यक्तीची तीच देशाची, खरी उन्नती व्हावयाची असेल तर प्रथम उन्नत धर्माचा प्रसार झाला पाहिजे ;"[६] या उद्देशाने राजा राम मोहन रॉय यांनी एकेश्वरवादाचा पुरस्कार ब्राम्हो समाजाची स्थापना इ.स. १८२८ मध्ये करुन लोकांच्या धर्मविचारामध्ये परिवर्तन आणण्याचा प्रयत्न केला. "संवाद कौमुदी" या आपल्या वृत्तपत्रातून त्यांनी सुधारणावादी विचार मांडले. Gift of Monotheists आणि Precepts of Jesus या ग्रंथाद्वारे मुर्तीपूजेला विरोध करुन एकेश्वरवाद, नीती, सद्सद् विवेकबुद्धी, बंधुता या तत्वांचा पुरस्कार केला. त्यांच्या पुरोगामी विचारांमुळे त्यांना घरातून व सनातनी लोकांकडून विरोध सहन करावा लागला. त्यांनी शिक्षणक्षेत्रात स्थानिक भाषांना प्रोत्साहन देवून अनेक शैक्षणिक संस्थेला सहकार्य दिले. इ.स. १८२६ ला वेदान्त कॉलेज काढून धर्मशास्त्र, तत्वज्ञानाच्या शिक्षणाबरोबरच त्यांनी पाश्चात्य भौतिक ज्ञान मिळावे यासाठी प्रयत्न केले. राजा राम मोहन रॉय यांना सती प्रथा म्हणजे स्त्रीदास्यत्वाचे प्रतीक वाटत होते. त्यांच्या मते, सती जाणाऱ्या स्त्रियांच्या निकट वारसांना त्यांच्या मृत्यू पासून फायदा होत असल्यामुळे त्यांनी आपल्या पतीच्या चितेवर जाळून घ्यावे याबद्दल त्यांचे मन वळविल्याची अनेक उदाहरणे अर्जदारात प्रत्यक्ष किंवा विश्वासु साक्षीदारांच्या सांगण्यावरुन माहीत आहेत.... कोणत्याही शास्त्राच्या दृष्टीने किंवा जगातील कोणत्याही लोकांच्या सारासार विचाराने पाहिले तरी हे सर्व खून आहेत."[७] अशा अमानवीय प्रथे विरुध्द लढा उभारुन ब्रिटीश सरकारच्या मदतीने सती प्रथा कायद्याने बंद पाडण्यात यश मिळविले. राजा राम मोहन रॉय यांनी सर्व प्रथम धर्म सुधारणा नंतर समाज सुधारणा व त्यानंतर राजकीय व आर्थिक सुधारणांकडे क्रमाक्रमाने सर्वांगीण सुधारणेचे विचार आपल्या लेखनातून मांडून समाज सुधारणेचे कार्य केले होते.

नव युग धर्म मध्ये श्री. स.कृ. फडके यांनी त्यांच्या बद्दल म्हटले की "या युगाच्या आरंभी पाश्चात्य शिक्षणाने, नास्तिक व पाखंडीपणाची अशी भयंकर लाट या देशात उसळली होती की तिने किस्पेकांच्या मताप्रमाणे लवकरच

सर्व देश आक्रमून हिन्दूधर्म अमूलाग्र उखडून काढला असता, परंतु ईश्वराच्या अचिंत्य नियतीमुळे त्यावेळी राजा राम मोहन रॉय हा एक अलौकिक पुरुष निर्माण झाला व त्याने एकेश्वरी पंथ नामक एक नवीन लाट उत्पन्न केली, त्यामुळे पुढे येणारी आपत्ती टळली"[८] राजा राम मोहन रॉयांनी बंगाल मध्ये पाश्चात्य ज्ञानाने नवीन दृष्टी प्राप्त झालेल्या विचारांनी हिन्दूधर्म विचार, आचारात क्रांती करुन आधुनिक भारताची निर्मिती करण्याचा प्रयत्न केला होता. ज्याप्रमाणे बंगालमध्ये राजाराम मोहन रॉय यांनी समाज कार्याला सुरवात केली त्याच प्रमाणे महाराष्ट्रातही बाळशास्त्री जांभेकरांनी जनजागृतीचे कार्य सुरु करुन समाजप्रबोधन केले होते. बाळ शास्त्री जांभेकरांना (इ.स. १८१२-१८४६) पाश्चात्य शिक्षणाच्या अध्ययनाने नवी दृष्टी प्राप्त होवून त्यांनाही आपल्या समाजातील शिथिलता जाणवली होती. कॉलेज प्रोफेसर, एज्युकेशनल इन्स्पेक्टर, प्राचार्य इ. पदावर कार्य करुन शिक्षण विषयाच व ऐतिहासिक संशोधनाबरोबर त्यांनी समाज कार्य केले होते. पाश्चात्य ज्ञानाच्या आधारे लोक जागृती करुन आपला समाजही प्रगतीशील बनवू शकतो अशी त्यांची खात्री होती म्हणून त्यांनी ज्ञानप्रसार व लोक जागृती असे उद्देश आपल्या जीवनाचे ध्येय ठेवून इ.स. १८३२ ला "दर्पण" हे वृत्तपत्र आणि १८४० ला "दिग्दर्शन" ह्या मासिकाद्वारे लोक शिक्षणाचे कार्य केले "ज्ञान हीच मानवी जीवनाची खरी शक्ती आहे व या शक्तीच्या बळावर आपण आपले धार्मिक, सामाजिक, राजकीय, आर्थिक प्रश्न सोडवुन , आपल्यामध्ये सुधारणा घडवुन पाश्चात्यांच्या बरोबरीचे स्थान मिळवु शकतो", असा त्यांना आत्मविश्वास होता.

राजाराम मोहन रॉय यांच्या प्रमाणे एखादा पंथ स्थापन करुन धर्म सुधारणा करण्यावर त्यांचा विश्वास नसला तरी धार्मिक, सामाजिक सुधारणांबाबत त्याचे विचार पुरोगामी होते. दर्पणमधून त्यांनी विविध विषयांवर लेखन केले होते. "हिन्दू विधवांचा पुनर्विवाह, शेतकरी लोकांत सरकारचे उत्तेजन, या देशाचे लोकांतून मोठ्या सरकारी जागेसाठी नेमणुका", इ. अनेक राजकीय सामाजिक विषयांवर लेख लिहून लोक जागृतीचे कार्य केले होते. वृत्तपत्राचे माध्यम सुधारणा करण्यास किती प्रभावी आहे याचे विश्लेषण करतांना त्यांनी इ.स. १८३२ ला

सुरु केलेल्या दर्पण वृत्तपत्राच्या पहिल्या लेखात ते म्हणतात की, "ज्या देशातून आपले सांप्रतचे राजकर्ते येथे आले, त्या देशात हे एथे आल्याचे पूर्वी फार दिवसापासून या आश्चर्यकारक छापयंत्रांची कृत्ये चालु होती. त्यापासून मनुष्याचे मनातील अज्ञानरुप अंधकार जाऊन त्यावर ज्ञानरुप प्रकाश पडला. या सज्ञान दशेस येण्याचे साधनांमध्ये इतर सर्व देशांमध्ये युरोप देश वरचढ आहे. नियतकालिक लेखांपासून जे स्वार्थ होतात, ते आम्हास सांप्रतचे राजाचे द्वारे माहित झाले. ज्या देशामध्ये असा लेखांचा प्रचार झाला आहे, तेथे तेथे आंतर्व्यवहारामध्ये तसेच बाह्य व्यवहारामध्ये शाश्वत हित झाले आहे. यांपासून बहुत वेळ विद्यांची वृध्दी झाली आहे. लोकांमध्ये निती स्थास आली आहे. केव्हा केव्हा प्रजांनी राजाचे आज्ञेत वर्तावे आणि राजांनीही त्यावर जुलुम करु नये अशा गोष्टी यांपासून घडल्या आहेत. अलिकडे कित्येक देशांत धर्मरीती आणि राज्यरीती यांत जे चांगले आणि उपयोगी फेरफार झाले आहेत, त्यांसही थोडेबहुत हे लेख उपयोगी पडले आहेत."[१] या शब्दामध्ये त्यांनी वृत्तपत्राचे महत्व प्रतिपादित केले होते. त्यांच्या काळातही "बॉम्बे हेरॉल्ड" व बॉम्बे कुरियर" सारखे इंग्रजी वृत्तपत्रे होती. समाजहिताच्या दृष्टीने जन जागरणाचे कार्य मराठीतून वृत्तपत्र काढुन आदर्श निर्माण केल्यामुळे तर रावबहादुर चंदावरकरांनी त्यांना आधुनिक महाराष्ट्रातील आद्यऋषी म्हटले आहे.

महाराष्ट्रातीलच नव्हे तर भारतातील समाज सुधारणेला ब्रिटीश साम्राज्याची शासन पध्दती, इंग्रजी शिक्षण आणि ख्रिस्ती धर्माचा प्रसार ह्या गोष्टी कारणीभुत ठरल्या होत्या. ख्रिस्ती धर्मोपदेशकांनी मुंबई, पुणे, नगर, नाशिक इ. ठिकाणी आपली प्रचार केंद्र उघडुन हिन्दु धर्मावर टिका करुन आपल्या धर्माचा प्रसार करु लागल्याने प्रथम समाजातील सनातनी वर्गाला हे आक्रमण थोपवुन धरण्याची आवश्यकता वाटु लागली. लक्ष्मण शास्त्री, मोर भट दांडेकर, नारायणराव कृष्ण शास्त्री साठे सारख्या धर्म पंडितांनी पुढाकार घेवुन आपल्या धर्माची माहिती लोकांना देवुन ख्रिस्ती धर्माच्या आक्रमणा विरुध्द पाऊल उचलले.

आपल्या धर्मावरील दोषांचे खंडन करावे या हेतूने मुद्रणाचा वापर करून मोरभट दांडेकर यांनी "उपदेश चंद्रिका" मासिक सुरू केले होते. त्यांनी ख्रिस्ती धर्माला कसून विरोध केला पण त्यांचा धर्माभिमान व पुराणमतवाद ऐतिहासिक घडामोडींचा अर्थ लावण्यात व पाश्चात्य राष्ट्रांच्या उत्कर्षाचे मर्म जाणण्यात पूर्णपणे अपयशी ठरला. त्यामुळे त्यांचे कार्य धर्मरक्षण करण्यात अपुरे ठरले. धर्म मानवी जीवनात संपूर्णपणे व्यापला असला तरी व्यावहारिक जीवनासाठी निरुपयोगी ठरला. भौतिक जीवनात धर्माचा वापर राजकीय आर्थिक, सामाजिक क्षेत्रात उत्कर्षाचा मार्ग दाखविणारा सहाय्यक ठरला नाही. एलफिन्स्टन-माल्कम-मेकॉले यांनी पुरस्कारिलेल्या शिक्षण प्रसाराच्या मराठी ग्रंथ निर्मितीच्या योजनेत भाषांतराच्या निमित्ताने काही शास्त्री पं. केशनाथ शास्त्री, रामचंद्र शास्त्री जान्हवेकर, जगन्नाथ शास्त्री क्रमवंत, बापू छत्रे, हरी केशवजी, बाळशास्त्री जांभेकर, गंगाधर शास्त्री फडके, दादोबा पांडुरंग इ. मंडळींनी शालोपयोगी साहित्य निर्माण करून एका अर्थाने महाराष्ट्रातील शिक्षण पद्धतीचा पाया घातला. भाषांतराच्या निमित्ताने काही इंग्रज अधिकाऱ्यांच्या हाताखाली (डॉ. कॅरे, कॅन्डी बंधू, जर्व्हिस, पोलसवगैरे ) काम करण्याची संधी मिळाली. त्यांच्या संपर्कामध्ये राज्यकर्ते आपल्यापेक्षा कितीतरी प्रगत आहे हे जाणवले. त्यांच्या प्रमाणेच शास्त्र आणि व्यवहार यांचा समन्वय साधला पाहिजे. आपल्या जीवनात त्यासाठी आमुलाग्र बदल झाला पाहिजे. धार्मिक चालीरीती व सामाजिक विचार सरणीत बदल केला पाहिजे, याची जाणीव होवून सामाजिक सुधारणेसाठी आपल्या ज्ञानाचा उपयोग करण्यास पुढे सरसावले त्यात बाळशास्त्री जांभेकर अग्रगण्य होत. पाश्चात्य विद्येची उपयोगिता जांभेकरांनी मे १८४० च्या दिग्दर्शन" मासिकात पुढील शब्दात व्यक्त केली" सांप्रत जेणे करून इंग्लिश लोकांचा अमंल दूर व्हावा अशी कोणतीही गोष्ट झाली तरी तिचा खेद मानू नये. कारण इंग्लंडातील सरकार येथील सरकारकरवी व इंग्लीश लोकांकरवी या देशाचे लोकांस विद्या शिकविण्याविषयी श्रम करीत आहेत. तेव्हा या प्रमाणे या देशाचे लोकांस विद्या शिकविण्याने असे होईल की, त्यास आपले राज्य करण्याचे सामर्थ्य येईल व कोणी लोकांस आपले राज्य आपले-राज्य करण्याचे सामर्थ्य असता ते आपण

राज्य न करता दुसऱ्या लोकांच्या ताबेत राहिले असे कोठे बखरांमध्ये दिसून येत नाही. त्याप्रमाणेच या देशात घडून यावे, यात इंग्लिश लोक व या देशाचे लोक या उभयताचे कल्याण आहे."[१०] आपल्या लेखनातून आपल्या वास्तव स्थितीची जाणीव करून देऊन परकीयांकडून चांगले ते घेण्याचा उपदेश त्यांनी लोकांना केला होता. पाश्चात्य विद्येच्याच प्रभावाने आपण आपली उन्नतावस्था प्राप्त करू शकतो असा त्यांचा ठाम विश्वास होता. पाश्चात्य ज्ञानाचा पुरस्कार करून त्यांनी विज्ञानाच्या अभ्यासावर भर दिला होता. आपल्या सामाजिक कार्यात त्यांनी ज्ञानप्रसारावर आपले लक्ष केंद्रित केले होते. ते दर्पण मधील एका लेखात म्हणतात की "भौतिक शास्त्रे आणि व्यवहारोपयोगी कला कौशल्ये याकडे आपण शतकानुशतके दुर्लक्ष केले. आपल्या ज्ञानोपासनेच्या मुळाशी एक तर ब्रह्मजिज्ञासा असे किंवा धर्म जिज्ञासा असे... त्यामुळे जगात आज आपण मागे पडलो आहोत. पण अजूनही आपल्याला हे अंतर तोडून इतर देशांच्या बरोबर येता येईल. ज्ञान ही कोणत्याही एका देशाची मक्तेदारी नाही. माणसे इकडून तिकडून सर्वत्र सारखीच असतात. आपण नेटाने प्रयत्न केला, तर आपल्या समाजातही स्वतंत्र बुद्धीचे संशोधक निघू शकतील"[११] असा विश्वास व्यक्त करतांना मात्र विद्या संपादन करतांना आपले सत्व विसरून अंधानुकरण करू नये.आपल्या उज्वल परंपरेतील सत्व टिकवून आपले वेगळेपण टिकविता आले पाहिजे असे त्यांनी ठामपणे सांगितले होते.

जांभेकरांनी स्त्री शिक्षण पुनर्विवाह इ. स्त्रियांच्या प्रश्नावर चर्चा करून सामाजिक सुधारणेत आस्था दाखविली होती पण त्यांच्या कर्तृत्वाला मर्यादा पडलेल्या होत्या. त्यांचे अल्पकालीन जीवन त्याचप्रमाणे स्वतःचे कुटुंब व सभोवतालची परिस्थितीचा विचार करता ते "प्रगतशील व्यवहारवादी" सुधारक ठरले. ख्रिस्ती धर्माच्या बाबतीत त्यांचे विचार "कऱ्या धर्माला राज सत्तेच्या आधाराची गरज भासू नये,स्वतःच्या बळावरच कुठेही त्याने

आपला प्रभाव पाडावा"[१२] संपूर्ण सामाजिक व धार्मिक सुधारणा हेच त्यांच्या प्रबोधनाचे ध्येय होते.

जांभेकरांच्या विचारामध्ये समतोलपणा, सौम्यता होती पण विष्णुबावा ब्रम्हचारी (इ.स. १८२५-७१) हे आक्रमक वृत्तीचे होते. वैदिक धर्मावर त्यांचा विश्वास होता. त्यांनी लेखन, चर्चा भाषण आणि वाद विवादाद्वारे ख्रिस्ती धर्मावर टिका करुन त्यांच्या धार्मिक आक्रमणाचा जागरुकतेने, हंबीरपणे प्रतिकार करण्याचा उपदेश केला. संन्यासी वृत्तीच्या बुवांचे खरे नाव विष्णू भिकाजी गोखले होते. वैराग्यवृत्तीच्या ह्या व्यक्तीने वेदांना धर्मशास्त्र मानले होते. स्वधर्माभिमान, लोकहिताची तळमळ, सडेतोडपणामुळे त्यांच्या व्याख्यानांचा प्रभाव लोकांवर पडत असे. बालावृध्द विवाह, बहुपत्नीकत्व विवाह, सती प्रथा इ. अनिष्ट चालीरीतींचा निषेध करुन त्यांनी स्त्रीशिक्षण, प्रौढविवाह, पुनर्विवाह, घटस्फोट, मंदिर प्रवेश, शुध्दीकरण, जल पर्यटन इ. गोष्टींचा त्यांनी सतत पुरस्कार करुन आपल्या प्रभावी वक्तृत्वाने समाजात खळबळ निर्माण केली होती. पण त्यांच्या विक्षिप्त स्वभावामुळे त्यांना अनुयायी वर्ग निर्माण करता आला नाही.

आपल्या "वेदोक्त धर्म प्रकाश" या ग्रंथामध्ये वेद प्रमाण्याला महत्व दिले असले तरी समकालीन प्रज्ञावंताचा अनुभव, अंतःप्रेरणा युक्तीवादाला प्रमाण मानले होते. पुरोहित वंशपरंपरा त्यांना त्याज्य वाटत होती. न्यायाधिशाने ब्राम्हण व महारास सारखीच शिक्षा द्यावी. तीस वर्षांच्या वरील पुरुषाने बालिकेशी विवाह करु नये, विवाह नियम कालपरत्वे चालावीत असे त्यांचे मत होते.[१३] कालबाह्य झालेल्या धर्म ग्रंथातील शब्दांचा किस काढण्यापेक्षा त्या त्या काळातील द्रष्टया पुरुषांचा अनुभव प्रमाण मानला पाहिजे. असे त्यांना वाटत होते. जुन्या पठडीतील शास्त्रार्थ निर्णयाची पध्दत त्यांना मान्य नव्हती. अशा विद्वज्जडते मुळेच आपल्या देशातील वेदकालीन अत्युत्तम व्यवहार सुधारणा, नीती व धर्मस्थिती यांची दुर्दशा

झाली आहे. वैराग्य संपन्न साक्षात्कारी पुरुषालाच आपल्या अधिकारवाणीने वेदोक्त धर्माचे सत्यस्वरुप सांगता येईल मग त्याने प्रत्यक्ष ग्रंथांचे अध्ययन केले असो की नसो. कारण मंत्रद्रष्टया ऋषींचा अनुभव आणि आत्मज्ञानी पुरुषाचा अनुभव सारखाच असतो त्यांच्या चिंतनातून आणि बोलण्यातून आपोआप सशास्त्रता येते."[१४] अशी विष्णुबाबांची विचारसरणी होती. त्यांनी वैदिक धर्माचे हस्य समजावून सांगण्याचे त्याचे प्रयत्न समाजहितासाठी होते. त्यांनी वाद विवाद, व्याख्यानाद्वारे ख्रिस्ती मिशन-यांच्या धर्मप्रचारास आळा घालण्याचा जोरदार प्रयत्न केला होता. त्याचप्रमाणे हिन्दुधर्माचे पुनरुज्जीवन करण्याचा प्रयत्न केला होता ब्रम्हचारींच्या संबंधात आपल्या समाजात ब-याच सुधारणा झाल्या पाहिजेत त्या सुधारणा करण्यासाठी पाश्चात्य संस्कृतीचा आधार घेण्याची गरज त्यांना वाटत नव्हती आपल्या प्राचीन संस्कृतीतून समाजाच्या ऐहिक अभ्युदयाचा मार्ग उपलब्ध होऊ शकेल असे त्यांना वाटत होते. समाजसत्तेचे स्वरुप त्यांनी पुढील शब्दात व्यक्त केले" सर्व प्रजेकडून सर्व जमिनींची लागवड करवावी ... आणि अनेक प्रकारची फळे, कंद, भाज्या, अन्न वगैरे उत्पन्न करुन गावोगाव कोठारे भरुन ठेवावी व त्यातून सर्व गावक-यांनी पोटास लागेल तितके अन्न न्यावे व जनावरांस चारा न्यावा... आगगाडया व तारायंत्रे गावोगावी असावी व सर्व प्रकारच्या कारखानदारांनी व शेतक-यांनी व राजाने एक सारखे अहिंसक खाणे खावे व ते सर्वांनी एकाच कोठारातून नेऊन खावे"[१५] अशा प्रकारचे साम्यवादी विचार त्यांच्यात दीर्घ चिंतनाने आले होते. त्यांची प्रवृत्ती अध्यात्मिक असली तरी त्यांनी ऐहिक जीवनही तितकेच महत्वपूर्ण मानले होते व ऐहिक जीवन प्रवाहित असावे असे त्यांना वाटत होते.

ब्रम्हचारीप्रमाणेच धर्मसुधारणा व समाजसुधारणेचे उद्देश निश्चीत करुन मुंबई मध्ये १८५० मध्ये "परमहंस सभा" राम बाळकृष्णांच्या अध्यक्षतेखाली स्थापन करण्यात आली. दादोबा पांडुरंग तर्खडकर (१८१४-८२) हे ह्या सभेचे प्रवक्ते व मार्गदर्शक होते. त्यांच्या विचाराचे "नीतीपूर्वक सप्रेम ईश्वरभक्ति

हाच धर्म" हे मुख्य सूत्र होते. ईश्वराचे पितृत्व व मानवाचे भ्रातृत्व यांच्यावर धर्मविचारांची उभारणी झालेली आहे असे त्यांना वाटत होते. धर्मात अंतःप्रवृत्तीला महत्व आहे बाह्य उपचार गौण आहेत जर एखादाचे धर्माचरण दुस-यांना अपायकारक होत असल्यास असे आचार सक्तीने बंद पाडले पाहिजेत. सहिष्णुता दृष्टीने दुस-यांच्या धर्माकडे पाहिले पाहिजे. पारमार्थिक धर्म हा शाश्वत असून व्यावहारिक धर्म हा कालामानाप्रमाणे बदलणारा आहे. त्याचा परमार्थाचा प्रत्यक्ष संबंध नाही. आपले व्यवहार चाली रीती, आचारधर्मात कालानुसार प्रसंगानुसार समाजहितासाठी बदलले पाहिजेत. ज्या प्रमाणे सभोवतालची सृष्टी कालानुपरत्वे बदलत असते तेव्हा लोकव्यवहार नेहमीच सर्वत्र एकसारखा चालला पाहिजे असा नियम धर्मशास्त्रातही नाही. हे व्यावहारिक नियम त्या त्या काळातील विद्वान, न्यायी राजकीय पुरुषांचे अनुकरण करुन लोक व्यवहारात सुलभता आणावी, त्यात जे सर्वासाठी प्रतिकूल असेल ते त्याज्य करावे. ज्या नियमांत राजकीय संबंध नसेल व ज्या पासून लोक व्यवहारात अडचण येत नसेल त्यांचा त्याग अथवा ग्रहण करण्यास व प्रत्येकजण समर्थ आहे. असे विचार दादोबांनी आपल्या "धर्मविवेचन" या पुस्तकात लिहिले आहेत. दादोबांनी ही एकेश्वरवादाचा पुरस्कार करुन धर्म ग्रंथ ईश्वर निर्मित नसून मानवनिर्मित आहेत असे स्पष्ट केले, त्यांच्या परमहंस सभेच्या आचारसंहितेत जातीभेद पाळू नये असा महत्वपूर्ण नियम ठेवलेला होता. मनुष्याच्या कर्तृत्वानुसार, योग्यतेनुसार त्या व्यक्तीला समाजात स्थान मिळावे जातिभेद नष्ट झाल्याशिवाय समाजाची सुधारणा होणे अशक्य आहे जातीबंधने ही मनुष्य निर्मित असल्यामुळे अन्नोदक व्यवहार, विवाह व व्यावसाय या संबंधीचे नियम समाजोत्कर्षासाठी बाधक आहेत राजकीयदृष्टया, प्रत्यक्ष व्यावहारिक जीवनात ते त्याज्य मानले जावे. या कृत्रिम बंधनाच्या पाशातून मुक्त झाल्याशिवाय ऐहिक व पारमार्थिक उन्नती होणे अशक्य आहे असे त्यांचे मत होते.[१४] त्याचप्रमाणे त्यांचे स्त्री शिक्षण प्रौढविवाह, पुनर्विवाह, एकपत्नीव्रत या विषयीचे विचार उदारमताचे होते. त्यावेळचा समाज कट्टर सनातनी असल्याने समाजाने त्यांना विरोध केला होता. दादोबा व त्यांच्या परमहंस सभासदामध्ये धर्म सुधारणेची तळमळ असली तरी त्यासाठी लागणारे

लागणारे लोकोत्तर मनोधैर्य त्यांच्या मध्ये नव्हते. ते प्रत्यक्ष सभेत भाग घेत नसत. त्यांच्या सभा गुप्त राहत. पण समाजात वावरुन प्रत्यक्ष कार्य करण्याचा प्रयत्न सामाजिक बहिष्काराच्या भितीने केले नाही. त्यामुळे परमहंस सभेचे अस्तित्व इ.स. १८६० मध्ये संपलेले दिसते. त्यांच्या या सामाजभिरु प्रवृत्तीवर टिका करतांना "जे लोक हिन्दी सौकिकांत दक्ष आहेत व जे फार सावधगिरीने वागतात त्यांशी तुलना केली असता हे लोक आमच्से अविचारी आणि उतावळे दिसतात खरे"[१७] या शब्दात भाऊ महाजनांनी त्यांच्या व्यक्तित्वाबद्दल स्पष्ट अभिप्राय व्यक्त केला.

भाऊ महाजन (इ.स. १८१८-९०) यांनी गरीबावस्थेतुन आपले शिक्षण घेऊन समाजकार्य करण्याचे ध्येय ठेवले होते. २४ ऑक्टो. १८४१ ला "प्रभाकर" हे वृत्तपत्र काढून सामाजिक, राजकीय, धार्मिक, सांस्कृतिक विषयांवर प्रगतीशील विचार मांडून समाजातील अनिष्ट परंपरा नष्ट करण्याचा आग्रह धरला होता. समाज प्रबोधनाचे कार्य वृत्तपत्र व "धूमकेतु", "ज्ञानदर्शन" त्रैमासिक या मासिकाद्वारे लोकांना आधुनिक जगाचा परिचय करुन देण्याचा प्रयत्न केला होता. लोकहितवादींच्या "शतपत्रांना" आपल्या "प्रभाकरात" अग्रस्थान देऊन समाजसुधारणेच्या अप्रत्यक्ष कार्याला सुरवात केली होती. सरकारवर निर्भिडपणे टिका करणारे भाऊ महाजन दुर्लक्षित राहिले. त्याच प्रमाणे डॉ. भाऊ दाजी, नाना शंकर सेठ यांनी समाज सुधारणेच्या कार्यात विविध क्षेत्रात महत्वपूर्ण अनेक [illegible] हातभार [illegible] कामगिरी बजावली होती. नाना शंकर शेटांनी शिक्षण क्षेत्रा मार्फत तर [illegible] डॉ. दाजींनी वैद्यकीय क्षेत्रात राहून समाज प्रबोधनाचे कार्य केले होते. स्त्री-शिक्षण व त्यांच्या समस्यांवर विचार प्रबोधनाचे कार्य करुन समाजाचे आरोग्य सुधारण्याचा प्रयत्न केला होता. आयुर्वेदातील [illegible] करून [illegible] करून देण्याचा प्रयत्न केला.

महाराष्ट्राच्या समाजसुधारकांच्या मालिकेतील आगळे वेगळे व्यक्तित्व म्हणजे ज्योतिबा गोविंद फुले (इ.स. १८२७-१८९०) यांचे होते. बहुजन समाजासाठी सामाजिक व आर्थिक सुधारणांची आवश्यकता पटवुन देतांना त्यांच्या प्राथमिक गरजांकडे लक्ष देणारे पहिले सुधारक होय. ब्रिटिश राजवटीच्या वास्तव स्वरुपाचे

त्यांना आकलन झाले नसले तरी बहुजन समाजाच्या उद्धाराची नवीन दिशा त्यांनीच प्रथम हिन्दुसमाजाला दाखवून दिली. बहुजन समाजाला शिक्षणाचे महत्व पटवून देऊन त्यांनी गोवंडे, परांजपे आणि वाळवेकर या मित्रांच्या साहाय्याने दलितांसाठी शाळा सुरु केली. महाराष्ट्रामध्ये अस्पृश्यता निवारणाची चळवळ त्यांनीच प्रथमतः सुरु केले. उपेक्षित व दलित समाजातील लोकांच्या शिक्षणाचा पाया घालुन भारतात पुढील काळात झालेल्या मोठया समाजक्रांतीची सुरुवात त्यांनी केली होती. रेव्हरंड जॉन विल्सन यांनी इ.स. १८५७ मध्ये लिहिलेल्या एका पत्रात फुल्यांचे कौतुक केले आहे. ज्योतिराव फुल्यांचे विचार परमहंसच्या विचारांशी मिळते जुळते होते. फुल्यांनी इ.स. १८४२ मध्ये दलित मुली व स्त्रियांसाठी पहिली शाळा काढून स्त्री शिक्षणाच्या कार्याचा सक्रिय पुरस्कार केला होता. मुलींच्या शाळेच्या निमित्ताने दादोबा पांडुरंगाशी त्यांची भेट झाली होती. परमहंस सभेबद्दल त्यांना आत्मियता असल्यामुळे राम बाळकृष्ण यांना फुल्यांनी "शिवाजीचा पवाडा" हे पुस्तक अर्पण केले. बाबा पदमनजीशी त्यांचा चांगला संबंध होता त्यांच्या बरोबरीने धर्मचर्चेसाठी सत्यशोधक समाजाची स्थापना इ.स. १८७३ मध्ये केली होती त्या निमित्ताने रानडयांशी त्यांची ओळख झाली होती. हिन्दु समाजातील ब्राम्हणेत्तर जातींमध्ये स्वाभिमान निर्माण होण्यास फुल्यांच्या सामाजिक चळवळीला सामाजिक वर्ग विग्रहाचे स्वरुप प्राप्त होण्यास सत्यशोधक समाजाची विचारसरणी कारणीभुत ठरली. ब्राम्हण लोकांमधील दुराग्रही लोकांना सामाजिक समतेचे तत्व विचारात घेण्यास भाग पाडण्याचे कार्य फुल्यांच्या या ब्राम्हणेत्तर चळवळीने केले होते. फुल्यांच्या धार्मिक व सामाजिक गुलामगिरीचे संस्कार नाहीसे करण्याच्या त्यांच्या भुमिकेचे कोणी स्वागत केले नाही. त्यांच्या विचारातील ब्राम्हणविरोध तेवढा त्यांच्या अनुयायांनी आत्मसात केला, त्यामुळे ज्योतिरावांच्या संप्रदायास विकृत वळण लागले. परंतु बहुजन समाजाविषयी तळमळ असलेले निष्ठावंत पुढारी या नात्याने फुल्यांची कामगिरी महाराष्ट्राच्या सामाजिक क्षेत्रात महत्वपूर्ण मानली जाते. या चळवळीने समाजातील खालच्या थरापर्यंत जनजागृतीचे कार्य केल्यामुळे सर्व समाज ख-या अर्थाने

वैचारिक मंथनाने टवळून निघालेला होता. "तरी या चळवळीच्या पुढील प्रचारकांत ब्रिटिश राजनीतीचे आकलन करण्याची पात्रता नसल्याने ही चळवळ काही काळ नोकरशाहीच्या हातचे खेळणे बनली आणि तिला मॉंटेग्यु-सुधारणानंतर अराष्ट्रीय राजकारणाचे विघातक स्वरुप आले. तथापि, ज्योतिराव फुले यांची महाराष्ट्रातील आद्य सुधारणांत प्रामुख्याने गणना करणे अवश्य आहे. "ज्योतिराव फुले यांना ब्रिटिशांचे राजकारण व ख्रिस्ती मिशनऱ्यांचा कावा समजला नाही असे म्हणणे भाग असले, तरी राजाराम मोहन रॉय पासुन सर्वच सुधारकांवर थोडया बहुत अंशाने लागु होणाऱ्या या आरोपाला त्यांच्याच बाबतीत विशेष महत्व देण्याचे कारण नाही."[१८]

फुल्यांनी स्त्री जीवनाविषयी मानवतावादी दृष्टिकोनातुन विचार ठेवुन सावित्रीबाईच्या सहकार्याने स्त्री शिक्षणाबरोबरच बालविधवांच्या उध्दारासाठी इ.स. १८६३ मध्ये त्यांनी बालहत्या प्रतिबंधक गृह काढले. विधवा स्त्रियांच्या नैसर्गिक भावनांचा माणुसकीने विचार करुन त्यांना सुरक्षित आयुष्य कसे देता येईल याचा प्रामुख्याने त्यांनी विचार केला होता. इ.स. १८६४ मध्ये सारस्वत समाजात पुर्नविवाह पुण्यामध्ये घडवुन आणण्यात त्यांनी पुढाकार घेतला होता. शिक्षण प्रसार करतांना सर्व समाजाला प्राथमिक शिक्षण मिळाले पाहिजे असा त्यांचा आग्रह होता. समाज सुधारणेची चळवळ खेडयापर्यंत पोहचविण्याचे कार्य फुल्यांनी केले होते. आपले विचार लोकांपर्यंत पोहचविण्यासाठी "संसार", "दिनबंधु" ह्या वृत्तपत्रातुन हिन्दुधर्मांच्या नावाखाली चालत असलेल्या वेडगळ चालीरीतींवर कडाडुन टिका केली. "गुलामगिरी", "ब्राम्हणाचे कसब" "शेतकऱ्याचा आसुड" इ. पुस्तके लिहुन बहुजन समाजाकडे सर्वांचे लक्ष वेधले. "अस्पृश्यांची कैफियत" या पुस्तकात खालच्या थरातील लोकांच्या मनुष्यहिनत्वाच्या जीवनाचे वास्तव वर्णन करुन चातुर्वण्य समाज पध्दतीवर टिका करुन जातिभेदाच्या निर्मुलनाचा आग्रह धरला होता व सामाजिक सुधारणेची गरज प्रतिपादित केली होती.

ज्योतिराव फुल्यांचे समकालीन लोकहितवादी (इ.स. १८२३-९२) हे महाराष्ट्राच्या समाज सुधारणेत निश्चित दिशा दाखविणारे एक प्रभावी व्यक्तिमत्व होय. लोकहितवादींची शतपत्रे महाराष्ट्राच्या सामाजिक प्रबोधनाची गंगोत्रीच होती. त्यांनी आपली वास्तविक स्थिती आणि पुढील सुधारणेची दिशा लोकांच्या लक्षात यावी म्हणून सतत दोन वर्षे "प्रभाकरा" मधून, शतपत्रामधून विचार प्रबोधन देण्याचे कार्य केले. सर्वांगिण समाज सुधारणेचा विचार त्यांनी शतपत्रांतून चाळीस वर्षे सतत दिला. वरिष्ठ वर्गातील सुशिक्षित व श्रीमंत लोकांना समाजहितासाठी जागे करण्याचा प्रयत्न गोपाळ हरी देशमुखांनी आपल्या शतपत्रामधून केला.] सुधारणा म्हणजे काय ? याबाबत ते म्हणतात, "आपली विद्या अपूर्ण व यत्किंचित असता ती पूर्ण म्हणून गर्व करिता. सार्वजनिक हिताचा मार्ग तुम्हास दिसत नाही. तो दिसावा याचे नाव सुधारणा."[११]

लोकहितवादींनी अत्यंत स्पष्टपणे, सडे तोड पणे कठोररित्या आपल्या समाजातील वास्तव परिस्थितीचे चित्रण करुन आपले दोष दाखविण्याचे धोरण स्विकारले होते.] काळाच्या गरजेनुसार भौतिक प्रगतीसाठी इंग्रजी शिक्षण, विज्ञानाची आवश्यकता बुध्दीवादी विचारांनी स्पष्ट केली होती. त्याचप्रमाणे ब्रिटिश भारतात काही काळ राहिले तर आपण त्यांच्या मदतीने आपला उध्दार करुन त्यांच्याइतकी योग्यता मिळवू शकतो पण ते जर अकाली गेले तर पुन्हा इतिहासाची पुनरावृत्ती होऊन बेबंदशाही माजेल असे विचार लिहितांना ते म्हणतात की "आपल्या लोकांच्या रीती अगदी बदलल्याशिवाय या देशाचे हित होणार नाही व या लोकांस स्वत: राज्य चालविण्याचे सामर्थ्य आल्या शिवाय लोक या देशातुन गेले तरी उपयोग होणार नाही. पुन: गर्दी होईल, बेबंदी, अंदाधुंदी, भाते राई, होळकरी गर्दी व पेंढारी असा गोष्टी पुनरपि होतील व कोणाचा जीव व घरदारही निर्भय राहणार नाही. जो जबरदस्त त्याचे हाती सर्व सत्ता जाईल व जो निर्बळ असेल तो उपाशी मरेल. त्याचे सर्व हरण होईल, यास्तव सुज्ञानी इंग्रज जाण्याची इच्छा कदापि करु नये... इंग्रजांसारख्या कर्तबगार लोकांशी आपला संबंध आला हा ईश्वरी अनुग्रहच होय.

त्याचा आपण भरपूर फायदा घेतला पाहिजे, हल्ली ज्या विद्या तत्वप्रतिपादक व वास्तविक जे व्यवहार आणि राज्यनिती यांच्या दर्शक आहेत त्यावर आपण लक्ष केंद्रित केले पाहिजे."[20]

"ज्ञान प्रकाश" ह्या आपल्या दैनिकातूनही आपले सुधारणावादी विचार मांडले होते. त्यांनी राजकीय, सामाजिक, आर्थिक, धार्मिक विचार पुरोगामी दृष्टिकोनातून मांडले होते, लोकहितवादी धार्मिक प्रवृत्तीचे असले तरी त्यांची श्रध्दा रानड्यांप्रमाणेच डोळस होती. ते अनिष्ट प्रथा, चालीरीतीवर टिका करुन ईश्वरोपासनेचा मार्ग सांगतांना म्हणतात,"मनुचे वचन असो, याज्ञवल्क्याचे असो, कोणाचेहि असो, ब्रम्हदेवाचे का असेना, बुध्दिदेव बलीयसी आहे. शास्त्रास एकीकडे ठेवा, आपली बुध्दी चालवा, विचार करुन पहा घातक वचनांवर हरताळ लावा.... ईश्वराचे व्यक्त स्वरुप ही सृष्टी आहे. त्याने जे जीव उत्पन्न केले, त्यातील ज्ञानी जीव जो मनुष्य, त्याचे कल्याण करावे. एखादा गरीब अंधकारात बसला आहे. दरिद्राने पीडीत आहे, ज्यास पैसा मिळत नाही, त्यास पैशाचे तेल आणून देऊन उजेडात बसविले तर बरे किंवा ते सोडून त्यास अंधारातच ठेऊन देवळातील मुर्ती जवळ पैशाचा कापूर नेऊन जाळावा हे बरे ? कोणत्याने ईश्वर तृप्त होईल ?" २१

लोकहितवादींनी स्त्री शिक्षण, बाल विवाह, पुर्न विवाह, जातिभेद, अस्पृश्यता या सारख्या सामाजिक विषयांवरही चर्चा केली समाजहिताच्या दृष्टीने जे उपयुक्त ठरेल ते सांगण्याचा प्रयत्न केला पाश्चात्य समाजजीवनातील आधुनिकीकरणाचा अंगिकार करण्याचा सल्ला देतांना अंधानुकरण होवू नये याकडे लक्ष देण्यास सांगितले आजच्या काळात जुन्या रुढी परंपरेत न अडकता प्रवाहित प्रगतीशील जीवनाच्या वाटचालीकडे अग्रेसर होण्यास सुशिक्षीत सल्यांना आव्हान केले त्यासाठी ज्ञानाची आवश्यकता प्रतिपादिली. "ज्ञान हे सर्व सन्मानाचे पराक्रमाचे, बलाचे व ऐश्वर्याचे मुळ आहे" या तत्वावर त्यांची श्रध्दा होती. बुध्दीवाद, विवेकनिष्ठा ऐहिकता, मानवतावाद, व्यक्तिस्वातंत्र्य इ. विचारमुल्ये त्यांच्या लिखाणात आढळतात या मुल्यांच्या आधारावरच त्यांनी प्रस्थापित समाजातील

ग्रंथप्रामाण्य रूढीप्रियता, दैववाद, कर्मकांड, ब्राम्हणवर्गाचे वर्चस्व, बालविवाह, जरठकुमारी विवाह, सतीप्रथा, केशवपन, स्त्रियांचे दयनिय जीवनातील कालबाह्य ठरलेल्या पण निष्ठुर धर्म चालीरीतींवर कठोरपणे टिका केली. त्यांचे जडत्व टाळुन कालानुसार नवीन उपयुक्त प्रथा चालीरीतींचा अवलंब करण्यास सांगितले. लोकहितवादींनी मनुष्याच्या अंत:प्रेरणेवर भर देऊन मनुष्य कृतीची उपयुक्तता सांगताना ते म्हणतात की, "ज्ञानप्राप्तीमुळे लोक शहाणे झालेकी त्यांना राज्यकारभाराचे कतृत्व लाभेल, व्यापारात नव्या विद्येत ते निपुण होतील... ईश्वराने सर्व मनुष्ये सारखी निर्माण केली आहेत वास्तविक पाहिले तर केव्हाडी लोक हे सुधारल्याच्या अंगी ब्राम्हणांसारखे शहाणे होतील हे उचित आहे."[२२]

लोकहितवादींनी आर्थिक विचारांमध्ये स्वदेशी, उद्योग शीलता, श्रम करण्यावर भर दिलेला आहे. ब्रिटिश राज्यकर्ते आमचा उध्दार करण्यासाठी येथे आले असले तरी त्यांचा आर्थिक स्वार्थ मोठा आहे. याची जाणीव लोकहितवादींना होती, म्हणूनच स्वदेशी, बहिष्कार या आर्थिक शस्त्रांचा वापर करण्याचा उपदेश केला आहे. त्यांचे विचार लोक शिक्षणाच्या उद्देशाने लिहिले गेले आहेत. परकीय सरकार चांगले आहेत असे म्हटले नव्हते. त्यांच्या कडून चांगले घेण्याचा जसा आग्रह केला तसा वाईटाचा निषेध कोण्याचाही आग्रह धरला होता. त्यांचे प्रगत विचार समाजाला सहजासहजी न पटणारे असल्याने समाजाकडून त्यांना विरोध झाला होता. लोकांचा तेजोभंग करण्याचा प्रयत्न केल्यामुळे त्यांचे विचार सर्वांगिण सुधारणेचे व्यापक व सर्वस्पर्शी विचार करणारे होते. आपल्या राजकीय, आर्थिक, सामाजिक, धार्मिक अवनती पासुन परावृत्त करणारे होते, पणे त्यांच्या पत्रातुन तत्वप्रणालीचे सुसंबध्द विवेचन आढळत नसले तरी लोक जागृतीचे कार्य त्यांनी प्रामाणिकपणे पार पाडण्याचा प्रयत्न त्यांनी केला होता.

महाराष्ट्राच्या या तत्कालीन सुधारणांना सामाजिक धार्मिक क्षेत्रात सुधारणा व्हावी असे वाटत असले तरी स्वत:पासुन सुधारणेत सुरुवात करण्याचा प्रयत्न फार कमी सुधारकांनी केलेला दिसुन येतो त्यामुळे त्यांच्या कार्याचा प्रभाव

दीर्घकाळ समाजावर राहू शकला नाही. परंतु त्यांच्या या लोकशिक्षण, समाजसुधारणेच्या विचार जागृतीमुळे रानडे व आगरकरांच्या कार्यासाठी पार्श्वभूमी तयार होण्यास मदत झालेली दिसते. या आद्यसुधारकांच्या कार्यामुळे भारतीय समाजजीवनात राष्ट्रीयत्वाची भावना हळूहळू प्रज्वलीत होऊ लागली. इंग्रजांच्या आक्रमणामुळे आपल्याला गुलामगिरी प्राप्त झालेली असली तरी या राज्यकर्त्यांनी स्वार्थासाठी का होईना पण येथील जनतेला पाश्चात्य ज्ञानाची दारे खुली करुन प्रगत जीवनाचा मार्ग दाखविला होता.

आर्थिक राजकीय दृष्टीने भारतीय समाजाला ब्रिटिश साम्राज्य हानीकारक ठरले असले तरी भारतीयांमध्ये एकात्मता, राष्ट्रियत्व, देशप्रेमाची भावना निर्माण होण्यास त्याचे साम्राज्य कारणीभूत ठरल्यामुळे त्याचे आगमन ही भारताच्या इतिहासातील एक चांगली गोष्टी म्हणून ओळखली जाईल असा विश्वास त्यांना वाटत होता. भारतीय समाजाला जे जडत्व प्राप्त झाले होते त्या जडत्वाला तडे देण्याचे कार्य या आद्य सुधारकांनी केल्यामुळे पुढे रानडे, चिपळूणकर, टिळक, आगरकर या सारख्या सुधारकांना समाजकार्य करणे सुसह्य झाले. या पन्नास वर्षांच्या काळात या आद्यसुधारकांनी समाजाची मानसिकता बदलण्याची पूर्ण तयार केली होती. चिपळूणकरांनीही निबंधमाला लिहून समाज प्रबोधनाचे कार्य करताना कृतीशील समाज कार्यासाठी टिळक आगरकरांसारख्या तरुणांना हाताशी धरले होते. रानडयांनाही दादोबा पांडुरंग, विष्णुशास्त्री पंडितां सारखे कार्य करण्याची इर्षा निर्माण होऊन पुढे सर्वांगीण समाज सुधारणेसाठी नवीन दिशा प्राप्त झाली होती असे वाटते.

आद्य सुधारकांच्या काळात समाज पूर्णपणे धार्मिक अंधश्रध्देत् अनिष्ट रुढी परंपरा आणि कर्मकांडांमध्ये सामावलेला दिसून येतो. त्यांना समाज, देश यांच्याबाबत राजकीय व आर्थिक कर्तव्याची जाणीव नव्हती. ऐहिक जीवनात जास्तीत जास्त कठोर व्रत, धर्मकार्य केली तर अध्यात्मिक जीवन सुखावह होईल याच जाणिवेने परमार्थिक जीवन जगण्याचा प्रयत्न करीत होती. त्या जीवनातील मनुष्यहितेचीही जाणीव त्यांना राहिली नव्हती अशा अंधारमय समाजात ज्ञानाच्या प्रकाशाकडे नेण्याचे कार्य करुन त्यांच्या विचारांतरील

पारंपारिक मळभ दूर करण्याचा प्रयत्न सुरू केला होता. त्यांच्याच ह्या कार्याला पुढे नेऊन रानडे आगरकरांनी लोकांना मानवी जीवनाच्या सर्वांगीण सुधारणेचा मार्ग दाखवून समाजाला, प्रगतीशील समाजाचे दर्शन देऊन राष्ट्रप्रमाणे कार्य करण्याचा मार्ग दाखविला होता. त्यांच्या उज्वल कार्याची पार्श्वभूमी या आद्यसुधारकांनी तयार केलेली होती. त्यांच्याच कार्यावर आधारित पुढील समाजसुधारकांनी पाउले टाकून ब्रिटिश साम्राज्याच्या गुलामगिरीतून भारताची मुक्तता करण्यासाठी प्रयत्न केलेले दिसून येतात.

## संदर्भ - प्रकरण पहिले

1) J.K. Mujumdar (ed), Indian speeches and documents on English rule - P.15, उधृत, आचार्य शं.द. जावडेकर, आधुनिक भारत, (पुणे ; १९३८), पृ.११ (यानंतर या पुस्तकाचा उल्लेख जावडेकर : आधुनिक भारत, असा येईल).

2) Percival Spear, The Oxford History of Modern India, (1740-1947), (1965), P.134, उधृत, त्र्यं.कृ. टोपे; न्यायमूर्ती महादेव गोविंद रानडे : व्यक्ती, कार्य आणि कर्तृत्व, (पुणे :१९९२), पृ.३४. (यानंतर या पुस्तकाचा उल्लेख टोपे : न्या. रानडे, व्यक्ती, कार्य आणि कर्तृत्व असा येईल.)

३) अ.का. प्रियोळकर (संपादक) , लोकहितवादीकृत निबंध संग्रह, (मुंबई; १९६७), पृ. ११.

४) न.र. फाटक, न्यायमूर्ती महादेव गोविंद रानडे यांचे चरित्र, (पुणे : १९६६), प. ६२. (यानंतर या पुस्तकाचा उल्लेख - फाटक न्या. रानडे यांचे चरित्र असा येईल.)

५) जावडेकर , आधुनिक भारत, पृ. १८.

६) डॉ. रा.गो. भांडारकर यांचे धर्मपर लेख व व्याख्याने, पृ. ३४२-४३, उधृत जावडेकर , आधुनिक भारत, पृ. ४५

७) Nalin C. Ganguli; Raja Ram Mohan Roy, P. 32-33, उधृत - जावडेकर , आधुनिक भारत, पृ.६१.

८) जावडेकर , आधुनिक भारत, पृ.४५

९) ग.गं. जांभेकर (संपादक) , बा.ग. जांभेकर यांचे जीवनवृत्त व लेखसंग्रह खंड १ ला, (पुणे : १९५०), पृ.१८

१०) डॉ. मोरेश्वर गोविंद रानडे , महाराष्ट्रातील समाज विचार १८१८-१८७८, (पुणे, नागपूर : १९७१), पृ. २७६.

११) ग.गं. जांभेकर , बा.ग. जांभेकर यांचे जीवनवृत्त व लेख संग्रह, भाग २ रा (पुणे : १९५०), पृ. २८-२९

१२) कित्ता, पृ. १२१

१३) विष्णुबावा ब्रम्हचारी , वेदोक्त धर्म प्रकाश, (मुंबई : १८५९) पृ. ७३८ - ७४७

१४) कित्ता, पृ. १६१-१६२

१५) अ.का. प्रियोळकर , परमहंस व तिचे अध्यक्ष रामचंद्र बाळकृष्ण, (धर्म विवेचन सह), (मुंबई : १९६६), पृ. ८१-८२

१६) कित्ता, पृ. ८७-८८

१७) अ.का. प्रियोळकर , रावबहादुर दादोबा पांडुरंग, (मुंबई : १९४७), पृ. २५७.

१८) जावडेकर , आधुनिक भारत , पृ. १०१-१०२.

१९) अ.का. प्रियोळकर (संपादक) , लोकहितवादीकृत निबंध संग्रह, पृ. २५६

२०) कित्ता , ज्ञानपत्रे नं. ८९, २० जाने. १८५०, पृ. २१९-२२०

२१) कित्ता , ज्ञानपत्रे पत्र नं. ७०, पृ. १०-१५.

२२) कित्ता , पृ. १६-१७

# प्रकरण दुसरे

## न्यायमुर्ती रानडे आणि गो.ग. आगरकर यांचे जीवनचरित्र

### अ) न्यायमुर्ती मा. गो. रानडे यांचे जीवनचरित्र

"महाराष्ट्र म्हणजे त्यावेळी एक थंड गोळा होऊन पडला होता. या थंड गोळ्याला कोणत्या त-हेने उब दिली असता तो पुन्हा सजीव होईल व हातपाय हालवु लागेल याचा रात्रंदिवस एक सारखा विचार करुन अनेक दिशांनी, अनेक उपायांनी, अनेक रीतींनी त्याला पुन्हा जिवंत करण्याचे दुर्धर काम अंगावर घेऊन त्या करिता जीवापाड मेहनत जर कोणी केली असेल तर ती प्रथमत: न्या.रानडेनीच! हेच त्यांच्या थोरवीचे किंवा असामान्य मोठेपणाचे मुख्य चिन्ह होय", [१] टिळकांनी रानडयांबद्दल असे गौरवोद्गार काढुन त्यांना श्रध्दांजली अर्पण केली होती. त्यांनी केलेले कार्य भारताच्या सर्वांगिण उन्नतीच्या दृष्टीने महत्वपूर्ण पाऊल होते. १९ व्या शतकाच्या उत्तरार्धात महाराष्ट्रात पर्यायाने भारतामध्ये ज्या प्रमुख व्यक्तिंनी सामाजिक प्रबोधन घडवुन आणले त्यात न्या. रानडे यांचे कार्य अतिशय महत्वपूर्ण ठरले आहे. स्वातंत्र्यपूर्व काळातील त्यांनी उभारलेल्या व्यापक संघटित संस्थाचे कार्य समाजाच्या जागृतीसाठी उपयुक्त ठरले. त्यांच्यातील संघटनवृत्ती मुळे त्यांनी आपल्या विचारांच्या प्रभावाने सर्व जनतेला राष्ट्रीय चळवळीसाठी संघटित केले. आपल्या अद्वितिय ज्ञानाने, कर्तबगारीने भारताच्या राजकीय, सामाजिक, धार्मिक, आर्थिक, सांस्कृतिक इतिहासाला नवीन वळण मिळाले.

महादेव उर्फ माधव गोविंद रानडे यांचा जन्म नाशिक जिल्ह्यातील "निफाड" या गावात १८ जाने. १८४२ ला झाला. इ.स. १८४२ हे वर्ष भारताच्या इतिहासात ब्रिटिश साम्राज्य भारतात स्थिर झालेला आणि निद्रिस्त अवस्थेतील काळ होता. रानडे यांचे मुळ घराणे रत्नागिरी जिल्ह्यातील मोभार-पावोरी या गावातील होते. व्यवसायानिमित्त त्यांचे निपणजे भास्कर अप्पा सांगली संस्थानात नोकरीला गेले. भास्कर अप्पा हे धार्मिक वृत्तीचे होते. त्यांच्या प्रामाणिकपणा बद्दल व

विद्वत्तेबद्दल कीर्ती असल्यामुळे सांगलीच्या राजाने त्यांना आपल्या दरबारात मानाचे स्थान दिले होते. नंतर पेशव्यांच्या दरबारात सांगलीच्या राजाचे प्रतिनिधी म्हणून दाखल झाले. आजोबा अमृतराव ब्रिटिशांच्या सेवेत मामलेदार पदावर होते. त्याचे दुसरे चिरंजिव म्हणजे रानडयाचे वडील गोविंदराव अहमदनगर मध्ये डेप्युटी कलेक्टरच्या ऑफीसात कारकून पदावर होते. रानडयांच्या जन्मानंतर त्यांनी कोल्हापूरच्या संस्थानात खाजगी कारभारी म्हणून, नोकरी इ.स. १८४५ या काळात कोल्हापूर मध्ये ब-याच सुधारणा नाना मोरोजी या मुंबईच्या पोलिटिकल एजंटच्या ऑफिसातील कारकून व्यक्तिने स्व प्रयत्नाने घडवून आणल्या होत्या. इ.स. १८४८ ला मराठी शाळा व १८५३ ला एक इंग्रजी शाळा स्थापन करण्यात आली या शाळेला राजाराम हायस्कूल हे नाव देण्यात आले. मोरोजींनी १८५४ ला दळणवळणाची साधने उपलब्ध झाल्यानंतर कोल्हापूर मध्ये "वर्तमान संग्रह" नावाचे वृत्तपत्र काढले व सोबत "ज्ञान संग्रह हे मासिक हेड मास्तर कृष्णाजी वाफाजीच्या संपादणत्या खाली सुरु केले.

सुरुवातीला रानडयाचे शिक्षण मराठी शाळे पासून सुरु झाले. इ.स. १८४८ ला कोल्हापूरच्या मराठी शाळेत शिकले नंतर इ.स. १८५१ पासून त्यांनी इंग्रजी शिक्षण घेण्यास सुरवात केली. या शालेय जीवनात ते सर्वसामान्य विद्यार्थी गणले जात त्यांच्या बुध्दीची कुशाग्रता गुरुजनांच्या नजरेत पडली नव्हती त्यांच्या स्वभावात उपजतच विमिपणा होता. 'He was remembered as somber, slient and slow the condescendingly loved "baby elephant" as the household nickname had it. He was physically awkward, and for several years he possessed a slight speech defect, which the family found amusing. He suffered by contrast with his effervescent younger sister and became the buft of family jokes. His mother sometimes wondered a loyd wether Madhav would ever be clever enough to suppot both himself and a wife."[2] रानडे उंच,

सुदृढ होते, त्यांची शरीरयष्टी हे त्यांच्या कुटुंबातील वरदान होते.

गोविंदराव रानडे सरकारी क्वॉर्टरमध्ये राहत, त्यांच्या शेजारी त्यांचे वरिष्ठ अधिकारी कित्येक होते. त्यांची मुले हुशार सरसरीत असल्यामुळे रानडयांचा धिमेपणा जास्त जाणवत होता. शाळेत जे शिकविले जाई ते घरी आल्यावर भिंतीवर बोटाने अक्षर काढून त्याची उजळणी करीत. रस्त्यात खेळत असले तर धुळीत अक्षरे लिहून बघत. त्यांचा स्वभाव एक मार्गी होता. त्यांच्या कामात कुणी अडथळा आणलेला आवडत नसे. रानडे लहानपणापासुन बुध्दीमान म्हणून गणले गेले नसले तरी अभ्यासु होते. त्यांच्यावेळी खेडयांमधुन अंकगणित शिकविले जाई. त्यांना शिकविणारे शिक्षक अंकगणित मनोरंजक पध्दतीने शिकवित पण त्यांना एकदा एक गणित अडले तेंव्हा ते रानडयांनी सोडवुन दाखविले होते. शाळेत असतांना रानडे कधी वार्षिक परिक्षेचा निकाल स्वतःहुन घरी सांगत नसत. त्यांना ते इतरांकडुन कळत असे याबद्दल त्यांना विचारले असता "त्यात काय सांगावयाचे आहे, रोज आम्ही शाळेत जावुन अभ्यास करतो तर पास होणारच, त्यात काय विशेष आहे"[3] असे उत्तर मिळत असे. त्यांना लहानपणापासुनच आपल्या कृतीवर विश्वास होता. शालेय जीवनात भावनाप्रधान वृत्ती व नैतीक मुल्यांची जाणिव निर्माण होत होती हे त्यांच्या सोंगटयाच्या खेळण्यामधुन स्पष्ट होते. रानडे यांना सोंगटया खेळण्यासाठी कुणी मिळाले नाहीतर ते एकटेच खांबाच्या पुढे बसुन खेळत होते. "माधवरावांनी एका खांबासमोर बसुन आपला डाव सुरु केला खांबालाच त्यांनी प्रतिस्पर्धी मानुन उजव्या हाताने खांबाचे दान टाकीत डाव संपविला. कर्मधर्म संयोग असा की, खांबाचे दान सरस पडुन डाव बिनतोड माधवरावांच्या अंगावर आला. हा प्रकार पाहत त्यांची चुलती शेजारी उभी होती. तिने निर्जीव खांबाला विजय मिळाला हे पाहताच माधवरावांना चिडविले. पण चीड हया भावनेला त्यांच्या स्वभावरचनेत थारात नव्हता असे म्हटल्यास चालेल माधवराव शांतपणे चुलतीस म्हणाले की, "खांबाच्या हाताला चांगले दान पडले. डाव त्याने जिंकला, त्यात बिघडले काय ?" यावरुन रानडयांची न्यायबुध्दी त्यांच्या वर्तणुकीतुन लहानपणापासुनच प्रगट होत होती. सणांच्या दिवशी अंगावर घातले जाणारे दागीने लपविण्याचा प्रयत्न करीत असत त्याबद्दल विचारल्यास आपल्या घरी येणाऱ्या भाबुक-या, चारक-यांच्या अंगावर

दागिने कुठे असतात"[४] असा प्रतिप्रश्न करुन समोरच्या व्यक्तिला मूक करीत. यावरुन सभोवतालच्या परिस्थितीचे अवलोकन करण्याची व विवेकशीलतेने वागण्याची प्रवृत्ती लहानपणा पासुनच तयार होत होती. एकदा एखादी गोष्ट मनात असली की त्याचा प्रभाव कायम राहत असलेला दिसुन येतो.

सुरुवातीला रानडयांच्या आई गोपिका बाईनी त्यांच्या इंग्रजी शिक्षणाला विरोध केला होता. पण हा विरोध गोविंदरावांनी मोडून काढला. कोल्हापूर मध्ये त्याचे इंग्लिश शिक्षण इ.स. १८५१ पासुन १८५६ पर्यंत सुरु होते. "Ranade's experience in the Kolhapur English School reinforced this pattern. He began to grow into the world of English civilization when at age eleven, he entered the school in its first english class in 1851"[5] पण कोल्हापूरला शिक्षणाची मर्यादित सोय असल्याने पुढील शिक्षणासाठी मुंबईला पाठविण्याचा विचार त्यांच्या घरात सुरु होता. त्यांच्या आईने मुलाला दूर ठेऊन शिक्षण घेण्यास नकार दिला होता. रानडे वडिलांचा आदर करीत त्याच बरोबर बोलायला भीत असत. रानडयांनी आपल्या पुढील शिक्षणाची इच्छा आपल्या शेजारी राहत असलेले जनार्दन हरी किर्तने यांच्या जवळ बोलुन दाखविली. त्यांच्या ही मुलांच्या पुढील शिक्षणाचा प्रश्न असल्याने त्यांनी गोविंदराव रानडयांशी बोलून मुलांना मुंबईला शिक्षणासाठी पाठविण्याचा सल्ला दिला. तेव्हा गोविंदरावांनी किर्तन्यांच्या मुलांसोबत रानडयांची मुंबईला पुढील शिक्षणाची व्यवस्था केली. त्यावेळचे कोल्हापूरचे पोलिटिकल एजंट कॅप्टन रिव्हजने विल्सन स्कूल मध्ये मुलांना प्रवेश देण्याचा आग्रह केला. पण रानडे व किर्तन्यांना मिशनरी शाळेच्या कार्याबाबत साशंकता असल्याने त्यांनी एलफिन्टन इन्स्टिटयूट मध्ये मुलांना प्रवेश दिला. व त्याचे पुढील शिक्षण चालु ठेवले.

रानडे यांच्यावर त्यांच्या आईच्या अध्यात्मिक वृत्तीचा प्रभाव होता हा प्रभाव मुंबईत शिक्षण घेत असतांना कायम होता. दुर्दैवाने इ.स. १८५४ मध्ये त्यांची आई गोपिकाबाई याचे निधन झाले. तेव्हां त्यांच्या वडिलांनी लागलीच

सोळा दिवसांनीच दुसरे लग्न केले. हिन्दु समाजातील अनिष्ट रुढी परंपरेचा पहिला अनुभव त्यांना घरातुनच अनुभवयाला मिळाला ते अनिष्ट आहे याची जाणीव होत होती पण अंतर्मुख वृत्तीने त्यांनी प्रसंगाला तोंड दिले. त्यानंतर थोडया दिवसांनीच गोविंदरावांनी त्या काळाच्या पध्दतीनुसार माधवराव चे लग्न बाराव्या वर्षी वाईच्या सखुबाई दाडेकर यांच्याशी लावुन दिले व बहिण दुर्गा हिचे लग्न ती नऊ वर्षांची असतानाच करुन देण्यात आले. अशा रितीने रानडयांना बालविवाह सारख्या अनिष्ट धार्मिक सामाजिक परंपरेचा अनुभव स्वतःलाच घ्यावा लागला.

रानडयांनी मुंबईतील इंग्लिश शिक्षणाला सुरवात इ.स. १८५६ पासुन केली. एलफिस्टन मध्ये प्रवेश घेतल्यानंतर रानडे सतत अभ्यास, वाचन करीत असत. त्यांची अभ्यासाची पध्दत म्हणजे नवीन ग्रंथाचे वाचन करणे, वाचलेल्या ग्रंथाचा सारांश लिहुन काढणे व ती माहिती लक्षात राहावी म्हणुन ग्रंथाचे पुन्हा एकदा मोठयाने वाचन करणे. यामुळे त्यांचा अभ्यास सखोल व परिपूर्ण असे. नवीन ज्ञान आत्मसात करण्याची प्रवृत्ती असल्यामुळे त्यांनी ज्ञानप्राप्तीच्या इच्छेने मोठ मोठया ग्रंथाचे वाचन शालेय जीवनापासुनच सुरु ठेवले होते. व त्यासाठी कठीण परिश्रम घेत. त्यामुळे त्यांची ज्ञानोपासना प्रगल्भ बनलेली होती. त्यांच्या या अभ्यासुपणा मुळे प्रभावित होऊन शाळेच्या मुख्याध्यापकांनी "हा मुलगा पुढे किर्ती मान होणार" असे भाष्य केले होते जे पुढे खरे झाले. पुढे त्यांच्या या अभ्यास पध्दतीबद्दल त्यांच्या मित्राने विचारले असता त्यांनी उत्तर दिले की, "मला समजु लागल्यापासुन मी ग्रंथाचे, वृत्तपत्राचे वाचन करतेवेळी किंवा भाषणाचे श्रवण करते वेळी डोक्यातील दोन खोल्या उघडया ठेवत असतो जे वाचले असेल किंवा ऐकले असेल ते एका खोलीत साठवितो, आणि या वाचनाचा अगर श्रवणाचा राष्ट्र कार्यात कुठे उपयोग करावयाचा हे ठरवुन दुसऱ्या खोलीत निरनिराळ्या विभागात त्यांची वाटणी करतो. हा साठा याची फिरविताच बाहेर पडु लागतो"[६] यावरुन त्यांची ज्ञानोपासनेची आकलन शक्ती व स्मरणशक्ती तिव्र होती हे जाणवते. त्यांच्या अभ्यावृत्तीबद्दल त्याचे मित्र सर भांडारकर यांनी रानडयांच्या

मृत्युनंतर प्रार्थना समाजाच्या उपासना प्रसंगी बोलतांना सांगितले की, "माधवरावजी १८५५ चे सुमारास कोल्हापूरहून मुंबईस एलफिस्टन कॉलेजात आले, तेव्हाच त्यांची माझी प्रथम ओळख झाली. फणसवाडीतल्या चाळीत आमच्याबरोबर रहावयास आले. गप्पागोष्टी करण्यात ते आपला वेळ कधीच घालवीत नसत. त्यांची कोणाशी विशेष ओळख नव्हती. दिवसरात्री ते सारखे वाचनात निमग्न दिसत. त्यावेळी आता प्रमाणे नेमक्या परीक्षा नव्हत्या. या नेमक्या परीक्षांनी अदी घाण केली आहे परीक्षेच्या अभ्यासा बाहेरचे, गिबनच्या इतिहासासारखे ग्रंथ वाचण्यात गुंग झालेले माधवरावजी बोलीत दिसत."[7] रानडे यांनी उच्चशिक्षणाला प्रारंभ केल्यापासून संपूर्ण महाविद्यालयीन शिक्षण संपेपर्यंत ते केवळ पुस्तकी किडाच बनले होते. वाचनाच्या आवडीमुळे ते कुठल्याही विषयावर उत्कृष्ठ माहिती लिहून शाकत असत.

त्या काळात मॅट्रिकचे शिक्षण घेतांना परीक्षेसाठी निबंध लिहावे लागत असत. रानडयांनी मनुष्या काळापासून आजपर्यंत हिन्दुस्थानात घडलेली स्थित्यंतरे "या विषयावर मराठीत निबंध लिहिलेला होता. त्यात त्यांनी ब्रिटिश साम्राज्याबद्दल प्रतिकूल विचार प्रगट केले होते. त्यामुळे इंग्लिश परीक्षकांचा राग त्यांनी ओढवून घेतला होता. त्यांनी मुद्दामच रानडयांना कमी गुण दिले होते. इ.स. १८५९ ला मुंबई विद्यापीठाने पहिली मॅट्रिकची परीक्षा घेतली. त्या परीक्षेत रानडे, भांडारकर, वागळे, मोडक हे चांगल्या गुणांनी पास झाले. तेव्हा रानडयांना सत्तर रुपये शिष्यवृत्ती दरमहा मिळू लागली होती. त्यांच्या यशाने प्रभावित होऊन एलफिन्स्टन इन्स्टिटयुटचे प्रिन्सिपल केळुस होरमुसजी अलपईवाला यांनी म्हटले की, This is an uncommon lad and he is destined to attain great distinction"[8]. इ.स. १८६१ ला रानडयांनी सिनियर स्कॉलरशिप ची परिक्षा दिली. त्यातील एका प्रश्न पत्रिकेत मॅट्रिक पर्यंत विद्यार्थ्याने किती पुस्तके वाचली याचा तपशील विचारलेला होता तेव्हा रानडयांनी इ.स. १८५९ ते १८६१ या काळातील वाचलेल्या पुस्तकासंबंधी लिहिले की, "I entered the college 10th June 1858 An account of what I have studied privately within these three years. It is imposible to give at this movement firstly because I did not expect such a question now, and secondly because I am not much in the habit of keeping a

memorandum of my studies, still I will state here the names of all the books. I can at this moment remember to have read within these three years.

1) Macaulay - History of England vols. I and II, Essays vols. I,II,III.
2) Gibbon - Decline and fall the Roman Empire, complete.
3) Buckle - Introduction to the History of civilization of English Vol. I (मुळ नाव History of civilization of England)
4) Scott's Novels - Waverley, Antiquary, Guy Maynering, Roh Roy, oil mortality.
5) Bulwar Lytton - Harold and Rienzi
6) Milton - Paradise Lost.
7) Plato's Dialogues - phaedo, Georgius, sophist.
8) Combell - Poems
9) Scott - Marmion, The Lady of the last Minstrel.
10) Madam D' Arblay - Ceeilia
11) Byron - Giour, Corsair, Bride of Abydos,
12) Horntook - Diversion vol. I
13) Washington Irving - Tales of a Traveller, Conquest of Granda.
14) Adom smith - Wealth of nations vol. I, II.
15) Bar bauld - selections from the spectator Vol I " [9]

या ग्रंथांच्या अभ्यासाने रानडयांच्या विचारांची तात्त्विक बैठक तयार झालेली होती. या अभ्यासनीय वाचनामध्ये इतिहास, कादंबरी, काव्य निबंध, प्रवासवर्णन

ह. विषय होते याशिवाय त्यांच्या अभ्यासक्रमात शेक्सपियरची तीन नाटके, पाचवा व आठवा हेन्री, मर्चंट ऑफ व्हेनिस यांचा पुस्तकाचा समावेश होता. त्याच बरोबर बेकनचा ग्रंथ "नोव्हम ऑर्गानम", बटलरचा "ॲनालॉजी" हा धार्मिक तत्वज्ञानाचा ग्रंथ वाचलेला होता. मनुष्याला धर्माची गरज आहे. धर्म हा संस्कृतीला सहाय्यक असून त्याच्या शिवाय मानवाची आध्यात्मिक उन्नती होणार नाही असे विचार रानड्यांच्या मनावर ठसण्यात बटलरच्या ग्रंथाचा उपयोग झाला. बटलरचे धर्मतत्वज्ञान शिकविण्यासाठी वेगळी ऐच्छिक क्लासेस एलफिस्टनमध्ये होती. या क्लासमध्ये सामील होऊन त्यांनी विशेष अभ्यास केला होता. Butlote-ऽचा Methods of Ethics हा ग्रंथ डेक्कन कॉलेजचे माजी प्रिन्सिपल सेल्बी यांच्या प्रस्तावनेसह इ.स. १८८१ ला प्रसिद्ध केला. त्यावर जाने. १८८२ ला सार्वजनिक सभेच्या त्रैमासिकात रानड्यांनी परीक्षण लिहिले होते. हा परीक्षण लेख रमाबाई रानडे प्रकाशित मिसलेनीयस रायटिंग्ज या ग्रंथात समाविष्ट करण्यात आला आहे.

महाविद्यालयीन जीवनात रानड्यांनी इंग्लिश भाषेवर प्रभुत्व मिळविले होते व त्यानंतर लॅटिन भाषेचा अभ्यास करुन इंग्लिश वाड.मयाचा सखोल अभ्यास वर्षभर केला होता. या काळात रानड्यांना लिहिलेले निबंध इतके उत्कृष्ट होती की, मुंबई प्रांताचे शिक्षक संचालक हॉवर्ड यांनी ते निबंध इंग्लडला पाठविले व त्यात "हिन्दुस्थानातील एका विद्यार्थ्याने उत्कृष्ट लिहिले त्याचा हा नमुना" असा अभिप्राय कळविला होता. एलफिस्टन मधील त्याचे गुरु प्रिन्सीपल सर अलेक्झांडर ग्रँट यांचा त्यांच्यावर विशेष लोभ होता. रानड्यांनी कॉलेजमध्ये असतांना "शिवाजीची राज्य पध्दती व इंग्लिश राज्य पध्दतीशी तुलना" ह्या शिर्षकाचा निबंध लिहीला होता. त्यात ब्रिटिश राज्य पध्दतीवर टिका केली होती. तेव्हा प्रिन्सीपल ग्रँटने त्यांची कानउघडणी करुन सहा महिने स्कॉलरशीप बंद केली होती. रानडेवर विशेष लोभ असुनही ग्रँटने शिक्षा केली होती. ते रानड्यांची तुलना सॉक्रेटिसशी करीत असत. बी.ए.ला त्यांनी "मराठी" हा विषय विशेष भाषा म्हणून घेतला होता. इ.स. १८६२ ला बी.ए.च्या परीक्षेला

बसले होते. बी.ए. होण्यापूर्वीच त्यांना एलफिन्स्टन कॉलिजला फेलो म्हणून नेमण्यात आले. १८६६ पर्यंत त्यांनी फेलोशिप पूर्ण केली होती, मुंबई विद्यापीठाच्या प्रथमच झालेल्या बी.ए.च्या परीक्षेत रानडे सर्वप्रथम आले. नंतर त्यांनी बी.ए. ऑनर्ससाठी अभ्यास केला पण त्यांना याच काळात अति अभ्यासाने डोळ्यांचा त्रास सुरु झाल्याने सहा महिने त्यांच्या अभ्यासावर परिणाम झाला. त्यामुळे बी.ए. ऑनर्सला फर्स्टक्लास मिळाला नाही. तरी त्यांच्या परीक्षकांनी त्यांना त्यांच्या विद्वत्तेने प्रभावित होवून रानडे यांना एक सोन्याचे पदक व दोनशे रुपये दक्षिणा दिले होते. रानडे यांच्या अभ्यास पध्दतीबद्दल बोलतांना सर दिनशा वाच्छा यांनी लिहिले की, "रानडे विद्यार्थी असतांना त्यांचा चिकाटी हा गुण पराकोटीला पोहचलेला आढळून येत असे. आमच्यात काही जण त्यांना विनोदाने बालमतंगज( The Infant Elephant ) म्हणत असत. रानडे भावी आयुष्यात अप्रतिम विद्वान म्हणून गाजणार याविषयी आमचे कोणाचेही द्विधा मत नव्हते. पुढे त्यांच्या सार्वजनिक आयुष्यात जे गुण प्रगट झाले, ते गुण अविश्रांत श्रम करणारे एक विद्यार्थी या नात्याने त्याकाळातही लक्षात येत असत."[१०]
ऑनर्सला त्यांनी इतिहास व अर्थशास्त्र हे विषय घेतले होते. त्याचे मराठी विषयातील नैपुण्य पाहून मॅट्रिकच्या मराठी विषयाचे परीक्षक म्हणून नेमणूक केली गेली. इ.स. १८६३ मध्ये बी.ए. ऑनर्स साठी अभ्यास कोणत्या पध्दतीने केला होता याचा उल्लेख करतांना रानडे लिहितात की, "ऑनर्सच्या परीक्षेसाठी मी ठोकळ अंदाजाने माफक आकाराची २५००० पाने वाचली आणि अवघड पुस्तकांचा सारांश लिहून व एकाच विषयावरील निरनिराळ्या पुस्तकातील तुलनात्मक टिपणे करून १०० कागद लिहिले. ऑक्टो. च्या सुट्टीत अर्थशास्त्रावरील पुस्तके वाचण्यात सकाळचा वेळ सर्वी घालीत होतो. दिवसाचा बाकीचा भाग इतिहासाकडे खर्ची पडत असे. रात्रीच्या पूर्व भागात किंवा उत्तर भागात मी लिहिण्याचे व घोकंपट्टीचे काम करीत होतो. एकूण १४ तासाप्रमाणे अभ्यास चालला होता."[११]

पुस्तकांशिवाय Ligard Froude Hume Mackintosh इ.अनेक लेखकांच्या ग्रंथाचा अभ्यास केला होता. विषयातील पुस्तकांना मर्यादा नसल्यामुळे जितकी पुस्तके वाचता येतील तितकी पुस्तके वाचली होती. याच काळात त्यांनी

ज्ञानोपासनेत "सर्वज्ञ"ता मिळविली होती या ज्ञानाचा उपयोग त्यांना पुढील आयुष्यात झालेला होता. व्यापक ज्ञानप्राप्तीमुळे त्याचे विचार प्रगल्भ, वृत्ती संयमी आणि विवेक शील बनली होती. कोणत्याही लहान सहान गोष्टीवर खोलवर विचार करण्याची मनोवृत्ती झालेली होती. त्यामुळे ते सहसा कुणावर रागावलेले चिडलेले आढळत नाही. क्वचितच वेळी त्यांचा संयम सुटत असे. याला कारण त्यांनी ज्ञानाने आपली बौध्दिक पातळी वाढवुन सर्वसामान्या पेक्षा काळाच्या पुढे पाहण्याची सवय त्यांना जडलेली होती. आपले ज्ञान सर्व क्षेत्रात परिपूर्ण करण्याचा प्रयत्न त्यांनी विद्यार्थी जीवनात केलेला होता.

इ.स. १८६३ मध्ये रानडयांनी इतर भाषेंच्या ज्ञानाबरोबरच संस्कृतचा अभ्यास केलेला होता. कॉलेजमधील शास्त्रींची मदत घेवुन "हितोपदेश, विक्रमोर्वीशीयम्, अभिज्ञान शाकुंतलम्" ही पुस्तके वाचुन व्याकरणाचा अभ्यासही केला होता. कुठल्याही विषयातील ज्ञान अपुरे राहु नये यावर त्यांचा कटाक्ष होता. रानडे याचे समकालीन सहध्यायी दिनशा वाच्छा यांनी १९०१ ला एलफिन्टनच्या सम्मेलनात त्यांच्या अभ्यासाविषयी बोलतांना म्हटले की,

"Listless of all that was going on around him, we could find him either intently absorbed in writing his weekly eassay or reading aloud, his Grote and Gibban, his Hume and Macaulay, his Locke and Hamilton and the rest of the standard authors which to us freshmen were such a terrible bug-bear to master. The Principal and Professors, Dr. Harkness and Sir Alexnder Grant, Prof Hughlings and Sinclair considered him as one who was destined to make his mark in the public life of this great city and achieve the highest distinction."[12]

सतत अभ्यास करणारा विद्यार्थी ही प्रतिमा शालेय जीवना पासून त्यांनी निर्माण केली होती. हीच प्रतिमा कॉलेज जीवनातही कठोर परिश्रमाची ज्ञानोपासना सतत कायम ठेवली होती. त्यामुळे डाव्या डोळ्याचा विचार होऊन तो डोळा कायमचा अधु बनला होता. डोळ्याच्या त्रासामुळे त्यांना १८६३ मध्ये काही काळ डॉ. रिडच्या सल्याने रजा मिळालेली होती.

इ.स. १८६२ मध्ये रानडे बी.ए. पास झाले त्या वर्षी मुंबई विद्यापीठाने प्रथमच पदवीदान समारंभ घडवून आणला होता. हा समारंभ टाऊन हॉलमध्ये साजरा करण्यात आला. २८ एप्रिल १८६२ ला मुंबईचे गव्हर्नर सर बार्टल फ्रियर यांच्या अध्यक्षतेत पार पडला, त्यांनी आपल्या भाषणांत रानडेंचा गौरव केला होता त्यांनी पुढे भाषणांत म्हटले की, "तुमच्यावर केवळ विद्यापीठातीलच किर्ती अवलंबून नाही. समाजाची निती तुमच्यावर अवलंबून आहे. तुम्ही विद्यापीठाचे पदवीधर आहात. तुमच्या वर्तनात सगळ्या सुशिक्षित जगाचे गुण दिसावयास पाहिजे. विशिष्ट सरकारचे समाजाचे अथवा देशाचे गुण तुमच्या वर्तनात दिसल्याने इतिकर्तव्यता होणार नाही. तुम्हाला जे शिक्षण मिळाले आहे, त्या शिक्षणाने सामाजिक नितिमत्ता लयास जाते. तुम्ही वडील मंडळींची अवज्ञा करु लागता, गर्विष्ठ व स्वयंमन्य बनता, असा या शिक्षणावर आरोप आहे. तो तुम्ही दूर केला पाहिजे. विद्या आणि नितिमत्ता यांचा परस्पर संबंध आहे हे लक्षात असू द्या. तुम्हाला जर शहाणे व विद्वान व्हायचे असेल तर विद्यापरायणतेला उच्च प्रतिच्या निर्मळ बुध्दिमत्तेप्रमाणेच अंत:करणाची पवित्र शुध्दता आवश्यक आहे. हे कधीही विसरु नका"[१३] या व्याख्यानाचा प्रभाव अध्यात्मिक वृत्तीच्या रानडयांवर पडणे स्वाभाविकच होते. विद्वत्तेने प्राप्त झालेली नम्रता सद्गुणी लोकांचा आदर्श आपल्या डोळ्या समोर सतत ठेवण्याचा प्रयत्न करीत असतो. रानडयांनी फ्रियरांच्या व्याख्यान संग्रहाला प्रस्तावना दिली होती. इ.स. १८७० मध्ये हे पुस्तक प्रकाशीत करण्यात आले होते त्या प्रस्तावनेत रानडे लिहितात की,

"He (sir Bartle Frere) has placed us under deep obligations by encouraging love of learning and culture among educated Indians. His university convocation addresses were veritable Govt. despatches. Like a prophet he has compared the present with its good and bad characteristics with those of the past and the future. His speeches in which he advocated freedom for Universities may be regarded as a specimen of the rare elguence one meets with in this country. His annual addresses were a most valuable exchange of thought and their moral effect would never be obliterated from the minds of his listeners"[14]

रानडयांवर फ्रियरांच्या व्याख्यानाचा प्रभाव किती परिणाम झाला होता हे वरील वक्तव्यावरुन लक्षात येते. आपल्या ज्ञानोपासनेला नितिमत्तेची साथ देऊन आपले जीवन सतत कार्यशील व उज्वल ठेवण्याचा प्रयत्न केला होता. इ.स. १८६५ मध्ये एम्.ए. आणि १८६६ मध्ये एल.एल.बी.ची पदवी रानडयांना बहाल करतांना श्री. फ्रियर यांना धन्यता वाटत होती. त्यांचा सन्मान करुन त्याचे गौरवाने स्वागत केले होते. त्यांच्या चांगल्या भविष्या विषयी चर्चा करुन, सदिच्छा देऊन त्यांचा समावेश विद्यापीठाच्या फेलोंमध्ये केला होता. इतके सन्मान रानडयांनी प्राप्त केले तरीही त्यांच्यामध्ये अहंम्यता कधीच आली नाही उलट विनीत वृत्तीनेच लहानपणापासुन शिक्षणाची कास धरुन त्यांनी आपला जीवनक्रम आखला होता. प्रदीर्घ ज्ञान संपादनाने ह्या विनयशीलते मध्येच भर पडत गेली होती.

रानडे इ.स. १८६१ पासुन फेलो म्हणून नेमणूक झाल्यानंतर शिक्षणाबरोबरच अध्यापनाचेही कार्य करीत. त्यांनी इतिहास, अर्थशास्त्र, गणित, भुगोल, इंग्लिश, तर्कशास्त्र निबंधलेखन कविता इ. विषय शिकवित असत. त्यातल्या त्यात इतिहास व अर्थशास्त्र हे विषय जास्त आवडीचे होते.

रानडे इंग्लिश हा विषय ही विद्यार्थ्यांना शिकवित असत इंग्लिश कविता निबंध या संबंधी माहिती देतांना इंग्रजी विषयावर प्रभुत्व मिळविणे

आवश्यक आहे असे त्यांना वाटत होते. इंग्लिश भाषा ही भाषा पाश्चात्य असली तरी आंतरराष्ट्रीय तिचे महत्व असून पाश्चात्य ज्ञान चांगल्या प्रकारे आत्मसात करण्यासाठी इंग्रजी शिकणे आवश्यक आहे. असे ते म्हणत असत. पाश्चात्य शिक्षणामुळे ज्ञानाचे विशाल क्षेत्र भारतीयांना प्राप्त होवुन एका सुसंस्कृत संस्कृतीची आपली ओळख झाली व आपला संबंध आला याबद्दल रानडयांना आनंद झाला होता. इंग्रजी भाषेचे महत्व पटवुन देतांना त्यांनी म्हटले की, "English language is tobe regarded not as simply an English affair, but rather an affair of all advanced nations of the west.... The important thing of any body of language is that it should tell us what we are, what our duty is and what we are to do in this world, what our rights are and such like matters"[15]

रानडयांनी आपला विद्याभ्यास सतत सुरु ठेवला होता त्यांनी चांगल्या प्रकारे एलू.एलू.बी. या अभ्यास करुन परीक्षा दिली होती. या परीक्षेमध्ये रानडे व त्यांचे मित्र। वागळे हे दोघेच एल.एल.बी.च्या परीक्षेत प्रथम श्रेणीचे विद्यार्थी ठरले. अशा रितीने ते कायद्याच्या परीक्षेत यशस्वी झाले. त्यानंतर तीनच महिन्यांनी त्यांनी ऑनर्सची परीक्षा दिली त्यातही ते उत्तीर्ण झाले. इ.स. १८६६ पर्यंत रानडयांनी ज्ञानोपासना केली होती. त्यांनी अध्ययन केलेल्या ग्रंथाच्या यादींवर नजर टाकली तर आजही कायदे पंडीतांना आश्चर्य वाटते. इ.स.१८६५-६६ च्या वार्षिक अहवालात त्यांनी आपल्या ग्रंथ वाचनाबद्दल माहिती देतांना विनयशीलता प्रगट केली आहे. कुठेही प्रौढी मारण्याचा प्रयत्न केलेला दिसत नाही. ग्रंथाची सुची लिहितांना ती वाचनीय ग्रंथ असल्यामुळे त्यांचा उल्लेख करणे व पुढील विद्यार्थ्यांना मार्गदर्शक ठरेल या उद्देशाने लिहिलेली आहे. आपली विनम्रता प्रगट करतांना अहवालात ते म्हणतात, "परीक्षेतील यशाने माझ्या या सगळ्या परीश्रमाचा भरपूर मोबदला मिळाला असे मी समजतो. मी व वागळे असे दोघेच विद्यार्थी असल्याने आम्ही अभ्यास एकत्र केला. वाचलेल्या पुस्तकांची यादी बढाई खातर दिलेली नाही. ज्या कोणाचा आमच्यावर विश्वास आहे, त्यांचा विश्वास

अपात्री ठरला नाही. हे दाखविण्याच्या हेतूने ही यादी जोडलेली आहे. आमच्या हेतुचा गैरसमज कोणी करुन घेणार नाही, अशी आम्हांस उमेद आहे."[१६] त्यांच्या विद्वत्तेला संस्कारातून, अभ्यास व अनुभवातून मिळालेली विनयशिलता त्यांच्या जीवनात कायम होती. त्यांना लाभलेला उत्कृष्ट गुरुजन वर्गही त्यांच्या जीवनावर चांगला प्रभाव पाडण्यात यशस्वी झालीत त्यापैकी वर्डस्वर्थ हार्कनेस, हॉवर्ड, ह्युलिंग्ज, सर अ. ग्रँट या सारख्या विद्वानांनी तत्कालीच्या इंग्रज प्राध्यापकांनी योग्य मार्गदर्शन देवून त्याचे विद्यार्थी जीवन यशस्वी करण्यास मदतच केली होती. हे सर्व प्राध्यापक विद्यार्थ्यांसाठी मेहनत घेत असत. त्यांनी घेतलेल्या मेहनतीचे चीज रानडयांनी प्रदीर्घ ज्ञानोपासना करुन मिळविली होती. त्यांच्या विव्दत्तेबद्दल आदराने बोलतांना टिळकांनी त्यांना "सर्वज्ञ स हि माधव" म्हटले आहे बहुतेकांना त्यांच्या विव्दत्तेचे ज्ञान प्रगल्भतेचे व आकलन शक्तीचे आश्चर्य आणि आदर वाटत होता.

रानडयांनी विद्यार्थी दशेतच अध्यापनाचे, परीक्षकाचे कार्य केल्यामुळे त्यांना त्या त्या विषयातील सखोल ज्ञान प्राप्त करण्याची संधी मिळाली होती व त्याचा उपयोग त्यांनी केला होता. ज्ञान लालसे बरोबर परीश्रम करण्याची विलक्षण तयारी, प्रवृत्ती होती व आपल्या मर्यादा ते चांगल्यारितीने ओळखुन होते . इ.स. १८५९ मध्ये लिहिलेल्या एका निबंधाच्या वहीत "शेतकी" या विषयावर निबंध लिहितांना त्यांनी "मी ब्राम्हण जातीत जन्मास आल्यामुळे मला शेतीचे प्रत्यक्ष ज्ञान नाही" असे स्पष्ट पणे कबुल केले होते. याच वही मध्येचे त्यांनी अभ्यास केलेल्या ग्रंथाचा उल्लेख आहे. वाचनाचे वेड असल्याने अफाट वाचन ते करीत असत. पुढील काळात सार्वजनिक आयुष्यामध्ये या विव्दत्तेचा भरपूर उपयोग करता आला.

रानडे यांनी अध्यापनाबरोबरच परीक्षकाचे कामही बी.ए.ला असतांना केले होते. बी.ए. मराठी विषय घेतला असल्याने व त्यांच्या ज्ञानावर विश्वास असल्याने त्यांना मराठी परीक्षक नेमण्यात आले होते. आपले परीक्षकाचे काम अनेक वर्ष करीत असता त्याचा तपशील लिहून काढत असत.

या मुळे त्यांनी मिळविलेले ज्ञान सर्वांगानी परिपूर्ण होण्यास परीक्षक या पदाचाही उपयोग झाला होता. इ.स. १८६४-६५ ला अर्थशास्त्र विषय शिकवितांना त्यांनी मिलच्या अर्थशास्त्रीय ग्रंथाचे वाचन करुन त्यातील दोष पूर्ण लिखानावर टिका केली होती, विद्यार्थ्यांना मिल शिवाय सिनियर, मॅकुलाक, रॅमसे, माल्थस, बॉस्टियट इ. विचारवंताच्या ग्रंथाचे वाचन स्वतः केले व विद्यार्थ्यांना सुध्दा करायला लावले. इतिहास शिकवितांना व शिकतांना त्यांनी सखोल अभ्यास केलेला होताच त्याचा उपयोग त्यांना चांगल्या प्रकारे निबंध लिहिण्यामध्ये झालेला होता. कॉलेजमध्ये असतांना लिखाणावर भर देत असत.

रानड्यांना इतिहासाचे आकर्षण जबरदस्त असल्यामुळे त्यांनी इतिहासाच्या अभ्यासाकडे व संशोधनाकडे विशेष लक्ष दिले होते. महाविद्यालयीन शिक्षण घेत असतांना इतिहासावर निबंधलिखन केले होते. इ.स. १८९९ मध्ये मुंबईच्या रॉयल एशियाटिक सोसायटीमध्ये मराठ्यांच्या राज्य व्यवस्थेतील टाकसाळी व चलन या विषयावर निबंध वाचला होता. हा निबंध संकीर्ण लेखसंग्रह या ग्रंथामध्ये ३३०-४२ हया पानावर दिलेला आहे. याच सोसायटीतून त्यांनी जून १९०० मध्ये रानड्यांनी "पेशवे रोज निशींना प्रस्तावना" हा निबंध वाचला होता. रा.ब. वाड यांनी लिहिलेल्या मराठी रोज निशींचा अभ्यास "या संशोधन निबंधाला प्रस्तावना रानड्यांनी दिली होती. या संशोधनात त्यांनी १७०८ ते १८१६-१७ हया काळातील रोजनिशींचा अभ्यास केलेला होता. हा निबंध इतिहास संशोधकांसाठी उपयुक्त आहे.

रानड्यांना मराठ्यांच्या इतिहासाची आवड असल्याने त्यांनी इ.स. १९०० मध्ये Rise of Maratha Power हा ग्रंथ लिहून पूर्ण केला. यात रानड्यांनी शिवाजी महाराजांनी उभारलेल्या स्वराज्याची योग्यता पटवून दिली व इंग्रजांनी मराठ्यापासून राज्य घेतले, मुसलमानापासून घेतले नाही हे सिध्द केले आहे. यात इंग्रज लेखकांनी शिवाजीवर लावलेल्या लुटारुंच्या आरोपाचे खंडन केले आहे. मुसलमान इतिहासकारांची री इंग्रज लेखकांनी ओढून भारतीयांचा विशेषतः

मराठ्यांचा तेजोभंग करण्याचा प्रयत्न रानड्यांच्या लक्षात आलेला होता. रानड्यांनी मराठी सत्तेचा उदय हे पुस्तक लिहिण्याचा आपला उद्देश स्पष्ट करतांना म्हटले की, "जवळ जवळ १०० वर्षे ज्या सत्तेची हुकूमत पश्चिमेस द्वारका, पूर्वेस जगन्नाथपुरी, उत्तरेस हरिद्वार व दक्षिणेस रामेश्वर ह्या प्रदेशांवर चालत होती, त्या मराठी सत्तेचा उत्कर्ष व प्रभाव वर्णन करणे हा आहे. हे पुस्तक लिहितांना मराठ्यांच्या पराक्रमाच्या गाथेमधून कोणता राजकीय व नैतिक धडा आपण शिकावा" हा ही उद्देश आहे. त्याचबरोबर शिवाजीचा उदय होण्यापूर्वी महाराष्ट्रात अनेक संतानी फार मोठे कार्य करून शिवाजीला अनुकूल अशी भूमी तयार केली होती. महाराष्ट्रात संत परंपरेने धर्मसुधारणेचे कार्य केले आहे व हे कार्य युरोपमधील प्रोटेस्टंट्स धर्मसुधारकापेक्षा वेगळे आहे.[१७] हे स्पष्ट केले. रानड्यांचा हा ग्रंथ आजही मराठ्यांच्या इतिहासात महत्त्वपूर्ण ठरला आहे. रानड्यांना शिवाजी महाराजांविषयी आदर असल्यामुळे शिवजयंती साजरी करावी असे प्रतिपादन टिळकांपूर्वी रानड्यांनी केले होते. शिवाजींचा मोठेपणा रानड्यांनी आपल्या लिखाणांतून स्पष्ट केला.

रानड्यांनी या पुस्तकांत महाराष्ट्रातील संत व प्रेषित यांच्यावर एक प्रकरण लिहिले आहे. त्याचप्रमाणे शिवाजीच्या राज्यव्यवस्थेचे व अष्टप्रधान पध्दतीची तुलना ब्रिटिश राज्य घटनेतील मंत्री मंडळाशी केलेली आहे. रानड्यांच्या ह्या ग्रंथाचा उपयोग नंतरच्या इतिहास संशोधकांना अत्यंत उपयुक्त ठरला. दत्तो वामन पोतदार या ग्रंथाची तुलना गिबनच्या ग्रंथाबरोबर करतात मराठ्यांच्या इतिहासाविषयी रानडे यांनी पेशवे दप्तराचे संशोधन करून पायाभूत कार्य केले आहे.

इ.स. १८६६ मध्ये रानड्यांकडे ओरिएंटलचे काम आले. हे कार्य करीत असतांनाच त्यांना अक्कलकोटचा कारभारी आणि कोल्हापूरला न्यायाधिशाचे काम पहावे लागे त्यानंतर इ.स. १८६८ ला प्राध्यापकाची कायम नोकरी मिळाली. तेव्हा त्यांच्या विद्यार्थ्यांनी रानडे सर परत आल्याचा आनंद रानड्यांना सोन्याचे घड्याळ देऊन व्यक्त केला होता. प्राध्यापकाचे कार्य त्यांनी इ.स. १८७१

पर्यंत केले होते. या मधल्या काळात त्यांनी अनेक बढाबढा-या पार पाडल्या होत्या. Small cause Court चे न्यायाधिश पोलिस मॅजिस्ट्रेट, हायकोर्टात डेप्युटी रजिस्टार म्हणून काम करावे लागले. इ.स. १८७१ मध्ये चा परीक्षा पास झाल्यानंतर त्यांना नेमणूक न्याय खात्यात कायमची सरकारी नोकरी मिळाली. त्यांनी, इ.स. १८५८ ते १८७१ या विद्यार्थी जीवनामध्ये अध्ययन, प्राध्यापक परीक्षक, न्यायाधिश इ. पदे भूषविली होती. या सुरुवातीच्या अवाढव्य बौध्दिक कार्यामुळे त्याची प्रतिष्ठी त्यांच्या विद्तेमुळे झाली होती.

रानडयांनी ६ जुन १८६८ पासून ओरियंटल ट्रान्सलेटरचे कार्य सुरु केले. याच काळात Dakshina Prize Committee चे सभासद झाले होते. त्यांच्या कामाचे स्वरुप म्हणजे मराठीत नवीन जे वाड.मय प्रसिध्द होईल, त्या वाड.मयाची ओळख सरकारला करुन देऊन त्या विषयी अभिप्राय कळविणे हे पद त्यांनी वर्षभर भूषविले होते. सरकारकडे आलेली पुस्तके, पोपडया किंवा हस्तलिखिते वाचुन त्यावर आपला अभिप्राय कळवित. हया कार्याचा ब्रिटिश सरकारचा उद्देश म्हणजे ब्रिटिश साम्राज्याला अपेक्षार्ह वाटणारा मजकूर रद्द करणे आणि त्या ऐतिहासिक कागदपत्राचे जतन करणे होता. ब्रिटिश राज्यकर्ते इतिहासाचे भोक्ते असल्यामुळे ऐतिहासिक वस्तुचे रक्षण करणे आपले कर्तव्य मानीत. त्याप्रमाणे रानडयांची अभिप्राय लिहिण्याची पध्दत सविस्तर पध्दतीची असल्यामुळे व भावी पिढीच्या दृष्टीने ते महत्वपूर्ण असल्याने शाळा खात्या मार्फत प्रसिध्द होणा-या Bombay Education Record मध्ये हे अभिप्राय प्रसिध्द केले जात. त्यांच्याकडे आलेल्या सौरंध्री, रत्नप्रभा, हिन्दुस्थानचा संक्षिप्त इतिहास, सातारकर भोसल्यांचा इतिहास केकादर्श इ. पुस्तकावर त्यांनी विस्तृत अभिप्राय कळविले होते. "हिन्दुस्थानाचा संक्षिप्त इतिहास या पुस्तकाचे समालोचन करताना त्यांनी लिहिले की, "ज्या ग्रंथकाराने इतिहास विषयावरील अधिकारी लेखकांची मोठमोठाली पुस्तके वाचलेली नाहीत, त्याची तद्विषयक संक्षिप्त पुस्तके कधीच लोकप्रिय होणार नाहीत. इतिहास लेखकांसमोर गतकाळचे

स्पष्ट चित्र उभे राहिल्याशिवाय, कार्य कारणभावाच्या नियमान्वये उत्पन्न झालेल्या घडामोडी कोणत्या व केवळ सहजासहजी उत्पन्न होवुन कालपटावर आपले स्मृतीचिन्ह न ठेवणाऱ्या क्षुद्र गोष्टी कोणत्या, याचा निवाडा त्यास करता येणार नाही"[१८] इतिहास लेखनाविषयी रानड्यांची अभ्यासवृत्ती, प्रमाणबध्द लेखनाचे वैशिष्ठ्य नजरेस येते. रानडे आपले मत विवेकाच्या कसोटीवर, बुध्दीप्रामाण्याच्या आधारे तपासुन पाहत. नंतरच योग्य व वाटले तर त्याचा अंगिकार करीत असत. म्हणुन त्यांना ग्रॅंटनी सॉक्रिटिस सारखे चौकस म्हटले आहे.

सातारकर भोसल्यांच्या इतिहासावरील पुस्तकाचे अवलोकन करीत असता त्यांनी अभिप्राय दिला की, "After all it is not just to judge of men of the past times in the abstract. One must look upon men and things in the light of contemporary history and bearing in mind the peculiar circumustances of people who live amidst troublous times. Judged by this charitable standard shivaji was a favourable specimen of the race to which he belonged.[19] निःपक्षपातीपणाने न्याय देण्याची प्रवृत्ती उपजतच त्यांच्यामध्ये लहानपणापासुन होती. त्या न्यायबुध्दीला त्यांनी आपल्या ज्ञानाने प्रभावित ठेवले होते. त्यासाठी त्यांनी कधी आपपर भाव ठेवला नव्हता. म्हणुनच एका उत्कृष्ट विद्यार्थी, न्यायाधिश, प्राध्यापक या सर्व भुमिकेतुन त्यांनी आपले उच्च आदर्शावर आधारित जीवन प्रभावित ठेवुन लोकांसमोर एक समाजसुधारकाचा आदर्श निर्माण केला होता व आपल्या कार्याला अध्यात्माची जोड देवुन उच्च नैतिक आदर्शही निर्माण केला होता. गीतेप्रमाणे परिणामाची अपेक्षा न ठेवता सतत कार्य चिंतनशील, संयमी, दुरगामी वृत्तीने करीत असत. सरकारी नोकरी करीत असता त्यांनी सार्वजनिक सभा, प्रार्थना सभा, वक्तृत्वमंडळ ग्रंथोत्तेजक मंडळ, वसंत व्याख्यानमला, राष्ट्रीय सभा, सामाजिक परिषद संस्था मार्फत सामाजिक सुधारणा घडवुन आणण्याचा लोकांमध्ये जागृती करण्याचा

प्रयत्न केला. राजकीय, सामाजिक, आर्थिक, धार्मिक, वाड.मयीन, सांस्कृतीक या सर्व क्षेत्रात कार्य केले. त्यांनी आपल्या लिखाणात इंग्लिश भाषेला महत्व दिले असले तरी मराठी भाषेवर ही त्यांचे प्रेम होते. ओ. ट्रान्सलेटरचे कार्य करतांना त्यांनी मराठी वाड.मयाचा अभ्यास केला होता. मराठी वाड.मयाची समृध्दी गाठण्याकरीता इंग्लिश वाड.मयाशी त्याची तुलना करीत इ.स. १८६५ ला Catlauge of Native Pulication in The Bombay Presidency upto 31st Dec. 1964. या ग्रंथासाठी मराठी वाड.मयासंबंधी लेख लिहिला होता.

रानडे यांचे सुखवस्तु एकत्र कुटुंब होते. ते स्वतः अत्यंत साधेपणाने राहत असत त्यांच्या जीवनात व पितृभक्तीला अत्युच्च स्थान होते. रमाबाईंनी आपल्या आठवणींमध्ये रानडे वडिलांचा आदर करीत असल्याचा उल्लेख आहे. "वडिलांचा शब्द मोडावयाचा नाही आणि त्यांच्या कुटुंबामध्ये आपण विघातक व्हावयाचे नाही, ही दोन व्रते त्यांनी कटाक्षाने पाळली"[20] रानडयांवर घरची सर्व जबाबदारी असल्यामुळे रानडे व रमाबाईंनी घरातील सौख्य कायम टिकावे म्हणून बराच त्रास सहन केला. कुठलेही काम काटेकोरपणे व परिश्रम घेवुन करण्याची सवय त्यांना जडली होती. याचा उपयोग त्यांना पुढील जीवनात बराच झाला होता. त्यांचा स्वभाव मुळातच उदार व सहिष्णु असल्याने घरातील लहान मोठया वाडीत लोकांच्या कुटुंबाची काळजी निस्वार्थी व कर्तव्यदक्षतेने रानडे घेत असत. संयमी वृत्तीमुळे त्यांनी अप्रिय गोष्टी त्यांनी सहन केल्या होत्या.

रानडे यांची राहणी अत्यंत साधी होती. त्याचे प्रमाणे त्यांचा पेहरावही साधाच होता. रानडे यांच्या सवयी इतक्या साधेपणाच्या होत्या की, त्या एखाद्या संसार निवृत्त साधु-पुरुषाला शोभतील असे दिनशा वाच्छा यांनी म्हटले होते.[21] रानडयांचा विद्या व्यासंगीपणा पुण्यात सब्जज म्हणुन इ.स. १८७१ ला झाल्यानंतर ही चालुच होता. सार्वजनिक जीवनात प्रवेश केल्यानंतरही त्यांच्या ज्ञानोपासनेत खंड पडला नाही त्यामुळे त्यांचा एक डोळा अतिवाचनाने कायमचा अधु बनला होता. त्यांचा स्वभाव धीर गंभीर होता कधी कुणाची कुचेष्टा केली नाही उणेपणा किंवा दोष त्यांनी बोलुन

दाखविले नाही व तसे दुस-यांकडून होत असल्यास त्याला प्रोत्साहन कधीचे देत नसत. फाटकांनी त्यांच्या या स्वभावाविषयी विश्लेषण केले आहे.[२२] त्यांचे वक्तृत्व प्रभावी होते. वक्तृत्वोत्तेजक सभा, वसंत व्याख्याने मालेतील भाषणाने भारावून जात.या सभेत त्यांचे बालमित्र महादेव कुंटे व रानडयांना ह्या प्रभावी वक्तृत्वामुळे लोक त्यांना प्रेमाने पुण्याच्या दोन "महाकाळी तोफा" म्हणत असत. त्यांचे विचार सर्वसमावेशक वृत्तीचे असल्याने त्यांनी आपल्या विरोधकालाही प्रखर विरोध करण्याचा प्रयत्न केला नाही. अत्यंत साध्यावृत्तीने ते इतरांना आपल्यामध्ये समावून घेत असत. या स्वभावाच्या फायदा त्यांना पुढील सार्वजनिक जीवनात झालेला दिसून येतो. त्यांचे सार्वजनिक जीवन पुण्यामधून इ.स. १८७१ पासून सुरु झाले होते व त्यानंतर त्यांनी कधी मागे न पाहता आपले जीवन कार्य सतत कार्यरत राहून यशस्वीपणे करण्याचा प्रयत्न केला. रानडयांनी समाजकार्य करीत असतांना इ.स. १८९३ पर्यंत सामाजिक तत्कालीन प्रश्नावर लक्ष केंद्रित केले होते. तसेच इ.स. १८९५ पर्यंत सार्वजनिक सभेचे कार्य यशस्वी करण्याचा प्रयत्न केला. शेवटी ही सभा टिळकांच्या हातात गेल्यानंतर त्यांनी राष्ट्रीय सामाजिक परिषदेच्या कार्यात मग्न राहिले होते. या दरम्यान डिसें. १९०० मध्ये लाहोरच्या सामाजिक परिषदेच्या अधिवेशनाची पूर्वतयारी करीत असतानाच ते शेवटच्या गंभीर आजाराने अंथरुणाला खिळून राहिले व त्याच आजारपणात त्यांचे निधन १६ जाने. १९०१ मध्ये रात्री १०.३० ला मुंबईत झाले. या शेवटच्या अधिवेशनातील भाषणात त्यांनी भारताच्या उज्वल भवितव्याची स्वप्ने पाहिली होती. रमाबाई रानडयांनी आपल्या आठवणीत त्यांच्या शेवटच्या जीवनयात्रेचा उल्लेख आहे. ते स्वतः आजारी असल्याने लाहोर अधिवेशनाला जावू शकले नाही त्यांनी आपले लिहिलेले भाषण श्री. चंदावरकर, श्री. गोखले सोबत चिटणीसांकडे पाठविले. ते भाषण त्या अधिवेशनात वाचून दाखविण्यात आले. रानडे यांनी आपल्या शेवटच्या भाषणात भारताच्या उज्वल भवितव्याचा आशावाद प्रगट केला होता. "वशिष्ठ आणि विश्वामित्र" या भाषणात त्यात ते शेवटी म्हणतात "ज्या मानववंशात या प्रकारच्या आचार्यांची परंपरा आहे, तो मानववंश कधीही

मागे पडणार नाही. आणि मला विश्वास वाटतो की, जे दिव्य ध्येय आपण गाठू इच्छितो, ते गाठण्याला आपणाला फार काळ थांबावे लागणार नाही" लाहोर परिषदेतील माहिती "टाईम्स, ॲडव्होकेट, सोशल रिफॉर्मर इ. वृत्तपत्रात वाचल्यानंतर त्यांनी गोखले, चंदावरकरांची अधिवेशनातील भाषणे वाचल्यानंतर आता यापुढे हा भार घेण्यास तुम्ही दोघेही योग्य आहात हे पाहून मला फार संतोष वाटला या संस्थाने मला वाटत असलेली काळजी आता कमी झाली आहे."[२३] अशा आशयाची दोन पत्रे आपल्या हातांनी दोघांना लिहिले ही त्यांची शेवटची पत्र होती. त्यापूर्वी त्यांनी आपल्या सार्वजनिक जीवनातील अखेरचे भाषण स्वतः २४ नोव्हेंबर १९०० मध्ये दादाभाई नौरोजींच्या तैलचित्राचे अनावरण करतांना केले होते. त्या भाषणात भारताच्या भवितव्याची दिशा स्पष्ट करतांना त्यांनी नौरोजींच्या कर्तृत्व विशद केल्यानंतर शेवटी म्हटले की," In the modern conditions of life the India that is to be born will have no room for mere distinction of race, creed, colour we aspire all of us to be Indian first and Indians to the last, over every other every other condition which has separated us so long and made a united India impossible. The India of the past we can never hope to revive, but the India of the lecture, it is for us to shape and to fashion."[24] हे भाषण करीत असतांनाच त्यांना छातीतून कळा येत होत्या. त्यांची तब्येत खालावत असली तरी त्यांनी आपले कार्य थांबविले नव्हते. शेवटपर्यंत समाजासाठी स्वतःचा उपयोग करून घेतला. उत्कट देशप्रेमाने स्वतःच्या कार्यावर निष्ठा ठेऊन निस्वार्थीपणाने कार्य केले होते.

रानडयांनी बी.ए.च्या दोन्ही परीक्षेत त्यांनी वाचलेल्या पुस्तकांचा तपशील त्यांनी इ.स. १८६२-६३ सालच्या कामातील अहवालांमध्ये दिला आहे त्याप्रमाणे त्यांनी बी.ए.ला अभ्यासलेली पुस्तके पुढील प्रमाणे :-

(1) Macaulay - Speeches (2) Gil Blas, (3) Tocqueville-Revolution. (4) Curran - speeches (5) The last of the Barons, (6) Pecoke - India in Greece. (7) Devareux (8) Smollet - Peregrin pickle (9) Sir Lancelot Greaves (10) Ranky's Popes, (11) Wilson - Hinduoo Seats (12) Byron-Don Juan, Child, Harold and Sardanapalus. (13) Newman - University and Education (14) Hallam - Middle age, constitutional History इ.स. १८६३-६४ या काळात रानडयांनी (1) Buckle - History Vol. II (2) Macaulay - History, Five vols (3) Coleridge - Poetical words - Piecelom-ni, Wallenstein, (4) Foster - Essays ही पुस्तके वाचली.
(5) Shelley - poetical works - Queen Mab, Prometheus, Cenci, revolt of Islam. (6) Thier - French Revolution 200 pages. (7) Petrarch - Sonnets. (8) Voltaire - Henriad. (9) Eugene Aram. (10) Alfieri - Agamemnon (11) Sir G. Lewis - Influence of Authority in matters of opinion. Vol I, II. (12) History of Inductivity Science Phylosophy इत्यादी पुस्तके वाचली.

इ.स. १८६४-६५ या काळात वाचलेली पुस्तके (1) Maine - Ancient law (2) Portions of Words worth (3) Mill-Representative Government (4) Sir G. Lewis - Dialogue on Government, political terms, Method of observations in politics Vol I (5) Macaulay - continuation History of England. (6) Manseli - Bampton Lectures (7) Marivale - Vol I to VII (8) Milman - Christianity vol I,II (9) Cohrille- Empire of the Romans. (10) Carlyle - French Revolution."[२५] इ.पुस्तके होय.

ब) आगरकरांचे जीवनचरित्र

१९ व्या शतकात भारतात धर्म व समाज सुधारणेची लाट उसळली हा केवळ योगायोगाचा भाग नसून त्याला आवश्यक असे पोषक वातावरण अनेक कारणांनी तयार होवू लागले होते. भारतात पाश्चात्य ज्ञान मिळवून बुध्दिवादाने प्रभावित झालेल्या सुशिक्षित पिढीने समाजातील अनिष्ट गोष्टींकडे वैज्ञानिक व चिकित्सक दृष्टीने अवलोकन करुन वाईट रुढी, परंपरा नष्ट करण्यासाठी समाज प्रबोधनाचे कार्य करण्यास पुढे सरसावले. अनिष्ट परंपरेच्या विळख्यात अडकून पडलेल्या भारतीय समाजावर बुध्दिप्रामाण्याने आघात करुन निकोप समाज निर्माण करण्याच्या कार्याला सुरवात वैचारिक प्रबोधनाने झाली. सर्व समाजसुधारकांची समाजाला सुधारण्याची तळमळ सारखी असली तरी त्यांच्या विचारांची तात्विक बैठक वेगवेगळी आणि विचार व्यक्त करण्याची शैलीही विभिन्न होती. त्यांच्या वैचारिक विवेचनाच्या मर्यादा आणि व्याप्ती विभिन्न असल्याने त्यांच्या विचारांच्या प्रभावाचे क्षेत्र लक्षात येते. या दृष्टिकोनातून आगरकरांच्या जीवनशैली वरुन त्यांच्या विचारांची व्यापक दृष्टी ही इतर सुधारकांहून भिन्न व वैशिष्ठयपूर्ण असलेली आढळून येते.

आगरकरांनी आपले कार्यक्षेत्र महाराष्ट्रापुरते मर्यादित केले असले तरी त्यांचे समाजाला जागृत करण्याचे कार्य बहुमोल ठरले आहे. सामाजिक संक्रमणाच्या काळात नवशिक्षित तरुणांवर मुलगामी परिणाम होवून राजकीय, सामाजिक, धार्मिक, शैक्षणिक चळवळी उभारण्याची प्रेरणा अप्रत्यक्षपणे मिळत होती. आगरकरांच्या विद्यार्थी जीवनात सामाजिक, राजकीय घडामोडींचा प्रभाव पडून त्यांचे व्यक्तिमत्व तयार होत होते. त्यातूनच त्यांच्या विचारांना प्रगल्भता प्राप्त होवून तत्कालीन परिस्थितीशी मिळते जुळते न घेता प्रतिकूल परिस्थितीशी सामना करण्याची प्रवृत्ती निर्माण झाली. व त्यांनी आपल्या जीवनाचा प्रवाह सामान्य न ठेवता समाजोध्दारासाठी कठीण परिस्थितीत असामान्य जीवन पत्करले. हातात लेखणी घेऊन लोक शिक्षणाच्या

माध्यमातुन एक नवीन समाज निर्माण करण्यास पुढे सरसावले. त्यांच्या साहित्यामध्ये व कृतीत क्रांतीकारक वृत्तीचे स्फुलिंग विखुरलेले दिसतात. या पार्श्वभूमीवर त्यांच्या जीवन कार्याचे अवलोकन केल्यास एका ख-या समाजसुधारकाचा प्रत्यय येऊ शकेल.

गोपाळ गणेश आगरकर यांचे जन्म गाव सातारा जिल्ह्यातील क-हाड जवळील टेंभू हे खेडेगाव होय. त्यांचे पणजोबा बच्चाजीपंत टेंभू मधील सधन आसामी म्हणून ओळखले जात. त्यांचा मोठा वाडा व त्यातील लक्ष्मीनारायणाचे मंदीर २० व्या शतकाच्या अखेरीपर्यंत मोडकळीस आलेल्या अवस्थेत कायम होते. वडील गणेशपंत व आई सरस्वती बाई यांच्या दुस-या मुलाचा म्हणजे गोपाळरावांचा जन्म त्यांच्या आजोळी क-हाडमध्ये १४ जुलै १८५६ ला झाला. घरची गरीब परिस्थिती असल्यामुळे त्यांचे बालपण आजोळी क-हाडमध्येच गेले. आगरकरांचे धाकटे मामा दत्तोपंत भागवत समवयस्क असल्याने त्यांच्याशी विशेष स्नेह होता. प्राथमिक शिक्षण मामां सोबत क-हाडलाच झाले. आगरकर बालपणी उनाड, हूड प्रवृत्तीचे असले तरी अभ्यासुवृत्ती, हजार जबाबी पणा त्यांच्यामध्ये होता. धीटपणा, स्पष्ट वक्तेपणा आणि अभ्यास लेखनाची ओढ लहानपणीच रुजली होती.

इ.स. १८६८ पर्यंत इंग्रजी तिस-या वर्गापर्यंतचे शिक्षण क-हाडलाच झाले. या काळात त्यांच्या आयुष्यातील काही घडलेल्या घटनांवरुन त्यांची स्वभाव वैशिष्ठ्ये स्पष्ट होतात. शालेय जीवनातच त्यांच्यामध्ये वाचनाची आवड निर्माण झाली व लेखनाला प्रेरणादायी वातावरण लाभले. त्यांच्या शाळेचे हेडमास्तर श्री. नारायण मनोहर रोधे मुलांना हसत, खेळत अभ्यासाशी एकरुप ठेवित. विनोदाने प्रश्न विचारावे आणि विनोदानेच उत्तरे द्यावीत यामुळे विद्यार्थ्यांमध्ये ते विशेष चमकले. हीच विनोदबुध्दी आगरकरांच्या पुढील जीवनातही कायम राहिली. त्यावेळी क-हाडमध्ये (मुन्सिफ) न्यायाधिश म्हणून रावसाहेब अमृत श्रीपत नागपूरकर हे गृहस्थ विद्याप्रेमी व उदारप्रवृत्तीचे

होते. ते दर रविवारी विद्यार्थी व समवयस्क मित्रांची सभा ठेवित. त्यात विविध विषयांवर मुलांकडून निबंध लिहून वाचून घेत व चांगल्या निबंधाला उत्तेजनपर बक्षीस देत असत. आगरकर आपल्या मित्रांसोबत या सभेत सहभागी होत असत. आगरकरांच्या एका चांगल्या निबंधाला बक्षीस मिळून त्याचे सभेत सर्वांनी कौतुक केले परंतु क-हाडचे मामलेदार रावसाहेब जोशींनी त्यांच्या निबंधावर टिका करुन आक्षेप घेतला की, "असला निबंध असा लहान मुलांना कसा लिहिता येणार ? कोणा कडून तरी लिहून घेतला असेल झाले। मामलेदाराचे हे बोलणे आगरकरांना आवडले नाही त्यांनी धिटाईने लागलीच सुनावले की, "साहेब आपणास हवेच असेल तर आपण पाहिजे तो निबंध आता मला लिहावयास सांगा, अगदी इतकाच चांगला निबंध मी आपणांस लिहून दाखवतो."[२६] या तडफदार उत्तराने खुष होऊन नागपूरकरांनी त्यांना दोन रुपयाचे बक्षीस दिले. हाच तडफदारपणा आगरकरांच्या पुढील आयुष्यातही कायम राहिला.

अत्यंत हलाखीची परिस्थिती असल्याने आजोळी प्राथमिक शिक्षणाची सोय झालेली होती. पण पुढील शिक्षण क-हाडला उपलब्ध नसल्याने ते कोठे व कसे घ्यावे हा त्यांच्या समोर मोठा प्रश्न होता. शिक्षणाची आवड त्यांना स्वस्थ बसु देत नव्हती. म्हणून त्यांनी इ.स. १८६९ ला क-हाडला मुन्सिफ कचेरीत नोकरी करुन शिक्षणासाठी पैसा उभारण्याचा असफल प्रयत्न केला पण त्यात जीवनातील महत्वपूर्ण वेळ घालवित आहो ह्याची जाणीव होऊन त्यांनी नागपूरकरांची भेट घेवून पुढील शिक्षणाचा मनोदय सांगितला. त्यांनी आगरकरांचा पंचाहत्तर रुपये देऊन मदत केली नंतर आगरकर आपल्या चुलत काकांकडे रत्नागिरीला पायी चालत गेले. वयाच्या बारा, तेराव्या वर्षापासून त्यांच्या खडतर जीवनाला सुरवात झाली होती. प्रतिकूल परिस्थितीवर मात करण्यासाठी प्रत्येक संकटाला सामोरे जाण्याची प्रवृत्ती ह्या लहान वयातच अंगी बाणली होती. पण त्याचे काका वामनराव आगरकर हे शिक्षण खात्यातील तपासनीस आगरकरांच्या मदतीस धावले नाही. शिक्षणाची प्रबळ इच्छा व कष्ट करण्याची तयारी असुनही त्यांना रत्नागिरीला शिक्षण घेता आले नाही." स्वावलंबना

बरोबरच जीवनातील व्यवहारी जीवनाचा अनुभव इतक्या लहान वयातच त्यांना आला. सामाजिक अन्यायाचे, अव्यवस्थेचे चित्रण करण्यात पुढे त्यांच्या लेखणीत जो सडेतोडपणा व बिनचूकपणा आला याचे कारण बालवयापासून त्यांना मिळालेला कटू अनुभव व पहावयास मिळालेल्या गोष्टी हेच होय.[२७] त्यानंतर आगरकर परत कऱ्हाडला आले. त्यांना दोन भाऊ, तीन बहिणी असल्याने घरची आर्थिक परिस्थिती सांभाळण्यासाठी कऱ्हाडला इ.स. १८७२ ला कपौंडरची नोकरी पत्करली पण त्यांना शिक्षणाची ओढ स्वस्थ बसू देत नव्हती. ही नोकरीही त्यांना मानवली नाही.

आगरकरांचे थोरले मामा अकोल्यामध्ये स्थायिक झाले होते. त्यांनी आपल्या लहान भावाला दत्तोपंतांना आपल्या सोबत अकोल्यास शिक्षणासाठी नेण्याचे ठरविले. तेव्हा आगरकरांनाही त्यांच्या सोबत अकोल्याला जाण्याची संधी मिळाली. तेथे त्यांनी इ.स. १८७२ ते ७५ या काळात हायस्कूलचे तीन वर्षांचे शिक्षण घरी राहून पूर्ण केले. ते उत्तम रितीने पास झाले. विष्णुपंत महाजनी नावाचे प्रेमळ शिक्षक त्यांना लाभले. त्यांच्या मार्गदर्शनाखाली त्यांनी हायस्कूलचे शिक्षण पूर्ण केले होते. महाजनींनी आगरकरांबद्दल उद्गार काढतांना म्हटले की, "गोपाळरावाचे वय त्यावेळी पंधरा-सोळा वर्षांचे होते. अंगयष्टी उंच, सडपातळ व काटक होती. डोळे पाणीदार, भाषण ठसक्याचे व आत्म प्रत्ययाचे होते अभ्यासावर फार लक्ष, वेळ फुकट दवडायचा नाही असा निश्चय तेव्हाच गोपाळराव नाव काढतील अशी माझी खात्री झाली होती. चांगल्या कळकळ घेणाऱ्या गुरुवर व आप्तांवर प्रेम जास्त वाढत चालले ससतशी पुज्य बुध्दीही सरसावली पण स्पष्ट मनाला खरे वाटे ते बोलण्याची सवय गुरुगौरवार्थही कमी झाली नाही. एकदा कामामुळे शाळेत जायला उशिर झाला असता, "तुमच्या हातून काय होणार ? असेच रखडत पडायचे तुम्ही ?" असे महाजनींनी म्हणताच आगरकर पटकन उद्गारले, "आपणासारखा एम्.ए. होईन तरच नावाचा आगरकर."[२८] त्यांच्या या बोलण्यावरुन निश्चयी सडेतोड, स्पष्टवक्तेपणा दिसून येतो. आणि आर्थिक अडचणींमुळे व परिस्थितीमुळे शाळेत वेळेवर हजर राहणे अशक्य असले तरी ज्ञान संपादन करण्याची लालसा त्याही परिस्थितीत कमी झालेली नव्हती. उलट जास्त

आग्रही वृत्तीने व निश्चयाने पुढील मार्ग शिक्षण पूर्ण करण्याचा प्रयत्नकरीत राहिले.

हायस्कूल मध्ये असतांना इंग्लिशचे सखोल ज्ञान प्राप्त करण्याकरीता आगरकरांनी इंग्रजी पाठाचे मराठीत भाषान्तर करण्याची पध्दत महाजनी सरांकडून आत्मसात केली होती त्यामुळे त्यांच्या मराठी लेखनाला अपेक्षित वळण लागले त्याचा उपयोग पुढे त्यांना वृत्तलेखनात झालेला दिसून येतो.

व-हाडमध्ये उच्च माध्यमिक वर्गासाठी व्हर्नाक्युलर स्कॉलरशिप परीक्षा होत असे. त्यात नवनीत, नाटके, गद्यग्रंथाचा अभ्यासक्रम होता. आगरकरांनी दोन वर्षे ही स्कॉलरशिप मिळविली होती. इतिहास, इंग्रजी संस्कृत, मराठी इ. विषयांचा अभ्यास मॅट्रिक पर्यंत चांगल्या प्रकारे झालेला होता. शाळेपासून त्यांना ललित लेखनाची आवड असल्याने निबंध लिहिणे हा त्यांचा आवडता छंद होता, व या माध्यमातूनच त्यांनी अर्याजन करुन शिक्षणाचा खर्च पूर्ण करण्याचा प्रयत्न करीत असत. पुढे हेच ललित लेखन त्यांच्या सुधारणा कार्यातील महत्वाचे अंग बनले होते. इ.स. १८७५ ला मुंबई विद्यापीठाची प्रवेश परीक्षा पास झाल्यानंतर पुन्हा त्यांच्या पुढे पुढील शिक्षण कसे होणार असा प्रश्न उभा राहिला. थोरल्या मामांना दोघांच्या शिक्षणाचा खर्च झेपणारा नव्हता, दत्तोपंत आधीच पुण्यात शिक्षणासाठी गेलेले होते. महाजन सरांनी जे आगरकरांच्या मनावर व बुध्दीवर संस्कार केले होते त्याचा उपयोग त्यांच्या पुढील जीवनात झालेला होता. महाजनींनी त्यांची शिक्षणाची दुर्दम्य इच्छा ओळखून आपल्या परिने आर्थिक मदत करण्याचा प्रयत्न केला. आगरकरांच्या कॉलेज प्रवेशासाठी त्यांच्या गुरुजनांनी साठ रुपये वर्गणी गोळा करुन त्यांची गरज भागविली, पुढील आर्थिक गरज पूर्ण करण्यासाठी आगरकरांनी अकोला येथील "व-हाडसमाचार" या साप्ताहिका मध्ये सहा महिने लेख लिहून दरमहा पाच रुपये मिळविले. याच वेळेला त्यांना ज्युनियर स्कॉलरशिप मिळू लागली. तरीही आर्थिक चणचण होतीच. डेक्कन कॉलेजच्या गॅदरिंगमधील निबंध स्पर्धेत भाग घेवून ५० रु.चे बक्षिस मिळविले. त्याचबरोबर पुण्यातील रानडे निर्मित

वक्तृत्वोत्तेजक सभेच्या स्पर्धेतही "एकत्र हिन्दु कुटुंब पध्दतीतील फायदे व तोटे" या विषयावर निबंध लिहून ५० रु. चें पारितोषिक मिळविले. दत्तोपंत मामाही थोडी फार मदत करीत असत. पुढे परीक्षेच्या फी साठी त्यांच्या जवळ पैसे नसल्याने त्यांनी नाटक लिहून पैसे मिळविण्याचा प्रयत्न सुरु केला. त्याचे प्राध्यापक केरूनाना छत्रे यांना याबद्दल कळले तेव्हा त्यांनी आगरकरांचा वेळ सत्कार्णी लागावा आणि अतिरिक्त श्रम वाचून त्याचे लक्ष अभ्यासात केंद्रित होण्यासाठी ताबडतोब आगरकरांची फी भरली. अशा त-हेने प्रतिकूल परिस्थितीवर मात करुन त्यांनी कॉलेजचे पहिले वर्ष उत्तम रितीने पास होवून पूर्ण केले.

बी.ए.च्या दुस-या वर्षी स्कॉलरशिप मिळाल्याने आर्थिक गरज भागुन त्याचे लक्ष अभ्यासावर केंद्रित झाले. इंग्रजी व संस्कृत या दोन्ही भाषेतील अनेक ग्रंथाचा अभ्यास केला. ऐच्छिक विषय इतिहास, तर्कशास्त्र व तत्वज्ञान या विषयांची निवड केली होती. या काळात त्यांनी अनेक प्रसिध्द लेखकांच्या पुस्तकांचा अभ्यास केलेला होता. त्याचबरोबर प्राध्यापकांची व्याख्याने आत्मसात केली होती. जॉन स्टुअर्ट मिल्ल चे On Liberty, Subjection of Women, Three Essays on Religionहया ग्रंथाचे सखोल वाचन केले. मिल्लचा उदारमतवाद, व्यक्ति स्वातंत्र्याचे विचार, लोकशाहीची कल्पना, धर्मविषयी बुध्दिप्रामाण्यता इ. विचाराचे संस्कार वाचनाने याच काळात आगरकरांवर निर्माण झाले. मिल्ल प्रमाणे हर्बर्ट स्पेन्सरचे Sociology and Ethics, First principles social - statics, first principles of Ethics Vol II, Essay on Education and Kindred subjects इं. ग्रंथाचे वाचन केले."[२९] आगरकरांवर स्पेन्सरच्या समाजशास्त्रीय विचारांचा प्रभाव पडलेला होता. इतिहास विषयातील गिबन हया लेखकाने आगरकरांना प्रभावित केले होते. गिबनचे Decline and Fall of Roman Empire हे पुस्तक विशेष महत्वपूर्ण वाटत होते. कोम्टच्या विचारांचाही प्रभाव त्यांच्यावर होता. फ्रेन्च राज्यक्रांती मधील विचारांनी ते भारावलेले होते.

त्याचप्रमाणे त्यांना मिल्लनेही प्रभावित केले होते या प्रसिध्द लेखकांच्या ग्रंथाच्या वाचन व मननानंतर निर्माण झालेले नवीन विचार, कल्पना आपल्या सहध्यायां व्यक्त करीत असत. त्यावेळचे बुध्दिमान विद्वान प्राध्यापक, कुशाग्र बुध्दीचे सहमित्रांशी होणाऱ्या विचार विनिमयामुळे त्यांच्या बौध्दिक क्षमतेचा विकास होत गेला व त्याच बरोबर सामाजिक विचारांची जाणीवही सखोल होत गेली. अभ्यासाला पुस्तकाखेरिज असांतर इतर ग्रंथांच्या व्यासंगामुळे आगरकरांच्या मनात विद्यार्थी जीवनापासूनच लोकसेवेची प्रेरणा मूळ धरू लागली होती. अत्यंत गरीबीतून वर आल्यामुळे आगरकरांना सामाजिक व्यवस्थेतील दोष अनिष्ट रूढी परंपरा, सामाजिक व्यवहाराच्या विकृत स्वरूपाचे लवकरच आकलन होत गेले. हाल अपेष्टा सहन करून आपली ज्ञानोपासना कायम ठेवली होती. ज्ञानाची प्रगल्भता वाढण्याकरीता ग्रंथाचे वाचनही वाढले होते. "सा विद्या या विमुक्तये" विद्या तीच खरी की माणसाला स्वार्थाच्या जाळ्यातून मोकळी करते आणि काही उदात्त कृत्ये हातून घडविते,याप्रमाणेच आगरकरांनी अशीच विद्या मिळविण्याची इच्छा बाळगली होती व ती मिळाल्यावर तसेच वागावयाचे विचार त्यांच्या मनात येऊ लागले होते.[30] इतिहास, तत्वज्ञान या विषयांचा सखोल अभ्यास करतांना लोककल्याण कडे त्याचे लक्ष आकर्षित होऊ लागले होते.

त्यांच्या विचारांवर व मनावर ःतरांप्रमाणे केरूनांना छत्रे या प्राध्यापकांचा प्रभाव होता, निस्वार्थीपणा, विद्याव्यासंग, दुसऱ्यांना मदत करण्याची प्रवृत्ती विशेषतः गरीब विद्यार्थ्यांना मदतीचा मिळणारा हात यामुळे आगरकर प्रभावित होते. त्यांच्या संबंधी मृत्युलेख केसरीत लिहितांना आपली पुज्यबुध्दी त्यांनी प्रगट केली होती. डेक्कन कॉलेजमधील गणिताचे प्राध्यापक शोलबी यांच्या मार्गदर्शनाचे पुढील शिक्षण संस्थांच्या कामातही बराच उपयोग झाला होता. अशा विद्याप्रेमी, निस्वार्थी, उदारमतवादी विद्वानांच्या सहवासामुळे त्यांच्या जीवनात बदल होण्यास मदत झाली.

आगरकर बी.ए.च्या शेवटच्या वर्गात असतांनाच त्याचे लग्न झाले हे लग्न त्या काळाच्या मानाने उशीराच झाले होते. त्याकाळात १६-१७ व्या वर्षी मुलीचे विवाह करून दिले जात. पण आगरकराचे लग्न बावीसाव्या वर्षी

क-हाडजवळील उंब्रज येथील अंबूताई मोरभट फडके यांच्याशी झाले. लग्नानंतर त्या यशोदाबाई आगरकर बनल्या होत्या. लग्नापूर्वी त्या निरक्षर होत्या. आगरकरांनी त्यांना लिहायला, वाचायला शिकविले. पण त्या जुन्या संस्कारात वाढल्या असल्यामुळे जुन्या प्रथा आणि चालिरिती त्यांच्याकडुन सहजासहजी सुटल्या नाहीत. आगरकरांनी त्यांच्यावर सक्ती किंवा दडपण आणून त्यांच्या मनाविरुध्द जाण्याचे टाळले. नवे विचार ते पत्नीला पटवून देण्याच्या प्रयत्न करीत. त्यातून त्यांना जेवढे पटेल तेवढेच त्या घेत होत्या. त्यांच्या धार्मिक समजुतीचा त्यांनी कधी अपमान केला नाही किंवा त्यांच्या रुढ विचारांची अवहेलना केली नाही. त्यामुळे त्यांच्या कौटुंबिक जीवनात तंटा किंवा संघर्ष निर्माण झालेला आढळत नाही. अत्यंत गरीब परिस्थितीतही त्यांनी आपले घर व्यवस्थित सांभाळले पुढे त्यांना दोन मुले व एक मुलगी झाली. पत्नीला शिक्षितकेले असले तरी त्यांना आर्थिक परिस्थितीमुळे उच्च शिक्षण देवून समाज कार्यात आणणे आगरकरांना शक्य झाले नाही. पण त्यांच्यावर आगरकरांच्या विचारांचा प्रभाव होता.पत्नीजीवना विषयी व कुटुंबाविषयी माहिती लिहिलेली आढळत नाही.

इ.स. १८७८ ला आगरकरांनी बी.ए.ची परीक्षा देऊन उत्तम रितीने पास झाले. विद्यार्थी दशेत त्यांना ज्ञानार्जनासाठी कराव्या लागणा-या अथक परिश्रमामुळे बी.ए. नंतर त्यांची प्रकृती खालावली व त्यांना दम्याचा विकार जडला, ह्या रोगाने त्यांची पाठ मरे पर्यंत सोडली नाही. बी.ए. झाल्यावर डेक्कन कॉलेजमध्ये १८७८ ला फेलो म्हणून नियुक्ती झाली. थोडी आर्थिक विवंचना कमी झाल्यावर त्यांनी एम्.ए.ला प्रवेश घेऊन अभ्यासावर आपले लक्ष केंद्रित केले. इ.स. १८७९ ला त्यांच्या जीवनाला वळण देणारी घटना घडली ती म्हणजे डेक्कन कॉलेजला बाळ गंगाधर टिळक यांच्याशी झालेली मैत्री होय. आगरकर एम्.ए. व टिळक एल्.एल्.बी.चा अभ्यास एकाच वसतिगृहात राहून करीत होते. समवयस्कतेमुळे व एक ध्येयाने प्रेरित असलेले दोन व्यक्ती एकत्रित आल्यानंतर त्यांचा स्नेह संबंध दृढ बनला. आपल्या ज्ञानाचा उपयोग लोकसेवेसाठी करावा अशी तळमळ आगरकरांना विद्यार्थी दशेपासून लागली होती. सरकारी नोकरी

करून सुखासीन जीवन जगण्यापेक्षा स्वतंत्र बाण्याने देशासाठी, समाजाच्या उन्नतीसाठी काहीतरी कार्य करावे असे विचार दोघांच्याही मनात असल्याने दोघांमधील मैत्रीने ह्या विचारांना चालना मिळाली. दोघांची निःस्वार्थ व स्वतंत्रवृत्तीने समाजसेवा करण्या विषयीची मनोभुमिका अभ्यासू वृत्तीमुळे तयार होऊन अन्यायाविरूद्ध लढण्याची झुंजार वृत्ती आगरकर व टिळकांची जीवन निष्ठा बनली.

आगरकर एम्.ए.ला असतांनाच त्यांनी आपले जीवनध्येय लोककल्याणाकडे केंद्रित केले होते. अभ्यासाबरोबर त्यांनी पुढील जीवनात समाजसेवेचा निस्वार्थ मार्ग स्विकारण्याचे ठरविले इतकी आर्थिक विवंचना बालपणापासुन असुनही त्यांना श्रीमंतीचे आणि मोठ्या पदाचे आकर्षण वाटले नाही. आपल्या आईला लिहिलेल्या पत्रात आगरकरांनी सांगीतले की, "आपला मुलगा मोठाल्या परीक्षा देत आहे, त्याला आता मोठाल्या पगाराच्या नोकऱ्या मिळतील आणि आपले पांग फिटतील असे मोठाले मनोरथ आई तु करीत असशील. पण मी आत्ताच सांगुन ठेवतो की, विशेष संपतीची हाव न धरता फक्त पोटापुरत्या पैशावर संतोष मानुन सर्व काळ परहितार्थ घालविण्याचे मी ठरवित आहे". त्यांच्या या विचाराबद्दलची प्रतिक्रिया व्यक्त करतांना महाजनीसर लिहितात की, विद्यार्थी दशेत गरिबीशी सतत झुंज देऊन, अलौकिक यश संपादून, आमरण गरिबीत आयुष्य कंठण्याचे ठरवुन अध्यापन वृत्तीने पुराण ऋषीचे अनुकरण करून तीस उज्ज्वल करण्याचे व्रत या निश्चयाने गोपाळराव घेत होते."[३१] आगरकरांना बालपणापासुन अशक्य गोष्टी प्राप्त करण्याची जिद्द होती. कृ.आ. गुरूजी हे टिळक आगरकरांचे जवळचे परिचित मित्र होते, त्यांनी आगरकरांच्या ध्येयाबद्दल म्हटले की, "गोपाळराव हे एक स्वयंप्रकाशीत रत्न होते. इतकी साहस व आयास सोसून त्यांनी इतकी मजल मारली असताही त्याचे लक्ष स्व सुखाकडे वळले नाही तर त्याचे सारे लक्ष लोकोपयोगी कृत्याकडे लागले होते."[३२] आगरकरांच्या प्रत्येक कृतीतूनच त्यांनी आपल्या ध्येयनिश्चीतीची वाच्यता केलेली दिसते. शालेय जीवनातील खडतर अनुभवातुनच त्यांनी आपला मार्ग

शोधला होता व त्यासाठी आवश्यक असलेल्या ज्ञानाची उपासना करुन आपले वैचारिक मानसिक प्रगल्भता व्यापक करण्याचा प्रयत्न केला होता. आपण ज्या समाजात राहतो त्या समाजाविषयी आपले काही कर्तव्य आहे, याची जाणीव त्यांच्यामध्ये विद्यार्थी दशेतच उत्पन्न होऊ लागली होती. त्यांचे मित्र व मामा दत्तोपंतांनी त्यांच्या ध्येयाविषयी आठवण सांगीतली की, कृष्णेच्या घाटावर बसुन मित्रासोबत गप्पा मारतांना त्यांना मित्रांना पुढील भविष्यासंबंधी विचारले तेव्हा मित्रांनी सामान्य व्यक्तिप्रमाणेच उत्तरे दिली होती पण आगरकरांनी मात्र त्यावर आपली प्रतिक्रिया व्यक्त करतांना म्हटले की, "मला असे वाटते की, आपले लोक अज्ञानी आहेत तेव्हा त्यांना शहाणे करुन सोडण्याचा प्रयत्न करावा"[३३] एवढेच बोलुन विसरले नाहीत तर लोकांना शहाणे करण्यासाठी स्वतः कठोर परिश्रम करुन ज्ञानार्जन केले आणि प्रथम सुधारणा आपल्या आयुष्यात घडवुन आणण्याचा प्रयत्न केला व नंतरच लोकांना, समाजाला सांगण्याचा निश्चय केला. त्यांचे हे विचार केवळ बौध्दिक चिंतनातुन तयार झाले नव्हते तर सभोवतालच्या परिस्थितीचे आकलन आणि गरीबीमुळे समाजाकडुन मिळणारी चांगल्या वाईट प्रकारची वागणुक आणि इतिहास, समाजशास्त्र, तत्वज्ञानाच्या अभ्यासाने तयार झालेला नवीन दृष्टिकोन या सर्व गोष्टीही कारणीभुत ठरल्या.

टिळकांशी आगरकरांची मैत्री घनिष्ठ झाल्यानंतर त्यांच्या समान ध्येयवादी जीवनाला एक मार्ग सापडला. दोघेही देशाच्या पारतंत्र्याविषयी मनात खंत बाळगुन होते. हे पारतंत्र्य आपल्या समाजाच्या झालेल्या अवनतीला कारणीभुत आहे याची जाणीव झाल्यामुळे स्वाभिमानाने, स्वतंत्रवृत्तीने, आत्मविश्वासाने व निर्भयपणे समाजकार्य करण्याचे मनोरथ आखु लागले. बंडगार्डन, सारसबागेची टेकडी, डोंगरीचा तुरुंग इ. ठिकाणी टिळक आगरकरांनी तासनतास गप्पा मारुन, वादविवाद करुन भविष्यातील आपला जीवनक्रम निश्चित करीत होते. "निश्चिंततेच्या त्या काळातही आपल्या मायभूमीचे "राजनैतिक दास्य" आणि आर्थिक दैन्य या विषयीचे विचार या तरुणांच्या डोक्यात थैमान घालीत असत. पदवी पदरात पडल्यानंतर काय करायचे याची चर्चा करीत एकत्र हसत फिरत असत."[३४] टिळक - आगरकरांच्या या चर्चेमध्ये त्यांचे मित्र ही सामील होत असत. त्या मित्रांमध्ये श्री. सारंग व श्री. उपासनी हे दोघे टिळक

आगरकरांच्या मध्ये ध्येय निश्चिती संबंधातील झालेल्या चर्चे साक्षीदार बनले होते. "आपले शिक्षण आपणच सांभाळले पाहिजे" हे ध्येय ठेवून राष्ट्रीय कार्याचा श्री. गणेशा करण्याची त्यांनी केलेल्या प्रतिज्ञेसंबंधी झालेला संवाद उपासनी व शारंगच्या मदतीने न. चि. केळकरांनी लो. टिळक याचे चरित्र भाग एक या पुस्तकामध्ये पेज नं. ४५-५० मध्ये लिहिलेला आहे.

आगरकरांनीही आपल्या सार्वजनिक जीवनातील पहिल्या तुरुंगवासात लिहिलेल्या "डोंगरीच्या तुरुंगातील आमचे एकशे एक दिवस" या पुस्तकात आपल्या ध्येया संबंधी टिळकांसोबत "झालेल्या संवादाची आठवण करतांना लिहिले की, "मी एम्. ए. करीता व टिळक एल्. एल. बी. करिता अभ्यास करण्यासाठी कॉलेजात राहिलो असतांना सरकारी नोकरी न पत्करिता देशसेवेत आयुष्य घालविण्याचा ज्या दिवशी निश्चय केला त्या दिवसापासून आम्ही जे जे बोललो, चाललो होतो त्याची पुन्हा पुन्हा आठवण होवून त्याची अनेक वेळा पुनरावृत्ती होत असे."[३५]. त्याच प्रमाणे टिळकांनी सुध्दा आगरकरां सोबत निश्चित केलेल्या ध्येया संबंधी माहिती आपला मुलगा श्रीधर पंत यांना सांगितलेली होती. त्यांनी आपल्या आठवणींमध्ये "टिळकाचे उद्गार लिहिले की, "ही सादिलबुवाची टेकडी! या टेकडीवरील एकूण एक खडक व पाऊलवाट माझी चांगली परिचयाची आहे. डेक्कन कॉलेजात असतांना मी व आगरकर दोघांनी या टेकडीवर बसून कित्तेक विषयावर वादविवाद केले केले, भावी आयुष्यक्रमासंबंधी कित्तेक योजना केल्या, चांदण्या रात्री कित्तेक वेळा भटकत फिरलो, गेले ते दिवस."[३६] या सर्व आठवणीमधून दोन मित्रांच्या मनात समान ध्येयाची ज्योत सारखीच प्रज्वलित झालेली दिसून येते. ध्येय समान असले तरी काही वाटा वेगळ्या वळणाच्या असल्याने राष्ट्रीय कार्याचे मार्गक्रमण करण्याच्या उपायासंबंधी अनेकदा वादविवादही होत असत, पण या वादविवादाने दोघांची मैत्री जास्त दृढ होत गेली. हा वादविवाद घडून येण्याला आगरकरांची बुध्दीप्रामाण्यवादी विचारसरणी कारणीभूत होती. टिळकांना लहानपणी आगरकरांप्रमाणे परिस्थितीचे चटके सहन न करता सधन परिस्थितीमुळे

सहजासहजी शिक्षण मिळाले व घरातील रुढी परंपराचे वातावरण विशेष असहनीय वाटले नाही, त्यामुळे टिळकांना समाजातील वाईट गोष्टींचे वर्चस्व प्रखरतेने जाणवले नाही, त्या उलट आगरकरांना लहानपणापासून अखंडतव आपल्या आयुष्याचा मार्ग शोधावा लागला त्यामुळे त्यांची विचारसरणी आग्रही व व्यक्तिस्वातंत्र्यावर भर देणारी निर्माण झाली होती. मिल्ल व स्पेन्सरचे समाजशास्त्रीय सखोल तत्वज्ञान समाजरचनेच्या मुळापासून शोध घेणारे असल्याने त्याचा परिणाम आगरकरांवर जास्त प्रभावशील होता. ह्या त्यांच्या वादविवादाच्या सवयीमुळे त्यांच्या विचारात प्रगल्भता आलेली होती.

आपला समाज, आपला देश दारिद्र्य व गुलामगिरीत अडकलेला असतांना आपण स्वार्थासाठी सुखासिन जीवन जगण्यात जन्माचे सार्थक नसून लोकोपयोगी कार्य करुन देशोध्दाराच्या कार्यात मदत करावी ह्या उद्देशाने प्रेरित होवुन पुढील जीवनाचा मार्ग निश्चित केला होता. "पहिल्या वर्गात पदवी परीक्षा उत्तीर्ण झालेल्या तरुणांनी स्वार्थत्यागपूर्ण व एकनिष्ठतेने जनतेची सेवा करण्याची प्रतिज्ञा करावयाची ही गोष्ट इ.स. १८७९ साली अभुतपूर्व होती सरकारी नोकरी हे तर त्या काळातील सुशिक्षित तरुणाचे ध्येय व जीवन सर्वस्व होते पण हेच जीवन ह्या तरुणांना क्षुद्रपणाचे वाटत होते. त्यांच्या मोठेपणाच्या कल्पना भिन्न होत्या. चालुन आलेल्या वैभवावार लाथ मारुन लोकांचे अज्ञान व दारिद्र्य दुर करण्यास स्वेच्छेने दारिद्र्याला कवटाळणे यात खरा मोठेपणा आहे अशी त्यांची भावना होती."[३७] टिळक आगरकर यांनी शिक्षण घेत असतांनाच आपले कार्य सुरु करण्यासाठी इतर मोठया व्यक्तिचे सहकार्य व मार्गदर्शन मिळविण्याच्या दृष्टीने हालचाली सुरु केल्या होत्या. जेणे करुन शिक्षणानंतर लागलीच आपल्या कार्याला सुरुवात करता येईल, हा त्यांचा उद्देश होता

इ.स. १८५७ च्या राष्ट्रीय उठावाच्या भीषण आघाताने स्तिमित झालेला देश १८७० मध्ये सावध झाला होता. सुशिक्षीतांच्या पहिल्या दुसऱ्या

पिढीने आपल्या कार्यक्षेत्राच्या मर्यादेत राहून देशाला सावध करण्याचा प्रयत्न केला होता. जनसेवेच्या उत्साहाने भारलेल्या न्या. रानडयां सारख्या समाज सुधारकांच्या दृष्टीनेही सार्वजनिक कार्याचे स्थान जीवनात दुसरे होते त्यांनी अफाट कार्य केले असले तरी सरकारी नोकरीच्या मर्यादेत जखडलेले होते. इ.स. १८७६ ला दादाभाई नौरोजींनी Poverty of British India हा ग्रंथ प्रसिध्द करुन ब्रिटिश सत्तेचा आर्थिक स्वार्थ देशबांधवासमोर उघड केला होता. वासुदेव फडक्यांनी इ.स. १८७८ ला ब्रिटिशांविरुध्द विद्रोहाचे निशाण उभारुन धक्का दिला होता. त्यातच अभूतपूर्व दुष्काळाने देशावर आघात करुन असंख्य लोकांचे बळी घेतले होते. लोकहितवादींच्या शतपत्रांबरोबर विष्णुशास्त्री चिपळूणकरांच्या निबंध मालेने महाराष्ट्राला जागे करण्याचा प्रयत्न सुरु केला, अशा परिस्थिती मध्ये टिळक-आगरकरां सारख्या नव्या दमाच्या आणि देशप्रेमाच्या भावनेने प्रेरित असलेल्या व्यक्ती स्वस्थपणे बसने अशक्य होते. त्यांना वडील मंडळीच्या मार्गदर्शनाची गरज होती. व ही गरज रानडे-चिपळूणकरांच्या भेटीने आणि मार्गदर्शनाने पूर्ण होऊन त्यांनी आपल्या देशसेवेच्या राजमार्गाकडे जाण्यास आरंभ केला. अल्पावधीतच त्यांच्या कार्यजागृतीने महाराष्ट्राच्याच नव्हे तर अखिल भारतीय ब्रिटीश राजवटीमध्ये खळबळ माजविली होती.

टिळक-आगरकरांनी आपल्या ध्येय पूर्तीसाठी मार्ग काढण्यासाठी न्या. रानडे यांचा सल्ला घेण्याचे ठरविले यावेळी रानडे धुळ्याला होते. त्यांना महाराष्ट्रामध्ये विद्वान, प्रतिष्ठित आणि वेळात वेळ काढून देशहित कार्य करणारे सुधारक म्हणून मानाचे स्थान होते. त्यांना टिळक आगरकरांनी पत्र लिहून कमी खर्चात व स्वदेशहितार्थ शिक्षण देणारी शाळा काढण्याचा मनोदय पत्रातून व्यक्त केला होता. रानडयां सारख्या देशहिताची तळमळ असलेल्या व देशाच्या सर्वांगिण सुधारणेसाठी सतत कार्य करणाऱ्या पुढाऱ्याला ह्या दोघांच्या स्वार्थत्यागी व पूर्णपणे देशकार्याला वाहून घेण्याच्या निर्णयाने प्रभावित केले होते. त्यांची देशसेवेची निर्धारित दिशा समजताच त्यांनी दोघांना प्रोत्साहन दिले. त्यांच्या पत्राला उत्तर देतांना,

"हिन्दुस्थानच्या उध्दाराला राष्ट्रीय शिक्षण व राष्ट्रीय वृत्तपत्र व राष्ट्रीय धर्मप्रणाली (National press, National Education and National Church) या तीन साधनांची आवश्यकता आहे असे न्या. रानडयांनी स्पष्ट म्हटले व टिळक, आगरकरांच्या लोकशिक्षणाच्या कल्पनेस उचलून धरले."[३८] त्यांच्या राष्ट्रकार्याच्या उद्देशात त्यांनी लोकशिक्षणाला महत्वाचे स्थान दिले होते. पण त्यांच्या ह्या कल्पनेचा इतरांनी उपहास केला असला तरी रानडे यांनी त्यांच्या भावनेचे गांभीर्य ओळखून त्यांना प्रोत्साहन दिले होते व इतरांनी केलेल्या उपहासाला प्रत्युत्तर देण्याचा प्रयत्न केला. "आतापर्यंत सार्वजनिक कामात पडणारी मंडळी बहुतेक सर्व सरकारी नोकरीत असून त्यांना फावेल त्यावेळी ते असे काम करीत असतात पण आता ही तरूण तरतरीत मंडळी देशसेवेला या व ज्जन्म वाहून घेण्यास तयार झालेली आहेत, त्यांना उत्साह देणे हेच आपले आद्य कर्तव्य आहे. त्यांच्या उणीवांवर बोट ठेवण्याची ही वेळ नाही".[३९] या शब्दात लोकांना समजून दिली होती. व त्यांना गप्प केले होते. यावरून टिळक आगरकरांच्या या नवीन कार्य निश्चीती विषयी माहिती लोकांना झालेली होती असे दिसते पण त्यांच्या निःस्वार्थ समाजजागृतीच्या ध्येयाची कल्पना अघटित वाटत असावी.

न्या. रानडे यांनी टिळक, आगरकरांना विष्णुशास्त्री चिपळूणकरांना भेटण्याचा सल्ला दिला. रानडे यांना निबंधमालाकर चिपळूणकर सरकारी शाळेतील शिक्षकाची नोकरी सोडून पुण्यात नवीन स्वतंत्र शाळा काढण्याच्या विचारात आहेत ही माहिती होती. आगरकरांचा चिपळूणकरांशी थोडा परिचय झालेला होता. बी.ए.ला असतांना आगरकरांनी एक राजकीय विषयावरील निबंध चिपळूणकरांना दाखविलेला होता. तेव्हा त्यांच्या देशहिता विषयी विचारांची कल्पना आलेली होती. रानडयांच्या सल्लानुसार टिळक-आगरकर विष्णुशास्त्री चिपळूणकरांना जावून भेटले. तेव्हाच चिपळूणकरांनी दोघांना राष्ट्रीय शिक्षण देणाऱ्या इंग्रजी माध्यमाची शाळा काढण्याविषयी माहिती देवून व जाने १८८० ला शाळा सुरु करण्याचा दिवस निश्चित केला. दोघांचे सहकार्य मिळाल्यामुळे चिपळूणकरांच्या कल्पनेला मूर्त स्वरुप मिळाले होते. आपल्या देशाचे हित

परकीय सत्तेपेक्षा आपल्याला जास्त चांगले ज्ञात असल्याने आपणच नवीन समाज निर्मितीसाठी राष्ट्रीय शिक्षण देवून स्वतंत्र बाण्याचे व्यक्तिमत्व तयार होणारी पिढी निर्माण केली पाहिजे. समाजाला दुस-यांवर अवलंबून न ठेवता आपणच त्यास इष्ट वळण दिले पाहिजे राष्ट्राचे सत्व जागृत करण्याचा हा प्रभावी माध्यम लवकर परिणाम करणारा ठरला नसला तरी समाजावर दीर्घकालीन संस्कार घडविणारा योग्य मार्ग आहे याची जाणीव या त्रयींना असल्यामुळे त्यांनी आपल्या कल्पनेला साकार करण्याची योजना लवकर अमलांत आणण्याचे ठरविले.

योजनेप्रमाणे १ जानेवारी १८८० ला पुण्यामध्ये बुधवार पेठेतील मोरोबादादा फडणिसांच्या वाड्यामध्ये "न्यू इंग्लिश स्कूल" ची स्थापना करण्यात आली. सुरवातीला शाळेमध्ये चिपळूणकर, टिळक, नामजोशी, आपटे इ. लोकांनी शिक्षणाचे कार्य सुरु केले. आगरकराचे एम्. ए. चे शेवटचे वर्ष असल्याने ते या शाळेत १८८१ मध्ये रुजु झाले. शाळेत पहिल्याच दिवशी दिडशे विद्यार्थी तर सहा महिन्यात विद्यार्थ्यांची संख्या पाचशेवर पोहचली. या नवीन शाळेसंबंधी कळताच बडोद्याच्या महाराजांनी शाळेला भेट देवून, देणगीच्या द्वारे हातभार लावला. सुरवातीला कमी पैशाच्या मोबदल्यात शिक्षकाचे कार्य केले. इतर सरकारी व खाजगी शाळा आणि न्यू इंग्लिश स्कूल" या शाळेच्या उद्देशामध्ये बराच फरक होता. पुण्यात इतरही शाळा होत्याच पण त्याचे उद्देश आताप्रमाणेच द्रव्यार्जन करणे ह्या ध्येयाशिवाय दुसरा नसल्याने त्या सर्वसामान्यच राहिल्या होत्या. पण चिपळूणकर, टिळक, आगरकरांनी आपल्या शाळेचे उद्देश स्वभाषा, स्वधर्म, स्वदेश विषयीचा अभिमान, गतइतिहासाची स्मृती शिक्षणाच्या सहाय्याने विद्यार्थ्यांना करुन देवून त्यांच्यामध्ये राष्ट्रीय भावना जागृत करणे व लोकशिक्षणाचा प्रसार करुन लोकांच्या विचारात क्रांती, जागृती घडवून आणणे हे ठेवले होते. लोक शिक्षणाचे प्रमुख माध्यम शिक्षण ठेवून त्यांनी समाजसुधारणेला सुरवात केली होती.

वा.शी. आपटे सारखे शंकरशेटची शिष्यवृत्ती प्राप्त केलेले बुध्दिमान पदवीधर त्यांच्या साक्षरता प्रसाराच्या कार्यात सहभागी झाल्याने शाळेच्या लौकिकात भर पडलेली होती. आगरकरांच्या बेळ्कर वृत्तीने शिकविण्याच्या पध्दतीने ही शाळेच्या लोकप्रियतेत भर पडलेली होती. त्यावेळचे नामवंत पुढारी, अधिकारी, मिशनरी, मंडलीक वर्डस्वर्थ मिचेल सारख्या लोकांनी या नव्या शाळेच्या उपक्रमाची प्रशंसा केली होती. शाळेच्या विद्यार्थ्यांची संख्या दिवसेंदिवस वाढतच होती. शाळेतील शिस्त, अभ्यास, स्वदेशाभिमान जागृत करण्यावर या तरुण शिक्षकांनी आपले लक्ष केंद्रित केले होते. जातिभेद, जातीमत्सर, स्पृश्यास्पृश्य ह्या सारख्या वाईट गोष्ट त्याज्य मानण्यात प्रेरित करुन निकोप स्वराज्य निर्मितीसाठी आवश्यक असणारे ज्ञान देण्याचा उपक्रम सुरु केला होता. कमी आर्थिक मोबदला घेवून ही शिक्षक मंडळी त्यागी भावनेने शिक्षणाचे कार्य ऋषींच्या वृत्तीप्रमाणे करीत असल्याचे सहाजीकच त्यांच्या कार्याकडे समाज आकर्षित झालेला होता.

आगरकरांची शिकविण्याची पध्दत केरुनाना छत्रे यांच्या सारखी होती. कोणत्याही विद्यार्थ्याने कसाही प्रश्न विचारला तरी त्यांना राग येत नसे. आपली शांती ढळू न देता ते सर्व प्रश्नांची उत्तरे देत असत. विचारात मतभेद असले तरी विनोदबुध्दीने त्या गोष्टीतील मर्म सांगण्याची त्यांची पध्दत वैशिष्ठ्यपूर्ण होती. त्यामुळे विद्यार्थ्यांच्या मनात कुठलीही शंका राहत नसे सामान्य व्यवहारातील उदाहरणे विनोदी पध्दतीने व अवघड गोष्टी सुलभ पध्दतीने सांगत असल्यामुळे सहाजिकच मुलांमध्ये त्यांना लोकप्रियता प्राप्त झालेली होती. त्याचे बोलणे शिष्टाचाराला धरुन वाटत नसल्यामुळे त्यांच्यावर शिष्टसंमत नसल्याचा आरोप टिकाकारांनी केला आहे. "आगरकराचे शिकविणे विद्यार्थ्यांना पटण्यासारखे असले तरी पाल्हाळीक असे वक्तव्य न. चि. केळकरांनी टिळकप्रेमामुळे केले आहे.[४०] गरीब, हुशार, अभ्यासु विद्यार्थ्यांना निस्वार्थी व निःपक्षपणाने मदत करीत. विचारांमध्ये मतभेद असला तरी त्यांच्या शिक्षणावर परिणाम होणार नाही याची काळजी घेत असत. आपली बुध्दीप्रामाण्यावादी

मते इतरांना पटावीत ह्या दृष्टीने सांगत असले तरी ती मते इतरांवर लादण्याचा प्रयत्न त्यांनी कधीच केला नव्हता. व्यापक आणि ज्ञान प्राप्त झाल्यानंतर आपली मते योग्य आहेत याचा प्रत्यय येईल असे त्यांना वाटत होते. विद्यार्थ्यांना वाईट सवयी लागू नयेत यासाठी ते जागरूक असत. शाळा काढतांना त्यांनी आपल्या ध्येय धोरणासाठी झटण्याचा प्रयत्न सतत केला होता." We have undertaken this work of popular education with the firmest conviction and belief that of all agents of human civilization education is the only one that brings about material, moral and religious regeneration of fallen countries and raises them up to the level of most advanced nations by slow and peaceful revolutions"[41] या उद्देशात ते यशस्वी झालेले दिसून येतात.मॅट्रिकच्या परीक्षेच्या निकालाने त्यांच्या कर्तृत्वाचे चिज होत असलेले आढळून येई. हे शिक्षण कार्य करीत असतानाच त्यांनी समाज सुधारणेचे कार्यही सुरू ठेवले होते. मुलांना केवळ शिक्षण देणे हा उद्देश नसून त्यांच्या मधील विवेकबुध्दी जागृत करून एक सशक्त विचारांचा नागरिक बनविले, त्यांच्यातील अंधश्रध्दा अनिष्ठ रुढी परंपरेचे बंधन सैल करणे, हा ही उद्देश त्यांनी आपल्या शिक्षण कार्यात ठेवलेला होता.

"आगरकर एम्.ए. करीत असतांना त्यांनी एकदा आपल्या मामांना व त्यांच्या मित्र मंडळींना शिक्षणानंतर शिक्षक होण्याचा मनोदय बोलून दाखविला होता तेव्हा सर्वांनी त्याचा उपहास केला होता. यदव्युत्तर शिक्षणानंतर मोठया अधिकाराची नोकरी न पत्करता शिक्षकासारखा अतिसामान्य पेशा पत्करणे हे त्यांना त्यांच्या निर्बुध्दपणाचे लक्षण वाटत होते. पण आगरकरांनी ह्या हेटाळणीला योग्य उत्तर दिले होते. "जातीवंत झरा आणि पावसाळ्यात साठलेले डबके ही कधीच एक व्हायची नाहीत. माझी इच्छा शिक्षक होण्याची आहे पण ती हल्ली चालू असलेल्या रमण्यात शिरून दक्षिणा उपटण्याकरीता नाही तर लोकांत स्वतंत्र विचार उत्पन्न होवून स्वोन्नतीचे मार्ग लोकांना दिसू लागतील, अशा प्रकारच्या शिक्षणाचे काम करावे आहे." आगरकराचे हे बोलणे सर्वांनी हसण्यावारी नेले होते. त्यांना आगरकराचे बोलणे अशक्य गोष्ट वाटत

होती. पण आगरकरांना आपले म्हणणे पटवून देण्याचे असल्याने ते पुढे बोलले की, "औरंगजेबाच्या कारकीर्दीत उदयोन्मुख शिवाजीबद्दल किंवा व्यापारी इंग्रजाबद्दल प्रारंभी त्यांची महत्वाकांक्षा ऐकून मनातले मांडे खाण्याच्या प्रकारातले वाटल्याने त्यांची संभावना लोक करीत असतील, आणि मी ज्यावेळी मुन्सफ कोर्टात उमेदवार होतो किंवा हॉस्पिटलमध्ये औषधे टवळीत होतो त्यावेळी एम्.ए. होण्याच्या गोष्टी काढल्या असत्या तर ऐकणारास त्या असंभव वाटल्या असत्या. माझे विचार असंभवनीय आहेत असे मला वाटत नाही. जर योगायोग तसा असेल तर मी करून दाखवीन"[३२] त्याप्रमाणे त्यांनी शिक्षकी पेशा पत्करून आपले बोलणे कृतीत आणले होते. ही त्यांच्या जीवनातील एक आठवण कृ.आ. गर्जांनी टिळकचरित्रात लिहून ठेवली आहे. आगरकरांच्या परिस्थितीकडे पाहून त्यांचा निश्चयाला स्नेह्यांनी वरवर घेण्याचा सतत प्रयत्न केला. त्यामुळे त्यांच्या मध्ये मानहानीतून जिद्द, कृती निश्चयी वृत्ती प्रगट होत होती.

लहानपणा पासून जिद्दीने आपले आयुष्य एका विशिष्ठ ध्येयाने प्रभावित ठेवून आपल्या निश्चयापासून कधीच ढळले नाहीत. त्यामुळे त्यांचे विचार बुध्दिनिष्ठ, विवेकनिष्ठ राहिले होते. आपले विचार ते विद्यार्थ्यांमध्ये परखडपणे मांडीत असत व प्रसंगानुसार सुधारणेची तत्वे मुलांना पटवून देत असत. पण हळूहळू हे कार्यक्षेत्र त्यांना मर्यादित वाटू लागले होते. लोकशिक्षणाचे ध्येय अपुरे असल्याची जाणिव होऊ लागली. सार्वजनिक जीवनात प्रवेश करतांना सामाजिक व राजकीय जाणीवांचे क्षेत्र वाढवे या विचाराने त्यांनी व त्यांच्या सहका-यांनी आपले शैक्षणिक कार्य वाढविण्याचे ठरविले. लोकांना शहाणे करण्याच्या उद्देशासाठी लोकशिक्षणाची पाऊले कशी टाकावीत या संबंधी त्यांचे चिंतन सुरु होते.

चिपळूणकर, टिळक, आगरकरांनी उभारलेल्या "न्यू इंग्लिश स्कूल" या शाळेचे यश किती प्रमाणात वाढले होते याचा पुरावाच जर द्यायचा झाला तर देशी लोकांबरोबर ब्रिटिश अधिका-यांचे मत सांगता येईल.

त्यावेळचे शिक्षण आयोगाचे अध्यक्ष W.W. Hunter यांनी सप्टें. १८८२ ला या शाळेला भेट देवून प्रशस्ती पत्र दिले त्यात लिहिले होते की," स्वयंपूर्णता व स्वावलंबन ह्या ध्येयांनी भारलेल्या काही उत्साही, कर्तृत्वान आणि बुध्दिमान तरुणांनी स्थापन केलेली ही संस्था, सरकारकडून काही ही अनुदान मिळत नसतांनाही या देशातल्या सरकारी शाळांशी यशस्वीपूर्ण स्पर्धा करु शकत आहे, इतकेच नव्हे तर इतर देशातील शाळांशी तुलना करता त्यांची ही शाळा सर्व प्रकारे बरोबरी करु शकेल"[४३] अशा प्रकारे देश, समाज कार्याच्या पहिल्या कृतीला यश, प्रतिष्ठा, लोकप्रियता प्राप्त झाल्याने आपले कार्यक्षेत्र विस्तृत करावे असा विचार या मंडळीच्या मनात निर्माण झालेला होता. त्यांचे ध्येय शाळा काढून साध्य होणार नव्हते नव्या पिढीबरोबरच जुन्या पिढीलाही जागृत, सज्ञान करायचे होते. मिल स्पेन्सरवादी बुध्दि प्रमाण्यावाद्यांचा पगडा जसा प्रभावीपणे आगरकरांवर होता तसाच थोडाफार टिळक, चिपळूणकरांवरही होता. समाजाच्या कुंठीत, बंदिस्त जीवनामुळे राजकीय स्वातंत्र्य गमावले असले तरी आपण आता लोकांना सामाजिक, राजकीय, धार्मिक दृष्टीने जागृत करुन प्रहरता जास्त काळ टिकणार नाही व आपली समाज राजकारण करण्यात सध्ये ठोस या दृष्टीने कार्य करण्यासाठी वृत्तपत्रासारखे दुसरे परिणामकारक माध्यम नाही ही जाणीव प्रबळ होवुन त्यांनी वृत्तपत्र काढण्याचा निश्चय केला.

राष्ट्रीय पुनरुत्थान करण्यासाठी व जनजागृतीचा वृत्तपत्र हा पाया व प्रमुख आधारस्तंभ आहे ह्या उद्देशाने प्रेरित होवुन आगरकर व वामनराव आपटे यांनी वर्तमानपत्राच्या कामाची जबाबदारी स्विकारण्याची तयारी दाखविली. त्यांनी जनजागृतीच्या ह्या माध्यमाचे महत्व इतर सहकार्यांना पटवुन दिले. चिपळूणकर, टिळक, आगरकरांनी वृत्तपत्र काढण्याचा संकल्प करुन आपले समाजकार्य व्यापक करण्याचे ठरविले. त्यानुसार इंग्रजी व मराठी यादोन्ही माध्यमातुन समाजातील सुशिक्षित वर्गाला राष्ट्रकार्यासाठी, समाज सुधारणेसाठी जागृत करण्याचा निश्चय ठाम झाला. एक जुना छापखाना

विकत घेऊन मोरोबादादांच्या बुधवार वाड्यात आणण्यात आला व त्याला "आर्यभूषण" हे नाव देण्यात आले. त्याचबरोबर २ जाने. १८८१ ला "मराठा" हे इंग्रजी आणि ४ जाने. १८८१ ला "केसरी" हे मराठी माध्यमाचे वृत्तपत्र सुरू केले. टिळकांनी "मराठा"चे संपादकत्व आणि आगरकरांनी "केसरी"चे संपादकत्व स्वीकारले. या दोन्ही वृत्तपत्रातून सुरवातीला सर्वांनीच या दोन्ही वर्तमानपत्रातून लेख लिहिले आणि राजकीय व सामाजिक विचारांचा प्रसार निर्भिडपणे समाजापुढे मांडण्यास सुरवात केली. इतर वर्तमान पत्रे पुण्यात होतीच व ह्या वृत्तपत्रांनी आपले वेगळेपण लवकरच लोकांपुढे आणले त्यामुळे ह्या वृत्तपत्रांना लोकप्रियता मिळाली. न्यु इंग्लिश स्कूल प्रमाणेच बहुजनहिताय होवून या लोकांनी आपल्या समाजकार्याचे एक दमदार पाऊल पुढे टाकले.

सुरवातीलाच "केसरी"च्या उद्देश पत्रकातून आपल्या वृत्तपत्रीय कार्याचे ध्येय प्रगट केले होते. ४ जाने. १८८१ च्या केसरीच्या १ ल्या अंकाच्या अग्रलेख स्तंभात "वर्तमान पत्रे" ह्या शीर्षकाखाली लोकांना सांगण्यात आले की, "आम्हाला जे सत्य वाटते त्याच्या अनुरोधाने प्रत्येक विषयाची निःपक्षपाती भूमिकेवरून चर्चा करण्याचा आमचा निर्धार आहे. या पत्रात सध्याच्या वर्तमान पत्राप्रमाणेच नेहमीचे विषय तर येतीलच पण या शिवाय लोकस्थितीवर निबंध, नवीन ग्रंथावर टिका तसेच विलायतेतील राज्य प्रकरणांच्या वाटाघाटीचा सारांश इ. विषयांचा समावेश केला जाईल. रस्तोरस्ती रात्री दिवे लावलेले असल्याने व पोलिसांची गस्त सारखी फिरत असल्याने जो उपयोग होतो तोच त्या त्या जागी वर्तमान पत्रकर्त्यांची लेखणी सदोदित जागृत असल्याने होत असतो... वर्तमानपत्रे ही लोकांचे कोतवाल होत. या कोतवालांनी सर्वत्र गस्त घालीत असावे आणि कोठे काही जुलमाचा अन्यायाचा, अडाणीपणाचा किंवा घातकी प्रकार दिसून आल्यास तो लोकांच्या, सरकारच्या आणि विशिष्ट अधिकाऱ्यांच्या नजरेस आणावा."[४४] हा उद्देश स्पष्ट केला. हा लेख चिपळूणकरांनी लिहिलेला होता. श्री. वि.भि. कोलतेकृत चिपळूणकर लेखसंग्रहात या लेखाचा समावेश आहे. केसरीमध्ये चिपळूणकर, टिळक, आगरकर, प्रा. गोळे, आपटे, केळकर, डॉ. गर्दे

नाम जोशी यांनी उल्लेख लिहिले आहेत.

चिपळूणकर निबंधमालाकार असल्यामुळे ते मराठीचे "शिवाजी" संबोधले जात. आगरकरांनाही लहानपणापासून निबंध लिहिण्याची आवड होतीच. त्याचा उपयोग त्यांना या वृत्तपत्रामध्ये करता आला, केसरीचा अंक आकर्षक लेखनशैली, माहितीपूर्ण लेख, खरमरीत टिका यामुळे थोड्याच दिवसात महाराष्ट्रात केसरीचा प्रभाव निर्माण झाला, आणि न्यु इंग्लिश स्कूल प्रमाणेच ह्या दोन्ही साप्ताहिकांनी लवकरच लोकप्रियता प्राप्त केली. केवळ दोनच वर्षांत "केसरी"ने भारतातील सर्वाधिक खप असलेल्या वृत्तपत्रांमध्ये मानाचे स्थान मिळविले. आणि पश्चिम भारतातील सुशिक्षित लोकांचे मुखपत्र म्हणून "मराठा" ने मान्यता प्राप्त केली. "केसरी" आणि "मराठा" च्या स्पष्ट व परखड लिखाणाबद्दल असे लिहीले गेले आहे की "कोणतीही अनुचित गोष्ट मग ती कितीही प्रतिष्ठा पावलेली आणि अन्याय कितीही दृढमुल झालेला असो, त्यावर कठोर प्रहार करायला ते सतत सिध्द असत. आपली बाजु लढवितांना सावधपणा ऐवजी लढाऊ वृत्तीचीच कास धरल्यामुळे टिळक व आगरकर या दोघांनाही प्रारंभी मोठ्याच अग्निदिव्यातुन बाहेर पडावे लागले."[४५] आगरकरांच्या काळातच केसरीची लोकप्रियता वाढत होती. समाजाला नवविचाराचे सुधारणावादी वळण लावण्याचे सामर्थ्य त्यांच्या लेखणीत होते. स्वतंत्र वृत्तीचे त्यांचे विचार लोकांना विचार करायला प्रवृत्त करीत. समाजातील रुढीग्रस्त विचार मागे पडावे व समाजाला पोषक विचाराचे वातावरण तयार व्हावे, या दृष्टीने अभ्यास व अनुभवाने लेखणीचा वापर करीत. त्यामुळे केसरीने समाजाला जागृत केलेच. त्याबरोबर ब्रिटीश अधिका-यांच्या समोर आपले अस्तित्व प्रगट केले. त्याचा परिणाम केसरीकरांना आपल्या सडेतोड व प्रमाणीकपणाचीच समाज सुधारणेच्या व्रताची शिक्षा म्हणून तरुंगवास पत्करावा लागला. स्वराज्य प्राप्तीचा उद्देश समोर ठेवून लोकशिक्षणाचे कार्य हातात घेतले होते व या कार्याला टिळक आगरकरांना यशाही लवकरच मिळाले. ध्येयवादी "केसरीने" मराठी समाजाला औदासीन्यातुन

बाहेर काढून स्वातंत्र्याची दिशा दाखविण्याचे आणि निकोप समाजाच्या पुष्टीसाठी आपली लेखणी चालविण्याचे कार्य आगरकरांनी अखंडपणे केल्यामुळे त्यांचे विचार लोकांच्या मनाला जाऊन भिडले. प्रभावी लेखणीचा परिणाम कोल्हापूर प्रकरणाद्वारे लवकरच जाणवला. केसरीला पहिल्याच वर्षी एका मोठ्या आव्हानाला समोर जावे लागले.

इ.स. १८८१ च्या सुमारास म्हणजे केसरीच्या पहिल्याच वर्षी कोल्हापुरामधील बर्वे प्रकरणाने महाराष्ट्रात अस्थिरता, अस्वस्थता निर्माण करण्यात "केसरी" "मराठा" या वृत्तपत्राने हातभार लावला. बर्वे प्रकरण म्हणजे कोल्हापूर संस्थानातील कारभारी महादेव बर्वे हे तरुण छत्रपती शिवाजींचा छळ करतात, या संदर्भातील होय या छत्रपतींना वेडे ठरवून पदच्युत करून त्यांची कैदेत रवानगी केली व तेथे छळ सुरु केला, अशा बातम्या महाराष्ट्रभर पसरल्याने टिळक-आगरकरांनी या प्रकरणात लक्ष घातले. त्यावेळी संस्थानिक व छत्रपतीबद्दल लोकांच्या मनात आपुलकी व आत्मियता असल्याने समाजामध्ये बर्वे विरुद्ध प्रतिकूल वातावरण निर्माण होऊन बहुतेक वृत्तपत्राचे रकानेच्या रकाने या घटनेने भरलेले असत. १६ जाने. १८८१ च्या "मराठा" वृत्तपत्राने महाराजांवरील होणाऱ्या अन्यायाला वाचा फोडली.

केसरीनेही २० नोव्हे. १८८१ च्या रंग महालातील लज्जास्पद व अधमतेचे "प्रकार" ह्या शिर्षकाखाली लेख लिहून या प्रकरणाला प्रसिद्धी दिली. ८ जाने. "१८८२ ला" एक राजा दोन संपादक हा अग्रलेख १७ जाने. १८८२ मध्ये "दोन पत्र" या लेखात कोल्हापूरच्या दिवाणाचे वाभाडे काढणारे क्रमशीत लेख प्रसिद्ध झाले "ज्ञानप्रकाश" या वृत्तपत्राने हे प्रकरण लोकांच्या नजरेसमोर आणले होते. ज्ञानप्रकाशाने बर्व्यांची महाराज्यांच्या संदर्भातील दोन पत्र प्रसिद्ध केली. तीच पत्रे आगरकरांनी ८ जानें. प्रकाशीत केली होती. ह्या पत्रांमध्ये खळबळ माजून बर्व्यांनी ही पत्रे बनावट असल्याचे सांगून, कोर्टात बदनामीची फिर्याद मुंबई सरकारच्या परवानगीने केली. २४ जाने. ला ही फिर्याद मान्य करून केसरी मराठा वर आरोप घेवून टिळक आगरकरांवर खटला भरला. त्याप्रमाणे नाना भिडे,

राव बहादूर सदाशिव पांडुरंग, न्याय शास्त्रातील बळवंतराव जोशी, केशव बरवे, वामन रानडे इ. संशयीत आरोपी म्हणून त्यांना कोर्टासमोर उभे केले. टिळक आगरकरांचे वकील फिरोजशाहा मेहता हे होते. पण दबळ पुरावा नष्ट झाल्याने काहीच करता आले नाही. "दिवाण व महाराणी साहेब व महाराजांच्या इंग्लिश पालकांनी मिळून अल्पवयीन दत्तक महाराजाविरुध्द केलेला कट "केसरी" मराठा ने उघडकीस आणला तरी "शास्त्रीलायक सांगणे" हा पुरावा होऊ शकत नाही" या मुद्यावर नियत-कालीकावर "बेजबु" अविचारीपणाने केल्याचा आरोप सिध्द होवून १७ जुलै १८८२ ला चार महिन्याच्या कारावासाची शिक्षा टिळक-आगरकर, बरवे यांना झाली आणि भिडे, रानडे यांना दोन वर्षाची साधी कैद व हजार रुपये दंड करण्यात आला. [४६] वस्तुतः या वृत्तपत्रकारांनी सद्बुध्दीने कोल्हापूर प्रकरणात छत्रपतींची बाजु घेवुन होणाऱ्या अन्यायाला वाचा फोडली. त्यामुळे लोकांच्या मनात या संपादकाच्या निर्भयपणाबद्दल आदर निर्माण झाला. पण झालेल्या शिक्षेमुळे वाईटही वाटले. काही दिवसानंतर अहमदनगरच्या किल्यात छत्रपतींचा दुदैवी अंत झाला. त्यामुळे सत्य परिस्थिती लोकांपुढे आली व त्यांचा टिळक आगरकरांबद्दल आदर दुणावला व सरकार विरुध्द विद्रोही भावनेला चालना मिळाले. एका सार्वजनिक कार्यासाठी तुरुंगवास पत्करल्याने टिळक-आगरकरांबद्दल जनमानसात एक कृतीशील पुढारी हे व्यक्तिचित्र निर्माण झाले. या प्रकरणाने टिळक आगरकरांनी धडा घेवुन कोणत्याही गोष्टी पुराव्या शिवाय लिहुन नये, निर्भयपणा बरोबरच सावधगिरीही बाळगली पाहिजे ह्या गोष्टी अनुभवाने आत्मसात केल्या.

२४ ऑक्टो १८८२ ला टिळक आगरकरांची रवानगी डोंगरीच्या तरुंगात झाली. या तुरुंगात एकशे एक दिवस अत्यंत कष्टप्रद जीवन व्यतीत करुन परत त्यांचे आल्यानंतर जनतेचे त्यांचे उत्साहाने स्वागत केले. ब्रिटिशांच्या सत्तेला न घाबरणारे पहिले पुढारी म्हणून लौकिक झाला. या तुरुंगातुन परतल्यानंतर आगरकरांनी "डोंगरीच्या तुरुंगातील आमचे एकशे एक दिवस" हे छोटेसे आत्मकथनपर पुस्तक लिहिले. त्यात तुरुंगातील जीवनाविषयीचे मनोरंजक,

वास्तवाची वर्णन करून तुरुंगाची शिस्त, कैद्यांच्या जीवनात होवु शकणारे फेरफार व पुढील जीवनाविषयी केलेले संकल्प व अर्थांतर विषयावरील विचार या पुस्तकात लिहिलेले आहे.

पुढे या पुस्तकांत आगरकर लिहितात की,"ज्या शिवाजी महाराजांनी आम्ही हल्ली राहत आहो ह्या देशात मोठ्या शौर्याने व अनेक संकटे भोगुन राष्ट्रत्व आणले. त्या शिवाजीचे वंशजासाठी आम्ही थोडी चाकरी बजावित असतांना आम्हास "आरामस्थल" (तुरुंग) प्राप्त झाले, त्या विषयी आम्ही तिळमात्र दुःख मानीत नाही". या तुरुंगाच्या काळात टिळकांशी पुन्हा एकदा आपल्या ध्येयाविषयी दृढनिश्चय करून पुढील जीवनातील कार्याचे क्षेत्र ठरविले. त्याचबरोबर कोल्हापूर प्रकरणात आपली चुक किती व आपणांस भोगावी लागणारी शिक्षा कितपत योग्य आहे, आपण याप्रमाणे कैदी जीवन जगण्याचा लोकांवर काय परिणाम होईल, आपल्या शाळेचे व छापखान्याचे किती नुकसान होईल, पुढे कोणाकोणाच्या मदतीवर आणि शब्दांवर अवलंबुन राहता येईल, पुढे पुन्हा तुरुंगात यावे लागेल, तरी ज्या गोष्टी केल्या पाहिजे, अशा गोष्टी कोणत्या वगैरे नाही नाही त्या विषयांवर आमचा एक एक वेळ एवढ्या जोराने वाद चाले की, आसपासचे शिपाई "हळु बोला" म्हणून इशारा करीत". ध्येयसिध्दी गाठतांना परिस्थितीचा बसलेला हा पहिला जबरदस्त फटका होता. परंन्तु त्यामुळे टिळक आगरकरांची मने खंबीर बनली. आगरकर शेवटी विनीत वृत्तीने लिहितात की, "वर्तमानपत्र काढून पुरे एक वर्ष झाले न झाले तो आम्हावर एक दोन बिकट प्रसंग येवुन गेले, त्यातुन आम्ही निभावले हे केवळ ममताळु मित्रांच्या मदतीने झाले, आमच्या दृष्टीने तो आक्रमवात ठरला नसला तरी आधीच निश्चित केलेल्या मार्गाने स्वदेशाची सेवा करण्याच्या आमच्या निर्धाराला मात्र यामुळे पोलादी सामर्थ्य प्राप्त झाले.[४७] या पुस्तकामध्ये आगरकरांना मानवतावादी दृष्टिकोन ठेवुन कैद्यांच्या असह्य जीवनाविषयी लिहुन कैद्याचे जीवन कसे असावे, त्यांना कशा प्रकारच्या शिक्षा व्हाव्या व त्यांचे जीवन सुधारण्यासाठी कोणत्या मार्गांचा अवलंब करावा, त्यांना कोणत्या सोयी उपलब्ध करून द्याव्या इ. विषयी विस्तृत माहिती दिलेली आहे. हे पुस्तक त्यांच्या व्यक्तिगत विचारांवर प्रकाश टाकणारे आहे.

टिळक आगरकरांच्यावर येणाऱ्या संकटापूर्वीच एक आधारस्तंभ संपलेला होता. १७ मार्च १८८२ ला विष्णुशास्त्री चिपळूणकरांच्या अकाली निधनाने दोघांना जबरदस्त धक्का बसला आगरकरांनी २१ मार्च १८८२ केसरीच्या अंकात "कैलासवासी विष्णू कृष्ण चिपळूणकर" हा अग्रलेख लिहून त्यांना श्रध्दांजली अर्पण केली. समोर आलेल्या संकटाला निर्धाराने तोंड देऊन तुरुंगातून सुटून आल्यावर नव्या जोमाने आपल्या सार्वजनीक कार्याला सुरवात केली. या तुरुंगवासाने सार्वजनिक महत्वाच्या विषयाला महत्व येवून सार्वजनिक नेत्यांचा एक नवा आदर्श टिळक-आगरकरांच्या रूपाने निर्माण झाला.

तुरुंगमुक्तीनंतर टिळक-आगरकरांनी "केसरी मराठाचे" संपादकत्व पुन्हा आपल्या हातात घेतले. ३१ ऑक्टो. ८२ ला आगरकरांनी "कर्तव्य कर्म करण्यात माघार नाही"हा लेख लिहून लोकांच्याप्रती आपली कृतज्ञता प्रगट केली. नंतर न्यू इंग्लिश स्कूल कडे लक्ष दिले. शाळेची प्रगती दिवसेंदिवस होत होती. आपल्या शिक्षण संस्थेला जास्त नियमबध्दता, स्थायीस्वरुप व त्याची कार्यक्षमता वाढविण्याच्या दृष्टीने २४ ऑक्टो. १८८४ ला "डेक्कन एज्युकेशन सोसायटी" स्थापन केली. स्थापनेच्या जाहिर कार्यक्रमाला न्या.रानडे, भांडारकर, वेडरबर्न, छत्रपती शाहू, गोखे इ. व्यक्तींनी उपस्थित राहून आशिर्वाद दिला व या व्यापक संघटनेच्या कार्यात हातभार लावून व्यवस्थापक मंडळाची कामगिरी स्वीकारली. निस्वार्थ त्याग, सेवावृत्ती अल्पवेतन ही तत्वे अंगीकारुन टिळक-आगरकर, नाम जोशी आपटे, गोखे, केळकर, गोळे धारप, भानु, पाटणकर या दहा व्यक्ती सोसायटीच्या आजीव सभासद होत्या. भांडारकरांनी समितीचे अध्यक्षपद भूषविले होते. आपटे यांच्याकडे न्यु इंग्लिश स्कूलची जबाबदारी सोपविली गेली व त्यांनी शाळेचा नावलौकिक वाढविण्यात बरीच मदत केली. त्यानंतर नवविचारांच्या तरुणांना सार्वजनिक जीवनात समाविष्ट करण्याच्या दृष्टीने टिळक, आगरकर, नाम जोशी यांना महाविद्यालयाची गरज वाटू लागली. त्यांनी सोसायटीच्या स्थापनेनंतर दोन महिन्यांनीच नवीन महाविद्यालय काढण्याची परवानगी मिळविण्यासाठी मुंबई

विद्यापीठाकडे अर्ज पाठविला. न्या. रानडे, प्रा. सेलबी, वेडनबर्न यांच्या सल्ल्याने मुंबईचे गव्हर्नर यांच्या मदतीने कॉलेजसाठी सरकारकडून परवानगी मिळविण्याचा प्रयत्न करण्यात आले.

सर्वांच्या प्रयत्नांना यश येऊन सर जेम्स फर्ग्युसन यांचे नाव व्यवहारिक दृष्टया देवून २ जाने. १८८५ ला गद्र्यांच्या वाडयात "फर्ग्युसन कॉलेज" स्थापन करण्यात आले. १८८५ ला कॉलेजचा पहिला वर्ग सुरु करुन प्रिन्सिपल म्हणून वामन शिवराम आपटे यांची नेमणूक करण्यात आली. महाविद्यालय सुरु होणार ही बातमी "केसरी" मधून देतांना आगरकरांनी नर्मविनोदाने लिहिले, "हे फर्ग्युसन कॉलेज गोडबंगाल काय आहे ते लवकरच वाचकांपुढे आणण्याचा विचार आहे. पण त्या प्रसंगी त्यांनी व इतरांनी खबरदार असावे. कारण ती हकीकत वाचल्याबरोबर खिशातील रुपये पटापट उडया टाकून "दक्षिण हिन्दुस्थान विद्याप्रसारक मंडळी" कडे येऊ लागले तर आम्ही जबाबदार नाही"[८८] न्यु इंग्लिश स्कूल प्रमाणेच फर्ग्युसन कॉलेजही लवकरच प्रतिष्ठ झाले. कॉलेज मधील प्राध्यापकांची निस्वार्थ सेवा, स्वदेशाभिमानी शिक्षक, विद्यार्थ्यांच्या शिक्षणाविषयी तळमळ असल्याने मिळणारे उत्तम मार्गदर्शन व चांगले शिक्षण मिळत असल्याने विद्यार्थ्यांची संख्या दिवसेंदिवस वाढत होती. नाम जोशींनी प्रयत्न करुन चतुःशृंगीच्या मैदानात कॉलेजला नविन जागा मिळवीली: आणि महाविद्यालयाचा विस्तार होवु लागला. आर्य समाजाला या सोसायटीमुळे प्रेरणा मिळाली असे लाला लजपतराय यांनी म्हटले होते. डेक्कन एज्युकेशन सोसायटीने अनेक शाळा, महाविद्यालय काढून आपल्या संस्थेला प्रथम स्थान शिक्षणक्षेत्रात मिळवून दिले.

लोकशिक्षणाच्या कार्यात क्रांती घडवितांनाच टिळक आगरकरांचे वैचारिक मतभेद विकोपाला जाण्याची स्थिती निर्माण झाली. लोकजागृती समाजसुधारणा घडवून आणतांना आपल्या ज्ञानाच्या प्रसाराने आणि त्यागी वृत्तीचा आदर्श ठेवून स्वतंत्र बाण्याने निस्वार्थबुध्दीने कार्य करण्याचे व्रत दोघांनी मिळून घेतले असले तरी सुरवातीला सुक्ष्मरित्या मतभेद झाले होते हे

हे वैचारिक मतभेद देशकार्य करतांना सात आठ वर्षांनंतर स्पष्टपणे जाणवू लागले. त्यांच्या विचारातील मतभेदाची सूक्ष्म बीजे कॉलेजमध्ये असतानाच देशसेवेसंबंधी जे वाद विवाद होत त्यातूनच व्यक्त झालेली आहे असे त्यांचे मित्र गोरे व उपासनीनी लिहिलेल्या आठवणीतून प्रगट होते.

आगरकर - तुमच्या विषयावर मी थोडेच दिवस पण करुन विचार केला आहे. समाजसेवेचा मी सर्व बाजूंनी थांग घेवून पाहिला पण मला अजूनही राजकीय सुधारणांच्या ऐवजी सामाजिक सुधारणा करणेच आमचे आमचे आद्य कर्तव्य आहे असे वाटते.

टिळक - आज आपण फक्त समान ध्येय होते की नाही एवढेच पाहून आगरकर, तुम्ही घर सुधारा असे म्हणता पण मला घरच नाही, मग मी काय करु ? असे जर कोणी म्हणाला तर तुम्ही त्याला घर दिले पाहिजे.

आगरकर - अलबत, त्याला मी घर देईन, मतभेद होतो तो येथेच आहे सामाजिक जखम हृदयाची आहे, असे समजून आज शेकडो वर्षे इलाज झाला नाही.

टिळक - अहो आगरकर, ही जखम तलवारीची नाही. भुकेची आहे. अन्न न मिळाल्यामुळे पोटात अन्न गेले पाहिजे आणि अन्नाचे ताट आपल्या ताब्यात नाही. तथापि मी आज मध्यमार्ग सुचवितो. आपण दोघांना चालू स्थितीचे किंवा सर्वांगीण शिक्षण हाती घ्यायला हरकत नाही ना ? शिक्षणा सारख्या पवित्र कार्यात तर आपला Common Platform आहे ना ?

आगरकर - (विचार करुन) Common Platform आहे ठीक टिळक, ठीक सुचविले, ठरले, आमच्या देशाचे शिक्षण आम्हीच हाती घ्यायचे. ठरली ना एकवाक्यता ?

टिळक - ठरली. - उपासनी - ठरली, आगरकर, तुमचे दोघांचे मी अभिनंदन करतो.[४१]

यानंतर सर्व प्रकरणाने दुर्लक्षात गेले असतांना देखील त्यांच्यामध्ये वादविवाद हे वैचारिक मतभेदाने निर्माण झालेले दिसून येतात. हे मतभेद कार्य करतांना तात्त्विकापेक्षा व्यवहारिकातील कोणत्या अंगावर विशेष भर द्यावा याबद्दलच होते. त्यात "राजकीय पारतंत्र्य येण्यास व देशाचे एक जिनसीपण फार बिघडविण्यास आपल्या सामाजिक व ऐतिहासिक परंपरेने जी कारणे झाली आहेत, त्यांचेही निर्मूलन राजकीय पारतंत्र्य हलविता हलविताच नेटाने केले पाहिजे असे गोपाळराव आगरकरांचे म्हणणे होते. तर उलट, एकदा का राजकीय पारतंत्र्य पूर्ण जाऊन आपण आपल्या घरचे संपूर्ण मालक झालो की सगळे साफ करणे हातचा मळ आहे, असा टिळकांचा आग्रह होता. त्याचप्रमाणे दुसरा मुद्दा असा होता की, जेसुईट तत्त्वाप्रमाणे डेक्कन सोसायटी बाहेरील प्राप्ती सोसायटीकडेच सर्व मंडळींनी जमा करावी की स्वतःकडे ठेवावी. यावर मतभिन्नता होती.[50] टिळकांना वाटत होते की संस्थेच्या स्थापनेच्या वेळी केलेला संकल्प मोडू नये, हवे तर त्यांना जास्तीचा पगार दिला जावा. पण बाहेरील कार्याचा मोबदला सोसायटीला देऊन त्या संस्थेच्या उत्कर्षाकडे लक्ष केंद्रित करावे. लोककार्यासाठी कमीत कमी मोबदला घेऊन निस्वार्थ जेसुईटांप्रमाणे कार्य करावे अशी टिळकांची इच्छा होती, पण आगरकरांना सोसायटी चांगल्या सुस्थितीत कार्यरत असतांना बाहेरील कार्याचा मोबदला सदस्यांनी घेतला तर संस्थेने याबाबत आक्षेप घेऊ नये. कालानुसार तत्त्वामध्ये बदल करण्यास हरकत नाही असे वाटत होते. आगरकरांचा विवेकवाद इथे प्रगट होतो. देशकार्य करतांना वास्तववादी दृष्टीकोनातून डोळसपणे कार्य केले तर ते कार्य दीर्घकालीन होऊन यशस्वी होते असे आगरकरांना वाटत असल्याने ते आपल्या भूमिकेवर ठाम राहिले. इ.स. १८८८ ला होळकरांनी दिलेल्या अनुदानाच्या वाटणीसंबंधात टिळकांशी आगरकरांना निकराने वाद घालावा लागला. टिळकांनी विनावेतन सन्माननीय जनसेवा स्वीकारण्या देखील विरोध करण्यास शेवटपर्यंत ताणले, यात वाद नाही आजीव सदस्याने स्वतःच्या शक्ती अशा प्रकारे शिक्षणोत्तर कार्यात खर्च करण्यावर विरोध करून त्यांना हिणकस भासविले. "टिळकांनी ज्येसुईटांच्या स्वार्थत्याग मध्ये आपल्या अपेक्षा

काय ? याचे स्पष्टीकरण टिळकांच्या लेखनात येत नाही— ज्येसुइटांची संघटना लष्करी शिस्तीची आहे, त्यांना कसलीच मालमत्ता जवळ ठेवायला परवानगी नाही, या पंथाचे हे चरित्र असंतात आपणाने डेक्कन एज्युकेशन सोसायटीच्या सभासदांना आवश्यक होते. आयुष्यांच्या स्थूल स्वार्थत्याग व निष्ठेने विद्याप्रसार एवढ्यापुरतेच ज्येसुइट व सोसायटीचे सभासद यांच्यात काही प्रमाणात साम्य दिसेल.[51] खरे तर टिळक म्हणतात त्या तत्वांवर शाळेच्या उपक्रमाची उभारणी झालीच नव्हती. स्वार्थत्यागाची पराकोटीची भावना आगरकर-टिळकांमध्ये होतीच त्यामुळे ते बाहेरची कामे करुन तत्वापासून दूर गेले असे म्हणता येणार नाही. त्यांच्या पैकी कुणीही आपल्या कार्यात हलगर्जीपणा केल्याचे नमूद नाही. त्यामुळे वडयाचे तेल वांग्यावर काढण्याचा भाग अधिक असल्याचे सांगून वसंत पणशीकर म्हणतात की, "सोसायटीतले भांडण हा वस्तुतः पुढारी पणाचाच झगडा होता आणि तो टिळकांनीच उपस्थित केला होता"[52] २६ डिसें. १९१९ च्या केसरीत टिळकांनी याबद्दल खुलासा करतांना लिहिले की," डेक्कन एज्युकेशन सोसायटी ही संस्था स्थापन करण्याचे वेळी मुळ संस्थापकांचे जे उद्देश होते ते पुढे ढळत चालले होते"[53] असे मतभेद हळू हळू वाढत गेले. सामाजिक प्रश्नांवरुन हे मतभेद विकोपाला जावून शेवटी टिळकांशी आगरकरांचे पटेनासे झाले.

य.दि. फडके यांनी "शोध बाळ गोपाळांचा" या पुस्तकात टिळक-आगरकरांच्या मतभेदाविषयी म्हटले की, "१८८७ च्या जून महिन्यात डेक्कन एज्युकेशन सोसायटीतील मतभेद तीव्र बनले होते. सामाजिक प्रश्नावर आगरकर गोखले एकीकडे तर इतर अनेक सदस्य टिळकांच्या बाजूला अशी परिस्थिती होती. डेक्कन एज्युकेशन सोसायटीत मात्र टिळकांचा गट अल्पमतात तर आगरकरांच्या बाजूला बहुमत होते."[54] असे असले तरी सर्व साधारणपणे टिळक, आगरकर यांचे मतभेद निर्माण होण्यात त्या दोघांचा विभिन्न स्वभाव भेद कारणीभुत ठरला होता. याबाबत श्री निवास बन्हट्टी "टिळक आणि आगरकर" या पुस्तकामध्ये लिहितात की, "अत्यंत भिन्न प्रकृतीच्या व भिन्न संस्काराच्या या दोन मनस्वी पुरुषांचे विचार व दृष्टीकोन अत्यंत भिन्न,

किंबहुना परस्पर विरोधी होणे अपरिहार्य होते. त्यांच्यात तात्त्विक कलह झाला यात काहीच गैर नव्हते. त्यात व्यक्तिद्वेष मिसळला गेला, एवढीच गोष्ट वाईट झाली."[५३] त्यांच्या मतभेदाचे तात्त्विक फरक स्पष्ट करतांना प्रभाकर पाध्ये आपल्या "तीन तपस्वी" या पुस्तकांत म्हणतात की, "टिळक विद्वान होते, विचारवंत होते, तत्त्वज्ञ होते. पण याहूनहि ते जीवनाशी सरळ दोन हात करणारे व्यवहार कुशल मुत्सद्दी होते..... तत्वाच्या अनुरोधाने परिस्थितीचा अर्थ लावण्यापेक्षा परिस्थितीनुसार आपले डावपेच आणि युक्तिवाद योजणारे ते चतुर मुत्सद्दी होते. जीवनाच्या प्रत्यक्ष संगरात ते आगरकरांहून कितीतरी अधिक यशस्वी ठरले याचे कारण हेच. तरीपण आगरकरांनी आपल्या जीवनाने महाराष्ट्रात सार्वजनिक शुचितेचा आणि सत्यशीलतेचा उदात्त आदर्श निर्माण केला, ही माझ्या मते सर्वश्रेष्ठ कामगिरी होय"[५४] टिळक आगरकरांनी केसरी व सुधारक या वृत्तपत्राच्या माध्यमातुन आपले मतभेद व्यक्त केल्याने ते जग जाहिर झाले होते. पण त्यांच्या मैत्रीचा धागा शेवट पर्यंत तग धरुन होता.

सुरवातीपासुनच केसरीचे संपादकत्व आगरकरांकडे होते तरी सामुदायिक तत्वावर एकवाक्यतेची अभिव्यक्ती करणारे होते. मर्यादा सांभाळुन आपल्या वैयक्तिक तत्वांना मुरड घालुन सामाजिक, धार्मिक विषयांवर लेखन करण्याचे धोरण केसरीतील सभासदांनी पाळले होते. आगरकर संपादक या नात्याने इ.स. १८८४ पर्यंत वागलेही. परंतु इ.स. १८८४ मध्ये मलबारींनी उपस्थित केलेल्या संमती वय, बालविवाह, असंमत वैधव्य या संबंधात पत्रके काढुन सरकारला कायदा करण्याची विनंती केली. त्यामुळे सुधारकांमध्ये या विषयांवर वादविवाद होवुन दोन गट पडले. न्या. रानडे, आगरकर, गोरे इ. मंडळी कायदा करण्याच्या बाजुचे होते, तर टिळक, तेलंग मंडळींनी याचा विरोध केला. त्यामुळे आगरकरांना केसरीमध्ये या सामाजिक प्रश्नांसंबंधी लेख लिहिणे, आपली मते मांडणे अशक्य झाले. आपल्या सहका-याशी वारंवार मतभेद होवु लागले. तेव्हा टिळकांनी तुम्ही स्वतःच्या सहीने किंवा लिहुन आलेला मजकूर "या सदराखाली लिहिण्याची मुभा दिली. पण आगरकरांना स्वतः संपादक असतांना अशा त-हेने लिहिणे

पसंत नव्हते. त्यांच्या सद्सद् विवेकबुध्दीला ते पटेनासे होवु लागले. परखडपणे मत मांडण्याची प्रवृत्ती असल्याने मनाला जे पटेल तेच करण्याची वृत्ती असल्याने त्यांना बंदिस्त मर्यादित लिहिणे अवघड जावु लागले. १६ डिसें. १८८४ च्या केसरीच्या अंकात "वादे वादे जायते तत्व बोध" हा अग्रलेख लिहून आलेला मजकूर स्वत: नावाने सही करुन लिहिला. त्यात त्यांनी संमती वयाच्या वादाच्या कायदयाचे पक्षाचे समर्थन करुन पुढे लिहिलेकी", नाव घालुन लेख छापण्यात काही मातब्बरी आहे, असे आगरकरांना बिल्कुल वाटत नाही. पण बालविवाहाच्या निषेध साधना विषयी त्यांचे व त्यांच्या मित्रांचे विचार जुळत नसल्यामुळे त्याला या मार्गाचे अवलंबन करावे लागत आहे..... आतापर्यंत मंडळीवर माझे विचार न लादता या विषयाच्या संबंधाने जितके लेख लिहिले. तितके लिहिले पण अलिकडे या वादाने पुण्यात फारच उचल झाल्यामुळे मंडळीसाठी दबुन दबुन लिहिण्याचा क्रम सोडून एकवार मोकळेपणी कायद्याची बाजु दाखवावी असी माझी इच्छा आहे."[५७] पण हा लेख त्यांनी अपूर्णच ठेवला. यावेळेपासुन त्यांनी सामाजिक विषयावर लिहिणे जवळ जवळ सोडून दिले. फक्त संपादकीय लेख सुरु ठेवले. केसरीत संमतीवयाच्या कायद्याविरुध्द लेख यानंतर येत राहिले.

आगरकराचे आधी सामाजिक की राजकीय, राष्ट्रीय सभा आणि सामाजिक परिषदेचे परस्पर संबंध, दादाजी विरुध्द रखमाई इ. सुप्रसिध्द विषयावर सहका-यां विरुध्द विचार असले तरी त्यांना स्वतंत्रपणे लिहिता आले नाही. शेवटी त्यांच्या मनाची तगमग २५ ऑक्टो १८८७ च्या केसरीत आगरकरांची संपादकाची आलेल्या मजकुराने संपली. आजपासुन टिळक हे केसरी पत्राचे प्रकाशित झाल्याचे जाहिर करुन जबाबदारी संपल्याचे जाहिर करण्यात आले. आगरकरांना केसरी सोडतांना वाईट वाटले, त्यांनी केसरीच्या जन्मापासुन लेखन कार्य केल्यामुळे सहाजीकच हे वृत्तपत्र आवडते बनले होते. पण मतांना मुरड घालणे अशक्य असल्याने नाईलाजास्तव केसरी सोडला होता. पण आपले लोक शिक्षणाचे कार्य बंद पडु दिले नाही. लागलीच दस-याच वर्षी इ.स. १८८८ ला दस-याच्या मुहुर्तावर "सुधारक" हे नवीन वृत्तपत्र काढले. हे वृत्तपत्र गोपाळ कृष्ण गोखले यांच्या मदतीने हे वृत्तपत्र सुरु केले. गोखले इंग्लिश

विभाग व आगरकर मराठीतुन लेखन करीत. लेखनाच्या माध्यमातुन आपल्या समाजजागृतीच्या कार्याला पुन्हा सुरुवात केली. आगरकरांच्या सुधारक पत्रकाचा विरोध सुरवातीपासुनच होवु लागला होता पण आगरकरांनी न डगमगता, निर्भयपणे आपले कार्य अव्याहतपणे सुरु ठेवले इ.स. १८९१ पर्यंत सुधारकाने केसरीची जागा घेतली इतकी लोकप्रियता सुधारकाला प्राप्त झाली होती. आगरकरांनी वृत्तपत्र लेखना खेरिज मराठी क्षेत्रातही लेखन केले आहे. अनेक पुस्तके त्यांनी लिहिली आहेत. सार्वजनिक कार्याच्या सुरवातीलाच तुरुंगात जाण्याचा प्रसंग आला तेव्हा १८८१ ला 'डोंगरीच्या तुरुंगातील आमचे एकशे एक दिवस' हे पुस्तक छोटया स्वरुपात लिहिले आहे. त्यांनी बहुतेक लिखाण मराठी भाषेतच केले आहे. इ.स. १८८३ ला "विकार विलसित" हे नाटक लिहिले हे नाटक "हेम्लेट" या नाटकाचे भाषान्तर असले तरी व्यक्तिचे मनोचित्रण करतांना शेक्सपियरच्या शोकप्रधान भावनेचा अविष्कार प्रगट करतांना लोक जागृतीचा, शिक्षणाचा उद्देश दृष्टीआड केला नव्हता "वाक्य मिमांसा" हे मराठी व्याकरणावर आधारित पुस्तक लिहिले आहे त्यात इंग्रजी व्याकरणातील वाक्य पृथक्करण मराठीत आणण्याचा प्रयत्न करुन मराठी भाषेची लोकप्रियता वाढविण्याचा प्रयत्न केला होता. त्यांनी आपले लेखन कार्य मराठी भाषे पुरते मर्यादित केले असल्यामुळे त्याचे कार्यक्षेत्र महाराष्ट्रापुरतेच सिमित रहाले होते.

सुधारकाच्या माध्यमातुन लोकशिक्षणाचे कार्य करीत असतांनाच आगरकरांनी प्रि. आपटेंच्या मृत्युनंतर ऑगस्ट १८९२ पासुन फर्ग्युसन कॉलेजचे प्रिन्सिपद भूषविले होते. याच वर्षी मुंबई विश्वविद्यालयाचे फेलो म्हणून त्यांची नेमणूक झाली होती. सुधारकातुन समाज सुधारणेचे कार्य करुन त्यांनी पुर्नविवाह, मिश्रविवाहाला प्रोत्साहन दिले होते. आपल्या वृत्तपत्रातुन सुशिक्षित समाजाला सतत जागृत करण्याचा प्रयत्न करीत राहिले पण त्याचे आयुष्य अल्पायुषी ठरले. बी.ए.ला. असतांनाच त्यांना दम्याचा रोग जडलेला होता. या रोगाने अथक परिश्रमाने जास्त पछाडले होते. तरी शरीर प्रकृतीकडे दुर्लक्ष करीत आपल्या कार्याकडे जास्त लक्ष घालविले होते.

त्यामुळे दम्याने जोर पकडून त्यांची प्रकृती खूपच खालावली इ.स. १८९५ च्या उन्हाळ्यात त्यांचे मित्र व त्राटिका नाटकाचे लेखक वासुदेव केळकरांच्या मृत्युने आगरकर आणखीनच खचले. १६ जूनला रविवारी रात्री पत्नीशी बोलले. "आता मला थोडे बरे वाटते आहे. मी आता निजतो आणि तुम्हीही निजा" असे म्हणून झोपले. शाळा, कॉलेज, वृत्तपत्र, सोसायटी या सर्व संस्थांच्या कार्यांचा ताण त्यांच्या प्रकृतीला सहन झाला नाही. त्यातच त्यांचा मृत्यु सोमवार १७ जून १८९५ ला सुधारकाच्या सातव्या वर्षाच्या ३६ वा अंक निघण्यापूर्वी सकाळी त्यांचा झोपेतच मृत्यु झाला. त्यांच्या मागे त्यांच्या पत्नी यशोदाबाई (इ.स. १८६८ ते १९३७) मोठा मुलगा यशवंतराव (इ.स. १८८५-१९६१) मधला माधवराव (इ.स. १८९२ - १८५२) मुलगी सुमती (१८९५-१९०३) यांनी त्यांच्या आठवणींवर आयुष्य घालविले. [५९]

आगरकर क्रांतीकारक व आधुनिकतेचे पुरस्कर्ते असले तरी त्यांची राहणी अत्यंत साधी होती. आपल्यासाठी दुसऱ्यांना त्रास होवू नये याकडे त्यांचे फार लक्ष होते. आपला मृत्यु केव्हाही येवू शकतो याची जाणीव असल्याने त्यांनी आपल्या पत्नीची व मुलांच्या भविष्यातील व्यवस्था केलेली होती. या संबंधात आपल्या पत्नीला यशोदाबाईंना नेहमी म्हणत की, "माझ्या मागं स्वतंत्रपणानं मुलांची काळजी घेऊन त्यांच्या सर्व गोष्टी तुलाच कराव्या लागण्याचा संभव आहे. धीर धरून आल्या प्रसंगाला तोंड देत जावं! कोणत्याही वेळी गांगरून जाऊन दीन पणाने मदतीसाठी दुसऱ्यांच्या तोंडाकडे पाहण्यात भूषण नाही."[६०] आगरकरांनी आपले संपूर्ण आयुष्य स्वाभिमानाने व स्वावलंबीपणाने घालविले होते. आपल्या मृत्यु नंतर प्रेत संस्काराचा खर्च आपल्या मित्रांवर पडू नये म्हणून आगरकरांनी आपल्या पेटीत वीस रुपयाची एक पुरचुंडी बांधून ठेवली होती व त्यावर "माझ्या प्रेत दहनार्थ" लिहून ठेवले होते. आगरकरांच्या मृत्युनंतर ती पुरचुंडी गोखल्यांना दिसल्यानंतर त्यांना रडू कोसळले. त्यांचा आगरकरांच्या विषयीचा आदर जास्तच दुणावला. आगरकर कधीही आपल्या तत्वापासून दूर गेले नाहीत. एकटेच आपल्या तत्वासाठी, देशकार्यासाठी झटत राहिले. लोकांनी निंदा केली, विरोध केला तरी जे लोकांसाठी योग्य

उपयुक्त आहे ते विचार लोकांपर्यंत पोहचविण्याचा सतत प्रयत्न केला. त्यांच्या कार्याचे श्रेष्ठत्व त्यांच्या बुद्धिवादी विचार पुरस्कारण्यात आहे. सर्वांचा विरोध सहन करून त्यांनी आपले विचार लोकांच्या मनावर ठसविण्याचा प्रयत्न केला होता. आज एका शतकानंतर त्यांचे विचार पुरोगामी असल्याचा प्रत्यय येतो.

मृत्युपूर्वी आगरकरांनी लोकांना सक्रियतेचा संदेश दिला होता. आपल्या संदेशात ते म्हणतात "चांगला मनुष्य मेला म्हणजे मागे राहिलेल्यांनी त्याबद्दल शोक करावा हे स्वाभाविक आहे. पण तो केला म्हणजे आपले कर्तव्य आटोपले असे समजणे प्रमाद होय. चांगल्यांच्या चांगल्या गुणांचे अनुकरण करून लोकहित साधण्यात त्यांच्या पलिकडे जाणे हेच खरे बंधुप्रेम व खरा पुरुषार्थ आहे."[६१] त्यांच्या हया संदेशाला गांभीर्याने घेतल्यास देशाची प्रगती होण्यास मदत होईल.

## संदर्भ-प्रकरण दुसरे


१) न.चि. केळकर, लोकमान्य बाळ गंगाधर टिळक यांचे चरित्र, पूर्वार्ध, खंड २ रा, ( पुणे : १९२३), पृ.क्र. ८९.

2) Richard Tucker, Ranade and Roots of Indian nationalism, (Bombay : 1977), P. 14-15 (यानंतर या पुस्तकाचा उल्लेख Tucker, Ranade असा येईल.)

३) फाटक, न्या. रानडे यांचे चरित्र, पृ. ६.

४) कित्ता, पृ. ७-८

5) Tucker, Ranade, P.15

६) वा.वा. ठाकूर, न्या. महादेव गोविंद रानडे यांचे चरित्र, (इंदोर : १९४२), पृ. २४,(यानंतर या पुस्तकाचा उल्लेख ठाकूर, रानडे यांचे चरित्र, असा येईल.)

७) फाटक, रानडे यांचे चरित्र, पृ. १३

8) T.V. Parvate, M.G. Ranade - A Biography, (Bombay : 1963), P. 11 (यानंतर या पुस्तकाचा उल्लेख Parvate, M.G. Ranade), असा येईल).

९) फाटक, न्या.रानडे यांचे चरित्र, पृ. १७-१८

१०) कित्ता, पृ. २९

११) कित्ता, पृ. २१.

12) James Kellock, M.G. Ranade, Patriot and social servent, (Culcutta : 1926), P.10-11 (यानंतर या पुस्तकाचा उल्लेख Kellock, Ranade, असा येईल.)

13) Tikekar, The cloister Pale - A Biography of the University of Bombay (1983), P 5-7, फाटक, न्या. रानडे यांचे चरित्र, पृ. २४

14) Parvate, M.G. Ranade, P.17.

15) Kellock, Ranade, P. 12-13.

१६) फाटक, न्या. रानडे यांचे चरित्र, पृ. २२-२३.

17) M.G. Ranade, Rise of Maratha Power, (Bombay : 1900), P.15 ; 158 - 165.

१८) फाटक, न्या. रानडे यांचे चरित्र, पृ. ४५.

१९) कित्ता, ४६.

२०) रमाबाई रानडे, आमच्या आयुष्यातील काही आठवणी, (पुणे : १९३०), पृ. २१, (यानंतर या पुस्तकाचा उल्लेख रमाबाई, आठवणी असा येईल)

21) Tucker, Ranade, P.78.

२२) फाटक, न्या. रानडे यांचे चरित्र, पृ. १७२

२३) रमाबाई, आठवणी, पृ. २४३-२५५.

२४) न्या. रानडे यांचे चरित्र, पृ. ३८७-३८८.

२५) कित्ता, पृ. ३१-३२.

२६) पुं.पां. गोखले, आगरकरांची ओळख, (पुणे : १९६९), पृ. ५९-६०, (यानंतर या पुस्तकाचा उल्लेख गोखले, आगरकरांची ओळख असा येईल)

२७) मा.दा. आळतेकर, संपूर्ण आगरकर निबंधसंग्रह, भाग १ ला, (पुणे : १९३८), पृ. २६, (यानंतर या पुस्तकाचा उल्लेख, आळतेकर, निबंधसंग्रह १ असा येईल).

२८) वि.मो. महाजनी, गोपाळ गणेश आगरकर, मनोरंजन मासिक, (जुलै : १९१६), पृ. ६४.उधृत, सुनंदा देशपांडे, गो.ग. आगरकर पृ.१७-१८.

२९) सुनंदा देशपांडे, गोपाळ गणेश आगरकर (पुणे : १९८३), पृ. २१. (यानंतर या पुस्तकाचा उल्लेख देशपांडे, गो.ग. आगरकर असा येईल.)

३०) गोखले, आगरकरांची ओळख, पृ. ६९.

३१) कित्ता, पृ. ९८

३२) कृ.आ. गुर्जी, लोकमान्य बा.ग. टिळक यांचे पन्नास वर्षांचे चरित्र, भाग १ ला, (पुणे : १९०६), पृ. १०४. (यानंतर या पुस्तकाचा उल्लेख गुर्जी, टिळक यांचे ५० वर्षांचे चरित्र भाग १, असा येईल)

३३) स.मा. गर्गे, गोपाळ गणेश आगरकर, (पुणे : १९९१) , पृ. ४५ (यानंतर या पुस्तकाचा उल्लेख गर्गे आगरकर असा येईल)

३४) म.आ. करंदीकर, आधुनिक भारताचे शिल्पकार, बा.ग. टिळक, (दिल्ली : १९७२) पृ. ५ (यानंतर या पुस्तकाचा उल्लेख डॉ. करंदीकर आधुनिक भारताचे शिल्पकार टिळक, असा येईल)

३५) गो.ग. आगरकर, डोंगरीच्या तुरुंगातील आमचे एकशे एक दिवस, (पुणे : १८८२) पृ. ७ (यानंतर या पुस्तकाचा उल्लेख आगरकर, डोंगरीच्या तुरुंगातील आमचे एकशे एक दिवस असा येईल.)

३६) आचार्य शं.द. जावडेकर, डेक्कन कॉलेजातील दोन क्रांतिकारक. नवभारत, (ऑगस्ट : १९५६) उधृत, सुनंदा देशपांडे, गो.ग. आकरकर, पृ. २१

३७) करंदीकर, आधुनिक भारताचे शिल्पकार-टिळक, पृ.६-७

३८) गोखले, आगरकरांशी ओळख, पृ. ७१.

३९) य.दि. फडके, आगरकरांचा केसरी, मौज दिवाळी अंक (१९७५), पृ.६०

४०) न.चि. केळकर, समग्र केळकर वाङ्मय, खंड १, टिळक खंड (पुणे : १९३८), पृ. २३१-२०२ (यानंतर या पुस्तकाचा उल्लेख केळकर, टिळक खंड, असा येईल).

४१) आळतेकर, निबंध संग्रह, भाग १ ला, पृ. १२२-१२३.

४२) गुर्जी, टिळक यांचे पन्नास वर्षांचे चरित्र, भाग १ ला, पृ. १०६-१०७

४३) धनंजय कीर, लोकमान्य टिळक-फादर ऑफ दी इंडियन फ्रिडम स्ट्रगल, (बॉम्बे : १९६९) पृ. ३६

४४) कित्ता, पृ. ३०

४५) डॉ. करंदीकर, आधुनिक भारताचे शिल्पकार, पृ. ११

४६) फकीर, टिळक, पृ. ३२-३३

४७) आगरकर, डोंगरीच्या तुरुंगातील आमचे एकशे एक दिवस, पृ. ८-११

४८) केळकर, टिळक खंड, पृ. १९८

४९) कित्ता, पृ ५१-५२.

५०) गोखले, आगरकरांशी ओळख, पृ. ८०-८२

५१) न.र. फाटक, लोकमान्य, (मुंबई : १९७२), पृ. ७०

५२) वसंत पळशीकर, लोकमान्य बा.ग. टिळक "नेतृत्वाची उभारणी" समाज प्रबोधन पत्रिका, (नोव्हें, डिसें, १९७३), पृ. ७९.

५३) न.चि. केळकर, टिळक चरित्र - उत्तरार्ध, (पुणे : १९२८), पृ. २०

५४) य.दि. फडके, शोध बाळ गोपाळांचा, (पुणे : १९७७), पृ. ३७

५५) श्री निवास वनहट्टी, टिळक आणि आगरकर, (नागपूर : १९५६), पृ. ९६-९७.

५६) प्रभाकर पाध्ये, तीन तपस्वी, (कोल्हापूर : १९४६), पृ. ११

५७) गो.ग. आगरकर, केसरीतील निवडक निबंध, भाग १ ला, (पुणे : १९३७), पृ. २१६.

५८) द.ना. आपटे (संग्राहक), यशोदाबाई आगरकर यांनी निवेदिलेल्या आगरकरांच्या आठवणी, स्त्री-किर्लोस्करवाडी, (पुणे : मे-सप्टें. १९३८), यानंतर या पुस्तकाचा उल्लेख यशोदाबाई, आगरकरांच्या आठवणी असा येईल)

५९) यशोदाबाई आगरकर, आगरकरांच्या आठवणी.

६०) सुनंदा देशपांडे, गो.ग. आगरकर, पृ. ४३.

६१) गोखले, आगरकरांशी ओळख, पृ. ८७.

## प्रकरण तिसरे

## न्या. रानडे आणि गो.म. आगरकर यांचे राजकीय आणि आर्थिक कार्य

### अ) न्या. रानडे यांचे राजकीय, आर्थिक कार्य

न्या. रानडे हे राजकीय पुढारी किंवा राजकीय विचारवंत नसले तरी ते राजनितीचे गाढे अभ्यासक मानले जातात. त्यांचे राजकीय विचार तत्कालीन राष्ट्रीय पुनरुत्थानाने प्रभावित झाले होते. भारतीय समाजाचे प्रबोधन घडवून आणणे हे त्यांनी आपले जीवित कार्य मानले होते. त्यांचे जीवन ध्येय निश्चित होण्याला त्यांच्या प्रगाढ ज्ञानार्जनातील तत्वज्ञान कारणीभूत झाले दिसून येते. "समाजसुधारणेतून देशकार्य" हे त्यांनी आपले धर्मकार्य मानले होते. आपल्या देशासाठी स्थिर व सुदृढ अशा राजकारणाला आधारभूत सामाजिक लोकशाही स्थापन करण्याचे उद्दिष्ठ त्यांनी आपल्या जीवनाचे उद्दिष्ठ ठेवले होते "Ranade aimed to create a real social democracy without which there could be no sure and stable politics"[1] त्यांनी आपले कार्य राजकीय, सामाजिक अशा बंधनात मर्यादित ठेवले नव्हते.

रानडयांवर इंग्लंडच्या उदारमतवादाचा प्रभाव पडलेला होता. जॉन लॉक हे उदारमतवादाचे आद्यप्रणेते मानले जातात. Two Treatises of Government 1960 (1690) या ग्रंथाचा रानडयांवर राजकीय वैचारिक दृष्टीने बराच प्रभाव पडलेला होता. उदारमतवादी तत्वज्ञानात मानवाच्या प्रतिष्ठेला महत्वाचे स्थान दिलेले आहे. समाज हा व्यक्तींचा समुदाय असल्याने समाजाचे हित म्हणजे जास्तीत जास्त व्यक्तींचे हित हेच सामाजिक विचार प्रणालीचे उद्दिष्ठ मानले गेलेले आहे. लॉक यांनी आपल्या पुस्तकात नैसर्गिक स्थिती, निसर्गाचे नियामक तत्व आणि नैसर्गिक हक्कावर आधारीत राजकीय विचार प्रणालीचा विचार केलेला आहे. फ्रेन्च व्यक्तिवादी विचारवंतानी लॉकच्या विचारसरणीचा पुरस्कार केलेला आहे. बेन्थॅम हया इंग्लंडच्या उदारमतवाद्यानेही व्यक्ति स्वातंत्र्याचा पुरस्कार केला आहे.

पण त्याचे विचार नैसर्गिक कल्पनेवर आधारित नव्हते. त्यांनी व्यक्तीच्या हक्कापेक्षा त्याच्या उपजत प्रवृत्ती व शक्तीला महत्व दिले आहे. Season of fiction is nowover नैसर्गिक हक्क, सामाजिक करार यांच्या सारख्या काल्पनिक तत्वांचा हंगाम संपलेला आहे, अशी बेन्थॅमची विचारसरणी आहे. निसर्गाने मानवाला बुध्दी, भावना, इच्छा शक्ती, उपक्रमशीलता बहाल केल्याने तो बुध्दीच्या जोरावर नैसर्गिक शक्तींचा जाणून घेवून विज्ञानाच्या सहाय्याने नैसर्गिक शक्तींनी आपल्या नियंत्रणात आणून आपल्या सुखासाठी राबवीत असतो. मानवाच्या त्या सहज शक्तींचा अधिकाधिक विकास करण्याची संधी देण्यातच सामाजिक प्रगती होवू शकते असे बेन्थमचे मत आहे. तर दर्ड सारखा सेंद्रीयवादी विचारवंताने समाजाला पूर्ण संबोधून व्यक्ती ह्या केवळ शाखा किंवा अवयव आहे असे म्हटले आहे. सामाजिक संबंधामधून मानवाचे व्यक्तित्व निर्माण होते, फलद्रूप होते आणि संतती व कर्तुत्वाच्या रुपाने समाजातच विलीन होते. मिल्लने मनुष्याचा ध्येयवाद हा तत्व निष्ठेच्या प्रेरणेने समाज जीवनात सर्वोच्च दर्जावर पोहचते, त्यासाठी नैतिकतेच्या पोषणाची गरज प्रतिपादीत करतांना मिलने पशुवत जीवन जगणाऱ्या माणसांतील उच्चतर नैतिक प्रेरणा जागृत करणे हे शिक्षणाचे व सामाजिक संस्थांचे मुख्य कार्य मानले आहे. सुसंस्कृत मानवाची नैतिक प्रेरणा, हेच समाजात सुव्यवस्था ठेवण्याचे सर्वोत्तम साधन आहे असे मिल सारख्या व्यक्तीवादी तत्वचिंतकाचे म्हणणे आहे." ह्या सर्व उदारमतवादी विचारवंताच्या शिकवणाचा परिणाम रानडयांच्या विचारांवर झालेला आहे.[२] जॉन लॉक, बेन्थॅम, मिलच्या विचाराने प्रभावित असले तरी त्यांचा उपयुक्तता वाद त्यांना पटलेला नव्हता. कारण उपयुक्तता वाद्यांनी फक्त मनुष्याचाच विचार केला आहे. त्यांच्या विवेकबुध्दी, ध्येयासक्ती, कर्तव्यभावना, न्यायप्रियता इ. गोष्टींकडे दुर्लक्ष केले आहे असे रानडयांना वाटते. मानव हा निसर्गातीलच एक भाग असल्याने त्यालाही भूक, कामवासना, तहान इ. विकार आहेत व त्यांच्या तृप्तीसाठी जन्मभर त्याची धडपड सुरु असते. तसेच मनुष्य समूहवृत्तीचा असल्यामुळे समाजाचा एक घटक म्हणून संघटित व प्रगतीशील जीवन जगण्याची

त्याला इच्छा असते. दुसऱ्याबद्दल आदर, सहानुभूती, अनुकंपा, मैत्री, सद्भावना इ. अशा प्रकारच्या भावना विचार असल्याने सामाजिक बांधीलकीतून त्याची कर्तव्य निष्ठा जागृत होत असते. म्हणूनच समाजाच्या कल्याणासाठी जीवन सर्वस्व अर्पण करणाऱ्या व्यक्ती समाजात आढळतात. मनुष्याच्या या सद्भावनेचे व कर्तव्यनिष्ठेचे पोषण समाजातूनच होत असते. नैसर्गिक विकार, सुसंस्कृत स्वार्थ, उदार सहानुभूती आणि निरपेक्ष कर्तव्यदक्षता या माणसाच्या निरनिराळ्या प्रवृत्तीत सुसंवाद साधण्याची जबाबदारी सामाजिक नेत्यांवर, सामाजिक संस्थांवर आहे असे रानडयांना वाटत होते. म्हणून समाजाची खरी सुधारणा करायची असेल तर मुळात मनुष्यात्व बदल झाला पाहिजे. ~~हे काम बिकट असले तरी मुळात मनुष्यात्व बदल झाला पाहिजे~~ हे काम बिकट असले तरी करणे आवश्यक आहे त्याशिवाय समाज प्रगती होणे अशक्य आहे. "This work of liberation must be the work of our own hands, each one working of himself for his own release. The strength of motive, and the impulse to act up to it, must come from within"[3] म्हणूनच रानडे यांना समाजाच्या सर्वांगिण सुधारणेसाठी धर्म भावनेचे विशेष महत्व वाटत होते. सुशिक्षितांना धर्मबुद्धीने समाजाचे निष्ठावान, कर्तव्यदक्ष व सुप्रवृत्त घटक बनविण्यासाठी त्यांनी आपली लेखणी वापरली व भाषणांच्या द्वारा समाजसुधारणा करतांना देशव्यापी संघटनांची निर्मिती व्हावी, यासाठी प्रयत्न केले. अशाच देशव्यापी संघटनांच्या आधारे भारताचे स्वातंत्र्य परत मिळू शकू असा विश्वास ही त्यांना वाटत होता. पण त्यासाठी राजकीय व्यवस्थेची गरज महत्वपूर्ण वाटत होती.

रानडयांवर युरोपिय उदारमतवादी विचारांचा प्रभाव असला तरी भारतातील दृष्टिकोनातून त्यांनी आपले राजकीय तत्वज्ञान मांडण्याचा प्रयत्न केला आहे. व्यक्तींच्या हितासाठी व समाजहितासाठी कायदा, स्पर्धा, नैतिकता या तीन बाबींची आवश्यकता त्यांना वाटत होती त्यांना कायदयांच्या मर्यादांची जाणीव होती म्हणूनच त्यांनीही लोक शिक्षणावर भर दिलेला होता. त्यांना भारताला

केवळ राजकीय स्वातंत्र्य मिळवुन देऊन नवसमाज निर्माण करायचा नव्हता तर, हा समाज नवविचारांनी प्रभावित असला तरी चांगल्या अध्यात्मिक गोष्टीचे पुनरुज्जीवन व्हावे असे त्यांना वाटत होते. त्या दृष्टीकोनातुन ते राजकीय कार्यात प्रयत्नशील होते. आपल्या देशाची दुरावस्था नष्ट होवुन देशाला पुन्हा पुर्वीचे वैभव कसे मिळवुन देता येईल. याकडे त्याचे लक्ष केंद्रीत झालेले होते. त्यादृष्टीने भारतासाठी कोणत्या गोष्टीची गरज आहे या विषयी ते सतत चिंतन करीत असत. त्यांचे समकालीन शिष्य गोपाळ कृष्ण गोखले यांच्या Speeches and writing of Gokhale Vol 3 यात रानडयांच्या जीवनातील सर्वांगिण कार्याचे स्वरुप कसे होते या विषयी विवेचन केले आहे. या विवेचनामधुन रानडयांचे राजकीय क्षेत्रातील विचार किती परिपुर्ण होते याचा प्रत्यय येतो.

रानडयांना भारतावरील इंग्रजाचे राज्य हे एक ईश्वरी वरदान वाटत होते" "With a liberated manhood, with buoyant hope, with a faith that never shirks duty. With a sense of justice that deals fairly to all, with a unclouded intellect and powers fully cultivated and lastly, with a love that overleaps all bound renovated India will take her proper rank among the nations of the world, and be the master of the situation and of her own destiny"[4] प्रत्येक गोष्टीकडे, घडामोडींकडे ईश्वरी इच्छेच्या दृष्टीकोनातुन पाहण्याची त्यांची मनोवृत्ती होती. देशात कायदयाचे राज्य स्थापन करुन शांतता प्रस्थापित कशी करावी, याबद्दलचे शिक्षण देण्यासाठीच परमेश्वराने ब्रिटिशांना या देशात पाठविले आहे, असा त्यांचा विश्वास होता. तेव्हा देशातील प्रस्थापित कायदयाच्या राज्याला ज्यामुळे धक्का बसेल असे कोणतेही कृत्य करु नये, याकडे त्याचे विशेष लक्ष होते.

" देशात कायदा प्रस्थापित करणे हा राज्यकर्त्यांचा धर्म आणि तो कायदा निमुटपणे पाळणे हा प्रजाजनांचा धर्म हे रानडयांच्या राजकीय तत्वज्ञानाचे प्रमुख सूत्र होते... ब्रिटिश राज्यकर्त्यांनी हिन्दी लोकांना समानतेचे वागवावे

आणि हिन्दी लोकांनी ब्रिटिश साम्राज्याशी एकनिष्ठ राहावे, असे त्यांचे राजकीय तत्वज्ञान होते"[१] इ.स. १८५८ च्या राणीच्या जाहिरनाम्याला रानडे भारतीयांचा "मॅग्नाचार्टा" मानत असत. राणीच्या सनदेनुसार आपण भारतीयांना ब्रिटिश जनतेप्रमाणे प्रतिनिधिक राज्य पध्दती प्राप्त झाली पाहिजे आणि हिन्दुस्थानला ब्रिटिश छत्राखाली मांडलीकी स्वराज्य मिळाले पाहिजे हे त्यांच्या राजकीय कार्याचे अंतिम ध्येय होते. त्यांच्या ह्या राजकीय दृष्टीकोनामुळे ते एक मवाळ, ब्रिटिश धर्जिणे आहेत, अशी टिका त्यांच्यावर समकालीनांनी केली होती. परंतु रानड्यांची भाषणे व लेखन कार्य जर काळजी पूर्वक अभ्यासिले तर त्यांच्या विचारातील दूरदृष्टी व देशकार्यासाठी केलेली धडपड पाहता राष्ट्र जीवनात क्रांतीचा विचार रानड्यांना असह्य वाटत होता. ब्रिटिशांनी भारताला कायद्याचे राज्य दिले हीच त्यांची सर्वात मोठी देणगी वाटत होती. तेव्हा तिला धक्का लागेल असे देश विघातक कृत्य करु नये असे त्यांना वाटत होते. रानड्यांनाही देशाचे स्वातंत्र्य हवे होते पण समाज सुदृढ झाल्याशिवाय देशाचे स्वातंत्र्य मिळविणे म्हणजे परत दुस-या गुलामगिरीत पडण्यासारखे वाटत होते. ब्रिटिश सरकार इतर आक्रमकापेक्षा बुध्दिवान, कर्तुत्वान असल्याने त्यांच्या छत्र छायेत राहून राजकीय ज्ञान मिळवून, समाज सुधारणा करुन नव समाज निर्मिती करता येईल असा विश्वास त्यांना वाटत होता. म्हणून त्यांनी ब्रिटिश राज्य भारतीयांसाठी उपयुक्त आहे असे म्हटले होते, म्हणून त्यांचे विचार नेमस्त वाटतात. त्यांचे विचार इंग्लंडच्या उदारमतवादी विचारसरणीवर आधारित होते. रानडे संयमीवृत्तीचे अध्यात्मवादी असल्याने त्यांच्या कृती मध्ये आणि विचारांमध्ये जहालपणा आढळत नाही. सरकारी नोकरीत असले तरी त्यांनी कधी लाचारी पत्करली नव्हती पण इतर जहाल राष्ट्रवाद्याप्रमाणे सरकारवर कडाडून टिकाही कधी केली नाही. सरकारचे धोरण चुकीचे वाटले, तेव्हा त्यांनी युक्तीवादाने त्यांच्या कृत्यावर आक्षेप घेतलेले आहेत. "भारतीय आर्यत्व न तोडता" जुन्या चांगल्या परंपरा आणि नवीन मुल्यांच्या मदतीने भारतातील राजकारण त्यांना यशस्वी करायचे होते.

रानड्यांनी ज्यावेळी आपल्या सार्वजनिक कार्याची सुरवात केली तेव्हा टिळकांनी म्हटल्याप्रमाणे [६] महाराष्ट्र हा निद्रित अवस्थेतील थंड गोळा होता. त्या गोळ्याला कोणत्याही प्रकारे ऊब दिली असता तो सक्रिय होईल याचा रात्रंदिवस विचार करून त्यासाठी मेहनत घेणारे रानडे महाराष्ट्राचे पहिले यशस्वी पुढारी ठरले. त्यांच्या अविरत कार्यामुळे पुढे पुणे हे महाराष्ट्राचे "बौद्धिक व राजकीय" कार्यक्षेत्र ठरले. त्यांच्या आधी लोकहितवादी, बाळशास्त्री जांभेकर इ. व्यक्ती कार्यरत होत्या पण प्रत्येकाचे मार्ग व विचार वेगवेगळ्या परिस्थितीतून पुढे जात होते. न्या. रानड्यांच्या काळापासून महाराष्ट्रातील राजकारणाला चालना मिळालेली दिसते. त्याचे कार्य अल्पावधीत जनतेसमोर येवून टिळकांसारख्या जहाल पुढाऱ्याने अत्यंत वेगाने इंग्रज सरकारला आपल्या हक्क व कर्तव्यांची जाणीव करून दिल्याने हे नेतृत्व महाराष्ट्राला मिळवून देण्याचे श्रेय रानड्यांना द्यावे लागते. समाज प्रबोधनाचे कार्य करतांना सार्वजनिक चळवळी उभारण्यासाठी अनेक संस्थांनी निर्मिती केली होती. त्यांना चळवळीचे अधिष्ठान मिळवून दिले होते. त्यांना समाज सुधारणेचे कार्य करतांना आपल्या कार्याचे सामाजिक, राजकीय, आर्थिक, धार्मिक असे विषय विभाजन मान्य नव्हते. याप्रमाणे विभाजन केल्यास देश आत्मघातास बळी पडेल असे त्यांना वाटत होते. समाजात अनुकूल परिस्थिती निर्माण झाली असता प्रत्येक क्षेत्रात त्यांनी कार्य केले आहे. सामाजिक व राजकीय संस्था एकाच नाण्याच्या दोन बाजू आहेत असे त्यांना वाटत होते. देशाच्या सर्वांगिण सुधारणेसाठी त्यांना सर्व क्षेत्र सारखेच महत्वाचे वाटत. इ.स. १९०० मध्ये मुंबईला भरलेल्या प्रांतिक सामाजिक परिषदेमध्ये बोलतांना त्यांनी म्हटले की, "जो पर्यंत (स्वराज्याचे) राजकीय हक्क प्राप्त झालेले नाहीत व ते प्राप्त होत नाहीत, तो पर्यंत समाजव्यवस्थेला प्रगत व उन्नत रूप प्राप्त होणे शक्य नाही, उलटपक्षी जोवर समाज जीवनात विवेक व न्याय या तत्वांचा आदर होत नाही तोवर राजकीय हक्क व अधिकार राबविण्यास समाजाच्या ठिकाणी पात्रता उत्पन्न होत नाही, जोवर सामाजिक व्यवहारांची मांडणी सदोष आहे तोवर चांगली, सर्वांचे कल्याण साधणारी आर्थिक व्यवस्था अस्तित्वात येवू शकत नाही. जर समाजापुढील धार्मिक

श्रेय कल्पना व तत्त्वे हीन व भ्रष्ट बनलेली असतील, आणि ती तशीच राहणार असतील तर सामाजिक, आर्थिक, राजकीय क्षेत्रामध्ये समाजाचे पाऊल पुढे पडू शकत नाही. हा अन्योन्याश्रय केवळ योगायोगाचा भाग नाही तर समाजाच्या धारणेचा, प्रगती-परागतीचा अटळ नियम आहे.[७] असे सर्वांगिण सुधारणेचे तत्त्व त्यांनी मांडले.

देश व समाजहित हयाचे ध्येय पुढे ठेवून त्यांनी प्रबोधनाचे कार्य करतांना देशातील सर्व क्षेत्रांचा विचार केलेला होता. आपले सुधारणांविषय बाबत मत अधिक स्पष्ट करतांना इ.स. १९०० मध्ये सातारा-यामध्ये झालेल्या प्रांतिक सामाजिक परिषदेत ते बोलले की "आपल्या देशाच्या प्रत्येक खेड्यांत चावडी, देऊळ, विहिर, धर्मशाळा असा काही धार्मिक, काही सामाजिक, काही राजकीय स्थाने किंवा संस्था आहेत. त्यांचा उपयोग खेड्यातल्या प्रत्येक माणसाला होतो. चावडी अमक्यासाठी, देऊळ तमक्यासाठी अशी उपयोगाची वर्गवारी किंवा विभागणी खेड्यात नसते जो देवळात जातो, त्यालाच कालान्तराने चावडीवर जाऊन कर भरावा लागतो. अगर आपल्या गा-हाण्याची दाद मागावी लागते जी स्थिती खेड्यांची तीच शहरांची दुकाने, बाजार, रंगभूमी देवालये, शाळा, दवाखाने, लष्करी छावणी या सर्वांशी माणसाचा मग तो लहान असो, स्त्री असो वा पुरुष असो की रंक असो संबंध येतो. या संबंधाच्या समन्वयाने माणसाचे जीवित पूर्ण होत असते व त्यालाच नागरी city life जीवन म्हणतात. मानव जातीच्या गुंतागुंतीच्या प्रत्येक धाग्याकडे लक्ष द्यावे लागते. काळ स्थळानुसार कधी एखाद्या धाग्याचे जास्त महत्त्व असेल, कधी कमी असेल पण त्यातल्या काही धाग्यांची पूर्ण उपेक्षा करून चालणार नाही."[८]
राजकारणाविषयी बोलतांना जबाबदार राज्य पध्दती विषयी बोलणारे पुढारी सामाजिक प्रश्नाबद्दल मौन बाळगतांना किंवा उदासीन राहिलेले पाहून रानडयांना वाईट वाटे. कारण सामाजिक पाया मजबूत असल्याशिवाय त्यावर राजकीय इमारत टिकून राहणार नाही हे ते ओळखून होते. म्हणून त्यांनी राष्ट्रीय सभेत सामाजिक विषय टाळले गेले तेव्हा सामाजिक प्रश्नावर विचार करण्यासाठी सामाजिक परिषदेचे नवीन व्यासपीठ निर्माण केले होते. आणि

राजकारण व समाजकारणामध्ये कृतीशील चळवळ त्यांनी सुरू करून समाजाला जागृत करण्याचे कार्य त्यांनी केले.

त्यांच्या राजकीय व आर्थिक कार्याचे स्वरूप म्हणजे समाजाला वास्तव परिस्थितीची जाणीव करून देणे, लोकांना समाजाभिमुख करण्यासाठी त्यांच्या मध्ये राजकीय सुधारणांबाबत आकांक्षा निर्माण करणे, सुधारणा घडवून आणण्यासाठी सरकारकडे निवेदने करणे, सरकारच्या विधेयकाचा सखोल अभ्यास करणे इ. कार्य अप्रत्यक्षरित्या केले होते. रानडे अलबर्ट बील, रिपनच्या स्थानिक स्वराज्य संस्था, महाराष्ट्रातील दुष्काळ, शेतजमिनीची परिस्थिती, शेतकऱ्यांचा कर्जबाजारीपणा, दक्षिणेकडील टी, या संबंधी लोकांनी केलेले कार्य सार्वजनिक सभा, सामाजिक परिषद, त्रैमासिकातील लिखाण इ. विषयी आपले विचार व सूचना सरकारपर्यंत पोहचविण्याचा प्रयत्न करीत. सरकार त्याकडे दुर्लक्ष करणार हे त्यांना माहित असल्याने ते जनतेच्या माध्यमातून सरकारपर्यंत पोहचविण्यासाठी लोकांमध्ये राजकीय जागृती निर्माण करण्याचा प्रयत्न त्यांनी केला होता त्याचे भाषण लिखाण लोकांमध्ये राजकीय जागृती आणण्यास उपयुक्त ठरले.

रानडयांच्या सार्वजनिक राजकीय कार्याची सुरवात खऱ्या अर्थाने पुण्यात इ.स. १८७१ ला पुण्याला सबॉर्डिनेट जज्ज म्हणून आले तेव्हा पासून झाली. त्यावेळी पुणे हे पेन्शनराचे शहर म्हणून ओळखले जाई. इ.स. १८५४ मध्ये पुण्यात मोरशास्त्री साठे नावाचे गृहस्थ "कल्याणोनायक" सभा काढून दर रविवारी प्रतिष्ठित लोकांची सभा घेत इ.स. १८५३ ला सरदार वर्गानी "डेक्कन असोसिएशन" संस्था काढली होती. त्यानंतर मुंबईच्या धर्तीवर इ.स. १८७४ मध्ये "पुना असोसिएशन" निर्माण करण्यात आले व त्याची एक शाखा म्हणून इ.स. १८७० ला वर्ष प्रतिपदेच्या दिवशी "सार्वजनिक सभा" स्थापन करण्यात आली. त्यावेळी हया सभेचा उद्देश केवळ पर्वती संस्थानचा कारभार सुरळीत ठेवाचा येवढाच होता. नंतर तिच्या कार्याचे क्षेत्र वाढविण्यात आले, रानडे पुण्यात आले तेव्हा ही संस्था कार्यरत होती.

रानड्यांनी ह्या संस्थेची सूत्रे हातात घेऊन सार्वजनिक सभेचे कार्य यशस्वीरित्या सुरु केले. त्यांना एक उत्साही कार्यकर्ते "सार्वजनिक काका" उर्फ गणेश वासुदेव जोशी या वकीलांची सोबत मिळाल्याने महाराष्ट्रातील सार्वजनिक जीवनात एक नव चैतन्य संचारण्यास सुरवात झाली होती.

रानड्यांच्या सुरवातीच्या कार्याबद्दल टिळकांनी केसरीत लिहिले की, "माधवराव मुंबई सोडून पुण्याचे प्रि. फादर आमीन च्या जागेवर आले तेव्हा दादाभाई नौरोजी सारख्या पुढारी गृहस्थाच्या उदाहरणाने त्यांच्या मनावर बराच परिणाम झालेला होता. सरकारी नोकरीचे काम चांगल्या रितीने सांभाळून, देशाच्या उत्कर्षाकरिता कोणकोणत्या दिशेने काय काय प्रयत्न केले पाहिजे हे ठरविणे व ते अंमलात आणण्याकरीता सतत परिश्रम करुन जागरुकता ठेवणे हे काही सामान्य बुध्दिमान पुरुषाचे काम नव्हे.... सर्व बाजूंनी राष्ट्राची उन्नती झाली पाहिजे, असे त्यांस वाटत होते. व ह्या दिशाचे व बाजूचे सांगोपांग परिक्षण करुन त्यांच्या योग्यायोग्यतेबद्दल निर्णय करण्याइतकी परमेश्वराने त्यास प्रगल्भ व व्यापक स्फूर्ती दिली होती. धर्मव्यवस्था, समाजसुधारणा, उद्योगधंदे, शिक्षण, राजकीय व्यवस्था वगैरे बाबतीत आम्ही मागे आहोत व ह्या सर्व गोष्टीत सुधारणा झाल्या शिवाय इतर सुधारलेल्या राष्ट्रांची आपणांस बरोबरी करता यावयाची नाही असा त्यांचा पक्का ग्रह झाला होता"[१] त्याचे सुरवातीचे कार्य वृत्तपत्रांनी दखल घेण्याइतपत उल्लेखनिय ठरले होते. त्यांनी दूरदृष्टीने योजलेले कार्य समाजाला चालना देणारे ठरले होते.

प्रथमतः स्वदेशी चळवळीचा उपदेश इ.स. १८४८ सा महाराष्ट्रातील आद्य सुधारक लोकहितवादी यांनी आपल्या लेखांतुन केला होता. त्याच स्वदेशी चळवळीचा पुरस्कार करुन इ.स. १८७२ पासुन त्यासाठी प्रचार, संघटनाचे कार्य रानडे व सार्वजनिक जोशी काका यांनी केले. रानडे यांनी १८७२-७३ सा स्वदेशी धंदयाचे पतन व त्याच्या उन्नतीचे उपाय संबधी व्यापार विषयक

दोन भाषणे दिली होती, त्यात दादाभाई नौरोजींच्या "Poverty of British India"या ग्रंथाचा परामर्श घेऊन "सामाईक भांडवलाच्या मंडळ्या स्थापून यांत्रिक कारखाने काढल्याशिवाय औद्योगिक उन्नती होणार नाही"[१०] हे तत्व लोकांच्या मनावर ठसविले. सार्वजनिक काकांनी स्वतःच खादीचा वापर करुन ठिकठिकाणी स्वदेशी मालाची दुकाने काढून, स्वदेशी उद्योगधंद्यांना उत्तेजन दिले. व ते कार्य आमरण केले. रानडयांनी राष्ट्रीय अर्थशास्त्राचा पुरस्कार करुन आपल्याही देशात युरोपिय पद्धतीची औद्योगिक क्रांती व्हावी यावर भर दिला त्यात संरक्षक जकातीच्या तत्वांचा अवलंब करण्याचे आव्हान ब्रिटिश सरकारला केले होते. त्याचप्रमाणे रानडे यांनी औद्योगिक परिषदे पुढे केलेल्या भाषणांमधून सरकारने येथील उद्योगधंद्यांना उत्तेजन द्यावे अशी मागणी वारंवार केली होती. पण त्यांना खुल्या आंतरराष्ट्रीय व्यापाराचे तत्व मान्य नव्हते. मात्र त्यांची भूमिका समाजवादाकडे झुकणारी नसून फेडरिक लिस्ट प्रमाणे राष्ट्रवादी होती. रिकार्डोप्रणित अर्थशास्त्राची गृहित भारतीय अर्थव्यवस्थेला पोषक नाही कारण इंग्लंड व भारतातील परिस्थितीत जमिन अस्मानाचा फरक आहे हे स्पष्ट केले होते. भारताच्या मुख्य विचारसरणीत अर्थार्जनाला मानाचे स्थान नसल्यामुळे ते अर्थोत्पादनावर लक्ष केंद्रित करीत नाहीत. स्पर्धा आणि करार यापेक्षा येथील आर्थिक व्यवहारावर परंपरा व जन्मजात प्रतिष्ठा यांचाच प्रभाव जास्त आहे. म्हणून १७ व्या १८ व्या शतकांत इंग्लड मधील राज्यकर्त्यांनी व्यापार अभिवृध्दीसाठी अनेक संरक्षक उपाय योजले, असाच उपायांची गरज भारताला आहे असे रानडयांनी प्रतिपादित केले व पुढे सरकारला, समाजाला आव्हान केले की" The state is now more recognised as the national organ for taking care of national needs in all matters in which individual and co-operative efforts are not likely to be so effective and economical as national efforts. This is the correct view to take of the true functions of a state."[11] त्यांनी भारतासाठी कल्याणकारी शासनाचा पुरस्कार केला होता.

अर्थशास्त्र हा रानडयांचा आवडता विषय असल्याने त्यांनी या विषयावर विख्यात लोकांच्या तत्वज्ञानाचा अभ्यास केलेला होता. ॲडम स्मिथ, रिकार्डो, मील, लिस्ट इ. अर्थशास्त्रीय विद्वानांच्या विचारातून आपल्या देशाला हितकारक असा राष्ट्रीय हिन्दी अर्थशास्त्राचा पाया त्यांनी याच सार्वजनिक सभेच्या माध्यमातून घातला होता. ब्रिटिशांच्या राजकीय व औद्योगिक गुलामगिरीने देश आर्थिक दृष्टया पंगु झालेला आहे. "हयाचे विश्लेषण करताना ते म्हणतात की" The political domination of one country by another attracts far more attention than the more formidoble, though unflet domination which the capital enterprise and skill of one country exercise over the trade, and manufactures of another. This domination has an invidious influence which paralyzes the springs of all the varied activities which together make up the life of nation, and this influence was so paramount at one time in British India that there were grave reasons to fear the worst consequences of the inevitable change [12]

रानडयांनी दोन दशकांत सार्वजनिक सभेचे स्वरुप मुंबई कलकत्यामधील राजकीय चळवळी प्रमाणे विस्तृत केले होते. इ.स. १८७२ ला हेन्री फॉसेट यांना पार्लमेन्टमध्ये निवडून दिल्याबद्दल ब्रिटनच्या नागरिकाचे अभिनंदन करण्याची मुंबई, कलकत्ता येथील राजकीय संस्थानी सुचविलेल्या कल्पनेला सार्वजनिक सभेने पाठिंबा दिला होता. ही सभा पुण्यातील राजकारणाचे आद्यपीठ बनले होते. सुरवातीला या सभेने अर्ज तयार करणे, संबधित अधिका-यांकडे पाठविणे सभा भरवुन ठराव मांडणे इ. सर्व कार्य केले इ.स. १८७४ ला ब्रिटिश पार्लमेंट मध्ये भारतीयाचे प्रतिनिधी असावेत, अशी मागणी करणारा अर्ज

पार्लमेन्टच्या सभासदांकडे पाठविलेला होता. इ.स. १८७५ ला बडोद्याचे महाराज मल्हारराव गायकवाड यांच्यावर तेथील ब्रिटिश प्रतिनिधीस विषप्रयोग केल्याचा आरोप करण्यात आला, तेव्हा त्यांना पाठिंबा जाहीर करण्यासाठी व आर्थिक मदतीसाठी कायदेशीर चळवळ उभारण्यात आली. याच सभेचे महत्वपूर्ण काम म्हणजे इ.स. १८७६-७७ मध्ये महाराष्ट्रात दुष्काळ पडला असता दुष्काळग्रस्त शेतक-यांना मदत करुन त्यांची गा-हाणी सरकार पुढे मांडली. व त्यांना न्याय मिळवुन देण्याचे कार्य या सभेने केले होते. सार्वजनिक सभेच्या कार्याला स्थायी स्वरुप देण्यासाठी इ.स. १८७८ ला एक "त्रैमासिक" सुरु करुन सभेच्या कार्याचा अहवाल तयार करणे, स्वतंत्र निबंध लिहिणे, प्रचलित वाड.मय प्रसिध्द करणे इ. गोष्टीचा समावेश या मासिकात करण्यात आला. हे त्रैमासिक अठरा वर्षे चालले होते "या त्रैमासिकातील दोन तृतीयांश मजकुर न्या. रानडे लिहित असत. असे गोखल्यांच्या विधानावरुन कळते. पण सर्वच मजकूर रानडे यांच्या नावावर प्रसिध्द होत नसे."[१३] कारण त्यावेळी ते सरकारी नोकरीत असल्याने त्यांच्यावर काही बंधने होती. रानडे आपल्या लिखाणाबाबत अतिशय सावध असत. या संबंधात त्यांचे मित्र व चरित्रकार रावबहादुर मानकर म्हणतात की," Almost all the weight elaborate and thoughtfull representation that were submitted either to the Government of India, the Govt. of Bombay or the House of commons were either drafted under Ranade's advice or composed by him इतरांनी लिहिलेले लिखाण किंवा मसुदा त्यांच्याकडे आला व त्यांना तो पसंत पडला नाहीतर मनासारखे लिखाण होईपर्यंत ते त्यांना लिहिण्यास सांगत नंतरच ते प्रसिध्द केले जाई. त्यामुळे त्रैमासिकाची उपयुक्तता व प्रभाव सर्वत्र पडलेला होता त्याच्या लिखाणाबद्दल मुंबईचे गव्हर्नर लॉर्ड रे म्हणतात की," your association has during mytenure of office given me the benefit of your criticism

I consider it usefull and I shall mention to lord Harris that in continuing these friendly relations he will find the task of Govt. made lighter"[14].

या सभेच्या व्यासपिठावर सार्वजनिक काका, रानडे यांच्या बरोबरच चिपळूणकर, गोखले, टिळक, पटवर्धन इ. व्यक्तींनी कार्य केले आहे. रानडयांचे सार्वजनिक सभेद्वारे यशस्वी झालेले कार्य म्हणजे रानडयांनी इ.स. १८७२ ला डिसेंबर मध्ये महाराष्ट्रातील जिल्हयांच्या शेतकऱ्यांच्या आर्थिक स्थितीबद्दलची पाहणी करुन अहवाल लिहिला. दादाभाई नौरोजींनी ब्रिटिश पार्लमेन्टच्या भारतातील जमाबंदी समिती समोर अहवाल दिला व त्यात ब्रिटिश समितीने बरेच फेरफार करुन ते चार खंडात ग्रंथरुपात प्रसिध्द केले. तेव्हा रानडयांनी स्वतः या ग्रंथाचा अभ्यास करुन त्याचा सारांश "इंदुप्रकाश" या वृत्तपत्रात लेखरुपाने प्रसिध्द केला. त्यांच्या या लेखांची प्रशंसा "सॅटरडे रिव्हयु" या वृत्तपत्राने केली होती. रानडयांनी इ.स. १८७४ नंतर या अहवालावर स्वतंत्र पुस्तक प्रसिध्द केले. रानडयांचे सभेद्वारे यशस्वी झालेले दुसरे कार्य म्हणजे बडोदयाच्या मल्हारराव गायकवाडांवरील विषप्रयोगाच्या आरोपाविरुध्द केलेला अर्ज होय. त्यांनी व्हाईसरॉयकडे सार्वजनिक सभेतर्फे या संदर्भात अर्ज पाठविला असता त्याचा गांभीर्याने विचार होऊन हिन्दी व ब्रिटिश लोकांचे मिळून एक चौकशी मंडळ नियुक्त केले. बडोदयाचे राज्य खालसा केले जाणार नाही, निःपक्षपातीपणे न्याय दिला जाईल, असे आश्वासन मिळविले. सार्वजनिक काकांनी जाहीर सभा भरवुन एक लाखाची आर्थिक मदत मिळवुन महाराजांना दिली. सभेच्या मागणीप्रमाणे आरोपांची चौकशी होऊन आरोप निराधार ठरला पण त्यांना राज्यकारभार करण्यास अयोग्य ठरवुन मद्रासला पाठविण्यात आले होते.

रानडयांनी इ.स. १८७७-७८ हया काळात महाराष्ट्रात पडलेल्या दुष्काळात केलेले कार्य महत्वपूर्ण मानले जाते. त्यांनी दुष्काळी भागाचा व परिस्थितीचा पूर्ण अभ्यास करण्यासाठी आपले प्रतिनिधी पाठवुन माहिती मिळविली. त्यावर लेख लिहुन दुष्काळावर उपाययोजना सुचविलेले लेख

सरकारकडे सभेच्या मार्फत पाठविले. सरकारच्या दोषपूर्ण कारवाहीवर प्रकाश टाकून सरकारने केलेल्या चांगल्या कार्याची प्रशंसा केली होती. वस्तुस्थितीपूर्ण लिखाण असल्यामुळे सरकारनेही त्यांच्या चांगल्या कार्याची प्रशंसा केली आणि या अहवालाची दखल घेवून उपाययोजना अमंलात आणल्या व इ.स. १८७८ ला दुष्काळाचा अहवाल प्रसिध्द केला. सभेने ही त्रैमासिकात दुष्काळ विषयक शेतक-यांच्या स्थितीवर अनेक लेख प्रसिध्द केले. तसेच शेतक-यांवर लादण्यात आलेल्या दाव्या शेतक-यासंबंधी माहिती सरकारपर्यंत पोहचविण्याचा प्रयत्न केला होता. सरकारी अधिका-यांना मात्र रानडयांचे लेख आवडले नाहीत. त्यांनी माहिती वस्तुस्थितीला सोडून असल्याचा आरोप केला. तेव्हा रानडयांनी "सभेचे कार्यकार अतिशय दक्षतेने आपली माहिती गोळा करतात, तथापि त्यांच्या लिहिण्यात अत्युक्ती असल्यास ती ओढसळ पणाची घोतक समजता, दुष्काळग्रस्तांच्या मताचे ते 'अधिष्कारण आहे असा तिचा अर्थ करावा' मुद्दा न सोडता आरोपाची धार बोथट करण्याचे कौशल्य माधवरावांच्या उत्तरात दिसते"[१७] दुष्काळ संपला तरी दुष्काळा निवारणीचे काम संपले असे त्यांनी कधीच मानले नव्हते या दुष्काळ सारख्या आपत्तीतुन निघणारे निष्कर्ष सरकारपर्यंत कळविण्याचा प्रयत्न केला. Administration in Bombay presidency record मध्ये Reports of the working of the relief act by M.G. Ranade हे अहवाल उपलब्ध आहेत. रानडयांनी शेती संबंधी अनेक लेख त्रैमासिकात लिहिले होते. सामाजिक न्यायाच्या दृष्टीने ग्रामीण विभागाच्या लोकांसाठी रानडयांनी प्रथमच कार्य करुन सरकारला त्याबद्दल हालचाली करण्यात भाग पाडलेले दिसून येते. इ.स. १८७९ मध्ये Deccan Agriculturist Relief Act ब्रिटिश सरकारने संमत केला. हे कार्य म्हणजे इंग्रजांच्या काळात लहान सहान घटना नव्हती. इ.स. १८८१ ला मध्यप्रांतासाठी The Central Provincess land reveneu & Tendency Bill वर आपली प्रतिक्रिया केली नंतर Deccan agriculturist-Relief Act वर चार निबंध लिहिले व त्यात कायद्यांच्या दोषांची चर्चा केली त्याचबरोबर कायद्याचा पध्दती व शेतक-यांना दुर्बाजारीपणा

संस्थानांचा राज्यकारभार, देवस्थानाची व्यवस्था मद्य आदिंयातील प्रश्न इ. विषयावर रैमा तिकातून लिहिले केले"[१६] आर्थिक क्षेत्रातील रानडयाचे विचार परिपूर्ण व वास्तव परिस्थितीशी सुसंगत होते.

कोणतेही कार्य हाताळतांना रानडे आशावादी असत. त्यांचा आशावाद हा दुर्बल माणसाच्या मनोराज्यासारखा नसून हिन्दुस्थानच्या सुक्ष्म अंतर्गत प्रवृत्तीच्या अभ्यासावर आधारलेला होता. परंतु "रानडयाचे विशेष हा की त्यांनी दिलेली कर्तव्याची हाक या झगडयाच्या निर्णयांकडे पाहून दिलेली नव्हती. या प्रयत्नात आपल्याला अपयश येईल, कदाचित अनेक काही होईल, परंतु केवळ प्रयत्नानेही आपले अपरिमित कल्याण होईल, आणि अपयशापासून धडे मिळतील हाच सा-या प्रगतीचा नियम आहे आणि त्यातून आपली तेवढी सुटका व्हावी असे म्हणता येणार नाही"[१७] असे त्याचे मत होते. त्यांनी आपले कार्य आत्मविश्वासाने पूर्ण करण्याचा प्रयत्न केला. निष्काम प्रवृत्तीने केलेल्या कार्याला कधीमधी कधी अपयश आले तरी ते कधी डगले नव्हते.

इ.स. १८७७, जाने. मध्ये ब्रिटिश गव्हर्नर लॉर्ड लिटनने इंग्लंडच्या राणीला दिल्ली दरबारात "हिन्दुस्थानची राणी" हा किताब भव्य समारंभपूर्वक देण्याचा निर्णय घेतला. दुर्दैवाने याच वर्षी भारतामध्ये मोठा दुष्काळ पडला होता. तरीही राणी एम्प्रेससाठी मोठा समारंभ करण्याचे ठरले. इंग्लंडचे पंतप्रधान डिझरायली यांच्या सल्ल्याने लिटनने भारतातील ब्रिटिशाचे राजकीय व व्यापारी साम्राज्य सुदृढ करण्याच्या दृष्टीने ह्या समारंभाला विशेष महत्व देऊन आग्रहाने करण्याचा प्रयत्न केला. त्यात राणीचे महत्व वाढविण्याचा प्रयत्न होता. जाने. १८७७ ला दिल्लीत एक मोठा दरबार भरविण्यात आला. या दिल्ली दरबारात सार्वजनिक सभेचे प्रतिनिधी म्हणून रानडयांनी सार्वजनिक काकांना पाठविले. ते बादीच्या गणवेशात होते. सभेतर्फे राणीला मानपत्र देण्याचे निश्चित करुन रानडयांच्या अध्यक्षतेखाली एक सभा भरवून मसुदा तयार करण्यात आला. रानडयांना या ब्रिटिश साम्राज्यामुळे भारतात राष्ट्रीय भावना निर्माण करण्याचे कार्य सतेच परकिय

सतोविरुद्ध एकत्र येण्याचे अपूर्व कार्य शक्य झाल्यामुळे त्याबद्दल कृतज्ञता व्यक्त करणे आपले कर्तव्य आहे, असे रानड्यांना वाटत होते म्हणून त्यांनी मानपत्र ब्रिटिश साम्राज्ञीला देण्याचा आग्रह धरला मानपत्राचा मजकूर पुढील प्रमाणे होता. "ब्रिटिश राष्ट्राशी समान दर्जा व जबाबदारीने हक्क" हिन्दी राजकारणाची सुधारणा आम्हाला कशी हवी आहे, याचे हे दिग्दर्शन आहे. "साम्राज्ञी" ही पदवी धारण करण्याच्या प्रसंगी, हिन्दी लोकांना नवे राजकीय हक्क देऊन या राष्ट्रातील राज्यसंस्थांनाच्या विकासाच्या नव्या युगाला प्रारंभ करा. हिन्दी लोकांना ब्रिटिश राष्ट्राच्या बरोबरीचा राजकीय व सामाजिक दर्जा प्राप्त करून द्या. आपण "साम्राज्ञी" हा किताब घेतला, ही गोष्ट आम्हास भाविष्यकाळात प्राप्त होणाऱ्या व आपणांशी साठवून ठेवलेल्या आमच्या सुखाच्या ठेव्याचे पूर्वचिन्हच होय असे आम्ही समजतो"[१९]

व्हिक्टोरिया

हे मानपत्र सार्वजनिक काकांनी राणी एलिझाबेथला दिल्यानंतर तेथील सभेतील राजेलोकांना उद्देशून भाषण केले त्यात त्यांनी म्हटले की, "सर्व जातीच्या व धर्मांच्या लोकांचा व त्यांच्या मुखत्यारांचा जमाव होण्याचा जो प्रसंग आला आहे, तो सर्व एकंदर राष्ट्राला फार महत्वाचा आहे आणि पुढे इतिहासात या सर्वांचे ऐक्य होण्यासच काय तर हिन्दुस्थानच्या राष्ट्रीय पुनरुज्जीवनाचा आरंभ झाल्याचा सूचक म्हणून मानला जाईल..... आपण या राष्ट्रातील थोर व प्रतिष्ठ पुरुष आहात तसेच हिन्दुस्थानातील एकत्र राष्ट्राचे पार्लमेंट आहात त्याचप्रमाणे हिन्दुस्थानातील सर्व संस्थानाची व राष्ट्राच्या राजकीय संबंधांची सभाच आहा. तेव्हा आता हा जो जमाव आहे, तो पुढे हिन्दुस्थानचा व इंग्लंडचा कधीही न सुटण्यासारखा संबंध झाल्याच्या योगाने जगामध्ये ज्या गोष्टी होणार आहे त्याचा केवळ प्रारंभ आहे."[२०] अशी कल्पना लोकांसमोर ठेवून काकांनी राजकीय दृष्टया राष्ट्रीय एकात्मते साठी आव्हान केले होते. त्याचप्रमाणे राष्ट्रीय सभेचे बीजारोपण केले होते. त्यानंतर सार्वजनिक सभेने अशाच अर्थाची पत्रे अनेक पुढाऱ्यांना पाठवून राष्ट्रीय सभेची कल्पना मांडली होती. सुरेंद्रनाथ बॅनर्जींनी सुद्धा दिल्ली दरबाराच्या वेळी राष्ट्रीय

सभेची कल्पना सुचली होती, असे म्हटले आहे व लाला लजपतराय यांनीही यंग इंडियामध्ये राष्ट्रीय सभेची कल्पना दिल्ली दरबारामुळे पुढे आली असे म्हटले आहे. सरकारकडे दाद मागण्यासाठी साम्राज्यनिष्ठ सनदशीर राजकारणाची कल्पना ही दिल्ली दरबाराची देणगी मानली पाहिजे. राष्ट्रीय सभेच्या जनकत्वाचा मान यामुळे सार्वजनिक सभेला जातो. अशा प्रकारे सार्वजनिक सभेने केलेल्या कार्याने महाराष्ट्रातच नव्हे तर संपूर्ण भारतामध्ये राजकीय, सामाजिक चैतन्य निर्माण होण्यास मदत झाली होती.

इ.स. १८७०-१८९५ हा काळ महाराष्ट्राच्या राजकीय सामाजिक जीवनात अत्यंत महत्वपूर्ण मानला जातो त्यात इ.स. १८७१-१९०१ हा काळ "रानडे युग" म्हणून प्रसिध्द आहे. या काळात रानडयांनी आपल्या आचार विचारांनी संपूर्ण महाराष्ट्राला प्रभावित केले होते. त्याचे पडसाद संपूर्ण भारतभर उमटले होते. प्रार्थना समाज, सार्वजनिक सभा, वसंत व्याख्यान माला, हेमंत व्याखान माला व कलाकुसरोत्तेजक सभा, वेदशास्त्रोत्तेजक सभा, ग्रंथोत्तेजक मंडळ, डेक्कन सभा, सामाजिक परिषद, राष्ट्रीय सभा, नगर वाचन मंदीर, पुणे रंग हाऊस इ. अनेक संस्थाचे जाळे निर्माण करुन त्यांना नावारुपास आणण्याचे यशस्वी कार्य रानडयांनी केले होते या माध्यमातुन राजकीय सामाजिक चळवळी निर्माण करुन महाराष्ट्रात चैतन्य निर्माण केले. हे सर्व कार्य करतांना मात्र त्यांना आपल्या सरकारी नोकरीचा विसर पडलेला नव्हता. ते ही कार्य निष्ठेने पार पाडले होते. तसेच त्यांचे सार्वजनिक कार्यही कधीच सीमित राहिले नव्हते. लोकांमधील चांगल्या सीमित वृत्तीला प्रोत्साहित करुन त्यांना संघटनात्मक दृष्टीने एकत्रित आणण्याचे कार्य त्यांनी विविध संघटना, चळवळीची निर्मिती करुन यशस्वी रित्या केले. देश व संधी मिळताच प्रत्येक कार्य करण्यास पुढाकार घेत. डॉ. आंबेडकरांच्या शब्दात "ज्ञानाच्या व्याप्तीबाबत, सूक्ष्मतेच्या आवाक्याबाबत आणि दृष्टीच्या टप्प्याबाबत ज्याची रानडयांशी तुलना करता येईल अशी व्यक्ती भारताच्या इतिहासात

दुर्मिळ होय, ज्या विषयाला हात घातला नाही ज्यात प्राविण्य मिळविले नाही असा कुठलाच विषय त्यांनी अस्पर्शी ठेवला नाही"[२१]

इ.स. १८७८ ला लॉर्ड लिटनच्या काळात मुद्रण स्वातंत्र्यावर नियंत्रण आणण्यासाठी व्हर्नाक्युलर प्रेस ॲक्ट" पास केला होता. या कायद्या विरोधी देशभर निषेध नोंदविला गेला. रानडयांनी सार्वजनिक सभे मार्फत निषेध व्यक्त करण्यासाठी सभा बोलविली होती. वृत्तपत्र स्वातंत्र्य हे राष्ट्राच्या विकासासाठी आवश्यक आहे. या मुद्यावर भर देवून सभेने व्हाईसरॉयकडे रानडयांनी तयार केलेला अर्ज पाठविण्यात आला. अर्थात प्रत्यक्ष सभेला सरकारी नोकर असल्याने हजर नसले तरी पडद्या मागची भूमिका घेवून त्यांनी वृत्तपत्र कायदाविरोधात कार्य केले होते सभेमध्ये रानडे हजर होते किंवा नाही याबाबत न.र. फाटक, गोविंद तळवलकर आणि रा.के. लेले यांच्या लिखाणात परस्पर विरोधी विधाने आहेत. पण सरकारी नोकरीमुळे त्यांच्या कार्याला मर्यादा पडत होत्या हे स्पष्ट आहे. तसेच रिपनच्या काळातील प्रमुख गाजलेली घटना, इलबर्ट बिल होय. यामध्ये युरोपियन गुन्हे गारांची चौकशी करण्याचा अधिकार हिन्दी मॅजिस्ट्रेटला द्यावा, अशा आशयाचा कायदा इ.स. १८८३ ला पास करण्यात आला. पण त्याला ॲंग्लो इंडियन वृत्तपत्र व ब्रिटिशांनी विरोध केल्याने हे विधेयक रद्द झाले. पण रिपनचे याबाबत मानवतावादी उदार दृष्टीकोनातुन केलेले प्रयत्न अयशस्वी ठरले होते. रानडयांचा रिपनसारख्या उदारमतवादी गव्हर्नरच्या कार्याला पाठिंबा होता. त्यांच्या इलबर्ट बिलावरील आपली प्रतिक्रिया व्यक्त केली. मुंबईला भारतीय पुढारी वकील, ब्रिटिश अधिकारी यांना डिनरला बोलविले असतांना रिपनबद्दल आपले विचार व्यक्त केले की, हिन्दुस्थानातील ॲंग्लो इंडियन समाज हिन्दी महत्वाकांक्षेचा कधीच पुरस्कार करणार नाहीत, स्वदेशात ब्रिटिशांचे कितीही पक्ष असले तरी भारताच्या बाबतीत सर्वांचा एकच पक्ष आहे तो म्हणजे कॉन्झर्वेटिव पक्ष होय" पुढे रानडे म्हणतात की "We have a format discussion after dinner and no single individual of any nationality objected to the principale of the Bill, though some objections were

urged against some of its details......... But we were all much impressed with the singular ability and moderation with which native gentlemen stated their views. For myself I could not help contasting the fatuity of policy which would alienate or humiliate men of this stamp, so anxious to stand well with us and to tread in our steps, with one which endeavors, in a spirit of magnanimous confidence, to associate them more closely with ourselves and strengthens at the same time their self-respect and their respect for us."[22] या शब्दात त्यांनी रिपनच्या उदारमतवादाबद्दल व अँग्लोइंडियन लोकांबद्दल आपल्या भावना व्यक्त केल्या होत्या. त्यांच्या नेतृत्वात, वक्तृत्वात देशाचे नेतृत्व घेऊन जबाबदारीने, संयमाने विरोध करण्याचे सामर्थ्य होते. आपल्या विशाल व सहानुभूतीपूर्ण दृष्टीने राजकीय क्षेत्रातील विचारांना व्यापक तत्वज्ञानाची बैठक रानड्यांनी ठेवली असल्याने त्यांच्या विचारात समतोलपणा पुरेपूर दिसतो.

इ.स. १९७८-७९ हे वर्ष महाराष्ट्रासाठी रणधुमाळीचे वर्ष ठरले एप्रिल १८७८ ला वासुदेव बळवंत फडक्यांनी ब्रिटीश सत्ते विरुद्ध बंड केले होते. त्यांनी श्रीमंत सावकारांकडे दरोडे घालुन गरीबांची आर्थिक मदत करण्याचा प्रयत्न केला होता. सनदशीर मार्गाने स्वातंत्र्य मिळणार नसल्याची जाणीव होताच त्यांनी रामोशी लोकांना हाताशी घेउन बंड उभारले होते. फडक्यांना ब्रिटिश अधिकाऱ्यांनी पकडुन इ.स. १८७९ ला मृत्युदंडाची शिक्षा न्यायालयाने दिली होती. त्यावेळी सार्वजनिक काकांनी त्यांचे वकीलपत्र घेतले होते. या प्रकरणात रानड्यांचा व फडक्यांचा प्रत्यक्ष संबंध कुठेच आलेला नव्हता. पण टेंपल गव्हर्नरला रानड्यांची फडक्यांना फूस असावी असा संशय वाटत होता. न.र. फाटकांनी आपल्या पुस्तकात "फडक्यांनी स्विकारलेला मार्ग संमत नसला व तिरस्करणीय वाटत असला तरी त्यांची देश भक्ती माधवरावांस सर्वस्वी मान्य

होती"[२३] असे म्हटले आहे. तर गोविंद तळवलकरांनी "फडक्यांवर रानडयांचा अप्रत्यक्ष प्रभाव होता" फडक्यांच्या रोजनिशी मध्ये रानडयांची व्यापार विषयक भाषणं ऐकल्याचा उल्लेख आहे."[२४] असे स्पष्ट केले आहे. या संदर्भात ह्यूमचे चरित्रकार वेडनबर्न या उठावाबद्दल ह्यूमने इंग्रज सरकारला धोक्याचा इशारा केला होता. त्याप्रमाणे दादाभाई नौरोजी ब्रिटीश सरकारला १८८० ला देशाची परिस्थिती नीट हाताळण्याचा इशारा देत होते.[२५] असे स्पष्टीकरण जावडेकरांनी दिले आहे. तर आगरकरांनी ही केसरीतुन महाराष्ट्रातील स्फोटक परिस्थितीची वाहुल देवुन ब्रिटिश सरकारला रचनात्मक राजकारणात हिन्दुस्थानच्या लोकांच्या सहभागाचा आग्रह केला आहे.[२६] असे लिहले. फडक्यांनीही स्वतःच्या वक्तव्यामध्ये इंग्रजाचे राज्य जावुन भारतीयाचे राज्य निर्माण होण्याचे भविष्य वर्तविले होते[२७] या सर्व प्रकरणात मात्र रानडयांबद्दल ब्रिटिश सरकारची खतरजी होवुन त्यांची बदली नाशिकला करण्यात आली होती. व त्यांच्या पुण्याच्या कार्यामध्ये खंड पडला होता. पण फडक्यासारखे क्रांतिकारकांचा विरोध रानडे, आगरकर यांच्या सारखे सुधारक करीत असले तरी त्यांच्या देशभक्तीबद्दल आदर होता. असे वाटते. ह्याच घटनेप्रमाणे पुण्याच्या बुधवार वाडयाला लागलेल्या आगीचा संबंध जोडण्याचा प्रयत्न केला गेला. पण मुंबईचे गव्हर्नर रिचर्ड टेंपल यांचा पुण्याच्या सुधारकांवर विशेष रोष असल्याने प्रत्येक विघातक घटनेशी रानडयांचा संबंध जोडण्याचा प्रयत्न करीत असत. "India In 1880 " या आपल्या पुस्तकातही त्यांनी संशय व्यक्त केला व नंतर धुळ्याला बदली करण्यात आली. पण रानडे मात्र यामुळे विचलित झाले नाहीत. त्यांनी आपले कार्य तसेच सुरु ठेवले.

निवृत्त मॅजिस्ट्रेट ए.ओ. ह्युम यांनी इ.स. १८५७ च्या क्रांतीचा अनुभव घेतल्यामुळे आणि फडक्यांनी केलेल्या विद्रोहामुळे भारतात इंग्रजी साम्राज्याला लोकक्षोभा पासुन वाचविण्यासाठी भारतातील आपली गाऱ्हाणी सरकारपुढे मांडण्याचे व्यासपीठ देण्याचा विचार राष्ट्रीय सभा या माध्यमातुन केला होता. त्यांनी डफरीन बरोबर सल्लामसलत करुन राष्ट्रीय सभेच्या स्थापनेचा उद्देश सडीत

नेला होता. भारतातील राजकीय सामाजिक परिस्थितीची जाणीव असल्याने सामान्य जनतेच्या क्रांती विचारालसुशिक्षित नेतृत्व मिळून ब्रिटिश साम्राज्याला खिळखिळे होण्यापासून वाचविण्यासाठी त्यांनी भारतातील नेमस्त विचारांच्या पुढाऱ्यांना सहभागी करुन इ.स. १८८५ ला राष्ट्रीय सभेची स्थापना केली होती. ही राष्ट्रीय सभा निर्माण होण्यापूर्वीच भारतीय नेते कलकत्याचे उमेशचंद्र बॅनर्जी, सुरेंद्रनाथ बॅनर्जी, आनंद मोहन बोस, मुंबईचे मंगलदास नथूभाई, नौरोजी फर्दुनजी, काशीनाथ तेलंग, विश्वनाथ मांडलीक, फिरोज शहा मेहता, मद्रासचे एस. सुब्रम्हण्यम अय्यंगार, पी.नायडू, पी आनंदाचार्य आणि दादाभाई नौरोजी आणि न्या. रानडे या सर्वांनी इ.स. १८७७ पासून एखादी राष्ट्रीय संस्था स्थापन करण्याच्या उद्देशाने प्रयत्न सुरु ठेवले होते. दिल्ली दरबारात ही कल्पनाही मांडली गेली पण त्याचे प्रयत्न अपुरे पडले. त्यासाठी भारतीय पुढाऱ्यांना ब्रिटिश निमसरकारी प्रतिष्ठित व्यक्ती ए.ओ. ह्युम यांची मदत घ्यावी लागली असे लाला लजपतराय यांनी आपल्या "यंग इंडिया" मध्ये म्हटले होते. ह्युम यांनी पुढाकार घेवून ही कल्पना साकार केल्याने भारतीयांचा त्यांना सागलीच पाठिंबा मिळाला. रानडयांचा राष्ट्रीय सभा निर्मितीस हातभार होताच ह्युमना देखिल भारतीय पुढाऱ्यांच्या सहकार्याची आवश्यकता असल्याने त्यांनी न्या. रानडे यांची भेट पुण्याला इ.स. १८८४-८५ मध्ये घेतली होती. त्यावेळी रानडयांनी एक अराजकीय संघटना निर्माण करावी असा मनोदय बोलुन दाखविला होता. "या संघटनेला "इंडीयन नॅशनल काँग्रेस" हे नावही रानडयांनी सुचविले होते..... ह्युम रानडयांच्या व्यक्तित्वाने प्रभावित झाले होते. रानडे हे एक असामान्य गृहस्थ असुन त्यांच्या मनात सतत आपल्या राष्ट्राचा विचार असे व देशाचे कल्याण कोणत्या मार्गाने होईल याचा सतत विचार करीत असत".[८] असे मत त्यांनी रानडयांबद्दल व्यक्त केले होते. ह्युम रानडयांना गॉड महादेव असे गमतीने म्हणत असत."[२८]

राष्ट्रीय सभेचे पहिले अधिवेशन पुण्याला व्हावे असे रानडे आणि ह्युमना वाटत होते. पण पुण्याला प्लेगची साथ आल्याने पहिली काँग्रेस सभा डिसें१८८५ ला मुंबई येथे भरली. या सभेला रानडे हजर होते. पण ते

निरिक्षक म्हणूनच सरकारी नोकरीच्या मर्यादा त्यांना होत्या. परंतु या अधिवेशनाच्या चर्चेत त्यांनी भाग घेतला होता, असे त्याचे समकालीन रामचंद्र मोरेश्वर साने यांनी आपल्या आठवणीत लिहिले आहे. काँग्रेसची घटना तयार करण्यात आली अधिवेशनातील काही ठरावामध्ये यांचा सहभाग होता. त्यांच्या लिखाण शैलीची छाप या ठरावांमध्ये आढळते. काँग्रेसच्या राजकारणाला वैचारिक व तात्त्विक अधिष्ठान देण्याचे कार्य रानडयांनी केले होते. जनतेला राजकीय हक्कांची जाणीव व राजकीय शिक्षण देण्यासाठी राष्ट्रीय सभा उपयुक्त व्यासपीठ आहे, असे त्यांना वाटत होते. त्यांनी त्रैमासिकातून राजकीय जागृती घडवून आणण्याचा प्रयत्न केला. जास्तीत जास्त सुशिक्षित लोकांचा सहभाग असावा असे त्यांना वाटत होते. त्याच बरोबर राष्ट्रीय काँग्रेसच्या अधिवेशनामध्ये रानडे प्रेक्षक स्मात सहभागी होते. या सभेचे महत्व ते ओळखून होते. "या पहिल्या अधिवेशनात रानडे हजर असले तरी त्यांचा विशेष प्रभाव नव्हता"[२९] असे टकर यांनी आपल्या पुस्तकात म्हटले आहे. या अधिवेशनात चिपळूणकर व तेलंग यांनी काही अडचणी आहेत असे सुचविले होते आणि दुसऱ्या ठरावात प्रांतिक कायदेमंडळाचे अधिकार वाढवावेत अशी सुचना करण्यात आली होती. रानडे १८८५ पासून प्रत्येक अधिवेशनामध्ये उपस्थित होते. पण प्रत्यक्ष चर्चेत त्यांनी कधी भाग घेतला नाही. ते राष्ट्रीय सभेत इ.स. १८९९ पर्यंत हजर होते.

मद्रासमध्ये झालेल्या तिसऱ्या अधिवेशनात रानडयांनी सभेसाठी विषय नियामक समिती बनविण्याची सुचना केली होती. अध्यक्ष बद्रुद्दीन तय्यबजी व ह्युम ह्यांनी ही सुचना उचलून धरली होती. त्या समितीने इ.स. १९०८ पर्यंतच्या सर्व सभेत महत्त्वपूर्ण कार्य केले. इ.स. १९०८ ला ऑल इंडिया काँग्रेस कमिटीची स्थापना करण्यात आली. तेव्हा नियामक समिती रद्द करण्यात आली. राष्ट्रीय सभेची स्थापना झाल्यापासून हिन्दु -मुसलीम यांच्या संबंधाविषयी दोन दृष्टीकोन समोर आले होते. राष्ट्रीय सभेच्या यशामुळे साशंक झालेले ब्रिटिश सरकार मुसलीम समाजाला हाताशी घेण्याचा प्रयत्न करुन हिन्दु मुसलीमांमध्ये

फूट पाडण्याचा प्रयत्न करीत होते. तर सय्यद अहमद हे मुस्लीम जनतेने काँग्रेसमध्ये भाग घेवु नये असा आग्रह धरीत होते, तर बद्रुद्दीन तय्यबजींना मुस्लीम जनतेचा काँग्रेसमध्ये सहभाग आवश्यक वाटत होता. रानडयांनी या दोन मुस्लीम गटांना एकत्रित आणून समझौता करण्याचा प्रयत्न याच मद्रास काँग्रेसमध्ये केला होता. आपल्या एका व्याख्यानात त्यांनी हिन्दु मुस्लीमांना आपल्या संकुचित विचारांना तिलांजली देवुन बंधु भावाने देशात एकसंघ राहण्याची सुचना व आग्रह केला होता. भारत देश एक संघ रहाण्यासाठी धार्मिक संस्थांना राजकारणात स्थान देवु नये असा इशारा केला होता. त्याप्रमाणे त्यांनी सार्वजनिक धार्मिक उत्सवाचाही विरोध केला. टिळकांनी सुरु केलेल्या गणपती उत्सवाच्या धार्मिक स्वरुपाला रानडयांनी विरोध केला होता १८९३-९४ पुण्या मुंबईतील हिन्दु मुस्लीम दंगलीमुळे दोन धर्मातील अविश्वास वाढत चालला होता म्हणून कुठलेही धार्मिक उत्सव सार्वजनिकरित्या साजरे करुन अविश्वासाची दरी वाढून देश दुभंगण्याची भिती त्यांना वाटत होती. भारताच्या विकासासाठी हिन्दु मुसलमानांच्या ऐक्याची आवश्यकता प्रतिपादित करतांना ते म्हणतात की "भुतकाळाच्या उदाहरणावरुन जर काही बोध घ्यावयाचा असेल, तर एक गोष्ट स्पष्ट आहेत की हिन्दु-मुसलमानांचे ऐक्य झाल्याशिवाय, त्या प्रचंड देशात कसलीहीप्रगती होणार नाही. या करिता आपल्यात अकबराच्या अमदानीत उदयास आलेल्या मुख्य सल्लागारांनी व मुत्सद्यांनी सांगितलेल्या मार्गाचे अवलंबन केले पाहिजे व अकबराचा पणतु औरंगजेब याने केलेल्या चुका प्रयत्नपूर्वक टाळल्या पाहिजेत"[30] त्यांचा हा विचार आज १०० वर्षानंतरही उपयुक्त ठरलेला दिसुन येतो. राष्ट्रीय ऐक्यतेची गरज त्यांना जास्त मोठया प्रमाणात देशासाठी आवश्यक वाटत होती.

राष्ट्रीय सभेच्या व्यासपीठावर रानडयांनी गोपाळ कृष्ण गोखले यांना आणून सभेला एक निष्ठावंत नेता मिळवुन दिला. रानडे तरुणांना राष्ट्रीय कार्यासाठी सतत प्रेरणा देत असत. टिळक-आगरकरांनाही त्यांनी प्रोत्साहित केले होते. रानडयांनी इ.स. १८९९ पर्यंतच्या काँग्रेस अधिवेशनाच्या काळात काँग्रेस पुढाऱ्यांना सल्ला देणे मार्गदर्शनाचे प्रोत्साहन देण्याचे कार्य केले होते. आपले राजकीय कार्य सार्वजनिक सभा , डेक्कन सभा द्वारे करीत. त्यांच्या

प्रभावी कार्यामुळे त्यांचे मित्र व वर्तमानपत्रे त्यांना कायदे कौन्सिल मध्ये सरकारी नोकरी सोडून जाण्याचा सल्ला देत पण रानडे आपल्या मर्यादा जाणून असल्याने त्यांनी सक्रीय राजकारणात कधी भाग घेतला नाही. त्यांच्या राजकारणाचे स्वरुप प्रबोधनाचे, समाजाला जागृत करण्याचा, लोकांना संघटीत करण्याचे प्रयत्न करीत होते. सर्व समाजाला दूर करून सोडण्याचा त्यांचाही संकल्प होता. भारताच्या नवराष्ट्राच्या निर्मितीसाठी त्यांना आपले कार्य अत्यावश्यक वाटत होते. त्यांच्या कार्याबद्दल बोलतांना तात्यासाहेब केळकर लिहितात की, "शंभर कँडल पॉवरचा दिवा दिवाण खान्यात लावला तर डोळे दिपण्याइतका प्रकाश पडतो. पण पाण्याला आंधण आणणाऱ्या विजेच्या हिटर मधून एक साधी ठिणगीही निघत नाही. ते आपले काम अदृष्य स्थाने करतो"[३१] याप्रमाणे रानडयांनी राजकारणात सहभाग घेतलेला होता.

१९ व्या शतकात अनेक समाजसुधारणा संघटना निर्माण झाल्या होत्या पण त्या संघटित नव्हत्या. राष्ट्रीय सभेच्या स्थापनेच्या वेळी ह्यूमना रानडेप्रमाणेच या सभेत सामाजिक प्रश्नही हाताळले जावे, त्यावर चर्चा व्हावी असे वाटत होते. पण लॉर्ड डफरीनने त्याला विरोध केला. त्यामुळे राष्ट्रीय सभा पूर्णपणे राजकीय संघटना बनली होती." सुरुवातीला काँग्रेस अधिवेशनात तिसऱ्या दिवशी सामाजिक विषयावर चर्चा झाली होती. रानडे आणि मद्रासचे न्यायाधिश रघुनाथराव बोलल्याचे सभेचे चिटणीस काशीनाथ त्रिंबक यांनी म्हटले आहे. पण त्याच वेळी काही प्रतिनिधींनी त्याला विरोध केला. राजकीय प्रश्नावर संघटित होण्यात अडचणी येतील या मुद्दयावर दादाभाई नौरोजींनी दुसऱ्या अधिवेशनात प्रतिक्रिया व्यक्त केली. आपल्या अध्यक्षीय भाषणांत "राजकीय स्वरुप असलेल्या काँग्रेसने फक्त राजकीय प्रश्न हाताळावेत. सामाजिक प्रश्नांचा विचार करण्याकरीता दुसरी तरतुद करावी नाहीतर राजकीय प्रश्नाकडे दुर्लक्ष होईल व सामाजिक प्रश्नांबाबत पुढाऱ्यांमध्ये दुफळी माजुन काँग्रेस कमकुवत होईल"[३२] असे मत त्यांनी मांडले होते. रानडयांना हे विचार मान्य नव्हते.

त्यांना सामाजिक, राजकीय असे वेगवेगळे सुधारणा विषय मान्य नव्हते. समाजकारण व राजकारण यामध्ये विभाजन केल्यास देश आत्मघाताला बळी पडेल ही भीती त्यांना वाटत होती.[३३] याच काळात आधी राजकीय की सामाजिक हा वाद निर्माण झालेला होता. तेव्हा त्यांनी आपल्या विचारातील समतोलपणा ढळू न देता हा वाद राष्ट्रीय दृष्टया गौण ठरविण्याचा प्रयत्न केला. प्रबोधनाच्या कार्यामध्ये अंतर्गत मत भिन्नतेला स्थान मिळू नये असे त्यांना वाटत होते.

इ.स. १८८७ ला मद्रास येथे काँग्रेसशी संबंधित पण वेगळी स्वतंत्र अशी नवीन एक देशव्यापी संस्था सामाजिक विषयांवर राष्ट्रीय दृष्टीकोनातून चर्चा करण्यासाठी "राष्ट्रीय सामाजिक परिषद" स्थापन करण्यात आली. रानडे हे या संस्थेचे संस्थापक होते. रघुनाथ रावांचे सहाय्य रानडयांना होते. या परिषदेमध्ये विषयांची मर्यादा नव्हती. राष्ट्रसभेचे अधिवेशन संपल्यानंतर, त्याच ठिकाणी त्याच मंडपात परिषदेचे कामकाज चालत असे, औपचारिकरित्या या दोन संघटना वेगवेगळ्या असल्या, तरी एकीचे ठराव बंधनकारक नव्हते. पण दोन्ही संघटनेच्या कार्यामध्ये आस्थेने भाग घेणाऱ्या प्रतिनिधींच्या दृष्टीने वेळ, श्रम, पैसा वाचविणारी व्यवस्था होती. रानडयांना राष्ट्रीयसभेतच देशाचे सामाजिक प्रश्न हाताळले जावे, अशी इच्छा होती. ती त्यांनी सामाजिक परिषद निर्माण करून पूर्ण केली. पण त्याला टिळकांचा विरोध होता, या परिषदेत राजकीय विषयांवरही चर्चा केला जाई.

या परिषदेची रचना राष्ट्रवादावर आधारित होती. हिचे कार्य वर्षभर चालत असे यात धार्मिक विषय घेतले जाणार नाहीत असे स्पष्ट केले होते. "रानडयांनी राष्ट्रीय सभा व सामाजिक परिषदेला दोन भगिनी म्हटले होते या परिषदेचे ध्येय सामान्य मनुष्याचे जीवन चांगले करणे व काँग्रेसचे ध्येय राष्ट्राची प्रगती करणे"[३४] असे म्हटले आहे. सामाजिक परिषदेचे कार्य म्हणजे स्थानिक सुधारणांच्या चळवळींना उत्तेजन देणे, कधीतुन एकदा या चळवळीतील व्यक्तिंनी एकत्र येवुन, परस्परांशी भेटून व स्फुर्ती घेवुन पुढील कामाला लागणे सामाजिक चळवळीसाठी मार्गदर्शक तत्वे निश्चीत करणे हा या परिषदेचे ठराव सुचनेच्या स्वरुपात असतील असे रानडयांनी दुसऱ्या परिषदेत, १९८८ ला स्पष्ट

केले होते. राष्ट्रीय एकात्मता व संघटन वृत्ती निर्माण करण्याच्या दृष्टीने ही परिषद उपयुक्त व महत्वपूर्ण होती. त्याचप्रमाणे देशाच्या सर्वांगिण विकासाच्या दृष्टीने हे एक योग्य पाऊल होते, रानडयांचे राजकारण सावधपणाचे, व्यवहारी व बुध्दिनिष्ठ होते. परंतु या परिषदेच्या कार्याबाबत टिळकांनी टिका केली आहे." या सभेच्या धोरणाशी सहमत नसलेल्या प्रतिनिधींच्या दृष्टीने राष्ट्रसभेच्या मंडपाचा उपयोग सामाजिक परिषदेसाठी करणे गैर होते. सामाजिक बाबी संबंधी टिकाटिप्पणी करण्यासाठी राष्ट्रसभेचा मंडप वापरल्याने राष्ट्रसभे विषयी जनतेच्या मनात दुरावा निर्माण होण्याची शक्यता आहे असे टिळकांनी मराठामध्ये ८ डिसें. १८९५ ला लिहिले होते"[३५] पण रानडयांची भूमिका व कार्य संस्थात्मक स्वरुपाचे असल्योने ते विचारांच्या आदानप्रदानाला व कृतीला जास्त महत्व देत असत. त्यांच्या कृतीमध्ये मवाळपणाला महत्व होते. रानडयांचा स्वभाव शांत व संयमी प्रवृत्तीचा असल्याने त्यांचे कार्य त्यांच्या स्वभावाशी सुसंगतच होते. त्यांचे समकालीन सुधारक ज्योतिबा फुले यांचे कार्य प्रखरवादी स्वरुपाचे असल्याने त्यांनी या परिषदेत सहभाग घेतला नव्हता आगरकर हे बुध्दिवादी असले तरी आक्रमक भूमिका घेणारे असल्याने ते ही या परिषदेपासुन दुर राहिले त्यांनी सक्रिय राजकारण केले नाही रानडयांनी सर्वांचे सहकार्य मिळविण्याचा प्रयत्न केला होता. गोखल्यांनी रानडयांना मदत करुन, प्रांतीय सामाजिक परिषदा स्थापन करुन, या परिषदेच्या कार्याला गती देण्याचा प्रयत्न करण्यात यश मिळविले. रानडयांनी आपले कार्य देशव्यापी करण्याचा प्रयत्न केला होता. हे मान्य करावे लागेल.

सार्वजनिक सभा टिळकांच्या हातात गेल्या नंतर रानडयांनी निराश न होता पुण्यात एक नवीन राजकीय संस्था "डेक्कन सभा" या नावाने इ.स. १८९६ ला स्थापन केली. या सभेत सुरवातीला एकशेएक नागरिक उपस्थित होते. ही सभा किबे वाडयात भरविण्यात आली होती. रानडयांनी या संस्थेची ध्येय धोरणे स्पष्ट करणारा जाहिरनामा काढलेला होता. या

जाहिरनाम्यात" ही सभा नेमस्त व लिबरल लोकमताचे प्रतिनिधित्व करील" या तत्वावर भर दिला होता. माणसा माणसांमध्ये न्यायाचे संबंध प्रस्थापित करणाऱ्या सर्व कार्यावर दृढ निष्ठा ठेवून "कायद्याच्या राज्याच्या तत्वानुसार प्रजेच्या हक्कासाठी प्रयत्नशील राहण्याचे तत्व अंगिकृत करुन "जे अशक्य आहे, या जी उद्दिष्ठे अतिदूरच्या भविष्यातच साध्य होण्यासारखी आहेत, ती साध्य करण्याची व्यर्थ आकांक्षा न बाळगण्याचे पथ्य नेमस्तांना बंधनकारक आहे. मात्र सर्व गोष्टींच्या वाढविकासाची स्वाभाविक, नैसर्गिक प्रक्रिया असते. त्या प्रक्रियेतील पुढचे पाऊल टाकता यावे म्हणून नेमस्त व्यक्ती निरंतर प्रयत्नशील राहील. न्यायबुध्दी बाळगून समन्वयी वृत्तीने स्वतःच्या आवाक्यातले, हातासी असलेले जे कोणते काम असेल, ते नेमस्त करीत राहतील"[३६] असे स्पष्ट केले आहे.

सार्वजनिक सभा रानडे नसल्यामुळे निष्प्रभ झाली होती. टिळकांशी संघर्ष नको या उद्देशाने रानडयांनी राजकीय जागृतीचे कार्य करण्यासाठी डेक्कन सभा स्थापन केली पण ही सभा सार्वजनिक सभे प्रमाणे भरीव कार्य करू शकली नाही. या सभेचे राजकारण साधुगिरीचे व नेमस्त पणाचे असल्याने नवीन पिढीवर त्या सभेचा विशेष प्रभाव पडला नाही. रानडे असे पर्यंत मात्र ही सभा कृतीशील होती पण त्यांच्यानंतर निष्क्रीय बनली. गोखल्यांनी इ.स. १९०८ ला या सभेला सक्रीय करण्याचा प्रयत्न केला पण त्यात यश मिळाले नाही.

रानडयांनी राजकारणामध्ये उदारमतवादाचा अवलंब केला होता. नवराष्ट्राची उभारणी ब्रिटिशांच्या सत्तान्तरानंतर करायची होती. त्यांनी ब्रिटिशांचे राज्य "दैवी संकेत" म्हणून मान्य केले असले तरी भारत ब्रिटिशांच्याच अधिपत्याखाली कायम राहावा, असे म्हटले नव्हते. त्यांच्या आगमनाने भारतात उदयाला आलेले नव चैतन्य शिक्षणाच्या स्थाने आपली अस्मिता जागृत होवू शकली, याबद्दल ते ब्रिटिशांचे आभार मानतात व आपल्यातील

कमतरता, त्रुटी ओळखून व वस्तुस्थितीकडे लक्ष देवून आपले राज्य स्वतंत्र करण्यासाठी राजकीय, सामाजिक जागृतीला महत्व देतात स्वतःमध्ये राज्य करण्याची योग्यता निर्माण करून आले दोष दूर करून, राज्य आपल्या हातात घेण्यावर भर देतात, भारतासारख्या अप्रगत देशात सर्वसामान्य लोकांना राजकीय, आर्थिक सुधारणेची तत्वे पटवून देऊन ती आचरणात आणण्यात बराच वेळ लागेल हे माहित असतांना सुध्दा उदास न होता लोकांच्या न्यायबुध्दीवर विश्वास ठेवून सुधारणा घडवून आणण्याचा मार्ग त्यांनी पत्करला होता. त्यांना जगातील सर्व राष्ट्रामध्ये भारताने स्वबळावर मानाचे स्थान मिळवावे, असे वाटत होते. रानड्यांच्या राजकीय कार्याचा विचार करतांना त्यांना स्पष्ट भारताचे स्वातंत्र्य अभिप्रेत होतेच पण त्याही पुढे जाऊन एका नवराष्ट्राची उभारणी करायची होती" केव्हा ना केव्हा तरी ब्रिटिश सत्तेचा शेवट हिन्दुस्थानात होणार व हिन्दुस्थानातील लोक स्वायत्त समाजाचे जीवन जगु लागतील व त्यासाठी सत्तान्तर आवश्यक आहे हे त्यांनी स्पष्ट केले होते. त्यांना राजकीय क्रांती नको होती. राजकीय क्रांती स्वातंत्र्य देवु शकत असली तरी नव समाज किंवा नवराष्ट्र निर्मितीसाठी त्या क्रांतीचा उपयोग क्वचितच होतो. त्यांच्या उज्वल हिन्दुस्थानच्या स्वप्नात दुष्काळ दारिद्र्य जबरदस्ती ह्या गोष्टी भुतकाळातील घटना ठेवून एक नव युग निर्माण करायचे होते. त्यांना स्वतंत्र हिन्दुस्थान हा समृध्द आणि सर्वांना न्याय देणारा पाहिजे होता.

रानड्यांचा देशाच्या उज्वल भविष्याविषयीचा आशावाद हा बुध्दिनिष्ठ आणि सकारात्मक स्वरुपाचा होता. त्याचे राजकीय व आर्थिक तत्वज्ञान, त्यांच्या सर्वकष सुधारणे मधीलच एक भाग होता. भारताच्या राज्यव्यवस्थेचे स्वरुप कोणत्या स्वरुपाचे असावे याबाबत रानडे याचे मत जाणणे आवश्यक आहे. ते एका लेखात म्हणतात की," If there is one point More than another which strikes every student of British Indian Administration in this country, it is its incapacity

to realise to itself fact that the institutions of a country can never be permanently or even for a long time out of harmony with its intelligence, social advance and economic conditions, without producing demoralising consequences. The deffering conditions of national development in various provinces in India are too often ignored and set aside to make room for a uniform administration. One code, one Law, one measure, the same taxation, the same routine forms, a foundness for uniformity is an end in itself, this is the besetting sin of administration. This mischief is aggravated by alterations of policy, which alike err in exaggerating the action of Government out of accord with the contemporary wants and aspirations of the people. The change when it comes is too late, and has such a violent swing, that for from curing the mischief already accomplished, it leads to fresh and great troubles and further demoralisation, setting class aggainst class destroying the best elements of national life and growth and stimulating the worst instincts."[37] रानड्यांची वरील मते आजच्या राजकारणात राष्ट्राचे अस्तित्व सुरक्षित ठेवण्यात आवश्यक असल्याचे जाणवते. भारतात प्रासंगिक सनदशीर राजकारणाचा पाया घालण्याचे कार्य न्या. रानड्यांनी केले. ते संघटित राजकारणातील कार्यकर्ते आणि व्यवहारिक मुत्सदी होते. त्यांनी आपले राजकीय धोरण इंग्लंडच्या लिबरल पक्षाच्या अनुरोधाने आखले असले तरी भारतात लिबरल पक्ष रानड्यांच्या मृत्युनंतर अस्तित्वात आला होता. रानडे यांचे राजकीय कार्य त्यांच्या

स्वभावाशी मिळते जुळते होते त्याच प्रमाणे भारतात नवराष्ट्राची उभारणी करण्यासाठी त्यांनी निश्चीत केलेल्या मार्गाशी सुसंगत होते. त्यांच्या राजकीय कार्याचा वारसा गोखल्यांनी चालविला होता व राजकारण पुढे नेले. त्यानंतर गांधीनी गोखल्यांना आपले गुरु मानून रानडयांच्या नेमस्त राजकारणाचे क्षेत्र व्यापक बनविले.

रानडयांनी राजकीय विचारांबरोबरच आर्थिक विचारही सखोल मुलगामी स्वरुपात प्रगट केलेले दिसुन येतात. रानडयांनी ब्रिटिश सरकारने मर्यादित स्वरुपात सत्तेचा वापर करुन राज्य सरकारला अधिकार देवुन आर्थिक क्षेत्रातील नियंत्रण कमी केले तर भारताच्या अर्थकारणाचा विचार करतांना त्यांनी देशाचा विकास होऊ शकेल असा आशावाद प्रगट केला होता.

भारतातील शेती, आयात-निर्यात, व्यापार, उद्योग धंद्याची वाढ व स्वदेशीचा पुरस्कार इ. विषयी विचार आपल्या लिखाणात मांडलेले आहे. भारताचा आर्थिक प्रश्न हा शेती व्यवसायाशी निगडित आहे हे रानडयांना माहित असल्याने त्यांनी शेती-व्यवसाय फायदेशीर कसा होईल याचा प्रामुख्याने विचार, आपल्या ग्रंथात केलेला आहे. त्याच प्रमाणे ब्रिटिश व्यापारी धोरणामुळे देशाचे आर्थिक नुकसान आणि पतन कशाप्रकारे होत आहे, याचे ही विवेचन त्यांनी केले आहे. रानडयांनी सामाजिक व्यवस्था व अर्थव्यवस्था हया एकमेकांना पूरक आहेत असे म्हटले, कारण त्यांचा राष्ट्राकडे पाहण्याचा दृष्टीकोन व्यक्ती प्रधान नसुन समाज प्रधान होता, अर्थशास्त्र हे एका अर्थाने"समाजशास्त्र आहे" हयाचे स्पष्टीकरण करतांना ते म्हणतात की, "राजकारण व समाजशास्त्र यांच्या बाबतीत स्थळ, काळ आणि परिस्थिती माणसांच्या नैसर्गिक शक्ती व प्रवृत्ती, त्यांच्या सवयी व चालीरीती, त्यांची समाजव्यवस्था व कायदे कानु आणि त्यांचा पुर्व इतिहास या सर्वांचा विचार करावा लागतो. हे जर खरे, तर आपल्या जीवनाच्या आर्थिक बाजुचा विचार करीत असतांना मात्र, एकाच प्रकारची तत्वप्रणाली सर्व काळी, सर्व स्थळी आणि संस्कृतीच्या सा-याच अवस्थांतुन उपयुक्त मानली जावी हे आश्चर्य कारक

नव्हे काय ?"[३८]

सामाजिक दृष्टिकोनातून आर्थिक प्रश्नांचा विचार करतांना वर्ग, समाज राष्ट्र यांना यथोचित स्थान देण्याचा प्रयत्न त्यांनी आपल्या विचारांमध्ये केल्यामुळे रानडे भारतीय अर्थशास्त्रीचे पहिले द्रष्टे विचारवंत ठरले आहे. कुटुंबापासून राष्ट्रापर्यंत उत्तरोत्तर व्यापक होत जाणाऱ्या सामाजिक संघटनांचे महत्व लक्षात घेवून सरकारने आपले आर्थिक क्षेत्र व्यापक स्वरुपाचे ठेवावे. पण ते आर्थिक तत्व समाजाला उपयुक्त ठरतील किंवा नाही याचाही विचार केला जावा असे रानडे यांचे मत होते. राष्ट्रीय दृष्टिकोनातून अर्थशास्त्राचे विवेचन करतांना ते लिहितात की, "आधुनिक विचारसरणी समष्टिवादाकडे झुकू लागली आहे. व्यक्ती आणि तिचे संबंध हा अर्थशास्त्रीय विचारांचा मध्यबिंदू नसून, ज्या समाजाचा व्यक्ती ही घटक आहे, तो समाज त्याचे खरे केंद्र होय. याकरिता आपले तत्व विचार केवळ कल्पनेमध्येच खरा न राहावा म्हणून व्यक्तीचे हितसंबंध विशेष लक्षात न घेता, त्या व्यक्तीची समाजविषयक कर्तव्ये, समाजाचे संरक्षण व हित, सामाजिक शिस्त व शिक्षण ह्या गोष्टी ही विचारात घ्यावयात हव्यात."[३९] रानडयांना युरोपातील दोनशे वर्षांच्या अर्थशास्त्रीय विचारांचा आढावा घेवून त्यांनी भारतीय अर्थव्यवस्थेचे परिस्थिती नुसार विश्लेषण केले आहे.

रानडे यांनी आपले आर्थिक विचार वेळोवेळी दिलेल्या व्याख्यानातून व लेखनातूनसुद्धा स्पष्ट केले आहे. डिसें. १८७२ ला त्यांनी स्वदेशी व्यापारावर व्याख्यान दिले त्यात ते म्हणतात की, "इंग्रज सरकार व व्यापारी हिन्दुस्थानातल्या संपत्तीचे शोषण करीत आहे. प्रजेकडून मिळणाऱ्या उत्पन्नाचा १/३ भाग म्हणजे १६ कोटी रुपये दरसाल अविच्छिन्न विलायतेस जातात. परदेशी कच्चा माल जातो व त्यामानाने पक्का माल कमी येतो. त्यामुळे हिन्दी कारागिरांच्या कौशल्याचा क्षय होत असून, सर्वांची प्रवृत्ती विलायती जिनसांकडे दिवसें दिवस वाढत चालल्यामुळे, स्वदेशी जिनसांचा क्रय संसाराच्या कामात फारच कमी होत आहे. त्यामुळे हिन्दी व्यापाराची दशा शोचनीय झाली आहे. कोणत्याही देशाचा आर्थिक प्रकृती चांगली

असण्यासाठी, आयात-निर्यात मालात संतुलन असणे आवश्यक असते..... याही परिस्थितीत आपल्याला थोडेफार कार्य करता येईल व ते कार्य म्हणजे देशात कारखाने काढून विलायती मालाच्या खपाची पिछेहाट करणे, पण त्यासाठी भांडवलाची जरूरी आहे. हे भांडवल कसे जमा करावयाचे हा मुख्य प्रश्न आहे..... येथे विलायतेची बरात सांभाळून जे सोने-रुपे देशात येते, ते या देशात आले म्हणजे निम्मे सरकारी टाकसाळीत नाणे, बनते व बाकी निम्मे देशातच मुरते. म्हणजे भुईत गडते. लोक आपल्या बायका मुलांच्या अंगावर त्याचे दागिने बनवून ते सोनेरुपे, तापलेली जमीन पाणी शोषून घेते, त्याप्रमाणे अंगावर जिरवितात. त्यास एकदा दागिन्याचे रूप पावले म्हणजे व्यापाराचे कामी त्यांचा तादृश उपयोग होत नाही. आपल्या सारख्या दरिद्री देशात, परदेशस्थ लोकांच्या अमंलामुळे व आपल्या गैरसमजुतीच्या वर्तनामुळे दरसाल २५ कोटीची नागवण होत आहे, याचा सर्वत्रांनी आपल्या योग्यतेप्रमाणे विचार करावा.[४०] अशा प्रकारे देशाच्या आर्थिक दुरव्यवस्थेचे वर्णन करून त्यांनी लोकांना जागे करण्याचा प्रयत्न केला व पुढे आशावाद प्रगट केला की, "भारताला यापूर्वीही अशाच, किंबहुना यापेक्षाही जास्त बिकट परिस्थितीतून जावे लागले आहे व त्यातून तो बाहेर पडला. त्याप्रमाणे इतक्या ओझ्यानिशी व या वेढ्यातूनही आपली सुटका होईल, या गोष्टींची सर्वांनी खात्री बाळगावी," या आपल्या भाषणात त्यांनी फ्रान्सच्या उद्यमशीलतेचे उदाहरण दिले. जर्मनी फ्रान्समधील झालेल्या युद्धानंतर आर्थिक परिस्थिती सुधारण्यासाठी फ्रान्सने केलेल्या प्रयत्नांचा पाठपुरावा केल्यास आपण ही आपली अर्थ व्यवस्था सुधारू शकतो असा त्यांना विश्वास वाटत होता. रानडयांनी भारतातील औद्योगिकरणावरही आपले विचार मांडले होते. भारताचा मुलभूत आर्थिक प्रश्न दारिद्र्याचा होता. दरिद्री राष्ट्रामध्ये सुसंस्कृत जीवनाचा विकास होणे अशक्य असते हे रानडयांना माहित असल्याने त्यांनी दारिद्र्याच्या मुळ कारणावर विशेष लक्ष दिले. दारिद्र्याचे मुळ कारण भारतातील शेती व्यवसाय होय. शेती व्यवसायावर फार मोठ्या

प्रमाणात भारतीय समाज अवलंबुन असल्याने त्याचप्रमाणे हा शेतीव्यवसाय पावसावर अवलंबुन असल्याने भारताची आर्थिक प्रगती खुंटलेली आहे. या शिवाय व्यापार हा ब्रिटिश व्यापाऱ्यांच्या हातात गेल्याने भारताची दरिद्रावस्था वाढलेली आहे. तेव्हा आर्थिक प्रगतीसाठी शेती व्यवसायाबरोबर औद्योगिकरणावर भर देणे आवश्यक आहे असे रानडयांना वाटत होते. हे विचार त्यांनी इ.स. १८९१ मध्ये लिहिलेल्या लेखात व्यक्त केले आहे.[४१] याबद्दल रानडयांचे विचार कर्वे आपल्या शब्दात व्यक्त करतांना लिहितात की, "हिन्दुस्थानच्या दारिद्र्याच्या प्रश्नाकडे ऐतिहासिक दृष्टिने व निःपक्षपातीपणाने पाहत असता, अपल्या आपल्या आर्थिक जीवनावर राजकीय घडामोडी पेक्षा आपल्या समाजाच्या विशिष्ट औद्योगिक घटनेमुळेच अधिक दूरगामी परिणाम घडुन आल्याचे रानडयांना दिसुन आले. कितीही प्रमाणात राजकीय सुधारणा घडवुन आणालो तरी, औद्योगिक घटनेकडे योग्य तऱ्हेने लक्ष पुरवुन त्यात उचित असे परिवर्तन घडवुन आणल्या शिवाय दारिद्र्यातुन आपण मुक्त होणे शक्य नाही"[४२] रानडयांना राजकीय गुलामगिरी देशासाठी सुसह्य वाटत असली तरी आर्थिक गुलामगिरी देशासाठी घातक वाटत होती.

रानडयांना औद्योगिक परावलंबनामुळे देशाच्या आर्थिक हानी बद्दल वाईट वाटत होते. उद्योगाच्या विकासासाठी बचत करुन भांडवल गोळा केले पाहिजे, त्याच प्रमाणे औद्योगिकरणासाठी तांत्रिक शिक्षण महत्वाचे आहे. त्यासाठी वैज्ञानिक संशोधनाची आवश्यकता आहे, असे रानडयांना वाटत होते. त्यांनी जमशेटजी टाटा यांच्याशी विचार विनिमय करुन तांत्रिक शिक्षणाची संस्था आणि वैज्ञानिक संशोधनासाठी एक संस्था निर्माण करण्याचे ठरविले होते. पण दुदैवाने त्यांची योजना अमलांत येण्यापुर्वीच त्यांचे निधन झाले.[४३] रानडयांनी आपल्या अर्थविषयक विचारांना मुर्त स्वरुप देण्यासाठी व लोकांना त्यासाठी सक्रिय करण्याचा प्रयत्न केला होता. ठिकठिकाणी व्याख्याने देवुन लोकांना आर्थिक शिक्षण देण्याचा प्रयत्न केला. इ.स. १९८८ ला नाशका एक व्याख्यान दिले त्याच प्रमाणे इ.स. १८९०

मध्ये पुण्यात भरलेल्या औद्योगिक परिषदेतही भाषण केले होते. याच वर्षी त्यांनी इंडस्ट्रीयल असोसिएशन ऑफी वेस्टर्न इंडिया ही संस्था स्थापन केली. इ.स. १८९२ ला डेक्कन कॉलेज मध्ये "हिन्दी अर्थशास्त्र" हा निबंध वाचला. औद्योगिक परिषदेच्या प्रसंगाने त्यांनी अर्थविषयक अनेक लेख लिहिले. हे सर्व लेख त्यांच्या "Essays on Indian Economics " या ग्रंथात समाविष्ट केलेले आहेत.

रानड्यांना निकोप सामाजिक व राष्ट्रीय जीवन निर्माण होण्यासाठी देशाच्या अर्थव्यवस्थेला आधुनिक स्वरूप देण्याचे कार्य महत्वपूर्ण वाटत असल्यामुळे, सरकारने विरोध जरी केला तरी ते कार्य प्रयत्नपूर्वक केले पाहिजे, असा त्यांचा आग्रह होता. ब्रिटिशांच्या औद्योगिक प्रभुत्वाचा दुःपरिणाम सांगून उद्योगासाठी सामाजिक भांडवल मंडळ स्थापन करण्याचा सल्ला सरकारला दिला आहे. रानड्यांची आर्थिक भूमिका राष्ट्रीय समाजवादी होती.

रानड्यांच्या आर्थिक विचारांचा आढावा घेतांना आचार्य दांडेकरांनी म्हटले की, रानडे यांची आर्थिक विचारसरणी निर्दोष नव्हती" याबद्दल विश्लेषण करतांना त्यांनी दादाभाई नौरोजी व रानडे यांच्या आर्थिक विचारसरणीतील फरक स्पष्ट केला. रानडे यांच्या आर्थिक विचारांवर दादाभाईंच्या विचारांचा प्रभाव असला तरी हा फरक स्पष्टपणे जाणवतो. दादाभाईंच्या प्रत्येक भाषणात आणि लेखनात हिन्दुस्थानची आर्थिक लूट आणि तिची राजकीय कारणे यावरच सर्व भर देवून त्यांनी सामाजिक व औद्योगिक सुधारणेच्या प्रश्नांना दिलेले गौणत्व स्पष्ट दिसते. तसेच हिन्दुस्थानच्या भीषण दारिद्र्यातुन उद्भवणाऱ्या भावी क्रांतीची पूर्व सुचना देऊन, राज्यकर्त्यांना व जनतेला जागृत करण्याचा त्यांचा सतत रोख्ही रानड्यांच्या विचारांच्या एकंदर वृत्तीशी थोडा विसंगत वाटत होता. रानड्यां सारख्या विचारांच्या लोकांना, दादाभाई हे जहाल वाटत असत. दादाभाईंच्या विचारांचा सरळ निष्कर्ष असवे दारिद्र्य नष्ट होण्यास आधी

स्वराज्य मिळाले पाहिजे असा निघतो. त्यामुळे ब्रिटिश राज्य पध्दतीत बदल झाला नाही, तो पर्यंत औद्योगिक सुधारणा शक्य नाही असे ठरुन, एक प्रकारचा नैराश्य वाद पसरतो असे न्यायमूर्तींना वाटे.[४४] या संदर्भात जावडेकरांना आगरकरांचे विचार जास्त महत्वपूर्ण वाटतात. ब्रिटिशांनी साम्राज्याबरोबरच व्यापार, अर्थव्यवस्था आपल्या हातात ठेवल्यामुळे निरुद्योगामुळे भारताच्या दारिद्र्यात भर पडली. पण हे उद्योगधंदे, व्यापार राज्याप्रमाणेच त्यांच्या हाती आम्ही दिले आहेत. तेव्हा आता जसे स्वराज्य मिळविण्यासाठी आम्ही झटपट करीत आहोत तसेच उद्योगधंदे, व्यापार इ. आपल्या हातात नियंत्रित करण्यासाठी प्रयत्न केले पाहिजे, आपले राजकीय व आर्थिक प्रश्न एकमेकांशी संलग्न आहेत याचे स्पष्टीकरण देतांना पुढे आगरकर म्हणतात की," व्यापार धंद्याच्या संबंधाने आम्हास आमच्या सरकारशी विशेष राजरोसपणे भांडता येते. तथापि हे भांडण घालीत असता ही गोष्ट ध्यानात ठेवली पाहिजे की, अतिभौतिक दृष्टया इंग्रज लोकांस हिन्दुस्थानच्या राज्यापेक्षा हिन्दुस्थानशी व हिन्दुस्थान हाती असल्यामुळे सर्व आशिया खंडाशी करता येत असलेल्या व्यापारापासून अधिक फायदा होत आहे. तेव्हा जर आम्ही आपल्या व्यापाराचे पुनरुज्जीवन मनापासुन करु लागलो, तर त्यांना उघडपणे प्रत्यवाद करता येणार नाही". पुढे ते भारतीय अर्थशास्त्रज्ञांच्या विचाराचे विश्लेषण करतांना म्हणतात की,"आमच्या व्यापारात व शेतकीत अर्थशास्त्राचे उल्लंघन न करता, कोणत्या रीतीने मदत करता येईल, याची चिकित्सा मि. जस्टीस तेलंग, रा.ब. रानडे, दादाभाई नौरोजी वगैरे अनुभविक, शास्त्रज्ञ व विचारी गृहस्थांनी केला आहे पण तिचा उपयोग काय ? निजलेल्यास जागे करणे शक्य आहे. पण जाग्यास जागे कोण करु शकेल ? इंग्लिश लोकांच्या मनोधर्मात एकाएकी प्रचंड क्रांती झाल्याशिवाय, त्यांच्या अंतःकरणात जपान किंवा युनायटेड स्टेटस् येथील सरकाराप्रमाणे आमच्या व्यापार वृध्दीविषयी कळकळ उत्पन्न होईल, अशी आशा करणे व्यर्थ आहे."[४५] रानडे यांनी कुठल्याही प्रकारच्या

संघर्षाला किंवा क्रांतीला उपयुक्त मानले नव्हते. त्यांच्या विचारतत्वात विचार संघर्षाला मुद्दा स्थान नव्हते. त्यांच्या विचारसरणीमुळे नेमस्तवाद जन्माला आला तर दादाभाईंच्या विचारसरणीमुळे जहाल राष्ट्रवाद जन्माला आला असे जावडेकराचे म्हणणे होते. पण नलिनी पंडित यांनी रानडयांना हिन्दी अर्थशास्त्राचे जनक मानले आहे. रानडयांना दादाभाई नौरोजींच्या विचारातील तथ्यांश मान्य होता असे त्यांनी म्हटले आहे. पण भारतीय हिताकरीता ब्रिटिश सरकारने आर्थिक धोरण राबवावे हा विचार प्रामुख्याने रानडयांनी मांडला होता. असे पंडितांनी स्पष्ट केले आहे."[४६]

रानडे यांचे आर्थिक धोरण हे त्यांच्या विशाल समाजसुधारणेचा एक भाग होता. आर्थिक विचारांबाबत रानडयांचे द्रष्टेपण दिसून येते. त्यांनी अर्थविषयक विचार सार्वजनिक सभेच्या त्रैमासिकातूनही लिहिले होते. रानडयांना राजकीय सुधारणेच्या मागणीसाठी स्थापन झालेल्या राष्ट्रीय सभे बरोबर सामाजिक परिषदेचे अधिवेशन आणि औद्योगिक परिषद भरविली गेली तर भारतातील राजकीय, सामाजिक, आर्थिक विषयांवरील प्रश्नांवर एकत्रितपणे विचार होवून तिन्ही आघाडयांवर भारताची प्रगती होऊ शकेल. पण त्यांचा हा विचार राजकीय पुढाऱ्यांनी उचलून धरलेला नव्हता. रानडे यांनी आपल्या लेखनद्वारे प्रेरक मार्गदर्शन आणि संघटनात्मक कार्य आर्थिक क्षेत्रात केले "सह्याद्रि" मासिकाच्या रानडे विशेषांकात प्रा. वा.गो. काळे म्हणतात की, "रानडे यांनी आर्थिक विचारात व कार्यात राष्ट्रीय व व्यवहारिक धोरण साधले, म्हणूनच रानडे भारतीय अर्थशास्त्राचा पाया घालणारे पहिले विचारवंत व सुधारक ठरतात. याच मासिकातील दुसऱ्या लेखात प्रा. धनंजय गाडगीळ म्हणतात की, " रानडे यांना एका विशिष्ट क्षेत्रात सुधारणा झाल्याशिवाय इतर क्षेत्रात सुधारणा होऊ नये हे मान्य नव्हते. सुधारणा सर्वकष असते ह्या त्यांच्या भूमिकेतुन त्यांनी केवळ राजकीय सत्तेचे हस्तांतर करून हिन्दुस्थानातील दारिद्र्याचा प्रश्न सुटणार नाही हे त्याचे भकीत आज दुर्दैवाने

खरे ठरलेले दिसते. रानड्यांनी जरी ब्रिटिश साम्राज्याचे स्वागत केले असले तरी त्यांना त्या राज्याचे चांगले गुण मान्य होते. पण त्या सरकारचे आर्थिक धोरण देशहिताच्या दृष्टीने धोकादायक वाटत होते. म्हणून त्यांनी ब्रिटिश सरकारच्या प्रतिकूल धोरणावर टिका केली आहे. याच मासिकातील एका लेखात पी.के. गोपालकृष्णन म्हणतात की, "हिन्दुस्थानातील रानडे हे पहिले अर्थशास्त्रज्ञ आहेत की ज्यांनी हिन्दुस्थानच्या आर्थिक प्रगतीसाठी कोणत्या बाबी आवश्यक आहेत हे दाखवून दिले आहे. त्याप्रमाणे आपल्या प्रगतीसाठी कोणते पर्याय हिन्दुस्थानात शक्य आहेत हे ही दाखविले. रानडे हे एक मोठे शास्त्रीयदृष्ट्या विचार करणारे आद्य प्रवर्तक होते. हे खरे आहे की, त्यांनी अनेक प्रश्नांची उत्तरे दिली नाहीत, तरी पण ते प्रश्न कसे सोडवावेत याबद्दल दिग्दर्शन केले आहे. म्हणूनच आर्थिक विकासाच्या प्रश्नांचा विचार करणाऱ्या आधुनिक अर्थशास्त्राचे ते संस्थापक होते"[५७] (सह्याद्रि रानडे विशेषांक, जाने १९४२).

रानड्यांनी जे सनदशीर राजकारण केले ते वर वर पाहिले असता ब्रिटिश साम्राज्यासारखे वाटत असले तरी राजनिष्ठा व सनदशीर राजकारण यात फरक आहे. त्यांनी आपल्या नोकरी विषयी राजनिष्ठा ठेवली असली तरी राजकारण मात्र एक भारतीय राष्ट्रनिष्ठ व्यक्ती म्हणून देशाच्या कल्याणकारी दृष्टिनेच केले होते. हे राजकारण करतांना भारतीयांना काय आवश्यक आहे याची जाणीव ठेवून त्यांनी राजकीय व आर्थिक धोरणाचा पाठपुरावा केला होता. थुक्तपणे, संयमाने देशाचे नेतृत्व केले होते. त्यांचे कार्य आधुनिक भारत निर्माण होण्याच्या दृष्टीने महत्वपूर्ण मानले जाते. रानड्यांना राजकीय किंवा आर्थिक क्षेत्रात कसलीही महत्वाची प्रगती करण्यास देशाकरीता तीन गोष्टींची गरज वाटत होती, म्हणजे "ऐक्य भावनेची संघटना आणि स्वावलंबनाची", व्यापक राष्ट्रीय ऐक्य हे त्यांचे ध्येय होते. त्यासाठी दीर्घ कालपर्यंत आणि सतत लढा देण्यासाठी आवश्यक असलेल्या गुणांची वाढ योग्य अशा सामाजिक, शैक्षणिक व्यवस्थेच्या योगाने होऊ शकेल असा रानड्यांना विश्वास वाटत होता.

## ब) आगरकरांचे राजकीय आणि आर्थिक विचार

आगरकरांनी आपले सामाजिक सुधारणेचे कार्य महाराष्ट्रापर्यंत मर्यादित ठेवले असले तरी ते राष्ट्रीय वृत्तीचे निष्ठावान विचारवंत होते. त्यांनी सामाजिक संक्रमणामध्ये राजकीय व आर्थिक सुधारणेला तेवढेच महत्व दिले होते. कारण समाजसुधारणा ही राजकीय, आर्थिक, धार्मिक समाजजीवनाशी संबंधीत आहे, असे त्यांना वाटत होते. म्हणून त्यांनी राष्ट्रीय पुनरुत्थानाच्या चळवळीमध्ये सर्वांगिण सुधारणेचा पुरस्कार केला होता. त्यांच्या राजकीय विचारांवर मिलच्या "लिबर्टी" या ग्रंथाचा सखोल परिणाम झालेला होता. त्याच प्रमाणे इग्लंडमधील उदारमतवादी विचारसरणीचाही प्रभाव त्यांच्यावर पडलेला होता. आगरकरांचे राजकीय विचार त्यांच्या सामाजिक व धार्मिक विचारांप्रमाणे स्पेन्सर प्रणित विकास वादाच्या तत्वावर आधारित होते. मिलच्या व्यक्तिवादाचा प्रभाव त्यांच्या विचारांवर पडलेला दिसुन येतो. भारतीय राजकीय परिस्थिती व तत्कालीन समस्यांचा विचार करुन लोकशिक्षणावर जास्त भर दिलेला होता. "उदारमतवादी लोकशाही शासनव्यवस्था" हे त्यांच्या राजकीय सुधारणेचे अंतिम ध्येय होते. त्यांनी राज्यसंस्थेचे सर्वसामान्य स्वरुप आणि तिची स्थित्यंतरे यांचा ऐतिहासिक दृष्टीने विचार केला आहे. आगरकरांनी सामाजिक सुधारणे संबंधी विचार जेवढ्या प्रखरतेने मांडले तेवढ्याच प्रखरतेने आर्थिक, राजकीय दृष्टिकोनही लोकांपर्यंत पोहचविण्याचा प्रयत्न केला. त्यांच्या राजकीय, आर्थिक लेखनाचा परामर्श घेतला तर "आगरकर महान राजकीय विचारवंत आणि पक्के स्वराज्यवादी समाजसुधारक" होते, हे लक्षात येते. त्यांनी राजकीय, आर्थिक धार्मिक, सामाजिक , सांस्कृतिक, वाङःमयीन ह्या सर्व क्षेत्रात चौफेर नजर ठेवुन समाज प्रबोधनाचे कार्य आपल्या अल्पायुष्यात अविरतपणे केलेले दिसते.

इंग्रजांनी भारतात ब्रिटिश साम्राज्य स्थापन केल्यानंतर भारतातील समाजसुधारक आणि विचारवंत आपल्या पराभवाची, कमतरतेची कारणे शोधु लागेले. ते ब्रिटिशांच्या औद्योगिक प्रगतीने व सुधारलेल्या श्रेष्ठ संस्कृती ने

प्रभावित झाले होते. त्यांच्या इतके सुस्पष्ट, परिपूर्ण होण्यास बराच कालखंड जावा लागेल. आपल्या मध्ये सुधारणा घडवून आणण्यास प्रारंभ करून सनदशीर मार्गाने अर्ज विनंत्या ब्रिटिश सरकारकडे करून हळू हळू मर्यादित स्वरूपाच्या राज्यपध्दतीचा स्वीकार करणे हे ध्येय सुरुवातीच्या सुधारकांनी ठेवले होते. रानड्यांसारख्या दूरदृष्टीच्या सुधारकाने नव्या व जुन्या मूल्य विचार सरणीमध्ये समन्वय साधुन लोकांमध्ये जागृती निर्माण करण्यासाठी राजकीय, आर्थिक, धार्मिक सुधारणांना तात्विक अधिष्ठान मिळवुन दिले. होते. त्यांनी सामोपचाराने संघटितरित्या राजकीय, आर्थिक, धार्मिक सुधारणेच्या कार्याला सुरवात "केसरी" या वृत्तपत्राच्या आधारे केली होती. त्यांच्या प्रखर राष्ट्रवादी विचारांमुळेच भारतातील राजकारणाला नवे वळण मिळाले. आगरकरांनी लेखणीच्या द्वारे आपले राजकीय, आर्थिक विचार समाजामध्ये रुजविण्याचा प्रयत्न केला.

ब्रिटिशांची प्रशासन व्यवस्था, दळणवळण व्यवस्था आणि पाश्चात्य ज्ञानामुळे भारतातील परंपरागत व्यवहार व जीवनपध्दतीला हादरे बसु लागले. व त्या ठिकाणी समता स्वातंत्र्याने प्रभावित असलेली नवीन समाजरचना आकार घेवु लागली. त्यामुळे विचाराचे संक्रमण भारतात सर्वदूर पसरु लागले. सर्व-साधारणपणे सामान्य मनुष्य आपल्या दैनंदिन उदरभरणाच्या व्यवहारामध्ये गुंतलेला असतो. कोणताही राज्यकर्ता येवो किंवा कोणाचेही राज्य असो, त्या विषयी तो उदासीन असतो. तो प्राथमिक गरजांच्या पूर्तीवर समाधानी असतो. त्यातच धन्यता मानत असतो. अशा अल्पसंतुष्ट समाजाला राजकीय दृष्टया जागृत करून गुलामगिरीचे, दैन्य वस्थेचे, अन्यायी अत्याचारी राजसत्तेचे वास्तव दर्शन घडवुन त्याचे लक्ष स्वातंत्र्याकडे, स्वराज्याकडे आकर्षित करण्याचे कार्य अवघड असते हे कार्य आगरकरांनी केसरी "सुधारकाच्या" माध्यमातुन प्रभावितपणे केले. लोकहितवादी, रानडे या सारख्या सुधारकांनीही राजकीय जागृतीचे कार्य केले होते. पण ते एका मर्यादेतील होते. आगरकर व्यक्ती

स्वातंत्र्याचे पुरस्कर्ते होते. स्वातंत्र्य, समता, बंधुता, न्याय, नीती ह्या तत्वांचा अंगिकार त्यांनी आपल्या जीवनात केलेला होता. स्वाराज्य, स्वधर्म, स्वभाषा, स्वदेशाविषयी त्यांना प्रेम असले तरी त्यांनी आपल्या समाजातील दोषांवर पांघरुण घालण्याचा प्रयत्न कधीच केला नाही. निर्भयपणे जे खरे असेल ते वास्तव चित्रण करुन कुठल्याही संकटाला सामोरे जाण्याचा प्रयत्न केला होता. आगरकरांनी इ.स. १८८० ते १८८८ पर्यंत केसरीतुन राजकीय आर्थिक लेख मोठ्या प्रमाणात लिहिलेले आढळते. त्या मानाने सुधारकामध्ये सिमित स्वरुपात राजकीय व आर्थिक लेख प्रसंगानुरुप आलेले दिसतात. त्यामुळे त्यांच्या राजकीय विचारांकडे "एक समाज सुधारक" म्हणून दुर्लक्ष झालेले आढळते.

मनुष्य हा समाजशील बुध्दीवादी प्राणी आहे. तेव्हा समाजाचे सर्व व्यवहार सुरळीत चालविण्यात कोणत्यातरी प्रकारची नियंत्रक आणि संरक्षक राजसत्तेची आवश्यकता भासत असते. मनुष्याच्या सामाजिक संबंधातुनच त्यांची उन्नती होत असते. व समाज धारणेसाठी श्रम संयोगाची आवश्यकता असते व हे श्रमसंयोग निर्विघ्नपणे चालण्यास सामाजिक नियमांची गरज असते. ह्यातुन समाजाचे हित साधले जाते. ह्या दृष्टिकोनातुन एखादा समाज नियंत्रक शक्तीच्या नियमांचे पालन करीत नसेल तर तो समाज एक तर निर्बल शासकाच्या हाती असतो, नाहीतर दुसरे त्या समाजाने जडत्व धारण करुन शासन संस्थेला निष्क्रिय बनविलेले असते. असा समाज आपला विकास घडवुन आणण्यास अयशस्वी ठरतो. अशा समाजाला विवेकवादी विचारांच्या सुधारकांनी योग्य नेतृत्व देवुन समाजाला प्रवाहित करण्याचा प्रामाणिक प्रयत्न करावा लागतो. आगरकरांनी विवेक निष्ठ सुधारकाच्या कर्तव्याबद्दल म्हटले की, "जो पर्यंत विवेक पूर्ण जागृत झाला नव्हता तो पर्यंत विश्वासाने किंवा श्रध्देने प्रत्येक गोष्टीत आपला अंमल चालविला यात काही वावगे नाही. जसा लोकांस तसा मनास कोणीतरी शास्ता पाहिजे व त्या प्रमाणे वर्तमानाचे नियमन करणारे असे कोणतेच तत्व नसण्यापेक्षा विश्वासासारखे एखादे स्खलनशील तत्व असणे इष्ट आहे. पण हे कोठपर्यंत ? अधिक चांगले तत्व अस्तित्वात आणले नाही तोपर्यंत, ते असे की, जुन्या प्रमादी तत्वाने आपली राजचिन्हे श्रेष्ठ तत्वाच्या स्वाधीन केले पाहिजेत.

हे सर्व अधिकारात येऊन पुढे विश्वास आणि विवेक यांच्या दरम्यान होणार आहे. व असे होण्यासच मनुष्यजातीस प्राप्त होण्याजोगे ऐहिक व परमार्थिक सुख लवकर प्राप्त होवु लागणार आहे, अशी आमची समजुत आहे. व ती तशी असल्यामुळे विश्वासावलंबी कल्पनांस आणि आचारांस विवेकाची आच देऊन झाडून पाहणे हे सुधारकाच्या अनेक कर्तव्यापैकी एक कर्तव्य होवुन बसते"[४७] अशी आपल्या कर्तव्याविषयी ची जागृतता ठेवुन आगरकरांनी प्रामाणिकपणे व निष्ठेने समाज कार्य केले आहे. समाजातील समस्येचा प्रसंगानुसार विचार करून आपले राजकीय, आर्थिक, सामाजिक, धार्मिक पुरोगामी विचार लोकांपर्यंत पोहचविण्याचा प्रयत्न ते सतत करीत राहिले. आगरकरांनी इ.स. १८८० ते १८८८ पर्यंत "केसरी" मध्ये मोठ्या प्रमाणात राजकीय आर्थिक विषयावर लेख लिहिलेले आढळतात. त्यांनी केसरीमधून लोकांसाठी राजकीय, आर्थिक परिस्थितीची वास्तव जाणीव करून देणारे लेख लिहिले. ब्रिटिश राज्यकर्त्यांनी भारत "एक वसाहत" या दृष्टिकोनातून राबविलेले हेतुपुरस्सर धोरणे व त्यांचा उद्देश आपल्या लेखनातून स्पष्ट केला. ब्रिटिशांच्या दडपशाहीपूर्ण कायद्याचा विरोध ही केला त्याच प्रमाणे त्यांच्या सकारात्मक कार्याची प्रशंसा केली. आपल्या लेखांमधून राजकीय शिक्षण देण्याचा प्रयत्न करून स्वराज्याकडे वाटचाल करणारे विचार त्यामधून सांगितले.

आगरकर स्वतः शिकत असतांना जगाच्या राजकीय इतिहासाची तुलना भारतीय राजकीय परिस्थितीशी करीत असत. भारतातील राजकीय दयनीय परिस्थितीचा शोध घेतांना मुळापासुन विचार करण्याच्या सवयीने त्यांनी राजकीय परिस्थितीला कारणीभुत घटकांचा अभ्यास केला होता. गुलामगिरीत खितपत राहण्याची अवस्था आमच्या समाजातील धार्मिक, सामाजिक बंधने राजकीय प्रगतीला मारक ठरल्याने, अतिश्रध्दीने येणाऱ्या विलासीन, उदासिन, आळस प्रवृत्तीने अधोगती प्राप्त झाली आहे हे त्यांनी ओळखले होते. सामाजिक धार्मिक रुढी परंपरा, कल्पना, प्रथा यांची अनिष्ठता जो पर्यंत नष्ट होत नाही, तो पर्यंत कुणाचे तरी गुलाम राहण्याची आमची नियती राहिल, त्यातुन बाहेर पडायचे असेल तर समाजाची, देशाची सर्वांगिण सुधारणा आवश्यक आहे हे

आपल्या प्रत्येक लेखातून सांगण्याचा प्रयत्न ते करीत असत.

इ.स. १६०० मध्ये भारतात ईस्ट इंडिया कंपनी स्थापन झाल्या पासून इ.स. १८५७ पर्यंतच्या दुर्बल राजकीय परिस्थितीचा फायदा इंग्रज लोकांनी उचलला होता. भारतीय समाजात संकुचित वृत्तीचा झालेला प्रादुर्भाव आपआपसांतील वैर, फुटीर, विलासीवृत्ती, परंपरेने निर्माण झालेली अहंकारी वृत्ती, अंधश्रध्देने भरलेली भारतीय राजवटीची प्रतिगामी धोरणे, मित्र शत्रू न ओळखण्याच्या पारखी वृत्तीच्या अभावामुळे भारत अगदी प्राचीन काळापासून गुलामीत वावरला. कुणाच्या न कुणाच्या तरी दास्यत्वात राहण्याची सवय झालेल्या समाजाला आपल्या नियंत्रणात आणणे, ब्रिटिशांना सोपे गेले होते. त्यामुळे केवळ इंग्रजांना दोष देण्यात अर्थ नाही. ते नाहीतर आणखी फ्रेन्च, पोर्तुगीजांनी राज्य केले असते. वास्तवतेकडे लक्ष देवून सत्यापासून पाठ फिरवून आपले दोष लपवून एकांगी दृष्टिकोनाने विचार न करता आपल्यातील चुका ओळखून त्यात बदल घडवून आणणे आवश्यक आहे असे आगरकरांना वाटत होते. ते आपल्या लेखांत म्हणतात की, "सत्यात जागृत राहून आपणांस जे खरे दिसेल ते खरे म्हणणे आणि वाईट असेल ते वाईट म्हणणे यातच खरे हित, खरे कर्तव्य व खरा देशाभिमान आहे अशी आमची पक्की समजूत होवून गेली असल्यामुळे, इंग्लिश लोकांचे गुण गाण्यात ज्याप्रमाणे स्वदेशाभिमानास लाज आणणारी गोष्ट आमच्या हातून घडते असे आम्हास वाटत नाही, त्याप्रमाणे प्रसंगविशेषी त्यांच्या हातून घडणारे प्रमाद उघडपणे बोलून दाखविणे यातही आमच्या कडून कोणत्याही प्रकारचे अप्रशस्त आचरण होते अशी शंका आमच्या मनात येत नाही."[४८] आगरकरांनी राजकीय आर्थिक जीवनात प्रगतीला खीळ घालणारे दोष दाखवून प्रगतीचा मार्ग त्यांनी सांगितलेला होता. त्यांनी जातिभेद, अस्पृश्यता, प्रारब्धवाद, परदेशगमन , निर्बंध, बाल विवाह स्त्रीशिक्षण विषयक संकुचित दृष्टीकोन,

अल्पसंतुष्ट प्रवृत्ती, आळस, दुसऱ्यांच्या विषयीची अनास्था, जिद्दीने अर्जन न करण्याची प्रवृत्ती, इत्यादी स्वभावाच्या राजकीय, आर्थिक, सामाजिक गोष्टी समाजविकासाच्या आड येत असल्याने त्यांवर प्रहार केले आहे. परकीय सत्ता या देशातून जावी आणि आपले राज्य आपल्या हातात असावे असे वाटत असेल तर तरुण सुशिक्षितांनी पुढे येवून समाजाचे पुढारीपण आपल्याकडे घेवून समाजातील अनिष्ट प्रथा, रुढी इत्यादींना समाजाला शहाणे करून देशाला प्रतिष्ठा मिळवून देण्याचा प्रयत्न केला पाहिजे असे त्याचे मत होते. तरुण पिढी समाजाचा उत्कर्ष घडवून आणू शकते हा जबरदस्त आशावाद त्यांना होता. जर युवकांनी पुढाकार घेतला नाहीतर देशाचे काय होईल हा विचार त्यांना असह्य वाटत होता. ते आपल्या "तरुण सुशिक्षिता विज्ञापना"[४९] या लेखांत म्हणतात की " ज्या देशात राजकीय समतानाही, विद्या नाही, वित्त नाही, शारीरिक व मानसिक सामर्थ्य म्हणण्यासारखे नाही. अशा देशातील युनिव्हर्सिटयांत आणि कॉलेजात इतर ठिकाणा पेक्षा थोडीशी अधिक चळवळ नसेल तर त्या देशाची अखेर गति काय होईल हे सांगता येणे फार कठीण आहे." कारण स्वतःहून आपली गुलामगिरी सुटका करून घेतल्याशिवाय स्वातंत्र्य मिळणार नाही. राजकीय स्वातंत्र्य नसणे म्हणजे अस्तित्वहिन जीवन जगणे आहे, तेव्हा राजकीय अधिकार प्राप्त करण्यासाठी झगडले पाहिजे. चळवळी केल्या पाहिजे. कुणीही आपणाहून आपल्या स्वातंत्र्य देणार नाहीत. " राजकीय हक्काची, जडसुखाची किंवा स्वातंत्र्याची "घाल" म्हणून कोणी भीक घालत नाही. या गोष्टी केवळ ज्याच्या त्याच्या अक्लेनेच साध्य होण्यासारख्या आहेत."[५०]

यासाठी देशात, समाजात राजकीय, सामाजिक जागृती करणे आवश्यक आहे. तेव्हाच आपण आपल्या स्वातंत्र्याची इच्छा करु शकतो असे आगरकरांचे मत होते. आगरकरांनी " राज्यसत्तेची उत्पत्ती व अभिवृद्धी"[५१] या लेखात राज्यसत्तेबद्दल आपले विचार स्पष्ट केले आहेत. राज्यसत्तेच्या

उत्पत्तीबद्दल त्याचे विचार गुलामी स्वरूपाचे होते.

पृथ्वीवर समाजनिर्मिती झाल्यापासूनच राज्यसंस्था निर्माण होवून राजा व प्रजा असे वर्ग निर्माण झाले आहेत. मनुष्याने आपल्या संरक्षणाच्या दृष्टीने बलवान व्यक्तिसमूहाचे दास्यत्व अनादी कालापासून पत्करले आहे. तो बलहीन असल्यामुळे त्याला राजापासून कितीही त्रास झाला तरी तो त्रास सहन करून समाजात राहणे त्याने अधिक पसंत केले आहे व आपले कल्याण साधण्याचा प्रयत्न केला आहे. बौध्दिक चातुर्य, शारीरबळ, सौंदर्य आणि श्रीमंती याबद्दल मनुष्याच्या अंतःकरणात जन्मतःच पुज्यभावना असल्याने हे सर्व गुण एका व्यक्तीत, समुहात एकवटल्यास त्याचा आदर करून त्याच्या नियंत्रणात सुरक्षित राहण्याचा प्रयत्न करीत असतो. अशा रितीने राज्यसत्तेचा जन्म होतो. ही राजसत्ता काही ठिकाणी एकाच्या हातात तर काही ठिकाणी अनेकांच्या हातात असते. युरोपातील बहुतेक राष्ट्रात राजसत्ता अनेकांच्या म्हणजे लोकांच्या हातात असलेली दिसते तर आशिया खंडामध्ये एकाच्या हातात म्हणजेच राजांच्या हातात असलेली दिसून येते. ही राजसत्ता आपल्या हातात कायम टिकविणे हे राज्यसंस्थेचे प्रमुख कर्तव्य असते, पण ही राजसत्ता टिकविता आली नाहीतर ते राज्य दुसऱ्या राज्याचे गुलाम म्हणून राहते. व त्या राष्ट्राचे अस्तित्व नष्ट होण्याची स्थिती प्राप्त होते. यातून मार्ग काढण्यासाठी कमकुवत असलेल्या राष्ट्राला आपले सामर्थ्य परत मिळविण्यासाठी प्रयत्न करावे लागतात. त्यासाठी जनतेमध्ये देशाभिमान निर्माण करून त्याच्या गुलामगिरीची जाणीव करून दिली, तरच तो आपले स्वतंत्र राष्ट्र मिळविण्यासाठी प्रयत्नांची पराकाष्टा करीत असतो. समाज हा परिवर्तनशील असल्यामुळे तो या सर्व अवस्थेतून जात असतो. पण त्यासाठी समाजाला सतत प्रवाहित ठेवण्याचा प्रयत्न करावा लागतो.

आगरकरांनी स्पेन्सरच्या विकासवादाचा व मिलच्या व्यक्तिवादाचा पुरस्कार करुन आपली राजकीय विचार तत्वांची मिमांसा केलेली आहे. "आमचे काय होणार?"[५२] या लेखात ते लिहितात की, " पृथ्वीवर राजकीय घडामोडी होता होता तीत अखेरपर्यंत जी राष्ट्रे टिकतील त्या सर्वात हर एक प्रकारचा राज्यव्यवहार अगदी सौम्य अशा लोकसत्तात्मक राज्यपद्धतीकडून होत जाईल, म्हणजे सर्व देशात राजसत्ता लोकांच्या किंवा लोकांनी निवडलेल्या प्रतिनिधींच्या हातात असून तिची मर्यादा अत्यंत संकुचित असेल व तिचा अमंल अतिशय सुखदायक व सौम्य असेल" असा व "वसुधैव कुटुंबकम"आशावाद आगरकरांनी प्रगट केला आहे. त्यांनी राज्यसंस्थेचे स्वरुप आणि तिच्या स्थित्यंतराचा ऐतिहासिक दृष्टीने विश्लेषण केले आहे. त्याप्रमाणे भारताच्या दृष्टीकोनातुन आवश्यक अशा राज्यसत्तेचा विचारही त्यांनी आपल्या लेखामधून केलेला आहे.

आगरकरांनी "सौम्य" अशी लोकसत्ताक शासनव्यवस्था हे आपल्या राजकीय सुधारणेचे अंतिम उद्दिष्ट मानले आहे. समाजाचे सर्व व्यवहार सुरळीत चालण्यात कोणत्या ना कोणत्या प्रकारची नियंत्रक व संरक्षक अशी राज्यसत्ता नेहमीच आवश्यक असते. समाजधारणेसाठी श्रम संयोगाची आवश्यकता असते. श्रमसंयोग निर्वेधपणे चालु राहण्यात कोणत्या ना कोणत्या प्रकारचे सामाजिक संविधान(Social organisation ) हवे असते. या पार्श्वभूमिवर त्यांनी आपली राजकीय मते मांडली आहेत. आगरकरांच्या राजकीय विचाराचे मुलतत्र स्वातंत्र्य, समता, स्वावलंबन, बंधुत्व ही तत्वे मिल्ल विचार सरणीने प्रभावित झालेली होती "[५३] त्यांच्या मते राजकीय संस्था, राजसत्तांचा मुख्य उद्देश समाजहित असले पाहिजे, इंग्रजांची राजवट आपल्याला कितीही अनिष्टकारक वाटत असली तरी जोपर्यंत सामर्थ्यामध्ये राज्य सांभाळण्याची कुवत निर्माण होत नाही तोपर्यंत परकीय राजवट घालविण्याची घाई करण्यापेक्षा या राजवटीचे स्वरुप भारताला कसे हितकारक ठरेल असा प्रयत्न करणे जास्त चांगले राहिल, नाही तर एका गुलामगिरीतुन सुटल्यानंतर आपल्याच अंदाधुंदी कारभाराने पुन्हा दुसऱ्याचे तरी गुलाम बनण्याची पाळी येईल , असे होवु नये म्हणून आधी सामाजिक अज्ञान नाहीसे

करुन लोकांना राज्यकारभारासाठी जागृत करणे आवश्यक ठरेल. त्यानंतरच शांततामय उपायांनी क्रांती घडवून आणणे शक्य होईल असा आगरकरांच्या राजकिय विचारांचा आशय होता.

भारत प्राचीन काळात वैभवशाली देश म्हणून प्रसिद्ध होता. पण येथे लोकांमध्ये शौर्य, राजकीय गुण असले तरी राजकीय एकात्मतेची भावना नव्हती. त्यामुळे सतत परकीय आक्रमकांनी आम्हाला गुलाम बनविले आहे. देशाभिमान, राष्ट्रप्रेम ह्या भावना इंग्रजांच्या काळापासून भारतात निर्माण झाल्या आहेत. त्यापूर्वी ही भावना सुप्तावस्थेतच होती. त्यावेळी धर्म श्रेष्ठ मानला जाई. आगरकर सुधारका मधील "सामाजिक सुधारणेस अत्यंत अनुकूल काळ, सांप्रत काळ"[१४] या अग्रलेखात लिहितात की, "पूर्वीपासूनच खऱ्या देशाभिमानाची कल्पना या हिंदू लोकांत नाही असे म्हणावयास हरकत नाही. ती असती तर मुसलमानास देखिल आम्ही येथे पातशाही स्थापू दिली नसती... रजपूतांसारख्या काही जाती रणशूर आहेत पण उपयोग काय ? जेथे शौर्य आहे तेथे अक्कल नाही व जेथे अक्कल आहे तेथे शौर्य नाही, अशी आमची चिरकालीन स्थिती होऊन बसली आहे. मराठेशाहीचा आढावा घेतांना पुढे म्हणतात की, "काही विशेष कारणांमुळे या महाराष्ट्र देशातील लोकांत अक्कल आणि शौर्य यांचा स्वल्पकालीन संयोग झाल्यामुळे त्यांनी मुसलमानांचे पारतंत्र्य झुगारुन दिले व काही काळ स्वराष्ट्राचा उपभोग घेतला. पण मुसलमानापेक्षा वरिष्ठ शत्रुंशी झगडण्याचा प्रसंग आल्या बरोबर आपले कष्टार्जित स्वातंत्र्य गमावून बसले..... आर्थिक दुर्बलतेने इतके आळशी झालेलो होतो की, आमच्यामध्ये राजकारण करण्याची कुवत नष्ट झाली होती. त्यामुळे कुणाला दोष देण्यापेक्षा स्वतःचे अवगुण लक्षात घेवून स्वतःला राजकीय सामाजिक दृष्टया समर्थ बनविणे आवश्यक झाले आहे.

कायमस्वरूपी स्वातंत्र्य राहण्याची इच्छा असेल तर आम्ही आपला गृहस्थिती व धर्माचार सुधारण्याचा प्रयत्न प्रथम केला पाहिजे व तो करण्याला अत्यंत अनुकूल सांप्रत काल आहे. चांगली राजकीय स्थिती ही चांगल्या गृहस्थितीचे फळ होय". असे स्पष्ट केले आहे.

देशामध्ये राजकीय सुधारणा करतांना आपल्या दोषांकडे पाठ फिरवून गुलामगिरीमध्ये राहण्याची केवळ खंत बाळगून उपयोग नाही आमच्यामधील आळस, संकुचितवृत्ती, भेदभाव, परस्पर द्वेषभाव, एकजुटीचा अभाव, अज्ञान, स्वदेश, राजकारणाबाबत सर्वसामान्यांची उदासीनता ह्या गोष्टी गुलामगिरी पत्करण्यात कारणीभूत ठरलेल्या आहेत. तेव्हा इंग्रजी राज्याने दिलेली राजकीय एकता, दळणवळणाची साधने, शांतता व सुरक्षितता, शिक्षण ह्या गोष्टींचा फायदा उचलून स्वातंत्र्य प्राप्तीसाठी लोकांनी प्रयत्न केले पाहिजेत. पण प्रत्यक्षात मात्र अजूनही उदासीन, आळशी, संकुचित, फुटीरवृत्ती नष्ट झालेली नाही. धर्मनिष्ठीत जीवनातून बाहेर पडलेले नाहीत. याचे आगरकरांना वाईट वाटते ते " युरोपियन आणि नेटिव याचे अन्योन्य संबंध" ५५ या अग्रलेखात लिहितात की, "मूर्ख लोक देशाभिमानाच्या आणि स्वराज्याच्या बाता मारतात पण इंग्रजी राज्य आल्याने आमचे काय हो वाकडे झाले आहे ? आगगाड्या तारायंत्रे, विद्यालये, दवाखाने, इन्साफ कचे-या, कायदे कौन्सिले, पोलिस बंदोबस्त, तोफखाने, दारुगोळा तटबंदी रस्ते, शेतकी व्यापार वृद्धीत कमी तरी आहे काय?" या गोष्टींचा फायदा उचलून आपला उत्कर्ष लोकांनी, समाजाने करून घ्यावा आणि आपले राष्ट्र स्वतंत्र करण्याचा प्रयत्न करावा अशी आगरकरांची इच्छा होती.

परकिय सत्तेच्या चांगल्या गोष्टीचा अंगिकार करतांना मात्र त्यांच्या आचाराचे अंधानुकरण करण्याच्या प्रवृत्तीला आगरकरांनी विरोध दर्शविला होता. "इंग्रजांच्या कोणत्या गोष्टी अनुकरणीय आहेत?" इंग्रजी विद्या व

आपली सामाजिक स्थिती; "इंग्लंड शिवाय आम्हास गती नाही, "अनुकरण"[५६] इ. लेखांमध्ये नवशिक्षित समाजाच्या पाश्चात्यांच्या अंधानुकरण वृत्तीवर प्रकाश टाकलेले आहे. देशाच्या राष्ट्राच्या सुरक्षिततेकरीता व परकीय राजवट उपयुक्त असली तरी त्या राजसत्तेने निरंकुश स्वरुप प्राप्त केले की, त्यात दोष निर्माण होवून ती सत्ता रसातळाला जाते, लोकांना पेशवाईपेक्षा ब्रिटीश राज्य प्रभावी वाटले होते, त्या प्रभावाने ते नतमस्तक झाले होते, त्या राजसत्तेच्या जीवनपध्दती आकर्षक वाटून त्यातील मर्म समजून न घेता अंधानुकरण सुरु केले होते नवशिक्षितांना राज्यकारभाराच्या सोयीसाठी सरकारी नोकरीत अंतर्भूत करण्यात आले होते., या नोकरीच्या कामात त्याचे जीवन सुखी, चैनी झाल्याने "इंग्रजसरकार मायबाप" या निष्ठेने त्यांची सेवा करणे हेच जीवीत कार्य मानले होते. त्यामुळे "हांजी हांजी" करण्याची प्रवृत्ती इतकी बळावली होती की त्यांना गुलामगिरीत असल्याची जाणीव राहिलेली नव्हती. देशहितासाठी काही सार्य करावे, असे वाटत नव्हते. स्वदेश प्रेम लोप पावले होते. अशा पांढरपेशा सुशिक्षित लोकांना देशकार्यासाठी प्रवृत्त आणि प्रेरित करण्यासाठी उपहासात्मक लेखन करुन त्यांची अस्मिता जागृत करण्याचा प्रयत्न आपल्या वृत्तपत्रातून केला होता. त्यांच्या मनात पारतंत्र्याविषयी चीड निर्माण करुन सर्वांना एकजुटीने स्वराज्य प्राप्तीसाठी अग्रेसर करण्याचे कार्य सुरु ठेवले, मात्र ही राजकीय सुधारणा करीत असतानाच सामाजिक, आर्थिक, धार्मिक सुधारणांकडेही लक्ष दिले पाहिजे असे आगरकरांना वाटत होते. केवळ एकाच सुधारणेवर लक्ष केंद्रित करणे चुकीचे आहे असे त्याचे मत होते. आगरकरांनी जरी राजकीय चळवळीला प्राधान्य दिले तरी ती एकजुटीने व एकाग्रतेने चालु ठेवण्यासाठी सामाजिक प्रश्नांच्या बाबतीतील विचार संघर्ष कटाक्षाने टाळला पाहिजे, हे मत त्यांना बिलकुल मान्य नव्हते.... स्वतंत्र राजकीय ~~चळवळीस~~ चळवळ

नको. सामाजिक सुधारणा घडून आल्या की राजकीय प्रगती आपोआप होईल, असे आगरकरांनी कुठेच म्हटलेले नाही"[५७] असे गं. बा. सरदारांनी आगरकरांच्या सुधारणा विचाराचे विश्लेषण करतांना म्हटले आहे.

आपल्या लेखांमधून आगरकरांनी राजकीय सुधारणा कशया प्रकारे करता येतील याबाबत वेगवेगळी सुचना देण्याचाही प्रयत्न केला. समाजाचा उदासीनपणा पाहूनही ते कधी निराश झाले नाहीत. सर्वांना एकत्रित आणण्यासाठी आपला लेखणी कार्यरत ठेवली. स्वराज्य प्राप्तीसाठी आपल्यामध्ये योग्यता निर्माण करुन सर्वांनी एकजुटीने प्रयत्नकेला तर निदान पन्नास वर्षांनंतर निश्चितपणे स्वराज्य स्थापन करता येईल असा आशावाद त्यांना वाटत होता. राजकीय विचारांबाबत ते "जहाल विचारवंत" होते. आपले जहाल विचार लोकांच्या उतरविण्याचा सतत प्रयत्न केला. समाजाला लोकशिक्षणाद्वारे जागृत करतांना निर्भयपणे, परखडतेने कठोर सत्य लिहिण्यास मागेपुढे पाहिले नाही.

इंग्लंड हे राष्ट्र प्रगत असले तरी ते ज्या सवलती भारताला देत आहेत, जसे शिक्षण, राजकीय, सत्ताप्रणाली आहेत, त्यात त्यांचा स्वार्थीपणा तसेच सुसंस्कृतपणा आहे. पण राजकीय चळवळ उभारल्याशिवाय ते भारतासारखी विशाल वसाहत सहजरित्या भारतीयांच्या हातात परत देतील, असे आगरकरांना बिलकुल वाटत नव्हते. त्यासाठी निकराचा लढा घावा लागणार आहे. इंग्रजांचे वर्चस्व झुगारण्यासाठी त्यांच्याशी हा लढा देत असतानाच पाश्चात्य संस्कृतीतील नवीन चांगली तत्वे आत्मसात करुन आपल्या समाजाचे आधुनिकीकरण करणे आवश्यक आहे. असे त्याचे मत होते. राजकीय सत्ता हे मानवी जीवन समृध्द करण्याचे साधन आहे, त्याचा योग्य वापर करण्याची प्रवृत्ती आपल्यामध्ये बाणणे आवश्यक आहे. ब्रिटिश सत्ता परकीय असल्याने जेतेपणाची भावना बाळगुनच ते राज्य करणार, तेव्हा त्यांच्यामध्ये उद्दामपणा, अत्याचारी व दडपशाहीने राज्य करण्याची प्रवृत्ती राहणे नैसर्गिक आहे. पण अशा वेळेला भारतात समाज जागृतीची चळवळ चालु असली तर राज्यकर्त्यांच्या कृत्यावर काही प्रमाणात बंधने

येतात. देशाची प्रगती घडवून आणण्यासाठी परकीय सत्तेमध्ये बेबंदपणा येणार नाही हे पाहिजे पाहिजे. शासन संस्थेमध्ये शिरून राजकीय शिक्षण घेण्यासाठी दक्ष व तत्पर राहण्याचा प्रयत्न केला पाहिजे. त्यासाठी राजकीय संघर्षाइतकेच सामाजिक प्रबोधनाची आवश्यकता आहे, तरच परकीय सत्ता नष्ट करून बलशाली राष्ट्र निर्माण करण्यात यशस्वी ठरू अशी आगरकरांची विचारसरणी होती. ते आपल्या लेखांमध्ये म्हणतात की, "जीवनार्थ कलहात भारतीय आर्यांचा शेवटपर्यंत निभाव लागावा हे इष्ट असेल तर ज्या उपायांनी राज्यसत्ता त्यांच्या हाती येईल ते आपण करीत असलो म्हणजे आपले कर्तव्य झाले, असे समजून (लोकाग्रणींनी) स्वस्थ बसता कामा नये तर ज्या उपायांनी राजसत्ता प्राप्त झाली असता तिचे संरक्षण व तिचा सदुपयोग करता येईल असे शिक्षण त्यांस अगोदर दिले पाहिजे."[५८]

इंग्रज राजवटीमुळे भारतातील मध्ययुगिन अवस्था संपुष्टात येवून आधुनिक भारताला प्रारंभ झालेला होता. आणि समता व निःपक्षपाती या तत्वावर आधारित कायद्याचे राज्य सुरु झाले. कायद्याचे पालन करणे हे चांगल्या नागरिकत्वाचे लक्षण आहे. भारतातील लोकांना पुरातन काळापासून रुढी, प्रथांचे काटेकोरपणे पालन करण्याची सवय असल्याने त्यांना ब्रिटीश कायद्याचे पालन करणे कठीण गेले नाही. पण हा कायदा मानवी प्रगतीस हितकारक आहे किंवा नाही हे पाहणे आवश्यक असते. कारण कायदे दोन गोष्टींमुळे पाळले जातात. एकतर दडपशाही अत्याचाराला घाबरुन नाहीतर स्वतःच्या अस्तित्वाची जाण न ठेवता पारतंत्र्यात स्वेच्छेने राहण्याच्या सवयीने, पण कायद्याचा उद्देश समाजात देशात शांतता निर्माण करून विज्ञान, कलांचा उत्कर्ष व्हावा, असा असला तरच तो कायदा ग्राह्य मानला पाहिजे. नाहीतर त्या कायद्याचा विरोध करण्याचा प्रयत्न सनदशीर मार्गाने झटपट करून त्यात बदल घडवून आणणे आवश्यक आहे. कारण कायदा एखादे राष्ट्र दुसऱ्या राष्ट्राला आपल्या अंकीत ठेवु शकत नाही, जेतेपणाच्या भावनेने दडपशाही अत्याचार चरम सीमेला पोहचला असेल तर त्याला विरोध होणे नैसर्गिक आहे.

कारण चेंडू जितका खाली दाबला जाईल तेवढयाच वेगात तो वर उसळला असतो. सत्ताधारी वर्ग बेजबाबदारपणे अनिर्बंध अधिकार गाजवीत असल्यास त्याच्या अत्याचाराने सहनशीलतेचा नाश होवून तो विद्रोह करण्यास प्रवृत्त होतो. पण ही विद्रोहीभावना क्षणिक असते. तेव्हा आपला विरोध वैधानिकरित्या व्यक्त करून सरकारला काही वेळा नमते घेवून कार्य करणे भाग पाडले पाहिजे त्यासाठी जनतेला राजकीय शिक्षणाची गरज आहे. कारण "राजकीय हक्काची, जडसुखाची किंवा स्वातंत्र्याची "घाल" म्हणून कोणी भीक घालत नाही. या गोष्टी ज्याच्या त्याच्या अकलेनेच साध्य होण्यासारख्या आहे. राजकीय स्वातंत्र्य जाणे ही अत्यंत खेदजनक गोष्ट खरी, हे जाणे म्हणजे शरीरातील सर्व इंद्रिये आणि त्याचे व्यापार याचे पोषक असे चैतन्य सारतत्व नाहीसे होणे होय. पण ते गेले म्हणून रुदन करीत बसण्यात काय फायदा आहे. जगावयाचे असेल व ते चांगल्या प्रकारचे जगणे हवे असेल, तर ते चैतन्यसारतत्व फिरून आपल्या हाती घेण्याचा प्रयत्न केला पाहिजे व सांप्रत राष्ट्रसभादी साधनांच्या द्वारे तो जितका होण्यासारखा आहे तितका आम्ही करीत आहो"[१९] आगरकरांनी लोकांना स्वप्रयत्नांवर भर देण्यास सांगितले आहे. राष्ट्रसभेसारख्या संस्था स्थापन करून एकजुटीने प्रयत्न केल्यास स्वराज्यप्राप्तीचा मार्गक्रमण लवकर करता येईल व त्यासाठी त्यांनी लोकांना आवाहन केले आहे. राष्ट्रसभा व त्याबरोबर सामाजिक परिषदेच्या कार्याचा त्यांनी पुरस्कार केला आहे.

भारतात रिपनच्या उदारमतवादी धोरणामुळे राजकीय प्रगतीच्या आकांक्षा उंचावल्या होत्या. वृत्तपत्रस्वातंत्र, स्थानिक स्वराज्यसंस्था, शिक्षणप्रसाराच्या कार्यामुळे सनदशीर मार्गाने आपल्या राजकीय हक्काची मागणी केल्यास आपल्याला काहीतरी हक्क मिळतील, असा आत्मविश्वास सुशिक्षित वर्गात वाढू लागला होता. सुरेंद्रनाथ बॅनर्जी यांनी पुढाकार घेवून दादाभाई नौरोजी, फिरोजशहा मेहता, न्या. रानडे यांच्या सहकार्याने कलकत्यात राष्ट्रीय परिषद भरवून भारतातील सर्व प्रांतातील राजकीय पुढाऱ्यांना राजकीय चर्चा करण्यास एकत्र आणले होते. ब्रिटीश

सरकारचे बॅनर्जींच्या व परिषदेच्या कार्याकडे लक्ष होतेच, त्यांनाही सत्ता हातात केंद्रित करतांना लोकमत जाणून घेण्याची इच्छा होती. ते लोकक्षोभ उसळू नये यासाठी दक्ष होतेच, व्हॉइसरॉय लॉर्ड डफरीनच्या काळात त्यांच्या प्रोत्साहनाने व भारतातील नावाजलेल्या पुढाऱ्यांच्या सहकार्याने सेवानिवृत्त सचिव ए.ओ.ह्यूम यांच्या अध्यक्षतेखाली इ.स.१८८५ डिसेंबर ला राष्ट्रीय सभेची स्थापना करण्यात आली. "प्रत्येक राष्ट्रातील लोकांना स्वराज्याचे हक्क असावेत, म्हणून कायदे मंडळात लोकांचे प्रतिनिधी असले पाहिजे" या उद्देशाने भारतात प्रतिनिधिक संस्थांची स्थापना करणे हे ह्या सभेचे ध्येय होते. ह्यूम यांनी राष्ट्रसभेचे कार्य सामंजस्य व सापेक्ष वृत्तीने सात वर्षे पर्यंत यशस्वीरित्या केले होते. पण ह्या सभेला पाहिजे तितका पाठिंबा मिळालेला नव्हता. राजकीय कार्याबाबत लोकांची उदासीन प्रवृत्ती नष्ट झालेली नव्हती. वेगवेगळ्या समूहातील लोकांनी स्वतःहून पुढे येऊन सक्रीय पाठिंबा देण्याची गरज होती. काही ध्येयवादी विचारवंत ह्या सभेच्या कार्यात सहभागी होते. संस्थानिक जमीनदार वर्ग परकीय सत्तेच्या आधीन असल्याने त्यांचा रोष ओढवू नये म्हणून अलिप्त होता, तर शेतकरी वर्ग अज्ञानाने अलिप्त राहिला होता. त्यामुळे सभेचे कार्य सुरुवातीला विशेष उल्लेखनीय ठरले नाही. उलट ह्यूमच्या कार्याकडे संशयीवृत्तीने पाहून अँग्लोइंडियन वृत्तपत्र, गोरे अधिकारी आणि ब्रिटिश धार्जिणे नेमस्त पुढारी ह्यांनी ह्यूमवर देशद्रोहाचे आरोप लावण्यास सुरुवात केली. तेव्हा आगरकरांना वाईट वाटले. आता राष्ट्रसभेचे काय होणार[६०] या लेखात ते म्हणतात की, "आज आपले राष्ट्र गुलाम राष्ट्र बनून राहिले आहे. राष्ट्राचे ऐक्य व अभ्युदय होण्यास लागणारा एकही गुण आमच्यामध्ये नाही... प्रत्येकाची दृष्टी तत्कालिक क्षुद्र स्वार्थावर खिळून राहिली आहे. त्यामुळेच राष्ट्र सभेची चळवळ देशातील सर्वांच्या कल्याणासाठी

चालू असतानाही तिच्याशी समरस होणारे अगदीच अल्पसंख्य आहेत." या गोष्टींचा त्यांना विषाद वाटत होता. ह्यूमच्या राजद्रोहावरील आरोपांना उत्तर देतांना त्यांनी राष्ट्रसभाबंद पडता कामा नये "[६१] या लेखात लिहिले की, "ह्यूमसाहेबांसारखी आमची आम्हास कळकळ असती तर राजद्रोहाचा किंवा दुसरा

कसला ही आरोप आपणांवर आणून घेण्यात व त्याचे परिणाम साहण्यात आम्ही तयार झालो असतो. पण इतके धैर्य आमच्या अंगी असते तर आमची सांप्रत दास्यावस्था आम्हाला कोठून आली असती". एका परकीय ब्रिटिश व्यक्तीने भारतीयांना राजकीय शिक्षण देण्याच्या उद्देशाने केलेले कार्य महान होते. पण त्याची जाण न ठेवता त्यांच्या कृतीकडे संशयाने पाहणे म्हणजे कृतघ्नपणा आहे. असे आगरकरांना वाटत होते. लोकांमध्ये देशाविषयी स्वार्थत्यागवृत्ती निर्माण करून देशकार्य करण्यात प्रवृत्त करण्याची जास्त गरज आहे असे त्यांना वाटू लागले होते.

राष्ट्रीय सभा सुरवाती पासूनच एक राजकीय संस्था होती. भारतातील लोकांची प्रतिनिधीक सभा होती. तिला समाजसुधारणेपासून अलिप्त ठेवण्यात आले होते. आगरकरांना रानडे यांच्या प्रमाणेच हे वेगळेपण मान्य नव्हते. आधुनिक युगात राजकीय व सामाजिक स्थितीचा घनिष्ट संबंध असल्यामुळे राज्य-कर्त्यांकडून सामाजिक कायदे संमत करून समाज सुधारणेसाठी राष्ट्रीय सभेचा उपयोग होवू शकतो असे त्यांना वाटत होते कारण सत्ता हे समाजव्यवस्थेचे साधन आहे. त्याचा उपयोग केला तर देश सामर्थ्यशील बनू शकतो. या दृष्टीने राष्ट्रीय पुनरुत्थानाच्या चळवळीत राजकीय संघर्षाइतकीच सामाजिक प्रबोधनाची आवश्यकता राष्ट्रीय सभेच्या माध्यमातून पूर्ण होऊ शकते. या दृष्टिकोनातून त्यांना राष्ट्रीय सभा महत्वपूर्ण वाटत होती. त्यांच्या काळात राष्ट्रीय सभा बाल्यावस्थेत होती. दरवर्षी या सभेची अधिवेशने भरत असली तरी तिच्या ध्येय धोरणासंबंधी भारतीय पुढाऱ्यांचे विचार स्पष्टपणे निश्चित झाले नव्हते, सुशिक्षित वर्गांमध्ये मात्र राजकीय हक्कासंबंधी जाणीव या सभेमुळे होवू लागली होती. इंग्लंडमधील लिबरल पक्षाने राष्ट्रसभेच्या कार्याला सहानुभूती दर्शविलेली होती." इंग्लंड व हिंदुस्थान" [६२] या अग्रलेखात आगरकरांनी १५ फेब्रुवारी १८८७ मध्ये लिहिले की, " धाडस, उद्योग व निरपेक्ष बुद्धी यांचा जसजसा फैलाव होत जाईल व लोकांत आपल्या हक्काचे पूर्ण ज्ञान होवुन ते

जसजसे अधिका अधिक हक्क मिळविण्याचा प्रयत्न करतील तेव्हाच कोठे मारवाडी सरकारकडून आम्हास काही सुट मिळेल.'

काही काळाने हळूहळू राष्ट्रसभेने आपल्या नाविण्यपूर्ण कार्याने देशातील सर्व थरातील लोकांना आकर्षित केले होते. भारतातील अनेक शहरांमधून राष्ट्रसभेची अधिवेशने भरविण्यात येवु लागली. निरनिराळ्या प्रांताचे पुढारी त्यात एकत्र येवुन मालावरील जकात, राज्यकारभारावरील खर्च, कायदे कौन्सील मध्ये भारतीयांचा सहभाग असण्याची मागणी इ. प्रश्नांची चर्चा करुन राजकीय आर्थिक हक्कांची मागणी करु लागले. समाजातील निरनिराळ्या प्रश्नांवरील पुढारलेल्या लोकांची मते नम्रपणे पण स्पष्ट त्यात सरकारपुढे मांडली जावु लागली. यामधुन सरकार व लोकमत यांचे राष्ट्रीय सभा दुवा बनले. सरकारच्या अडचणी लक्षात घेवुन सहानुभूतीने त्यावर विचार केला जाऊ लागला.

सरकारच्या अडचणी लक्षात घेवुन सहानुभुतीने त्यावर टीका करण्याचे व आपल्या मागण्या सरकारकडे विनयपूर्वक सादर करण्याचे धोरण राष्ट्रीय सभेने ठेवले होते. भारतातील लोक प्रतिनिधीक संस्थासाठी अपात्र आहेत, हा परकीय सत्तेचा भ्रम मोडुन काढण्यात राष्ट्रीय सभा यशस्वी झाली आणि देशभर चाललेल्या राजकीय प्रश्नांच्या चर्चेतुन लोक जागृतीला बरीच मदत होत होती. त्यामुळे सुरवातीला जे इंग्रज सरकार राष्ट्रीय सभेला प्रोत्साहन देत होते तेच सरकार आता राष्ट्रीय सभेचे विरोधक बनु लागले. इतक्या अल्पावधीत राष्ट्रीय सभेला मिळालेल्या यशाचे ते द्योतक होते. राजकीय पुढाऱ्यांनी स्वराज्याचे ध्येय डोळ्यासमोर ठेवुन माघार न घेता, न घाबरता आपली गाऱ्हाणी सरकारपर्यंत पोहचविण्याचा प्रयत्न करु लागले. लोकांना आपल्या कर्तव्याची, हक्काची जाणीव करुन राजकारणात सक्रीय करण्याचा प्रयत्न करु लागले. त्याचप्रमाणे सरकारी अधिकाऱ्यांच्या अन्यायी कृत्यांवर टीका करु लागले होते. आगरकरही त्याकाळातील सौम्य मनोवृत्तीला अनुसरुन मार्मिकरित्या उपहासात्मक लिखाण करुन लोकजागृतीचा प्रयत्न करीत होते.

केसरीतील " हिन्दुस्थानात स्वतंत्रराज्यरितीचा लाभ केव्हा होईल?"[६३] या १४ डिसेंबर १८८६ ला लिहिलेल्या लेखात म्हणतात की, " इंग्लंड देशाने आपल्या ताब्यातील कॅनडा, न्युझिलंड, दक्षिण व पश्चिम ऑस्ट्रेलिया इ. राष्ट्रांना Partial स्वराज्य दिले परंतु आपल्याला कां दिले नाही ? कारण लोकांत तशी उत्कटत्याने इच्छा प्रगट केली गेली नाही, इतिहासावरुन प्राय: असे निश्चित झाले आहे की लोकांनी उग्र स्वरुप दाखविल्याखेरिज त्यांत आपला अधिकार मिळत नाही." स्वातंत्र्याची मागणी चळवळी करुन करावी लागते.. त्याप्रमाणे ३१ ऑगस्ट १८८६ च्या अंकात देशसुधारणेचे कोडे"[६४] या लेखातही तत्कालीन लोकांच्या मानसिकतेचा विचार करुन पुढे त्यांना जमेल तसे मर्यादित स्वराज्याची व राज्यव्यवस्थेच्या फेरबदलाची आवश्यकता प्रतिपादित केली आहे. हे कार्य राष्ट्र सभे मार्फत होईल असे त्यांना वाटत असले तरी इंग्रजसरकार त्याला सहजासहजी तयार होणार नाहीत याची खात्री होती. राज्यव्यवस्थेतील काही अधिकार स्थानिक जनतेला दिले तर इंग्लंडकडे जाणारा पैशाचा ओघ थांबेल हे ब्रिटिश सरकार चांगल्याप्रकारे ओळखून होते म्हणून ब्रिटिश सरकार आपली ध्येय धोरणे राबवितांना दक्ष असलेले आढळतात.

राजकीय, सामाजिक प्रबोधनाच्या कामात राष्ट्रीय सभेचे कार्य महत्वपूर्ण ठरल्याने त्याचे स्वरुप विस्तारले होते. त्यामुळे सरकारची वक्र नजर या सभेकडे गेली होती. राष्ट्रीय सभेची मुस्कटदाबी करण्याचा ब्रिटिश सरकार प्रयत्न करु लागले, तेव्हा आगरकरांनी केसरी, सुधारकामधून अनेक लेख लिहिले. "राजतृष्णा", राजकीय संविधानाचे अपायकार "राजकीय संस्थाविषयी सामान्य विचार" "आता राष्ट्रसभेचे काय होणार" "राष्ट्रसभा बंद ठेवता कामा नये" "हिच्या नावाने शिव रड" "अद्यापि राष्ट्रसभेचे काम झाले नाही " "उघड अन्यायाचे नि:शंक मंडन" लोकशिक्षणावर गदा" "राज्यसत्तेची उत्पत्ती व अभिवृध्दी"[६५] ह्या सर्व लेखामध्ये राजकीय शिक्षण व राष्ट्रीय सभेच्या कार्याचे महत्व पटवून देण्याचा प्रयत्न केला. इंग्रज अधिकारी ब्रिटिश सरकारला सावध ठेवण्याचा

प्रयत्न करीत व आपल्या सूचना अंमलात आणण्यात आग्रही असत. तेव्हा आगरकर यांलेखांमधून त्यांच्यावरही टीका करीत असलेले अनेक लेखांमधून दिसून येते. पत्रकार, संपादक यानात्याने जागृत राहून सातत्याने लिहित होते. २८ डिसे. १८९१ च्या अद्यापि राष्ट्रसभेचे काय झाले नाही "६६ ह्या लेखात ते म्हणतात, " आमच्या राष्ट्राला खरे राष्ट्रपण आणण्यासाठी आमच्या राष्ट्रसभेची स्थापना झाली असे आम्ही समजतो. तेव्हा ते राष्ट्र पण येईपर्यंत आमच्या राष्ट्रसभेचे काम झाले असे कोणासही वाजवी रितीने म्हणता येणार नाही... आमच्या सरकारचे कमी अधिक नियमन आमच्या हाती आल्याखेरीज आमच्या राष्ट्रसभेचे कर्तव्य संपले असे कसे म्हणता येईल... यासंबधाने इंग्लंडचे अनुकरण करणे इष्ट असेल तर तेथील हाऊस ऑफ कॉमन्स सारखी राज्यसभा येथे स्थापण्यात येईतोपर्यंत राष्ट्रसभेचा कार्यभाग उरकला असे म्हणणे अप्रयोजक होणार आहे " आगरकरांनी कमकुवत शारीर स्वास्थ्यामुळे आणि प्राध्यापक, प्राचार्य व संपादक इ. कार्यातील व्यस्ततेमुळे राष्ट्रसभेत प्रत्यक्ष सहभाग कधी घेतला नाही, कधी उपस्थित राहिले नाहीत. प्रत्यक्ष सहभाग कधी घेतला नाही., कधी उपस्थित राहिले नाहीत. प्रत्यक्ष राजकारणात कधीच भाग घेतला नाही. पण लोकांमध्ये राजकीय आर्थिक जागृती निर्माण करण्याचे कार्य त्यांनी केले होते.

ज्यावेळी ह्यूम निवृत्तीनंतर प्रकृती स्वास्थ्यासाठी स्वदेशी जाण्या निघाले तेव्हा राष्ट्र सभाबंद पडते की काय ? अशी परिस्थिती निर्माण झाली असता आगरकर हिच्या नावानेही तीच रड "६७ मध्ये लिहितात की, "आमचे जुने व बडे लोक जितके सामाजिक सुधारणे विषयी तितकेच राजकीय व व्यापारीय सुधारणे विषयी अज्ञान व उदासिन आहेत असे म्हणण्यात हरकत नाही, असे नसते तर राष्ट्रसभेच्या नावानेही पुन: पुन: तीच रड का ऐकावी लागती. पण या राजकीय परिषदेचे महत्व कळते आहे तरी कोणाला". राज्यसत्ता जोपर्यंत हातात येत नाही तोपर्यंत ती सत्ता मिळविण्याचे सनदशीर मार्ग थंड न पडता चालू ठेवावे. लोकांमध्ये राष्ट्रीय सभेविषयी आपुलकी निर्माण करून तिच्या

माध्यमातून ब्रिटिश सरकारशी दोन हात करण्याची तयारी ठेवावी. समजा ह्युमच्या सल्ल्याप्रमाणे ही सभा फक्त लोकांच्या कार्यांच्या शंकेने बंद ठेवली तर कायमची बंद पडेल अशी भीती आगरकरांना वाटत होती म्हणून त्यांना राष्ट्रसभा बंद पडता कामा नये असे वाटत होते कारण राष्ट्रीय सभेचे आक्रमण संपलेले नव्हते. तिचे असणे जास्त महत्वाचे होते तरच राजकीय चळवळीला चालना मिळणार होती, अशी आगरकरांची पक्की खात्री होती, म्हणूनच त्यांनी राष्ट्रीय सभेच्या अस्तित्वाचा आग्रह धरला होता. राष्ट्रीय सभेबरोबरच आगरकरांना ब्रिटिश राजवटीमुळे भारताला प्रभावी शासनयंत्रणा, कायद्याचे र ाज्य, आधुनिक दळणवळणाची साधने व शिक्षण प्रसारामुळे आधुनिक जगाचे द र्शन होऊन स्पर्धा व सुरक्षितता मिळाली हे मान्य करतात "इंग्लंडशिवाय आम्हास गती नाही"[98] या लेखामध्ये इंग्रजांनी भारतावर केलेल्या उपकाराची कृतज्ञता दाखविली आहे. देशात राजकीय अंदाधुंदीच्या काळात विशिष्ठ प्रकारची एक संघीय राजकीय व्यवस्था देऊन समाजाचे अस्तित्व टिकविले आहे. परंतु ही आवश्यक कर्तव्ये केल्याने सरकारचे कर्तव्य संपले असे होत नाही तर राज्यातील जनतेचे हित कुशल पाहणे आवश्यक ठरते. हंटरसारख्या अधिकाऱ्याने इंग्लंडपेक्षा भारतातील लोकांचे जीवन अधिक सुखी आहे म्हटल्याने देश सुखी होत नाही. स्वतःच्या आर्थिक फायद्यासाठी दळणवळणाची सोय करतांना विदेशी मालाची आयात करून भारतातील महानलहान उद्योगधंदे नष्ट केले. शेतीवर अधिक भार पडून रोजगारीला पर्याय नसल्याने देशाची आर्थिक स्थिती दिवसेंदिवस खालावत गेली. ब्रिटिश सरकारने रशियाच्या संभाव्य आक्रमणापासून भारताचे रक्षण करण्यासाठी अफगाणिस्थानशी युद्ध करून वारेमाप खर्च सैन्य व्यवस्थेवर सुरु केला. त्यातील उच्च पदावर असलेल्या ब्रिटिश अधिकाऱ्यांवरही भरपूर धनसंपत्ती खर्च करीत आहे. त्याचे पगार, पेन्शन, इंग्लंडच्या भांडवलावरील व्याज, व्यापारी लाभ हे सर्व इंग्लंडची अर्थव्यवस्था प्रबळ करण्यात गुंतले आहेत. या भारताबाहेर जाणाऱ्या ओघामुळे भारतीय आर्थिक व्यवस्था दयनीय बनली आहे. त्याचे विदारक चित्रण दादाभाई नौरोजींनी Poverty of India आणि न्या. रानडे

यांनी Essays on Indian economics या पुस्तकातून केले आहे. भारतीय आर्थिक व्यवस्था कशी रसातळाला जात आहे. भारत दिवसेंदिवस कसा दरिद्री होत आहे ह्याचे ह्या पुस्तकातून चित्रणही केले आहे. आगरकरांनाही भारतातील दासळल्या अर्थव्यवस्थेवर आपल्या लेखांमधून प्रकाश टाकलेला होता. "तीन अर्थशास्त्रे" या लेखमालेतून एकोणिसाव्या शतकाच्या उत्तरार्धात भारतात आर्थिक समस्येबाबत तीन मत प्रवाह प्रचलित होते. त्यांना आगरकरांनी औपपत्तिक, प्रयोज्य व भ्रामक अर्थशास्त्र अशी नावे दिली आहेत. व्यापाराला सरकारने अजिबात सहकार्य न करणे म्हणजे औपपत्ति अर्थशास्त्र, सरकार व लोकांनी सहकार्य करून इतर देशांशी निर्बंध व्यापार करणे म्हणजे प्रयोज्य व महाग व ओबडधोबड देशी मालाशिवाय दुसरा माल वापरू नये याला भ्रामक अर्थशास्त्रे असे म्हटले आहे. ब्रिटिशांच्या अन्यायी व्यापारी नितीमुळे भारतातील उद्योगधंदे बंद झाले होते. अफू व निळ सारख्या वस्तुंच्या उत्पादनाकरीता भारतीय शेतकऱ्यांची होत असलेली शारिरिक, आर्थिक पिळवणूकीचे विदारक वास्तव लेखन त्यांनी आपल्या "अफूचे कमिशन एकदाचे बसले"[७०] या लेखांमधून केले होते. रेल्वे कंपनी, सैन्यव्यवस्थेत भारतीयांवर होणारे जुलूम व नोकरी टिकविण्यासाठी सहन कराव्या लागणाऱ्या मानसिक यातना यासंबधी माहिती उजेडात आणून लोक जागृती करण्याचा प्रयत्न केला, केसरीमधून "आमच्या निकृष्ट स्थितीत कारण कोणार, गुलामाचे राष्ट्र, हिन्दुस्थानापासून इंग्लडला फायदे, आम्ही आमच्या दारिद्र्यातून कशाने सुटू, गुणोविद, हिन्दुस्थानची नागवण, हिन्दुस्थान देश बुडाला हो ठार बुडाला"[७१] इ. लेखांमधून भारतीयांची मनोवृत्ती आणि इंग्रज सरकारची आर्थिक दडपशाही व लूट यासंबधी लेखन करून भारताची अर्थव्यवस्था समृध्द स्थितीतून दारिद्र्याकडे जाण्यात कारणीभूत परिस्थितीचे लेखन केले आहे. त्यांनी लिहिलेले आर्थिक लेख राष्ट्रहिताचे व राष्ट्रप्रेमाचे पोतक होते.

इंग्रजी राज्यात भारतीयांची आर्थिक स्थिती अत्यंत हलाखीची झाली आहे हे त्यांनी अनेक लेखांमधून वारंवार आकडवारी सह स्पष्ट शब्दात लिहिले आहे.

ब्रिटिश सरकारला आंतरराष्ट्रीय राजकारणात स्वतःचे श्रेष्ठत्व टिकविण्यासाठी अनेक युध्दे करावी लागली. त्यासाठी लागणारे मनुष्यबळ, धनसंपत्ती भारतातून घेतले जाई व त्याचा बोझा भारतीय लोकांवर पडत असल्यामुळे भारतीयांची दैन्यावस्था दिवसेंदिवस वाढतच गेली. रशियासारख्या अग्रगत राष्ट्राने भारतावर आक्रमण केले तर भारतावर संकट निर्माण होण्याची स्थिती उत्पन्न झाली असता भारतीयांनी इंग्रज सरकारला दिलेली मदत संयुक्तिक मानता येईल पण ते निमित्त घेवून सैन्यावर होणाऱ्या खर्चाचा बोजा सतत लादला जातो हे चुकीचे आहे असे इंग्रजांच्या व भारतीया यांच्या नजरेस आणून दिले. "फेर जमाबंदी आणि लष्करी खर्च यासंबंधी आपले विचार मांडले "७२

आर्थिक दृष्टीने केसरीमधूनच लिहिल्या गेलेल्या "इंग्रजी राज्याची उलट बाजू अथवा आमचे घोर दारिद्र्य".७३ या लेखात आगरकर म्हणतात की, " हिन्दुस्थानची राज्यसूत्रे वृद्ध महाराणी साहेबांनी आपल्या हाती घेतल्या पासून हिन्दुस्थानचे वित्त कृष्णपक्षातील चंद्राप्रमाणे क्षयास लागले असता... आमचे वित्त शुक्लपक्षातील चंद्राप्रमाणे वाढीत लागले आहे.... असा या लोकांना अलीकडील विलक्षण राज्य पध्दतीमुळे भ्रम होतो... इंग्लंडातारखे महात्मे आमची खरी स्थिती मोठ्या प्रयासाने समजून घेवून, आपल्या अपनीत बांधवांच्या ज्ञानचक्षूवरील भ्रमपटल यत्किंचित दूर करण्याचा प्रयत्न करतात" पण त्यांनाही देश द्रोही मानले जाते. इंग्रजी राज्यामुळे आमचे आर्थिक शोषण होत आहे. तेव्हा लोकांना आर्थिक दारिद्र्याच्या दुष्परिणामाची जाणीव करून देवून व्यापाराच्या बाबतीत भारतीयांनी स्वतः प्रयत्नशील राहिले पाहिजे असा मार्गही सुचवितात. "व्यापाराखेरीज तरणोपाय नाही" अप्रतिबंध व्यापार आणि उत्तेजन "नेटिव लोकांत इंग्रजासारखे धाडस कधी होईल:, उद्योगवृध्दी, समाजोन्नतीचा एक मुख्य घटक समाईतीन उभारलेल्या भांडवलाचे कारखाने"७४ मध्ये आगरकर लोकांना प्रोत्साहित करतांना म्हणतात की, "देशी माल वापरण्याचा निश्चय सर्वांनी करावा म्हणजे चारदोन वर्षांत इंग्लंडचे व्यापारी चीची करीत बसून हिन्दुस्थानात जिकडेतिकडे उद्योगच उद्योग

व कारखानेच कारखाने होऊन जातील"[७५] आगरकरांनी आपल्या आर्थिक विषयक लेखात भारतीय अर्थव्यवस्थेच्या सर्व बाजूंचा विचार करुन लेखन केले होते. समृष्ट सामाजिक जीवनात अर्थव्यवस्थेचे स्थान महत्वपूर्ण असल्यामुळे त्याकडे दुलर्क्ष करुन चालणार नाही. याची जाणीव करुन दिलेली आहे.

इ. स. १८७५-७७ ह्या काळात भारतात व महाराष्ट्रात भयानक दुष्काळ पडलेला होता. त्याकाळात साठ लाख लोक अन्नान्न करीत मरण पावली होती. त्यावेळी इंग्रजी सत्तेच्या बेपर्वाइचे, बेजबाबदारपणा, आर्थिक लुटालुटीचे वर्णन त्यांनी आपल्या लेखामधून तिरस्करणीय इंग्रजाची कृती या दृष्टीकोनातुन मांडलेली होती. इंग्रज सरकार आंतरराष्ट्रीय राजकारणामध्ये स्वतःची प्रतिष्ठा वाढविण्याकरीता लागणारे अर्थसहाय्य, मनुष्यबळाचावापर करतांना भारतीयावर गाजवीपेक्षा जास्त कर लावुन त्यांना दारिद्र्याखाली चिरत ठेवण्याचा प्रयत्न करीत आहेत. भारतातील साठ टक्के लोकांना पोटभर अन्न मिळत नसतांनाही इंग्रज सरकार त्याकडे दुलर्क्ष करुन भारतीय व्यापार नष्ट करुन, भारताची आर्थिक दशा हिन अवस्थेत नेत आहे, याकडेही त्यांनी लोकाचे लक्ष आकर्षित केले. भारतीय लोकांवर करांचे ओझे सतत लादले आहे. दर तीन वर्षांनी शेतसारा वाढवुन शेतकऱ्यांना शेतिविहीन केले आहे. स्वतःच्या चैनीसाठी : अगणित पैसा खर्च करुन आपले जीवन सुसज्ज ठेवण्याचा प्रयत्न करतात. या दृष्टीकोनातुन त्यांनी लिहिलेले लेख उपहासात्मक दृष्टीकोनातील आहे. "चैन, कराविषयी प्रथम संक्षिप्त विचार, करांविषयी कित्येक गंमतीचे प्रश्न"[७६] इ. . लेख इंग्रजी राज्याच्या कर योजनेविषयी माहिती देणारे लेख आलेले आहेत. त्यात दोषपूर्ण करपध्दतीमुळे भारताच्या सामाजिक जीवनावर झालेल्या दुष्परिणामांची चर्चा केलेली आहे तर " वाचाल तर चकीत व्हाल", ह्या पण त्याला काही धरबंध असु द्या", हिन्दुस्थानातील अन्नान्नदशेचे दुष्परिणाम" हिन्दुस्थानची तिजोरी आणि घाटत असलेला अन्याय"[७७] इ. अर्थविषयक लेखामधुन आगरकरांनी जगातील राष्ट्रांची तुलना भारताबरोबर करुन भारताचे अर्थजीवन ब्रिटिश सरकारने किती निकृष्ट दर्जाचे बनविले आहे याचे

वास्तव चित्रण केले आहे. आंतरराष्ट्रीय नाणेबाजारात रुपयाचे अवमुल्यन मोठ्या प्रमाणात होत असल्याचेही निदर्शनास आणले आहे. आर्थिक दृष्टिने हे अवमुल्यन भारतासाठी ब्रिटिश सरकारच्या आर्थिक स्वार्थी धोरणामुळे नुकसानकारक कसे ठरले आहे याचे विश्लेषण त्यांनी केले आहे. त्याप्रमाणे "हिन्दुस्थानास क्षय झाला"[७८] या लेखात ते म्हणतात की," ब्रिटिश लोकांनी जी राज्यपध्दती येथे घातला आहे ती नैतिक दृष्टीने जरी अत्यंत निर्दोष आहे, तरी द्रव्य दृष्टीने ती पराकाष्ठेची एकदेशीय आहे म्हणजे ती फारच थोडयाअंशानी हिंदु लोकांस हितावह आहे" आज आर्थिक दृष्टीने भारत जगात अत्यंत गरीब देश झालेला आहे. भारताचीं प्राचीन काळातील समृध्दीची गाथा वाचली जात आहे. त्याच्या शतांश भागाचे अस्तित्व भारतात राहिले असावे. जगाच्या दृष्टिकोनातुन भारताचा अर्थदृष्टया विचार करतांना आगरकर "वाचाल तर वचाल"[७९] या लेखात लिहितात की, " हिन्दुस्थानात प्रत्येक इसमा मागे वार्षिक उत्पन्न सारे वीस रुपये आहे. युरोपखंडातील संपन्न देशानी तुलना करता ग्रीस, इटली, रशिया वगैरे देश फार गरीब दिसतात. पण युरोपातील गरीबांतला गरीब देश हिंदुस्थानपेक्षा बायपट श्रीमंत आहे... युरोपातील देशांचा उत्पन्नाचा सारा भाग तेथील लोकांच्या निर्वाहाकडे किंवा उपभोगाकडे लागतो, आमच्या देशातील उत्पन्नाचा बराच भाग प्रतिवर्षी परक्या देशात जातो व त्याबद्दल एक कवडीचा देखील मोबदला आम्हांस मिळत नाही. म्हणजे या वीसापैकी पंधरा रुपये तरी आमच्या पोटात जात असतील किंवा नाही याचा संशय आहे. इंग्रजांच्या आर्थिकनिती बद्दल इंग्रज सरकारला आगरकर "कराविषयी प्रथम संक्षिप्त विचार" कराविषयी कित्येक गमतीचे प्रश्न", - - - - - "घ्या, पण त्याला नाही निबंध असु या"[८०]यात म्हणतात की," तुम्ही आमचे राज्य करता त्याअर्थी आमचा पैसा तुम्ही घ्या पण त्याला काही तरी धरबंद असु द्या, येवढेच आमचे त्यांना सांगणे आहे. करपध्दती, व्यपारी धोरणात ताळमेळ ठेवुन भारताच्या अर्थव्यवस्थेत

स्थिर ठेवणे आवश्यक आहे याची जाणीव करुन देतात. भारतात दरवर्षी दुष्काळापेक्षाही सार्थीच्या तापाने मेलेल्यांची तपशीलवार यादी सांगुन, उपासमारीने इंग्रजांच्या काळातील भारतीयांच्या मृत्यूबद्दल खेद व्यक्त करुन आगंतुक कारणापासुन होणाऱ्या मनुष्यहानीला ब्रिटिश सरकार जबाबदार असल्याचे स्पष्ट केले आहे. त्यापेक्षा पेशवाई व बादशाहाच्या काळातील राज्ये तरी सुखी होती असे प्रतिपादीत करुन "हिंदुस्थानातील अन्नान्नदशेचे दुष्परिणाम"[८१] या सदराखाली लिहिले की, "इंग्रजी राज्यात पोटभर अन्न तर मिळत नाहीच, उपास मारीत अनेक रोगांचा प्रादुर्भाव होऊन लोक निष्कारण मरतात. संग्राम स्वरुप आगंतुक कारणाने युरोपखंडात सत्पान्नव वर्षात जितकी मनुष्ये मेली तितकी या हतभाग्य हिन्दुस्थान देशात फक्त आठ वर्षांच्या आत तापाच्या आगंतुक सायीत बळी पडली" तसेच भारतातील उत्पादन भांडवल निर्यातीमुळे येथील लोकांची स्थिती दयनीय बनलेली आहे. येथील उद्योगधंदे बंद पाडणे हे स्वार्थाकरीता जरी केले असले तरी त्याचे दुष्परिणाम त्यांच्यावरही होवु शकतात असा इशारा त्यांनी "भांडवल गेले व्यापार गेला"[८२] या लेखात केलेला आहे." इंग्लंडने आमचे व्यपार आटोपले असल्यामुळे, आमचे केवढे नुकसान होत आहे हे जोपर्यंत इंग्लंडचा माल येथे खपत आहे तोपर्यंत इंग्लिश व्यपारी मनात कशासाठी आणतील ? ज्या वेळेस येथे एखादा मोठा दुष्काळ पडुन किंवा टाईम्स ऑफ इंडियाने म्हटल्याप्रमाणे, दरिद्र्याने पिळुन काढलेल्याला व भुकेने गांजुन गेलेल्या लोकाचे एखादे प्रचंड बंड होवुन त्याच्या व्यापारात एकाएकी मोठा धक्का बसेल व कोटयावधी रुपयाचे नुकसान होईल, तेव्हा कोठे त्यांचे डोळे उघडणार". अशा रितीने भारतीय अर्थव्यवस्थेचा सखोल विचार करुन इंग्रज सरकारच्या आर्थिक धोरणावर त्यांनी परखडपणे लिखाण केले आहे. ब्रिटिशांनी भारतात सुरु केलेल्या रेल्वे दळणवळणामुळे अनेक फायदे झाले असले तरी येथील खाजगी रेल्वे कंपन्यांनी चालविलेल्या जुलमी कारभाराचे वाभाडे आगरकरांनी आपल्या लेखांमधुन काढले. कारखान्यातील

कामगारांप्रमाणेच रेल्वे कामगारांची स्थिती दयनीय होती. रेल्वे कंपनीतील गैरव्यवहाराकडे सरकारने लक्ष द्यावे असे सरकारला आव्हान केले त्याचबरोबर कामगारांनी आपल्या मानवीय हक्कांसाठी संघटित होऊन एकत्रित येण्याची गरज प्रतिपादित केली होती. कामगार संघटनेबाबत त्यांचे विचार महत्वपूर्ण आहेत . मानवी दृष्टिकोनातून आर्थिक धोरणाच्या विचार मांडलेला आहे. त्यावेळी आगरकरांच्या सुधारक बरोबरच्या इतर वृत्तपत्रानेही इंग्रजांच्या आर्थिक धोरणावर टिका केली आहे" पायोनियर "इंग्लिशमन" सारखे वृत्तपत्र आघाडीवर होते. मुंबई, मद्रास, कलकत्ता सारख्या शहरावरून देशाच्या आर्थिक स्थितीचे मुल्यमापन जे विदेशी ब्रिटिश प्रतिनिधी करीत त्यांनाही भारतातील खेड्यापाड्यात जावून त्यांच्या वास्तव जीवनाचे अवलोकन करण्याचा सल्ला आगरकरांनी दिला आहे. टोरी पक्षातील इंग्लड पार्लमेन्टच्या लोकांना उद्देशून त्यांनी हेच म्हटले होते. तेथील व्हिग पक्ष भारतातील चळवळीला अनुकूल असला तरी टोरीपक्षाने साम्राज्यवादी दृष्टीकोनातून भारताचे वर्चस्व कायम टिकविण्यावर जोर दिलेला होता. त्यामुळे भारतातील राजकीय आर्थिक परिस्थितीचे विवेचन पार्लमेन्टमध्ये दोषपूर्ण करीत असत. पण त्याचाही समाचार घेण्यास ब्राईट, मेकॉले, रिपन डंडला, ह्यूम सारखे राजनितीतज्ञ समोर येत याबद्दल आगरकरांनी कृतज्ञताही व्यक्त केली आहे.

भारतासारख्या विशाल देशामध्ये प्रशासनव्यवस्था सुरळीत चालविण्यासाठी ब्रिटिश सरकारला स्थानिक लोकांची मदत आवश्यक असल्याने सरकारी कार्यासाठी प्रशिक्षण देण्याच्या उद्देशाने काही परिक्षा घेतल्या जात, तिच्हील सर्विस मार्फत राज्य कारभातील अनुभव भारतीयांना मिळावा यासाठी इंग्लंडमध्ये पाठविले जाई पण ह्या प्रशिक्षणासाठी मात्र वय व शिक्षणाची अट जाचक स्वरुपाची असल्याने, बहुतेक भारतीय तरुण योग्यता असतानाही त्यात प्रवेश करू शकत नसत व त्यापासून वंचित राहत. या

विषयावर लोकशिक्षणाच्या दृष्टीकोनातून आगरकरांनी प्रकाश टाकलेला आहे. "हिंन्दुस्थानचे राज्य कोणासाठी, अथवा सिव्हिल सर्व्हिससाठी समकालीन परिक्षा"[८३] या लेखात ते म्हणतात की, "नेटिव लोकांस सरकारी नोकरीत किती घ्यावे आणि किती घेवु नये याविषयी साहेब लोकांत जी चर्चा चालते तिचे बाह्य स्वरुप कसेही असले तरी, तिच्या मुळाशी हिन्दुस्थानचे राज्य कोणासाठी करावयाचे हा मुख्य प्रश्न असतो". भारतीयांच्या मध्ये राज्य करण्याची कुवत नाही किंवा ते याकरीता योग्य नाही असा त्यांच्या चर्चेचा विषय असल्याने त्या परिक्षाबाबत जास्तीत जास्त जाचक अटी ठेवुन कमीत कमी त्या लोकांना संधी देण्याचा प्रयत्न केला आहे. ही परिक्षा इंग्लंडमध्ये होत असल्यामुळे आर्थिक प्रश्नामुळे सर्वसामान्य वंचित राहतील हाही दृष्टिकोन असावा असे आगरकरांना वाटत होते. गुलामगिरीच्या सवयीमुळे भारतीयांना स्वतंत्ररित्या राज्य करता येईल किंवा नाही याबाबत ब्रिटिश साम्राज्य साशंक होते. साम्राज्यतृष्णा प्रबळ असल्याने भारतीयांना सवलती देण्यास टाळण्याची प्रवृत्ती इंग्रजांची बनलेली होती. या प्रवृत्तीवर आगरकरांनी ब्रिटिश मानसिकतेचे अवलोकन केले आहे. "राज्यकर्त्यांनो ! लोभमुलानि पापानि" हे वचन नित्य ध्यानात ठेवा", अति तृष्णा न कर्तव्या चक्र भ्रमति मस्तके हलवायाचे दुकानावर ब्रम्हार्पण"[८४] यासारखे उदाहरण देवुन सारखे मिश्किल कोपरखळी मारणारे लेख लिहुन इंग्रज सरकारलाही सत्य सांगण्याचा प्रयत्न केला आहे. सिव्हील सर्विस संबंधात केसरीमध्ये आगरकरांनी १ एप्रिल ते १२ ऑक्टोंबर ८६ पर्यंत सिव्हिल सर्विस १-२-३-४-५, लॉर्ड लिटन व सिव्हिल सर्विसेस, लॉर्ड लिटनचे कृष्ण कारस्थान, विलक्षण कोटीक्रम लॉर्ड लिटन व सिव्हिल सर्विस". असे अनेक लेख लिहुन सिव्हिल सर्विसच्या प्रश्नाचा पाठपुरावा केलेला होता व लोकजागृती घडवुन आणण्याचा प्रयत्न केला होता. सुधारकातही १८ जुन १८९३ ला या संबंधात "वेळ मोठी आणीबाणीची आहे, स्वस्थ बसाल तर फसाल"[८५] या लेखात ब्रिटिशांच्या या सर्व्हिसविषयी चाल-ढकलीच्या प्रवृत्तीवर कठोर प्रहार केले आहे" "अनाथांचा वाली कोणी नाही"[८६]

या लेखामधून इंग्रज सरकारने शिक्षणाच्या खर्चावर आणलेल्या नियंत्रणासंबंधी विश्लेषण करून इंग्रजीनच्या दंडुकेशाहीवर कोरडे ओढले आहे. शाळा कॉलेजची फी वाढवून सरकारी शिक्षण खर्चात कपात करून देशाचे शैक्षणिक नुकसान करण्याच्या कृत्यावर आघात केले आहे. उपहासाने लिहिताना आगरकर म्हणतात की, "आम्ही तुमचे स्वातंत्र्य नाहिसे केले, पण त्याबद्दल पाश्चिमात्य ज्ञानाचे सारे भांडार आम्ही तुम्हांस अर्पण केले" ही जी इंग्लिश लोकांची आजपर्यंतची गर्वोक्ती होती त्याचे काय होईल" असा खवचट प्रश्न त्यांनी विचारला आहे. भारतीयांमध्ये ब्रिटिशांच्या तोलामोलाची नसली तरी थोडी कुवत असेल तर काही काळाने ब्रिटिशांकडून राज्य हिरावून घेतील" असे भविष्यही "चिमाबाईचे रमाबाईचे सख्य होणार कसे"[८७] या लेखात वर्तविले गेले होते. त्यांनी भारतीय व ब्रिटिश समाजपध्दती, जीवनपध्दतीतील फरक लक्षात घेता त्या स्तरापर्यंत पोहचायला वेळ लागेल. पण भारतीय केव्हातरी स्वराज्य मिळवतील असा आशावाद त्यांना होता. त्यासाठी लोकशिक्षण समाजसुधारणा, राजकीय/धार्मिक सुधारणा व आर्थिक प्रश्नांची सतत चर्चा करून लोकजागृती घडवून आणली तर हे कार्य पन्नास वर्षांतही होऊ शकेल व नवीन भारत सुदृढ स्वराज्य निर्माण होण्यास मदत होईल असा आशावादी दृष्टिकोन त्यांनी ठेवला होता.

इ.स. १८८५ ते १८९५ ह्या दशकात "आधी सामाजिक की आधी राजकीय सुधारणा" हा वाद निर्माण झाला होता. हा वाद राष्ट्रीय सभेच्या स्थापनेपासूनच सुरु झाला होता. पण तो प्रामुख्याने मलबारी शेठजींच्या सम्मती वयाच्या बिलामुळे पुढे आला. टिळक आणि आगरकर ह्या दोन मित्रांनी आपल्या सार्वजनिक कार्याला एकाच वेळी सुरुवात इ.स. १८८१ पासून केली होती. सात वर्षांपर्यंत दोघांनीही महाराष्ट्रात जनजागृती आपल्या समान ध्येयाने घडविली होती पण दोघांच्याही ध्येयाच्या संकल्पना भिन्न असल्याने

जास्त काळ सौख्य होणं अशक्य असल्याने इ.स. १८८७ पासून दोघांच्या विचाराचे मतभेद महाराष्ट्रभर गाजले. वृत्तपत्रातून एकमेकांवर आरोप करण्याची मजल खालच्या स्तरापर्यंत पोहचली होती. त्यामुळे वाचकही त्यांच्या वृत्तपत्राला काही काळ कंटाळले होते. आगरकरांनी दुसरे "सुधारक" वृत्तपत्र काढल्याने आगीत तेल ओतल्यासारखे झाले व तत्कालीन परिस्थितीचे दिग्दर्शन वृत्तपत्रातून न होता एकमेकांवर आरोप प्रत्यारोप सुरु झाले होते.

आगरकरांना सरकार सामाजिक सुधारणा करण्यास अनुकूल होत आहे पाहून कायद्याने सुधारणा अमलांत आणली तर समाज त्या सुधारणेला विरोध करीत असले तरी सरकारच्या दडपणाखाली, शिक्षेच्या भितीने कायद्याचे पालन करणे लोकांना भाग पडेल व हळूहळू मतपरिवर्तन होवून समाजातील रुढीचे उच्चाटन होईल. त्याचबरोबर शिक्षणाच्या माध्यमातून समाजसुधारणेबरोबरच राजकीय जागृती निर्माण होवून समाज स्वराज्य प्राप्तीसाठी अग्रसर होईल, असा त्यांना विश्वास वाटत होता. आगरकरांनी समाज सुधारण, धार्मिक सुधारणा, राजकीय, आर्थिक सुधारणा हे सर्व केवळ व्यवस्थेचे स्वरुप मानले होते. टिळकांनी सुरुवातीपासूनच सरकार विरोधी भुमिका स्विकारल्याने कायद्याच्या आधारे समाजसुधारणा त्यांना नको होत्या. लो. टिळकांनी आपल्या संस्कृतीच्या अभिमानाच्याच परंपरागत पायावर जहाल राजकारणाचा पाया घातला तर आगरकरांच्या जहाल राजकीय विचारांचा पाया केवळ स्वातंत्र्य, समता आणि सत्यनिष्ठतेची सार्वत्रिक आकांक्षा यावर होता.

आगरकर समाजसुधारणेबद्दल जितके जागृत होते तितकेच राजकीय सुधारणेबद्दलही होते. म्हणून त्यांना रानडे यांच्या प्रमाणेच राष्ट्रीय सभेतही सामाजिक प्रश्न घेतले जावे असे वाटत होते. त्यांनी सुरु केलेल्या वृत्तपत्रात "सुधारक काढण्याचा हेतु"[८८] या पहिल्या अग्रलेखात मुळ प्रकृती म्हणजे "भारतीय आर्यत्व न सांडिता" या पाश्चिमात्य नविन शिक्षणाचा

व त्याबरोबर ज्या नविन कल्पना येत आहे त्याचांही आम्ही योग्यरितीने अंगिकार करीत गेलो, तरच आमचा निभाव लागणार आहे" असे स्पष्टपणे सांगून आपल्या देशाच्या उत्कर्षासाठी कायद्याने समाज सुधारणा करण्यात काहीच हरकत नसावी याचा आग्रह धरुन ते पुढे म्हणतात की," कोणीतरी आस्तित्वात असलेल्या लोकमतातील दोषास्पद दाखविण्याचे व समाजातील बहुतेक लोकांत अप्रिय परंतु फलकारक असे विचार त्यांच्यापुढे आणण्याचे, अनभिमत काम करण्यात तयार झाले पाहिजे". या कार्यासाठी स्वतःची लेखणी त्यांनी आकृष्मार झिजविली होती, सुधारकाच्या स्थापने मागे त्याचे ध्येय स्वराज्य प्राप्ती हेच होते पण मुलगामी दृष्टीकोनातून ते ध्येय प्राप्त करण्याचा मार्ग वेगळा होता. "मूळ पाया चांगला पाहिजे"[८९] यालेखात ते म्हणतात की " धर्मसुधारणा, आचार सुधारणा, राजकीय सुधारणा वगैरे वर्ग केवळ व्यवस्थकरिता केलेले आहेत. त्यापैकी अमुक्यात एक नंबर, अमुकात दुसरा नंबर अमुकात तिसरा नंबर असे काही ठरविता येणार नाही. ते सर्व मनुष्याच्या वेगवेगळ्या व्यवहाराचे व्यंजन होत, व त्या सर्वांची एका समयावच्छेद करुन सुधारणा होत जाणे म्हणजेच मनुष्यांची किंवा त्यांनी वसविलेल्या राष्ट्रांची सुधारणा झाली असे म्हणतात येईल" त्यांना समाजाला योग्य मार्ग दाखवून, सुदृढ करुन एक समये स्वराज्य निर्माण करावयाचे होते. त्यांनी सामाजिक सुधारणेचा पुरस्कार केला असला तरी राजकीय सुधारणेत मागे नव्हते. त्यांनी व्यक्तिस्वातंत्र्यावर आधारित, विवेक बुध्दी प्रामाण्याच्या सहाय्याने मानवी जीवनाचे ऐहिक सुसंवर्धन केले व, समाजाचा सर्वांगीण विकास करुन, स्वराज्याच्या प्राप्तीने सुराज्य निर्माण करावे ध्येय ठेवले होते. त्यासाठी ते एकाकी आजन्म लोकांची अवहेलना, राग सहन करीत लढत आपला लेखणी चालवित राहिले.

कोणतीही समस्या हाताळतांना त्यांची स्वराज्यवादी भूमिका कुठेही सुटली नाही. "सामाजिक सुधारणा आणि कायदा", कायदा मागता ते जात का मागत नाही, " सामाजिक सुधारणेत अत्यंत अनुकूल काळ – २, आमचे दोष

आम्हांस केव्हा दिसु लागतील, आता धर्माभिमानी कैसकी जात करणार म्हणतात, सक्त सुशिक्षितास विचारणा महाराष्ट्रीयांस अनावृत्त पत्र, "बोलके सुधारक, चालते सुधारक व सुधारणा निंदक" इ.[१०] त्यांनी लेखांमधुन आपली भुमिका स्पष्ट करुन ऽ-याअर्थाने पारतंत्र्यातुन सुटका करण्यासाठी आवश्यक वाटणा-या गोष्टींना अग्रक्रम दिलेला आहे. प्रथम राज्य टिकविण्यास आवश्यक असलेल्या गुणांचे संवर्धन करणे व लोकांतील दोषांचा नाश करुन स्वराज्य प्राप्त करण्याचे व रक्षण करण्याचे सामर्थ्य उत्पन्न करणे या गोष्टीचा पाठपुरावा करणे आवश्यक आहे. असे आगरकरांना वाटत असल्याने त्यांनी आपले विचार वृत्तपत्रातुन निर्भयपणे मांडले. "सामाजिक सुधारणेस अत्यंत अनुकुल काल - २"[११] मध्ये आगरकर आपले विचार प्रगट करतांना म्हणतात की "ज्याप्रमाणे व्यक्ति कुटूंबाचे घटक होत, त्याप्रमाणे कुटूंब राष्ट्राचे घटक होत. कुटुंबे सुधारण्यावाचेरिज राष्ट्र सुधारणा किंवा राजकीय सुधारणा कधीच व्हावयाची नाही " सामाजिक, राजकीय वादा मध्ये पडण्याची आगरकारांची इच्छा नव्हती, पण समाजाला कोणी अदुरदृष्टीने स्वराज्यप्राप्तीचे मार्ग दाखवित असतील, त्यांना विरोध करुन समाजाचे, देशाचे हित साधणे हा त्यांचा हेतु होता. हा वाद कित्येक वर्षे चालतच राहिला. आगरकारांनी आपल्या लेखांतुन प्रसंगानुरुप "जहाल राजकीय भुमिका" कायम ठेवली होती. ही भुमिका इलबर्ट बिल व भारतीय वृत्तपत्रांची गळचेपी करण्याचा प्रयत्न केला तेव्हा "राजकीय संविधानाचे अपायकारकत्व "गोरे गुन्हेगार, काळे न्यायाधिश वर्तमानपत्रे, इंग्रजी राज्यात ना दाद ना पुकार"[१२] इ. लेख राजकीय हक्काची मागणी केली होती. आगरकरांना सुराज्याची गरज भासत होती. त्यांचे विचार आजच्या काळातही दुरगामी ठरलेले दिसतात.

आगरकरांनी राजकीय विचारांच्या संबधात हिन्दु-मुस्लीम प्रश्नाकडे गंभीरतेने पाहिले होते, १९व्या शतकाच्या अखेरीला राजकीय प्रश्नांनी उग्र स्वरुप धारण करण्यास सुरवात केली तेव्हा ब्रिटिश सरकारने "Divine and rule" या नितीने भारतीयाचे ऐक्य नष्ट करण्याचा प्रयत्न केला.

सुरवातीला राष्ट्रसभेला ब्रिटिश सरकारने लोकक्षोभ सौम्य मार्गाने बाहेर पडावा या दृष्टीने प्रोत्साहन दिले पण अल्पावधीतील तिचे यश पाहून ब्रिटिश सरकारने त्याकडे साशंक नजरेने पाहू लागले आणि राष्ट्रीय सभा ही जनतेची प्रतिनिधीक सभा नसून सरकारी नोकरीत शिरकाव न झाल्याने असंतुष्ट व अल्पसंख्यांक हिन्दू सुशिक्षितांची संख्या आहे अशी टिका करुन मुस्लीम जनतेला चिथावण्यास सुरवात केली. त्यामुळे हळूहळू मुस्लीम लोक सभेतून बाहेर येवू लागल्यावर हिन्दु-मुस्लीम दंगे घडवून आणण्यात ब्रिटिश सरकारने पुढाकार घेतला. बद्रुद्दीन तय्यबजींना राजकीय उद्देश प्राप्तीकरणा-साठी राष्ट्रीय सभेचा मार्ग योग्य वाटत होता. त्यांनी मुस्लीम बांधवांना राष्ट्रीय सभेला पाठिंबा देवून ऐक्य साधण्याचे आणि देश स्वतंत्र करण्याच्या प्रयत्नात सहभागी होण्याचे आव्हानही केले होते. शेकडो वर्ष एकत्र राहूनही या दोन समाजात एकमेकांबद्दल दुजाभाव व अविश्वास होता. ऑगस्ट १८९३ ला पुण्यात हिन्दु-मुस्लीमांचा पहिला दंगा झाला त्यानंतर अनेक ठिकाणी दंगे घडून आले, याप्रसंगी आगरकरांनी ऐहिकनिष्ठ, धर्म, निरपेक्ष, राष्ट्रीयत्वाच्या भावनेने काही लेख लिहिले होते व सामंजस्याची भूमिका ठेवण्याची विनंती देशवासीयांना केली होती.

इ.स. १८५७ च्या राष्ट्रीय क्रांतीनंतर सामाजिक, राजकीय प्रश्नांच्या संदर्भात होणाऱ्या विचार प्रवाहातून वेगवेगळे मत प्रवाह निर्माण होत असले तरी त्याला सांप्रदायिकतेची झळ लागलेली नव्हती. दोन्ही समाजात वैचारिक मतभेद असले तरी सामंजस्य होते. पण राष्ट्रीयसभेच्या उत्कर्षामुळे ब्रिटिश सरकारने धूर्तपणे इ.स. १८९० पासून हिन्दु-मुस्लीम समाजात फूट पाडण्यास सुरवात केली. त्याचे पहिले प्रतिबिंब १८९१ ला उमटलेले होते. आगरकरांनी यावर "हिन्दु व मुसलमानांत तंटे कां होतात", धर्मसंग्राम अथवा गृहकलह, अशाने निभाव कसा लागेल, हिन्दु व मुसलमान यांचे ऐक्य कशाने होईल, "हे विचारीपणाचे लक्षणव्हे", हिन्दु लोकांची अविश्वसनियता"[९३] इ. लेख लिहून भावी स्वराज्याच्या

दृष्टीने दोन्ही समाजाच्या एकात्मतेची आवश्यकता प्रतिपादित केली आहे. त्याचे दोन्ही धर्म विषयक विचार राष्ट्रवादी स्वरूपाचे होते. समाजाचे दुर्भंगणे हे देशहिताच्या दृष्टीने घातक ठरेल असे त्यांना वाटत होते. आगरकरांनी ह्या दंग्याबाबत समंजस आणि सुजाणपणाची भूमिका घेतली

"हिन्दू व मुसलमान यांचे ऐक्य कशाने होईल"[९४] या १८ सप्टें १८९३ च्या लेखात आगरकरांनी मुस्लीमबांधवांना उद्देशून म्हटले की, "हिन्दू मुस्लीमांनी भावाभावाप्रमाणे वागून सामाजिक व राजकीय ऐक्य दाखवून स्वराज्यासाठी, लोकशाहीला यशस्वी करण्यासाठी एकत्रीत राहण्यातच दोघांचे हित आहे असा सल्ला दिला होता. "इंग्रजाच्या "दुही माजवा आणि राज्य करा" या तत्वाचा अवलंब इंग्रजी राज्याच्या चिरस्थाई केसाठी करताना एका जातीस व्यर्थ महत्व देऊन, दुसरीचा नाहक पाणउतारा करणे हे नोकरशाहीचे वर्तनसूत्र होऊन बसते. आणि म्हणून प्रसंगविशेषी मुसलमान लोक आपल्या उपयोगी पडण्यासारखे आहे, तेव्हा विशेष आयास वागून त्यांची मैत्री संपादून ठेवता आली तर तसे करणे आपले कर्तव्य आहे असे समजतात". इंग्रजाचा धूर्त डाव लोकांना दाखवून आगरकर पुढे त्यांची समजूत काढतांना म्हणतात की, " दास्य हे दोघांच्याही कपाळी आले आहे व दोघांनाही आपआपल्या उन्नतीचा उपाय करणे जरुर आहे.—— मुसलमानांनी पारशी लोकांप्रमाणे हिन्दू लोकांचा हेवा करणे सोडून देऊन एकंदर सा–या गोष्टीत विशेषतः राजकीय गोष्टीत एकमेकांच्या हातात हात घालून चालले पाहिजे —— इंग्रज सरकारने त्यांच्यावर कितीही मेहेरबानी केली तरी तीपासून त्यांचा विशेष फायदा होण्यासारखा नाही हे विशेष ध्यानात ठेवा.—— इस्माईल खानासारख्यांचा नाद सोडून द्या. आ. मि बद्रुद्दीन तय्यबजी सारख्यांच्या सल्ल्याने वागू लागा म्हणजे थोड्या काळात सर्व काही ठीक चालू लागेल" असा कळकळीचा सल्ला दिलेला आहे.

हिन्दू-मुस्लीमांचे गत काळातील संबंध कसेही असले तरी सध्या भारताचे भविष्य दोघांच्या सामंजस्यावर अवलंबून आहे. दोघांमधील मतभेदाने इंग्रजाचे

राजकारण साधणार आहे. तेव्हा "लंडन टाईम्स" सारख्या विद्वेषी वृत्तपत्रामध्ये इस्माईलखानच्या कडव्या व दुराभिमानी वत्र प्रचाराला प्रसिद्धी देऊन आगीत तेल ओतण्याचे कार्य केले होते त्यावेळी लोकांना शांत करण्याचा प्रयत्न आगरकर करीत होते. आपल्यात धर्मकलह निर्माण करणाऱ्या ब्रिटिश राज्यात धर्मकलह होत नाही का ? असा सवालही त्यांनी केला होता. शतकानुशतके युरोपातील अनेक देशात धर्मकलह झालेला आहे. तेव्हा त्याचा बाऊ करण्याचे कारण नाही हे सांगताना "हिन्दू व मुसलमानात यांच्यात तंटे का होतात" [१५] या लेखात म्हणतात की, "हिन्दू व मुसलमान यादोन निराळ्या धर्मांच्या लोकांत धर्मवेडामुळे आजपर्यंत जितका रक्तस्त्राव झाला आहे, त्याहून अधिक रक्तस्त्राव ख्रिस्ती धर्मांच्या २ सटात झाला आहे " इंग्रज लोक भेद नीतीने आमच्यामध्ये फूट पाडून टीकेकाव आम्हाला गुलामगिरीत ठेवण्याचा प्रयत्न करीत आहेत. पण शिक्षण व लोक जागृतीने आमच्यामधील तंटे कमी होवून आपण केव्हातरी पाशवी सत्तेवर उलटू" असा आशावाद प्रगट केला आहे. त्याचप्रमाणे इंग्रजसरकारलाही त्याच्या कर्तव्याची जाणीव करून दिली आहे. जातीय दंगल झाली तर त्याची ताबडतोब दखल घेवून राज्यात शांतता प्रस्थापित करणे सरकारचे कार्य होय. दंगलीबाबत सरकार[?] दोष पूर्ण भूमिकेवर त्यांनी टिका केली आहे.

अशाप्रकारे आगरकरांची राजकीय आणि आर्थिक विचारसरणी "जहालवादी स्वराज्याची" होती. त्यांनी समाजाचे कुशल राहून त्यात अधिकाधिक उन्नतावस्था येण्यात जेवढी बंधने अपरिहार्य वाटतात तेवढीच ठेवून व्यक्ती विकासाव्दारे स्वातंत्र्य मिळवून स्वराज्य चिरकालीन टिकविणे हेच त्यांच्या लोक शिक्षणाचे व समाज कार्याचे ध्येय होते. आगरकरांना वाटत होते की, लोकशिक्षणाच्या माध्यमातून आणि लोकांच्या सम्मतीनेच समाजात परिवर्तन घडून येऊ शकते" याच भूमिकेतून त्यांनी समाज प्रबोधनाचे कार्य केले. त्यांच्या राजकीय, आर्थिक विचारांमध्ये लोकजागृतीचा उद्देश स्पष्ट दिसतो. सतत लोकांनी राजकीय बाबतीत विशेषत: परकीय सत्तेच्या

कामात सार्वजनिकीने सरकारी ध्येय धोरणावर लक्ष ठेवले पाहिजे. पण त्याच प्रमाणे स्वत:मध्ये व समाजातही सुधारणा घडवुन आणण्यास पुढाकार घेतला पाहिजे असा त्यांचा आग्रह होता. भारतातील सर्व लोकांनी एक राष्ट्र, एक देश या उद्देशाने सुधारणांचा पाठपुरावा केला तर समाजात द्रुत गतीने जनजागृती होवुन देशाला स्वतंत्र्य मिळण्यास फारसा काळ लागणार नाही, आणि लवकरच भारत हे राष्ट्र जगातील वैशिष्टय पूर्ण राष्ट्र ठरेल असा त्यांना आशावाद होता. पण त्यासाठी लोकांनी भेदाभेद करुन जाती धर्माचे तटे निर्माण केले तर एका दुभंगलेल्या स्वरुपात भारताची निर्मिती होईल ही भिती त्यांना वाटत होती. स.मा.गर्गे यांच्या सारख्याज्येष्ठ विचारवंताने आगरकर स्मृती शताब्दी समारोहच्या शृंखलेतील फर्ग्युसन कॉलेजच्या कार्यक्रमात आगरकरांच्या राजकीय विचाराबद्दल बोलतांना म्हटले की, हिन्दु-मुसलमानांच्या समस्येवर आगरकरांनी बुध्दिवादी दृष्टिकोनातुन मार्मिक चर्चा केली आहे. त्यांच्या विचारांचा परामर्श घेतांना शेवटी म्हणतात की, " आगरकरांनी आपल्या वृत्तीचा समतोल पणा न सोडता या प्रश्नांवर चर्चा केली आहे. एच.एम इस्माईलखान नावाच्या कडव्या प्रवृत्तीच्या गृहस्थाने "लंडन टाईम्स"मध्ये राष्ट्रीय सभेसंबंधी व हिन्दु विरोधी भडक प्रक्षोभक लिखाण केले होते, त्यावर उत्तर देतांना आगरकरांनी लिहिले की, "मुस्लिम लोकांचा खरा तरणोपाय हिन्दु लोकांशी एकमत करण्यात आणि जोडीने ज्ञान, संपत्ती व राजकीय हक्क संपादण्यात आहे, असे आम्हास वाटते. म्हणून उभयतांनी सख्या भावाप्रमाणे वागण्यातच मुस्लिमांचे कल्याण आहे. याकरिता इस्माईल खानांसारख्यांचा नाद सोडून बद्रुद्दीन तैयबजी सारख्यांच्या तंत्राने वागणे त्यांच्या हिताचे ठरले" असे विचार ऑक्टो.१८९३ मध्ये आगरकरांनी मांडले पण त्यांची ही सदिच्छा अर्थात सफल झाली नाही, हे पुढच्या काळातील राजकीय घटनांवरुन दिसते."[९९] आगरकरांनी समाज प्रबोधनाचे, लोकशिक्षणाचे कार्य करतांना सामाजिक सुधारणांवर भर दिला असला तरी राजकीय, धार्मिक, आर्थिक, सामाजिक इत्यादी सुधारणांपैकी कोणत्याही एका सुधारणेला अग्रक्रम देवुन

त्याकडे लक्ष केंद्रित करणे त्यांना मान्य नव्हते. सुधारणाचे वर्गीकरण हे केवळ व्यावहारिक व्यवस्थेसाठी निर्माण केले जाते. सामाजिक, राजकीय, आर्थिक, धार्मिक या सर्व प्रकारच्या सुधारणा एकाच वेळी होत गेल्यास मानवाची, समाजाची सर्वांगीण सुधारणा होईल असा त्यांना विश्वास होता. काला नुसार, गरजेनुसार (सुधारणाचे वर्गीकरण न करता) तत्कालीन समस्येवर भर देऊन त्या समस्याचे निराकरण केल्यास समाजसुधारणा योग्य प्रकारे होवू शकेल असे आगरकरांना वाटत होते. त्यांचे राजकीय व आर्थिक विषयावरील विचार सामाजिक व धार्मिक विषयांइतकेच मुलगामी, दृष्टेपणाचे होते. त्यामुळे त्यांचे सर्व विचार चिरंतन ठरले आहेत. पण आपले राजकीय, आर्थिक विचार प्रगट करतांना समाजाचे नेतृत्व जनतेसमोर येवून करू न शकल्यामुळे ते "उपेक्षित सुधारक" म्हणून ओळखले जावु लागले.

## प्रकरण - ३ रे

**संदर्भ :**

१) B.R. Ambedkar, Ranade, Gandhi and Jinnah, (Jullundur : 1964), P.27

२) गं.बा. सरदार, रानडे प्रणीत सामाजिक सुधारणेची तत्त्व मिमांसा, (पुणे : १९७३), पृ. ८४-८६

३) M.G. Ranade, Miscellaneous Writings, (Bombay:1915), P 208 (यानंतर या पुस्तकाचा उल्लेख M. G.Ranade, M.Writings असा होईल)

४) कित्ता, पृ. २८४

५) जावडेकर, आधुनिक भारत, पृ. १३५.

६) न.चिं. केळकर, लो. टिळक यांचे चरित्र, पूर्वार्ध, , पृ. ८१

७) Ranade, M.Writings, P.231-232.

८) फाटक, न्या. रानडे यांचे चरित्र, पृ. ३५४-३५५.

९) बा.गं. टिळक, लो. टिळकांचे केसरीतील लेख, खंड ४ था, (पुणे : १९२८), पृ. २८३-२८६.

१०) जावडेकर, आधुनिक भारत, पृ. १३१

११) M.G.Ranade, Essays on Indian Economics, (Madras:1916), P.31 (यानंतर या पुस्तकाचा उल्लेख Ranade, Essays on Indian Economics असा येईल)

१२) कित्ता, पृ १३

१३) गोविंद तळवलकर, विराटज्ञानी न्यायमूर्ती रानडे, (पुणे : १९८९ ),पृ.५०

१४) वा.बा. ठाकूर, न्या.रानडे याचे चरित्र, पृ ७४-७५.

१५) फाटक, न्या. रानडे याचे चरित्र, पृ. १५९-१६०..

१६ ) किता, पृ. २३७

१७ ) द.गो. कर्वे, स्वतंत्र भारताचे द्रष्टे न्या. म.गो.रानडे ,(पुणे : १९४२), पृ. १७, (यानंतर या पुस्तकाचा उल्लेख कर्वे, स्वतंत्रराष्ट्राचे द्रष्टे - रानडे असा येईल)

१८) फाटक, न्या. रानडे याचे चरित्र, पृ. ३१

१९) जावडेकर, आधुनिक भारत, पृ. १४०-१४१.

२०) किता, पृ. १४१.

२१) Ambedkar, Ranade-Gandhi and Jinnah, पृ. ११-१२.

२२) Tucker, Ranade, P. 142-143.

२३) फाटक, न्या. रानडे याचे चरित्र. पृ. २०६.

२४) गो. तळवलकर, नौरोजी ते नेहरू, (मुंबई : १९६९), पृ. ३६.

२५) जावडेकर, आधुनिक भारत, पृ. १५८

२६) गो.ग. आगरकर, केसरीतील निवडक निबंध, पुस्तके १ ले,(पुणे : १९३७) पृ. २४-२५.

२७) नलिनी पंडित, आजकालचा महाराष्ट्र, (पुणे : १९७२), पृ. ७५.

२८) P.J. Jagirdar, Mahadev Govind Ranade (Delhi:1972), P. 130.

२९) Tucker, Ranade, P.119.

३०) कर्वे, स्वतंत्र भारताचे द्रष्टे न्या. रानडे , पृ. १६७.

३१) गो. तळवलकर, नौरोजी ते नेहरू, पृ. ५६.

३२) त्र्यं. कृ. टोपे, न्या.रानडे,व्यक्ती कार्य आणि कर्तृत्व, पृ.२२३-२२४.

३३) बलराम नंदा (अनुवादक-वसंत बक्षीकर), गोपाळ कृष्ण गोखले
ब्रिटिश राजपट व नेमस्त मुग, (मुंबई : १९८६), पृ. १४७ (३४): कित्ता पृ.१५०
३५) Jagirdar, M.G. Ranade, P. 213-214.
३६) फाटक, न्या.रानडे यांचे चरित्र, पृ.१२२-१२३
३७) कर्वे, स्वतंत्र भारताचे द्रष्टे - रानडे, पृ.५५
३८) कित्ता, पृ.६४
३९) फाटक, न्या. रानडे यांचे चरित्र, पृ.१२३-१२४
४०) कर्वे, स्वतंत्रभारताचे द्रष्टे-रानडे, पृ. ८५-९२
४१) कित्ता, पृ.८६
४२) कित्ता, पृ.९५
४३) जावडेकर, आधुनिक भारत, पृ. १२३-१२४
४४) कित्ता, पृ.१२७-१२८
४५) नलिनी पंडित, महाराष्ट्रातील राष्ट्रवादाचा विकास, पृ.४५
४६) सह्याद्रि, रानडे विशेषांक, (जाने - १९४२).
४७) म.गं.नातु आणि दि.य.देशपांडे, आगरकर वाङ्‌मय व खंड १,
(मुंबई : १९८४), (यानंतर या पुस्तकाचा उल्लेख नातु-देशपांडे, आगरकर
वाङ्‌मय खंड १, असा येईल )
४८) मा.दा.आळतेकर, आगरकर निबंधसंग्रह, भाग ३, (पुणे : १९४०),
पृ. १३५-१३६
४९) नातु-देशपांडे, आगरकर वाङ्‌मय, खंड १, पृ. ४६
५०) आळतेकर, आगरकर निबंध संग्रह, भाग २, (पुणे : १९३८), पृ.२४६
५१) आगरकर, केसरीतील निवडक निबंध पुस्तक दुसरे, (पुणे : १८८८ ) पृ.३४-३६
५२) नातु-देशपांडे, आगरकर वाङ्‌मय खंड १, पृ. १२-४४
५३) गं.बा.सरदार, आगरकरांचा सामाजिक तत्वविचार, ( पुणे : १९७९),
पृ. १३९
५४) नातु-देशपांडे, आगरकर वाङ्‌मय, खंड १, पृ. ११२-१२०

५५) आगरकर, केसरीतील निवडक निबंध, पुस्तक १ ले, (पुणे : १८८७), पृ.१५३-१५६
५६) किता, पृ. ६६-१२४
५७) गं.बा.सरदार, आगरकरांचा सामाजिक तत्व विचार, पृ.१४६.
५८) आन्तेकर, आगरकर निबंधसंग्रह, भाग १, पृ. १८.
५९) किता, पृ. १३२.
६०) आगरकर, केसरीतील निवडक निबंध, पुस्तक दुसरे, पृ. ११८.
६१) किता, पृ. १२२.
६२) आगरकर, केसरीतील निवडक निबंध, पुस्तक १ ले (पुणे : १८८७), पृ.१९०
६३) किता, पृ.१८७.
६४) किता, पृ. ३४.
६५) नातु-देशपांडे, आगरकर वाङ्मयखंड १, पृ. ११८-३७८ आगरकर,
केसरीतील निवडक निबंध संग्रह, पुस्तक २ रे, पृ.३४-११२.
६६) आन्तेकर, आगरकर निबंध संग्रह भाग ३, (पुणे : १९१८) पृ. १२५
६७) ग.प्र.प्रधान, आगरकर लेखसंग्रह (दिल्ली : १९६०), पृ. ३४०
(यापुढे याग्रंथाचा उल्लेख, प्रधान, आगरकर लेखसंग्रह असा येईल)
६८) आन्तेकर, आगरकर निबंधसंग्रह, भाग ३, पृ. १०६
६९) प्रधान, आगरकर लेख संग्रह, पृ. ३००-३०९
७०) किता, भाग ३, पृ. ५२
७१) आगरकर, केसरीतील निवडक निबंध, पुस्तक पहिले, पृ. ११-३६, १८६-२१४.
७२) किता, पुस्तक दुसरे पृ. ११४-११७
७३) प्रधान, आगरकर लेख संग्रह, पृ. ३०९
७४) आगरकर, केसरीतील निवडक निबंध, पुस्तक दुसरे, पृ. ७, ३०, ६८, ७५,
१२१, ३३१.
७५) प्रधान, आगरकर लेखसंग्रह, पृ. ३००.
७६) आगरकर, केसरीतील निवडक निबंध, पुस्तक दुसरे, पृ.८०, १५५, १५७
७७) प्रधान, आगरकर लेख संग्रह, पृ. ३१०-३३६

७८) किता, पृ. ३१२
७९) किता, पृ. ३१६
८०) किता, पृ. ११८, आगरकर, केसरीतील निवडक निबंध, पुस्तक २ रे, पृ. १५५-१५८
८१) किता, पृ. ३२४
८२) किता, पृ. ३३८
८३) किता, पृ. ३४७
८४) नातू-देशपांडे, आगरकर वाङ्मय खंड,१ पृ. ३००-३१२
८५) किता, पृ. ११३-११४
८६) किता, पृ. ३००
८७) आगरकर, केसरीतील निवडक निबंध, पुस्तक दुसरे, पृ. ८८
८८) नातू-देशपांडे, आगरकर वाङ्मय खंड १, पृ. ५-१२
८९) किता, पृ. ३८१-३८४
९०) किता, पृ. २८६,३७२,११२-१६, १०३- ०८, २१२, ४५,४३०,३९४
९१) किता, पृ. ११६-१२०
९२) आठवले, आगरकर निबंध संग्रह, भाग १,२,३, पृ. २४५-६०
९३) किता, पृ. १३५-१५१, २००-२२६
९४) किता, पृ. २०५-२०६
९५) किता, पृ. १८४
९६) स.मा.गर्गे, आगरकरांचा सर्वांगिण सुधारणावाद, सकाळ-रविवार पुरवणी, आगरकर विशेषांक, (पुणे : ११ जून १९९५)

# प्रकरण - ५ वे

## न्या. रानडे आणि गो. ग. आगरकर यांचे सामाजिक विचार व कार्य

### अ] न्या. रानडे यांचे सामाजिक कार्य :-

आधुनिक भारताच्या इतिहासात एकोणिसाव्या शतकाच्या उत्तरार्धात जे सामाजिक, धार्मिक, आर्थिक राजकीय प्रबोधन महाराष्ट्रात घडून आले, त्याचे सर्व श्रेय न्या. रानडे यांना आहे. समाज परिवर्तनाची दिशा निश्चित करण्यास तत्वज्ञान नेहमीच उपयुक्त व आवश्यक ठरत असते. रानड्यांवर ब्रिटन मधील उदार मतवादाचा प्रभाव असला तरी त्यांनी भारतीय परिस्थितीचा विचार करुन त्या उदारमतवादाचा अंगिकार त्यांनी केला होता. त्याला पोषक आणि प्रेरक ठरेल असाच तत्वज्ञानाची बैठक त्यांनी आपल्या सामाजिक सुधारणेच्या कार्यासाठी केली होती. बालपणापासून त्यांच्यावर धार्मिक संस्कार व ईश्वरभक्तीचे संस्कार झाल्यामुळे तत्कालीन समाजाच्या गतिहीनतेने ते निराश कधीच झाले नाहीत. आशावादी दृष्टीकोन ठेवून "सत्यमेव जयते" ह्या ब्रीदावर अटळ श्रध्दा ठेवून ते सार्वजनिक कार्यासाठीच प्रयत्नशील राहिले होते. भारतीय पुनरुत्थान घडवून आणण्याच्या प्रखर इच्छेने त्यांनी देशातील सुशिक्षितांचे नेतृत्व केले होते. पुरोगामी विचाराला कृतिशीलतेची जोड देऊन त्यांनी सामाजिक जीवनात परिवर्तन घडवून आणण्याचा प्रयत्न केला होता. ब्रिटिशांच्या काळात भारतातील राजकीय, सामाजिक, आर्थिक परिस्थिती मध्ये होणाऱ्या परिवर्तनाचे अवलोकन करुन काळाचा प्रवाह ओळखून त्यांनी नवसुशिक्षितांच्या मनातील सीमित दृष्टिकोन, कर्मीपणाची भावना नष्ट करुन त्यांच्या आचार विचारांना योग्य वळण लावण्याचा प्रयत्न केला होता. ब्रिटिशांच्या काळात भारतातील राजकीय, सामाजिक, आर्थिक परिस्थिती

पाश्चात्य विद्या आत्मसात करून वैयक्तिक उत्कर्ष आणि समाजाचा उत्कर्ष यांचा मेळ घालण्याची शिकवण त्यांनी उच्चशिक्षित उच्च वर्णीयांना दिली. त्यांची कार्यपध्दती सर्वसमावेशक आणि समन्वयशील असल्यामुळे महाराष्ट्रातील निद्रिस्त जनतेमध्ये जागरूकता निर्माण करण्याचे कार्य त्यांनी केले होते.

इ.स. १८५७ च्या राष्ट्रीय उठावानंतर भारतात ब्रिटिश साम्राज्य स्थापन झाले. 'Uniformity of management and unity of authority' ह्या तत्वामुळे भारतात एक राष्ट्रीयत्वाची भावना प्रस्थापित होण्यास, अनुकूल परिस्थिती निर्माण होण्यास सुरूवात झाली होती. रानडे महाविद्यालयीन शिक्षण घेत असताना सामाजिक सुधारणेचे, त्यांचे विचार अमूर्त स्वरूपात होते. ब्रिटिश साम्राज्याच्या काळात ख्रिश्चन मिशन-यांनी दिलेल्या पाश्चात्य ज्ञानाने नवीन विचार भारतीय समाजात नव्याने परिचित होवू लागले. भारतात सर्वप्रथम राजा राममोहन रॉय यांनी समाजप्रबोधनाला सुरूवात केली होती; आणि महाराष्ट्रात रानड्यांच्या अगोदर बाळशास्त्री जांभेकर, दादोबा पांडुरंग आणि लोकहितवादी यांनी समाजसुधारणेच्या कार्यास सुरूवात केली होती. "जांभेकर, दादोबा आणि लोकहितवादी या तिघांच्याही मतप्रतिपादनातील ग्राह्यांश रानडे यांनी आपल्या विचारसरणीत सामावून घेतला. काही सुधारणांना शास्त्रवचनांचा आधार मिळाला तर तो घेऊनच त्यांचे समर्थन करण्याचे त्यांनी धोरण ठेवले होते."[१] रानड्यांची समाज सुधारणा विषयक विचारांची मांडणी या आद्य सुधारकांच्या कार्यामुळे सुसूत्रबध्द झाली. त्यांच्या विचारमंथनातून समाजाच्या सर्वांगीण विकासाचे सुधारणावादी विचार प्रगट झालेले आहे. इ.स. १८७० पासून त्यांनी समाज सुधारणेचे व समाज प्रबोधनाचे कार्य सुरू केले. रानड्यांनी सुधारणावादाचे स्वरूप विशद करतांना आपला दृष्टिकोन सर्वसमावेशक व अनाग्रही ठेवलेला होता. उदारमतवादाचा पुरस्कार करून भारतातील सामाजीक, राजकीय

समस्यांचा विचार त्यांनी आपल्या लिखाणातून समाजासमोर ठेवला होता. याच दृष्टिकोनातून सामाजिक सुधारणेकडे त्यांनी लक्ष केंद्रित केले.

"The change which we should all seek is thus a change from constraint to freedom, from credulity to faith, from status to contract, from authority to reason, from unorganised life to organised life, from bigotry to toleration, from blind fatalism to a sense of human dignity".[२]

अशाप्रकारे सुधारणावादाची तत्वे प्रतिपादित करीत समाजसुधारणेचे कार्य हाती घेतले. रानड्यांच्या काळात भारतीय समाजात सामाजिक एकात्मतेची जाणीव बाल्यावस्थेतच होती. राष्ट्रीयता, हिन्दुत्व, भारतीयत्व ह्या भावनात्मक आपुलकीबाबत समाज उदासीन होता. उच्चशिक्षित तरुणांमध्ये उदासीन पाश्चात्य विद्येच्या प्रभावाने राजकीय आकांक्षा, ब्रिटिशांच्या स्वातंत्र्यप्रियता आणि न्यायबुद्धीच्या आधाराने प्रफुल्लित झाल्या होत्या. त्यामुळे "राजनिष्ठ राहून आपण सनदशीर चळवळींचा अवलंब केल्यास आपल्याला उत्तरोत्तर राजसत्तेत वाटता वाटा मिळत जाईल असा आशावाद त्यांचा होता. मात्र अनिष्ट रूढींचे आणि कल्पनांचे उच्चाटन करुन आपण आपला समाज अधिक निर्दोष कर्तव्यदक्ष, कार्यक्षम व बलशाली बनवला पाहिजे. कारण असे झाले तरच मिळालेली सत्ता आपल्याला समर्थपणे पेलता येईल हे त्यांनी ओळखले होते. म्हणून राजकीय हक्काइतकेच सामाजिक सुधारणेसाठीही ते प्रयत्नशील राहिले, रानडे हे या पदवीधर सुशिक्षितांच्या उदयोन्मुख पिढीचे प्रतिनिधी व प्रवक्ते होत".[३] रानड्यांनी भारतातील परिस्थितीनुसार, मनुष्यस्वभावानुसार त्यांनी आपल्या समाजप्रबोधनाची तत्वमिमांसा ठरविलेली होती. भारतात कायम ब्रिटिश राज्य राहील असे त्यांना कधीच वाटले नव्हते. येथील समाज जागृत व समर्थ झाल्यानंतर ब्रिटिशांना येथील राज्य भारतीयांच्या हातात सोपवून परत जावे लागेल, हे भविष्यकालीन दृश्य त्यांना स्पष्टपणे जाणवत होते, दिसत होते, म्हणूनच त्या दृष्टिकोनातून उच्च

सुशिक्षित लोकांनी, बुद्धिमान लोकांनी आधुनिक कल्पना स्वीकारून समाजावर मानवतावादी दृष्टिकोनातून बिंबविल्यास समाज प्रबोधन होवून एक समर्थशील राष्ट्र निर्माण होवू शकेल असा आशावादी दृष्टिकोन त्यांनी आपल्यासमोर ठेवून आपले कार्य करण्यास सुरुवात केली. सुशिक्षित तरुणांच्या कार्यक्षमतेवर विश्वास ठेवून त्यांना कार्यप्रवण करण्याचा प्रयत्न केला कारण त्यांना माहित होते की, "It is clear that there is a chance of producing a reasonable conviction among not the vast majority of those who do not think, but among the considerable minority who is every country lead opinion by informing it and setting it in proper form before the community in general".४ समाजात एकजिनसीपणा नसल्याने नम्रतेने आणि युक्तिवादाने लोकांना एकत्रित आणण्यासाठी समाजातील सुप्त शक्तींनी जागृत करून कार्यान्वित करण्याचे कार्य रानडयांनी केले.

रानडयांच्या विचारप्रणालीत धार्मिक भावना अनुस्यूत असल्यामुळे त्यांच्या भाषणात, लिखाणात ईश्वराच्या अस्तित्वाचा उल्लेख अनेकदा येतो. याच धर्मभावनेने त्यांच्या सामाजिक कार्यावर प्रभाव टाकलेला आहे. भारतातील अनेक सुधारक अगदी राजाराम मोहन रॉय पासून गांधीपर्यंतच्या समाजसुधारकांनी आपल्या धार्मिक अढळश्रद्धेचा उपयोग समाजकार्यासाठी केला आहे. अर्थात त्यांची धर्मनिष्ठा ठोस होती. रानडयांचीही धर्मश्रद्धा सामाजिक चळवळीशी, सुधारणांशी निगडीत होती. त्यांनी धार्मिक दृष्टिकोन समाजसुधारणेसाठी कसे उपयुक्त ठरते, याबद्दल बोलतांना म्हटले की, "There appears to be no ground for hope, under such circumstances, of seeing any genuine reform movement springing up from within the heart of the nation, unless that heart is regenerated, not by cold calculations of utility, but by the cleansing fire of a religious revival".[5]

रानड्यांनी ईंग्लंडच्या उदामतवादाचा पुरस्कार करुन जॉन स्टुअर्ट मिल्लचा ऐहिकनिष्ठ नीतीप्रधान उदामतवाद मान्य केला असला तरी त्यांना ईश्वराचे, अति प्राकृतिक तत्त्वाचे शासन व अस्तित्व मान्य होते. धर्म व नीती यांच्या संकल्पना वेगवेगळ्या वाटत असल्या तरी त्या एकाच नाण्याच्या दोन बाजू आहेत असे रानड्यांना वाटत होते. मनुष्यातील नीतीमत्तेला ईश्वरनिष्ठेचे स्थान आहे, ह्या तत्त्वाचे प्रतिपादन करतांना ते म्हणतात की, "Intelligent, self-originated volition under obligation of duty and sense of personal responsibility, this is in the case of man the divine, that is the super-human and super-natural element in him". [6] रानड्यांनी भारतातील इंग्रजी राज्याचा पुरस्कार केला असला तरी त्यांच्यामध्ये राष्ट्रीय भावना ओतप्रोत होती. गोपाळ कृष्ण गोखल्यांनी म्हटल्याप्रमाणे "देशसेवा, समाजकार्य हाच त्यांनी आपला धर्म मानलेला होता. आपल्या देशाची दुर्दशा संपून त्याला पुन्हा पूर्वीचे वैभव कसे प्राप्त होईल हिच चिन्ता त्याच्या जिवाला रात्रंदिवस लागून राहिली होती". [७] त्यासाठी त्यांनी अविरत श्रम आयुष्यभर केले होते. आपल्या समाजाचे, राष्ट्राचे अंतर्गत सामर्थ्य वाढविणे, आपले गुण दोष ओळखून पुढे हानीकारक ठरणाऱ्या गोष्टी टाळून समाजाला पोषक असे वातावरण निर्माण करणे. कारण समाजसुधारणा एकाएकी घडून येत नाही. त्यासाठी दीर्घकाळ प्रयत्न करावे लागतात. तेव्हाच समाजही सुधारणा स्विकारित असतो. व ह्यातूनच सामर्थ्यशील संपन्न राष्ट्र निर्माण होवू शकते. ह्या तत्त्वाचे प्रतिपादन करुन रानडे भारताचे उज्ज्वल भविष्य रेखाटतांना लिहितात की, with a liberated manhood, with buoyant hope, with a faith that never shirks duty, with a sense of justice that deals fairly to all, with unclouded intellect and powerfully cultivated and, lastly,

with a love that overleaps all bound, renovated India will take her proper rank among the nations of the world, and be the master of the situation and of her own destiny".[8]
असा भारत देश निर्माण करण्यासाठी समाजसुधारकांनी पुढे यायला पाहिजे. समाजजीवनात परिवर्तन सतत होत राहिले तर असा समाज प्रवाहित व विकसीत समजला जातो. पण भारताच्या दृष्टिकोनातून पाहिले तर मराठ्यांच्या राज्यानंतर भारताची समाजपरिवर्तनीय गती थांबल्यामुळे नव्याने आलेल्या ब्रिटिश राज्यांच्या काळात समाज प्रबोधनाला सुरूवात झाली. सुशिक्षित व ध्येयाने प्रेरित असलेल्या सुधारकांनी आपआपल्या परीने प्रयत्न करण्यास प्रारंभ केल्याने भारतीय समाज जीवनात एक प्रकारचे चैतन्य निर्माण होण्यास सुरूवात झाली. पण हे चैतन्य कायम ठेवण्यासाठी समाजसुधारकाने समाजाची गती ओळखून प्रवाहाची दिशा योग्य दिशेने आपल्या प्रयत्नाने नेण्याचा प्रयत्न करावा असा सल्ला ही त्यांनी दिला आहे. खऱ्या सुधारकांची व्याख्या करतांना ते लिहितात की, "The true reformer has not to write upon a clean slate. His work is more often to complete the half-written sentence. He has to produce the ideal out of the actual, and by the help of the actual"... The process of growth is always slow, where it has to be sure growth".[9] सुधारकाला समाजाची सर्वांगीण उन्नती व्हावी असे वाटत असेल तर त्याला अंतर्मुख होऊन व्यक्तीच्या उदात्त भावनांचे संगोपन करण्यासाठी धर्मबुध्दीला योग्य वळण लावावे लागेल असा मार्ग सांगून हेच कार्य रानड्यांनी आपल्या सार्वजनिक आयुष्यात केले आहे.

रानडे यांनी इ.स. १८७० मध्ये आपल्या सामाजिक प्रबोधनाच्या व सुधारणेच्या चळवळींना सुरूवात केली होती. त्या काळात उच्चवर्णीय

समाजात एकजिनसीपणा नव्हता. मृतप्राय बनलेल्या हिन्दु समाजाच्या सदसद्विवेक बुध्दीला जागृत करण्यासाठी त्यांनी अनेक चळवळी, संघटना, उभारल्या. प्रार्थना सभा, सार्वजनिक सभा, सामाजिक परिषद, औद्योगिक परिषद, डेक्कन सभा, ग्रंथोत्तेजक संस्था अशा अनेक संस्थांच्या कार्याला प्रवाहित केले. महाराष्ट्रामध्ये निस्वार्थ बुध्दीने त्यागी प्रवृत्तीने कार्य करणाऱ्या संस्थांची परंपरा रानडे यांनी निर्माण केली. आपले कार्य पूर्णत्वास जाण्यास बराच काळ जावा लागणार आहे याची त्यांना जाणीव होती. त्यांनी आपल्या आयुष्यातील तीस वर्षे सामाजिक सुधारणेसाठी एका मर्यादेत राहून सतत कार्य केले.

इ.स. १८७१ ला पुण्यात सबजज्ज म्हणून आल्यानंतर खऱ्या अर्थाने त्यांच्या समाजकार्याला सुरुवात झाली होती. शिक्षण घेत असतांनाच आपल्या समाजाचे, देशाच्या बदलत्या परिस्थिती अवलोकन ते करीत होते. पाश्चात्य जीवन सरणीशी आपल्या जीवन सरणीशी तुलना करतांना त्यांना दोष स्पष्टपणे जाणवत होते. व्यवहारी जीवन जगतांना त्यांच्या ध्येयांना मर्यादा पडत असल्या तरी त्यांनी आपले सार्वजनिक जीवन सतत कृतीशील ठेवलेले होते. विधवाविवाहाच्या उद्भवलेल्या प्रसंगामुळे रानडे यांचे सार्वजनिक जीवनात पदार्पण झाले असले तरी अप्रत्यक्षरित्या शिक्षण घेत असतांना अध्यापनाचे कार्य करून आपले सामाजिक कार्य सुरु केले होते.

इ.स. १८६१ पासून फेलो म्हणून शिकत असतांनाच त्यांनी विद्यादानाचे कार्य सुरु केले होते. इतिहास, भूगोल, अर्थशास्त्र, तर्कशास्त्र, गणित, इंग्रजी इ. विषय शिकविले. "एखादा कर्तृत्वशाली पुरुष राष्ट्रात निपजतो व सगळ्या समाजाच्या व्यवहाराला नवे वळण घालतो," हा सिध्दान्त त्यांनी आत्मसात करून त्यांनी अध्यापनाचे कार्य पाच वर्षांपर्यंत केले होते. ह्या काळात न्याय खात्यातही काम करीत होते. इ.स.१८७१ मध्ये पुण्यात न्यायाधीश म्हणून आल्यानंतर त्यांनी शिक्षण क्षेत्र सोडले

होते तरी त्यांच्या विद्यार्थ्यांनी त्यांच्यावर अलोट प्रेम केले. सयानी नावाच्या विद्यार्थ्याने त्यांच्या शिक्षणातील समाजकार्याच्या तळमळीबद्दल गौरवोद्गार काढले आहेत.[१०] रानड्यांनी शिक्षण व लोकशिक्षणाचा सामाजिक सुधारणेचा मार्ग वेगळ्या पद्धतीने स्विकारला होता. ब्रिटिश राज्यसत्तेशी निकट संबंध साधून लोकांपर्यंत सरकारच्या कार्याची माहिती होऊन चांगले स्विकारणे व जे देशासाठी, समाजासाठी हितकारक नसेल त्याचा निषेध आपल्या लिखाणाद्दारे करणे हे तत्व अवलंबून सुशिक्षित समाजाला जागृत करण्याचा प्रयत्न करून अन्यायाचा निषेध करण्याचे आवाहन केले. त्यांच्या कार्याच्या मर्यादेची जाणीव तत्कालीन सुधारकांना असल्यामुळे त्यांचे योग्य मार्गदर्शन घेऊन त्यांना सहकार्य करण्यास पुढे येत. सामाजिक सुधारणेमध्ये स्त्री शिक्षण आणि विधवा विवाह या दोन प्रश्नांना १८७० च्या काळात विशेष महत्व देण्यात आले होते. "त्यापूर्वीच बंगालमध्ये विद्यासागरांनी इ.स. १८५१ मध्ये या समस्येला जनतेसमोर मांडले होते. विद्यासागरांनी बंगाल सरकारला अर्ज विनंती करून अथक प्रयत्नाने १८५६ मध्ये विधवा विवाहाचा कायदा पास करून घेतला होता. पण त्यापूर्वीच महाराष्ट्रामध्ये सर्वप्रथम बाळशास्त्रींनी १८३० मध्ये पहिल्यांदा मुंबई 'दर्पणां'मध्ये पुर्नविवाहासंबंधी लिहिले होते. त्यानंतर बाबा पदमजी त्यांनी या विषयावर दोन पुस्तके लिहिली. विष्णु शास्त्री पंडित यांनी विद्यासागरांच्या प्रोत्साहनाने व काही मित्रांच्या मदतीने "विधवा विवाहोत्तेक मंडळी" १८६० मध्ये स्थापन केली आणि मानवतावादी व शास्त्रीय दृष्टीकोनातून "इंदुप्रकाश" मध्ये वैचारिक प्रबोधनाच्या दृष्टीने लेखन करून आपले कार्य प्रभावीपणे सुरु ठेवले होते. सनातनी लोकांनी विरोध करण्यासाठी "हिन्दुधर्म व्यवस्थापन सभा" स्थापन केली. रानडे त्यावेळेस मुंबईतच होते.

रानड्यांचा विष्णुशास्त्री पंडितांच्या कार्याला पाठिंबा होता. विष्णुशास्त्री पंडितांनी विधवा विवाह घडवून आणण्यासाठी प्रयत्न केले. १५ जून १८६९ मध्ये कोरोबा कान्होबा या गृहस्थाच्या विवाहाची "इंदुप्रकाश" मधून निमंत्रण पत्रिका प्रसिद्ध केली. या विधवाविवाहाच्या पत्रिकेवर लोकहितवादी, गाडगीळ, विष्णुशास्त्री पंडित, तळेकर, म.गो.रानडे, मोरेश्वर, भिडे अशा सात लोकांच्या सह्या होत्या. तेव्हा हा विवाह होऊ नये म्हणून हिन्दुधर्म व्यवस्थापकाच्या लोकांनी सभा घेवून प्रचार करण्याचा प्रयत्न केला. त्यावेळी व्यायामशाळेतील उस्तादांच्या मदतीने सनातन्यांना गप्प बसवून विष्णु शास्त्री पंडितांनी महाराष्ट्रात पहिला विधवा विवाह घडवून आणला. सार्वजनिक जीवनात रानड्यांचा सहभाग ह्या विधवा विवाहाच्या घटनेपासून झालेला होता. सामाजिक न्यायासंबंधी तळमळ या विवाहाच्या बाबतीत दिसून आली. रानड्यांची बहिण दुर्गा हिचा विवाह वयाच्या दहाव्या वर्षी होवून लवकरच काही वर्षांनी विधवा झाली होती. त्यामुळे विधवा स्त्रीचे दयनीय जीवन त्यांनी जवळून पाहिले होते.

वरील विधवा विवाहाला विरोध करणाऱ्या सनातनी लोकांनी या विवाहाला पाठिंबा देणाऱ्या लोकांवर बहिष्कार टाकण्यास सुरुवात केली, तेव्हा शंकराचार्यांच्या शंकराचार्यांच्या मार्फत हा बहिष्काराचा प्रश्न सोडविण्याचा प्रयत्न केला गेला. मार्च १८७० मध्ये पुण्यामध्ये वादविवाद घडवून सुधारकांनी बाजू मांडण्याचा प्रयत्न केला गेला. पण निमंत्रण पत्रिकेतील सह्या करणाऱ्यांना बहिष्कारापासून मुक्त होता आले नाही. लोकहित वादींनी मुक्तीसाठी प्रायश्चित घेवून "इंदुप्रकाश" मध्ये तसा आशयाचे पत्र लिहिले. पण विष्णुशास्त्री पंडित व रानड्यांनी समाजकंटकांनी चालविलेला छळ सहन करुन प्रायश्चित नाकारले.

या सामाजिक बहिष्काराचे स्वरूप कसे होते याबद्दल रानड्यांनी १ ऑगस्ट १८८६ मध्ये सर विल्यम हंटरला लिहिले होते की, "माझी धाकटी बहिण माझ्या जवळ मुंबईस राहत असे तिला तिच्या सासरच्या मंडळीने बोलावून नेले व पुष्कळ महिनेपर्यंत माझी व तिची भेट पडू दिली नाही. ती कधी कधी चोरून मला भेटण्यासाठी येत असे. माझ्या ब्राम्हण नोकरांनी मला सोडले नवा नोकर ठेवला की, तो थोड्याच दिवसात [बहिष्काराच्या धाकाने] नोकरीवर पाणी सोडून निघून जाई. सणासमारंभात आम्हाला बोलविण्याचा क्रम सर्वत्र बंद पडला जर आमच्या घरातल्या बायका कोठे गेल्यातर तेथे त्यांचा अपमान होवू लागला. त्यांचा संपर्क टाळण्याची प्रवृत्ति दिसू लागली. कुटुंबातले कोणी मनुष्य वारल्यास त्याच्या प्रेतसंस्कारासाठी आम्हास माणसे मिळण्याची पंचाईत पडे, अशा वेळी आमच्या घराकडे कोणी ढुंकून पाहिल तर शपथ, प्राय: प्रेतसंस्कारासंबंधी सर्व कामे आमची आम्हासच उरकावी लागत. बहिष्काराचे सत्र सुरू झाल्यावर पूर्वी ठरलेली लग्ने मोडली. प्रत्येक शहरांत बहिष्कृतांचा वर्ग होता. पण आम्ही आपला मार्ग सोडला नाही. आणखी पुर्नविवाह घडवून आणले... १८७१ साली मी पुण्यास सरकारी कामानिमित्त गेल्यावर माझे वृध्द वडील माझ्या जवळ राहण्याकरीता आले. त्यांच्यावर माझ्या संसर्गामुळे छळाची धोरपड येवू नये म्हणून जेवतेवेळी त्यांच्या पंक्तीला मी बसत नव्हतो. दूर पान घेवून मला जेवावे लागे".[१२] अशा प्रकारे रानडे यांनी स्वजन व समाजाकडून होणाऱ्या बहिष्काराला निमूटपणे तोंड देवून विधवा विवाहाचे समर्थन केले होते. समाज जागृतीचे कार्य करतांना स्वत:ला होत असलेला त्रास सहन करणे हे त्यांच्या अंगी लहानपणापासून भिनलेले होते. त्याचा प्रत्यय त्यांच्या सार्वजनिक जीवनात आढळतो.

इ.स. १८७१ ला रानडे यांनी स्वदेशीच्यापाराला उत्तेजनासाठी एक कंपनी, त्याचे सहकारी सार्वजनिक काकांच्या मदतीने सुरु केली. त्यात रानड्यांचे सहकार्य बरेच होते. रानड्यांचे सार्वजनिक सभेचेही कार्य सुरूच होते.

याच काळात इ.स. १८७३ मध्ये रानड्यांची प्रथम पत्नी सखूबाई ह्याने गंभीर आजारी पडल्या तेव्हा रानड्यांनी कोर्टाची कामे सांभाळून पत्नीला नामांकित डॉक्टरामार्फत उपचार, औषध देवून शुश्रुषा करण्याचा प्रयत्न केला. पण दुर्दैवाने ३ ऑक्टोबर १८७३ ला पत्नी सखूबाईचे निधन झाले. त्यावेळी रानड्यांचे वय ३१ वर्षांचे होते. पत्नी वियोगाचे दुःख त्यांना झाले होते. याच काळात त्यांचे मित्र श्री. रावबहादूर गणपतराव मानकर यांच्याही पत्नीचे निधन झाले होते. त्यांना रानड्यांनी सांत्वनापर पत्र लिहिले.[१३] त्यात आपल्या सहचारिणी बद्दलच्या भावना व्यक्त करून, देवावर विश्वास व्यक्त केला व त्यांचेही अप्रत्यक्ष सांत्वन केले.

रानडे मृत पत्नीच्या वियोगातून बाहेर पडत नाही तर त्यांच्या वडिलांनी "आपला सुधारक मुलगा एखाद्या विधवेशी लग्न करेल" या भीतीने त्यांच्या दुसऱ्या लग्नासाठी हालचाली सुरू केल्या. त्यांनी स्वतः पत्नी गेल्यानंतर तिसऱ्या-पाच दिवशी लग्न केले होते. ते व्यवहारी परंपरावादी होते. रानड्यांनी विधवा बहिणी प्रमाणेच व्रतस्थ जगण्याची इच्छा वडिलांजवळ बोलून दाखविली. पण त्याचा काहीच उपयोग झाला नाही. इंग्लंडला जायचे असल्याने सहा महिन्यानंतर लग्नाचे बघू असाही पर्याय सुचविला. पण वडिलांनी मुलाचे म्हणणे न ऐकता परस्पर त्यांचे लग्न साताऱ्याच्या अण्णासाहेब कुर्लेकर जे सांगलीच्या पटवर्धन जहागिरदार कुटुंबाशी संबंधीत होते, त्यांच्या अशिक्षित मुलीशी ठरविले. रानडे पितृभक्त असल्याने वडिलांना विरोध करू शकले नाहीत. त्यांचे लग्न रमाबाईशी झाले. ह्याच रमाबाईंनी पुढे रानड्यांच्या प्रोत्साहनाने शिक्षण घेवून रानड्यांच्या सार्वजनिक जीवनात बरोबरीने चालण्याचा यशस्वी प्रयत्न केला. त्यांनी लग्नाबाबत घटना "आमच्या आयुष्यातील काही आठवणी"[१४] या आत्मचरित्रात लिहिल्या आहेत.

पण रानड्यांना या दुसऱ्या विवाहामुळे प्रतिकूल परिस्थितीशी सामना करावा लागला. कृती आणि बोलणे यात तफावत झाल्याने या सुधारकावर

समाजाने आक्षेप घेतले होते. वडिलांना विरोध करणे हे त्यांना कधी जमले नाही म्हणून त्यांना हे आक्षेप, टिका सहन करावी लागली. "वडिलांचा शब्द मोडावयाचा नाही आणि त्यांच्या कुटुंबसुखामध्ये आपण विघातक व्हावयाचे नाही, ही दोन व्रते त्यांनी कटाक्षाने पाळली."[१५] असे रमाबाई रानडे यांनी लिहून ठेवले आहे.

द.गो.कर्वे यांनी पुनर्विवाहाच्या घटनेबाबत म्हटले की, " रानड्यांनी स्वतः उदाहरण घालून देण्याची संधी घालविली, याबद्दल पुनर्विवाहाचे पुरस्कर्ते त्यांच्यावर रागावले, तर विरूध्द पक्षाला वादाला निमित्त मिळून रानड्यांचा पुनर्विवाह विधवा विवाहाचा पुरस्कार, लोकांची समजूत होती तेवढी काही कळकळीचा नाही, असे म्हणावयास फावले. रानड्यांचा ज्यांना निकट परिचय होता आणि नैतिक धैर्याबद्दल ज्यांना विश्वास वाटे अशानांही या वर्तनाचा नीट उमज पडेना. स्वतः रानड्यांनी आपल्या या वर्तनाचा खुलासा करण्याचा कधीच प्रयत्न केला नाही.... परंतु रानड्यांच्या बाबतीत कळकळीचा अथवा नितिधैर्याचा अभाव या गोष्टींचा करणे कुत्सीतपणाचे असल्याने त्याचा गंभीरपणे विचारही करण्याचे कारण नाही, त्यांचे सबंध जीवन म्हणजे इतर कोणत्याही गोष्टी पेक्षा स्वतःशी प्रामाणिकपणे वागण्याचा अखंड प्रयत्नच होय.-- आणि जो काही थोडा उणेपणा पुर्नविवाह न केल्याने त्यांना पत्करावा लागला त्याचे प्रायश्चित मुकाटाने सारी टिका सहन करून घ्यावयाचे आणि या बाबतीत अधिक वादात पडावयाचे नाही असे त्यांनी ठरविले असणे शक्य आहे."[१६] रानडे लग्नानंतर चार महिन्याची रजा घेवून पत्नी व मित्रासोबत भारतभ्रमण करून पुन्हा आपल्या समाजकार्यास लागले.

रानड्यांच्या या दुसऱ्या विवाहाबद्दल तत्कालीन वृत्तपत्र "इंदुप्रकाश" मध्ये टिका झाली होती. इंदुप्रकाशाने १७ डिसें. १८७३ ला त्यांच्यावर कडक टीका करून त्यांच्या समाज धर्मसुधारणा नाममात्र भासतात असे लिहिले.

रानड्यांचे लग्न ठरल्याचे निश्चीत झाल्यानंतर एका लेखात इंदुप्रकाशाने १७ डिसें• १८७३ ला त्यांच्यावर कडक टिका केली• त्यावेळी टाईम्स ऑफ इंडिया व बाम्बे गॅझेटनेही याविषयी लेख प्रकाशीत केले होते•"१७ त्यावेळी रानड्यांचे महत्व सामाजिक दृष्टिकोनातून वाटलेले असल्यामुळे त्यांच्या प्रत्येक कृतीकडे समाजाने लक्ष ठेवले होते• विष्णुशास्त्री पंडित हे विधवा विवाहाचे पुरस्कर्तेच नव्हते तर त्यांनी आक्रमक भूमिका याबाबत घेतली होती• दुर्दैवाने त्यांचे इ•स• १८७५ मध्ये निधन झाल्यामुळे सामाजिक सुधारणा चळवळीचे नेतृत्व रानडे यांच्याकडे आले होते• विष्णुशास्त्री पंडिताच्या मृत्युपूर्वी ज्योतिबा फुले यांनी सत्यशोधक समाजाची स्थापना करुन सामाजिक सुधारणेला व्यापक व मोठी बैठक दिली होती• पण ज्योतिबांच्या नंतरच्या काळात या सुधारणा चळवळीला ब्राम्हण-ब्राम्हणेत्तर वादाचे विकृत स्वरुप आल्याने ही चळवळ सामाजिक क्रांतीची चळवळ राहिली नाही• त्याचा पुरोगामीपणा नष्ट होवून राजकीय स्वार्थाचे साधन बनले होते• त्यामुळे ज्योतिबाच्या कार्याकडे समाजाचे दुर्लक्ष झाले होते• त्यामुळे समाजसुधारकाचे नेतृत्व रानड्यांमध्ये केंद्रित झाले होते• पण त्यांच्या दुसऱ्या विवाहामुळे त्यांची सुधारकाची प्रतिमा अस्पष्ट बनली होती•

त्यानंतर त्यांच्या जीवनातील महत्वपूर्ण घटना म्हणजे ऑगस्ट १८७५ मध्ये स्वामी दयानंद सरस्वती यांचे पुण्यातील आगमन होय• दयानंदांना हिन्दु, वैदिक धर्म मान्य असला तरी स्मृती, पुराणामुळे भ्रष्ट झालेला हिन्दु धर्म मान्य नव्हता• त्यांनीही विधवा विवाहाचा पुरस्कार केला होता• पुण्यातील दोन महिन्याच्या दयानंदानी केलेल्या वास्तव्यात रानड्यांनी त्यांची पंधरा व्याख्याने आयोजित केली होती• संन्याशी व सुधारक प्रवृत्तीच्या दयानंदाचा समाजात बराच दबदबा होता• दयानंद मूर्तीपूजा व जातिभेद मानीत नसले तरी वेद ईश्वर प्रणीत मानत, प्रार्थना समाजाचे अनुयायी धर्मग्रंथाला ईश्वर प्रणीत मानीत नसल्यामुळे त्यांना रानड्यांनी दयानंदाचा

केलेला सत्कार मान्य नव्हता. पण रानड्यांनाही वेद ईश्वरप्रणित मान्य नसली तरी आपली मतभिन्नता स्वतःपुरती मर्यादित ठेवून त्यांनी समाजकार्यासाठी त्यांची व्याख्याने आयोजित केली होती. दयानंद हिन्दीतून भाषण देत असल्याने पुणेकरांना ती चांगली समजावी म्हणून त्याचे भाषान्तर श्री महादेव कुंटे व श्री गणेश आगाशे हे गृहस्थ एका दिवसाआड मराठीतून सांगत असत. श्री गणेश आगाशे यांनी रानड्यांच्या तिस-या पुण्यातिथीच्या काळात "Third Anniversary of Mr. Justice M.G.Ranade's Death "[१८] ह्या विषयावर मुंबईच्या हिन्दु युनियन क्लबच्या अध्यक्षीय भाषणात १६ जाने. १९०४ ला या घटनेबद्दल उल्लेख केला होता. ते लेख नंतर इंदुप्रकाश मध्ये प्रसिध्द झाले होते. ह्या भाषणांतील मुद्दे खोडून काढण्यासाठी महामहोपाध्याय रामशास्त्री आपटे व ख्रिस्ती धर्मस्विकारलेले रेव्हरंट निळकंठ शास्त्री हे दयानंदानी व्याख्यान दिलेल्या ठिकाणीच दुस-या दिवशी उपस्थित राहत, पण दयानंदाच्या व्याख्यानाने प्रभावित झालेल्या समाजाने त्यांना दाद दिली नव्हती. पण "स्वामींना विरोध करण्यासाठी पुण्यातील परंपरागत सनातनी हिन्दु धर्माभिमानी व ख्रिस्ती धर्माभिमानी यांचे झालेले मेतकुट मात्र गमतीशीर वाटत होते "[१९] दोन परस्पर विरोधी विचारांचे लोक दयानंदासारख्या समाजसुधारका विरोधी एकत्र आले होते.

दयानंदाच्या हस्ते पुण्यात "आर्यसमाजा" च्या शाखेची स्थापना करण्यात आली. या शाखेच्या कार्यकारी मंडळात मुख्यतः रानड्यांचा समावेश करण्यात आला होता. दयानंदांना देण्यात येणारा निरोप समारंभ हा पुण्यातील नामंकीत वकील श्री. गंगारामभाऊ मस्के यांच्या बंगल्यात आयोजित करण्यात आला होता. दयानंदानी मिरवणुकीसाठी नकार दिला असतांना वेद पोथींची हत्तीवरून मिरवणूक काढण्याचे ठरविले गेले. ही मिरवणूक म्हणजे सनातनी वर्गाला आपला अपमान वाटला म्हणून त्यांनी गाढवाला समजवून "गर्दभनंदाची" वरात काढली. तेव्हा मिरवणूक रद्द करावी की काय असा विचार समोर येताच रानड्यांनी आगाशेंना ठामपणे म्हटले; की,

"समाजसुधारणेच्या झेंड्यामागून जाण्याला किती बहादूर पुण्यात सज्ज आहेत याची या मिरवणुकीत कसोटी लागेल. सुधारणापक्ष कसास उतरला तर प्रतिकूल समाजाला त्याचे सामर्थ्य याचा अंदाज कळेल. आजपर्यंत कोणतीही सुधारणा छळाच्या भट्टीतून तावून सलाखून निघाल्याखेरीज यशस्वी झालेली नाही. छळ सोसण्याला सुधारकांची तयारी पाहिजे. मिरवणुकीवर दगडांचा मारा अगर गटारातल्या पाण्याचा वर्षाव झाला तरी त्याबद्दल हूं की चूं न करता तो निमूटपणे सहन करण्याला माझी तयारी आहे, तुम्ही सर्वांनी माझ्याप्रमाणे वागावे, अशी माझी विनंती आहे."[२०] रानड्यांच्या मताला पाठिंबा जाहीर करून ५ सप्टें.१८७५ ला मिरवणूक सुधारकांनी बुधवार वाड्यासमोरून नेली. त्यानंतर बुधवार वाड्यातच दयानंदांचे भाषण ठेवण्यात आले. तेथे स्वामींचे भाषण सुरु असतांना सनातन्यांनी गर्भदनंदाची मिरवणूक आणून त्यांच्या भाषणात व्यत्यय आणला. पोलीसांच्या मदतीने झालेला गोंधळ आटोक्यात आणण्याचा प्रयत्न केला गेला, पण पावसामुळे रस्त्यात झालेला चिखल एकमेकांच्या अंगावर टाकून रस्त्यातच हाणामारीचा प्रकार सुरु झाला. एकमेकांवर चिखल फेक करण्याचा प्रकार रात्री साडेनऊ पर्यंत सुरु होता. शेवटी रात्री रानडे आणि दयानंद सरस्वती स्वामी पोलिसांच्या मदतीने मागच्या दाराने वाड्यातून बाहेर पडले. ते घरी परतले तेव्हा त्यांच्यापत्नी रमाबाईंनी रानड्यांना चिखलाने माखलेले बघून विचारणा केली असता रानडे म्हणाले की "सगळ्यांमध्ये मी जर होतो तर चिखल मला कां लागणार नाही, पक्षाभिमानाची कामे अशीच असतात; दुसऱ्या पक्षातील माणूस लहान असो की मोठा असो त्याची चर्चा त्यांना कां वाटावी? अशावेळी मानापमानाचा विचार आमच्या मनात तरी कां यावा ? या गोष्टी अशाच चालायच्या"[२१] असे म्हणून या घटनेकडे स्वाभाविकपणे पाहिले होते. या दंगलीला कारणीभूत असलेल्या व्यक्तीला अटक झाली तेव्हा त्याने रानड्यांची माफी मागितली. रानड्यांनी "शरणागता मरण चिंतू नये" असे म्हणून त्याला पोलिसापासून सोडविले.

रानडे यांची समाज सुधारणेची कल्पना सर्व व्यापक, दूरगामी व विधायक स्वरूपाची होती. "मानवी प्रगतीच्या सर्वव्यापक अंगाची समाज सुधारणा झाल्याखेरीज राजकीय किंवा आर्थिक सुधारणेसारखे प्रगतीचे सर्व मान्य मार्ग ख-या अर्थाने यशस्वी व्हावयाचे नाहीत," [२२] असे त्यांचे मत होते. समाजसुधारणेची सुरुवात कुटुंबामधून सुरू झाली तर समाज प्रगती पथाकडे लवकर मार्गक्रमण करेल असेही त्यांना वाटत होते. त्यांनी कुटुंब घटकातील प्रमुख पण दुय्यम दर्जा देण्यात आलेल्या स्त्री जीवनाविषयीच्या दयनीय, निकृष्ट दर्जाच्या जीवनाला मानवतावादी दृष्टीकोनातून विचार केला जावा असे त्यांना वाटत होते. पण त्यासाठी कुटुंबाचे सौख्य नष्ट होणार नाही यावर त्यांचा कटाक्ष होता. याच दृष्टिकोनातून त्यांनी स्त्रीजीवनाच्या महत्त्वपूर्ण घटनेकडे पाहिले होते. इ.स.१८६० मध्ये ब्रिटिश सरकारने सम्मती वयाचा कायदा पास केला होता. पण त्याची अंमलबजावणी झालेली नव्हती. कायद्यान्वये पतीपत्नीचे वैवाहिक जीवन सुरू होण्यासाठी पत्नीचे वय कमीत कमी दहा वर्षाचे असावे हे निश्चीत ठरले होते, पण दहा वर्षानंतर तिच्यावर मातृत्व लादले गेले तर, तिची व बाळाची सुदृढरित्या, निकोपपणे वाढ होणार नाही, अशी भीती व्यक्त करण्यात येवू लागली. त्यामुळे या कायद्यात सुधारणा व्हावी म्हणून इ.स.१८८० पासून विवाहाचे वय वाढविण्यात यावे, असा आग्रह धरून सामाजिक चळवळीला सुरू झाली. एक पारशी गृहस्थ श्री बेहरामजी मलबारी यांनी हिन्दु मुलामुलींच्या विवाह वयात बदल व्हावा अशा प्रकारचे पत्र ब्रिटिश सरकारला व सुधारकांना पाठविले. हे पत्र म्हणजे संमतीवयाच्या वादाचे प्रमुख कारण ठरले. श्री बेहरामजी मलबारींनी या संमतीवयाच्या प्रश्नात लक्ष घातल्यापासून समाज सुधारकामध्ये दोन गट पडून एका वर्गाने ब्रिटिश सरकारचे सहाय्य सामाजिक सुधारणेसाठी घेवू नये, तर दुस-या गटाने समाज जर परिस्थितीनुसार बदलण्यास तयार नसेल तर कायद्याचा आधार घ्यावा असे मत मांडले होते. विवाह वय वाढविण्यासाठी रानड्यांनी कायद्याचे सहाय्य घेण्यास हरकत नाही, असे

प्रतिपादित केले होते. रानडे आपल्या संकीर्ण लेखात याबाबत म्हणतात की, "शारीरातील नासके रोगट भाग यांच्या बाबतीत जी वृत्ती योग्य असते ती काही नेहमीच्या सामान्य शारिरिक विकारांच्या बाबतीत नव्हे. पहिल्या प्रकारच्या विकारांच्या बाबतीत होमियोपेथीमधील अत्यंत लहान गोळी घालत नसून तीक्ष्ण शस्त्रक्रियाच हवी असते, हा दृष्टांत मनुष्य शारीराविषयीचा खरा आहे असे नाही. समाज शारीर आणि सामाजिक अधोगातीत उत्पन्न झालेली समाजदेशातील बांडगुळे यावरही तोच उपाय फलदायक ठरतो.—— अशा बाबतीत परकीय आणि आपले राज्यकर्ते असा खरा भेदच होऊ शकत नाही. जेव्हा परकीयांच्या हिताचा आपल्या हिताशी विरोध उत्पन्न होतो. त्यावेळी त्याला काही अर्थ असतो. परंतु जेथे त्यांचे हित काही गुंतलेले नाही आणि उपक्रम सर्वस्वी आपल्याकडूनच होत आहे अशा वेळी सरकारी मदतीवर येणारा ठराविक आ . निघूच शकत नाही. कारण आपणांच संमत केलेल्या तत्वांनुसार हा कायदा होत असून आपले स्वातंत्र्य गमावण्याचा त्यात काहीच प्रश्न नाही".[२३] समाजातील सत्प्रवृत्त लोकांनाच बदल घडवून आणण्याची इच्छा झाल्याखेरीज कायद्याचे सहाय्य घेण्यास रानडे तयार नसत. कायद्याने सुधारणेस पूर्णता येते व तिला अधिकृत स्वरूपही येते. पण विवेकाने आणि स्वेच्छेने झालेल्या मतपरिवर्तनाची सर त्याला केव्हाही यावयाची नाही, याची जाणीव असल्याने त्यांनी लोकजागृतीवर जास्त भर दिला होता. पण अनिष्ट रुढींचा अतिरेक होवू नये म्हणून कायद्याची मदत घेणे गैर वाटत नव्हते याच दृष्टिकोनातून त्यांनी संमती वयाच्या कायद्याचा पुरस्कार केला होता.

मलबारींनी हा विषय "इंडियन स्पेक्टेटर" या आपल्या वृत्तपत्रातूनही हाताळला होता. त्यांनी बालविवाह विरूध्द अनेक लेख लिहिले. आपल्या देशाची प्रगती, सामाजिक विकास झाल्याशिवाय होवू शकत नाही हे माहित असल्याने त्यांनी समाजातील विघातक गोष्टी कायद्याने, जागृतीने नष्ट होण्यासाठी प्रयत्न केले. "This country cannot rise unless its millions are lifted to a higher moral atmosphere and social

responsiblity." And this will not happen until we have a system of heart education side by side with head education."[२४] त्यांनी सरकारला बालविवाह विरोधी कायदा करण्याची विनंती केली होती. यामुळे महाराष्ट्रात खळबळ माजली. टिळकांनी सनातन्यांचा पक्ष घेवून सरकारचा हस्तक्षेप मान्य केला नव्हता. त्यांनाही सुधारणा हवी होती, पण ती सामाजिक क्रांती करुन हवी होती. परकीय शासक जे भारतीय संस्कृतीशी अपरिचीत आहेत त्यांच्या मदतीने होणाऱ्या समाज सुधारणेला त्यांचा विरोध होता. त्यांनी "मराठा" या वृत्तपत्रातील २९ मे १८८१ लेखात म्हटले की,," If we want that we should be proficient in the art of selfgovernment, the first qualification, we should show is the ability to manage our own business among ourselves and particularly that business which will be better regulated by ourselves than by the passing of an act or resolution--- let our people, therefore form associations, frame rules, restraint for themselves and do all they can to check--- this evil custom ( of child marriage)[२५] टिळकांनी बेहरामजी मलबारी या पारशी गृहस्थाने हिन्दुच्या प्रश्नात हस्तक्षेप करावा हे ही पटले नव्हते, तत्वत: त्यांनी संमतीवयाचा कायदा करण्यास विरोध केला असला तरी स्त्रियांना मानवतावादी जीवन जगता यावे, यासाठी समाजाला मुलींच्या लग्नाचे वय बारा होईपर्यंत विवाह करु नये असे आवाहन केले होते. त्यांनी स्वत:च्या मुलींची लग्न बारा वर्षानंतरच केली होती. मलबारीचे मित्र दयाराम गिडुमल यांनी मलबारींचे जीवन चरित्र लिहिले. त्यात सम्मती वयासंबंधीच्या कार्याबाबत माहिती दिलेली आहे. मलबारींनी बालविवाह व सक्तीचे वैधव्य ह्या दोन विषयावर टिपणे लिहून १८८४ मध्ये भारतात व इंग्लंडमध्ये पाठविली होती. त्या अगोदर इ.स.१८८२-८३ च्या काळात "Indian spectator ",

या आपल्या साप्ताहिकात बालविवाहावर अनेक लेख लिहिले व त्यात बाल विवाह प्रतिबंधक कायदा करावा " अशी मागणी केली. बाल विवाह बंद होण्यास अल्पवयात लग्न झालेल्या मुलास विद्यापीठाच्या परिक्षेस बसू देऊ नये व तसेच कोणत्याही सरकारी खात्यात नोकरी देवू नये". [२६] अशी सूचना केली. मलबारींच्या या सुचनेवरुन सुधारणावादी मंडळीत खळबळ माजली. सर वेडरबर्न व तेलंग यांनी या सूचनेला विरोध केला. तेलंगांनी २२ फेब्रु. १८८६ ला मुंबईला आधी सामाजिक की राजकीय सुधारणा" हा विषय घेऊन युक्तीवाद केला. त्यात सामाजिक सुधारणा घडवून आणतांना कार्य-शकटाच्या चक्रास कमीतकमी घर्षण होईल असेच धोरण स्वीकारले पाहिजे" असे म्हणतांना "सर्वांनीच समाजसुधारक बनले पाहिजे असे नाही. रानड्यांसारख्या अलौकिक बुध्दिच्या मनुष्याला सर्व सुधारणांना एकदम हात घालता येईल. पण बहुतेक लोकांचे बुध्दी-सामर्थ्य फार मापक असते. त्यामुळे त्याचा व्यय फार जपून केला पाहिजे." [२७] असे उद्गार काढल्याने स्वाभाविकच सनातनी वर्गानेही त्यांचा पक्ष उचलून धरला. त्यामुळे संमतीवयाचा वाद बराच गाजला. परंतु रानडे यांनी मलबारींच्या टिपणांना पाठिंबा दिला होता. तेलंगाच्या भाषणांमुळे सुधारणाविरोधी गटाला जोर आला होता. त्याला प्रत्युत्तर म्हणून रानडे यांनी मार्च १८८७ ला प्रार्थना समेत, दोन भाषणे दिली. त्यात सामाजिक सुधारणा घडवून आणण्यासाठी सरकारने कायदे करावेत व त्यासाठी चळवळ करावी," असे मत व्यक्त करुन सामाजिक सुधारणांकडे लोकांचा पाहण्याच्या दृष्टिकोना बद्दल म्हटले की, " लघुत्तम प्रतिकाराचा सोयिस्कर मुद्दा सांप्रत सर्वांना प्रिय होऊन बसला आहे. लोकांना राजकारणात भाग घेण्याची अतिशय हौस वाटते. जबाबदार राज्य पध्दतीबद्दल सारखी वावाव्हा सुरु आहे. पण सामाजिक सुधारणेचा प्रश्न निघाला की सगळे गाडे फिरते. राजकारणाने विषयीचा दिसणारा ताव मावळून सामाजिक सुधारणेचे नाव निघालेसे अगदी थंडगार मामला दिसून येतो----- या विषयाला नाके मुरडतात आणि फार पाठीस लागलो तर नाना प्रकारचे बहाणे लढवून हा प्रश्न जाऊ द्या,

आपोआप होईल असे म्हणतात. ---- लोकांच्या प्रवृत्तीतही विसंगतपणा पडलेला आहे. राजकारणात कोणाला यश मिळाले की ... ताबडतोब यशस्वी माणसाला लोक डोक्यावर घेऊन नाचतात... त्याच्या लहानमोठ्या सर्व दोषांकडे शक्य तितकी डोळेझाक करावयाला लोकांची तयारी आहे. सुधारकाला मात्र अगदी क्षुल्लक बाबतीत सुद्धा गय करायला त्यांची तयारी नाही."[२८] हे वक्तव्य त्यांनी "Limits and conditions of state Legislation in social matters." या विषयावर बोलतांना केले होते. बिस्मार्क प्रमाणेच रानड्यांना "राजकारण हा शक्य अशक्यतेचा खेळ आहे."[२९] असे वाटत होते. तेव्हा उठसूट इंग्रजांचा निषेध करीत बसण्यापेक्षा आपल्या समाजाची आंतरिक शक्ती वाढविणे, हे जास्त आवश्यक आहे. तेव्हा शक्यतोवर एकजुटीने समाजकार्य करावे, असे त्यांना वाटत होते.

ब्रिटिश सरकारने इ.स. १८८५-८६ या काळात समाजातील प्रतिष्ठित उच्च पदस्थ अधिकारी, पुढारी वर्गाचे मत अजमावण्याकरीता भारतात सर्वत्र मलबारींच्या टिपणांच्या प्रती पाठविल्या. रानड्यांकडेही एक पत्र पाठविली होती. त्यावर प्रतिक्रिया लिहितांना रानड्यांनी मुंबई सरकारला कायदा करण्याची गरज स्पष्ट केली. त्यात ते पुढे लिहितात की, "हिन्दू समाजात आत्मनियंत्रणाची शक्ती बिल्कुल नाही म्हणून शास्त्रांची असलेली अभेद्य अशी बंधने काढून, कायद्याची नवीन बंधने निर्माण करणे आवश्यक आहे असे स्पष्ट केले आणि सुधारणा करतांना सहा सूचना विचारात घेण्याची विनंती केली. त्यातील [१] दहा वर्षाच्या आत मुलामुलींची लग्ने होवू नयेत. मुलांच्या लग्नांची वयोमर्यादा कमीतकमी सोळा किंवा अठरा वर्ष आणि मुलीच्या लग्नांची वयोमर्यादा दहा किंवा बारा असावी. [२] लग्नाच्या वेळी वधू-वराचे वय काय होते ते ठरविण्याचा कोणाला अधिकार असावे याचा खुलासा असावा. [३] विश्वविद्यापिठांनी अविवाहित राहणाऱ्या विद्यार्थ्यांनाच

उच्च प्रतीच्या पदव्यांचा मान दिला जाईल, असा नियम जाहिर करावा. [४] संभोग संमतीचे वय चौदा ठरविण्यात यावे व त्यासाठी पिनल कोडची दुरुस्ती करावी. [५] ज्याचे वय पंचेचाळीस वर्षावर असेल तर त्याने अल्पवयस्क कुमारिकेशी विवाह करू नये, विजोड विवाहाबद्दल सरकारने कायदा करावा. [६] एक पत्नी हयात असता पुरुषाला दुसरा विवाह करण्यास कायद्याने प्रतिबंध करावा. मलबारींच्या दुसऱ्या टिपणात वैधव्याची दुःखे कमी कशी करता येईल याबाबत उल्लेख होता. त्यात रानड्यांनी बालविधवांच्या दयनीय स्थितीचे वर्णन करून निदान पंचवीस वर्षे वयाच्या बाल विधवांचे केशवपन करू नये असे सुचविले होते. कोणत्याही सुसंस्कृत समाजात हिन्दू बालविधवांसारखी परिस्थिती असणे लांछनास्पद आहे. हिन्दू समाजाने हजारो वर्षे विधवांची गांजवणूक केली आहे, ही वस्तुस्थिती त्या समाजाला काळीमा आणण्यासारखी असल्याचे" [30] रानड्यांनी नमूद केले होते. पण सुधारकांच्या कायदा करण्याच्या आग्रहाचा प्रयत्न असफल ठरला.

ब्रिटिश सरकारने मलबारींच्या टिपणा विरोधी मत जास्त प्रभावी आहे, असा निष्कर्ष काढला. त्यामुळे सरकारला काहीही करता येत नाही असे म्हणून सरकारने कायदा करण्यास नकार दिला. अशा रितीने मलबारी व सुधारकांचा पराभव झाला. तरीही समाजात ह्या प्रश्नाने जागृती निर्माण झाली होती. रानड्यांनी या सुधारणेच्या संबंधात ८ ऑक्टो.१८८६ ला मद्रास येथील पंचप्पा कॉलेजमध्ये Fact and fiction आणि Hindu Ideal of ducty या विषयावर दोन व्याख्याने दिली. या व्याख्यानात आणि पुण्यामध्ये झालेल्या सामाजिक परिषदेच्या इ.स.१८९५ च्या भाषणात त्यांनी सामाजिक सुधारणेच्या चार पद्धती सांगितलेल्या होत्या. [१] पारंपारिक पद्धत, [२] विवेक, [३] कायदा, [४] क्रांती पद्धती यातील तीन पद्धतींचा त्यांनी पुरस्कार केला होता. ते संयमी प्रवृत्तीचे असल्यामुळे सुधारणेचा क्रांती मार्ग त्यांना मानवणारा नव्हता. पहिली पारंपारिक पद्धत म्हणजे जुन्या

धर्मग्रंथाच्या आधाराने बदलेलेल्या परिस्थितीनुसार त्याचा अन्वयार्थ लावणे व जनतेला पटवून देणे जेणे करून प्राचीन ग्रंथ व परंपरेशी सुसंगत सुधारणा होय. गोखल्यांच्या शब्दात "सुधारकांना भूतकाळाशी आपले नाते पूर्णपणे कधीच तोडता येणार नाही आणि तोडता आले तरी ते कधी तोडू नये कारण दीर्घकालीन परिणामांच्या दृष्टिने ते अतिशय घातक ठरेल" असे रानड्यांचे मत होते."[३१] म्हणजे सुधारणा म्हणजे नवनिर्मिती नव्हे तर विस्मृत , विशुध्द धर्मज्ञानाचे पुनःप्रकटीकरण होय. हेच रानड्यांना सांगायचे होते. दुसरी विवेकी सुधारणा म्हणजे समाजाची सदसद्विवेकबुध्दी, एखाद्या कुरूढी विरूध्द जागृत करून सुधारणा घडवून आणणे. सद्सद्विवेक म्हणजे मानवाच्या मनातील ईश्वरी आवाज असून त्याच्या आज्ञेचे पालन प्रत्येकाने करायला हवे. भारतासारख्या विशाल राष्ट्राची विवेकबुध्दी जागृत करण्याचे कार्य अवघड आहे याची जाणीव त्यांना होती पण हे कार्य व्याख्याने, वृत्तपत्रे, ग्रंथाच्या माध्यमातून करणे शक्य होईल असे त्यांना वाटत होते. तिसऱ्या कायदा पध्दतीत बुध्दीनिष्ठ, विवेक, शाश्वत आणि सर्वसमावेशक अशी अधिसत्ता होय. यांची मनुष्याच्या बुध्दीनिष्ठेवर अढळ श्रध्दा होती. बुध्दीच्या बळावर हिन्दू समाजातील सर्वच प्रश्नांचे निरसन होवू शकेल यावर त्यांचा विश्वास होता. ब्रिटिश जनता, संसद, हिन्दी नोकरशाही व भारतीय प्रजा यांना भारतातील वस्तुस्थितीचे यथार्थ अवलोकन करून दिल्यास सुधारणांना व इतर कार्याला त्यांचा पाठिंबा मिळेल असे रानड्यांना वाटत होते. त्यांचा कायदा करण्यावर भर देण्याचे मुख्य कारण म्हणजे परकीय सरकारचे भारतातील अस्तित्व होय. वरील दोन पध्दतीने सुधारणा करण्यास अपयश आल्यास कायद्याचा आधार घेणे आवश्यक ठरेल. रानड्यांची कायद्याची संकल्पना, ऐतिहासिक सिध्दान्ताशी संलग्न आहे. जनतेच्या परिस्थितून व अनुभवामधून कायदा साकार होतो. हिन्दू समाजाला जी सुधारणा हवी असेल तर त्या सुधारणेची सर्वांनी मिळून एकजुटीने निः- संदिग्ध व स्पष्ट शब्दात मागणी केल्यास सरकार ती सुधारणा अंमलात

आणि शाळेल अशा पद्धतीने केलेला कायदा लादणारासुन लोकव स्वतंत्र बंधनकारक मानतील सामाजिक क्षेत्रात सरकारी हस्तक्षेप झाल्यास भारतीय जनजीवनाचे नुकसान होईल ही भीती निराधार आहे."[32] असे त्यांचे मत होते.

मलबारींनी केलेल्या स्त्रीविषयक या प्रयत्नांच्या यश अपयशाचा इतिहास त्यांचे मित्र दयाराम गिडूमल यांनी " Status of woman in India, या विषयावर पुस्तकरूपात प्रसिद्ध केले. त्यात गिडूमलच्या आग्रहा ने रानड्यांनी या पुस्तकाला प्रस्तावना Shastric text on the subject of Infant Hindu marriage " या शीर्षकाखाली दिली. त्यानंतर जाने-एप्रिल १८८९ च्या त्रैमासिकातही " The sutra and smirti Dicta on the subject of Hindu marriage" हा लेख लिहीला हा लेख रमाबाईंनी प्रकाशित केलेल्या संकीर्ण लेखसंग्रहात समाविष्ट केलेला आहे. यालेखात शेवटी ते म्हणतात की, " अशी आशा आहे की, सुधारणेच्या प्रतिकाराची लाट ओसरल्यावर सदाचारांना उराशी घट्ट धरून बसल्याने जुन्या शास्त्रोक्त उज्वल परंपरेची पायमल्ली केली जात आहे, हे लोकांच्या लक्षात येईल. जुन्या परंपरेस अनुसरून फेरफार करा असे सांगण्यात सुधारकांचा मनसोक्त क्रांती घडवून आणण्याचा उद्देश नसून धर्माच्या जुनाट वृक्षावर जी बांडगुळे उत्पन्न झाली आहेत, ती कापून काढण्याचा उद्देश आहे, असे लोकांना दिसून येईल".[33] अशा रितीने याममंधी सुधारकांच्या कार्यामुळे समाज सुधारणेला पडणारी खीळ दाखविण्याचा प्रयत्न केला व त्याचे दुष्परीणामही सांगितले. पण त्यावेळी सरकारने कायदा केलाच नाही. काही काळा नंतर इ.स. १९२९ मध्ये बालविवाह प्रतिबंधक कायदा करण्यात आला. संमतीवयाच्या टिपणीमुळे जे वैचारिक संघर्ष निर्माण झाले त्यातूनच समाजाला आपल्यातील उणीवांची जाणीव होवू लागल्याचे ते चिन्ह होते. मलबारींना रानडेंबद्दल आदर होता. त्यांनी रानड्यांबद्दल उद्गार काढतांना " Mr.Ranade - is perhaps the ablest Native judicial officer in India :

few know as I do what marvelous sagacity and acumen that man possesses"[३४] असे म्हटले.

इ.स. १८८५ ला मलबारींच्या पत्रकावर भारतात वादविवाद सुरु असतानाच मुंबईतील एका लहान प्रसंगाने सुधारकांचे लक्ष वेधले. रखमाबाई ही जनार्दन पांडुरंग या गृहस्थाची मुलगी होती. इ.स. १८६७ ला तिच्या वडिलांच्या मृत्यूनंतर तिच्या आईने डॉ. सखाराम अर्जुन ह्या व्यक्तीशी लग्न केले. त्यावेळेच्या कायद्याप्रमाणे रखमाबाईला वडीलांची सर्व संपत्ती मिळाली होती. तिचे लग्न डॉक्टरांचा एक नातलग व आश्रीत (दादाजी) याच्याशी वयाच्या १३ व्या वर्षी करुन देण्यात आले. शिक्षणाने सामान्य व रोगाने पीडित असल्यामुळे रखमा त्याच्या घरी सासरी न जाता वडिलांकडेच राहिली. तिने शिक्षण घेतले होते. दादाजीने रखमाला घरी आणण्याच्या प्रयत्न केला. डॉ. अर्जुन वारल्यानंतरही ती घरी न आल्यामुळे दादाजीने १२ मार्च १८८४ हायकोर्टात फिर्याद केली. हिन्दू शास्त्राप्रमाणे दादाजीकडे जाण्याची सक्ती होण्याची चिन्हे दिसताच तिने अँग्लो-इंडियन वृत्तपत्रात पत्रे प्रसिद्ध करुन सुधारकांची सहानुभूती मिळवून कोर्टाच्या न्यायावर परीणाम व्हावा असा प्रयत्न सुरु केला. जस्टीस हौलेने हिन्दु विवाह कायद्यात तशी काहीच तरतुद नसल्याचे सांगितले तेव्हा रखमाबाईने "नवऱ्याकडे जाण्यापेक्षा तुरुंगात जाईन" असे जाहिर केले. मुंबई कॉलेजचे प्रिन्सीपल वर्डस्वर्थ यांनी तिच्या मदतीसाठी रखमाबाई "डिफेन्स कमेटी" स्थापन करुन, तिची नुकसान भरपाईची सोय केली. रखमा ही डॉ. सखाराम अर्जुनांची मुलगी असल्याने सुधारकांचा तिला पाठिंबा मिळाला. हिन्दु स्त्रियांची दयनीय स्थिती लक्षात घेतल्याने हा खटला विशेष नसतांनाही गाजला. या विषयावर महाराष्ट्रात चर्चा सुरु झाल्या. वक्तृत्वोत्तेजक सभेतही हा विषय चर्चीला गेला. रानड्यांनी या व्यासपिठावरुन दिलेल्या भाषणात "स्त्रियांचे हक्क" यावर व्याख्यान दिले.

हे व्याख्यान २३ मे १८८७ च्या "ज्ञानप्रकाश" मध्ये प्रसिध्द झाले होते. त्याला प्रत्युत्तर म्हणून लो. टिळकांनी केसरीत लेख लिहून निषेध व्यक्त केला होता. [35] त्यामुळे या प्रकरणाला चांगलीच धार चढली.

रानडे यांनी स्त्रीविषयीच्या हीन दर्जाचे अनुदाराबद्दल काढणाऱ्यांवर टीका करून "स्मृती वाक्ये" स्त्रिया विषयी किती उदार दृष्टिकोन ठेवतात याची आठवण करून दिली. "न स्त्री स्वातंत्र्यमर्हति" या वचनाचा अर्थ आपल्या स्वार्थासाठी कसा लावून घेतात, याचे विश्लेषण देऊन पुढे म्हणतात, "स्त्री जातीचे जे दोष आपण वर्णन करतो, त्या वेळी ते दोष आपण आपल्या मातेवर, आपल्या कन्येवर व आपल्या भगिनीवर ही आरोपिता हे लक्षात राहू नये आश्चर्य आहे. आपल्या मातेची, कन्येची, भगिनीची व पत्नीची अशा रीतीने भर सभेत विटंबना करावी, याहून अधिक कृतघ्नपणाची कल्पनाच होत नाही. आपला पुरुषार्थ स्त्रियांपुरताच राहिला आहे असे आपण आपल्याच तोंडाने म्हणून घेणे याहून दुसरे लाजिरवाणे कृत्य कोणाच्याही हातून घडणार नाही. पुरुषार्थ दाखवावा असे वाटत असेल तर त्याला अन्य स्थळे पुष्कळ आहेत. सर्व पृथ्वीवरील लोक आपल्यावर चढ करून आपल्याला तुच्छ मानीत आहे, याची लज्जा वाटावी, हे एकीकडे राहून, पुरुषात काय सत्ता चालविण्याची ती घरातील आपल्या स्त्री-समाजावर चालवावी असे वाटणे, याहून अधमपणाची दुसरी कोटी दिसत नाही". [36] रानडेंच्या या वक्तव्यावर वामन शिवराम आपटे यांनी आक्षेप घेऊन वसंत व्याख्यानमालेत भाषण दिले होते परंतु त्यातून काहीच निष्पन्न झाले नव्हते. पण या प्रकरणामुळे स्त्रियांच्या अमानवीय वागणूकी विषयी हळूहळू मनुष्यतेच्या दृष्टिकोनातून पाहण्याचा प्रयत्न समाजाकडून होवू लागला हेच सुधारकांच्या यशस्वी कार्याचे द्योतक होते.

संमती वयाच्याच काळातच महाराष्ट्रात "शारदासदन" प्रकरणाने खळबळ माजली होती. रानड्यांना स्त्री शिक्षणाबद्दल आस्था असल्याने त्यांना पंडिता रमाबाई या संस्कृत विद्वान स्त्रीचे कौतुक वाटत होते.

तिचे पडील अनंतशास्त्री डोंगरे हे सुधारकवृत्तीचे असल्याने त्यांनी पत्नीला व मुलीला संस्कृतचे स्वत: शिक्षण दिले. त्यांना समाजाच्या बराच विरोध सहन करावा लागला. मुलींनी वयात आल्यानंतर स्वत:च्या पसंतीने विवाह करावा असे मत प्रदर्शन केल्याने तत्कालीन समाजाने त्यांना वाळीत टाकण्याचा प्रयत्न केला होता. शंकराचार्यांशी त्यांनी वाद घालून सनातनी लोकांना गप्प बसविले होते. पुढे पंडितांचा मृत्यू झाल्यानंतर रमाबाई भावाबरोबर बंगाल मध्ये गेल्या, तेथेही त्यांच्या विद्वत्तेमुळे त्या प्रसिद्ध झाल्या. त्यानंतर त्यांचा विवाह बिपीन दास या व्यक्तीशी होवून त्यांना एक कन्या झाली पण दुर्दैवाने पतीचा मृत्यू झाला. त्यांच्या विद्वत्तेची कीर्ती ऐकून महाराष्ट्रातील रानडे भांडारकर, मोडक आदी मंडळींनी तिच्या विद्वत्तेचा उपयोग स्त्रीयांच्या उत्कर्षासाठी करुन घ्यावा या उद्देशाने महाराष्ट्रात तिला आमंत्रित केले. रानडे यांच्या वाड्यातच त्यांचे भागवतावर पहिले प्रभावी व्याख्यान झाले. नंतर रमाबाईनी सुधारकांच्या मदतीने "आर्य महिला समाज" संस्था स्थापन केली. तेथे दर शनिवारला त्या निरनिराळ्या विषयावर व्याख्यान देत. रमाबाई रानडे याही त्या सभेत जात असत. पुढे पंडिता रमाबाईंनी इंग्रजीचे शिक्षण घेतले व त्या वैद्यकीय शिक्षण घेण्यास इंग्लडला गेल्या. तेथे त्यांनी ख्रिस्ती धर्माचा इ.स. १८८३ला स्वीकार केला. त्यानंतर भारतात परतल्यानंतर त्यांनी स्त्रियासाठी "शारदासदन" स्थापन केले. त्यांचा उद्देश विधवा स्त्रियांना आश्रय देणे हा होता. रानड्यांनी त्यांना या कार्यात मदत करुन त्यांची महाराष्ट्रभर व्याख्याने आयोजित केली. रानडे, आगरकर सारखे सुधारक या संस्थेचे कार्य व उद्देश चांगले असल्याने रमाबाई ख्रिस्ती असल्यातरी विशेष फरक पडत नाही या मताचे होते.

पण लो. टिळकांनी रमाबाई धर्मपरिवर्तनाचे कार्य करण्यासाठी शारदासदनाचा उपयोग करीत आहे, अशी टिका केसरीतून करण्यास सुरवात केली. "शारदासदन ही संस्था केवळ प्रौढ मुलींच्या अगर विधवांच्या

बौध्दिक आणि व्यवहारिक उन्नतीसाठी निघालेली नसून मेंढराचे कातडे पांघरून अकस्मात घात घालणाऱ्या हिंस्त्र श्वापदासारखी आहे, आणि तिचा उद्देश ख्रिश्चन धर्मप्रसार करण्याचा आहे." बोस्टनमधून प्रोटेस्टंट ख्रिश्चन मिशनरी त्यासाठी पैसा पूरवितात. तो पत्रव्यवहार उघडकीस आणला.[३७] शारदासदनात जबरजस्तीने ख्रिस्ती बनविलेल्या मुलींनी दिलेली कागदपत्रे लो. टिळकांनी केसरीतून छापली. पंडिता रमाबाईंनी त्यांचा इन्कार केला पण नंतर रानडे, भांडारकर, नूलकर, लोकहितवादी आदि मंडळींनी शारदासदनाच्या कार्यकारी मंडळाच्या पदाचा राजीनामा दिला. तसे पत्र १३ ऑगस्ट १८९३ ला वृत्तपत्रात छापले. हे पत्र D.S. Sharma यांच्या The Renaisanee of Hindustan या ग्रंथात १३५-३६ पानवर दिलेले आहे.[३८] ह्या राजीनाम्याच्या पत्रातून रानड्यांच्या मनस्थितीची कल्पना येते. आपला दुरुपयोग केल्याचे दु:ख त्यांना झाले होते. रमाबाईंनी ख्रिस्तीकरण करून आपल्या सामाजिक कार्याला विकृत वळण लावले याचे रानड्यांना वाईट वाटले. समाजाला अशा विद्वान व्यक्तींच्या मार्गदर्शनाची गरज असतांना त्या व्यक्ती योग्य नेतृत्व देवू शकल्या नव्हत्या. या प्रकरणांमुळे रानडे, लोकहितवादी, भांडारकर, भट, नूलकर यांच्यावर बरीच टिका झाली होती. रानड्यांची समाजकार्यासाठी व्यक्ती निवडण्याची ही पहिली चूक ठरली व त्याचे प्रायश्चित्त त्यांनी जाहीर माफी मागून करून घेतले होते. पण यामुळे ते निराश झाले नाहीत, त्यांनी आपले लक्ष सामाजिक परिषदेच्या कार्याकडे वळविले होते व आपले समाजकार्य चालूच ठेवले होते. समाजसुधारणा संघटितरित्या घडवून आणण्यासाठी एखादी राष्ट्रीय स्तरावर परिषद स्थापन करावी असा त्यांचा विचार होता. आणि हा विचार राष्ट्रीय सामाजिक परिषदेच्या रूपाने साकार झालेला होता. समाजपरिवर्तनासाठी ही संघटना उपयुक्त ठरेल असा त्यांचा विश्वास होता.

इ.स.१८९०-९२ या काळामध्ये पंच हौद मिशनचे वादळ रानडे यांच्या जीवनात निर्माण झाले होते. रानडे धार्मिक सात्विक प्रवृत्तीचे असल्याने

हिन्दु धर्माबद्दल त्यांना आस्था होती. इ.स. १८९१ सप्टेला हिन्दू धर्माचे महत्व एका व्याख्यानाव्दारे पटवून दिले, त्यापवर्वी डॉ.पेन्टकॉस्ट या गृहस्थाने ख्रिश्चन धर्मावर भाषण दिले. या भाषणाला रानडे हजर होते. त्यांनी या भाषणाच्या समारोपात ख्रिश्चन धर्माची वस्तुनिष्ठता सांगून हिन्दू धर्माची महत्वापटवून दिली होती."[39] या व्याख्यानापूर्वी १४ ऑक्टो. १८९० ला पुण्यातच ख्रिश्चनांच्या पंचहोदमिशन या संस्थेत चर्पासत्र होते. त्यात अनेक स्त्री पुरुषांबरोबर रानडे व टिळकही हजर होते. त्यात बावन्न ब्राम्हण व्यक्तींचा समावेश होता. समारंभाच्या शेवटी चहापानाचा कार्यक्रम झाला. मिशनमधील भगिनींनी सर्वांना चहा, बिस्किटे दिली. त्यात काहींनी चहा घेतला व रानड्यांबरोबर काहींनी स्त्री-दाक्षिण्या दाखवून कप हातात घेवून तसाच परत ठेवून दिला. याकाळात समंतीवयाचा वाद चालू असल्याने ख्रिश्चन व्यक्तीकडे चहा घेणे हे जातिविरोधी कृत्य समजले जाई, म्हणून ही सावधता बाळगली होती. ही घटना सहा महिने झाल्यानंतर श्री. गोपाळराव जोशी [डॉ.आनंदीबाईचे पती] यांनी "पुणे वैभव" या वृत्तपत्रात लेख लिहून चहापानाला हजर असणाऱ्या व्यक्तिंनी जातीबाहेरचे कृत्य केले म्हणून त्यांना जाति बहिष्कृत करावे" अशी मागणी केली. "जोपर्यंत ही मंडळी प्रायश्चित घेत नाही तोपर्यंत हा बहिष्कार चालू ठेवावा."[40] असा आग्रह धरला.

ह्या व्यक्तीने स्वत: ख्रिश्चन धर्मपरिवर्तन करुन पुन्हा धर्मान्तर केले होते. जेव्हा बाल विवाह विरोधी चळवळ सुरु होती. तेव्हा विरोधकांचे नेतृत्व करुन सहामहिन्याचा गाढव व दोन महिन्याच्या गाढवीचे लग्न मोठ्या थाटामाटात घडवून आणला होता. त्यांचा लिखाणाचा प्रभाव तत्कालीन कर्मठ ब्राम्हणसमाज पुढाऱ्यांवर पडला व त्यांनी १८९१ च्या शेवटी बहिष्काराला सुरवात केली. सर्वप्रथम पंच होद मिशनमध्ये सहभागी झालेल्या व्यक्तींशी संबधीत भिक्षुकांच्या मागे लागले. नंतर आचारी पाणक्यांवर तोच प्रसंग आणला, तेव्हा भिक्षुकांनी प्रायश्चित घेवून माफी मागितली [मागीतली]

त्यानंतर संबधीत लोकांच्या नातेवाईकावर ग्रामण्य करण्यास सुरवात केली. शंकराचार्यांकडे दोन शास्त्री पाठवून फिर्याद केली. तेव्हा रानडे यांनी शास्त्री लोकांपुढे आपली बाजू मांडण्याचा प्रयत्न केला. नातेवाईक मित्रांचे ग्रामण्य कमी व्हावे, या दृष्टीने त्यांनी प्रायश्चित घेण्याचे ठरवून लोणावळ्या हून आल्यानंतर रानड्यांनी १५ मे १८९२ ला पुण्यात प्रायश्चित घेतले आणि "बाम्बे गॅझेट"ला एक लांब पत्र लिहून आपली भूमिका मांडली. त्यात रानडे शेवटी म्हणतात की, ."The orthodox attacks against the reformers were so violent and based on such absurd charges that it was imperative to "remove the dispute from the lynch-law tribunals to the regularly con-situted courts.---- the ecclesiastical heads of the community.---- and for my associating freely with those of my friends who visited Erupoe and for my connection with the prathana samaj, I have continued to this day to be regarded as an excommunicated person" ४१ हे पत्र २८ मे १८९२ ला प्रकाशीत करण्यात आले होते. प्रायश्चितामागील भ्रम गैरसमज दूर होण्यासाठी रानड्यांनी वसंत व्याख्यान मालेत "Mental prepossessions" या विषयावर ५ जून १८९२ ला व्याख्यान देतांना युरोपमधील धार्मिक सुधारणेची प्राथमिक अवस्था व आजची आपली अवस्था याबद्दल तुलनात्मक साम्य सांगून आपल्यावर लादलेल्या नऊ आरोपांचे खंडण केले. स्वतः त्यांनी चहा घेतला नसता तरी मित्र, नातेवाईकांसाठी प्रायश्चित घेतल्याचे स्पष्ट केले. त्यात पुढे ते म्हणतात की, "संमती-वयाच्या वादापासून सुधारणेचे काही शत्रू काहीतरी निमित्त पाहत होते, त्यांना हे पंच हौद मिशनचे प्रकरण सापडले---- शंकराचार्यांचा अधिकार मानण्यात सुधारकांची पूर्वपरंपरा सुटलेली नाही. १८७० साली पुर्नविवाहाचा वाद त्यांच्याकडे निर्णयार्थ गेला होता. पुढे परदेशगमन करणारांना पंक्ती पावन समजण्यास हरकत नसावी, या मुद्दयांची वाटाघाट सुधारकांनी

सुधारकांनी शंकराचार्यांकडे केली आहे. मग आताच या प्रकरणात त्यांची उपेक्षा करण्याची काय जरूर होती ?[४२] असा सवाल करून त्यांनी सनातनी लोकांचा फोलपणा उघड करण्याचा प्रयत्न केला होता. समाजाला वास्तवतेचे दर्शन घ्यावे हा त्यांचा उद्देश होता. रानड्यांनी केलेल्या प्रायश्चिता-संबंधी प्रत्यक्ष माहिती रमाबाई रानडेच्या आत्मचरित्रातील पान १५३ - १६५ या पानावर आहे. "सुबोध पत्रिकेतील" वेचाळीसातील एक" या सहीचे १६ जून १८९२ चे एक पत्र प्रायश्चिताची माहीती देणारे आहे, हे पत्र "विश्रब्धशारदा" भाग एक ह.वि.भाटे या संपादकांनी २३६-२३८ या पानावर प्रकाशित केले आहे. रानडे यांनी प्रायश्चित घेतल्यामुळे सुधारणेचे एक पाऊल मागे पडले अशी टीका रानड्यांवर झाली होती. हे प्रकरण त्यांच्या जीवन शैलीशी विसंगत असल्यामुळे त्यांच्या सुधारणा चळवळीला थोड्या प्रमाणात हादरे बसले होते. तरीही त्यांनी आपले कार्य अन्यक्षेत्रात केंद्रित करून चालूच ठेवले होते. समाजाकडून झालेल्या विरोधाने ते कधी निराश, उदास झाले नाहीत. गोखल्यांच्या शब्दात, "ते नेहमी म्हणत, "औदासीन्य हा या काळातला मोठा शाप आहे" प्रकोपी मते एक वेळ त्यांना चालली असती, कार्यशक्ती अमार्गाला लागलेली सुद्धा चालली असती, परंतु या औदासिन्याने त्यांना अत्यंत उद्वेग येई. त्यावर जय मिळविणे त्यांना फार कठीण वाटे."[४३] हा विचार रानड्यांच्या सकारात्मक विचारांचा एक भाग होय.

रानडे यांनी समाजकार्य करीत असतांना राष्ट्रीय शिक्षण क्षेत्रात भरीव कामगीरी केली आहे. समाजाची प्रगती करायची असेल तर तो समाज शरीर दृष्ट्या आणि भौतिक साधन दृष्ट्या संपन्न झाला पाहिजेत, या आवश्यक गरजा आहे असे रानड्यांना वाटत होते. पण त्याचबरोबर शारिरीक गुणांबरोबर बौध्दिक शक्ती व नैतिक शक्तीचाही विकास होणेहेही आवश्यक आहे. बुध्दीच्या कर्तृत्वास वळण लावणाऱ्या योग्य त्या नैतिक शक्तीचा विकास होणे अगत्याचे आहे. हे रानडे जाणून असल्यामुळे "आपल्यापेक्षा

अधिक सामर्थ्यवान अशा राष्ट्रांबरोबर करावयाच्या झगड्यांमध्ये आपण मागे पडू नये, अशी इच्छा असेल तर आपल्याला या दिशेनेच कार्य करीत राहिले पाहिजे."[४४] शिक्षण घेत असतांना रानडे सतत वाचन करीत असत. तेव्हा त्यांना ते ग्रंथवाचन सर्वांनी केले पाहिजे असे त्यांना वाटत असे, प्रत्येक तरुणाने आपली उच्चपरंपरा आणि उच्चतर असे भवितव्याची ओळख शक्य तितक्या लवकर करावी अशी त्यांची इच्छा होती. त्यासाठी शिक्षक वर्ग जागृत असला पाहिजे असे त्यांना वाटत होते, ते म्हणतात, "बाहेरील मोठ्या जगात कोणत्या शक्ती कार्य करीत आहे, याची योग्य जाणीव त्यांनी आपल्या विद्यार्थ्यांत करुन द्यावयास हवी. या शक्तींना तात्पुरता प्रतिबंध होतो किंवा बाह्यत: अपयश आल्यासारखे दिसते. असे असले तरी मनुष्याच्या उन्नतीकरिता आणि सुखांकरिता जे प्रयत्न सा-या मानवजातीकडून होतात. त्याचे सार या शक्तीच्या कार्यात आलेले असते, हेहि त्यांनी आपल्या विद्यार्थ्यांना समजून सांगावयास पाहिजे."[४५] अशा शिक्षकांची गरज भारताला आहे तरच आपण आपल्या देशाची परिस्थिती बदलू शकतो असे रानड्यांना वाटत होते. पुढे ते शिक्षकाचे कर्तव्य सांगताना म्हणतात की, " आपल्या शिक्षक वर्गाने विद्यार्थ्यांना मनुष्य या नात्याने माणसाचा दर्जा काय असतो याची जाणीव करुन दिली पाहिजे.--- आपणा सर्वांचे विचार उच्चार आणि आचार मानवजातीसंबंधी वाटणा-या प्रेमाने प्रेरित झाले असावेत. --- पुराणकालातील ऋषिजनांमध्ये अगस्त्य आणि त्याची पत्नी लोपामुद्रा, अत्रि आणि त्याची भार्या अनसूया आणि वशिष्ठ व याची अर्धांगी अरुंधती यांची उदाहरणे उत्तम नमुना ठरतील असे वाटते. याप्रमाणे आधुनिक काळात आपल्याकडील डॉ. भांडारकर, मद्रासचे दि.ब.रघुनाथराव बंगालमधील केशवचंद्र सेन, प्रतापचंद्र मुजुमदार आणि शिवनाथ शास्त्री व पंजाबचे लाला हंसराज आणि लाला मुनशीराम यांचीहि नावे घेता येईल. ज्या समाजामध्ये अशा उपदेशकांची अखंड परंपरा चालू शकते तो माझ्या मते केव्हाही नाश पावणार नाही आणि अशा लोकांचा उपदेश आपल्यास

बोध करुन, स्फूर्ति देऊन, मार्ग दाखविण्यास लायक असतांना "पूर्व नियोजित पुण्यभूमी" चे दर्शन होण्याचा काल अधिकाधिक जवळ येत राहणार याविषयी मला बिलकुल शंका नाही."[४६] असे रानडे गुरु परंपरेबद्दल आपले मत व्यक्त करतात. प्राथमिक व दुय्यम शाळेतील शिक्षण हे सर्वसामान्य तयारीचे असते. पण ज्ञानाच्या एका विशिष्ट शाखेतील शिक्षण विश्वविद्यालयीन क्षेत्रातून होत असल्याने विशिष्ट हेतूने प्रेरित झालेल्या शिक्षण पद्धतीचा अवलंब केला तर ते शिक्षण जास्त उपयुक्त ठरेल असे त्यांना वाटते.

महाविद्यालयीन जीवन शिक्षण प्रणालीबद्दल आपले विचार व्यक्त करतांना म्हणतात की, " विद्यार्थ्यांना कॉलेजमध्ये राहणे आवश्यक असावे. शारीरिक व्यायाम हा कॉलेजच्या शिस्तीचा एक भाग केला जावा आणि बौद्धिक प्राविण्याप्रमाणे यामधील प्राविण्याचाही विचार केला जावा.--- आपले प्रयत्न अभ्यासक्रम सुलभ व्हावा आणि परिक्षांची संख्या कमी करुन त्या कमी कठीण व्हाव्यात या दिशेने प्रयत्न व्हावयास पाहिजे." त्याच बरोबर "विद्यार्थ्यांनी पदवी मिळाल्यानंतर विद्यापीठापासून दूर न जाता आपल्या नंतरच्या जीवनात आणि व्यवहारात विद्यापीठाशी असलेला उन्नतीकारक संबंध कायम राखावा, अशी काही व्यवस्था विद्यापीठांनी केली पाहिजे. विद्यापीठाच्या कार्याचा योग्य तो विस्तार केल्यानेच हे चांगल्या प्रकारे साधणार आहे."[४७] असे शैक्षणिक क्षेत्राबाबत प्रगल्भ विचार रानड्यांनी मांडले होते. रानड्यांचे इ.स. १८८१ पासून शिक्षण क्षेत्रात कार्य प्रभावी ठरलेले होते.

ब्रिटिश सरकारने स्त्रियांचे प्राथमिक शिक्षण व ब्राम्हणेत्तर मुलांच्या शिक्षणासंबंधी परामर्श निर्णय घेऊन शिक्षणखात्यात वाढ केली होती. इ.स.१८८२ मध्ये सार्वजनिक सभेने काही भारतीय विद्यार्थ्यांना इंग्लंडमध्ये शिक्षणासाठी पाठविण्याचा निर्णय रानड्यांनी घेतला होता. तेव्हा सभे तर्फे जमीनदार राजे, मुंबईतील धार्मिक वर्गाकडून सार्वजनिक सभेने इ.स.१८८२

मध्ये भारतीय विद्यार्थ्यांना उच्च शिक्षणासाठी इंग्लंडला पाठविण्याचा निर्णय घेतला होता. त्यासाठी आर्थिक मदत म्हणून राजे, जमीनदार, मुंबईतील धनिक वर्गाला यासाठी आवाहन करतांना रानडे यांनी श्रेमिक्राकात लिहिले की, " A Nation's destiny for good or evid hangs on its rising generation and when the best of them are trained and qualified by a rich experience of all that is noble and powerful in the civilized world. India under such leadership will certainly be rescued from its present helplessness (and) a new life will beat in the old members of the social body." ४८ भारताचे असे उज्वल भविष्य रानड्यांनी रेखाटतांना वास्तवतेचे भान ठेवले होते.

रमाबाई व माधवराव रानडे यांनी स्त्रियांसाठी प्राथमिक शाळा इ.स. १८८१ मध्ये सुरू केली होती. त्याशाळेला नंतर पंडिता रमाबाई सामील झाल्या होत्या. विदुषी रमाबाईंच्या सहाय्याने स्त्रियांचे शिक्षण क्षेत्र व्यापक करण्याचे रानड्यांचे विचार "शारदासदनाच्या" प्रकरणामुळे मागे पडले. सप्टें.१८८२ ला हंटर कमिशन पुण्यात आले. तेव्हा त्यांनी "आर्य महिला समाज" संस्थेला भेट दिली होती. त्यावेळी रानडे या संस्थेशी संलग्न होते. रानड्यांनी स्त्रियांच्या शिक्षणासाठी बरेच प्रयत्न केले होते. जुलै १८८७ ला त्यांनी इतर समाजसुधारकांच्या मदतीने पुण्यात मुलींसाठी "हुजूरपागा" शाळेची स्थापना केली होती, त्या शाळेला रानडे यांच्या विनंतीला मान देवून एक इंग्लिश गृहस्थ विल्यम वेडर्नबर्ग संचालक म्हणून लाभले होते. विष्णुशास्त्री चिपळूणकर, टिळक, आगरकर यांनी स्वदेशी शिक्षणाचे उच्च ध्येय समोर ठेवून इ.स.१८८१ "न्यू इंग्लिश स्कूल"ची स्थापना केली होती. त्याला रानड्यांनी प्रोत्साहन दिले होते. तसेच डेक्कन एज्युकेशन सोसायटी या संस्थेची स्थापना करण्यात आली, त्यात रानडेचा सहभाग होता. रानडे पुण्यात असतांना त्यांचा संबंध नेटिव्ह इन्स्टिट्यूशन, फर्ग्युसन कॉलेज, नूतन मराठी विद्यालय, फिमेल

हायस्कूल इ. शिक्षण संस्थाशी संबंध आलेला होता. रानडे यांनी रमाबाईना स्वत: घरी शिकवून त्यांचे सहाय्य समाजकार्यासाठी घेतले होते व त्यांना सार्वजनिक जीवनात समाविष्ट केले होते. रमाबाईंनी आपल्या आत्मचरित्रामध्ये या शिक्षणाचा उल्लेख केला आहे. रानडे मुंबई विद्यापिठाच्या सिंडीकेटचे सभासद असतांना त्यांनी देशी भाषांना शिक्षणक्षेत्रात स्थान मिळवून दिले होते. अशा रितीने रानड्यांनी राष्ट्रीय शिक्षण क्षेत्रात अप्रत्यक्षरित्या भरीव कामगिरी केली होती.

यानंतर रानडे यांनी आपले लक्ष राष्ट्रीय सामाजिक परिषदेतील कार्याकडे केंद्रित केले. रानडे यांनी समाज सुधारणा करतांना ज्या अनेक संघटना उभारलेल्या होत्या. त्यापैकीच राष्ट्रीय सामाजिक परिषद ही एक संघटना होय. भारतातील पुढाऱ्यांनी इ.स.१८८५ मध्ये ए.ओ.ह्युम यांच्या मदतीने राष्ट्रीय सभेची स्थापना केली होती. "ह्युम यांना या राष्ट्रीय सभेत फक्त सामाजिक विषयांचा विचार केला जावा आणि राजकीय प्रश्न निरनिराळ्या प्रांतिक संस्थांनी करावा असे वाटत होते. पण त्यावेळचे व्हाईसराॅय लाॅर्ड डफरीन ने या सभेत राजकीय विषय चर्चिले जावे म्हणजे लोकांच्या मनातील सरकार बद्दलच्या भावना कळतील" अशी सूचना केली. त्यामुळे राष्ट्रीय सभेला राजकीय संस्थेचे स्थान मिळाले. तरीही सुरुवातीला या सभेत सामाजिक प्रश्नांचा विचार केला गेला. "पहिल्या अधिवेशनाच्या काळामध्ये अधिवेशनातील तिसऱ्या दिवशी सामाजिक विषयावर न्या.रानडे आणि मद्रासचे न्यायाधिश दि.बी.रघुनाथराव बोलले असे अधिवेशनाचे चिटणिस श्री. काशीनाथ त्र्यंबक यांनी म्हटले आहे. पण ह्याच सभेत काही प्रतिनिधींनी राष्ट्रीयसभेच्या व्यासपीठावर सामाजिक प्रश्न हाताळले जावू नयेत यासाठी कोणती उपाय योजना करावी अशीही चर्चा सुरु केली ".[४९] असे म्हटले आहे.

दुसऱ्या अधिवेशनाच्या काळात अध्यक्ष पद भूषविलेल्या दादाभाई

नौरोजींनी आपल्या अध्यक्षीय भाषणात "राजकीय स्वरूप असलेल्या काँग्रेसने या सभेत फक्त राजकीय प्रश्न हाताळावेत. सामाजिक प्रश्नांचा विचार करण्या करीता दुसरी तरतूद करावी. कारण सामाजिक प्रश्ना बाबत पुढा-यांमध्ये एकमत न झाल्यास काँग्रेस कमकुवत होईल असे त्यांना वाटत होते. पण रानड्यांना आणि रघुनाथरावांना दादाभाईचे हे मत मान्य नव्हते."[५०] याच काळात देशात आधी राजकीय की आधी सामाजिक? असा वाद निर्माण झालेला होता. रानडे यांना राजकीय व सामाजिक प्रश्न एकाच व्यासपीठावरून चर्चिले गेल्यास राष्ट्रीय सभेचे अस्तित्व धोक्यात येईल असे वाटत नव्हते उलट राजकीय व सामाजिक सुधारणा एकाच वेळी घडून येवून लोकांमध्ये राजकीय व सामाजिक जाणीव निर्माण होईल असे वाटत होते. त्यांना राजकीय व सामाजिक या संस्था मानवी जीवनाचेच एक अंग वाटत होते. रानडे यांनी सामाजिक व राजकीय या संस्था एकाच नाण्याच्या दोन बाजू आहेत हे पटवून दिले. त्यांना इ.स.१९०० मध्ये साता-याच्या प्रांतिक राजकीय परिषदे बरोबर सामाजिक परिषद भरवून रानड्यांना अध्यक्षस्थान दिले होते, त्यामध्ये आपले मत मांडताना रानडे बोलले की, "आपल्या देशातल्या प्रत्येक खेड्यात चावडी, देऊळ, विहीर, धर्मशाळा अथवा काही धार्मिक, काही सामाजिक व काही राजकीय स्थाने किंवा संस्था आहेत. त्यांचा उपयोग खेड्यातल्या प्रत्येक माणसाला होतो. चावडी असल्यासाठी, देऊळ नसल्यासाठी अशी उपयोगाची वर्गवारी किंवा विभागणी खेड्यात नसते. जो देवळात जातो, त्यालाच कालान्तराने चावडीवर जाऊन कर भरावा लागतो अगर आपल्या गा-हाण्याची वर्दी द्यावी लागते. जी स्थिती खेड्यांची तीच शहराची, दुकाने बाजार, रंगभूमि, देवालये, शाळा, दवाखाने, लष्करी छावणी या सर्वांशी माणसाचा मग तो लहान असो, स्त्री असो, वा पुरुष असो की रंक असो. संबंध येतो. या संबंधाच्या समन्वयाने माणसाचे जिवीत पूर्ण होत असते व त्यालाच नागरी (City life) जीवन म्हणतात. मानवजीवीताच्या गुंतागुंतीतल्या प्रत्येक

धाग्याकडे लक्ष द्यावे लागते. काळस्थळानुसार कधी एखाद्या धाग्याचे जास्त महत्व असेल, कधी कमी असेल पण त्यातल्या काही धाग्यांची पूर्ण उपेक्षा करुन केव्हाही चालणार नाही."५१ राजकारणाबरोबरच समाजकारणाचाही विचार केला जावा असा त्यांचा आग्रह होता.

राजकारणाविषयी बोलतांना जबाबदार राज्यपद्धतीविषयी उत्साहाने बोलणारे पुढारी सामाजिक प्रश्नाबद्दल मौन पाळतांना बघून वाईट वाटले. राजकारणात थोडेसे यश मिळणाऱ्यांचा उदोउदो केला जातो. त्यांच्या दोषाकडे दुर्लक्ष केले जाते. पण सामाजिक सुधारणेसाठी त्याग करणाऱ्यांची उपेक्षा केली जाते. त्यांच्या वर्तनातील छोटासा दोष सुध्दा सहन केला जात नाही. उलट त्यांची ढोंगी, स्वार्थी, धर्मबुडव्या म्हणून निर्भत्सना केली जाते. या वस्तुस्थितीने रानडे व्यथीत होतांना दिसतात. कारण सामाजिक पाया बळकट असल्याशिवाय राजकीय इमारत टिकू शकणार नाही याचीजाणीव त्यांना होती. आजच्या काळाचे चित्र अगदी तद्वतच झाले आहे. आजही त्यांच्या विचारांची आवश्यकता वाटते आहे. रानड्यांनी राष्ट्रीय सभेत सामाजिक विषयांना टाळले जाणार हे लक्षात घेवून सामाजिक समस्येवर विचार करण्यासाठी नविन व्यासपिठ निर्माण केले.

रानड्यांनी इ.स.१८८७ ला मद्रासला काँग्रेसशी संबधीत पण स्वतंत्र अशी नवीन संस्था सामाजिक विषयावर चर्चा करण्यासाठी "राष्ट्रीय सामाजिक परिषद" नावाची सामाजिक परिषद काँग्रेस अधिवेशनाच्या वेळीच स्थापन केली. मित्र व सहकारी न्या. रघुनाथरावांचे सहाय्य माधवरावांना होतेच. या परिषदेमध्ये विषयांना मर्यादा नव्हत्या. राजकीय विषयही यात घेतले जात. ही परिषद राष्ट्रीय सभेनंतर त्याच व्यासपिठावर आयोजित केली जात असे. रानड्यांनी या परिषदेचे उद्देश नमूद केले आहेत त्यात ते म्हणतात की,
"We are in a sense as strictly national, social as well politically. Though the differences are great for purposes of immediate and practical reform, yet there is

a background of common traditions, common religions, common laws and institutions and customs and perversions of such customs which make it possible to deliberate together inspite of our diferences." [५२] या सामाजिक परिषदेची रचना राष्ट्रवादावर आधारित होती. या परिषदेचे कार्यक्रम वर्षभर चालत असत. ह्या सामाजिक परिषदेमध्ये धार्मिक विषय घेतले जाणार नाहीत असे ठरविण्यात आले होते. जसे राष्ट्रीय सभेने सामाजिक विषय टाळले तसेच या परिषदेने धार्मिक विचार टाळले. त्यामुळे प्रार्थना व आर्य समाजाचे अनुयायी या व्यासपीठावर दिसू लागले. रानड्यांनी काँग्रेसला व राष्ट्रीय परिषदेला "दोन भगिनी आहेत व परिषदेचे ध्येय सामान्य माणसाचे जीवन चांगले करणे व काँग्रेसचे ध्येय राष्ट्राची प्रगती करणे आहे." [५३] असे म्हटले आहे.

सामाजिक परिषदेचे कार्य म्हणजे स्थानिक सुधारणांच्या चळवळींना उत्तेजन देणे आणि वर्षातून एकदा त्या चळवळीतील व्यक्तिंनी एकत्र येवून परस्परांची ओळख करुन घेवून एकमेकांपासून स्फूर्ती घेवून पुढील कामाला लागणे, त्याचबरोबर परिषदेच्या वार्षिक अधिवेशनात परस्पर विचार विनीमय करुन सामाजिक चळवळीसाठी मार्गदर्शक तत्वे निश्चित करणे, परिषदेचे ठराव सूचनेच्या स्वरुपाचे असतील, असे माधवरावांनी दुसऱ्या अधिवेशनात इ.स. १८८८ ला स्पष्ट केले होते. रानड्यांच्या ह्या सामाजिक परिषदेच्या कार्याबाबत अनेकांनी टीका केली आहे. "ही परिषद मवाळ स्वरुपाची आहे " असे म्हटले गेले आहे. पण रानड्यांची भूमिका व कार्य ईरचनात्मक कृतीवर अवलंबून असे, संस्थात्मक कार्यामध्ये विचारांच्या आदान प्रदानाला जास्त महत्व आहे. त्यामुळे त्यात विचक्षणाला महत्व आहे व रानड्यांचा स्वभाव संयमशील, शांत प्रवृत्तीचा असल्याने त्यांचे कार्य त्यांच्या स्वभावाशी सुसंगत होते. समकालीन ज्योतिबाफुले यांचे कार्य प्रखर स्वरुपाचे असल्याने त्यांनी या सामाजिक परिषदेत आपला सहभाग

ठेवला नव्हता. व आगरकर हे सुधारक बुध्दिवादी विचारसरणीचे असल्याने ते आक्रमक भूमिका घेत असत. त्यामुळे ते ही ह्या सभेपासून दूर राहिले होते. मात्र रानडे ज्या ज्या व्यक्तिंचे सहकार्य मिळेल ते घेत असत. राष्ट्रीय सामाजिक परिषदेच्या स्थापनेनंतर प्रांतिय सामाजिक परिषदा स्थापन करण्यात आल्या होत्या, यात काही जातीय संस्थांचेही सहकार्य घेण्यात आले होते.

इ.स.१८९० मध्ये दिल्लीमध्ये काही शास्त्रींनी विवाह समारंभाच्या होणाऱ्या विनाकारण जास्तखर्च पध्दती विरुध्द मोहिम उघडली होती. इ.स.१८९३ ला संकेश्वर पीठाच्या शंकराचार्यांनी देवदासी पध्दती, जरठ कुमारी विवाह व हुंडापध्दती विरुध्दच्या चळवळीला पाठिंबा दिला होता. त्याला रानड्यांनी आपला पाठिंबा जाहिर केला होता.

रानडे वार्षिक परिषदेच्या अधिवेशनात आपला अहवाल सादर करीत, त्यात स्थानिक स्वरुपाच्या कार्याचा आढावा घेतला जाई. त्यातून असे आढळत होते की, भारतातील समाजात लहान व मोठ्या शहरी विभागात सामाजिक पुनर्रचनेबद्दल नवीन तत्वप्रणालीचे विचार मंथन चालले आहे. विवाहाच्या वेळी मुली, मुलांचे वय बारा आणि अठरा असावे, रखमाबाई सारख्या खटल्यापासून स्त्रियांना तुरुंगात पाठवू नये, वर-वधू मध्ये तीस वर्षाचे अंतर असेल तर विवाहाला बंदी घालण्यात यावी, विधवा विवाहाला प्रोत्साहन व बाल विधवांच्या केशवपनावर बंदी त्याप्रमाणे विवाह समारंभावर खर्च कमी करणे, बहुपत्नीत्वाचा, हुंडापध्दतीचा निषेध, आंतरजातीय विवाहाला प्रोत्साहन, स्त्री शिक्षणाला पाठिंबा इ. विषय या परिषदेतून चर्चिले गेले होते. पण यात मोठा दोष म्हणजे केवळ उच्च वर्णियांचा यात समावेश होता. "महाराष्ट्रात ज्योतिबा फुलेंचे सामाजिक कार्य दुर्लक्षित असे. रानडे आणि फुले मित्रत्वाचे संबंध होते असे असतांना सा. परिषदेने व रानड्यांनी ज्योतिबांच्या विचारसरणी सदृश्य आधारलेली भूमिका स्विकारलेली नाही याचे आश्चर्य वाटते. सामाजिक परिषदेने समाजसुधारणे च्या कार्यात सर्व संस्थांना एकत्रित आणतांना सर्व राष्ट्रीय संस्थांचा पाठिंबा मिळविण्याचा

प्रयत्न केल्याने जातींच्या प्रश्नाचा विचार परिषदेने केला नसावा.[५४]
सामाजिक परिषदेने तसे वैशिष्ट्ये पूर्ण कार्य इ.स. १८९५ पर्यंत केलेले नव्हते.

इ.स. १८९५ ला सामाजिक परिषदेचे अधिवेशन पुण्यात भरले. त्यात अध्यक्षपदावर डॉ. भांडारकर होते, "त्यांनी हिन्दु समाजाच्या जाती संस्थेवर आधारित असलेल्या भारताच्या भविष्याबद्दल निराशा व्यक्त केली होती."[५५] हे सामाजिक परिषदेचे अधिवेशन विशेष महत्वाचे ठरले. रानड्यांना राष्ट्रीय सभा व सामाजिक परिषद यांचे संबंध कायम राहावेत असे वाटत होते. राष्ट्रीय सभेची घटना तयार करण्यात रानड्यांनी मदत केली होती. गोखल्यांना लिहिलेल्या १० फेब्रु. १८९६ पत्रात कॉंग्रेस घटनेचा उल्लेख आहे. श्री.हाताळने व काही मित्रांनी मिळून घटना लिहीली होती असे त्यात रानड्यांनी लिहिले होते. पण कॉंग्रेसच्या अधिवेशनात ते सरकारी नोकर असल्यामुळे त्यांची भूमिका केवळ निरीक्षकाची होती. तर त्यानंतर भरणाऱ्या सामाजिक परिषद संस्थेचे सूत्रधार होते. त्यामुळे कॉंग्रेसच्या पुढाऱ्यांशी खाजगी रितीने चर्चा करुन स्वतःचे मत प्रदर्शन करीत असत. कॉंग्रेसच्या पहिल्या काही अधिवेशनातील ठरावांवर रानड्यांच्या लेखनाची छाप दिसून येते. त्यामुळे दोन्ही अधिवेशने संलग्न असली तर पुढील कार्यक्रमांची रुपरेखा आखण्यात सोपे होईल असे वाटून त्यांनी दोन्ही सभांचे संबंध कायम राहावेत म्हणून प्रयत्न केले. त्यासाठी के.सुब्बाराव यांनी मदत केली. पण कॉंग्रेसमधीलकाही पुढाऱ्यांच्या आग्रहामुळे पुढे कॉंग्रेसच्या मंडपात सामाजिक परिषदेने अधिवेशन घेवू नये असा निर्णय जाहीर करण्यात आला. तेव्हा मात्र रानड्यांना वाईट वाटले. रानडे यांना सुब्बारावांनी पाठविलेल्या पत्राचे उत्तर देतांना रानड्यांनी म्हटले की, "एकाच मंडपातून कॉंग्रेस व सामाजिक परिषद यांची अधिवेशने घेण्याची प्रथा चालू ठेवावयाची की नाही ह्या संबंधात बहुसंख्य कॉंग्रेस कमेटयांची मते आजमावण्याचा ठराव झाला होता. सामाजिक परिषदेची स्वागत समिती या ठरावास बांधलेली होती. हे चुकीचे पाऊल होते पण तडजोड घडवून आणण्याच्या इच्छेमुळे हे मान्य करणे भाग पडले

निदान तीन चतुर्थांश काँग्रेस कमिटयांनी आपले मत दिल्यानंतर हा निर्णय घ्यावयाचा होता."[५६] रानड्यांना राजकीय व सामाजिक सुधारणा बरोबरी ने व्हाव्यात असे वाटत होते म्हणून त्यासाठी त्यांनी आग्रह धरला होता. त्यावेळच्या काँग्रेस पुढा-यांमध्ये रानड्यांइतकी दूरदृष्टी व विशालता नसल्याने त्यांना सामाजिक परिषदेला वेगळे व्यासपिठ द्यावे लागले. दिनशा वाच्छा दादाभाई नौरोजी यांच्या सारख्या पुढा-यांना असे वाटावे याचे रानड्यांना जास्त दुःख होते. त्याचा दुष्परिणाम म्हणजे पुढील काँग्रेसच्या कार्यक्रमामध्ये नवराष्ट्र निर्मितीच्या प्रक्रियेत सामाजित संरचनेचे स्वरुप कसे असावे याबद्दल स्पष्ट उल्लेख आढळत नाहीत. पुढे गांधींनी यादृष्टीने प्रयत्न केला पण त्याचे महत्व ओळखले गेले नाही. त्यामुळे आजचे सामाजिक संघर्षांचे भयानक स्वरुप हे राजकीय व सामाजिक क्षेत्रातील विषमतेचे द्योतक आहे असे म्हणावे लागते. सुधारणा घडवून आणतांना परिस्थितीनुसार सुधारणा घडवून आणण्याचा प्रयत्न करावा लागतो. त्यांत आधी सामाजिक की आधी राजकीय असा वाद न घालता सर्वांनी सहमतीने सुधारणेचे कार्य करावे असे रानड्यांना वाटत होते. या वादातून काही निष्पन्न होणार नाही, उलट सामाजिक विषमता वाढेल ही व्यक्त केलेली भीती आजच्या काळात प्रगट झालेली दिसते.

इ.स.१८९५ च्या सामाजिक परिषदेत हिन्दू समाजाची पुर्नरचना जाती-संस्थेशिवाय करणे आवश्यक आहे" हा विचार पुढे आला होता तेव्हा रानड्यांनी " जाती-संस्था ही आमच्या सामाजिक रचनेवरील सर्वात मोठा कलंक आहे व आपली मुख्य लढाई या क्षेत्रात असेल."[५७] असे मत व्यक्त केले होते. याच अधिवेशनाच्या काळात सामाजिक परिषद राष्ट्रीय सभेच्या मंडपातून बाहेर पडली. या अधिवेशनात डॉ. भांडारकरांनी जातीसंस्थे विरुध्द मोहिम उघडली असली तरी ती भूमिका सामाजिक परिषदेने मान्य केली नाही. सामाजिक परिषदेचे आधारस्तंभ रानडे असल्यामुळे त्यांच्या व्यक्तित्वाची छाप परिषदेच्या कार्यावर पडणे स्वाभाविक होते. तेव्हा सामाजिक परिषदेच्या कक्षाही निश्चित झाल्या होत्या.

रानड्यांनी सामाजिक परिषदेत इ.स.१८८७-१९०० या काळातील दिलेल्या व्याख्यानांमधुन त्याकाळातील भारतातील निरनिराळ्या प्रांतात चाललेल्या सामाजिक सुधारणांची माहिती मिळते. त्यात त्यांनी सामाजिक सुधारणेच्या प्रत्येक मार्गाचे स्वागत केले आहे. इ.स. १८९७ ला अमरावती येथे भरलेल्या ११ व्या अधिवेशनात त्यांनी सामाजिक सुधारणा म्हणजे पुनरुज्जीवन की सुधारणा? या प्रश्नाचे उत्तर देतांना म्हटले की, "परधर्मात गेलेल्या लोकांना पुन्हा हिन्दू धर्मात प्रवेश देणे हा मुद्दा समाज सुधारणेचा एक मार्ग आहे. व समाज सुधारणा म्हणजे पुनरुज्जीवन नव्हे हे ही स्पष्ट केले आहे. जे नष्ट झाले त्यात आपल्याला पुन्हा जीवन ओतता येत नाही."[५८] हे त्यांनी स्पष्ट केले.

इ.स.१८९८ च्या मद्रासच्या अधिवेशनात एक एवडुबाईस "हिन्दुस्थानातील दारिद्र्य" ह्या ग्रंथाचे विश्लेषण केले. या ग्रंथात १०० वर्षापूर्वीच्या द.भारतातील सामाजिक परिस्थीचे वर्णन केलेले आहे. त्याची माहिती रानड्यांच्या ग्रंथात आलेली आहे."[५९] इ.स.१८९९ मध्ये लखनौमध्ये झालेल्या १३ व्या अधिवेशनात रानड्यांनी "एक हजार वर्षापूर्वीचा हिन्दूस्थान" या विषयावर व्याख्यान दिले, या व्याख्यानातून भारताच्या सांस्कृतिक इतिहासाचे स्वरूप लक्षात येते. हिन्दू मुस्लीमांचे सहकार्य आवश्यक आहे असेही त्यात प्रतिपादीत केले आहे. भारताची प्रगती होण्याकरीता सामाजिक परिषदेकडून भरीव कार्य झाले तर आपण नव राष्ट्र निर्मिती चांगल्या प्रकारे करु शकतो, असे त्यांचे म्हणणे होते.. ते पुढे म्हणतात की, If the lessons of the post have any value, one thing is quite clear viz. that in this vast country no progress is possible unless both Hindus & Mahomedans join hands together and are defermined to follow the lead of men and who flourished in Akbar's time and were his chief advisers and councillors, and sedulously avoid the mistakes wich were committed by this grand son

Aurangzeb." ६० हिन्दू मुस्लीम ऐक्य साधण्यासाठी समाजासमोर विशाल दृष्टीकोन निर्माण करणे आवश्यक आहे व त्यासाठी समाजाचा सर्वांगीण विकास होणे गरजेचे आहे. कुठलीही सुधारणा करतांना ती सर्वस्पर्शी आहे किंवा नाही याकडे लक्ष देणे आवश्यक आहे असे रानड्यांना वाटत होते.

रानड्यांनी सामाजिक सुधारनांना समाजाचे एक आवश्यक अंग मानले. तेव्हा ह्या शरीराला कुठेही न दुखावता सुधारणा घडवून आणण्यावर जास्त भर दिला होता. सामाजिक सुधारणाविषयी त्यांना आत्मियता होती. व पुण्य विभिन्न समाजाशी सामंजस्य निर्माण करणे समाज सुधारणा करतांना जास्त निकडीचे वाटत होते. त्याबाबत ते म्हणतात की, मनाच्या दुबळे पणावर मात करून परंपरेतील भ्रामक कल्पनांचे उच्चाटन समाजातून करणे आवश्यक आहे.. या गोष्टीचा पाठपुरावा करतांना ते पुढे म्हणतात की, " The thing to be reformed was their ownself, heart and head and soul, their own prejudices were to be removed, their superstitions to beeradicated, their courage to be strengthened, their weakness to be conquerred in fact their own character to be formed again so as to suit the times so as to fit with the spirit of the age." ६१ त्यांनी आत्मिक सुधारणेवर जास्त भर दिला होता.

सामाजिक परिषदेचे कार्य रानड्यांनी १९०० पर्यंत पाहिले होते. त्यांचे शेवटचे भाषण इ.स.१९०० डिसेंबरमध्ये लाहोर अधिवेशनासाठी भाषण तयार केले होते. पण आजारी पडल्याने ते स्वत: जावू शकले नाहीत. आपले व्याख्यान त्यांनी श्री. चंदावरकरांबरोबर चिटणिसांकडे पाठविले होते. त्या व्याख्यानाचा विषय "वशिष्ठ आणि विश्वामित्र" होता. या शेवटच्या भाषणात भारताच्या उज्ज्वल भवितव्याचा आशावाद प्रगट केला होता. लाहोर येथील काँग्रेस व सामाजिक परिषदेसंबंधी माहिती "पंजाबी टाईम्स, अॅडव्होकेट, "सोशल

रिफॉर्मर" इ. वृत्तपत्रात आली होती. कॉंग्रेसमधील व्याख्यान गोखल्यांनी वाचून दाखविले होते.

एकोणिसाव्या शतकातील परिस्थितीनुरूप सामान्य स्वरूपाच्या सुधारणाचे कार्य या परिषदेने केले आहे. अशाप्रकारची टिका केली जाते. विशेषतः मद्रासचे न्यायमूर्ती व्ही.भाष्यम् अय्यगांर यांनी या दृष्टिकोनातून केलेले वक्तव्य महत्त्वपूर्ण वाटते. . "Do not despise small reforms for which society may be prepared simply because they do not satisfy your ambition on other hand, reforms which are small in themselves, but are regarded revolutionary by the people are not, worth your attempt." [६२] पण हा त्यांचा दृष्टिकोन सर्वमान्य झाला नाही. मद्रासच्या 'Indian social Referm' या नियतकालीकाने रानडे व सामाजिक परिषदेच्या समाज सुधारणाविषयक सौम्य भूमिकेचा विरोध केला होता. चंदावरकरांनीही रानडेंच्या कार्याचा विरोध करून म्हटले की, " Ranade's greatness was not of their height . He had not that strenuousness of convictions, the moral indianation that active spirit of combat, which is so necessary to accomplish anything great." [६३] १९०० साली मंगलोर येथे झालेल्या मंगलोर " social peform assocciation " च्या अधिवेशनात स्वतःची भूमिका स्पष्ट करतांना रानड्यांची तुलना राजाराम मोहन रॉय, दयानंद सरस्वती, करसनदास मुल्जी, ईश्वरचंद्र विद्यासागर यांच्याशी तुलना केली होती.

Reformer या नियतकालीकाने "परिषदेने पूर्णवेळ कार्य करणारे कार्यकर्ते नेमावे असा सल्ला रानड्यांना दिला होता. द.भारतात त्यावेळी समाजसुधारक जास्तसक्रीय असलेले दिसून येतात. म्हणून त्यांच्या विचारानुसार रानड्यांचे कार्य सौम्यगतीचे वाटत असावे. तरी पण मात्र रानड्यांचे सामाजिक

परिषदेचे कार्य हे देशव्यापी होते हे मान्य करावे लागेल. त्यांच्या प्रयत्नामुळे व त्यांच्या सहकार्यामुळे ही सामाजिक परिषद चळवळ चालली व पुढे नेता आली. त्यांनी संघटित स्वरूपाच्या समाजसुधारणेला प्राधान्य दिले होते. त्याचेच अनुकरण करून नंतर इ.स.१९०३ ला चंदावरकरांनी करून "Bombay presidency social Reform Association." ही संस्था गिरगाव मुंबईत स्थापन केली. सध्या ह्या संस्थेचे कार्यालय गिरगावाच्याच Servent of India या सोसायटीच्या इमारतीत आहे. १९५४ मध्ये श्री. ना.म. जोशी, डॉ. परांजपे, न्या. गजेंद्रगडकर व त्र्यं.कृ.टोपे यांच्या पुढाकाराने "महाराष्ट्र सामाजिक परिषद" स्थापन केली गेली. ह्या परिषदेने इ.स. १९६५ पर्यंत आपले कार्य पार पाडले.

रानड्यांनी हिन्दुधर्माच्या वर्ण व्यवस्थेचे निर्माण झालेले तत्कालीन विकृत स्वरूपाचे अवलोकन करतांना ऐतिहासिक पार्श्वभूमीचा आढावा घेऊन त्याचे विश्लेषण केले आहे. वर्ण व्यवस्था कालबाह्य ठरल्याने त्याचे परिणाम समाजात दिसून येत आहे. ते आपल्या संकीर्ण लेखात म्हणतात की, "गेल्या तीन हजार वर्षात आपली जी अवनति होत आली आहे तिला जबाबदार असणाऱ्या कल्पना किंवा अंतःप्रवृत्ति काय असाव्यात ? त्या थोडक्यात पुढील प्रमाणे सांगता येतील. एक अलिप्तपणा अथवा आत्मसंतुष्टता दोन- आतील विवेक बुद्धीच्या सांगण्यापेक्षा बाह्य अथवा शक्ति यांच्यापुढे मान तुकविणे., तीन -वंश आणि जन्म यावरून माणसामाणसात काल्पनिक भेद मानणे, चार- अन्यायाला अथवा अपराधाला मुकाट्याने मान्यता देणे आणि अधिक्याचा देववादापर्यंत मजल जाईल एवढे ऐहिक कल्याणाकडे सर्वसाधारण दुर्लक्ष, आपल्या जुन्या समाज व्यवस्थेच्या बुडाशी या वृत्ति आहेत. साहजिकच त्यांचा परिणाम सध्याच्या कौटुंबिक व्यवस्थेत झालेला दिसतो. तीमध्ये स्त्री ही सर्वस्वी पुरुषाच्या आणि खालच्या जाति, वरच्या जातीच्या दास्यात राहत आहेत. इतक्या की मनुष्यत्वाविषयीचा स्वाभाविक आदरही त्यांच्या

मध्ये उरला नाही."[६४] जातीसंस्थाच्या ह्या विकृती नष्ट करण्याकरिता मानवतावादी दृष्टिकोन व व्यक्तिस्वातंत्र्याची आवश्यकता समाजाच्या निकोप वाढीसाठी अनिवार्य आहे असे त्यांना वाटत होते.

शतकानुशतका पासून उच्चवर्णीयांनी खालच्या जातींवर गाजविलेल्या वर्चस्वामुळे त्यांच्या सामाजिक, राजकीय, आर्थिक, जीवनात अवनती घडून आलेली आहे. एका मनुष्याने आपल्याच समाजातील दुसऱ्या व्यक्तीला "अस्पृश्य" म्हणून वागविणे, त्यांना घृणास्पद, खेदजनक वाटत होते. पण आता समाजाच्या उत्कर्षासाठी, राष्ट्राच्या निकोप उभारणीसाठी "अस्पृश्यते"ची भावना समाजाने मुळापासून नष्ट करण्याचा आग्रह करतांना रानडे लिहितात की. " आजवर ज्यांचा स्पर्शहि आपल्यास भ्रष्ट करीत असे आपण मानले त्यांच्याशी अधिक विचारपूर्वक वागून त्यांना आपली उन्नती साधण्यांत आपण मदत करणार, की " आमच्यावर आपली सावलीही पाडू नकोस" असे म्हणणार. पहिल्या प्रकाराने वागण्यात आपल्या अंतरात्म्याला अधिक सामर्थ्य, धीर, दयाशीलताही लाभतील की दुसऱ्या प्रकाराने ?"[६५] असा सवाल ते सुज्ञ लोकांना करतांना दिसतात. देशाला आधुनिकतेकडे नेतांना नव्या कल्पना विचार करतांना नवीन परिस्थितीच्या प्रभावाने दलित वर्गातील जागृत लोकांनी स्वतःच्या उध्दाराकरीता जी चळवळ केली ती समाजरचनेच्या अनिष्ट रूढींची, त्यांच्या उच्च वर्गीयांची अर्पूणता जाणवली म्हणून केली. पण दलितांनी स्वतःहून अन्यायाविरुध्द लढा देण्यासाठी उभे राहण्याची वाट न पाहता उच्च वर्णीयांनी जर माणुसकीच्या दृष्टीने त्यांना अमानवीय वागणूक देण्याचे सोडून समाजात समाविष्ट करून, राष्ट्रोध्दाराच्या कार्यासाठी त्यांचे सहकार्य घेण्याचे आवाहन हे त्यांनी उच्च वर्णीयांना केले होते. पण याबाबतीत उच्चवर्णीय आक्षेप घेण्याची शक्यता आहे असे लक्षात घेताच ते विचारतात की, " ज्यांना अन्याय होतो ते तक्रार करीत नाहीत, मग तिऱ्हाईकांना मध्ये पडण्याचे कारण काय ? आपले मंडन करण्याची ही

पध्दत पुनीच आहे. गुलामगिरी रद्द करण्याच्या वेळी, तसेच सती व बाल हत्ये विरुध्द कायदे होत असतांना, त्याप्रमाणे पुनर्विवाह मान्य करणा-या कायद्याचे वेळी हेच कारण पुढे करण्यात आले होते. अन्यायाचा अत्यंत अनिष्ट परिणाम म्हणजे त्याला बळी पडणा-यांची इतकी अवनती होते की, आपल्यावर जुलूम करणा-यांच्या पायावर ते लोळण घेतात."[६६] असे दीनहीन लोक आपला उध्दार कसा करु शकणार ? जोपर्यंत उच्चवर्णीयांचे सहकार्य, मदत त्यांना मिळू शकत नाही, तो पर्यंत त्यांच्या अवनतीची गतो तशीच राहील असे रानडे स्पष्ट पणे सांगताना दिसतात. पण त्यांच्या ह्या विचारांकडे लोकांचे त्याकाळी दुर्लक्ष झालेले दिसते.

जातीसंस्था एकेकाळी समाजव्यवस्थेचे आवश्यक तत्व असले तरी अस्पृश्यता हे नंतरचे स्वार्थी स्वरुप बनले होते. मंदिर प्रवेश, सार्वजनिक सुखसोयींपासून वंचीत करणे, जीवनावश्यक गोष्टी पाणी अन्ना सारख्या गोष्टींना त्यांच्यापासून हिरावून घेणे हे अमानवीय कृत्य वर्षानुवर्षे टिकून राहिले व त्यासाठी उच्चवर्णीय समाजाने मनुष्यत्वाच्या दृष्टीने विचार केला नाही. ब्रिटिशांच्या काळातही हिन्दूंना दुखवू नये म्हणून त्यात लक्ष घातले गेले नाही. यामुळे या समाज बहिष्कृत लोकांचे जीवन दिवसेंदिवस असहय होत चालल्याची जाणीवही सुशिक्षित समाजाला होवू नये याचे आश्चर्य रानड्यांना वाटत असले तरी केवळ खोटा अभिमान बाळगणा-या समाज ठेकेदाराचे स्वार्थी धोरण होय असे त्यांचे मत होते. "वस्तुत: हल्लीची सामाजिक व्यवस्था पूर्वीच्या थोर धर्मशास्त्रकर्त्यांनी घालून दिलेली खास नाही. त्यांच्या नावाबद्दल आदर देखावा शब्दांनी दाखवित असतो. पण त्यांच्या आज्ञा मात्र पदोपदी मोडत असतो. जेव्हा ही धर्म शास्त्रे रचली गेली त्याकाळी प्रचालित असलेल्या रुटींशी आजच्या बहुतेक रुटी विरुध्द आहेत. आजची स्त्रियांची परावलंबनाची स्थिती, विवाहाच्या वयासंबंधी रुट मर्यादा, वरील वर्गातील विधवांना पुनर्विवाहाची बंदी, पुरुषांना मिळणा-या सवलती, व स्त्रियांवर

लादलेली निवृत्ती यामुळे निर्माण झालेली विषमता, कडक रोटीबेटी आणि अस्पृश्यता, काही जातींनाच करावयाचा सारासारशून्य दानधर्म, यासारख्या आणि इतर गोष्टीत जुन्या पध्दतीपासून आपण जे इतके दूर गेलो आहोत त्याला हे पूर्वीचे धर्मशास्त्रकार कसे जबाबदार म्हणता येतील ? जुन्या पध्दतीत झालेले हे फरक मनुष्यनिर्मितीचे होत. माणसातील दोषप्रवृत्तींना दिलेल्या या सवलती होत. पूर्वीच्या अधिक चांगल्या रूढीच्या ऐवजी घुसडलेले हे दुष्ट आजार होत. —— धर्मशास्त्राची मान्यता ज्यांना मिळू नये, अशया भलत्या नवीन गोष्टी यात आहेत. —— आजच्या सुधारकांवर, जे जुन्या माननीय अशया पध्दतीचा आपल्या सोईस येतील तसा उपयोग करून घेत आहेत, असा आरोप करता येणार नाही. उलट सुधारकांनाच आपण या पुराण धर्माचे संरक्षक आहो असी भूमिका घेता येईल आणि ज्यांनी आपल्या स्वार्थाकरिता देवी आज्ञा धुडकावून दिल्या त्यांचा निषेध करता येईल". [६७]
रानडे ख-या धर्माचे तत्व प्रतिपादित करून सुधारकांना जातिभेद, स्पृश्यास्पृश्य या समाज विरोधी व अनिष्ट अशया रूढी नष्ट करण्यास समाजाला पुढाकार घेण्यास सांगताना दिसतात. हिन्दु धर्माचे खरे स्वरूप सांगून मानवतेच्या दृष्टीने समाजाचे विचार निर्माण होतील या दृष्टीने कार्य करण्याचा सल्लाही दिलेला आहे. देशाला सर्वांगिण विकासाकडे अग्रेसर करण्यासाठी मूलभूत सुधारणांवर भर दिलेला होता. मानवतावादी दृष्टिकोनातून विचार करण्याची सवय समाजाला लागली तर उदारमतवादी विचारसरणीचा विकास होऊन भारतातही स्वातंत्र्य समता, बंधुता ही तत्व रूजण्यास मदत होईल. त्याप्रमाणे भारतातही इंग्लंड प्रमाणेच लोकशाही रूजेल असा विश्वास त्यांना वाटता होता. म्हणून ते आपल्या विचार तत्वामध्ये सतत सर्वांगीण विकासावर आपले ध्येय, लक्ष्य केंद्रित करताना दिसतात.

रानड्यांनी समाजसुधारणा करतांना मध्यम सुशिक्षित वर्गाचे नेतृत्व डोळसपणे पत्करले होते. त्यांच्याकडून प्रतिसाद मिळेल ही त्यांची अपेक्षा दुबळ्या मध्यम वर्गाने सीमित ठेवली होती. गं.बा. सरदारांनी

त्यांच्या कार्याचे मूल्यमापन करतांना लिहिले की, "रानडे होस पण दुबळ्या मध्यम वर्गाचे कर्तबगार प्रतिनिधी व मार्गदर्शक होते. या वर्गाची शक्ती व मर्यादा ध्यानात घेऊन त्यांनी आपला सामाजिक सुधारणेचा कार्यक्रम आखला. शिक्षणातून आणि शहरी वातावरणामधून आधुनिक मूल्यांशी या वर्गाचा परिचय होत होता. तेव्हा त्यांच्या प्रसाराला त्यांचा पाठिंबा मिळेल अशी रानड्यांची अपेक्षा होती. परंतु या वर्गाकडून त्यांच्या प्रयत्नांना पुरेसा प्रतिसाद मिळाला नाही. नवशिक्षितांत उच्चवर्णियांची संख्या मोठी होती. शासनाच्या वेगवेगळ्या विभागातील अधिकार पदे त्यांनी काबीज केली होती. सावकारी, वकीली आणि डॉक्टरकी हे त्यांचे व्यवसाय किफायतशीरपणे चालू होते. मग समाज-व्यवस्थेत मूलगामी परिवर्तन घडवून आणण्याची तळमळ त्यांना कुठून असणार अर्थातच महाराष्ट्रातील उदारमतवादी चळवळीवर या वर्गाच्या हितसंबंधाच्या मर्यादा पडल्या. सामाजिक सुधारणे ऐवजी कुटुंब सुधारणेवरच त्यांनी समाधान मानले. स्त्री शिक्षण, प्रौढविवाह, पुर्नविवाह, केशवपन चालीचा निषेध, परदेशागमन यांच्या पलीकडे तत्कालीन सामाजिक चळवळीची मजल गेली नाही. अस्पृश्यता निवारण जातिभेद निर्मूलन या सुधारणा तत्वत: मान्य असूनही प्रत्यक्ष कार्यक्रमात त्यांचा समावेश झाला नाही. उच्चवर्णीय स्त्रियाही अशिक्षित रूढीपूजक होत्या. त्यामुळे नव्या मुल्यांचे संस्कार झालेल्या पुरूषांची कौटुंबिक जीवनात कुचंबना होत होती. म्हणून स्त्री शिक्षणाची चळवळ त्यांनी सुरू केली. स्वत:च्या हक्कासाठी झगडण्या-इतकी ताकद त्याकाळी स्त्रियांच्या ठिकाणी निर्माण होण्याची शक्यता नव्हती. त्यामुळे सामाजिक चळवळीच्या मागे कोणत्याच मोठ्या गटाचे सामर्थ्य उभे ठाकले नाही. विसाव्या शतकाच्या सुरूवातीस राजकीय चळवळीचा जोर चढला. उलट रानडे यांच्या मृत्यूनंतर सामाजिक सुधारणेची चळवळ थंडावत गेली".[६८] त्यामुळे रानडे यांच्या कार्याचे महत्व एकोणिसाव्या

शतकात प्रखरतेने जाणवते. त्यांनी समाजातील प्रमुख घटकाला महत्व देऊन स्त्रियांच्या जीवनात सुधारणा घडवून आणण्याचे कार्य केले होते. त्यांचे कार्य म्हणजे आजच्या काळातील स्त्री-जीवनातील झालेल्या सुधारणांचे फलीत होय. यातूनच त्यांच्या दृष्टेपणाची जाणीव होते. रानडे सर्वांगीण सुधारणेबाबत विश्लेषण करतांना सामाजिक राजकीय, धार्मिक सुधारणा ह्या कधी वेगवेगळ्या मानल्या नाहीत. ते सामाजिक सुधारणेचेच एक अंग मानत होते. त्यांनी समाजसुधारणेची व्याप्ती सांगतांना त्यांचे विशालत्व प्रगट केले होते. हेच भारताच्या उत्कर्षाकडे नेणारे योग्य मार्ग ठरले होते. पण दुर्दैवाने त्यांच्या विचारांकडे त्यांच्यानंतरच्या काळात भारतीय पुढा-यांचे दुर्लक्ष झाले होते. ते सामाजिक विकासाचे तत्व सांगतांना म्हणतात की, "जोपर समाज जीवनात विवेक व न्याय या तत्वांचा अटळ होत नाही, तोपर राजकीय हक्क व अधिकार राबविण्यास समाजाच्या ठिकाणी पात्रता उत्पन्न होत नाही. जोपर सामाजिक व्यवहारांची मांडणी सदोष आहे तोवर चांगला, सर्वांचे कल्याण साधणारी आर्थिक व्यवस्था अस्तित्वात येवू शकत नाही. जर समाजापुढील धार्मिक श्रेयकल्पना व साध्ये हीन व भ्रष्ट बनलेली असतील आणि ती तशीच राहणार असतील तर सामाजिक आर्थिक व राजकीय क्षेत्रांमध्ये समाजाचे पाऊल पुढे पडू शकत नाही. हा अन्योन्यायच केवळ योगायोगाचा भाग नाही, तर समाजाच्या धोरणेचा व प्रगतीचा परागतीचा तो अटळ नियमच आहे."[६१] डॉ. आंबेडकरांनी रानडेंच्या कार्याचे मोठेपण ओळखले होते. त्यांच्या शब्दात " Ranade argued that there were no rights in the Hindu Society which the moral sense of man could recognize. There were privileges and disabilities; privileges for a few and

disabilities for a vast majority. Ranade struggled to create rights. Ranade, wanted to vitalize the conecience of the Hindu Society which had become moribund as well as morbid. Ranade aimed to create a real social democracy without which there could be no sure and stable politics."[70] रानडे यांनी प्रतिकूल परिस्थिती-मध्ये आत्मविश्वासाने कमी पणाची भावना व हाळ्ता प्रभावीपणे आपले कार्य केले होते. त्यांचे कार्य सुशिक्षित एका वर्गाकरीता मर्यादित असेले तरी समाजाच्या सर्वांगीण विकासाच्या दृष्टीने उपयुक्त ठरले होते. या त्यांच्या दूरदृष्टिकोनातूनच त्यांच्या कार्याची व्यापकता लक्षात येते.

ब) आगरकरांचे सामाजिक कार्य :-

भारताच्या इतिहासात एकोणिसावे शतक हे "प्रबोधनयुग" म्हणून ओळखले जाते. ब्रिटिश राजवटीसोबत आलेल्या पाश्चात्य संस्कृतीने परंपरागत भारतीय आचार विचारांच्या जडण-घडणीवर तीव्र आघात केले. भारतीयांना पूर्णतः अपरिचित असलेल्या लोकशाही,

व्यक्तिस्वातंत्र्य, समता, बंधुता इ. विचार मूल्यांचा परिचय जसजसा भारतातील सुशिक्षित तरुणांना होवू लागला, तसतसे अनेक प्रश्न निर्माण होवून आपल्या संस्कृतीतील जटील रूढी, परंपराविषयी उलट सुलट विचारांचे वादळ निर्माण होवू लागले. त्या विचारमंथनाने वादळाने समाजव्यवस्था ढवळून निघाली आणि त्या विचार मंथनातून आधुनिक भारताची नवीन जडणघडण तयार होवू लागली.

महाराष्ट्रात इ.स. १८३० ते इ.स. १९०५ पर्यंतचा प्रबोधनाचा काळ अलौकिक व दैदिप्यमान ठरला. समाजाचे अग्रणी म्हणून बाळशास्त्री जांभेकर, भाऊ महाजन, दादोबा पांडुरंग, बापू छत्रे, हरी केशवजी, रामकृष्ण मोडक, विष्णुबुवा ब्रम्हचारी, बाबा पद्मजी, जगन्नाथ शंकरशेट, लोकहितवादी, डॉ. आत्माराम पांडुरंग, ज्योतिबा फुले, रानडे, चिपळूणकर, टिळक आगरकर इ. समाज सुधारकांनी आपल्या समाजकार्याने, त्यागी वृत्ती धारण करुन काळावर मात करुन आपले कर्तृत्व गाजवले. प्रत्येकाची प्रकृती, प्रवृत्ती, सामर्थ्य, दृष्टीकोन, कार्य, पध्दती भिन्न भिन्न असली तरी प्रत्येकाने देशसेवेचे व्रत अंगिकारले होते. महाराष्ट्रातील बुध्दीवादाचे जनक गोपाळ गणेश आगरकर यांनीही आपल्या अल्पायुष्यात संकटांना न जुमानता समाजाची विवेकशक्ती जागृत करण्यासाठी आणि समाजाला स्वाभिमानाने जगण्यास समर्थ करण्यासाठी प्रबोधनाचे कार्य केले. शरीर प्रकृतीच्या मर्यादेमुळे त्यांचेग्र कार्य प्रत्यक्ष समाजासमोर येवून पुढारीपणाचे नसले तरी

लेखणीचा प्रभावीपणे वापर करून लोकशिक्षण वृत्तपत्राद्वारे व शिक्षणाच्या माध्यमातून समाजजागृती घडवून आणण्याचा त्यांनी अविरत प्रयत्न केला होता. "टाकातून असेलोक असे काढण्याचे सामर्थ्य असेल व ती वाचण्यास निदान एक इसम तयार असेल तोपर्यंत इष्ट असेल ते बोलणार, आणि साध्य असेल ते करणार ".[७१] हे व्रत त्यांनी आमरण पाळले होते.आगरकरांनी विचार प्रबोधनाचे एक प्रभावी साधन म्हणून "सुधारक" वृत्तपत्राचा उपयोग केला होता. समाजाच्या विचारात त्याचप्रमाणे आचारामध्ये कालानुरूप सुधारणा झाली पाहिजे असे त्यांना प्रामाणिकपणे वाटत होते.

आपल्या सामाजिक जीवनात आमूलाग्र बदल घडवून आणताना आगरकरानी "व्यक्तीची" प्रतिष्ठा" हे आधुनिक सर्वश्रेष्ठ मूल्य महत्वपूर्ण मानले होते. व्यक्तिशिवाय समाज निर्माण होवू शकत नाही". व्यक्ती आणि समाज या एकाच नाण्याच्या दोन बाजू असल्यातरी कोणत्याही एका बाजूवर भर देणे योग्य नाही. न्याय,स्वातंत्र्य आणि बेजबाबदार स्वकेंद्रित वृत्ती यांची गल्लत करून जेव्हा व्यक्ती असामाजिक बनतात तेव्हा विचारवंतांना समाजभिमुखतेचा, सामाजिक कर्तव्यनिष्ठेचा आग्रह धरावा लागतो. आणि याउलट सामाजिक संस्थाचे निर्बंध जाचक होवून मनुष्याच्या अस्मितेचा जेव्हा कोंडमारा होवू लागतो, तेव्हा समाजचिंतक व्यक्तिस्वातंत्र्याचे तत्व पुरस्कारितात. आगरकर हे स्पेन्सर-मिल्लचे पोथीनिष्ठ उपासक नव्हते तर त्यांनी मिल्ल-स्पेन्सर चांगला पचविला होता. स्पेन्सरच्या तत्वप्रणालीमध्ये विज्ञानाचा कुशलतेने वापर केला होता. त्यांच्या मते " Science is partially-unified knowledge ; Philosophy is completely-unified knowledge".[72] आगरकर हे तत्वज्ञ नसले तरी एक समाजसुधारक समाजचिंतक होते. स्पेन्सर प्रमाणे त्यांची दृष्टी तत्वमिमांसेची नसली तरी समाजाच्या दृष्टीने विज्ञान व तत्वज्ञानाचा उपयोग समाजाचा उत्कर्ष घडवून आणण्यासाठी करून

देवू शकतो हे त्याचे मत होते. मिल स्पेन्सर ह्यांच्या विचारांचा प्रभाव त्यांच्यावर होता, पण आपल्या मर्यादा ते जाणत होते. त्यांच्या कार्याहून आपले कार्य वेगळे आहे याची जाणीव त्यांना होती. "आपण नव्या विचाराचे फक्त वाहक आहोत, युरोपिय सुधारणेत अनुकरण करण्यासारखे काय आहे ते पुनःपुनः दाखवावे यास्तव हे सुधारक पत्र काढले आहे".[७३] असे आगरकर म्हणत असले तरी त्यांचे लेखन अनुवादात्मक नव्हते आणि पाश्चात्यांचे अंधानुकरणही त्यांना मान्य नव्हते व आपल्या तत्वप्रणालीत व्यवहार्य मर्यादा ठेवून लोकांना योग्य मार्गदर्शन करण्याचे कार्य, विवेकबुध्दी जागृत ठेवून नेटाने आपले विचार पुन्हा पुन्हा सांगण्याचा प्रयत्न त्यांनी वृत्तपत्राव्दारे केला.

आगरकरांनी मानवाच्या सामाजिक, राजकीय, धार्मिक, कौटुंबिक जीवनाचा प्रवाह कसा सुरु झाला, त्यात काय काय बदल होत गेले, काळानुरुप ते बदलणे निसर्गनियमानुसार कसे एकरुप आहे याचे विश्लेषण आपल्या लेखां-मधून केले आहे. सामाजिक प्रबोधनात नवीन विचार आत्मसात करतांना जुन्या कालबाह्य हानीकारक विचारांचा त्याग करणे आवश्यक आहे हे लोकांना सांगणे, एक पत्रकार नात्याने आपले कर्तव्य आहे असे आगरकरांना वाटत होते. म्हणून त्यांनी विवेकनिष्ठेने बुध्दीप्रामाण्याच्या आधारे निर्भयपणे समाजजागृती करण्याचा प्रयत्न अविरत केला होता. "त्यांनी व्यक्तिवादाचा पुरस्कार करतांना समाजहिताकडे आपले लक्ष केंद्रित केले होते. कारण व्यक्ती जन्म घेतात, केव्हाना केव्हातरी मृत्यू पावतात. पण सामाजिक जीवनाचा प्रवाह अखंड चालू असतो. समाजाच्याच आधारे व्यक्ती आपले कर्तृत्व निर्माण करतात. समाज सुनियंत्रित, संपन्न, बलशाही असेल, त्यांची परंपरा उज्वल आणि स्फूर्तिदायक असेल तरच त्यात व्यक्तिविकासाला अनुकूल वातावरण निर्माण होवू शकते. पण हा समाज सुबध्द असणे आवश्यक आहे. तो जर अनिष्ट रुढी बंधनांनी जखडलेला असेल तर त्या समाजात व्यक्तिविकास होणे अशक्य आहे. सामाजिक समता मानवजातीचे उज्वल भविष्य निर्माण करु शकते. आगरकरांच्या वैचारिक लेखांमधील दृष्टी

स्थापक होती. समाजसुधारणेचे कार्य हे अखंडित स्वरूपाचे असते तेव्हाच समाज प्रवाहित राहू शकतो. म्हणून सुधारकाला तत्कालिक समस्येवर लक्ष केंद्रित करून विचार संघर्ष सुरु ठेवले तर समाज प्रबोधन चांगल्या प्रकारे होवू शकते, असे आगरकरांना वाटत होते".[७४] म्हणून त्यांनी स्त्रीशिक्षण बालविवाह-निषेध, केशवपननिरोध, बालवृद्ध विवाह प्रतिबंध, स्वयंवर, पुर्नविवाह, कन्या-विक्रय निषेध, प्रौढविवाह इ. प्रश्नाचा पाठपुरावा आपल्या लेखांतून सतत केला. अर्थात त्यांचे कार्य सुशिक्षित समाजापुरते मर्यादित वाटत असले तरी शिक्षणाच्या माध्यमातून जास्तीत जास्त लोकांना शिक्षित करण्याचाही त्यांचा उद्देश होता. त्याचबरोबर त्यांना राष्ट्रीयत्वाच्या दृष्टिकोनातून राजकीय प्रगती साधायची होती. कोणत्याही समाजरचनेचा विचार केल्यास त्यात दोष असणारच. त्यातील मानवी जीवनाला हानीकारक गोष्टी समाजातून नष्ट करून समाज सुधारला पाहिजे असा त्यांचा दृष्टीकोन होता. त्यांचे हे विचार महाविद्यालयीन शिक्षण घेत असतानाच पक्के बनत गेले.

आगरकरांनी समाजजागृती करतांना शिक्षणप्रसारावर जास्त भर दिला होता. भावी पिढीला सुशिक्षीत करून समर्थ राष्ट्र निर्माण करण्यासाठी त्यांनी अल्पवेतनावर इ.स. १८८१ पासून न्यू इंग्लिश स्कूलमधून आपल्या कार्याला सुरुवात केली. १८८५-९२ नंतर तेथे सुपरिटेंडेंट झाले. त्यानंतर फर्ग्युसन कॉलेजमध्ये प्रथम प्राध्यापक व नंतर १८९२ प्राचार्य म्हणून काम केले. शिक्षण क्षेत्राशी संबंधीत असतांनाच जुन्या पिढीलाही जागृत करण्यासाठी "केसरी" व नंतर "सुधारक" मधून आधुनिक सम्यक विचार परखडपणे लोकांसमोर मांडले. केसरीमधून प्रामुख्याने राजकीय, आर्थिक विचार मांडलेले आढळून येतात. सामाजिक विषयांच्या बाबतीत टिळकांशी मतभेद झाल्यामुळे आणि सामुदायिक तत्वांच्या जबाबदारीमुळे मतभेद विकोपाला जावून त्यांनी "सुधारक" हे स्वतंत्र वेगळे वृत्तपत्र काढले. आगरकर सर्व विषयांवर चर्चा करीत असले तरी शिक्षण व समाजसुधारणा या

विषयाबद्दल त्यांना जास्त आस्था होती. आपल्या प्रभावी लेखनाने ते वाचकांमध्ये एक द्वंद्वभाव निर्माण करून लोकांना विचार करण्यास प्रवृत्त करीत. प्रत्येक गोष्टीला दोन बाजू असतात. त्याप्रमाणे आगरकरांच्या विचारांना विरोध करणारे आणि त्याचे विचार पुरस्कृत करणारे असे दोन्ही वाचक महाराष्ट्रातून लाभले होते.

आगरकरांचे समाज सुधारणा विषयक विचार वाचतांना त्यांनी समाज सुबुध्द करणारे मार्ग जे अवलंबिले होते, ते किती मूलगामी स्वरूपाचे होते हे प्रकर्षाने जाणवते. लोकशिक्षणाचे कार्य करीत असतांना त्यांनी आपला शिक्षकाचा धर्म कायम ठेवलेला होता. देशाच्या भावी पिढीला स्वतंत्र, स्वावलंबी बनविण्याइतपत त्यांची बुध्दी प्रगल्भ केली पाहिजे हे त्यांच्या शिक्षणातील मुख्य तत्व होते. " Born of people, brought up with people's bread, for whom shall I live but for the people".[१४] अशा प्रतिज्ञेने त्यांनी आपले कर्तव्य पार पाडले. आगरकरांची विचारपध्दती बुध्दीवादी, वास्तववादी प्रत्यक्षवादी, विवेकवादी होती.

आगरकरांनी "सुधारक" हे वृत्तपत्र सुरु करतांना १ ऑगस्ट १८८८ आपल्या वृत्तपत्राचे व जीवनाचे ध्येय जाहिर करतांना म्हटले की, "The very name of the journal sufficiently indicates it's nature and it's purpose.—— It is to conbat this tendency, to point out our faults and to impress upon the minds of our countrymen the idea that in a modified adoption of many of essential elements western civilization lies the real salvation of our country, that we are going to start our paper. —— sheer physical force, as an instrument of political social or moral conversion, has ceased to exit

and the days of intellectual persusion have come. Those therefore that want to contribute what little they can to a right understanding of the many problems lying before the Indian public, need offer no apology for availing themselves of one of the best means of intellectually reaching the people - The Newspaper."[76] हे उद्देश त्यांनी आपल्यासमोर ठेवून समाजकार्य केले.

आगरकरांनी सुधारकमध्ये आपल्या विचारांनी महाराष्ट्राला जागृत करण्याचा प्रयत्न केला होता. सुधारकपत्र काढतांना लोकशिक्षणा-बरोबरच लोकांचा स्वाभिमान जागृत करणे, त्यांच्या मध्ये नवीन राष्ट्रीत्वमयीची इच्छा निर्माण करून त्याची जोपासना करणे. लोकांच्या संबंधीत कर्तव्याची जाणीव सरकाराला कठोरपणे जाणीव करून देणे यासाठी त्यांनी सुधारकमधून एक इंग्रजी कॉलम वेगळा ठेवला होता. हा कॉलम गोपाळ कृष्ण गोखले तयार करीत. आपले विचार प्रभावीपणे समाजातील लोकांना कळावे म्हणून त्यांनी मातृभाषेचा वापर प्रभावीपणे केला होता. ते स्वतःला विवेदवादी म्हणवून घेत. प्रत्येक प्रश्न विवेकवादाच्या कसोटीवर कस लावून त्याची योग्यता ठरवून ते आपली मते निर्भिडपणे मांडत. कोणत्याही देशात आढळून येणाऱ्या मांडवल बुध्दीवादाचे ते प्रतिनिधी होते. ------ त्यांच्या जीवनविषयक दृष्टीकोनानुसार जे बुध्दीला पटणारे, अन्यायकारक व अयोग्य, अमंगल वाटले त्यावर त्यांनी हल्ला चढविला. — त्यांच्या विचारात बुध्दीवादाचे सातत्यपूर्ण विकसन आढळते त्यात कोणत्याही अंतर्विरोध दिसत नाही. जगातील अनेक ठिकाणच्या जनतेच्या जीवनाच्या उपलब्ध साधनांनिशी अभ्यास करून आपला विचार पक्का करण्याची त्यांची पध्दत होती."[७७]

आगरकरांनी विवेकवादाच्या आधारे सामाजिक सुधारणाविषयीचे आपले विचार प्रगट केले आहेत. समाजसुधारणा ही कधी न संपणारी प्रक्रिया आहे. कालानुसार जुन्या परंपरा, रुढी सामाजिक प्रगतीमध्ये अडथळे निर्माण करुन अधोगतीकडे समाजाला नेण्याचा प्रयत्न करीत असल्याने प्रत्येक कालखंडात समाजसुधारणा करणे आवश्यक ठरते. पण सुधारणा लादून आणण्यापूर्वी ती सुधारणा आपल्या जीवन कार्याला फलप्रद आहे किंवा नाही याविषयी विचार करण्यात लोकांना प्रवृत्त करुन त्यांचे... चांगले, वाईट परिणामांची जाणीव देऊन सुधारणा अंगिकारण्यास लोकांना आग्रह करतात. समाजातील अनिष्ट रुढींविरुध्द समाजात विचारांचा संघर्ष निर्माण होणे आवश्यक आहे असे आगरकरांना वाटते. कारण याच विचार कलहातून समाजाच्या विचारांची गती उत्कर्षाकडे, विकासाच्या मार्गाने जाईल असा त्यांना विश्वास वाटतो. "महाराष्ट्रीयांस अनावृत्त पत्र" या अग्रलेखात ते लोकांना विचार कलह करण्यासाठी आव्हान देतांना म्हणतात, "बांधव हो विचारकलहाला तुम्ही इतके कश्यासाठी भिता ?" दुष्ट आचाराचे निर्मूलन, सदाचाराचा प्रसार, ज्ञानवृध्दी, सत्यसंशोधन सुखदयेचा विचार इ. मनुष्याच्या सुखाची वृध्दी करणाऱ्या गोष्टी विचार कलहाखेरिज होत नाही. आजपर्यंत या देशात हा कलह माजावा तितका कधीच न माजल्यामुळे व बहुदा आमचे लोक "गतानुगतिकच" असल्यामुळे हे भारतखंड इतकी शतके अनेक प्रकारच्या विपत्तीत सापडले आहे".[७८] हा विचार कलह वाढवितांना मात्र तो विकोपास जावू न देण्याची खबरदारीही घेण्यास सांगितले आहे. नाहीतर त्याला अनिष्ट वळण लागून रक्तपात, हिंसाचाराचे प्राबल्य वाढेल असाही विचार त्यांनी समर्पकपणे आपल्या लेखांमध्ये मांडलेला होता.

आगरकरांचे समाजसुधारणा विषयक विचार सर्वस्पर्शी असलेले दिसून येतात. सुधारणा मुळापासून करण्यावर त्यांचा जास्त आग्रह होता. वरवर

सुधारणा त्यांना नको होत्या. ते "आमचे काय होणार ", या अग्रलेखात म्हणतात की, "समाजाचे मुख्य घटक कुटुंबे होत व कुटुंबाचे मुख्य घटक स्त्री-पुरुष होत. तेव्हा कुटुंबाचा विचार करतांना प्रथम स्त्री-पुरुषातील संबंधाचा विचार केला पाहिजे".७९ कुटुंबातील स्त्री-पुरुष या मुख्य व्यक्तिंना समान स्थान मिळाले तर कौटुंबिक जीवन सुखावह होऊन स्त्रियांवर अत्याचार होण्याच्या प्रकाराला आपोआपच आळा बसेल असे त्यांना वाटत होते. नैसर्गिक दृष्टया स्त्री पुरुष ह्या दोनच जाती महत्वपूर्ण आहेत. तेव्हा हे भेद लक्षात घेवून आपल्या मर्यादित कार्यक्षमतेची जाणीव ठेवून प्रत्येक व्यक्ती संयमाने वागली तर समाजातील अनिष्ठ रुढी परंपरा शिथिल होण्यास मदत होईल. पण त्यासाठी प्रत्येक व्यक्ती मग ती स्त्री असो वा पुरुष त्याने शिक्षण घेणे अनिवार्य आहे, त्याशिवाय त्या व्यक्तीला मानवी जीवनाचा मतितार्थ कळणार नाही असेही आगरकरांना वाटत होते. निकोप समाजासाठी व्यक्तींना स्वातंत्र्य व समता या तत्वाची आवश्यकता आहे हे प्रतिपादित करतांना केसरीच्या 'आणखी एक मुद्दा" या अग्रलेखात ते लिहितात की, "सर्व मनुष्यप्राणी जन्मत: सारख्या योग्यतेचे असून त्याचे हक्कही एक सारखेच असतात व ती योग्यता व ते हक्क त्यांच्याकडे राहणे हे केवळ त्यांच्या कमी अधिक बुध्दीविकासावर व उद्योगशिलतेवर अवलंबून आहे, या तत्वानुसार जो जो मनुष्याची सुधारणा होत जाते तो तो त्यांच्या अन्योन्य व्यवहारातील बलात्काराचे तत्व लयास जावून त्याच्या जागी संमती तत्व प्रस्थापित होते व या कारणास्तव येथून पुढे राजा व प्रजा, कुलाधिपती व कुलावयव, पती-पत्नी, मातापितरे व अपत्ये, स्वामी-सेवक, गुरु आणि शिष्य, विक्रेता आणि ग्राहक यातील व्यवहार आणि संबंध उत्तरोत्तर बलात्काराने न होता संमतीपूर्वक होत जाणार आहेत" यासंबंधी नलीनी पंडित विश्लेषण करतांना लिहितात की, "आगरकरांनी विवेकवाद, व्यक्तिस्वातंत्र्य, समता, बुध्दिवाद या सर्व तत्वांच्या आधारे आपल्या सर्व आचारविचाराचे कठोर परिक्षण केले व त्यांना आपल्या समाज-

रचनेत जे गंभीर दोष आढळले ते लोकांना समजावून सांगून त्यातील अनिष्ठता लोकांना पटवून देण्याचा प्रयत्न केला".[८०] त्या अनिष्ट प्रथा, रुढी नष्ट करण्यासाठी किंवा कमी करण्यासाठी नवीन आचार विचार बुध्दिप्रामाण्याने सुचविले व ते लोकांनी स्विकारावे यासाठी लोकांच्या मनावर वृत्तपत्राच्या आधारे सतत बिंबवित राहिले व आपले विचार निर्भयतेने समाजासमोर मांडू लागले. लोकांच्या रागाला, नापसंतीला किंवा उपहासाला जराही न भिता जे समाजहितकारक आहे ते समाजाला समजून देण्यासाठी त्यांनी सतत आपली लेखणी चालविली आहे.

आगरकरांच्या विचारामध्ये मिल्ल स्पेन्सर कोम्स, गिबन यांच्या ज्ञानाचा प्रभाव असला तरी पाश्चात्य धर्तीवर त्यांनी भारतीय जीवनाचा विचार कधीच केला नव्हता. "सुधारक काढण्याचा हेतू" या लेखात त्यांनी आपल्या सुधारणामार्गाचा हेतू स्पष्ट करतांना "मूळ प्रकृती म्हणजे भारतीय आर्यत्व न सांडिता"[८१] यावर आपले लक्ष केंद्रित करुन समाजसुधारणेच्या कार्याचे विश्लेषण केले आहे. "a greatest happiness of the greatest number" हे मानवी, जीवनाच्या सुधारणेचे अंतिम ध्येय मानलेल होते. आगरकरांना लोकशिक्षणाचा मार्ग समाजसुधारणेसाठी जास्त आवश्यक, वाटत होता. लोकशिक्षण हे त्यांनी वृत्तपत्राच्या माध्यमातून आणि शैक्षणिक संस्थांच्या भरीव कार्यावर आधारित ठेवले होते. लोक, समाज जोपर्यंत स्वतःहून विचार करुन आपले चांगले काय ? वाईट काय ? हे ठरवू शकत नाही तोपर्यंत त्यांना वृत्तपत्राच्या, लेखनाच्या माध्यमातून सांगून त्यांना स्वतःहून सुधारणा घडवून आणण्यास प्रेरित करणे हे जीवीत कार्य त्यांनी आयुष्यभर केले होते. लोकशिक्षण हाच समाजसुधारणेचा राजमार्ग त्यांना वाटत होता व वृत्तपत्र हे प्रभावी साधन लोकशिक्षणाचे निवडले होते. "वर्तमानपत्रे"

हया केसरीच्या पहिल्या अग्रलेखात ४ जानेवारी १८८१ च्या पहिल्या अंकातच वृत्तपत्राचे महत्व स्पष्ट केले होते. वृत्तपत्राची तुलना त्यांनी रात्री रस्त्यावर लागणारे दिवे व गस्त घालणा-या पोलिसांशी केली आहे. "कोणकोणत्या गोष्टी लोकांत हितकारक आहेत व नव्या घेण्यासारख्या कोणत्या आहेत वगैरे गोष्टींचा वर्तमानपत्राच्या द्वारे ऊहापोह घालला असता किती फायदा होणार आहे, पण या गोष्टींकडे हवे तसे लक्ष कोणीच दिले नाही".[८२] अशी खंत सुशिक्षिताबद्दल व्यक्त करतांनाही दिसतात. समाज सुशिक्षित झाला म्हणजे आपोआप सुधारणा होतील, असे आगरकरांना वाटत नव्हते. शिक्षणाने विचार करण्याची दिशा मिळत असली तरी त्याचा उपयोग करण्याची प्रवृत्ती कमी प्रमाणात आहे याची त्यांना जाणीव होती, नाहीतर शिक्षित वर्ग क्रियाविहिन दिसला नसता. म्हणून केवळ शिक्षणावर अवलंबून न राहता सामाजिक सुधारणेसाठी स्वतंत्र प्रयत्न केले पाहिजेत असे आगरकरांना वाटत होते. म्हणून त्यांनी लोकशिक्षणावर जास्त भर दिला होता. "परंपरागत जीवन सरणीच्या चाकोरीतून लोकांची सुटका करून आधुनिक पध्दतीने त्यांना विचार करायला लावणे हे आगरकरांच्या मते लोकशिक्षणाचे मुख्य उद्दिष्ट असले पाहिजे". असे गं.बा. सरदारांना वाटते यासंबंधी आपले मत व्यक्त करतांना आगरकरांचे विचार मांडतांना ते लिहितात की, "सामान्य मनुष्याचे डोके पूर्वापार चालत आलेल्या व लहानपणापासून अनेक व्दारांनी संपादिलेल्या साधारण कल्पनांनी ठिक्कीसारखे गच्च भरून गेलेले असते. त्यात एखादी नवीन कल्पना शिरू देण्यास त्याला अतिशय प्रयास पडतात. वेडयावाकडया विचारांनी ज्याच्या मनातील तीळनतीळ जागा व्यापून टाकली आहे, त्याच्या मनातील वतनदार होवून बसलेल्या काही विचारास हुसकावून लावल्याशिवाय तेथे नवीन विचारांची डाळ मुळीच शिजत नाही".[८३] जुन्या विचाराचे उच्चाटन आणि नवीन विचारांची स्थापना असे दुहेरी कार्य समाजसुधारकांनी अंगिकारणे आवश्यक आहे असे आगरकरांना वाटत होते व हेच कार्य त्यांनी

आपल्या पुत्रमत्राद्वारे सतत केले होते. सर्वच जुने विचार त्यांना त्याज्य वाटत नव्हते आणि सर्वच नवीन विचारही स्वीकार्य वाटत नव्हते. जे विचार समाजप्रवाहाला व्यक्ति विकासाला चालना देणारे होते त्याच विचारांचा कल्पनाचा,परंपरांचा आग्रह त्यांनी धरला होता.

आगरकर मानवी जीवनात ज्ञानार्जनाला सर्वात जास्त महत्व देत होते. ज्ञानाशिवाय मनुष्य पशु प्रमाणे आहे. मनुष्याचे वेगळेपण त्याच्या बौध्दिक कृतीमुळे जगात स्पष्ट झाले आहे. तेव्हा बुध्दिला चालना देण्यासाठी शिक्षणाची आवश्यकता त्यांना वाटत होती. "शिक्षणाबद्दल सक्ती करावी काय?"[८४] या आपल्या अग्रलेखामध्ये ते म्हणतात " आमच्या देशात बा-या विद्येचा मक्ता ब्राम्हण जात बळकावून बसल्यामुळे किंवा ज्यांनी हा मक्ता बळकाविला त्यांना आणि त्यांच्या वंशजांना ब्राम्हण ही संज्ञा प्राप्त होवून बाकीचे लोक अक्षर शत्रू राहिल्यामुळे या घटकेस या प्रश्नाहून अधिक महत्वाचा दुसरा प्रश्न दिसत नाही. आमच्या सांप्रत शोचनीय स्थितीचा जो कोणी शांत पणाने विचार करील त्याला लोकशिक्षणाशिवाय ही आमची स्थिती सुधारण्याचा दुसरा उपाय नाही असे दिसून आल्यावाचून राहणार नाही. लोकशिक्षण म्हणजे उच्च प्रतीचे किंवा धंदेशिक्षण नव्हे. लहानापासून थोरास व गरीबापासून श्रीमंतास नित्याच्या व्यवहाराला घडी घडी उपयोगी पडणारे असे जे बुध्दि विकसक अत्यंत स्वल्प प्राथमिक शिक्षण त्याचाच सक्तीच्या शिक्षणात अंतर्भाव केला पाहिजे. कोणत्या प्रकार च्या धर्ममताशी या शिक्षणाचा बिलकुल संबंध नाही. --- तर अमुक एक शिक्षण अमुक वयाच्या आत प्रत्येक मुलीस व मुलांस मिळण्याची खबरदारी त्यांच्या आईबापांनी किंवा पालकांनी घेतली पाहिजे." आगरकरांनी या लेखांत जगातील राष्ट्रांनी शिक्षणाद्वारे केलेला राष्ट्राच्या विकासाचे उदाहरण देऊन शिक्षणाची आवश्यकता प्रतिपादित केली आहे. सरकारला

तसेच आईवडिल, पालकांना प्रत्येक मुलाला शिक्षण देण्याची सक्ती करण्याची सूचना केली आहे. इ.स. १८४७ ला लॉर्ड मेकाले ने House of commons मध्ये लोकशिक्षणावर भाषण दिले त्यात 'Educate the people' जेफरसनच्या वाक्याचा उल्लेख केला आहे. राष्ट्राची उभारणी खंबीर पणे स्थिर पायावर करायची असेल तर शिक्षण अंत्यत महत्वपूर्ण आहे हेच त्यांना सांगायचे होते. त्यासाठी सरकारने शिक्षणाच्या क्षेत्रात कायद्याची पाऊले टाकण्याची गरजही त्यांनी सांगितलेली आहे.

"अज्ञानरोग सर्व शारीरिक रोगांच्या मुळाशी आहे इतकेच नाही तर झाडून सार्‍या मानुषीय विपत्तींचे बीज आहे." तेव्हा शिक्षण घेण्याची देण्याची जबाबदारी कोणावरही असली तरी प्राथमिक शिक्षण सर्वांनाच मिळाले पाहिजे. ते शिक्षण दिले जात आहे किंवा नाही हे पाहण्याचे काम सरकारने केले पाहिजे. ते सरकारचे आद्य कर्तव्य आहे असे आगरकर "प्राथमिक शिक्षण सरकारचे अवश्य कर्तव्य आहे." असे ते प्राथमिक शिक्षणाचे महत्व'या लेखात सांगतात. त्यात ते शेवटी लिहितात की, " मानसिक शारीरिक क्षीणता, दारिद्र्य, पारतंत्र्य, धर्मसंबधाने वेड्याखुळ्या समजुती, जातिभेदासारखे हजारो पिढ्या चालत आलेले जबरदस्त निर्बंध इत्यादिकांनी गांजून, पिळून अथवा पिरडून जाऊन मरणोन्मुख झालेल्या देशास शिक्षणावाचून दुसरा तरणोपाय नाही;"[85] शिक्षणाच्या माध्यमातून लोकांना आपल्या अस्तित्वाची जाणीव होईल, चांगले काय वाईट काय यांची जाणीव होवेन स्वावलंबी बनण्याचा प्रयत्न करुन स्वातंत्र्य मिळविण्यासाठी प्रयत्नशील राहतील. शिक्षणाचा उद्देश बौध्दिक क्षमतेच्या आधारे ज्ञानप्राप्तीकरुन लोकांच्या आचरणात सुधारणा झाल्यास लोक शिक्षणाचा उद्देश खर्‍या अर्थाने सफल होईल असा आशावाद आगरकरांना वाटत होता. पण शिक्षणावर निर्बंध आणण्याचा प्रयत्न ब्रिटिश सरकार करीत आहे असे समजताच आगरकरांनी "लोक शिक्षणावर गदा"[86] या सुधारकामध्ये लिहिलेल्या

लेखांत सरकारवर टिका करून लोकमत जागृत करण्याचा प्रयत्न केला आहे. सरकारचे हे प्रतिगामी धोरण स्वार्थपूर्ण व दोषपूर्ण आहे हे लक्षात घेवून सरकारची कान उघडणी करतांना ते म्हणतात की, "ब्रम्हदेशाशी युध्द करण्यासाठी लागणारा पैसा शिक्षणाच्या पैशयात कपात करून मिळविण्या चा प्रयत्न ब्रिटिश सरकार करून स्वतःचे अस्तित्व दाखविण्याचा प्रयत्न करीत आहे. लोक शिक्षणावर होत असलेला खर्च कायम ठेवून शाळा व कॉलेज चालविण्याची जबाबदारी सरकार लोकांवर टाकते आणि त्यांची देखरेख आपणांकडे ठेवते आणि वरून "तुमच्या हायस्कूलावर असलेल्या खर्चा पैकी दोन तृतीयांश खर्च देण्यास तयार व्हा नाहीतर तुमचे हायस्कूल बंद केले जाईल" अशी धमकी सरकार स्वतःची जबाबदारी टाळत आहे पण स्वतःची राजवट मजबूत ठेवण्याचा प्रयत्न करीत आहे याहून आगरकर लिहीतात की " काटकसर करणे जरूर असेल तर ती दुसऱ्या खात्यातकरावी, ती शाळा खात्यात केल्याने लोकांचे आणि सरकारचे पुढे पराकाष्टेचे नुकसान होणार आहे." यासंबंधी ओरड ग्रेट पार्लमेंट पर्यंत पोहचवून सरकारी उत्पन्नाचा विवक्षित भाग लोकशिक्षणाकडे अव्याहत लाविला जाईल, असे पार्लमेन्टाने हिन्दुस्थान सरकार कडून बंधन करून घेतले पाहिजे" अशी सुचनाकरून ब्रिटिश पार्लमेन्टच्या लोकांपर्यंत आपले गाऱ्हाणे मांडण्याचा प्रयत्न करतांना दिसतात.

स्त्री-शिक्षणासंबंधी आगरकरांची मते पुरोगामी स्वरूपाची होती. अवनत राष्ट्राचे भौतिक, नैतिक व धार्मिक पुनरुत्थान करून धीमेपणाने व शांततावादी क्रांतीच्या मार्गाने पुढारलेल्या राष्ट्रांच्या बरोबरीत येण्याचे कार्य शिक्षणामुळे होत असते, असे त्यांना वाटत होते. स्त्रियांना पुरुषांप्रमाणेच शिक्षण देण्याची गरज आहे. तो एक सामाजिक सुधारणेचा महत्वपूर्ण टप्पा आहे. त्यामुळे समाजाची उन्नती होवू शकते असा आगरकरांचा विश्वास होता. कौटुंबिक सुखाच्या दृष्टीने, राष्ट्रोध्दाराच्या उद्देशाने स्त्री शिक्षणाचे महत्वत्यांनी जाणले होते. आगरकरांच्या

काळातील स्त्रियांचे जीवन असह्य मानवतेच्या दृष्टिने हीन दर्जाचे व दुःस्थितीत होते. समाजाचा खरा विकास घडवून आणायचा असेल तर स्त्रीयांविषयी लोकांचा दृष्टीकोन बदलला पाहिजे असे त्यांचे मत होते. लोक शिक्षणाद्वारे सुशिक्षितांना जागृत करतांना या सुशिक्षित लोकांनी आपल्या घरापासून सुधारणा करण्यास उद्युक्त व्हावे या विचारांनी त्यांनी बरेच लेख शिक्षण,,स्त्री जीवनाविषयी लिहिले आहेत.

आगरकरांना मुलांबरोबरच मुलींच्या सक्तीच्या शिक्षणाची गरज वाटत होती. म्हणून त्यांनी सुधारकांत "मुलांइतकीच मुलींच्या शिक्षणाची आवश्यकता "[८७] या लेखांत त्यांनी लहान मुलांच्या शिक्षणाबद्दल सरकारने जितकी सक्ती केली पाहिजे, तितकी मुलींच्या शिक्षणाबद्दलही केली पाहिजे असा आग्रह धरला आहे. समाजाची सुधारणा मुळापासून झाली पाहिजे तरच ती सुधारणा चिरकालीन ठरते असा विचार ते करीत असल्याने त्यांनी कुटूंबव्यवस्थेतील प्रमुख घटकांच्या विचाराचे, आचाराचे परिवर्तन होण्यावर भर दिला होता. स्त्रीही समाज व कुटूंबातील महत्त्वपूर्ण घटक असल्याने तिला जर शिक्षण दिले तर घरात सुधारणा लवकर घडून येवू शकतील असे त्यांना वाटत असल्याने त्यांनी आपल्या समाजसुधारणेत स्त्री शिक्षण, त्यांचे जीवन याच्यांत मुलभूत बदल घडवून आणण्यावर भर दिला होता. " ज्या स्त्रीपर अपत्यसंगोपनाचे येवढे जबाबदारीचे काम आपण सोपवितो तिला अक्षरशत्रु असू देणे अत्यंत अहितकारक आहे असे आम्हास वाटते.---- पुरुषांप्रमाणे स्त्रियांना ज्ञानमंदिराची व्दारे आम्हास आज नाही उद्या खुली करुन द्यावी लागणार हे ध्यानात आणून श्री. सयाजीराव गायकवाड महाराज मुलांच्या शिक्षणाप्रमाणेच मुलींच्या प्राथमिक शिक्षणाबद्दलही सक्तीचा कायदा करतील तर उच्च कुलातल्या मराठ्यांनी आपल्या स्त्रियांस आजपर्यंत गोषात कोंडून घातल्यामुळे जी अपकीर्ती संपादिली आहे. तिचे परिमार्जन होवून पुढच्यात लोक शास्त्राच्या नामावलिकेत त्यांचे नाव चिरस्थाई होवून बसेल."

आगरकरांनी स्त्रीशिक्षणाच्या संबंधात " स्त्री शिक्षणावर शेवटचे दोन

शाब्द" ८८ लेख लिहून स्त्री शिक्षणाचे महत्व पट्वून दिले होते.

शिक्षण घेणारांमध्ये मुलगा, मुलगी असा मतभेद करणे आगरकरांना पटत नव्हते. त्यावेळच्या समाजाच्या मनस्थितीकडे पाहून सरकारने मुला-मुलींना शिक्षणाची सक्ती करावी. कायदे करून सक्तीची शिक्षण व्यवस्था अमंलात आणावी. असे त्यांना वाटत होते. स्त्री जीवनाचे महत्व ओळखून स्त्रियांवर समाजाची असलेली बंधने, जबाबदारी लक्षात घेऊन आगरकरांनी "स्त्रियांना उच्चप्रतिचे शिक्षण द्यावे किंवा नाही."८९ या लेखात आपले विचार मांडतांना लिहितात की, बाल विवाह प्रथेमुळे मुलींचेहि लग्ने लवकर होत असल्याने घरातील जबाबदारीत त्या अडकून पडतात. त्यामुळे त्यांना बाहेरची क्षेत्रं बंद होतात. स्त्रियांना शिक्षण द्यायचे झाले तर या गोष्टींकडे गांभीर्याने लक्ष दिले पाहिजे. बालविवाहामुळे स्त्रीयांना दुःखद जीवनाला सामोरे जावे लागते. त्यासाठी ही बालविवाह प्रथा बंद पाडली व स्त्रियांना शिक्षण सक्तीचे करून पुढे उच्च शिक्षणांची संधी मिळाली तर वैचारिक, सामाजिक दृष्ट्या सुशिक्षित स्त्रिया समाजाची प्रगती घडवून आणू शकतील असा विश्वास आगरकरांना वाटत होता. आईवडील मुलींना शिक्षण देण्यापेक्षा त्यांची लग्ने लवकर करण्यात धन्यता मानतात. याबद्दल खेद व्यक्त करतांना आगरकर लिहितात की, " मुली जावई यांचे अल्पवयात सुखसोहळे पाहण्याची आम्हास जी दुष्ट अभिरुची किंवा खोड लागली तीमुळे आम्ही आमच्या मुलामुलींचे आणि त्याचबरोबर सा-या राष्ट्राचे अतोनात नुकसान करीत आहोत हे आमच्या लक्षात येवू नये ही मोठ्या दुःखाची गोष्ट आहे. आमची ही खोड गेल्याशिवाय या देशात अनेक मोठ्या स्त्रिया किंवा मोठे पुरुष उत्पन्न होण्याचा संभव नाही आणि तसल्या स्त्रीपुरुषांशिवाय कोणत्या ही देशांत चिरस्थाई मोठेपणा यावयाचा नाही." स्त्रियांच्या उच्चशिक्षणाचा पुरस्कार करतांना ते पुढे म्हणतात की, मुले जर लग्नानंतरही शिक्षण घेवू शकतात तर स्त्रियांनी का घेवू नयेत. पण त्यासाठी त्यांच्या मागचा

सासुरवास कमी झाला पाहिजे. त्यासाठी आमच्या धर्मश्रध्दा जर समाजोन्मुख झाल्यातर गार्गी, मैत्रेयी या प्राचीन काळातील विदुषीचे गोडवे गाण्याची वेळ न येता आपल्याही मुलींना विदुषी करण्यात धन्यता मानली पाहिजे तरच खऱ्याअर्थाने स्त्रियांना शिक्षण घेता येईल असा आशावाद आगरकरांनी प्रस्तुत केला होता.

स्त्रियांच्या शिक्षणाबद्दल समाजाचा दृष्टिकोन अनुकूल होत असलेला पाहून आगरकरांनी स्त्रियांना शिक्षण कोणत्या प्रकारचे द्यावे यावरही आपले विचार मांडले केसरीमध्ये " हिन्दूस्थान देश बुडाला हो ठार बुडाला" [५ ऑगस्ट १८८४] "फिमेल हायस्कूलातील शिक्षणक्रम" लेखमाला, "परशुरामावतार" [ १ नोव्हें.१८८७] आगरकरांनी लेख लिहिले होते. "स्त्री पुरुषांना एकच शिक्षण द्यावे व तेही एकत्र द्यावे."[९०] या अग्रलेखात म्हणतात की, "हल्ल्या पुष्कळ स्त्रियांच्या बुध्दिमत्तेची विनाकारण नासाडी होत आहे. ज्या कामास जे पुरुष बुध्दिसामर्थ्याने योग्य नाहीत त्यांच्या कडून ती कामे होत असल्यामुळे व स्त्रियांस ती करण्याची परवानगी नसल्या-मुळे एकंदरीत ती कामे व्हावी तशी होत नाहीत व तशी न झाल्यामुळे मनुष्य जातीच्या सुखास धक्का बसत आहे. हर एक शास्त्रात,कलेत व धंद्यात स्त्री-पुरुषांची चढाओढ लागून ज्याच्या त्याच्या व जिच्या तिच्या योग्यते नुरूप व्यवस्था लागली पाहिजे. शास्त्राभ्यास किंवा कलाभ्यास करण्यात स्त्रिया असमर्थ असतील तर त्यातश्या ठरतील. पण अनुभवाने तसे ठरेतो पर्यंत त्यांना कोणत्याही प्रकारचा प्रतिबंध करणे हा शुध्द दांडगे पणा होय. --- कोणतेही शिक्षण देतांना ज्याला ते द्यावयाचे आहे त्याच्या मानसिक व शारीरिक शक्ती जात्या कशा आहेत याचा विचार केला पाहिजे. इतकेच नाही तर त्या व्यक्तीस आपले आयुष्य कोणत्या स्थितीत घालवावे लागणार याचाही विचार केला पाहिजे." हे शिक्षण देतांना जर मुलामुलींना एकत्र शिक्षण मिळाले तर " मुलगे आणि मुली एकत्र वागल्याने

त्यांच्याविषयवासनेवर अपायकारक परिणाम न घडता उलट त्या शांत व गंभीर होतात. आणि उभयता मैत्रीचा पाया कोणत्याही बाह्यांगावर न घालता अंतरंगाची चांगली परिक्षा करून त्यावर तो घालण्याचा त्यांचा कल असतो"--- जसजसा पुरुषांत विद्येचा अधिक प्रसार होत जाईल, तसतसा स्त्रियांतही त्यांचा उपक्रम होवुन तो वाढत जाणार, तो वाढत गेला म्हणजे स्त्रियांस आपले हित कशात आहे आणि ते साधावे कसे हे समजू लागणार आणि ते समजू लागले की पुरुषांस हा आपला सांतितिक जुलूम सोडून घावा लागणार." आगरकरांचा स्त्री जीवनाच्या सुधारणेविषयीचा दृष्टिकोन विशाल स्वरूपाचा उदारमतवादी होता. संपूर्ण स्त्री वर्गाच्या पुरुषार्थाला कोणतीही आडकाठी असणे त्यांना मान्य नव्हते, पुरुषांना जे जे स्वातंत्र्य, हक्क, अधिकार आहेत ते सर्व स्त्रियांना मिळाले पाहिजेत, शिक्षणात, व्यवसायात, समाजकारणात, राजकारणात सर्व क्षेत्रात त्यांना प्रवेश मिळाला तर स्त्री शक्तीचा योग्य रितीने वापर होवून समाजाचा उत्कर्ष घडून येईल असे आगरकरांना वाटत होते. स्त्री पुरुषामधील वैचारिक सामाजिक विषमता कमी झाली पाहिजे. ही विषमतेची दरी कमी झाल्यास राष्ट्राचा विकास होण्यास चालना मिळेल असे त्यांना वाटत होते. मुलांमुलींना वयाच्या चौदाव्या वर्षापर्यंत शिक्षण मिळाले आहे किंवा नाही हे पाहण्याची जबाबदारी सरकार व स्थानिकांनी घेवून सक्तीच्या शिक्षणाचे धोरण राबविले पाहिजे. त्यासाठी सरकाराने शिक्षणावर विशेषतः प्राथमिक शिक्षणावर खर्च केला पाहिजे तसे कायदे केले पाहिजे. अशा प्रकारे जर सरकारने शिक्षणाचे धोरण राबविले तर निकोप समाज निर्माण होण्यास मदत होईल. ज्याप्रमाणे पुरुष समाजात मोकळेपणाने वावरतो, तसेच स्त्रियांना मोकळेपणाने वावरण्याची संधी मिळाली तर जगाच्या प्रगत देशाच्या बरोबरीत भारत एक तेजस्वी राष्ट्र म्हणून पुढे येण्यास फारसा काळ लागणार नाही. माणुसकीच्या मर्यादा ठेवून न्याय, समता, नीति, स्वातंत्र्य यावर आधारीत स्त्री जीवन असावे असे आगरकरांना वाटत होते.

आगरकरांच्या लिखाणातून लोककल्याण व सत्यप्रियता स्पष्ट होते. समाजातील सुशिक्षित लोकांबरोबर सनातनी वर्गाला काळानुसार बदलण्याचा इशाराही त्यांनी आपल्या सुधारकातून केला. आगरकरांच्या काळाचा विचार करता तेव्हाचे स्त्रीजीवन असह्य होते. मध्यकालीन समाजात होणाऱ्या बालविवाह प्रथेमुळे अनेक प्रश्न निर्माण होवून स्त्रियांचे जीवन पूर्णपणे दुर्धर बनले होते. आगरकरांपूर्वी रानडे आदी सुधारकांनी स्त्रीजीवना विषयीच्या दुःखाला वाचा फोडली होती. पण आगरकरांनी आपल्या सुधारकात स्त्रीजीवन सुधारण्यासाठी स्त्रीजीवनाचे असह्यपण प्रगट करुन त्याकडे समाजाचे लक्ष केंद्रित केले. त्यांना समानता, मानवतेच्या दृष्टिकोनातून पुरुषप्रधान समाजाने उदारपणे वागणूक देण्याचे आवाहन त्यांनी केले. आगरकर नुसते बोलके सुधारक नव्हते तर ते स्वतःही आपल्या पासुन सुधारणेला प्रारंभ करीत असत. त्यामुळे वृत्तपत्रातील त्यांचे लेख समाजावर एक प्रकारची प्रभावी छाप ठरवित असे.

इ.स. १८८५ मध्ये आधी सामाजिक की आधी राजकीय १ हा वाद निर्माण झाला असता त्यांनी "सामाजिक सुधारणेस अत्यंत अनुकूल काल साप्रंतकाल "[११] या शिर्षकाच्या लेखामध्ये सामाजिक सुधारणेला अग्रस्थान देतांना आपले विचार प्रगट केले की, "थोडया वर्षापूर्वी आ.का.त्रि. तेलंग यांनी मुंबईत जे सुरस व्याख्यान दिले व जे त्यावेळी लोकांस अत्यंत प्रिय झाले त्यात त्यांनी सामाजिक सुधारणेच्या अगोदर राजकीय सुधारणा झाली पाहिजे व बहुशः होते अशा मताचे प्रतिपादन केल्याचे स्मरते व हेच मत त्यांस मान्य आहे असे युरोपात पुष्कळ विद्वान व विचारी लोक आहेत.— पण कुटुंब सुधारल्याखेरिज राष्ट्रसुधारणा किंवा राजकीय सुधारणा कधीच व्हायची नाही.—— ज्या देशातील कुटुंबात गुलामगिरी व क्रौर्य यांचा अंमल जारीने गाजत आहे. त्या देशातील राज्यपध्दतीत ते दुर्गुण पूर्णपणे प्रतिबिंबित झालेच पाहिजेत व तीत त्याचे प्रतिबिंब पडले म्हणजे त्या राष्ट्रात

पिकळा आलीच पाहिजे.--- राजकीय धार्मिक व सामाजिक सुधारणापैकी प्रथम कोणती होते व करावी याविषयी किती मतभेद असलातरी सामाजिक व धार्मिक सुधारणा करण्यास आज आम्हास जितका अनुकूल काळ प्राप्त झाला आहे तितका पूर्वी कधीच नव्हता. या घटकेस हातपाय न हालविणे म्हणजे जाणून बुजून आत्महत्या करण्यास प्रवृत्त होण्यासारखे होय." असे स्पष्ट केले. समाजाच्या पर्यायाने राष्ट्राच्या विकासासाठी आपल्या विचारांमध्ये बदल घडवून आणणे आणि कृतीशीलतेने राष्ट्रकार्यास प्रवृत्त होण्यावर आगरकरांनी भर दिला.

आगरकरांनी समाज सुधारणेमध्ये स्त्री सुधारणेवर आगरकरांनी भर दिला होता. स्त्रियांना शिक्षण दिले तर त्यांचे बहूतेक प्रश्न सुटतील. कुटूंबाचे सुख या दृष्टिकोनातूनही स्त्री शिक्षण त्यांना महत्याचे वाटत होते. मुले स्वावलंबी होईपर्यंत तो आईवर अवलंबून असल्याने घरातील स्त्री सुशिक्षित, सुजाण असणे आवश्यक वाटत होते. आतापर्यंत स्वार्थीवृत्तीने पुरूषवर्गाने स्त्रीयांना पुढे येण्याची संधी नाही. त्यामुळे समाजही कुंठीत झाल्यासारखा स्थिरावला आहे. आता तरी स्त्रीला सर्वांगीण उन्नतीची संधी देण्यासाठी बालविवाह प्रथा बंद पाडणे गरजेचे आहे, विवाहाचा मर्यादा काळखंड वाढविणे आवश्यक आहे असे आगरकरांना वाटत होते. स्वतः आगरकरांनी त्या काळानुसार उशीरा विवाह केला होता आणि स्वतः:ची पत्नी यशोदाबाईंना सुशिक्षित, साक्षर बनविण्याचा प्रयत्न केला होता. मानवतेच्या दृष्टीकोनातून स्त्री जातीकडे पाहून समतेने वागणूक देण्याचा प्रयत्न त्यांनी जन्मभर केला होता. म्हणूनच ते बोलके नव्हे तर कर्ते सुधारक ठरले होते..

आगरकरांनी समाजसुधारणेत स्त्रीशिक्षणाप्रमाणेच प्रौढ विवाह, पुनर्विवाहावर भर दिलेला होता. आपल्या पारंपारिक समाजरचनेच्या रूढी कालबाह्य झाल्यामुळे तिच्यात बदल घडवून आणणे अपरिहार्य वाटत होते.

बालविवाह, विधवा वपन, सतीप्रथा, बहुविवाह पद्दती, विषम विवाह इ. पद्दतींवर टिका करुन त्याचे वास्तव व विकृत स्वरुप समाजासमोर मांडून त्यात सुधारणा घडवून आणण्याची प्रयत्न केले. पण त्यांचे विचार समाजाला जास्त जहाल वाटत होते. त्यामुळे त्यांच्यावर मोठ्या प्रमाणात टीका व बहिष्काराचे शस्त्र उगारले. पण त्यांनी निर्भयपणे आपले समाजकार्य चालूच ठेवले होते. बालविवाहाचे दुष्परिणाम सांगत असतानांच समाजातील तरुण सुशिक्षित वर्गास त्यात सुधारणा घडवून आणण्याचे आवाहन त्यांनी " तरुण सुशिक्षितांस विज्ञापना" [९२] ह्या लेखामध्ये आहे. "तरुण सुशिक्षित मित्र हो, " शरीर धड तर मन धड" [ A Sound mind in a sound body. ] अशी जी इंग्रजीत म्हण आहे ती तुमच्या सर्वांच्या ऐकिवात आली असेल. ज्याप्रमाणे जोरदार वृक्ष निपजण्यास मूळ अंकूर जोरदार पाहिजे, त्याप्रमाणे देशात सुदृढ स्त्री पुरुष निपजण्यास सुदृढ मुले होण्यास वैद्यशास्त्रांनी जो ऋऱ्या विवाहाचा काल सांगितला, त्याचे कोणा कडूनही उल्लंघन होता कामा नये या काळाचे उल्लंघन आम्हाकडून अनेक वर्षे होत असल्यामुळे आमची प्रजा क्षीण, अल्पायुषी, श्रम करण्यास नादान, उत्साहशून्य व भेकड अशी होत आहे. आमच्या शारीरसामर्थ्याचा लोप असल्यामुळे आमचे मानसिक सामर्थ्यहि नाहीसे होत आहे. बाल विवाह बंद झाल्यास आज प्रत्येक घरी ज्या एक दोन हतभाग्य बालविधवा दृष्टीस पडतात त्या दृष्टीस पडे नाशया होतील. विवाह पूर्वी मुलीस ज्ञान संपादन करण्यास अधिक फुरसत मिळाल्यामुळे पुढे त्यांच्याकडून अपत्यसंवर्धनाचे व प्रपंच चालविण्याचे काम चांगल्या रितीने होवू लागेल पण हे सर्व होण्यास बाल विवाहाची चाल बंद झाली पाहिजे व ती बंद होणे किंवा न होणे हे सर्वस्वी तुमच्या हातात आहे. या कामासाठी सर्व सुशिक्षित तरुणांनी "महाराष्ट्र बाल विवाह निषेधक" नावाची मंडळी स्थापवी अशी आमची सुचना आहे." आगरकर केवळ अशी सूचना करुन थांबले नाहीतर बालविवाह कायद्याने बंद व्हावे. विवाहाची वयोमर्यादा वाढावी यासाठी सरकारला कायदा

करण्याचा आग्रह करतात.

आगरकरांनी "केसरी" वृत्तपत्राचे संपादक असतांनाही बालविवाह ह्या विषयावर अनेक लेख लिहून त्यामुळे होणारे दुःष्परिणामाची चर्चा केली होती. हा विषय ज्वलंत असल्यामुळे त्यांचे टिळकांशी मतभेद होवून त्यांनी स्वतंत्र "सुधारक" पत्र काढून सामाजिक विषयावर समाज सुधारणेच्या दृष्टीने आवश्यक असे मुलगामी विचार लोकांपर्यंत पोहचविण्याचा प्रयत्न केला होता. बालविवाहामधील हानीकारकता त्यांनी केसरीमधील "अर्थदृष्टया बालविवाहाचा विचार" [३ ऑगस्ट १८८१], "व्यवहारदृष्टया बालविवाहाचा विचार" [ १० मे १८८१]" स्त्रीदास्य विमोचन" [ ३१ ऑगस्ट, ७ नोव्हें. १८८२] "मराठमोळा" [२ एप्रिल, २ मे १८८२] "सासुरवास"[९३] [२६ डिसें. १८८२] या लेखांमधून स्त्रियांची गुलामगिरी, विवशता, कुंचबना, सासरी बालवधूच्या होणा-या छळाचे विदारक माहिती मांडली होती. बालविवाह संबंधी लिहितांना उपरोधिकपणे बालविवाह प्रथारूढ कशी झाली याचे ही विवेचन केले आहे. त्यानंतर सुधारकामधून या विषयावर आगरकरांनी चिकित्सक पणे लेख लिहून बाल विवाह बंद पाडण्यासाठी उपायही सुचविले होते. त्यासाठी त्यांना कायद्याची गरज भासत होती. बालविवाहाच्या निवारासाठी संमतीवयाचा कायदा झाला पाहिजे असा आग्रह धरला होता. मुलामुलींच्या विवाहाची वयोमर्यादा वाढल्यास शारीरस्वास्थ्य, कुंटुबव्यवस्था आणि समाज जीवनाच्या दृष्टीने अयुक्त ठरेल या दूरदृष्टोने त्यांनी संमतीवयाच्या कायद्या चा पुरस्कार केला होता.

पुरातन काळापासून स्त्रीजीवनावर लादलेली बंधने शतकानुशतके तशीच राहिल्याने समाज आधुनिक काळाकडे वाटचाल करतांनाही स्त्रीजीवनाच्या असाह्यतेत बदल झालेला नव्हता. स्त्रियांच्या या विकट समस्येकडे पहिल्यांदा इ.स.१८८१ ला पाहिले गेले असले तरी इ.स.१८८४ मध्ये मि. बेहरामजी मलबारी या पारशी गृहस्थाने हिन्दू स्त्रियांच्या दयनीय जीवनांवर प्रकाश टाकून

"बालविवाह" व "असंमत वैधव्य" या दोन कालबाह्य ठरलेल्या रूढीविरुद्ध ब्रिटिश सरकारने कायदे करावे अशा अर्थाचे हिन्दुस्थान सरकारला, भारतीय व विदेशी पत्रकार आणि प्रतिष्ठित व महत्त्वपूर्ण लोकांकडे पत्रके पाठवून समाजामध्ये खळबळ माजविली होती. तसेच इ.स. १८८१ ला गुजरातमध्ये विजयलक्ष्मी नावाच्या स्त्रीने बालहत्या केली तेव्हा कोर्टाने तिचा अपराध सिद्ध करून तिला काळ्या पाण्याची शिक्षा दिली होती. ही शिक्षा गुन्ह्यापेक्षा भयंकर आहे असे मत प्रदर्शन त्यावेळी झाले होते. सार्वजनिक सभेतून न्याय मागण्यासाठी एक अर्ज पाठविला होता तेव्हापासून स्त्रियांच्या प्रश्नाला सुरुवात झाली.[९४] मलबारीचे सरकार दरबारात वजन असल्याने सरकार कायदा करते की काय अशी भीती सनातनी मंडळींमध्ये निर्माण झाली होती. या पत्रकामुळे सुधारक वर्गातही दोन गट पडले होते. रानडे, आगरकर मोडक कायद्याचे बाजूने उभे होते तर तेलंग, टिळकांनी सनातन्यांचा पक्ष उचलून धरला होता. केसरीचे धोरण सामुदायिक तत्त्वाचे असल्याने त्या मंडळींशी सामाजिक प्रश्नात मतभेद निर्माण होत असल्याने लिहून आलेला मजकूर या सदराखाली आगरकरांना लिहावे लागत होते. त्या लेखात स्वतंत्र मते मांडता येत नसल्यामुळे त्यांची कुंचबणा होवू लागली होती. तेलंग, टिळकांना सरकारने भारतीय समाज जीवनात ढवळाढवळ करू नये. आपल्या जीवनपद्धतीचा परिचय नसल्याने त्यांनी सामाजिक सुधारणा घडवून आणण्याच्या भानगडीत इंग्रज सरकारने पडू नये, असे त्यांना वाटत होते. आगरकरांनी १६ डिसेंबर १८८४ च्या "वादे वादे जायते तत्त्वबोध"[९५] या लेखात संमतीवयाच्या कायद्याचे समर्थन केले. मात्र हा केसरीच्या प्रकाशन अंकातील लेख मतभेदामुळे अपूर्णच राहिला. नंतर हा वाद सतत सुरुच राहिला होता.

नंतरच्या काळात आगरकरांनी सुधारकामध्ये या विषयावर अनेक लेख लिहिले. "संमतीचे वय आणि जुन्या लोकांचा खोटेपणा"[९६] या लेखात सर अँड्र्यू स्कोबल यांनी ९ जानेवारी १८९१ ला कलकत्ता येथे वरिष्ठ कायदे कौन्सिलात बील आणले. त्यासंबंधी सनातन्यांच्या प्रतिक्रियांचा

परामर्श घेतला आहे. या बिलात संभोगकाला॰स्त्रियांच्या संमतीचे वय बारा वर्षांचे असावे हा मुख्य मुद्दा होता. या लेखात ते म्हणतात की, "मुलगी कोणत्याही स्थितीत असो किंवा ती कोणत्याही वयाची असो तिला ऋतु प्राप्त झाला की, सोळा दिवसाच्या आत नवऱ्याला गर्भदान करण्याकरीता तिच्याकडे पाठविले पाहिजे, अशी शास्त्राज्ञा कोठे आहे ती या धर्माभिमान्यांनी आम्हांस दाखवावी..... स्त्री ऋतु स्नात असो किंवा नसो तिला तेरावे वर्ष लागण्यापूर्वी तिच्याशी समागम करणे, हा मोठा अन्याय होय. अशा आमच्या धर्मशास्त्राच्या व वैद्यशास्त्राच्या स्पष्ट आज्ञा आहेत. पण त्यांचा आमच्याकडून व्हावा तसा प्रतिपाल होत नसल्यामुळे कित्येक कन्यकांवर भयंकर प्रसंग गुदरत आहे. तेव्हा संमतीचे वय बारा वर्ष पर्यंत वाढविण्याच्या हेतुने आॅ. मि. स्कोबल यांनी जे बिल मुख्य कायदे कौन्सिलपुढे आणिले आहे, ते पास झाल्यास ज्या राक्षसी कामुकांच्या कामवासना अनावर होतील त्यांस कडक शिक्षा न होण्याबद्दल जे प्रतिबंध सांगितले आहेत ते ब्रिटिश सरकारने सक्त आमलांत आणिल्यासारखे होणार आहे". मलबारींनी इ.स. १८८७ मध्ये संमतीवय कायदयाचा बारा कलमांचा कार्यक्रम जाहिर केला आणि इंड्यिन पीनल कोडमधील कलमांमध्ये थोडी दुरूस्ती सुचविली. या कलमाप्रमाणे "बारा वर्षांच्या लग्न झालेल्या मुलीशी तिच्या नवऱ्याने संभोग केला तर नवऱ्याला कायदयाने शिक्षा व्हावी, मुलींची लहानपणीच लग्न होत असल्याने ऋतुप्राप्तीपूर्वीच शारीरसंबंधाचा बलात्कार घडल्यास बहुसंख्य मुली मृत्युमुखी पडतात, याकडे सरकारचे लक्ष वेधून कायदयात फेरबदल करण्याची विनंती केली होती. या फेरबदलाने धर्महानी होत नाही. उलट धर्मशास्त्र, आयुर्वेद इत्यादी या दुरूस्तीला शास्त्राधार असल्याची खात्री सरकारने करून ९ जानेवारी १८९१ ला कायदा पास केला. तेव्हा टिळकांबरोबर बंगालचे रमेशचंद्र मित्र हेही कायदयाच्या विरोधात उभे राहिले."[९७] तेव्हा आगरकरांनी सुधारकात "आता मात्र खचित होणार"[९८] या लेखात रोमेशचंद्राच्या विचारांचा

समाचार घेवून ऑ॰रा॰ब॰ नूलकर यांच्या संमतीवयाच्या बिलावरील उपयुक्त भाषण व नंतर प्रतिकूल झाल्याबद्दल विषाद प्रगट केला॰ त्यात जॉन स्टुअर्ट मिलचे मत देतांना लिहितात की "ज्याच्या अंगात जो दुर्गुण विशेष असतो, तो दुर्गुण काढून टाकल्यास फार प्रतिकूल असतो॰ अडाणी लोकांस जबरीच्या शिक्षणाचा, वस्ताद दारू पिणारास दारू पिण्याच्या बंदीचा, अल्पवयातच अपत्यांचे विवाह करणारास बालविवाहनिषेधाचा व अप्राप्त यौवन कुमारिकांचा, त्यांच्या संमतीविरुद्ध संभोग करणारांस सम्मतीचे वय वाढविण्याच्या कायदा सहसा पसंत पडावयाचा नाही॰"
याच विषयावर आगरकर आपले विचार मांडताना "विवाहकाल व संभोगकाल"[९९] या लेखात, त्यांनी डॉ॰ भांडारकरांनी विवाहकालमर्यादेला शास्त्राधार दाखविला त्यासंबंधी टिकात्मक विवेचन करून स्पष्ट केलेकी विवाहकालाची व संभोगकालाची जी मर्यादा अलिकडील समंजस व सुशिक्षित लोकांस प्रशस्त वाटू लागली आहे, तीच मर्यादा आमच्या पुरातन प्रमुख स्मृतींस व ऋषींस पूर्ण मानविली होती॰ इतकेच नव्हे तर त्या मर्यादेचे उलंघन करणे हे त्यांनी मोठे पाप मानिले होते.... पूर्वीच्या ऋषींनी व स्मृतीकारांनी स्त्री संभोगाची जी इयत्ता घातली आहे तीच हिन्दुस्थान सरकार घालू पाहत आहे, तिचे उलंघन न केल्यास सध्या सुधारकांत व सुधारणा निंदकात जो वाद चालला आहे, तो देखील नाहिसा होणार आहे॰" हे साधार स्पष्ट केले॰

पुढे आगरकरांनी धर्मशास्त्र संमतीवया विरोधी नाही हे पटवून देतांना "संमती बिलास धर्मशास्त्र बाधक नाही॰"[१००] या लेखात मुली वयात आल्यानंतरच त्यांना सासरी पाठविण्याचा विचार धर्मशास्त्राप्रमाणे आईवडिलांनी करावा असे परखडपणे बजावले आहे, त्याही पुढील लेखात "होऊच या तर दोन हात" [१०१] यामध्ये आगरकरांनी बेंटिंगच्या काळात सतीप्रथा बंद करण्याच्या कायद्याविरोधी जे मोहोळ उठले होते, त्याचेच उदाहरण देवून संमतीबील हे योग्य काळात पास केल्याने सरकारचे आभार

मानले. या लेखात आगरकर म्हणतात की, "एकाने सतत दुसऱ्याचे काम केले असता, दुसऱ्याला ते करिता येईनासे होऊन तो अगदी पंगू होतो आणि मग पहिल्यास त्यावर हवा तसा जुलूम करता येतो. नवऱ्याने आपल्या बायकोकडे केव्हा जावे हे ठरविणे समाजाच्या किंवा धर्माच्या अखत्यारातले काम आहे. तेव्हा सरकारने त्यात पडणे अप्रशस्त आहे हे सिद्ध होते. पण त्यासाठी समाज धर्म पुरुषाने मानवतेच्या नात्याने विचार करण्याची गरज आहे. आगरकरांनी परकीय सरकारला धर्मक्षेत्रात हस्तक्षेप करण्याचा अधिकार नाही असे म्हणणाऱ्या सनातन्यांना विचारले की, "ज्या वेळेस पोर्तुगिज लोकांनी ख्रिस्ती धर्म स्थापन करण्यासाठी कोकणपट्टीतील तुमचे अनन्वीत हाल केले. त्यावेळी तुमचा धर्माभिमान कोठे गेला. होता..... जेव्हा महमंदीयांनी हिन्दुस्थानच्या एका टोकापासून दुसऱ्या टोकापर्यंत साऱ्या हिन्दु लोकांस धर्म वेडाने जर्जर करून सोडले. तेव्हा धर्मरक्षणासाठी नुसता आरडा तरी करायचा. आता दयावंत ब्रिटिश सरकार केवळ परोपकारी बुद्धिने आपल्या लहान पोरींवर जुलूम करू नका येवढे आबदीने सांगत असता तुम्ही त्यावर आपले धर्मास्त्र सोडता. धिक्कार असो तुम्हाला तुमच्या धर्माला आणि हक्काला"[१] अशा ज्वलंत शब्दात त्यांनी सनातनी लोकांची निर्भत्सना करून सम्मतीवयाच्या बिलाचा पुरस्कार केला होता. हा संमतीबिलाचा कायदा झाल्यानंतर सनातन्यांचा विरोध मंदावला होता. पण त्यासाठी सुधारकांना सनातनी समाजाशी बराच काळ लढा द्यावा लागला.

बालविवाहापेक्षा आगरकरांनी स्वयंवर आणि संमतीविवाहावर जास्त भर दिलेला होता. "स्वयंवर"[१०२] या अग्रलेखात ते म्हणतात की, "जो स्वयंवरे नाहीत त्या सर्वांस आम्ही बालविवाह समजतो. ज्याचे त्याने लग्न करणे म्हणजे स्वयंवर. एकाने दुसऱ्याचे विवाह करणे म्हणजे बालविवाह. आम्हात एकेकाळी स्वयंवर पद्धती अत्यंत प्रचलित होती, अशयाबद्दल पुष्कळ

आधार आहे. आम्हापैकी बहुतेकांची लग्ने अकराच्या आतील वयाच्या मुलीशी झाली असल्यामुळे सध्या येथे बालविवाहाची पध्दत अमलांत आहे. याबद्दल पुरावा देण्याची मुळीच गरज नाही...... "सामाजिक सुधारणा परिषदेच्या" मनात जी बालविवाह निषेधक मंडळी स्थापावयाची आहे. तिच्या पुरस्कर्त्यांनी नुकत्याच प्रसिध्द केलेल्या पत्रकात १०, १२ व १४ हे जे मुलींच्या वयाची आकडे दिले आहेत ते आमच्या मते केवळ टप्पे आहेत. यापैकी शेवटचा आकडा आम्हास बराच पसंत आहे, असे आगरकरांनी स्पष्ट करुन प्रौढविवाहावर भर दिला. मुलामुलींमध्ये स्वतःच्या विवाहासाठी योग्य ते काय निर्णय घेण्याची विचारशक्ती निर्माण होणे गरजेचे वाटत होते.

संमतीवयाच्या वादाच्या काळात पुण्यात क्रिडाभुवन, तुळशीबाग या ठिकाणी सभा झाल्या. त्यातून प्रक्षोभक चळवळी निर्माण झाल्या होत्या. या काळात कायद्याबद्दल अनेक प्रकारे वादविवाद होवून आगरकर टिळकांचे मतभेद विकोपाला पोहोचले होते. "केसरी" व सुधारकांतून एकमेकांवर आरोप प्रत्यारोप, व्यक्तिगत टीकांनी सभ्यतेच्या मर्यादा सोडल्या होत्या. तरी ही आगरकरांनी संमतीवयाच्या अनुकूल अनेक लेख त्या काळात लिहिले होते. सामाजिक सुधारणेसाठी कधी कधी कायद्याची आवश्यकता पडते. या दृष्टिकोनातून त्यांनी "सामाजिक पडामोड", "सामाजिक सुधारणा आणि कायदा", "कायदा मागता ते जात की मागत नाही" "आता धर्माभिमानी स्वतःच वेगळी जात करणार म्हणतात", "संमतीवय आणि जुन्या लोकांचा खोटेपणा", ते तुमचे पुढारी नव्हेत".[103] इ. लेख लिहून संमतीवयाचे समर्थन केले होते. त्याचबरोबर संमतीवयाच्या पर्यायाचा, स्वयंवराचा पुरस्कार केला होता. या काळात आगरकरांवर समाजाने रोष प्रगट करुन होळीच्या सणाच्या दिवसांत सुधारकांची प्रेतयात्रा धर्मनिष्ठांनी काढली होती. त्यांना मारण्याची धमकीही देण्यात आली होती. पण आगरकर डगमगले नाहीत. त्यांनी आपले विचार वृत्तपत्रातून सतत मांडण्याचा प्रयत्न केला. बालविवाहाचा विरोध करतांना आगरकरांनी त्याला पर्याय म्हणून स्वयंवर पध्दतीचे विवाह,

गांधर्व विवाह किंवा स्वामोमत विवाहाचा पुरस्कार करून अशा प्रकारचे विवाह समाजात प्रचलित झाले पाहिजे, असे म्हणतांना" कथा पुराणातील नलदमयंती, अर्जुन सुभद्रा, दुष्यंत-शाकुंतला इ. काल्पनिक पुरुषांच्या स्वयंवर आणि गांधर्व विवाहाच्या कथा आवडीने वाचता, ऐकता मग ते वास्तव जीवनात अनुकरण करण्यात मागे का राहतात. स्वयंवराने स्त्रियांच्या चारित्र्यात, नीतीमत्तेत कोणत्याही प्रकारे शिथिलता येणार नाही किंवा दुराचार वाढणार नाही. "प्रियाराधान"[१०४] ह्या लेखामध्ये ते पुढे म्हणतात की, "राष्ट्राची खरी मजबुती कुटुंबाच्या आणि त्यातील व्यक्तिंच्या मजबुतीवर सर्वस्व अवलंबून आहे. त्या कुटुंबाची व त्याच्या लहान मोठ्या अवयवांची स्थिती जोपर्यंत आता आहे तशीच राहील, तोपर्यंत राज्य, धर्म, निती, उद्योग यापैकी कोणत्याही गोष्टीत आमचे पाऊल वास्तविकपणे पुढे पडेल असे कधीही म्हणता येणार नाही". विवाहाच्या बाबतीत स्वयंवर पद्धतीचा अवलंब करतांना प्रौढ विवाहाचे महत्व आगरकरांनी सांगितले होते. मुलामुलींना उच्च शिक्षण मिळाले तर ते आपल्या जीवनाविषयी गंभीरतेने विचार करून आपल्या अनुरूप व्यक्तीशी विवाह करण्यास पुढाकार घेण्यास पुढे सरसावतील, तेव्हा प्रौढ विवाह जास्त योग्य ठरतील असा आगरकरांच्या विवाहविषयक विचारांचा आशय होता. आगरकरांनी स्पेन्सरप्रणित विचारांना प्राधान्य देवून कुटुंबाच्या निकोपणाची आवश्यकता प्रतिपादित केली. समाजाचा निकोपपणा त्याच्या अंतर्भूत असलेल्या सुदृढ निकोप कुटुंबव्यवस्थेत असतो, ही कुटुंब व्यवस्था, सुदृढ असणे त्यासाठी आवश्यक आहे. कुटुंब व्यवस्थेतील प्रमुख दोन घटक पती-पत्नीचे परस्परसंबंध सुदृढ पायावर उभे राहिले पाहिजे, दोघांनाही समान हक्क अधिकारांचा उपयोग करता येणे आवश्यक आहे. त्यासाठी, प्रौढविवाह, सुशिक्षित स्त्री पुरुषांमध्ये होणे जरूरी आहे, असे आगरकरांचे स्पष्ट मत होते.

आगरकरांनी बालविवाहाबरोबरच विषम विवाहाचाही विरोध केला होता. या विवाहात वडिलांच्या वयाच्या मुलाशी अल्पवयीन मुलींचे लग्न

करुन देवून त्यांच्यावर वैधव्याचे दयनीय कष्टप्रद जीवन जगण्यास भाग पाडले जाते. त्या गोष्टी असहनीय म्हणून काही बालविधवा सती जाणे पसंत करतात. केसरीच्या २३ व्या अंकात ७ जून १८८१ मध्ये लिहिलेल्या "बाल-विवाहापेक्षा सतीच बरी"[१०५] या लेखात सतीप्रथेमागे सुरवातीला पतिप्रेमाची भावना असली तरी कालान्तराने एक रुढी, आचार प्रथा बनली. त्यामुळे पुढे एखाद्या स्त्रीला आत्मदहन करायचे नसले तरी तिला जबरदस्तीने चितेत लोटणे, ढकलणे हे अमानुष कृत्य करण्यास लोकांना काहीच वाटत नाही याचे आश्चर्य व्यक्त केले आहे. हा घृणास्पद प्रकार पूर्णपणे समाजातून नष्ट झाला पाहिजे असा त्यांचा आग्रह होता. नंतरच्या एका लेखात "मुलाचे लग्न करणे बापाचे कर्तव्य आहे काय ?"[१०६] यातही मुलांच्या आणि वडिलांच्या कर्तव्याचे अवलोकन करुन काळानुसार बदलण्याचे आवाहन त्यांनी सुशिक्षित वर्गाला केले आहे. केसरीतीलच "मराठमोळ्याची पुरवणी"[१०७] यात पुरुषांनी बायका ह्या केवळ प्रजोत्पादनाची हिंडती फिरती यंत्रे आहेत असे समजू नये... त्या सर्व कर्तव्य गाजविण्यास कुठे कमी पडत नाही, तेव्हा त्यांनी पाहिजे तो व्यवसाय करावा, पाहिजे तो विद्या संपादन करावी; पाहिजे त्या परिक्षा द्याव्या, पाहिजे त्या पदव्या मिळवाव्या, आणि पाहिजे तेव्हा लग्न करुन हवा तसा संसार करावा. अशी मोकळीक कालान्तराने मिळणार आहे". असा आशावाद सांगून स्त्रीला शिक्षण घेण्यास अवधी मिळावा त्यासाठी तिच्या लग्नाची वयोमर्यादा वाढविण्यास लोकांनी तयार असले पाहिजे असा आग्रह त्यांनी लोकांना केला होता. त्यांचे विचार आज शंभर वर्षांनंतरही किती दूरदृष्टीचे मूलगामी परिपूर्ण व उपयुक्त होते हे त्यांच्या लेखांवरुन दिसून येते. "मराठमोळा"[१०८] या लेखातही विधवा स्त्रियांच्या शुद्र जीवनाचे वर्णन केले होते. विधवा स्त्री, म्हणजे घरातील बहिष्कृत व्यक्ती मानली जाई, त्या काळची स्त्री पतीच्या मृत्यूनंतर सतीच्या बळजबरी आत्मदहना पासून जर सुटली तर विधवेचे असह्य दारुण जीवनाला सुरुवात होत असे. तिचे जबरदस्तीचे केशवपन करुन तिला विद्रूप करुन टाकीत. धर्माच्या नावाखाली केशवपन करुन अंधार कोठडीत राहणे, सार्वजनिक सण उत्सवात भाग न घेणे, पांढरे वस्त्र

नेसणे, परपुरुषाच्या दृष्टीस न पडणे, इ. गोष्टी कराव्या लागत. यावर आक्षेप घेऊन आगरकरांनी केसरीत ३० सप्टेंबर १८८४ "अतिशहाणा त्याचा बैल रिकामा" ३० जून १८८५ ला "उत्तम नाव्हिणी पाहिजेत" "अजून तरी सावध व्हा, नाव्हावली?" हे लेख लिहून आलेला मजकूर या सदरात घातले.[१०९] हिन्दु विधवेचे जीवन म्हणजे लोकांच्या क्रूरतेची विचार शून्यतेची पुतळी ठरलेली होती. या अनिष्ट रूढीवर त्यांनी धर्माभिमानी सनातनी लोकांवर कोरडे ओढले होते. इ.स. १८९२, ९ ऑगस्टला फर्ग्युसन कॉलेजचे प्रिन्सिपल आपटेंच्या मृत्यूनंतर त्यांची पत्नी रमाबाईने विधवेचे सोवळेपण पाळले, याचे आगरकरांना अतिशय वाईट वाटले होते. आपट्यांनी आपल्या पत्नीला आधीच समजावून सांगितले नाही म्हणून तिच्यावर असा प्रसंग आला याचे दोषारोपण आगरकरांनी आपट्यांवर केले होते. सुधारणा करतांना, ती घरापासून सुरु करण्याचा त्यांचा आग्रह होता.

आगरकरांनी बालविधवांची दुर्दशा थांबविण्यासाठी उपाय सुचवितांना स्त्री शिक्षणाबरोबरच पुर्नविवाह, विधवाविवाहाचा पुरस्कार केला. त्यांचा स्त्री विषयक दृष्टिकोन व्यापक स्वरूपाचा होता. त्या काळात कुठेही आणि कोणीही जर पुर्नविवाह विधवाविवाह केले तर त्याचे अभिनंदन आपल्या वृत्तपत्रातून "वर्तमानसार" या सदरातून प्रसिद्ध करीत असत. इ.स. १८९२ मध्ये श्री रामचंद्र भिकाजी जोशी यांच्या बहिणीने रा. परांजपे फॉरेस्ट ऑफिसर नागपूर येथील यांच्याशी पुर्नविवाह केला तेव्हा आगरकरांनी त्यांना आशिर्वाद दिला होता. आणि आपल्या सुधारकातून ह्या बातमीला प्रसिद्धी दिली होती. इ.स. १८९३ ला धोंडो केशव यांनी गोदुबाई जोशी यांच्याशी पुर्नविवाह केला तेव्हा आगरकरांनी अभिनंदन केले होते. त्यांनी आंतर्जातीय विवाहालाही प्रोत्साहन दिले होते. आगरकरांची मामेबहिण वेणूताई बाल विधवा झाली तेव्हा सर्वांचा विरोध मोडून त्यांनी तिला शाळेत घातले. शिक्षणानंतर आर्थिकदृष्ट्या स्वतंत्र

व्हावी म्हणून नोकरी मिळवून दिली व तिचा पुर्नविवाह घडवून आणला होता. स्वतःची आई इ.स. १८९० मध्ये वारली तेव्हा "क्षौरविधी" करण्यास नकार दिला होता.[११०] त्यांना काही धार्मिक विधी अवडंबर वाटत होते. या संबंधात २५ नोव्हेंबर १८९० मध्ये आपल्या मामांना पत्रात लिहिले की, "सुधारक पत्राच्या संपादकाने क्षौरापुढे मान तुकविणे ही लाजीरवाणी गोष्ट होईल".[१११] त्यांनी समाज सुधारणा करतांना कृतीशीलतेवर भर दिलेला होता. सुधारकांनीच स्वतःपासून सुधारणा केली नाहीतर त्या सुधारणेला अर्थ राहणार नाही असे त्यांचे मत होते. बालविवाहविरुद्ध बोलणाऱ्या पण प्रत्यक्षात आपल्या मुलामुलींचे विवाह लहान वयातच करण्याचा बोलक्या सुधारकाबद्दल आगरकर खरपसून समाचार घेत. दाजीसाहेब नगरकर यांनी १०-११ वर्षाच्या मुलाचे लग्न पाच वर्षाच्या मुलीशी केले होते तेव्हा केसरीत २७.९.१८८७ ला "इष्वृत्त" या सदरातून टिका केली होती.[११२]

मनुष्याच्या मृत्यूनंतरचे प्रेतसंस्काराचे विधी त्यांना वाष्कळ, औपचारिक वाटत होते. स्वतःच्या आईच्या मृत्यूनंतर त्यांनी "क्षौरविधी" करणे नाकारून सुधारकामध्ये "ब्राह्मण्याचा मुर्खपणा अथवा आमचे प्रेतसंस्कार"[११३] हा लेख लिहून धार्मिक अवडंबराचे वाभाडे काढले होते. त्याचा निरर्थकपणा उघड केला होता. पुर्नविवाहाचा प्रचार व्हावा या हेतूने आगरकरांनी सुधारकात " न कर्त्याचा वार शनवार"[११४] हा लेख लिहिला होता. यात पुर्नविवाहाचा विरोध करणाऱ्यांना त्यांनी खडसावले. चांगल्या गोष्टीची प्रथा प्रचलीत करण्यावर त्यांनी भर दिला होता. पुर्नविवाहामुळे विधवा स्त्रीला समाजात प्रतिष्ठा मिळेल. तिच्या मनातील हीनत्वाची भावना कमी होऊन नैतिक आचरणाचा मार्ग मोकळा होईल. भ्रुण हत्येसारख्या घटना घडणार नाही. पण ह्या पुर्नविवाह प्रथेला प्रतिष्ठा व लोकप्रियता प्राप्त होण्यासाठी कायदा व लोकमताची गरज आगरकरांना वाटत होती.

म्हणून ते आपल्या वृत्तपत्रातून पुर्नविवाह विधवाविवाहाला प्रसिध्दी देत व प्रोत्साहन देत. या लेखात ते पुढे लिहितात की, "पुर्नविवाहाचा एक प्रचार पाडतांना त्यातल्या त्यात जातिभेद मोडावा, हिन्दुधर्मशास्त्रातील वेडगळ विवाह पध्दतीत झुगारुन द्यावे ..... जातिभेद, विवाहविधी, गणमैत्री वगैरे प्रकार ईश्वरकृत नसून मनुष्याच्या अज्ञानापासून झालेले आहेत". अशा रितीने अंधश्रध्देला बळी न पडता वास्तविक जीवनाकडे समाजाला प्रवाहित करण्याचा प्रयत्न त्यांनी आपल्या लेखांध्दारे केला आहे.

त्या काळात लहानपणीच विवाह होत असल्यामुळे मुले मुली मोठे झाल्यानंतर त्यांच्या आचारविचारात, दिसण्यात आणि बौध्दिक तफावत असली तरी ते विवाह आईवडिलांनी, वडिलधारी मंडळींनी लावून दिल्यामुळे ते मान्य नसले तरी तसेच जन्मभर पिचत, कुंचबनेत सर्व आयुष्य स्त्रीला घालवावे लागे. या विषयावरही आगरकरांनी सुधारकात लेख लिहिले. घटस्फोट मिळविणे हा स्त्रियांचा हक्क आहे. स्त्रीला जर विजोड नव-याशी राहण्याची इच्छा नसेल तर कायद्याने तिला स्वतंत्र राहण्याचा अधिकार द्यावा असा आगरकरांचा आग्रह होता. इ.स. १८८५-८८ च्या दरम्यान "दादाजी विरुध्द रखमाबाई"[११५] हे घटस्फोटाचे प्रकरण गाजले होते. त्यावेळी आगरकरांनी स्त्री स्वातंत्र्याचा पक्ष घेऊन रखमाबाईचे समर्थन केले तर टिळकांनी सनातन्यांचा पक्ष उचलून धरला होता. रखमाबाईने बालपणी झालेले लग्न अयोग्य व्यक्तिशी झाले आहे हे स्पष्ट सांगून त्यांनी पती दादाजी भिकाजीकडे जाण्यास नकार दिला. तत्कालीन कायद्याप्रमाणे विवाहित स्त्रीने पतीकडे न गेल्यास तुरुंगवास होत असे. दादाजीने पत्नीचा ताबा मिळावा म्हणून अर्ज भरला. सुरवातीला न्यायालयाने रखमाबाईच्या बाजूने निकाल देताच तेव्हाची वृत्तपत्र 'Times of India, Bombay Gaze of Induprakash' सुबोध पत्रिका इ. वृत्तपत्रांनी या निर्णयाची दखल घेऊन दादाजींची बाजू घेऊन या प्रकरणाला प्रसिध्दी दिली. तेव्हा ख्रिश्चन

मिशनरी, मलबारी, रानडे, आगरकर यांनी रखमाची बाजू घेतली. सुधारकातील आगरकरांना ह्या प्रकरणावर उघडपणे लिहिता आले नाही पण केसरी सोडल्यानंतर सुधारकात रखमाची बाजू मांडली. त्यांनी "विवाह निराकरण अथवा घटस्फोट"[११६] या लेखात बालविवाहाच्या दुःष्परिणामातून सोडविण्याचा मार्ग म्हणून घटस्फोट घेणे गैर नाही. स्त्रीला जर तिच्या पतीबरोबर राहणे अशक्य वाटत असेल तर तिने घटस्फोट मागण्याचा प्रयत्न केला तर मानवतेच्या दृष्टिकोनातून विचार करून तिला घटस्फोट मिळाला तर ते सामाजिकदृष्टया फारसे वावगे नाही असे प्रतिपादन केले आहे तर "घटस्फोट अथवा काडीमोड"[११७] या लेखात स्वयंवर, प्रौढविवाह त्याप्रमाणे मुला-मुलींच्या विवाहाची मर्यादा वाढल्यास घटस्फोट घेण्यासारख्या घटना मागे पडतील, बालविवाहामुळे घटस्फोट घेण्याची पाळी स्त्री-पुरूषांवर येत आहे. स्त्रियांना समाजात एक व्यक्ती म्हणून जीवन जगण्यात प्राधान्य दिले तर काही अपप्रवृत्तींना आळा बसेल असे त्यांना वाटत होते. "सभ्यपणाची मर्यादा न सोडता, समाजाच्या हितास्तव ज्याला जी गोष्ट बरी वाटेल ती त्याने उघडपणे बोलून दाखविणे यातच समाजाचे कल्याण आहे". असे आपले विचार मांडले. स्त्रियांची बाजू योग्य वाटली तर आगरकर समाजाचा विरोध सहन करून त्यांचे समर्थन करीत असत. रखमाबाईच्या प्रकरणात त्यांची बाजू मांडली होती. आगरकरांनी स्त्रियांचे दुःख कमी होण्याचे मार्ग जे सांगितले त्याचा प्रचार ते आपल्या वृत्तपत्रातून करीत असत. स्त्रियांच्या यातनांचा अंत मृत्यू नव्हे तर स्त्रीने स्वतः समाजात निर्भयपणे जगण्यासाठी शिक्षणाच्या माध्यमातून आला विकास घडवून जे त्याज्य असेल, असहनिय असेल त्याचा विरोध करावा आणि स्वतः जे भविष्य उज्वल करण्यासाठी त्यांनी पुर्नविवाह घटस्फोटाचा, आर्थिक स्वावलंबाचा अवलंब करावा असे सांगितले. पुरूष जर पत्नीच्या मृत्यूनंतर लग्न करू शकतो तर स्त्रीयांनी का करू नये असा सवाल समाजाला केला होता. मानवतावादी दृष्टिकोनातून स्त्रियांकडे पाहण्याचा दृष्टिकोन समाजाने अमलांत आणावा असे त्यांना वाटत होते.

आगरकर आपल्या समाजातील स्त्रियांना स्वावलंबी होण्यास बालविधवांना दुसरा मार्ग सांगतात. पती वारला म्हणून मेंढ्रपणाने सती जाण्यापेक्षा किंवा विधवेचे असह्य शुद्र जीवन जगण्यापेक्षा शिक्षण घेऊन आपल्या पायावर उभे राहण्याचा, सल्ला देतात. तरच त्यांचे जीवन सुखकर होवू शकेल असे त्यांना वाटत होते. ते सुधारकात "स्त्रियांस परितार्थ-संपादक शिक्षण देण्याची आवश्यकता."[१२०] या लेखामध्ये लिहितात की, "ब्राम्हण, शेणवी, परभू या जातीतील सुखवस्तू घराण्यातल्या स्त्रियांस विद्यानंदात काळ घालविण्यास शिकविण्याचा परिपाठ पडेल व गरीब लोकांच्या मुलींस थोडेबहुत लिहिणे वाचणे शिकवून, त्याबरोबरच एखाद्या धंद्याचे ज्ञान करून देण्यात येवू लागेल, तर नव-याच्या मृत्यूवार्ते बरोबर आपोआप मरणारी किंवा मारून घेणारी स्त्री दिसेनाशी होईल, इतकेच नाहीतर ज्यांच्या वर दुर्दैवाने तो दुःखाचा डोंगर कोसळेल, त्या हळूहळू त्याचा भार विसरू लागून आपले, आपल्या मुलाबाळांचे व इतरांचे अस्तित्व होईल तितके सुखावह करण्यास इच्छू लागतील", आगरकरांनी स्त्री जीवनाचा सखोल विचार करून त्यांचे जीवन जास्तीत जास्त कशाप्रकारे सुखावह होईल या दृष्टीने स्त्री समाजसुधारणेकडे लक्ष दिले होते.

आगरकरांनी स्त्री पुरूषांचा पेहरावांचा विषयही आपल्या लेखनात अंतर्भूत केला होता, "आम्हा पुरूषांचा पेहराव."[१२१] या विषयावर सहा लेख लिहिलेत त्यांच्या या लेखनातून त्यांना पोषाख हे कालानुरत्वे बदलत असताना त्याचा बाऊ करण्याचे कारण नाही, पण तत्कालीन रूढीप्रिय समाजातून लहानसहान गोष्टीसाठी होणारा विरोध पाहून विचार संघर्षाला योग्य चालना देण्यासाठी हा विषय घेतला होता. पेहरावाचा मुख्य उद्देश "उपयुक्तता व दर्शनता असला पाहिजे हा मुद्दा मांडतांना ते म्हणतात" "युरोपात विशेषतः इग्लंडात थंडी फार व येथे उन्हाळा फार तेव्हा थंडीचे निवारण होण्यासारखे तळव्यापासून कमरेपर्यंत अंगास चिकटून बसणारे वस्त्र वापरणे तिकडील लोकांस अवश्य झाले व इकडील लोकांस उकाड्याचा त्रास न

होण्यासारखे व अंगास वारा लावण्यासारखे सुटे वस्त्र घेण्याची आवश्यकता पडली. युरोपियन व नेटिव लोकांच्या एकंदर पेहरावात जो भेद दिसतो त्याचे सामान्यपणे मुख्य कारण हेच आहे."[१२२] आगरकर आधुनिक विचारसरणीचे असले तरी त्यांना अंधानुकरण मुळीच मान्य नव्हते. एखादी गोष्ट केवळ पुरोगामी, आधुनिक आहे म्हणून तिचा अंगिकार करावा असे त्यांनी मुळीच म्हटले नव्हते तर त्या गोष्टीचा कार्यकारणभाव आणि उपयोगिता लक्षात घेऊनच ती गोष्ट स्विकारण्याकडे त्यांचा कल होता.

याचप्रमाणे आगरकरांनी स्त्रियांच्या पोषाखाबद्दलही लेख लिहिले आहेत "आमच्या स्त्रियांचा पेहराव"[१२३] या शिर्षकाखाली दोन लेख लिहिले आहेत. "उपयुक्ततेच्या दृष्टीने पाहता निरनिराळ्या धंद्यातील स्त्रियांचे पोषाख निरनिराळ्या त-हेचे पाहिजे आहेत, ही गोष्ट आजपर्यंत कोणाच्याही लक्षात आली नाही असे वाटते. भंगीण सुतारीण, कासारीण कुंभारीण परटीण, शेतकरीण, स्वयंपाकीण, दळणीन, कांडपीण, गौळण, भटीण सांराशा ई.प्रत्ययांत पाहिजे ती धंदेवालीण घ्या, "लुगडीचोळीण" हा सा-यांचा, सा-या स्तुलता व सार्वकालिक पोषाख ..... पोषाख असा असावा की जो घातला असता कोणतेही काम करतांना हस्तपादादि अवयवांचे चलनादि व्यापार सहज होवून, शरीरास कोणत्याही प्रकारचे कष्ट होऊ नयेत, किंवा त्यात वैरूप्यता दिसू नये"..... कोणताही पोषाख असा असावा की तो ताब्यात असावा..... ऊन-पाऊस यापासून संरक्षण करण्याचा जो सामान्य उपाय आहे तो आम्ही स्त्रियांस करू देत नाही ही मोठ्या शरमेची गोष्ट होय,..... सर्व स्त्रियांना चोळी न घालता घरच्या घरी तयार केलेले प्रत्यक्ष हाफ जाकीट घालण्यास काय हरकत आहे. जाकीटे घालण्याचा प्रघात पडल्यावर पदर काढण्याची मुळीच गरज पडणार नाही..... चोळीच्या ऐवजी ही जाकीटे घालण्याची पद्धत पाडिली असता, पदर सावरण्याचे काम वारंवार हातांनी न करावे लागल्यामुळे, ते मोकळे राहून स्त्रियांच्या अंगी कार्यक्षमता अधिक येईल..... थंडीत घराबाहेर

पडतांना जोडे वापरण्यास आणि थंडीत प्रवास करावयाचा असल्यास त्यांनी हातमोजे पायमोजे घालण्यास आणि घोड्यावर बसावयाचे असल्यास मऊ कातड्याचे बूट घालण्यास काय हरकत आहे ?" असा प्रश्न सुशिक्षित समाजाला विचारण्याचे धाडस आगरकरांनी केले होते. अशाच प्रकारच्या पुरोगामी विचारसरणीचे व्यक्तित्व आधुनिक असेल असा गैरसमज आगरकरांबद्दल वाचकांमध्ये झालेला होता. त्यांना पाहण्याकरीता एकदा एक गृहस्थ फर्ग्युसन कॉलेज जवळील राहत्या बंगल्यात आले असता आगरकर "धाबळीची बाराबंदी घातलेला, पंचा नेसलेला, दुस-या पंच्याने टापशी बांधलेला आणि चिलीम ओढीत बसलेला एक मध्यम वयाचा गृहस्थ आगरकरच आहेत यावर त्या गृहस्थाचा विश्वासच बसलेला नव्हता". स्त्रियांनी जाकिटे घातली पाहिजेत, असे प्रतिपादणारे सुधारकाचे संपादक आगरकर इतक्या साध्या राहणीचे असतील ही मला कल्पनाच नव्हती".[१२४] असे उद्गार त्या गृहस्थाने काढले होते.

आगरकरांनी सार्वजनिक स्तरावर होणा-या हिन्दूसणांचे विश्लेषण करतांना "पांच जन्याचा हंगाम"[१२५] या लेखात शिमग्याचा सण आम्हास जितका तिरस्करणीय व त्याज्य वाटतो तितकाच दिवाळीचा सण अभिनंदनीय व रक्षणीय वाटतो..... अभ्यंगस्नाने, सुग्रासभक्षण, लक्ष्मीपूजन, जमाखर्चाचा आढावा, देण्याघेण्याचा निकाल, सौम्य व सुखदायक खेळ, दीपोत्सव व दारूकाम, बहिणभावंडाच्या भेटी आणि ओवाळ्या वगैरे गोष्टी कोणत्याही प्रकारे लाजिरवाण्या नसून त्यामुळे आमच्या सांसारिक वृत्तीची व कुटुंब पध्दतीची रम्य बाजू प्रगट होते".

आपल्या सामाजिक परंपरेतील चांगल्या रूढींचे अवलंबन करण्यास ते प्रोत्साहन देत असत पण काही परंपरांना बिभत्स स्वरूप प्राप्त झाले असता त्याचा विरोध करीत. संमतीवयाचा कायदा पास झाल्यानंतर

पंडिता रमाबाई, काशीबाई कानिटकर यांनी एका स्त्रियांची सभा भरवून सरकारचे अभिनंदन केले होते. तसेच आगरकर भांडारकर, रानडे या सुधारकांनी क्रीडाभुवनात सभा भरवून कायद्याचे स्वागत करीत असता टिळक तेथे हजर होते. त्यांच्या उपस्थितीत सुधारक मंडळीवर दगडविटांचा वर्षाव झाला होता. याच वेळात होळीचा सण आल्याने सनातनी धर्माभिमानी लोकांनी आगरकरांचे नकली प्रेत तयार करून सुधारक मंडळीच्या दारावरून नेले. "दुनियेतले सुधारक मेले" अशा घोषणा देत प्रेतयात्रा काढली होती. सुधारक व इंदुप्रकाश या वृत्तपत्रावर त्यांचा रोष होता. याशिवाय पुण्यातच संमतीकायद्याचे दुःष्परिणाम दाखविणारे तमाशे अनेक पेठातून झाल्याची साक्ष तत्कालीन वृत्तपत्रे देतात".[१२६]

त्याचकाळात तसाच प्रकार थोड्याफार फरकाने पंचहौद प्रकरणाबाबत घडले. ४ ऑक्टोबर १८९० मध्ये "पंचहौद मिशन" या ख्रिस्ती संस्थेत एक समारंभ झाला, त्यात रानडे उपस्थित होते. या समारंभात चहापानाचा कार्यक्रम झाला. रानड्यांनी स्वतः व्यक्तीशः चहा घेतला नव्हता पण तरीही ग्रामण्याचा आरोप ठेवून शंकराचार्यांकडे प्रकरण गेले, गरज नसतांना रानड्यांनी कुटुंब व मित्रासाठी प्रायश्चित घेतले होते. याबाबत आगरकरांनी रानड्यांची बाजू घेतली होती. त्या संदर्भात त्यांनी "ग्रामण्या प्रकरण" व "इति श्रीचहा ग्रामण्य प्रकरण" समाप्तम्".[१२७] हे लेख लिहिले. त्यात ते म्हणतात "चहाच्या प्रकरणात जर एक अनिष्ट प्रकार झाला नसता तर त्यात एकंदरीत खेदकारक असे काहीच नव्हते तो अनिष्ट प्रकार म्हटला म्हणजे चहा घ्यालेली किंवा तेथे गेलेली मंडळी व ख्रिस्ती मिशनरी यांची याकामी एक जुट आहे असा जो कित्येकांचा गैरसमज झाला आहे तो होय. तेथे जाण्यात मंडळीचा असा मुळीच उद्देश नव्हता. हे आम्हांस तर प्रथमपासून माहित आहे. झालेल्या चौकशीत ही गोष्ट चांगली सिध्द होवून ठरावातही तसा स्पष्ट उल्लेख झाला आहे हे चांगले आहे" या प्रकरणाला प्रसिध्दी देणाऱ्यांनी रानडे ख्रिस्तीधर्माला प्रोत्साहन

देतात असा आरोप केला होता, त्यावर आगरकरांनी उत्तर दिले की, "या चहा प्रकरणात गुंतलेल्या बहुतेक लोकांची आम्हांस जी माहिती आहे, त्यावरून पाहता ख्रिस्तीधर्मास साहयभूत होण्याची कल्पना त्यांच्या नुसती स्वप्नीहि कधी आली नसेल असे आम्ही खात्रीपूर्वक सांगतो..... ब्राम्हणेतरांच्या हातचा चहा पिण्यात आम्हांस दोष वाटत नाही. इतकेच नाही तर आमच्या नीच मानलेल्या महारांची स्थिती सुधारून त्यांची व वेदशास्त्रसंपन्न ब्राम्हणांची एक पंगत झालेली जर आम्हांस पाहता येती, तर आम्ही स्वतःस मोठे कृतार्थ मानले असते. आमच्यातील जातिभेद नाहिसा व्हावा अशी जरी आमची मनापासून इच्छा असली तथापि ख्रिस्ती लोकांशी कारणावाचून मुद्दाम आम्ही संसर्ग का ठेवावा हे आम्हांस कळत नाही". हा टोला आगरकरांनी ज्यो. फुलेनाही मारला होता. शेवटी धर्माभिमान्यांना सांगितले की, "सुधारकांस जातीतून हुसकून टाकावे म्हणजे त्यांची पिडा टळेल असा जर ही ग्रामण्ये काढण्यात तुमचा हेतु असेल तर तो सफळ होणार नाही, ही तुम्ही खूण बांधून ठेवा. सुधारकांचे प्रयत्न केवळ त्यांच्या सुखापुरते असते तर तुम्हापासून वेगळे होण्यास तुमच्या ग्रामण्याची वाटच पाहिली नसती". आगरकरांनी सुधारकांच्या ध्येयाचे दर्शन लोकांना या लेखांमधून करून देण्याचा प्रयत्न केला होता. रानडे आगरकरांचे मार्गदर्शक, गुरुस्थानी असल्याने आगरकरांनी रानड्यांच्या सामाजिक कार्याची दखल सतत घेतली होती. पुण्यात रानड्यांच्या प्रोत्साहनाने स्थापन झालेल्या प्रार्थना समाजाबद्दल तत्कालीन समाजातील आधुनिक सुशिक्षित लोकांनी टिंगलटवाळी करण्याचा प्रयत्न केला होता तेव्हा आगरकरांनी खडसावतांना केसरीच्या १७ एप्रिल १८८३ च्या अंकात लिहिले की, "थट्टाच करावयाची म्हणजे पाहिजे त्या धर्माची करता येईल. रामनवमीच्या दिवशी येथील तुळशीबागेत जो थाट उडतो त्यावर पाहिजे तर हास्यरसप्रधान एक ग्रंथ ही करता येईल. धर्मासंबंधी पत्र लिहिणाऱ्यांनी हे नीट लक्षात ठेवावे की, कोणत्याही धर्माची केवळ

कुटाळकी करणाऱ्याच्या बुध्दीने आमच्याकडे धाडिलेल्या लेखांस आम्ही केराची टोपली दाखवू किंवा त्याच्या चिंध्या करून त्यास वातावरणात भ्रमण करावयास लावू."[१२८] यावरून आगरकर आस्तिक प्रवृत्तीचे नसले तरी त्यांना अविचाराने धर्म, समाज, राष्ट्राबद्दल बोलणाऱ्यांबद्दल विशेष दखल न घेता त्यांना वास्तवाची जाण करून देत असत. हिन्दुत्व त्यांच्या नसानसात मुरलेले होते. राष्ट्रधर्माला ते जास्त महत्व देत असत. १८७३ मध्ये रानड्यांनी रमाबाईशी पुर्नविवाह केला तेव्हा त्या ग्रामण्य प्रकरणाबरोबर त्यांच्यावर बरेच आक्षेप घेण्यात आले होते. तेव्हा आगरकरांनी "बोलल्याप्रमाणे वागणे हे एखाद्या ल्यूथरच्या किंवा बुध्दाच्या हातूनच घडते. माधवराव ल्यूथर किंवा बुध्द नाहीत.... ज्यांना कोणत्याही कारणामुळे पुढारीपण आले आहे त्यांच्या भाषणात व वर्तनात बराच मेळ असला पाहिजे; हे उघड आहे. सुधारकाच्या दृष्टीने त्याप्रसंगी माधवरावजींचे वर्तन या इयत्तेत उतरले नाही."[१२९] रानड्यांच्याबद्दल त्या कार्याचे समाजाच्या दृष्टीने महत्व आदर्श स्वरूपाचे असल्याने त्याची प्रत्येक कृती बोलक्या व कर्त्या सुधारकाची असावी असे आगरकरांना वाटत होते. समाजपुढाऱ्याचे चुकले असता त्याची जाणीव करून देण्यास मागेपुढे पाहिले नाही.

आगरकरांनी समाजाचा विचार करतांना सामाजिक विषमतेबद्दल जातिभेद, अस्पृश्यता, उच्चनीच याबाबत आपले विचार मांडण्यास इ.स.१८९३ मध्ये सुधारकातून सुरुवात केली होती. जातिभेद बुध्दीला न पटणारे आणि माणुसकीला न शोभणारे सामाजिक कृत्य आहे. असे त्यांना वाटत होते.जातिभेद निर्माण होण्यामागची कारणपरंपराही त्यांनी चिकित्सक बुध्दिने शोधली आणि ती कशी अयोग्य व अशास्त्रीय आहे हेही स्पष्ट केले". ब्रम्हाच्या मुखातून ब्राम्हणांची उत्पत्ती झाली आणि पायापासून शुद्र निर्माण झाले आणि ब्राम्हण हा श्रेष्ठ आणि अस्पृश्य हा कनिष्ठ असा धर्मकल्पनांनी निष्कर्ष काढला आहे या कल्पनेतच शेकडो वर्षे वावरल्यामुळे ते सर्व परंपरेने पाळलेच पाहिजेत अशी समाजमनाची घट्ट

खात्री झाली आणि मग जातिभेद पाळणे हाच धर्म आहे असे मानले जावू लागले.[130] असे धर्माधिष्ठीत लोकांनी समाजावर लादून जातीभेद पाळणे हा एक कुसंस्कार बनविला व मनुष्या मनुष्यामध्ये भेद निर्माण करून सामाजिक जीवनात विषमता निर्माण केली याचे विश्लेषण केले आहे. आगरकरांनी जातिव्यवस्थेवर टीका करतांना मनुष्यजन्माच्या मूळ स्वरूपाचा विचार केलेला आहे. मानव जन्म घेतांना अधिकार, हक्क, कर्तव्य हे सारख्याच प्रमाणात मिळवित असतो. पण आपल्या कर्तृत्वाने, योग्यतेने आपल्या कमी अधिक बुद्धिविकासाने, उद्योगशिलतेने हक्क व अधिकार मिळवित असतो. धर्माने दिलेल्या जन्माधिष्ठित जातिव्यवस्थेमुळे व्यक्ती विकास खुंटलेला आहे. जातीमुळे आपला देशाभिमान संकुचित झाला आहे. ज्ञान, शास्त्र, कला कुंठलेल्या आहेत. हिन्दु धर्मातील वेडगळ समजूती अनीष्ठ प्रथा, अंधविश्वास, सोवळे ओवळे, जातिभेदामुळे माणसामाणसातील संबंधामध्ये एक प्रकारची दरी निर्माण होऊन समाज दुभंगला आहे, हे जातिभेदाचे दुभंगलेपण जोपर्यंत नष्ट होत नाही, तोपर्यंत देशात राष्ट्रीयता देशप्रेम ही भावना खऱ्या अर्थाने रूजू शकत नाही अशी स्पष्ट जाणीव लोकांना करून दिली होती. या संदर्भात त्यांनी "म्युनिसिपालिटीचा हौद व ब्राम्हण्यावर गदा, शहाणे असाल तर आमचे ऐका, आणखी एक मुद्दा, सुधारकाची वेगळी जात कां करीत नाही" इ. लेख लिहून जातिभेद, ब्राम्हण ब्राम्हणेत्तर भेदभाव समाजाला कसा पोखरून काढत आहे याचे दारूण चित्र आपल्या लेखनातून प्रगट केले होते. जातिभेदामुळे आपल्या सामाजिक प्रगतीच्या मार्गात अडथळे निर्माण होतात. आज जातिसंस्थेची उपयुक्तता संपलेली आहे व तिचे नष्ट होणे आवश्यक झाले आहे. जातिसंस्थेमुळे दैनंदिन व्यवहारात जातिनिर्बंध, सोवळेओवळे यांचे अवास्तव स्तोम माजल्याने समाजात सलोख्याची भावना निर्माण होणे कठीण झाले आहे. परदेशागमन निषिद्ध झाल्याने देशादेशातील आर्थिक व सांस्कृतिक विचार-विनिमय होणे अशक्य झाले आहे. ते आपला मुद्दा

स्पष्ट करतांना म्हणतात की, "आज ज्या आम्ही अनेक आपत्ती भोगीत आहो, त्यापैकी ज्यांचे जनन आमच्या जातिभेदापासून झाले नाही असे म्हणता येणार आहे, अशा फारच थोड्या असतील". कोणताही समाज, घेतला तरी त्यात एकजिणसीपणा क्वचीच असत नाही. जातिसंस्थेला धर्माचे अधिष्ठान असले तरी या जातिसंस्थेतील भेदभावाचे पोषण करून सामाजिक व्यवहाराचे क्षेत्र संकुचित करणारी तथाकथित धर्मकल्पना आगरकरांना मुळातच हिणकस वाटते. चातुर्वर्ण्याला दैवी अधिष्ठान प्राप्त करून देवून जातिभेद हे ईश्वरकृत आहे. ब्राम्हण, क्षत्रिय, वैश्य, शुद्र या चार वर्णांची उत्पत्ती विराट पुरूषाचे तोंड, हात, मांड्या व पाय यापासून झाला आहे असे समजणे अंधश्रध्देचे द्योतक आहे. त्याप्रमाणे वर्णव्यवस्था हे ब्राम्हणाच्या कपटनितीचे फळ आहे असे म्हणणेही विपर्यासाचे होईल. "जातिव्यवस्थेमुळे जे नुकसान होत आहे, आमचे जे आजपर्यंत जे नुकसान झाले आहे हे आम्ही जाणून आहो व तो उत्तरोत्तर क्षीण होत गेला पाहिजे असे कबूल करण्यास आम्ही तयार आहो".[१३१] असे सांगून जातिव्यवस्था कालानुरत्वे बदलली पाहिजे असे मत त्यांनी मांडले होते.

"पाहाणे असाल तर आमचे ऐकाल".[१३२] या लेखात आगरकरांनी पुण्याच्या म्युनिसीपालिटीच्या नियंत्रणातील सार्वजनिक हौदावर पाणी भरण्यासाठी ब्राम्हण-शुद्रामध्ये जो तंटा निर्माण झाला होता, त्यासंबंधी व्यापक दृष्टिकोनातून निरीक्षण करून ब्राम्हणवर्गास त्यांनी इशारा दिला की, "कालाचा ओघ मनात आणून त्यानुसार आपल्या आचारविचारात बदल करण्यास तयार व्हा. कालप्रवाहाला विरोध करण्यास आठमुठेपणाने, भवितव्यतेशी टक्कर देण्यात काही हशिल नाही". "जरी ब्राम्हण झाला भ्रष्ट। तरी तो तिही लोकी श्रेष्ठ।" ही रूढ समजून खरी मानून ब्राम्हणांचे वर्चस्व यापुढे सहन केले जाणार नाही. कोण कुणाच्या

पोटी जन्मास आला याला वास्तविक काही महत्व नाही. उच्चनिच्चतेच्या जुनाट कल्पना मागे पडत चालल्या आहेत. बुध्दिबलाने व स्वकर्तुत्वाने जो पुढे सरेल तोच सध्याच्या काळात श्रेष्ठ ठरेल". धर्मरक्षणाचे नांव पुढे करुन उच्चवर्णीय लोक आपले महत्व वाढविण्याचा प्रयत्न करीत असतील तर हा त्यांचा शुध्द वेडेपणा आहे आणि त्यासाठी नगरपालिकेने लक्ष घालू नये. स्पृश्या-स्पृश्य, जातिभेद ह्या गोष्टी शतकानुशतके जोपासत आल्याने समाजावर आपले सर्वस्व राहावे हा विचार करणे अयोग्य आहे हे स्पष्ट करुन ब्रिटिश साम्राज्यात मिळालेल्या शिक्षणामुळे शूद्र समाजात या मानवताहिन वागणुकीमुळे असंतोष निर्माण होवू लागला आहे. परंतु या वर्गात अद्याप विद्येचा विशेष प्रसार झाला नसल्यामुळे त्याचे पूर्ण स्वरुप अजून भासू लागले नाही. विद्येचा जसजसा अधिक प्रसार होत जाईल, तसतसे शुद्रादि वर्गात हल्लीचे वैषम्य अधिकाधिक टोचू लागून ते नाहिसे करण्यात ते जारीने प्रयत्न केल्यावाचून राहणार नाहीत" असे भवितव्य बुध्दिवादी दृष्टिकोनातून द्रष्टेपणाने विवेचन आगरकरांनी केले होते. त्यांनी हिन्दुधर्मातील अनिष्ठ रुढी परंपरेवर अनेक हल्ले केले असले तरी त्यांचा मुळ हेतू हिन्दूधर्म आणि "आर्यत्व" कायम टिकविण्याचा होता. मुळ हिन्दुधर्म त्यांना मान्य होता. त्याच्या अवडंबराचे त्यांना वावडे होते. त्यांनी मानवतावादी दृष्टीने समाजातील सर्व स्तरातील जनतेचा विचार केला होता. समाजातील व्यक्ती सर्व समान आहेत. जातीमुळे मनुष्याला विशिष्ट गुण प्राप्त होतात असे त्यांना कधीच वाटले नव्हते. कर्तुत्वाच्या बळावरच मनुष्य समाजात श्रेष्ठ कनिष्ठ स्थान प्राप्त करतो असे त्यांचे मत होते.

आगरकरांचे अस्पृश्यतेसंबंधी विचार मानवतावादी आहेत. अस्पृश्यतेला त्यांनी हिन्दू धर्मातील निर्दयी परंपरा म्हटले आहे. धर्मश्रध्दा ही नेहमीच सात्विक आणि विवेकशील असते, असे नाहीतर ती तामसी

आणि पाषाणहृदयी बनते याचे उत्तम उदाहरण म्हणून अस्पृश्यता म्हणता येईल. सामाजिक विषमतेवर आधारीत या समाजविघातक परंपरेच्या आचारांवर आगरकरांनी परखडपणे टिका केली आहे. "सोवळ्यांची मिमांसा", "सोवळ्या ओवळ्याची पुरवणी"[१३३] या लेखात दैनंदिन जीवनात समाजातील सर्व घटकांचा संबंध आवश्यक असतांना त्यांना केवळ हलक्या प्रकारची कामे करतात म्हणून मनुष्यहिनतेची वागणूक देणे हे मानवी विवेकहिनतेचे लक्षण मानतात, यामुळे अकारण कष्टकरी समाज पिढ्यानपिढ्या पिळले जात आहे, अपमानित केले जात आहे. सुशिक्षित समाजाकडून अशा प्रकारची वागणूक ही लाजीरवाणी गोष्ट वाटत असतांनाही तिचा त्याग करण्याऐवजी धर्माचा एक भाग म्हणून अंगिकार केल्याचे विचित्र दृष्य पाहून आगरकरांनी उपहासात्मक टिंगल केली आहे, "जे कोणी या सोवळ्या ओवळ्याच्या प्रश्नात आपले मन नीटपणे घालतील त्यांना या अडचणीमुळे आमच्या देशाचारात प्रचंड विचारशून्यता ओतप्रोत भरून चालली आहे असे कबूल केल्याशिवाय राहवणार नाही.... लसून कांदा वगैरे पदार्थांस अत्यंत निषिध्द मानणाऱ्या शुचिर्भूत ब्राम्हणांनी हिंग, साबूदाणा, साखर, मीठ वगैरे पदार्थ तयार होवून वाण्याच्या दुकानात येवून पडेतोपर्यंत त्यांचा किती अमंगल पदार्थांशी संयोग घडत असतो हे ठाऊक असूनही मोठमोठ्या, उपवासांत व श्राध्दपक्षात त्यांचा बिनदिक्कत उपयोग करावा, हे केवढे आश्चर्य आहे ! ततेच मुलींच्या भावल्या, डोकीस घालण्याच्या पगड्या, जिने, खोगरे, खळ पुस्तके जोडे वगैरे नित्य वापरण्याच्या वस्तु कोण तयार करितो. त्यांचे घटक काय आहेत व त्यामुळे सोवळ्याओवळ्याची केवढी हानी होत आहे याचा एक दिवस तरी कोणी नीट विचार केला आहे काय ?... ढोर, भंगी, महार, धेड व चांभार यांनी आपआपले धंदे काही वेळ न करण्याचा कट केला तर स्वतःस उच्च मानून घेणाऱ्यांची काय अवस्था होईल ? सारे उच्चनिचत्व एकीकडे ठेवून प्रत्येक कुटुंबाला आपल्या घरातील घाण कधीतरी काढावी लागणार नाही काय ? वासरु किंवा रेडकू मेले असता तें आपण होऊन गावाबाहेर ओढून टाकावे लागणार नाही काय असा सवाल करुन

वास्तवतेची जाणीव करून देवून पुढे लिहितात की, "समाजाच्या विलक्षण राहाटीमुळे उच्चनिचत्व अस्तित्वात येवून तदनुसार जो व्यवसाय विभाग सर्वजगत्याग झाला आहे, त्यास ईश्वरकृत वसनातन मानून उच्च वर्गात जन्मास आलेल्या लोकांनी नीच वर्गात जन्मास आलेल्या लोकांस अपवित्र व अस्पृश्य मानावो, याहून मनुष्याच्या विचारोपणास लांछनास्पद अशी दुसरी गोष्ट नाही". अशा प्रकारे समाजजीवनातील वास्तविकतेचे चित्रण करून समाजाला विचार करण्यास भाग पाडले.

आगरकरांचे समकालीन ज्यो. फुले यांनी जातिभेद उच्चनिचता विरुद्ध बहुजन समाजाला जागृत करण्याचा प्रयत्न केला. तेव्हा सुरवातीला त्यांच्या कार्याचे आगरकरांनी अभिनंदन केले होते. पण त्यांच्या सामाजिक विचारसरणीची कटुता ख्रिस्ती लोकांच्या प्रोत्साहनाने वाढत आहे, असे दिसताच आगरकरांनी आक्षेप घेवून त्यांच्या विचाराला लागलेल्या समाज-विमुख दिशेबद्दल खेद व्यक्त करून त्यांनी पुढारी लोकांना देशकार्य करतांना जागृत राहण्याचा इशारा दिला. समाजात या वेगळ्या विचाराने देशप्रेमाची भावना लोकामधून कमी होवून जातिभिमानाची भावना वाढेल व त्यामुळे देश जातियतेने विभागला जाईल अशी धास्ती त्यांना वाटत असल्याने त्यांना वेळीच जागे करण्याचा प्रयत्न केला होता. फुल्यांची तत्वे त्यांना मान्य होती पण विचारांचे राष्टीयविघातीकरण मान्य नव्हते. केसरीच्या २४ ऑगस्ट १८८६ च्या अंकात त्यांनी "अशा कलहाने आपला देश उदयास येईल काय ?" यात ते म्हणतात की, "कित्येक मराठे लोकांनी निःस्नेह जातीचा आग्रह करून ब्राम्हण जातीस अगदी चिरडून टाकण्याचा जणू काय विडा उचलला आहे. त्यांच्या वागणूकीने देशाचे नुकसान मात्र होत आहे. जोतिच्या मंद प्रकाशाने त्यांचे डोळे तूर्त मिटले आहेत. जोतिची टिकटिक सरल्यावर ते आपोआप उघडतील व मग त्यास चांगले

दिसू लागेल अशी आमची खात्री आहे".[१३४] अशा रितीने आगरकरांनी जातिच्या नावाचा श्लेष साफून जातिभेदाची दरी तीव्र न करता, कर्तृत्वावर भर देवून आधुनिक काळाकडे वाटचाल करतांना स्पृश्यास्पृश्य उच्च-निच जातिभेद ह्या गोष्टी कमी करुन हळूहळू समाजातून नाहिश्या केल्या पाहिजेत असे आगरकरांनी वाटत होते.

आगरकरांनी समाजातील लोकांचा विचार करतांना तुरुंगातील कैदी लोकांच्या जीवनविषयी आपले विचार "डोंगरीच्या तुरुंगातील आमचे एक्शे एक दिवस" या आपल्या पुस्तकात मांडले होते. ब्रिटिश काळात तुरुंग म्हणजे काळ्या पाण्याची सजा मानली जात असे . तेथे आगरकरांनी काही दिवस वास्तव्य केल्यानंतर त्यांना कैदी लोकांशी तुरुंग अधिका-याची असलेल्या अमानुष वागणूकीचा निषेध केला व माणुसकीच्या दृष्टीने कैद्यांशी वर्तन केले तर अपराध्यांना त्याच्या दुःकृत्याबद्दल चूका लक्षात येवून ते आपले जीवन सुधारण्याचा प्रयत्न करतील. पण त्यासाठी तुरुंगाच्या व्यवस्थापनेत बदल व्हायला पाहिजे असे त्यांना वाटत होते. "तुरुंगातील लोकांना जशा शिक्षा देतात, तसेच थोडेबहुत शिक्षण दिले, किंवा नित्युपदेश केला तर त्यांच्या हातून होणा-या अपराधांची संख्या कदाचित कमी होईल. शारीर दंडानेच कैद्यांना सुधारले पाहिजे. या व्यतिरिक्त त्यांना सुधारण्याचा दुसरा मार्ग नाही, असे जे समजतात त्यांच्या विचारात थोडी बहुत चूक आहे असे आम्हांस वाटते".[१३५]

समाजात चालणा-या वेश्यागमन, दारुबाज करणा-या लोकांना मिळणा-या तथाकथीत प्रतिष्ठेचाही त्यांनी समाचार आपल्या लेखांमधून घेतला होता. त्यांच्या लिखाणातून वास्तवतेची प्रखरतेने सुशिक्षित समाजाला जाणिव होत असल्याने विचार पटणारा आणि न पटणारा असा वर्ग तत्कालीन समाजात निर्माण झालेला होता. त्यांनी आगरकरांना मारण्याची

धमकीही दिली होती पण आगरकरांवर त्याचा काहीच परिणाम झालेला नव्हता. त्यांचे स्नेही व सुधारकमधील इंग्लिश विभाग सांभाळणारे सहकारी गोपाळकृष्ण गोखले यांनी त्यांना सावध राहण्याची दक्षता घेण्यास सांगून "संध्याकाळी एकटे फिरायला जावू नका" असा सल्ला दिला. तेव्हा आगरकरांनी त्यावर उत्तर दिले की, "या माथेफिरूंच्या धमक्यांना भिऊन जर मी फिरायला जायचे बंद करू लागलो तर उद्या "सुधारक" लिहावयाचे सुद्धा सोडून द्यावे लागेल मला !"[१३६] असे म्हणून त्यांनी नित्याचे चतुःश्रृंगी कडे फिरायला जाणे चालूच ठेवले. आगरकरांनी सनातनी लोकांवर केलेल्या कठोर टिकेमुळे त्यांची निंदानालस्ती अनेक प्रकारे केली गेली. आपल्या विरुद्ध उठविल्या जाणाऱ्या अफवांना जास्त ऊत येवू नये म्हणून त्यांनी "ज्ञानप्रकाश" मध्ये एक पत्र प्रसिद्ध करून आपल्या स्पष्ट वक्तेपणाची व निर्भयतेची साक्ष दिली. ते पत्र त्यांनी "सुधारक" मध्ये २० एप्रिल, १८९१ मध्ये पुन्हा प्रसिद्ध केले. त्यांचे विचारतत्व जाणून घेण्यास हे पत्र उपयुक्त आहे. या पत्रात ते म्हणतात की, "धार्मिक, सामाजिक विषयावरील माझी बरीच मते सांप्रतकाळी सामान्य लोकांस पसंत पडण्यासारखी नसल्यामुळे व असली मते कोणाचे मन कधीही दुखावले जाणार नाही, अशाच रीतीने प्रसिद्ध करण्याविषयी मी विशेष काळजी घेत नसल्यामुळे पुष्कळ लोकांस माझा राग येत असेल व काही लोक माझा द्वेष करीत असतील याबद्दल मला शंका नाही..... ज्याला रूढ लोकमताविरुद्ध बोलावयाचे, लिहावयाचे व वागावयाचे असेल त्याने बराच लोकापवाद सहण्यास तयार असले पाहिजे, हे मी कबूल करतो आणि याच कारणास्तव सामान्य मनुष्यास असह्य असा जो मजकूर आजपर्यंत माझ्याविरुद्ध लिहिण्यात आला त्याकडे मी दुर्लक्ष केले. ..परंतु सध्या कित्येक पत्रांच्या लेखात व काही इसमांच्या बोलण्यात जे उद्गार निघत आहेत ते इतके अमंगल आहेत की, त्या संबंधाने उदासीन राहणे म्हणजे हाती धरलेल्या उद्योगास आपल्या तोंडाने आपली अपात्रता कबूल करण्या-

सारखे होय. माझी मते ज्यांस पसंत नसतील ते त्यापुरते माझ्यावर हवे तितके तुटून पडोत, किंवा ती मोडून काढण्यासाठी पाहिजे तितक्या कटू शब्दांचा वर्षाव करोत, आजपर्यंत मी त्याबद्दल फिकीर केली नाही व पुढेही करणार नाही. परंतु न्यू. इंग्लिश स्कूलातील व्यवस्थापक मंडळीचा बेबनाव होऊन त्यापैकी काही शाळा सोडणार, ही शोचनीय गोष्ट उघडपणे बाहेर आल्यापासून वरील मर्यादा सुटत चालली, आणि थोडे थोडे तिचे अतिक्रमण होता होता ती अनिष्ट गोष्ट घडल्यापासून व संमति-बिलाचा वाद उपस्थित झाल्यापासून आपआपल्या पक्षाचे मंडन करण्यासाठी, आणि प्रतिपक्षाचा मोड करण्यासाठी कोणाच्या संबंधाने काय लिहावे आणि काय न लिहावे अथवा काय बोलावे आणि काय बोलू नये याविषयी कित्येकांच्या लेखांत व भाषणात निर्बंध म्हणून काही उरला नाही..... ज्यांना प्रसिद्धपणे सुधारकासारखे वर्तमानपत्र चालवायचे असेल, ज्यांना शाळेतील, कॉलेजातील शिक्षकांचा धंदा करावयाचा असेल..... अशांच्या नीतिमत्तेविषयी कोणी शंका घेतली असता आपल्या निष्कलंकपणा-विषयी लोकांची पूर्ण खात्री होईल अशा रीतीने निराकरण केले पाहिजे, किंवा शिक्षकांचा आणि पत्रकर्त्यांचा विशेषत: सुधारकासारख्या पत्राचा धंदा सोडून देऊन दुसऱ्या हव्या त्या मार्गाने त्यांनी आपला उदारनिर्वाह करण्यास तयार झाले पाहिजे".[१३७] आगरकरांनी आपल्या कृत्याविषयी अशी प्रांजलपणाने समाजाला खात्री करून देऊन आपले समाजकार्य आमरण करण्याचे ध्येय ठेवले होते.

"सुजन करावे सकल जन" या तत्वासाठी त्यांनी आपली लेखनी चालविली होती. त्यांनी आपल्या विचारांमधून व्यक्तीसुखाकडून मानव-जातीच्या कल्याणाकडे आणि मानवजातीच्या कल्याणासाठी व्यक्तीचे ऐहिक सुखवर्धन आणि त्यातून राष्ट्रविकास हा त्यांच्या समाजकार्याच्या तत्वज्ञानाचा पाया ठरला होता. आगरकरांच्या स्मृती शताब्दी निमित्त आयोजित केलेल्या परिसंवादामध्ये सरोजिनी वैद्य यांनी आगरकरांच्या

कार्याचे मुल्यमापन करतांना म्हटले की, "हिन्दुधर्म विचारात आणि सामाजिक आचारात जेवढे काही खरोखर निर्दोष आणि हितावह आहे त्याचा आगरकरांनी स्विकार केला आहे. पण जे अहितकारक व सदोष आहे त्याचा निर्धाराने आपण त्याग करुन त्याच्या जागी पाश्चात्य संस्कृतीतील हितकर मुल्यांचा स्वीकार करण्यास तयार असले पाहिजे. भारतीय आर्यत्व न सांडता प्रगत देशातील आणि भिन्न संस्कृतीतील हितावह तत्वांचा स्वीकार केला तर राजकीय स्वातंत्र्याबरोबरच सामाजिक स्वातंत्र्य भारतात नांदू लागेल ही आगरकरांची समाज व धर्मसुधारणेसंबंधी भूमिका आहे". १९ मार्च १९९५ ला झालेल्या या परिसंवादात प्रा. यशवंत सुमंत यांनी "आगरकरांचा व्यक्तिस्वातंत्र्यावाद हा परहित केंद्री होता. आगरकर व्यक्तिवादी असूनही परहिताची उपेक्षा करीत नाही. उत्क्रांतीवादी असूनही "सोशल डार्विनिस्ट" होत नाहीत, अज्ञेयवादी असूनही चंगळवादी नाहीत आणि धर्मविरोधी असूनही श्रध्दाहीन होत नाही". या शब्दात आगरकरांच्या व्यक्तिमत्वाचे मुल्यमापन करतात तर समाजशास्त्रज्ञ प्रा. डी.एन. धनागरे यांनी "आगरकरांनी समाज सुधारणेचे विचार मांडले. पण आर्य-अनार्यत्वाच्या पलीकडे ते गेले नाहीत. त्यामुळेच ते सुधारणेची मोठी चळवळ उभी करु शकले नाहीत". पण टिळक स्मारक मंदिरात झालेल्या या सभेत प्रा. स. मा. कोगेकर म्हणाले की, आगरकरांनी जन जागरणाच्या भूमिकेतून कार्य केले आहे. "सर्वांगीण प्रगती" हेच त्यांच्या विचाराचे सार होते. आजच्या काळात आगरकर सारख्या सुधारकांची गरज आधुनिक भारताला वाटते यातच त्यांच्या कार्याचे गमक आहे.

::::::::::::::::::

# प्रकरण - ४ थे

## संदर्भ


१] मं० बा० सरदार, रानडे प्रणीत सामाजिक सुधारणेची तत्वमिमांसा, पृ०३५

२] M.G. Ranade, M.Writings, P.116.

३] मं०बा० सरदार, रानडे प्रणीत सामाजिक सुधारणेची तत्वमिमांसा, पृ०३०

४] M.G. Ranade, M.Writings, P.71.

५] Ibid, P.71

६] M.G. Ranade (Ed), M.B. Kolaskar, Religious and Social Reform, (Bombay : 1902), P.21.

७] Karve And Ambedkar (Ed), Speeches and Writings of Gopal Krishna Gokhale, Vol.III, (Pune : 1967), P.284

८] M.G. Ranade, M.Writings, P.179.

९] Ibid, P. 117-118

१०] फाटक, न्या० रानडे यांचे चरित्र, पृ० ४२

११] Tucker, Ranade, P.62 - 63.

१२] Ibid, P.65-66

१३] Mankar G.A. A Sketch of the Life and Works of the Late Mr. Justice, M.G. Ranade, Vol I-II (Bombay : 1902) P.22.

१४] रमाबाई रानडे, आमच्या आयुष्यातील काही आठवणी, पृ०२०-२२०

१५] किता, पृ०२१

१६] कर्वे द.गो., स्वतंत्र भारताचे द्रष्टे - रानडे, पृ. २३-२४.

१७] Tucker, Ranade, P. 80-82

१८] Ibid, P.82.

१९] फाटक, न्या. रानडे यांचे चरित्र. पृ. १५०

२०] किता, पृ. १५१

२१] रमाबाई, आमच्या आयुष्यातील आठवणी, पृ. ६३-६४.

२२] कर्वे, रानडे, पृ. २४

२३] रमाबाई रानडे [प्रकाशित] संकीर्ण लेख संग्रह ( मुंबई - १९४० )पृ.८०-८१
[यानंतर या पुस्तकाचा उल्लेख रानडे, संकीर्ण लेखसंग्रह असा येईल]

२४] Tucker, Ranade, P.209

२५] Ibid, P.208

२६] Dayaram Gidumal, Malbari, (Bombay : 1888) P.191-192

२७] केळकर, लो. टिळक चरित्र, भाग पहिला, पृ. १८०-१८१

२८] फाटक, न्या. रानडे यांचे चरित्र, पृ. २५८.

२९] B.R. Ambedkar, Ranade, Gandhi and Jinnah, P.45

३०] फाटक, न्या. रानडे यांचे चरित्र, पृ. २६३-२७०.

३१] Karve and Ambedkar, Speeches and Writings of G.K. Gokhale, P.788

३२] ग.बा. सरदार, रानडेप्रणीत सामाजिक सुधारणेची मिमांसा, पृ. ४९-५३.

३३] फाटक, न्या. रानडे यांचे चरित्र, पृ. २७६.

३४] D. Gidumal Malbari, P.192.

३५] फाटक, न्या. रानडे यांचे चरित्र, पृ. २६५-२६६.

३६] कित्ता, पृ. २६६-६७.

३७] न.र. फाटक, लोकमान्य, [मुंबई : १९७२], पृ. ७९-८०

३८] Tucker, Ranade, P.250-251

३९] T.V. Ramvate, Ranade, P.62.

४०] रमाबाई रानडे, आठवणी, पृ. १९३

४१] Tucker, Ranade, P.247

४२] फाटक, न्या. रानडे यांचे चरित्र, पृ. १५३-१५६

४३] Karve and Ambedkar, Speeches and Writings of G.K. Gokhale, P.777

४४] रानडे, संकीर्ण लेखसंग्रह, पृ. ३१४

४५] कित्ता, पृ. ३४६

४६] कित्ता, पृ. ३४७

४७] कित्ता, पृ. ३१५

४८] Tucker, Ranade, P.171

४९] टोपे, न्या. रानडे - व्यक्ती, कार्य आणि कर्तृत्व, पृ. २२३-२२४

५०] कित्ता, पृ. २२५

५१] फाटक, न्या. रानडे यांचे चरित्र, पृ. ३५४-३५५

५२] Randde, M.Writings, P.89

५३] Ibid, P.113

५४] टोपे, न्या. रानडे - व्यक्ती, कार्य आणि कर्तृत्व. पृ. २२६

५५] Ranade, M.Writings, P.236

५६] गोविंद तळवळकर, विराटज्ञानी न्या• रानडे, पृ• १४-१५•

५७] Ranade, M.Writings, P.236-237

५८] Ibid, P.196-197

५९] Ibid, P.200-203

६0] Ibid, P.226

६१] Ibid, P. 110-111

६२] टोपे, न्या• रानडे - व्यक्ती, कार्य आणि कर्तुत्व; पृ• २३१•

६३] किता, पृ• २•३८

६४] रानडे, संकीर्ण लेखसंग्रह, पृ• ११२

६५] किता, पृ• २११

६६] किता, पृ• ७९

६७] किता, पृ• २३३-२३४

६८] सरदार, रानडेंप्रणीत सामाजिक सुधारणेची मिमांसा, पृ•१०१-१०२

६९] Ranade, M.Writings, P.231-232

७0] B.R. Ambedkar, Ranade, Gandhi, and Jinnah, P.27

७१] नातू - देशपांडे, आगरकर वाङ्:मय खंड, भाग १, पृ•३

७२] गं•बा• सरदार, आगरकरांचा सामाजिक तत्वविचार, पृ•७१-७२

७३] मा•दा• आळतेकर, आगरकर निंबधसंग्रह, भाग १, पृ•५

७४] गं•बा• सरदार, आगरकरांचा सामाजिक तत्वविचार, पृ: ८२-८३

७५] पुं• चा• गोखले, आगरकरांची ओळख, पृ•१००

७६] किता, पृ• ७६-७७•

७७] पी•डी• दिघे, आगरकर आणि टिळक - समाजविचार, [मुंबई : १९९३], पृ• २५-२६•

७८] नातू - देशपांडे, आगरकर वाङ्मय, खंड १, पृ. ४३१.
७९] कित्ता, पृ. ३७.
८०] नलिनी पंडित, महाराष्ट्रातील राष्ट्रवादाचा विकास, पृ. ८०-८१
८१] ग.प्र. प्रधान, आगरकर लेखसंग्रह, पृ. १३२.
८२] गो.ग. आगरकर, केसरीतील निवडक निबंध, पुस्तक पहिले, पृ.२४५-५०
८३] सं.बा. सरदार, आगरकरांचा सामाजिक तत्वविचार, पृ. ९८-९९.
८४] नातू-देशपांडे, आगरकर वाङ्मय खंड, १, पृ. १८४-१८७
८५] कित्ता, पृ. १८८-१९२
८६] कित्ता, पृ. २२१-२२४
८७] कित्ता, पृ. १९३-१९७
८८] गो.ग. आगरकर, केसरीतील निवडक निबंध, पुस्तक १ ले, पृ.२१९-२२१.
८९] ग.प्र. प्रधान, आगरकर लेखसंग्रह, पृ. १८०-१८३
९०] कित्ता, पृ. १८४-१९०
९१] कित्ता, पृ. १४२-१४३
९२] नातू - देशपांडे, आगरकर वाङ्मय खंड १, पृ. ४५-५५
९३] गो.ग. आगरकर, केसरीतील निवडक निबंध, पुस्तक पहिले, पृ.१४४-१८९
९४] न.र. फाटक, न्या. रानडे यांचे चरित्र, पृ. ३४१
९५] आगरकर, केसरीतील निवडक निबंध, पुस्तक पहिले, पृ.२१७-२१९
९६] नातू-देशपांडे, आगरकर वाङ्मय खंड १, पृ. ४०८-४११
९७] न.चिं. केळकर, लो. टिळकांचे चरित्र, पुर्वार्ध, पृ. २४०-२५१.
९८] ग.प्र. प्रधान, आगरकर लेखसंग्रह, खंड १, पृ. १९७-२०२
९९] कित्ता, पृ. २०३-२०७

१००] कित्ता, पृ० २१४-२२२.

१०१] नातू-देशपांडे, आगरकर वाङ्मय खंड १, पृ० १२९-१३७.

१०२] कित्ता, पृ० २८२-२८५.

१०३] ग०प्र० प्रधान, आगरकर लेखसंग्रह, खंड १, पृ० ८६-१२१.

१०४] नातू-देशपांडे, आगरकर वाङ्मय खंड भाग १, पृ० ८६-८९.

१०५] गो०ग० आगरकर, केसरीतील निवडक निबंध, पुस्तक पहिले, पृ०७०-७२.

१०६] कित्ता, पृ० ७९-८२.

१०७] कित्ता, पृ० १८७-१८८.

१०८] कित्ता, पृ० १८१-१८६.

१०९] कित्ता, पुस्तक दुसरे, दुसरी आवृत्ती, पृ० २६-४३,
नातू-देशपांडे, आगरकर वाङ्मय खंड २, पृ० २९८-३००.

११०] पु०पां० गोखले, आगरकरांशी ओळख, पृ० ३-४,-२३.

१११] बलराम नंदा, गोपाळकृष्ण गोखले, पृ० ७३.

११२] य०दि० फडके, शोध बाळ गोपाळांचा, [पुणे : १९७७], पृ० २४

११३] नातू-देशपांडे, आगरकर वाङ्मय खंड भाग १, पृ० १३८-१४३.

११४] कित्ता, पृ० ३०४-३०९.

११५] य०दि० फडके, शोध बाळ गोपाळांचा, पृ० ११४-१२३.

११६] ग०प्र०प्रधान, आगरकर लेखसंग्रह, भाग १, पृ० ७४-७८.

११७] नातू-देशपांडे, आगरकर वाङ्मय खंड भाग १ पृ० ८२-८५.

११८] गो०ग० आगरकर, केसरीतील निवडक निबंध, पुस्तक पहिले, पृ०११० .

११९] कित्ता, पुस्तक दुसरे, पृ० ७८-७९.

१२०] ग०प्र० प्रधान, आगरकर लेख संग्रह, पृ० १७२-१७५.

१२१] कित्ता, पृ० २४९-२७६.

१२२] कित्ता, पृ. २६३-२६४.

१२३] कित्ता, पृ. २७७-२८१.

१२४] पुं.पां. गोखले, आगरकरांची ओळख, पृ. २४.

१२५] ग.प्र. प्रधान, आगरकर लेखसंग्रह, पृ. २४२-२४५

१२६] न.र. फाटक, न्या. रानडे यांचे चरित्र, पृ. २८८-२८९

१२७] ग.प्र. प्रधान, आगरकर लेखसंग्रह, पृ. २२३-२३१

१२८] य.दि. फडके, शोध बाळगोपाळांचा, पृ. २२

१२९] मा.दा. आळतेकर, आगरकर निबंधसंग्रह, भाग २, पृ.२६३-२६४.

१३०] स.मा. गर्गे, गो.ग. आगरकर, पृ.९०

१३१] मा.द. आळतेकर, आगरकरनिबंध संग्रह, भाग ३, पृ. ३४-३६

१३२] कित्ता, पृ. १८३-१८४

१३३] ग.प्र.प्रधान, आगरकर लेखसंग्रह, पृ. २३२-२४१

१३४] गो.ग. आगरकर, केसरीतील निवडक निबंध, पुस्तक दुसरे,

१३५] गो.ग. आगरकर, डोंगरीच्या तुरुंगांतील आमचे एकशे एक दिवस, पृ.२८

१३६] पुं.पां. गोखले, आगरकरांची ओळख, पृ. २५

१३७] य.दि. फडके, व्यक्ती आणि विचार, [पुणे : १९७९], पृ. ४-८

# प्रकरण - ५ वे

## न्यायमूर्ती म.गो. रानडे आणि गो.ग. आगरकर यांचे धर्मसुधारणा विषयक विचार

### अ] न्यायमूर्ती रानडे यांचे धर्मसुधारणा विषयक विचार :-

जगामध्ये भारतदेश "अध्यात्मिक राष्ट्र" म्हणून ओळखला जातो. अति प्राचीन काळापासून आधुनिक काळापर्यंत भारतीयांच्या सामाजिक, राजकीय, जीवनावर धर्माचे प्राबल्य असलेले दिसून येते. धर्माचा संबंध मानवी जीवनाच्या प्रत्येक क्षेत्राशी आल्यामुळे धर्म हा विषय अत्यंत नाजूक, गुंतागुंतीचा, गहन, आणि विवाद्य ठरलेला आहे. भारतात नैसर्गिक धन संपन्नता असल्यामुळे उदरनिर्वाहाचा प्रश्न सुटत असल्याने बाकीचे आयुष्य मोक्षप्राप्ती मिळविण्यासाठी धडपडणाऱ्या या देशामध्ये अनादी काला-पासून अनेक परकीय आक्रमणे होऊन शतकानुशतके गुलामगिरीत खितपत रहावे लागले, पण त्याची खंत कधी लोकांना जाणवली नाही. त्यामुळेच भारतीय समाज गतीहिन अवस्थेतच राहिला. ग्रीक, हुण, कुशान, अरब, तुर्क मुस्लिम आक्रमकांपेक्षा इंग्रजांचे आक्रमण वेगळ्या पध्दतीने आर्थिक, राजकीय दृष्ट्या प्रभावी ठरले असले तरी पण सुरवातीला पारतंत्र्याची जाणीव नाही. पण आर्थिक शोषण जसजसे वाढत गेले आणि उदर निर्वाहाचे साधन त्यांच्या हातातून काढले गेले, तेव्हा समाजाला या परकीय आक्रमकांची जाणीव होऊ लागली; आणि त्यांनी इ.स.१८५७ चे बंड घडवून आणले. पण ब्रिटिश सरकारने इ.स. १८५८ च्या राणीच्या जाहीरनाम्यात "भारतीयांच्या सामाजिक, धार्मिक जीवनात ढवळाढवळ करणार नाही" असे जाहीर करताच भारतीय समाज शांत झाला आणि धार्मिक जीवनकार्यात मग्न राहिला.

इंग्रज सरकारने जेव्हा इंग्रजी भाषेची ओळख भारतीयांना करून देऊन जगातील चांगल्या प्रसिद्ध ग्रंथाचे चिकित्सक अध्ययनाचे ज्ञान दिले, तेव्हा सुरवातीच्या सुशिक्षित पिढीला आपल्या गुलामगिरीची जाणीव होऊ लागली. पश्चिमात्य विद्येमुळे ज्यांची दृष्टी विशाल बनली होती, त्यांनी ख्रिश्चन धर्मातील उदात्त तत्वांचा अभ्यास केला व त्या अभ्यासाने हिन्दु धर्मात कोणत्या सुधारणा घडवून आणाव्यात यावर अंतर्मुख होऊन विचार करू लागले. त्यांनी देशाच्या सर्वांगीण प्रगतीसाठी सामाजिक, धार्मिक, राजकीय, आर्थिक सुधारणेला महत्व दिले. सुधारणेत सुरुवातीला धार्मिक सुधारणेवर भर देण्यात आला. भारतीय समाज हा धर्मातील कर्मकांड, अंधश्रद्धा, प्रतवैकल्य, पारलौकिक ध्येयाने बद्द असल्यामुळे प्रथम धर्मसुधारणा केली तरच आपोआप समाजसुधारणा घडून येतील हे समाजसुधारकांच्या लक्षात आले. म्हणून त्यांनी आपल्या कार्यात धर्मसुधारणेला अग्रस्थान दिले. बाळशास्त्री जांभेकर, दादोबा पांडुरंग, विष्णुबुवा ब्रम्हचारी, लोकहितवादी, ज्योतिबा फुले यांनी इ. सुधारकांनी महाराष्ट्रात धर्मसुधारणेचे कार्य हाती घेतले. भारतामध्ये ब्राम्हो समाज, आर्य समाज, सत्यशोधक, प्रार्थना समाज, रामकृष्ण मिशन, [सत्यशोधक] समाज इत्यादी संस्थांनी धर्मसुधारणेच्या कार्याला चालना दिली.

सुधारकांना धर्मसुधारणेचे कार्य करीत असतांना प्रत्येक प्रश्न सामाजिक रुढींशी निगडीत असल्याचे जाणवू लागले. धर्म व समाज हे एकाच नाण्याच्या दोन बाजू आहेत हे स्पष्ट होऊ लागले. धर्म ही समाजाचे नियमन करणारी संस्था बनलेली आहे. आतापर्यंत सामाजिक व धार्मिक क्षेत्राची विभागणी झाली नसल्यामुळे नवविचारांचा संघर्ष धर्मभावनेशी होऊ लागला. धर्मातील अनिष्ट रुढी, श्रद्धा परंपरेने सामाजिक जीवनाला आपल्या चौकटीत बंदिस्त केल्याने समाजाची गतीशीलता थोपवून धरली गेली. काळानुसार समाजामधील जुनी जीवनमूल्ये मागे पडून नवीन जीवनमूल्ये प्रस्थापित होत असली तरच

समाज प्रवाहित राहू शकतो, असा समाज जडत्व धारण करू शकत नाही. हा समाज प्रवाहित राहण्यासाठी धर्मभावना कालानुसार बदलणे आवश्यक असते. धर्माला बदलते स्वरूप देऊन समाजाचे धर्माकडे पाहण्याचा दृष्टिकोन व्यापक करण्याचे कार्य वेळोवेळी समाज सुधारकांना करावे लागते. समाज सुधारकांना समाजप्रबोधनाचे कार्य करतांना खऱ्या धर्माची ओळख समाजाला करून द्यावी लागते. हे कार्य अव्याहतपणे देशात होत राहिले तरच समाज प्रगतीशील राहू शकतो, हे मर्म या सुधारकांनी ओळखले होते. भारतामध्ये राजाराम मोहन रॉय, दयानंद सरस्वती, ईश्वरचंद्र विद्यासागर यांच्या बरोबर विष्णुबाबा ब्रम्हचारी, रानडे, आगरकर, विवेकानंदानी केले होते. महाराष्ट्रात धर्म सुधारणेच्या बाबतीत एकोणिसाव्या शेवटी न्या. रानडे आणि आगरकरांचे कार्य महत्त्वपूर्ण ठरले आहे.

विसाव्या शतकापर्यंत हिन्दु-धर्मातील रूढी परंपराचे, सामाजिक व्यवहाराचे चित्र परस्पर विसंगत असलेले आढळून येते. जैनधर्माने आत्मसात केलेला आत्यंतिक अहिंसावाद हा दैनंदिन सर्वसामान्य जीवन जगण्यास दुर्भर ठरत होता. तर बंगालमधील धर्मपुजेत बळीप्रथेला प्राधान्य होते. हिन्दु समाजात एकीकडे पहिल्या मुलीच्या जन्माला लक्ष्मीचा अवतार मानले जाई तर दुसरीकडे धर्मासाठी भ्रूणहत्या करण्यास मुलीचा बळी देण्यासही मागेपुढे पाहिले जात नसे. स्त्रीला त्यागी, देवीचे स्वरूप देणारा हा समाज देवदासी सारखे व्यभिचारी जीवन स्त्रियांना धर्मासाठी जगण्यास भाग पाडीत होता. सौभाग्यलक्ष्मीचे विवाहजीवन प्रदान करणारे धर्मपंडित तीच स्त्री विधवा झाल्यास तिचे केशवपन करून, तिची विटंबना करीत होता व तिला शुद्रापेक्षाही जास्त नरकमय जीवन जगण्यास भाग पाडीत होता. स्त्रियांना एकीकडे देवीचे स्वरूप देऊन तिची पूजा केली जाई तर त्याच स्त्रिला केवळ छोट्याशा चुकांसाठी समाजातून बहिष्कृत केले जाई.

धर्माच्या नावाखाली स्पृश्यास्पृश्यतेला, सतीप्रथेला प्रोत्साहन दिली जाई. पूजा व्रत वैकल्यातच मानवी जीवनाचे सार्थ आहे असा पारमार्थिक उपदेश करून समाजाला राजकीय, आर्थिक, सामाजिक जीवनाच्या ऐहिक कार्यापासून दूर ठेवण्याचा प्रयत्न तथाकथीत धर्म पंडितांनी केल्यामुळे समाज हा केवळ धार्मिक क्षेत्रापुरता मर्यादित बनलेला होता. अशा समाजाला सनातन हिन्दु धर्माच्या वास्तव स्वरूपाची जाणीव, ओळख करून देऊन सुधारकांनी धर्म सुधारणा पर्यायाने समाज सुधारणा करण्याचे कार्य करण्याचा प्रयत्न केला. धर्मातील दोष नष्ट करून धर्माला पूर्वस्वरूप प्राप्त करून देणे हे त्यांचे ध्येय होते. कारण पारमार्थिक उन्नती व ऐहिक उत्कर्ष ईश्वरभक्ती व व्यवहार नैपुण्य यात फरक आहे, असे या सुधारकांना वाटत नव्हते. उलट सुधारकांमध्ये ईश्वरनिष्ठा आणि सद्सद्‌विवेकबुद्धीवर अटळ निष्ठा असेल तरच ते कितीही कठीण प्रसंग आला तरी खंबीर राहून, तटस्थपणे आपले कार्य करू शकतात. अध्यात्मिक प्रेरणा ही मनुष्यस्वभावामध्ये उपजतच असते. त्यासाठी धर्माचे विशुध्द स्वरूपाचे ज्ञान आत्मसात केले तर धर्म सुधारणेचे कार्य यशस्वीपणे केले जाऊ शकते असे या सुधारकांना वाटत होते. म्हणून त्यांनी धर्मसुधारणेला आपल्या कार्यात अग्रस्थान दिले होते. या काळात युरोपातही रोमन चर्च विरुध्द धार्मिक चळवळी सुरू होत्या. राजकारणातील पोपचे महत्त्व कमी करण्याचा प्रयत्न सुरू होता. त्यासाठी तेथील धर्मसुधारकांना राज्यसंस्थेचा, अर्थव्यवस्थेचा पाठिंबा मिळत असल्यामुळे त्यांच्या धर्मसुधारणा चळवळी यशस्वी ठरल्या होत्या. पण भारतामध्ये हिन्दुधर्मामध्ये एकजिनसीपणा नसल्यामुळे येथील धर्मचळवळींना राज्ययंत्रणेचा, अर्थव्यवस्थेचा पाठिंबा मिळणे अशक्य होते. ब्रिटिश सरकारला आपले साम्राज्य टिकवून ठेवायचे असल्याने त्यांनी भारतातील धर्मसुधारणेत लक्ष घालणे टाळले. सनातनी वर्ग हा धर्म सुधारणेच्या चळवळींचा प्रमुख विरोधक असल्याने बहुसंख्य समाज ह्या चळवळी पासून अलिप्त राहिलेला होता; तो सामाजिक बहिष्काराच्या भितीने व अज्ञानामुळे.

त्यामुळे सुधारकांना धर्मसुधारणेसाठी एकाकी लढा द्यावा लागला आणि समाजाने त्यांच्या कार्याकडे दुर्लक्ष केले. त्यामुळे धर्मसुधारणा उपेक्षितच राहिली. तरीही समाज प्रबोधनाकरिता न्या. रानडे यांनी आपले धर्मसुधारणा कार्य अविरत केले. अध्यात्माचे अधिष्ठान समाजाच्या विकासासाठी आवश्यक आहे, अशी रानड्यांची धारणा होती.

भारतभूमीवरील मानवी जीवनाचे अधिष्ठान अध्यात्मावर आधारित आहे. प्रत्येक मनुष्याला धर्माची आवश्यकता असते व धर्म हा संस्कृतीचा पोषक असल्याने त्याच्या अभावी मानवाची आध्यात्मिक उन्नती होणे शक्य नाही, असे विचार रानड्यांच्या मनावर विद्यार्थी जीवनातच दृढमूल झाले होते. लहानपणीच त्यांच्या आई गोपिकाबाईंनी त्यांच्यावर धार्मिक संस्कार केलेले होते. त्यामुळे धार्मिक, आध्यात्मिक दृष्टी त्यांच्यामध्ये उपजतच निर्माण झाली होती. महाविद्यालयीन शिक्षण घेत असतानांच बेकन, स्मिथ, जॉन लॉक, हर्बट स्पेन्सर, मिल्ल, बटलर इ. पाश्चात्य विद्वानांच्या लिखाणाचा परिणाम रानड्यांवर झालेला होता. धर्ममंथनाच्या ह्या काळात बटलरच्या धार्मिक तत्वज्ञानाचा प्रभाव रानड्यांवर मोठ्या प्रमाणात पडलेला होता. त्यांचे धर्मविषयक विचार पारंपारिक हिन्दू धर्माच्या पार्श्वभूमीवर आधारित आहेत. न्यायमूर्तींनी आपले धार्मिक विचार प्रार्थना समाजामध्ये दिलेल्या व्याख्यानात मांडलेले आहे. त्याप्रमाणे " A Theists confession of faith" या निबंधात त्यांनी आपली ईश्वरनिष्ठश्रध्दा, आधुनिक ज्ञान व विचार यांच्या आधारे स्वतःच्या धार्मिक भावनेचे विवेचन केले आहे. त्यांच्या लिखाणात, व्याख्यानात पुष्कळदा ईश्वरीयोजनेचा उल्लेख येतो. आध्यात्मिकता ही मनुष्य स्वभावात मूलतः असते, त्या धर्मभावनेला जागृत ठेवतांना निसर्गाशी एकरूप होऊन व्यवहारिक जीवन समृध्दपणे जगण्याचा प्रयत्न केल्यास मानवी जीवन कृतार्थ होवू शकते, ह्या पारंपारिक हिन्दू वैदिक परंपरेच्या विचारसरणीच्या अधिष्ठानावर रानड्यांची धार्मिक विचारसरणी निहित होती.

खरा समाजसुधारक हा ईश्वरोपासक असला तर त्याला आपले कार्य करण्यास अध्यात्माचा आधार मिळतो असे रानड्यांचे मत आहे त्यांनी आपल्या Miscellaneous Writings मध्ये म्हटले की, "There appears to be no ground for hope, under such circumstances of seeing any genuine reform movement springing up from with in the heart of the nation, unless that heart is regenerated, not by cold calculations of utility, but by the cleansing fire of a religious revival."[1] अध्यात्मिक अधिष्ठान हे भारतातील सुधारणावादाचे वैशिष्ठ्य मानले जाते. राजाराम मोहन रॉय पासून पुढे गांधी आंबेडकर पर्यंतचे सर्व समाजसुधारक धर्मश्रध्दावादी होते. त्यांच्या धर्मभावना समाजोत्कर्षाच्या विचारांशी मिळत्याजुळत्या होत्या. त्यांनी आपल्या धर्मकल्पना ह्या आपल्या समाजाशी, त्यांनी उभारलेल्या चळवळींशी निगडीतच ठेवल्या होत्या. शाश्वत हिन्दू धर्म हा मानवतावादाशी संबंधीत असून हाच मानवतावाद उदारमतवादाचे एक अंग आहे अशी रानड्यांची धर्मविषयीची विचारसरणी उदारमतवादी व मानवतावादी स्वरुपाची होती.

रानड्यांची उदारमतवादी विचारसरणीची बैठक त्यांच्या महाविद्यालयीन जीवनात तयार झालेली होती. कॉलेजमध्ये असतांना त्यांनी बटलर गीबन, जॉन लॉक, मिल इ. अनेक पाश्चात्य विव्दानांच्या ग्रंथाचे अध्ययन करुन त्यातील उपयुक्त गोष्टी आत्मसात केल्या होत्या. उदारमतवादाचे आद्यप्रवर्तक जॉन लॉक यांनीही ईश्वरी अधिष्ठान मान्य केले आहे. "सर्व माणसे ही सर्वशक्तीमान आणि अनंतप्रज्ञ अशा ईश्वराची लेकरे आहे. तो आपला निर्माता आहे. तसाच नियंताही आहे. त्याच्या कार्यसिध्दीसाठी आणि त्याच्या शासनाबरहुकूम त्यानेच आपल्याला जगात धाडलेले आहे.------ मनुष्यमात्र ही ईश्वराची मत्ता आहे म्हणून

कुणालाही दुस-या माणसाला इतर प्राण्याप्रमाणे तुच्छ लेखून आपल्या उद्दिष्टपूर्तीचे साधन बनवण्याचा, लुबाडण्याचा किंवा मारण्याचा अधिकार नाही." या विचारांचा प्रभाव रानड्यांवर होता. जॉन लॉक ह्यांच्या राजकीय विचारांमध्ये मानवाची प्रतिष्ठा आणि व्यक्ति स्वातंत्र्य ही दोन तत्वे निसर्गसिध्द व प्रमाणभूत मानली आहेत. तसेच ॲडम स्मीथ सारखे अतिशय बुध्दीवादी व उदारमतवादी अर्थशास्त्रज्ञ ही Natural economic institutions are not merely good ; they are providential."[2] ह्या तत्वाचा पुरस्कार करतात. जॉन लॉक व स्मिथ या विचारवंताचा प्रभाव रानड्यांवर पडलेला दिसून येतो. त्यांच्यावर बटलरच्याही विचारांचा प्रभाव पडलेला होता.

मिल्ल, स्पेन्सर ह्या उदारमतवादी पाश्चात्य लेखकांच्या लिखाणाचा त्या काळातील बहुतेक सर्व विद्यार्थ्यांवर प्रभाव होता. ह्या विचारवंतांनी आपल्या लिखाणात मानवी जीवनाला त्याच्या नैतिकतेला, सत्यनिष्ठेला स्थान दिले आहे. विचार, भावना आणि कृती यांच्या सुसंवादात जीवनाचे मर्म आहे, असे मिल्लला वाटत होते. रानड्यांवरही मिल्लच्या ऐहिक नितीप्रधान विचारांचा प्रभाव पडलेला होता. पण त्यांना ईश्वराचे आणि अतिप्राकृतिक तत्वाचे अस्तित्व जास्त महत्वपूर्ण वाटत होते. त्यांनी मानवी जीवनातील ईश्वराच्या अस्तित्वाला अग्रस्थान दिले होते. मिल्लप्रमाणेच त्यांना 'मानवाच्या ऐहिक जीवनापलिकडील सत्य काय आहे ? ह्याचे संशोधन करणे व्यर्थ वाटत होते. त्यापेक्षा आपल्या ऐहिक जीवनाला सुंदर स्वरूप देण्यासाठी चिरंतन जीवनाची पवित्र साधना करण्यातच धन्यता वाटत होती. "To call these sentiments by the name morality exclusively, of any other title, is claiming too little for them. They are 'real religion ; of which, as of, other religions, outward good works. (The utmost meaning usually suggested

by the word morality) are only a part, and are indeed rather the fruits of the religion than the religion itself"[3] मिलचे हे विचार रानड्यांना पटलेले होते. शालेय व महाविद्यालयीन जीवनात त्यांनी असंख्य विद्वानांच्या ग्रंथाचे पारायण केलेले होते. त्यामुळे त्यांच्या मुलत: धार्मिक प्रवृत्तीवर निसर्गक्रम ईश्वराच्या अस्तित्वाची जाणीव त्यांना सतत होत राहिली. परमेश्वराच्या आस्तित्वाबद्दल आपले विचार प्रगट करतांना लिहितात की, " The continuance of the universe of matter in its ordained course, equipoised between all manner of distracting forces, is a greater standing miracle in favour of Theism than any number of violations of this uniform course, supported by mere human testimony can be, which are invoked to establish the divine origin of most of the established religions".[4] त्या काळात स्पेन्सरच्या तत्वज्ञानाने प्रभावाने अनेक सुशिक्षित तरुण अज्ञेयवादी बनले होते. आगरकरांनाही अज्ञेयवादाचे आकर्षण होते. पण रानड्यांना मिल्लच्या ऐहिक नितीप्रधान विचार मान्य असले तरी हा अज्ञेयवाद मान्य नव्हता. सृष्टीला, विश्वाला नियंता नाही. ठराविक नियमाने सृष्टीतील घडामोडी चालू असतात. हे तत्व भारतीयांकरिता निश्चित हितावह नाही असे त्यांना वाटत होते. तरुणांना स्वत:च्या विवेकबुद्धीला ईश्वराच्या आस्तित्वाची जाणीव ठेवून वागण्याची प्रवृत्ती निर्माण करता आली तर ते चांगले जागृत नागरिक होवू शकतात; असे रानड्यांना वाटत होते. अज्ञेयवादाच्या तत्वावर राष्ट्रीय भावनेचे पोषण होणे शक्य नाही. त्यासाठी प्रगल्भ विवेकबुद्धीची गरज असते. तरुणांमध्ये खोलवर विचार करुन वागण्याची प्रवृत्ती कमी असते. उलट नास्तिकपणाकडे त्यांचा कल वाढून संस्कृती परंपरेच्या विरुद्ध जाण्याची प्रवृत्ती जास्त असते. या आशंकेने रानडे आपले विचार मांडताना " The national mind cannot rest in agnosticism."[5] म्हणतांना दिसतात.

त्यांचे विचार आज सार्थ वाटतात. संस्कृती व नीती मुल्याचा -हास ज्या गतीने होत आहे त्याचे परिणाम स्वातंत्र्यानंतरच्या काळात दिसत आहेत. रानड्यांनी पाश्चात्य विचारवंताच्या विचाराबरोबर भारतीय धार्मिक तत्वज्ञानही आत्मसात केलेले होते. अनेक धार्मिक ग्रंथाचा खोलवर अभ्यास केलेला होता. त्याचे प्रत्यय त्यांच्या धर्मपर व्याख्यातून दिसून येते.

भारतातील धार्मिक मंथनाच्या काळात धार्मिक सुधारणा घडवून आणण्याच्या कार्याला पहिल्यांदा सुरुवात राजाराम मोहन रॉय यांनी १८२८ ला ब्राम्हो समाज स्थापन करुन बंगाल मधून केलेली होती. त्यांनी हिन्दू धर्मातील अनिष्ट रुढी, परंपरा ज्या कालबाह्य आणि बोजड झालेल्या होत्या, आणि ज्या वर्तमान काळात अडचणीच्या ठरल्या होत्या, अशा रुढी परंपराविरोधी आवाज उठवून समाजाला त्याज्य ठरविण्यास आपल्या लिखाणाव्दारे, व्याख्यानाव्दारे जनतेला आव्हान केले होते. पण समाजाकडून या अनिष्ट परंपरांना विरोध न होता, उलट त्यांच्यावरच बहिष्कार घातला गेला. तेव्हा सरकारचे सहाय्य घेवून या अनिष्ट रुढींना कायद्याने बंदी आणण्यास प्रयत्नशील राहिले आणि सती प्रथेवर बंदी आणण्यात यश मिळविले. पुढे त्यांची ही धार्मिक सुधारणा चळवळ दयानंद सरस्वती, रामकृष्ण परमहंस, न्यायमूर्ती रानडे, आगरकरांनी पुढे चालू ठेवली. या सुधारकांनी आपल्या हिन्दू धर्मातील दोष नष्ट करुन समानतेच्या तत्वावर आधारित नवीन समाजरचना निर्माण करणे हा उद्देश ठेवला होता. त्यांनी धार्मिक सुधारणा चळवळीला राष्ट्रीय स्वरुप देण्याचा प्रयत्न केला होता. देशातील राजकारणातील उदारमतवादाचे तत्व धार्मिक क्षेत्रात आणण्याचा प्रयत्न केला होता.

धर्माच्या क्षेत्रातील लहानसहान गोष्टीला उच्च प्रतिष्ठेचे स्वरुप देवून तो प्रश्न धार्मिक पंडितांनी आणि सनातनी समाजाने चिघळत ठेवण्याचा

प्रयत्न केला गेलेला दिसून येतो. यात काही बाम्हधोय सुधारकांचाही पाठिंबा मिळाल्याने एकोणिसाव्या शतकातील धार्मिक चळवळी वैशिष्ठ्य पूर्ण ठरल्या. रानडे, टिळक यांची धर्मावर श्रद्धा होती, पण धर्मकल्पना विभीन्न असल्याने त्यांच्यात वैचारिक संघर्ष निर्माण झालेला दिसून येतो. आगरकर जे मिल्ल स्पेन्सरच्या विचारांनी प्रभावित राहिल्याने धर्माचे श्रेष्ठत्व मानवी जीवनात त्यांनी नाकारले होते. त्यांनी मात्र रानड्यांच्या धार्मिक सुधारणेला पाठिंबा दिला. धर्मसुधारणेच्या बाबतीत रानड्यांचे विचार व्यापक असल्याने आगरकरांनाही त्यांचे विचार पटत असल्याने ते आपल्या लेखांमधून त्यांच्या कार्याची प्रशंसा करीत, असे त्यांच्या लिखाणा-वरून आढळून येते. रानड्यांना धार्मिक सुधारणाबाबत खरा संघर्ष सनातनी समाजाबरोबरच टिळकांशी करावा लागला. टिळक हे समाजाचे पुढारी असल्याने त्यांनी केलेल्या विरोधाला संघर्षाचे स्वरूप प्राप्त झाले होते. तरीही त्यांनी रानड्यांचे श्रेष्ठत्व मान्य केले होते. ज्योतिराव फुल्यांनीही धर्म सुधारणेची चळवळ सुरू करून इ.स. १८५३ ला सत्यशोधक समाजाची स्थापना करून मानवतावादी धर्माचा पुरस्कार केला होता. धर्मंडित व कर्मकांडा-विरूद्ध आवाज उठवून मानवाला मानव म्हणून प्रतिष्ठा देणारा नवीन मानव धर्माचा पुरस्कार केला होता. पण त्यांचे कार्य महाराष्ट्रापुरतेच मर्यादित राहिले होते. ज्यो. फुले रानड्यांचे समकालीन असले तरी त्यांच्या कार्यकक्षा वेगवेगळ्या ठरल्या होत्या. रानड्यांना संपूर्ण समाजाला घेवून आपले कार्य करण्याचे ध्येय होते.

ख्रिश्चन धर्माच्या अभ्यासामुळे पाश्चिमात्य शिक्षणामुळे धर्मा-विषयीच्या परंपरागत कल्पनांचा पुर्नविचार करणे अनिवार्य झाले आहे असे भारतातील पहिल्या सुशिक्षित पिढीला वाटू लागले होते. त्याच विचार-मंथनातून दादोबा पांडुरंगांनी सुरतला "मानव धर्म सभा" व नंतर मुंबईला "परमहंस सभा" स्थापन केली होती. त्यानंतर परमहंस सभा बंद पडल्यानंतर

त्याच सभेच्या सभासदांनी डॉ॰ आत्माराम पांडुरंग यांच्या घरी ३१ मार्च १८६७ ला रविवारी "प्रार्थना समाज" ही संस्था स्थापन केली॰ या पहिल्या उपासनेला न्या॰ रानडे उपस्थित होते किंवा नाही याला निश्चित पुरावा नाही॰ पण प्रार्थना समाजाचे प्रमुख आचार्य म्हणून रानडे आणि भांडारकरांचा उल्लेख केला जातो॰ ३० जुलै १८६७ ला प्रार्थना समाजाची तत्वप्रणाली जाहिर करण्यात आली॰ त्यांनी संस्थेचे स्वरूप हिंदू धर्मातील एक सुधारक पंथ ही वृत्ती कायम ठेवली होती॰ त्यांना मूर्तीपूजा, अवतार ह्या कल्पना मान्य नव्हत्या॰ परमेश्वराने कोणताही ग्रंथ निर्माण केलेला नाही॰ त्यामुळे एकही धर्मग्रंथ निर्दोष आहे असे म्हणता येणार नाही, असे त्यांना वाटत होते॰ ईश्वराचे स्वरूप अनंत, शाश्वत, सर्वसाक्षी, सर्वशक्तीसंपन्न, दयाघन, पवित्र असल्याने त्याची खरी पूजा म्हणजे त्याचे गुणगौरव करणे, सत्कार्य करणे, सर्वच ईश्वराची लेकरे आहेत॰ प्रार्थनाही आत्मिक उन्नतीसाठीच करायची असते, भौतिक फलप्राप्तीसाठी नव्हे असे ह्या समाजाचे उद्देश होते॰ या समाजाचे अनुयायी दर रविवारी एकत्र येवून उपासना करीत॰ पुढे पाच वर्षांनी यात सुधारणा करण्यात आली॰ डॉ॰ भांडारकरांनी प्रार्थना पध्दतीच्या कार्याविषयी माहिती देतांना म्हटले की, "त्या वेळच्या उपासनामध्ये उद्‌बोधन, स्तवन, प्रार्थना, उपदेश असे जे आज भाग आहेत तसे नव्हते; प्रार्थना करावयाची व एक निबंध वाचायचा प्रघात असे ------ हल्ली जे प्रार्थना संगीत आहे, तसे त्यावेळी नव्हते॰ त्यावेळी पाद्रि यांचे "रत्नमाला" नामक पुस्तक होते॰ त्यातील पद्ये म्हणण्याचा प्रघात असे॰ ------ त्यानंतर वाचण्यापेक्षा बोलणे बरे असे वाटून तो क्रम सुरु झाला॰ ------ एक वर्षी आम्ही तुकारामाचे काही अभंग घेतले व ते सर्व मंडळीस फार आवडले॰ ------ आपल्या सिध्दान्तास जुळतील असे विचार उपनिषद अर्वाचिन साधुसंत, पाश्चात्य ग्रंथकार यांच्याही आधारे सादर करण्यात येतात॰"[६] प्रार्थना समाजाच्या

उपासनेला तुकारामाचे अभंग, उपनिषदातील उद्बोधक वचने, समर्थांचे समग्र वाङ्मय त्याचबरोबर बायबल वर्डस्वर्थ व ब्राऊनिंग सारख्या अध्यात्मप्रवण कविता, उतारे विवेचन शेवटी आत्मनिरिक्षण होवून श्री• जगदिशाची प्रार्थना असा उपक्रम या संस्थेने ठेवला होता•

मुंबईनंतर ही प्रार्थनासभा पुण्यामध्ये इ•स• १८७० मध्ये श्री• मोडक यांनी स्थापन केली होती• मुंबईतील वास्तव्याच्या काळात रानड्यांच्या विचारसरणीवर प्रगत विचारांचा विचार व तत्वज्ञानाचा प्रभाव पडलेला होता• रानडे यांचे सहध्यायी भांडारकर, मोडक, वागळे यांनी आधुनिक जीवनपध्दतीचा पुरस्कार केला असला तरी त्यांनी आपल्या धर्मभावनांचा संपूर्ण त्याग केलेला नव्हता• रानडे यांच्याबरोबरच त्यांनाही हिन्दू धर्माचा खोलवर अभ्यास करुन धर्माच्या मूळ स्वरुपाचे सम्यक ज्ञान प्राप्त करुन नंतर धर्मसुधारणा करावी असे त्यांना वाटत होते• शुध्द धर्माचे स्वरुप लोकांना कळल्यानंतर त्यांच्या आचरण तत्वावर फरक पडून समाज सुधारणा होण्यास मदत होईल, अशी या मंडळींना आशा वाटत होती• त्यासाठीच त्यांनी धर्मसुधारणेच्या चळवळीला लोकांचा पाठिंबा मिळावा म्हणून धर्मासारख्या श्रध्दास्थानाचे पुनरुज्जीवन करण्याचा प्रयत्न केलेला दिसून येतो• मुंबई मध्येच त्यांनी आपल्या कार्याला सुरुवात केली होती•

रानड्यांच्या नेतृत्वामुळे प्रार्थना समाजाचे उपक्रम विस्तारले होते• त्यांनी प्रार्थना समाजाची तत्वे सर्व समाजाला ज्ञात व्हावी या उद्देशाने "Theists confession of faith" [एकेश्वर निष्ठाची कैफियत] या शीर्षकाची लेखनमाला इंग्रजी व गुजराती वृत्तपत्रात प्रसिध्द केली• त्यावर नंतर पुस्तकही लिहिले गेले• यात प्रार्थना समाजाची तत्वे विशद केली आहेत• हे पुस्तक १८७३ ला लिहिले गेले• त्यात एकोणचाळीस कलमे आहेत• त्यात पंचवीस कलमात विचार आणि तत्वमिमांसा आणि

चौदा कलमात आचरणावर भर देणारी तत्वे आहेत, या तत्वप्रणालीत परमात्म्याचे सत्-चित्त-आनंद स्वरुप मान्य केले आहे.[७] या संस्थेने रानडेंच्या काळात संगत सभा, धार्मिक उत्सव सुरु केले. या सभेच्या शाखा अहमदनगर, नाशिक, अहमदाबाद इ. ठिकाणी स्थापन करण्यात आल्या होत्या. रानड्यांच्या जीवनाची तात्त्विक बैठक अध्यात्मिक असल्यामुळे त्यांनी आयुष्यभर धर्म विचाराचे चिंतन, मनन करीतच समाजकार्य केलेले आहे. सार्वजनिक जीवनातील आशावादी व प्रयत्नशीलतेचे मर्म "सत्यमेव जयते" या श्रध्देत आढळून येते; असे त्यांचे मत होते. Theists confession of faith मध्ये रानडे म्हणतात की, "एका ईश्वराबद्दलच माणसाने पुज्यभाव, श्रध्दा व प्रेम बाळगावे याची शिकवण माणसाला देणे, आपल्या सहजप्रवृत्ती, बुध्दी, सद्सद्विवेक, आणि धार्मिक भावना यांच्या माध्यमातून हाती लागणाऱ्या ईश्वरी नियमाचे माणसाने स्वेच्छ्या व जाणीवपूर्वक पालन करावे ही शिकवण माणसाला देणे आणि उच्चतर अस्तित्वासाठी पात्रता कमावण्याची शिकवण देणे हे ह्या धर्माचे लक्ष्य व तोच धर्माचा विषय आहे, असी एकेश्वर वाद्यांची भावना आहे. - ईश्वराच्या अस्तित्वाची कल्पना आणि माणसाचे आत्मभान यांचा एक अटळ अन्योन्य संबंध आहे. माणसाचे आत्मभान अटळ्णे ईश्वराचे अस्तित्व कल्पिते आणि ती कल्पना केल्यावरच त्या आत्मभानाला परिपूर्णता व समाधान प्राप्त होते. यात कोणत्याही प्रकारचा अंतर्विरोध नाही.[८] या ग्रंथामध्ये त्यांनी धर्मसुधारणा करतांना समाजसुधारणा कशया आपोआप घडून येवू शकतात या गोष्टीचे विश्लेषण केले आहे. सामाजिक तत्व हे धर्मातील आचारणाचाच एक भाग आहे हेही स्पष्ट केले आहे.

रानड्यांनी प्रार्थना समाजामधील उपासना सभेत धार्मिक विषयावर अनेक व्याख्याने दिली आहेत. या व्याख्यानांचा उद्देश केवळ भजन, ईश्वरभक्ती किंवा उपदेश नव्हता तर प्रवचनाद्वारे हिन्दू धर्मातील आवश्यक

धर्मसुधारणेच्या चळवळीचे महत्व व कृती करण्यावर लोकांचे लक्ष आकर्षित करणे होता. त्यासाठी रानडे ऐतिहासिक दाखले देऊन चिकित्सकरित्या त्याचे मूल्यमापन करीत असत. आपल्या एका व्याख्यात ते म्हणतात की, "ज्या धर्मासंबंधी व सामाजिक बाबतींचा आपल्या लोकांमध्ये निकटचा संबंध असतो, त्यात सुधारणा करण्याविषयी इतकी खटपट व इतका हट्ट का हा प्रश्न सहजच निघतो. ----- हा पाश्चात्य शिक्षण मिळाल्याचा परिणाम नसून पूर्वीपासून आहे, हे नवीन बंड उपस्थित झालेले नाही. हे आपल्या देशाचा इतिहास पाहिला असता बौध्द, जैन हे धर्म, तसेच शंकर, रामानुजम, माधव, वल्लभ व स्वामिनारायण हे एकामागून एक झालेले संप्रदाय याच गोष्टींची साक्ष देतात."[१] रानडे संतवाङ:मयाचे उपासक होते. त्याचबरोबर सुशिक्षित पिढीचा साद्रूप्यपणा त्यांच्यामध्ये होता. त्यामुळे कोणतीही गोष्ट अंगिकारतांना मानवी मूल्याच्या दृष्टीकोनातून योग्य काय व अयोग्य काय याचे निकष लावून मग स्विकारीत असत.

रानडे श्रध्दाळू वृत्तीचे असल्याने त्यांच्या जीवनावर संताच्या कार्याचा प्रभाव पडलेला होता. त्यांच्या मते शिवाजींच्या कार्याला अनुकूल अशी पार्श्वभूमी संताच्या कार्यामुळेच महाराष्ट्रात तयार झाली होती. त्यामुळेच संत वाङ:मय हे धार्मिक सामाजिक राजकीय क्षेत्रात सर्वश्रेष्ठ ठरले आहे. संतवाङ:मय निवृत्तीपर वृत्तीचे आहे, रानडे प्रार्थना समाजामधील उपासनेत तुकारामाच्या अभंगाचे निरूपण करीत असत. तुकारामाचे अभंग सदैव त्यांच्या तोंडी असत. नामदार गोपाळकृष्ण गोखल्यांनी रानड्यांच्या संबंधी एक आठवण लिहिलेली आहे. इ.स. १८९७ ला रानडे व गोखले अमरावती कांग्रेसकून परत येत असतांना रेल्वेच्या डब्यात सकाळी चार वाजता पासून रानडे तुकारामाचे अभंग पुन्हा पुन्हा म्हणत होते. विशेषत: "जे का रंजले गांजले। त्यासी म्हणे जो आपुले। तोची साधु ओळखावा। देव तेथेचि जाणावा। करी मस्तक ठेंगणा। लागे संताच्या चरणा। जरी व्हावा

तुज देव। तरी हा सुलभ उपाव।"हे अभंग सदैव रानड्यांच्या मुखात असत. स्वतःच्या आयुष्यात याप्रमाणे आचरण करण्याचा सतत प्रयत्न त्यांनी केला. या अभंगातील आदर्श किती सोपा पण त्याचबरोबर किती उदात्त आहे. त्या दिवशीचा पहाटेचा तो देखावा माझ्या आयुष्यातील मोलाचा क्षण होता व तो देखावा माझ्या स्मरणात सदैव राहिला."[१०] एकदा प्रार्थना समाजाचे प्रचारक सदाशिवराव केळकर यांनी तुकारामांचा अभंग "नारायणी जेथे घडे अंतराय। हो का मायबाप त्या जावे ते", याचे आपल्या निरूपणात समर्थन करण्याचा प्रयत्न केला. तेव्हा रानड्यांनी त्यावर आपले मत मांडतांना म्हटले की, आपणांस सत्य वाटणाऱ्या गोष्टींचा आग्रह धरून वडिलांच्या मनाला दुःख देणे योग्य नव्हे. जसा काही गोष्टींचा आपल्यावर पगडा असतो तसाच विरुद्ध गोष्टींचा वडिलांच्या मतावर आग्रह असतो. मग आपलाच हेका पुरविण्यात अधिकार कोणता ? वडिलांची समजूत घालावी आणि समजूत पटल्यावर उभयतांनी त्या गोष्टीचा पुरस्कार करण्यास प्रवृत्त व्हावे. सत्यासत्याबद्दल बालंबाल खात्री होवून ज्यांनी कोणाची पर्वा न ठेवता ईश्वराची उपासना केली, ते पावन पुरुष धन्य होय, राज्याचा कायदा अन्यायाचा आहे, हजारो लोकांना त्रास होत आहे, लोकांचे अकल्याण होत आहे, तेव्हा सत्यासत्याच्या जोरावर एकदम एकानेच तो कायदा मोडल्याने फायदा होणार नसून कायद्याबद्दलचे आपले विचार दुसऱ्यांच्या मनात भरवून देण्याचे उद्योग चालू ठेवावे. सर्वांचा समज आपल्याप्रमाणे झाल्याने काही काळात तो कायदा मोडला जाईल. [गांधीच्या कायदेभंग चळवळीप्रमाणे] घरच्या वहिवाटीचा तसाच प्रकार आहे. कपाळाचे कुंकू लावण्यात व हातात बांगड्या वागविण्यात काही हाशील नाही. म्हणून कुंकू पुसण्याचे व बांगड्या फोडण्याचे कृत्य करता येणार नाही. घरच्या मंडळीशी नित्य प्रसंग असतो त्यास सदुपदेश करून मत वळवावे."[११] असे मत रानड्यांच्या व्यावहारिक दैनिक जीवनशैलीशी सुसंगत राहिले होते.

प्रार्थना समाजाच्या उपासनेत अनेक विषयांचा समावेश होता. जीवनाच्या सर्वांगाशी संबंधित विषयांवर चर्चा केली जात असे. अध्यात्मावर भर असला तरी मूर्तीपूजेचा विरोध केला होता. प्रार्थना समाज हे समाजाच्या धार्मिक उध्दाराचे एक साधन आहे अशी त्यांची भावना असल्याने ईश्वराच्या अव्दितीय स्वरूपाचे आकलन करून त्याच्या विराट, नैसर्गिक स्वरूप समजावून देण्याचा सतत प्रयत्न करीत. चांगल्या, वाईट गोष्टी ह्या पापपुण्याच्या चौकटीत घातले गेल्याने साहजीकच समाजात होणाऱ्या वाईट गोष्टींवर आळा बसतो. पापभीरू मनुष्य वाईट गोष्टी टाळून चांगले कृत्य करण्यास प्रवृत्त होतो. त्यामुळे सामाजिकच नीतीमत्तेचा स्तर आपोआपच उच्च दर्जावर पोहचतो म्हणजेच धर्मसुधारणा चळवळ समाज सुधारणेचेही कार्य करीत असते. हेच त्यांनी आपल्या व्याख्यानातून व्यक्त केले आहे.

"When mind it self is made the object of knowledge one becomes capable of discriminating between good and evil. This faculty is called viveka or vijnana. Vijanana is the basis of morality, law, polictis and household arrangements."[12]

प्रार्थना समाजातील काही सभासदांनी रानड्यांना नास्तिक मूर्तीपुजक म्हटले आहे. प्रार्थना समाजाचा मूर्तीपूजेला विरोध होता. एकेश्वरवाद मान्य केला होता. रानड्यांना हिन्दू धर्मामध्ये सुधारणा घडवून आणायची होती. हिन्दू धर्माचा त्याग करायचा नव्हता. धर्मातील अनिष्ट गोष्टी त्याज्य ठरवून धर्मात माजलेले अवडंबर कमी करायचे होते. त्यासाठी त्यांनी धार्मिक सुधारणा करतांना नेमस्ताची भूमिका स्विकारलेली होती. त्यांची ईश्वरोपासना चिंतनशील व क्रियात्मक प्रवृत्तीची होती. त्यांनी आपल्या ईश्वरवादाच्या श्रध्देला भागवत धर्माचे स्वरूप दिले होते.

आपली डोळस श्रद्धा ज्ञानाच्या आधारे मानवतावादी दृष्टीकोनात परिवर्तीत केले होते. त्यांनी मोरोपंताच्या "केकावली" परिक्षण करतांना मोरोपंताच्या परमेश्वराच्या गुणवर्णनाची प्रशंसा केली असली तरी त्यातील दोषही दाखविले होते. ईश्वराविषयी भक्तांच्या मनात नम्रपणा या गुणाची आवश्यकता आहे व ही कमतरता केकावलीत आहे हेही दाखवून दिले होते. ईश्वराविषयी त्यांची वृत्ती उपासकाचीच आहे हे दिसून येते.

रानडे ईश्वरोपासना करतांना कोणत्याही धर्मग्रंथावर अवलंबून राहिले नाहीत किंवा वेगवेगळ्या धर्मग्रंथाचे साधर्म्य शोधण्याचा प्रयत्न केला नाही तर इतिहास, विज्ञान आणि मनुष्याच्या अंतर्प्रवृत्तीवर विश्वास ठेवून धर्मसुधारणेकडे लक्ष दिले होते. प्रार्थना समाजाचा उद्देशच धर्मसुधारणेचा पर्याय नि समाज सुधारणेचा एक मार्ग असल्याने या संस्थेतील लोकांनी या कार्यावर लक्ष केंद्रित केले होते. "The Theists believes that God reveals himself in external nature and in the inner world of our mind and in History. These are his permanent and public revelations."[13] रानड्यांनी इतिहासातील घटनांचा अन्वयार्थ लावून वैज्ञानिक दृष्टीने आकलन करून मानवी जीवनाचे प्रवाह निश्चित केले होते. आपली ईश्वरभक्ती जर विज्ञान व इतिहासाविरूद्ध प्रवाहित होत असेल तर काही काळ थांबून त्यावर चिंतन केले पाहिजे, हीच खरी ईश्वरी योजना त्यांना वाटत होती. "If indeed History and science both declared against us, we might find it necessary to pause."[१४] आपली भूमिका इतिहास व विज्ञानाशी सुसंगत आहे हे ही स्पष्ट केले आहे. त्याचबरोबर धार्मिक जीवनातील ईश्वराच्या बरोबरीचे स्थान व्यक्तीला मिळू नये. त्याचे कर्तुत्व असामान्य असले तरी ईश्वराची परिपूर्णता त्याच्यामध्ये येवू शकत नाही. असामान्य व्यक्ती वरील श्रद्धा ही आपल्या विचारशक्तीला मारक ठरणार नाही

याची काळजी प्रत्येकाने घेतली पाहिजे नाहीतर त्याच्यामध्ये बौध्दिक गुलामगिरी निर्माण होऊ शकेल. एकनिष्ठ कार्यप्रवण बुध्दी म्हणजेच श्रध्दा होय म्हणून धर्मविचारात विवेकबुध्दीचे स्थान असणे महत्वाचे आहे असे रानड्यांचे मत होते. "The Theists acknowledges no distinction between the province of reason and the provice of faith in matters of religion, faith is practical and earnest reason. Authority has therefore, no more potent claim in matter of than in kindred social and political science. It is to be revered and not lightly questioned, but beyond this the immunity does not extend to prohibit the use of the reason in matters of faith."[15] अशयाप्रकारे रानड्यांना धर्म व विवेकबुध्दी हे एकच स्वरूप आहे असे वाटत होते.

रानड्यांनी प्रार्थनासमेत भागवत धर्मावर नऊ व्याख्याने दिली. या व्याख्यानामधून योगकर्म, ज्ञानकर्म आणि मनुष्यकृती वर त्यांनी भर दिला आहे. त्या व्याख्यानातून देशाच्या सामाजिक परिस्थितीचे अवलोकन करून काळानुरूप लोकांना चालण्याचा उपदेश केला आहे. हिन्दू धर्माला सनातन आर्यधर्माचे संबोधन देवून खरी सनातन परंपरा विकसनशील आहे, भागवत धर्म हेच त्याचे विकसीत रूप आहे असे त्यांनी म्हटले आहे. सनातन आर्यधर्माची वैशिष्ठ्य त्यात सांगितली आहेत. ईश्वराचा व मनुष्याचा परस्परसंबंध परमात्मा व जीवात्माचा संबंध अंतप्रेरणेने निर्माण झालेला असतो. त्याला ईश्वराची आराधना करण्यासाठी चर्च, धर्मगुरू, पुजारी, मंदिरांची आवश्यकता नाही, असे त्यांचे मत होते. हिन्दू धार्मिक परंपरेची त्यांनी चिकीत्सकपणे चर्चा केली आहे. विज्ञान, स्वर्ग, नरक, सिध्द साधक साध्य, भक्तीमार्ग चित्तशुध्दी, धर्मानुशासन सृष्टी, जीवात्मा

परमात्मा संबंध, उन्नत धर्मविचार, प्रार्थना समाजाची आवश्यकता, ल्यूथरचा काळ, खिस्ती धर्म व हिन्दू धर्म, ज्ञानेश्वर, रामदास एकनाथ, भागवतधर्म मिमांसा रुक्षेवर बाबांची कैफियत इ. अनेक विषयांवर व्याख्याने दिली आहेत. रानड्यांच्या मते मनुष्य हा कधीच परिपूर्ण नसतो. तो सतत पूर्णत्वाच्या शोधात असतो. श्रध्दा आणि बुध्दी यांचा परस्पर संबंध असतो. मनुष्याची श्रध्दा बुध्दीवादी दृष्टीकोनातून प्रगट झाली असेल तर तिला डोळस श्रध्दा म्हणता येईल. पण तीच श्रध्दा अंधानुकरणाने केली असेल तर अंधश्रध्दा ठरेल व अंधश्रध्दा मानवी जीवनाला केव्हाही घातकच ठरेल. तेव्हा मनुष्याने आपली श्रध्दा श्रेष्ठ व्यक्तीमध्ये निहित केली असेल तर त्याचे श्रेष्ठत्व कोणत्या कृतीने प्रगट झाले याचे आकलन करून घेणे आवश्यक आहे. ती श्रेष्ठ व्यक्ति कुठल्याही देशाची, धर्माची प्रेषक, संत, तत्वज्ञ, इतात्मा देवी असो, त्याचे दृष्टेपण उज्वल प्रतिमा अमोघ वक्तृत्व नितीधैर्य, समर्पणशीलता ही त्यांना लाभलेली दैवी देणगी समजून प्रत्यक्ष वाणी वा कृती यामधून ईश्वरी तत्वाचा, उपासनेचा साक्षात्कार होतो किंवा नाही याकडे पाहिले पाहिजे. तरच त्याची श्रध्दा डोळस राहील व त्याची कृतीही ईश्वरी योजनेनुसार कार्यप्रवाहित राहिल. म्हणजेच बुध्दी व श्रध्देचा संगम होवून विवेकबुध्दीने केलेले कार्य महत्वपूर्ण ठरेल असे त्यांना वाटत होते. त्यांची धर्मविचार प्रवृत्ती संकुचित नव्हती. आपली कृती जर योग्य दिशेने प्रवाहित करायची असेल तर त्यासाठी लागणारे श्रध्दास्थान मार्गदर्शनही योग्यच असावे लागेल. केवळ दुस-याने केले म्हणून त्याचे आपण अंधानुकरण करणे बरोबर नव्हे असे त्यांचे मत होते. त्यांचे धर्माविषयीचे विचार प्रगल्भ सखोल होते. रानडे यांनी भागवतधर्माला सनातनी आर्यधर्माचे सुवासिक व मधूर फळ म्हटले आहे. त्यांनी प्रार्थना समाजाच्या सभेत "भागवत धर्म" विषयीचे आपले विचार मांडले या नऊ व्याख्यानामधील पहिल्या व्याख्यानात ते धर्मातील थोर पुरुषाविषयी म्हणतात की, "अलीकडे राजकीय प्रकरणात जसा उद्योग व चळवळ दिसत

आहे, तितकीच किंबहुना अधिक, धर्मसंबंधाने निराशा व उदासीनता दिसून येते. त्यामुळे धर्माच्या ख-या स्वरूपाची समजूत लोकांस करून देण्याविषयी व्हावा तसा यत्न होत नाही, म्हणून आपणासर्वांस मान्य अशा साधु पुरुषांचे या अत्यंत महत्वाच्या बाबतीत काय विचार होते, हे माहीत करून घेणे आवश्यक आहे." ----- कारण ज्या काळात त्यांचा जन्म होतो त्या वेळच्या आचारविचारांचा त्यांच्यावर परिणाम सहजी घडतो. ते जरी सामर्थ्याने व बुद्धीप्रभावाने इतर लोकांहून श्रेष्ठ असतात, तरी कालरूपी प्रवाहाच्या सर्वथा विरुद्ध जाणे फारच दुरापास्त आहे. या गोष्टीची सत्यता येशू ख्रिस्त, महमंद, तुकाराम आदिकरून साधु पुरुषांची चरित्रे पाहिली असता ----- ते थोर पुरुष व आपण सर्व उदकाच्या प्रवाहाप्रमाणे एकसारख्या चालत आलेल्या कालप्रवाहाचे व कर्मपरंपरेचे परिणाम आहोत. त्यामुळे त्यांचा व आपणासर्वांचा निकट संबंध आहे हे लक्षात ठेवून त्यांच्या ग्रंथात विशेष गुणदर्शक शब्द, सरळ व सुविचाराचा जोभाग असेल तो प्रांजल बुद्धीने व आदराने स्वीकारण्यास आपण तयार असावे हे आपणा सर्वांस उचित होय."[१६] रानडयांनी भागवत धर्म व भक्तिमार्गाला सर्व काळाचे व सर्व धर्मांची एकवाक्यता करणारा धर्म आहे असे म्हटले आहे. तसेच दुस-या व्याख्यानात ते म्हणतात की, "भागवत धर्म जाणून काही उपयोग नाही तर ते ज्ञान वृत्तीतच आले पाहिजे."[१६] त्याशिवाय आपल्यामध्ये सहिष्णुवृत्तीचा विकास होणार नाही असे त्यांना वाटत होते. खोलवर विचारचिंतनाची त्यांना सवय जडल्याने प्रत्येक गोष्टींविषयी सखोल ज्ञान प्राप्त करीत असत. त्यामुळेच त्यांच्या विचारात परिपूर्णता, गांभीर्य सखोलपणा आढळत असे.

रानडे यांनी आपल्या तिस-या व्याख्यानात एकनाथ महाराजांनी वर्णाश्रमासंबंधी कर्ममार्गाचे स्वरूप कसे निगडित आहे ते सांगितले आहे. ह्याचे विश्लेषण करतांना ते म्हणतात की, "सृष्टीतून सर्व धर्म अनुयायी

लोकांमध्ये असतो व ती सर्वत्र विधिनिषेधरूपी म्हणजे शास्त्रविहित कर्म करणे व तन्निषिद्ध जी, त्यांचा त्याग करणे अशा प्रकारचा असतो.----- आपल्या या आर्यभूमीत त्याचे विशेष लक्षण जे आहे ते हेच की, तो वर्णाश्रम धर्माशी संबंध आहे." याचे स्पष्टीकरण करतांना त्यांनी एकनाथांनी सांगितलेल्या दोन ओव्या सादर केल्या. त्यातील एक ओवी पुढीलप्रमाणे, "भगवत्ताप संत लक्षणे । स्वधर्म कर्मा ऐसे दंडणे ।। वर्णाश्रमाचा ठाव पुसणे । होळी करणे कर्माची ।। १ ।। " याचे विश्लेषण करतांना ते म्हणतात की, "भगवंताच्या भक्तीत तल्लीन असून तद्द्वारा परमेश्वर प्राप्ती होईल असा ज्या पुरुषाचा दृढ विश्वास आहे त्याचा विधिनिषेध रूपी कर्ममार्ग केवळ दास बनतो. ----- हा वर्णाश्रमधर्म रूपी विधिनिषेधात्मक जो कर्म मार्ग त्याचे बंड यादेशात योगमार्ग व ज्ञानमार्ग या दोहोपेक्षा फारच अधिक असल्यामुळे एकनाथ महाराजांचा त्यावर कटाक्षही अधिक आहे. योगमार्ग व ज्ञानमार्ग यांच्यापेक्षा भक्तिमार्गाची श्रेष्ठता सिद्ध करितांना ते कठीण, दुष्कर व सर्वांस गम्य नाहीत एवढेच उणीव दाखविली आहे."[१७] रानड्यांना एकनाथांनी पुरस्कारलेला कर्ममार्ग जास्त योग्य वाटत होता. धर्माची पाळेमुळे निकोप रितीने समाजात रुजण्यासाठी त्याचे आकलन सर्वसामान्यापासून विद्वानांपर्यंत सर्वांनाच व्हावे. त्याचे चांगलेपण स्विकारणे, त्यातील क्लिष्टता काढून घेऊन त्यातील उणीवा कमी करणे, हे कार्य धर्मात सतत होत राहिले तर धर्म प्रवाहित राहिल असे त्यांचे मत होते. म्हणून त्यांनी योगमार्ग, ज्ञानमार्गापेक्षा कर्ममार्गावर जास्त लक्ष केंद्रित करुन समाजाचे प्रबोधन घडवून आणावे असे ठरवून व्याख्यानाचे नियोजन केले.

रानडे यांनी आपल्या चौथ्या व्याख्यानात कर्ममार्गाचे लाभ व दोष स्पष्ट केले आहेत. यात ते म्हणतात की, "जशी योगमार्गात निष्ठूरता, कठोरपणा अधिक व ज्ञानमार्गात अभिमान प्रबल, तशीच

कर्ममार्गात जडता विशेष असते. कर्ममार्गात मनुष्य एकदा गढून गेला म्हणजे सारा जन्म ह्यातच गुंतून असतो. इतकी कर्माशी एकरूपता व जडता झाली म्हणजे त्यापासून फायदा काय ? कारण जडता व प्रेम ही एकाच ठिकाणी नांदत नाही. आपण चैतन्यरूपी असता जडतेच्या आधीन झालो, तर आपण प्रेमरहित होतो हाच काय तो संस्कार होतो." तेव्हा कर्ममार्गातील ही जडता टाळायची असेल तर भक्तिमार्गाचा अवलंब करावा म्हणजे समाजातील सर्वांशी समतेच्या, बंधुत्वाच्या भावनेने आचरण करण्यास प्रवृत्त होतो. कारण भक्तीमार्गामध्ये जातिभेद, स्त्रीपुरूष असा भेद राहत नाही याबद्दल ते पुढे म्हणतात की, "भजनाच्या प्रारंभी साधूंस नमन करण्याची चाल आहे. त्यावेळी नामदेव, एकनाथ, तुकाराम वगैरे साधूंस नमने झाल्यावर कबीर, शेख महंमद यासही नमन करितात."[१८] कर्तृत्वाने श्रेष्ठ असलेल्या व्यक्तीचे श्रेष्ठत्व मान्य करतांना जात, धर्म, वर्ण हे त्याज्य ठरतात. त्या व्यक्तीचे कार्य महत्वाचे असते, असे रानडे यांचे विचार होते.

पाचव्या व्याख्यानात रानड्यांनी 'सृष्टी नियंताच्या नियमानुरूप आपले जीवनकार्य करतांना परमेश्वराच्या अस्तित्वाची जाणीव ठेवून आपल्या मनोवृत्तीला संयमीत ठेवल्यास आपल्या जीवनात स्वैराचाराला वाव मिळणार नाही. उलट आपल्या मनोवृत्तीस चांगले वळण लागून संयमी वृत्ती विकसीत होईल व आपल्या हातून चांगले कार्य घडेल. मनात जास्त लालसा उत्पन्न न होऊ देता त्या वस्तूविषयी, गोष्टीविषयी मर्यादित गरज पूर्ण करण्याची इतपत इच्छा ठेवावी व ते घेतांना त्यांचा उत्पन्नकर्ता व दाता यांचे चिंतन करावे; हाच आपला अधिकार व हेच आपले कर्तव्य, या भावनेने कुठलेही कार्य केले तर त्या कार्याचा अतिरेक होणार नाही व ते कार्य सिध्दीस जाईल हेच भागवत धर्माचे स्वरूप आहे[१९] असे रानड्यांनी आपल्या विवेचनात स्पष्ट केले आहे. त्याप्रमाणे सहाव्या व्याख्यानामध्ये त्यांनी आपल्या कार्यामुळे समाजात जे चांगले, वाईट पडसाद उठतात त्याबद्दल आपल्या

मनात निराशा उत्पन्न होऊ शकते. पण "भगवंताला अर्पण करण्याच्या हेतूने कर्म करीत असता लोकांच्या प्रशंसेमुळे हर्ष किंवा निंदेमुळे विषाद होत नाही व प्रत्येक कर्माच्या सभोवती भक्तीचे कवच बनत जात असते.---- म्हणजे मग त्यायोगे प्रसन्नता, अनुराग, शांति व एकप्रकारचे धैर्य उत्पन्न होते."[20] हे त्यांच्या व्याख्यानाच्या विवेचनाचे सार होते. रानड्यांना सार्वजनिक कार्य करतांना समाजाकडून जो विरोध होत होता ते सहन करण्याची प्रवृत्ती त्यांनी या भक्तीमार्गातून, भागवतधर्माच्या विचारातूनच आत्मसात केलेली होती.

सातव्या व्याख्यानामध्ये हिन्दुधर्मातील कर्मकांडामुळे लोकांना जे सुख व दु:ख प्राप्त होतात त्याची मूल्ये समाजाने ठरविली आहेत, त्यामुळे आपल्या कर्मकांडात कोठेतरी कमतरता आहे अशी जाणीव ठेवून ते कर्मकांड कठोरतेने करतात. त्याचा व्यवहारिक वा मानवतावादी दृष्टिकोन मागे पडून त्यांच्या कार्यास जडत्व प्राप्त होते व त्याचे विपरित परिणाम मानवी जीवनावर होतात. तेव्हा सुखदु:खाकडे पाहण्याचा दृष्टिकोन स्वसुखा पलिकडे ठेवल्यास ईश्वराच्या जवळ जाण्याचा मार्ग सापडेल कारण "धर्माचा व सदाचरणाचा साध्य, प्राप्य हेतु सुख किंवा दु:ख ही दोन्ही नाहीत. परमेश्वराच्या राज्यव्यवस्थेत या दोन्हींचे मिश्रण आहे. सिद्धान्ताची एक गोष्ट मनात धरिली पाहिजे, ती ही की, सुखप्राप्ति अथवा दु:खनाश ह्या केवळ धर्माच्या दोऱ्या आहेत व आपणांस घोड्याच्या ठिकाणी विशेष योग्यता आणावयाची आहे."[21] म्हणजेच केवळ सुखाचा विचार करून दु:खी होवू नका, तर ते कार्य इतरांसाठी कितपत उपयुक्त ठरेल याचा विचार करून धर्माचे आचरण केले तर समाजात नीतीमत्ता, सहिष्णुवृत्ती वाढेल व धर्माचे जडत्व नष्ट होवून समाजोत्कर्षासाठी धर्माचा उपयोग होवू शकेल असे विचार त्यांनी आपल्या धार्मिक व्याख्यानात मांडले होते. आपल्या आठव्या व्याख्यानात मानवी कर्तव्य आणि सुखदु:खाच्या कल्पनांचे विश्लेषण केलेले

आहे. त्याचबरोबर मनुष्याच्या कर्तव्याने निर्माण होणाऱ्या निकोप समाजव्यवस्थेचे चांगल्या नागरिकत्वाचे फायदे व दीर्घ परिणाम स्पष्ट केले आहेत.

रानडे यांनी आपल्या नवव्या व्याख्यानात गीतेचा धर्म व भागवतधर्माचे असलेले साधर्म्य स्पष्ट केले आहे. यामध्ये लोकांना उपदेश करतांना त्यांनी सुख प्राप्ती करीता कर्म करण्याची प्रवृत्ती सोडून देऊन "प्रत्येक कर्म देवांकरिता आहे, ममम, माझे अथवा मजकरीत्यर्थ नव्हे, हा गीताशास्त्राचा व भागवतधर्माचा उपदेश निरंतर लक्षात वागविला असता परमात्म्याशी होणारे ऐक्य खरे सारांश, धर्मपंथाचे अनुसरण परमेश्वराच्या काही गुणांचे ज्ञान असले तरी खरे प्राप्तव्य हाजास आले नाही, असे म्हटले पाहिजे. वहिवाटीप्रमाणे साधने अनुकूल असतील तदनुरूप मधुरता, क्षमता वगैरे सद्गुणांचा विकास तसाच फैलाव होणे हेच प्राप्तव्य."[२२] ह्या तत्वाचे मनन करण्याची विनंती त्यांनी आपल्या शेवटच्या व्याख्यानात केली आहे. स्वतःचे आचरण त्याप्रमाणे अखंडित ठेवले.

रानड्यांच्या निकट सहवासात असणारे त्यांचे सहकारी रा.ब. गणेश व्यंकटेश जोशी रानड्यांच्या धर्मवृत्ती बाबत म्हणतात की, एखाद्या देवतेच्या सान्निध्यात ज्या प्रकारची भावना मनात निर्माण होते, तशीच भावना रानड्यांच्या सानिध्यात असता अनुभवास येत असे; असे म्हणण्यात कोणत्याही प्रकारची अतिशयोक्ती नाही."[२३] इतके ते धर्माशी तद्रूप झालेले होते. त्यांना आपल्या प्रत्येक कृतीत ईश्वरी योजनेचा साक्षात्कार वाटत होता. त्यांची धार्मिक विषयावरील व्याख्याने अत्यंत प्रभावी असत. त्यांच्या पत्नी रमाबाई आपल्या आठवणीत लिहितात की, "मुंबईस प्रार्थना मंदिरात उपासना चालविण्याचे जेव्हा जेव्हा प्रसंग येत, त्या त्या वेळी एकदा त्या प्रेममय, रसाळ्वाणीचा ओघ सुरु झाला की,

हृदय उचंबळून यावे, मन तल्लीन व्हावे, क्षणात प्रापंचिक दुःखाचा विसर पडावा, आशा, आस्था यांचा हृदयात प्रवेश व्हावा, इतकेच नव्हे तर आपण कधी साक्षात स्वर्गसुख अनुभवित आहो असे वाटावे हा प्रकार उपासना सुरु झाल्यापासून तो संपेपर्यंत चालत असे, एवढेच नव्हे तर तेथून घरी आल्यावर सुद्धा त्या प्रेमळ मनावर पूर्ण संस्कार करणाऱ्या शब्दांनी जागृत केलेले धर्मविचार पुढे एक सारखे तासाचे तास मनात घोळत राहत."[२४] इतके त्यांचे प्रभावी वक्तव्य राहत असत.

रानड्यांची अध्यात्मिक वृत्ती प्रबळ असल्याने ईश्वरावर अढळ श्रद्धा निर्माण करतांना प्रत्येक कृती विचारपूर्वक करीत असत. सामाजिक प्रबोधनाला धर्मश्रद्धा आवश्यक आहे तरच समाज निरोगी निर्माण होवू शकेल असे त्यांना वाटत होते. पाश्चात्य विचारवंतांचा अज्ञेयवाद रानड्यांना अस्वस्थ करीत असे. त्यांना अज्ञेयवाद निरीश्वरवाद, धर्मनिरपेक्ष ऐहिकवाद अजिबात मान्य नव्हता. सार्वजनिक सभेच्या त्रैमासिकात प्रो.सेल्बीच्या भाषणाच्या पुस्तकांचे परिक्षण लिहिले. त्यातून त्यांचा स्वभावधर्म प्रगट झाला होता. त्यांच्यावर कठोर टिका केली आहे या संदर्भात आगरकरांशी त्यांचा वाद झालेला होता. इ.स. १८८५ मध्ये डेक्कन कॉलेजच्या वार्षिक स्नेहसम्मेलनात आगरकरांनी जेव्हा "धर्माचा आधार न घेताही संस्कृतीची नीतीमूल्यांची जोपासना करता येईल अशी बाजू मांडली तेव्हा रानडे संतापले होते. मनाची शांती व समतोलपणा सहसा न ढळू देणारे रानडे त्यावेळच्या भाषणात आपला राग आवरु शकले नाहीत. "आधुनिक पाश्चात्य विचारांची नुसती पोपटपंची करणाऱ्या सुशिक्षितांना आपल्या परंपरेची व परिस्थितीची बरोबर कल्पना नाही. विचारांची आयात हवी तितकी करता येते. पण समाजाचे पूर्व संस्कार आणि तत्कालिक गरज यांचे भान राखल्याखेरीज जनमानसात ते रुजविता येत नाही हे या सुशिक्षितांच्या लक्षात येत नाही" अशी रानड्यांची

तक्रार होती.[२५] त्यांच्या जीवनसरणी तत्त्वप्रणाली विशुद्द धर्मविचार शिवाय मानवी जीवन ही कल्पनाच त्यांना मान्य नव्हती. धर्माच्या बाबतीत ते इतके एकरूप झाले होते की विशुद्द धर्म जोपासण्यासाठी धर्मसुधारणा हे आपल्या जीवनातील आद्य कर्तव्य समजत असत. भारतातच राहून आपले जीवन सार्थकी लावण्याचे उद्देश त्यांनी अनेकदा बोलून दाखविले होते. धार्मिक सहिष्णुतेचा धडा भारताने जगाला दिला आहे, तेव्हा याच पुण्यभूमित राहून पुण्यकर्म करणे हेच जीवनउद्देश वारंवार बोलून दाखवित. धर्माबद्दल अनास्था, किंवा अवास्तव टिका केली तर अशयाप्रसंगी नेमस्त स्वभावाचे रानडे आपली तामसवृत्ती प्रगट करीत. धर्मनिरपेक्षतेची कल्पना त्यांना फसवी व हानीकारक वाटत होती.

रानडे प्रार्थना समाजाचे अनुयायी असले तरी त्यांना वेदांचे अध्ययन शास्त्रोक्त पद्धतीने होणे आवश्यक आहे असे वाटत होते. त्यांनी पुढाकार घेवून इ.स. १८७५ ला "वेदशास्त्रोक्त सभा" अस्तित्वात आणली. वैदिक संस्कृतीबद्दल त्यांना आदर होता. भारतीय संस्कृतीच्या मानाचे स्थान असलेले वेद लोकांनी, समाजाने नुसते पठन न करता ते समजून घेणे आवश्यक आहे असे वाटत असल्याने त्यांनी वेदशास्त्रोक्त सभेला पाठिंबा दिलेला होता. या सभेच्या स्थापनेमुळे वेदांचा अभ्यास करण्याची इच्छा असलेल्यांना शास्त्रोक्त शिक्षणाची संधी उपलब्ध करून दिली होती. याद्दारे धर्मावरील मळभ दूर करण्याचा प्रयत्न सुरु केला होता. हिन्दू धर्मशास्त्रा अन्वयार्थ तथाकथीत धर्मपंडितांनी आपल्या इच्छेनुसार लावून समाजाला जडत्व, गतीहीनता प्राप्त करून देणाऱ्या समाजाला अंधश्रद्दा धर्मबंधनात टाकल्याने समाज स्थिर बनून त्याचा विकास खंडित झालेला आहे. यावर उपाय म्हणून लोकांपर्यंत खऱ्या धर्माचा अर्थ कळावा या उद्देशाने या सभेच्या स्थापनेला सहकार्य केले होते. स्वत:ही प्रार्थना समाजाच्या माध्यमातून आपले व्याख्यान देवून धर्मविचार जागृती करीत होते. लेखांच्याद्दारे ही सुशिक्षित समाजाला धर्माचे सत्य पटवून देण्याचा प्रयत्न करीत होते. आपल्या संकीर्ण लेखात ते लिहितात की,

"हल्लीच्या सामाजिक व्यवस्था पूर्वीच्या थोर धर्मशास्त्रांनी घालून दिलेली खासच नाही. त्यांच्याबद्दल आपण शब्दांनी आदर दाखवित असतो. पण त्यांच्या आज्ञा मात्र पदोपदी मोडत असतो. त्या काळी प्रचलीत असलेल्या रूढींशी आजच्या बहुतेक रूढी विरुद्ध आहेत. आजची स्त्रियांची परावलंबनाची स्थिती, विवाहाच्या वयासंबंधी रूढ मर्यादा, उच्च वर्गातील विधवांना पूर्ण विवाहाची बंदी, स्त्रियांचे अज्ञान व एकांतवास, पोटजातीत विवाह करण्यासंबंधी निर्बंध, काही धंदे काही जातींनाच मोकळे ठेवणे, परदेशगमनाला बंदी, पुरुषांना मिळणाऱ्या सवलती व स्त्रियांवर लादलेली निवृत्ती यामुळे निर्माण झालेली विषमता, कडक रोटीबेटी आणि अस्पृश्यता काही जातींनाच करावयाचा सारासार शून्य दानधर्म या आणि यासारख्या इतर गोष्टीत जुन्या पध्दतीपासून आपण जे दूर गेलो आहोत त्याला हे पूर्वीचे धर्मशास्त्र कसे जबाबदार म्हणता येईल ? जुन्या पध्दतीत झालेले हे फरक मनुष्य निर्मितच होत. ----- अनेकदा इतिहासाला अज्ञान अशा व्यक्तींनी हे फरक केलेले असतात.----- या नवीन गोष्टींचे उच्चाटन करूनच जुनी माननीय अशा पध्दतीचा आपल्या सोईस येईल तसा उपयोग करून घेत आहोत असा आरोप करता येणार नाही. उलट सुधारकांनाच आपण या पुराण धर्मशाचे संरक्षक आहोत अशी भूमिका घेता येईल. ------ आपल्यापुढे प्रश्न असा की या प्रवाहाबरोबरच शुद्ध माणसाप्रमाणेच आपण तरुण जावयाचे की त्याला विरोध करावयाचा ? हे ओघ परमेश्वरी इच्छेने निर्माण होत असल्याने त्यांच्याबद्दलचे आपले कर्तव्य स्पष्ट आहे आणि हे कर्तव्य केवळ देवाची आज्ञा पाळत आहो ह्या भावनेने न करता आपल्या निकटच्या पूर्वजांनी आपल्या मार्गात जे अडथळे उत्पन्न करून ठेवले त्यांचे उल्लंघन करून जुन्या पूर्वजांच्या चालिरीती प्रत आपण पुन्हा परत येत आहोत याही भावनेने केल्यास अधिक सुखदच वाटेल."[२६] या दिर्घ लेखात रानड्यांनी खऱ्या धर्माचे स्वरूप समाजाला जाणण्याची आवश्यकता

आहे हे पटवून देण्याचा प्रयत्न केलेला आहे. त्यांनी आपल्या तत्त्वचिंतनात स्वप्नाळूपणाला थारा न देता वास्तव व्यवहार तत्व व ध्येयाची सांगड घालण्याचा सतत प्रयत्न केलेला आहे.

रानड्यांच्या मनात हिन्दू धर्मग्रंथाबद्दल विचार उद्भवत होते. हे विचार त्यांनी डेक्कन कॉलेजचे प्रिन्सीपल सेल्बोनी बटलरच्या Methods of Ethics ग्रंथावर केलेल्या परिक्षणाचे टिपण करतांना १८८२ च्या सार्वजनिक सभेच्या त्रैमासिकात लिहिले होते. त्यात धर्म हा संस्कृतीचा पोषण असून त्याअभावी मनुष्याची अध्यात्मिक उन्नती होणार नाही हे विचार रुजविण्याला बटलरचे ग्रंथ उपयुक्त ठरले आहेत. हे स्पष्ट केले त्याचकाळात डेकनची विचारसरणी ही प्रतिगामी स्वरुपाची असून त्याच्या ग्रंथाची ब्राम्हणी धर्मग्रंथांशी तुलना करतांना लिहितात की, 'I know very little Brahmanical schools - Ethier their method or their scope still I know this much they are dimetrically apposed to Baccon's method and are full of the restless agitation and the dogmatic tendency which Bacon has censured. They dispise that knowledge of nature which they derive from observation as being low and sordid. They have recourse to mental abstraction and contemplation and spun a web out of their own brains which astaunds us all and is intelligible to none."[27] ईश्वराच्या निर्गुण व सगुण स्वरुपावर त्यांची श्रद्धा होती.

रानडे यांनी धर्मामधील विचारांमध्ये नीतीमत्तेला महत्व दिले. मनुष्यव्यवहारामध्ये धर्म व नीतीचा परस्परसंबंध घनिष्ठ असतो. धर्म आणि नीती या संकल्पना वेगवेगळ्या वाटत असल्या तरी मानवी जीवनात त्या

एकमेकांशी सापेक्षपणे निगडीत आहेत. त्यांच्यात फरकात करता येणे शक्य नाही; असे म्हटले आहे. नीतीपालनात बाह्यकृतीपेक्षा मनुष्याच्या मनोवृत्तीला जास्त महत्व आहे. आपण एकाच ईश्वराची लेकरे आहोत तेव्हा एकमेकांशी बंधुभावप्रेमाने वागले पाहिजे या भावनेतून ईश्वरोपासना करून निर्माण होणारी श्रद्धा म्हणजे नीतीमत्ता होय असे म्हटले आहे. "वैज्ञानिक दृष्ट्या नीती व अध्यात्म यांचा संबंध ईश्वरोपासनेच्या ज्ञानाच्या माध्यमातून निर्माण झाला आहे, कारण शास्त्र हे मानवाच्या जीवनाशी संबंधीत क्रियाशील बनलेले आहे. भक्ती, ज्ञान, कर्माच्या माध्यमातून ईश्वरोपासना करून अध्यात्माचे सर्वोच्च शिखर गाठता येते."[२८] त्यांचा मात्र पुनर्जन्मावर विश्वास नव्हता. पुनर्जन्म ही कल्पना मानवी जीवनाच्या सादृश्यतेपेक्षा वेगळी आहे, मनुष्याला जो जन्म मिळतो, तोच जन्म ईश्वराची देणगी समजून सार्थकी लावणे जास्त महत्वाचे वाटत होते. केवळ धर्म विचारतच नव्हे तर संपूर्ण जीवनात वैयक्तिक जबाबदारीच्या जाणीवेने मानवी भूतदया दाखवून आपले कर्मकेले तर ते जास्त ईश्वरनिष्ठ राहील असे त्यांना वाटत होते. नैतिकतेच्या बाबतीत ते म्हणतात की, Intelligent, self-originated volition under obligation of duty and sense of personal responsibility, this is in the case of man of divine, that is the super-human and super-natural element in him."[29] मनुष्यजीवनाच्या दृष्टीने धर्म व नीती यांना एकच मानले तर ईश्वरोपासनेला बळ येवून आपल्या हातून सत्कृत्य निर्माण होवू शकते. हे सत्कृत्य करतांना ईश्वराच्या सर्वश्रेष्ठतेची जाणीव ठेवली पाहिजे असे त्यांचे मत होते. "Though there are many system of theology and ethics, there is only one religion and one morality."[30] मनुष्याला अनितीला सामोरे जातांना त्याच्या नैतिकतेची कसोटी लागते, त्यातूनच आत्मविश्वास, बळ मिळते. आपल्या

धर्मचिंतनात कुटुंबभावनेचा प्रभाव जास्त आहे. "मातृ पितृ देवो भव" ही भावना जेवढी प्रबळ आहे, त्या मानाने शासनावर न्यायदृष्टीवर कमी भर दिला जातो. समाजविषयीच्या कर्तव्याची जाणीव तेवढीच प्रखर असती तर आम्ही परकीय शृंखलेत वारंवार अडकलो तसे बंधनात राहिलो नसतो; असे रानड्यांना वाटते. समाजाला जागृत ठेवण्याचे कार्य हिन्दू धर्मपंडितांनी केले नसल्याने गतिहीन समाज गुलामगिरीतच धन्य झालेला दिसून येतो. धर्माचे विकृतीकरण करणाऱ्या धर्मपंडितांवर आघात करण्याचा प्रयत्न करतांना रानड्यांनी इ.स. १८६३ मध्ये लिहिलेल्या आपल्या पहिल्या "Social and Economic Problem" या निबंधात भारतातील लोकसंख्येच्या समस्येला वाढविण्यात धर्माच्या विकृतीकरणाची भूमिका जास्त प्रभावी व महत्त्वपूर्ण ठरल्याचे नमूद केले आहे. भारतात प्रजोत्पादन हे सांसारिक जीवनातील आवश्यक कर्तव्य मानले जाते. दीर्घायुष्यामुळे नातवाच्या मुलाचा जन्म म्हणजे सहस्त्र काशी यात्रेची पुण्याई व मुलाचा जन्म म्हणजे वंशाचा दिवा या समजुतींनी मात्र जिथे पोटभर अन्न मिळण्यासाठी होणारी मारमार असलेल्या कुटुंबात, समाजात, देशात प्रजोत्पादन वाढले, त्यामुळे रोगांची साथ, दुष्काळाला आमंत्रणच मिळाले. ही सामाजिक जाणीव नसल्यामुळे लोकसंख्येचा भस्मासूर झालेला आहे. व त्याच्याने अनेक प्रश्नांना जन्म दिलेला आहे. बेकारी, उपासमारी वाढली. रानड्यांनी धर्मचिकित्सा करतांना समाजहित लक्षात घेऊन युक्ती संमत व मौलिक विचार मांडलेले आहे.

रानड्यांनी धर्माचा विचार करतांना कोणता एखादा विशिष्ट धर्म नजरेसमोरच न ठेवता हिन्दू, मुस्लीम, पारशी, ख्रिस्ती या सर्व धर्मांना प्रेरक होईल अशी विचारसरणी मांडली आहे. हिन्दू व मुस्लीम लोकांच्या ऐक्य भावनेवरच भारताचे भवितव्य अवलंबून आहे हे चांगले ओळखून होते, म्हणून त्यांनी आपल्या एका भाषणात "मी हिन्दू ही नाही आणि

मुसलमानही नाही."[31] अशा अर्थाच्या गुरुवचनाची महती सांगितलेली आहे. त्यांनी समता बंधुत्व या दोन गोष्टींना आपल्या विचारसरणीत अग्रस्थान दिले आहे. लोकांच्या धर्मभावनेवर आघात होणार नाही याची काळजी घेत. भारतातील विविध धर्मीय समाजात एकोपा राहावा यासाठी प्रयत्नशील राहिले. भारतात राहणाऱ्या विविध धर्मीय व्यक्ती केवळ भारतीय आहेत हा विचार त्यांनी मांडला. समाजातील संवेदनशील प्रश्नावर दुसऱ्यांची मने दुखावणार नाही यासाठी सावध असत.

ख्रिश्चन मिशनरी शिक्षणाबरोबरच धर्मप्रसाराचेही कार्य करीत होते. त्यामुळे हिन्दू धर्मातील अनिष्ट रूढी नष्ट करून धर्माला समाजोन्मुख करण्याची गरज धर्मसुधारकांना वाटत होती. त्या दृष्टीने त्यांनी आपले पाऊल टाकले होते. ख्रिश्चन धर्म स्विकारण्यात उच्च वर्गापेक्षा निम्न वर्गातील लोकांचा पुढाकार जास्त होता. समाजात स्थान मिळण्यासाठी त्यांची ही धडपड होती. त्यामुळे साहजिकच ख्रिश्चन धर्माचा प्रभाव वाढलेला होता. त्याबद्दल प्रतिक्रिया उमटू लागल्या. तेव्हा रानड्यांनी पुण्यात प्रार्थना समाजाद्वारे झालेल्या मित्रमेळाव्यात[इ.स. १८८७] बोलतांना आपल्यामधील दोष दाखविले. त्यांनी म्हटले की, "धर्मव्यवस्था सतत वृद्धी पावावी म्हणून ह्या पंथाचा उदय होत आहे. जुन्या धर्मव्यवस्थेचे स्वरूप बदलून नवीन व्यवस्था अमलांत आणावी असे जरी सामर्थ्य आमच्यात नसले, तरी जे काही अल्प विचार आमच्या मनात आले आहेत ते जागृत ठेवणे आमचे कर्तव्य आहे.---- त्याप्रमाणे ही धर्मविचारसभी नवी ठिणगी जागृत ठेवण्यास पुढे तसाच कोणी सत्पुरुष निर्माण होवून तिला प्रज्वलीत करू देईल. ------ आमच्यामध्ये जी शिथीलता आहे तिला घालविण्याचा प्रयत्न मोठ्या प्रमाणाने व्हावयास पाहिजे."[32] हिन्दू धर्मामध्ये जो उच्चनीच, आपपर, श्रेष्ठकनिष्ट असा भाव निर्माण केला गेला त्याचे समाजातून उच्चाटन होणे आवश्यक आहे असे रानड्यांना वाटत होते. हे दोष काढल्यास धर्माचे पुनरूज्जीवन होवून हिंदू तत्वांचा प्रसार आपोआप होवू शकेल असे त्यांना वाटत होते.

पुण्यात झालेल्या दुस-या व्याख्यानात हिन्दू-ख्रिश्चन धर्मातील फरक स्पष्ट करतांना म्हटले आहे की, "आमच्या सर्व नव्या दिसणा-या विचारास आमच्या धर्मात स्थान आहे. दुसरी संतोषाची गोष्ट अशी की, जातीभेद मानणे, मूर्ती पूजा करणे, स्पृश्यास्पृश्याचा बाजार घालणे अशापैकी कोणतीही गोष्ट ख-या हिन्दूत्वास आवश्यक नाही.--- ख्रिस्ती धर्मामध्ये हा फार मोठा भेद आहे की, तो धर्म दोहोंकडून बांधला गेला आहे. ख्रिस्ती लोकांची कौन्सिले भरून धर्माच्या मर्यादा अगदी ठरवून टाकल्या आहेत."[33] ह्या मर्यादामधून मुक्त होण्याची हिन्दू धर्मामध्ये मानवतावादी दृष्टिकोन असल्याने कोणतेही विचार समाविष्ट करून घेण्याची क्षमता आहे. त्यामुळे प्रत्येक मनुष्य आपल्या बौध्दिक कुवतीने धर्माचे स्वरूप प्रगट करून त्यातून विचारसंघर्ष निर्माण करून सांमजस्याने धर्माचे पुनरुज्जीवन घडवून आणू शकतो. पण ह्या चांगल्या गोष्टींकडे दुर्लक्ष करून धर्मउपासनेतील जडत्व स्विकारल्याने समाज गतीहीन होवून परकीय धर्माच्या आक्रमणास बळी पडला आहे. हेच जडत्व नष्ट करणे म्हणजे धर्मसुधारणा होय. त्यासाठी पुढे येवून सुधारणा कार्य करण्याची गरज आहे; असे रानडेंचे म्हणणे आहे. ख्रिश्चनाच्या या धर्मप्रसारामुळे हिन्दू धर्मावर होणा-या परिणामाची चर्चा करीत असतांना प्रशासनाच्या पाठिंब्यामुळे ह्या गोष्टी वेगाने होत असल्याचे नमूद केले आहे. "Two currents of western culture were being poured into India the Chirstian religion and scientific knowledge. Indeed under the East India Company and under the crown of British Govt. of India had adopted the policy of not interesting with Indian religenous, never the less the rulers believed that Indian could not rise either materially or spiritually unless they ultimately adopted Chirstinaity. The mission-aries were very enthusiastic

and missed no apportunity of running down the beliefs, the tends and the injuctions of Hindu religion in social matters."[34] ख्रिश्चन धर्मामध्ये होणारा संघर्ष हा विज्ञान व धर्माचे महत्व स्पष्ट करणारा ठरला आहे. ज्याप्रमाणे भारतावर इस्लामधर्माने अनेक शतके आघात केल्यानंतर हिन्दू व मुस्लीम धर्मातील चांगल्या गोष्टींचा समन्वय होवून विकसित संस्कृती निर्माण झाली. तसेच ख्रिश्चन धर्माच्या प्रचारानेही होऊ शकेल असाही आशावाद त्यांना होता. त्यांची भाषा अवगत झाल्यास त्यांच्या देशातील चांगल्या ग्रंथाचे वचन होवून आपल्याला आपल्या देशाच्या प्राचीन वैभव प्राप्त करण्याचा मार्ग सापडेल हे कार्य इतिहास विज्ञान व धर्माच्या सहाय्याने सहज होवू शकेल, म्हणून ख्रिश्चन धर्मप्रसाराचे भय बाळगण्याचे कारण नाही, असे त्यांचे म्हणणे होते. ज्याप्रमाणे सुरुवातीला मुस्लीम धर्मप्रचाराने घाबरुन हिन्दू धर्म पंडितांनी धर्मामध्ये जडता, गतिहिनता निर्माण करुन अनिष्ट रुढी परंपरांना चालना दिली तसे मात्र होता कामा नये. सर्वसमावेशक तत्वावर हिन्दू धर्मसुधारणा होणे आवश्यक आहे. इतिहासापासून बोध घेवून पुन्हा पुन्हा त्याच चुका न करता धर्मसुधारणेचे कार्य हाती घेणे आवश्यक आहे, तेव्हाच समाजसुधारणा होवून आम्ही आमचे राज्य योग्य रितीने सांभाळण्यास समर्थ होवू शकू असा विश्वास रानड्यांना वाटत होता. आत्मपरिक्षणाची वेळ आलेली आहे. आपले दोष लक्षात घेवून मार्गक्रमण केले तर कुठलाही धर्म हा सारखाच वाटला तर धर्मपरिवर्तनाची प्रक्रीया आपोआपच क्षीण होत जाईल असेही त्यांना वाटत होते.

इ.स. १८८७ च्या मित्र मेळाव्यात रानड्यांनी "ख्रिस्ती धर्म व हिन्दू धर्म" आणि १८८० डिसेंबरला ख्रिस्ती धर्माविषयी काही विचार" ही व्याख्याने देवून हिन्दू धर्माचे श्रेष्ठत्व प्रतिपादित केले होते. धर्मभावनेशी नीतीमूल्य निगडीत असल्याने नैतिक आचरणावर व प्रवृत्तीवर भर दिला आहे.

हिन्दू धर्मापेक्षा ख्रिश्चन धर्मात नीतीमत्तेचे भान जास्त आहे हे स्पष्ट केले होते. २४ जुलै १८९६ ला गोखल्यांना लिहिलेल्या पत्रात "ख्रिश्चन लोकांना वैयक्तिक नीतीमत्ता व सार्वजनिक नीतीमत्ता आपल्या लोकांपेक्षा जास्त आहे. आपल्या धर्मातील उच्च विचारांचा आपल्या वैयक्तिक जीवनावर फारसा परिणाम होत नाही. ----- मानवाच्या वर्तणुकीवर सामाजिक आणि ऐहिक बाबींचा जास्त प्रभाव पडतो. मात्र वैयक्तिक आणि राष्ट्रीय नितीमत्ता असल्याशिवाय केवळ बुध्दीमत्तेमुळे राष्ट्र मोठे होत नाही."[३५] पण धर्म व तत्वज्ञान ह्या गोष्टी परस्परसंबंधीत आहेत. तेव्हा सामाजिक नीतीमत्तेची जाणीव आपल्यामध्ये निर्माण झाली पाहिजे असे त्यांना वाटत होते. समाज जीवनसरणीशी अनुरूप धर्मतत्वे आमलात आणले तर समाजसुधारणा होईल असे त्यांना वाटत होते. आम्ही आमच्या सुधारणेत धर्मसुधारणा कार्याला महत्व दिले नाहीतर आमची राजकीय, सामाजिक सुधारणा अपूर्ण व दोषपूर्ण राहील असे रानड्यांना वाटत होते. म्हणून ते म्हणतात की, "If your religious ideas are low and grovalling, you cann't succeed in social, economical or political sphere. This interdependence is not accident but the law of our nature."[36] रानड्यांच्या धर्मविचाराबद्दल डॉ. विकास खोले म्हणतात की, "रानडे धर्मशील मताचे होते तरी त्यांची धर्मभावना संकुचित नव्हती. ते समाजसुधारक होते तरी त्यांनी परंपरेतील सत्यांशाला कधी धक्का लागू दिला नाही. ते सर्व धर्मांविषयी समत्वबुध्दी बाळगणारे होते. तरीही त्यांच्या अंत:करणात हिन्दू धर्मातील व्यापक व उदार दृष्टीकोनाला लाभलेले सर्वोच्च स्थान कधी ढळले नाही. हा आपला देश हीच जगाची उध्दारभूमी आहे व हिन्दी जनताच ह्या उद्धारकार्या-करिता ईश्वराने नियोजलेली आहे व राष्ट्राच्या इतिहासाच्या जडणघडणीत ईश्वराचा हात आहे, अशी रानड्यांची श्रध्दा होती."[३७] अशया रितीने न्या. रानड्यांनी हिन्दू धर्माचे महत्व लोकांना सांगून धर्म सुधारणा व

पर्यायाने समाजसुधारणा करण्यास प्रवृत्त केले होते. त्यांनी धर्म सुधारणेत नीतीमत्तेला, मानवतेला, विवेकबुध्दीनुसार कार्याला महत्व दिले होते. त्यांच्या धर्मसुधारणेचा मुख्य उद्देश हिन्दू धर्मातील दोष काढून समतेच्या आधारावर समाजरचना निर्माण करणे हा होता, त्यासाठी त्यांनी संतपरंपरेचा एकेश्वरवाद आणि भक्तीमार्ग, भूतदया या तत्वांचा स्वीकार करून दुष्ट रूढींचा विरोध केला. धर्माचे विशुध्द स्वरूप समाजासमोर ठेवून आपले धर्मविचार लोकांपर्यंत पोहचविण्याचे कार्य केले. पण त्यांचे धर्मसुधारणेचे कार्य एका मर्यादेपर्यंत सीमित असलेले आढळते. तत्कालीन समाजातील रूढी परंपरा ह्या वेगवेगळ्या धर्मांत वेगवेगळ्या असल्यामुळे युरोपिय राष्ट्रामध्ये ज्याप्रमाणे संघटित होवून लढा देण्याचा प्रयत्न तेथील सुधारकांना करता आला तसेच भारतात करणे अशक्य होते. भारतातील रूढी परंपरेतील आचरणात शाश्वत नीतीमूल्यापेक्षा परंपरागत नीतीकल्पनांना जास्त महत्व दिले गेल्याने त्या रूढीपरंपरा कालबाह्य वाटत असल्यातरी त्यामध्ये बदल घडविण्यास सनातनी वर्गाबरोबर सुशिक्षित वर्गही धजत नसलेला दिसतो. मूर्तिपूजा, व्रतवैकल्ये, धार्मिक संस्कार, पुरोहितवर्गाचे प्रस्थ, इ. गोष्टी नाकारण्यास सुशिक्षितवर्ग पुढाकार घेणार नसल्याची जाणीव रानड्यांना होती म्हणूनच लोकांचा बुध्दिभेद होऊन समाज दुभंगू नये आणि सुधारणेच्या कार्याला विकृत वळण लागू नये याकडे विशेष लक्ष ठेवून व्यवहारिक सुधारणा करतांना विचारपूर्वक पावले टाकीत, अतिशय सावधगिरी बाळगत. लोकांच्या धर्मभावनेवर आघात होवू नये म्हणून त्यांनी आपल्या सुधारणा विचारांमध्ये समन्वयवादाला स्थान दिले. कुठल्याही प्रश्नांचा विचार करतांना त्यांना काही धर्मकल्पना, रूढी मान्य नसल्यातरी त्याचा आगरकरांप्रमाणे प्रखर विरोध करतांना दिसत नाही. स्वत: वडिलांच्या मृत्यूनंतर श्राध्दविधी करणे टाळले असले तरी अशा प्रकारच्या धार्मिक संस्काराविरूध्द स्पष्टपणे विरोध करून आपले विचार मांडले नाहीत. स्वत:ला मूर्तिपूजा मान्य नसली, व्रतवैकल्याचे वावडे असले तरी हे परंपरावादी धार्मिक

संस्कार आपल्यापुरते त्याज्य ठेवले पण त्या रूढींचे उघडपणे विरोध टाळला त्यांच्या मूर्ति पूजा, पुरोहितवर्ग, व्रतवैकल्ये, स्थलमाहात्म्य धार्मिक संस्कार इ. विषयांचे त्यांनी केलेले विश्लेषण वाचले असता त्यांच्या मतप्रतिपादनाची मर्यादा लक्षात येते. पण त्यांचा काळ व त्या काळातील सनातनी वर्गाचे समाजावर असलेले प्राबल्य पाहता रानड्यांनी धर्मसुधारणेची पाऊले जपून टाकली होती. रानड्यांच्या काळात आधुनिक कल्पना आणि नविन मूल्यांची नव्यानेच ओळख होत होती. म्हणून समाजप्रबोधनावर त्यांनी भर देवून समाजात विचार जागृती करतांना जागरूकतेने कार्य केले. सक्तीपेक्षा समंजसपणाने, धीराने आपला कार्यभाग कसा साधला जाईल याकडे विशेष लक्ष ठेवले होते. समाजामध्ये विचारजागृती घडून आल्यास लोकच आपणहून कालबाह्य धर्मरूढी कल्पनांना आपल्या जीवनात स्थान देणार नाही. अशा प्रकारे हळूहळू आपोआप सुधारणा घडवून आणण्याकडे लोकांचा कल निर्माण होईल असा आशावाद त्यांना असल्याने त्यांनी संग्राहक वृत्तीने लोकांना एकत्रित आणून सुधारणा कार्य करण्याचे तत्व अंगिकारले होते. त्यांच्याच शब्दात "There may be all these different lines not parallel but tapering towards one point in the end; but till they meet we must work together separately."[38]

या दृष्टीने रानड्यांचे धर्मविचार त्यांच्या संयमीवृत्तीप्रमाणेच मर्यादशील आणि परिपूर्ण असलेले दिसून येतात.

ब] <u>आगरकरांचे धर्म सुधारणा विषयक विचार</u> :-

भारतासारख्या विशाल आणि स्थितीप्रिय समाजाला सुधारणेसाठी प्रवृत्त करणे ही गोष्ट अत्यंत कठीण आहे, याची जाणीव आगरकरांना

समाजसुधारणेचे कार्य हाती घेतांना चांगल्या प्रकारे होतो. देशाच्या विकासासाठी लोकजागृती घडवून आणण्याचे कार्य त्यांनी आपल्या निबंध लेखनाद्वारे सुरु केले. त्यांच्या विचारांचा पाया बुध्दिवाद होता. बुध्दिवाद हाच उद्याच्या सुखी मानवतेच्या जीवनाचा पाया असला पाहिजे, तरच समाजामध्ये स्थित्यंतर क्षमता निर्माण होऊन शकेल, आणि विश्वाच्या गतितत्वामधील मर्म जाणून घेवून आपल्यात बदल घडवून आणण्यास समाज पुढाकार घेईल; असा त्यांचा विश्वास होता. बुध्दिवाद म्हणजे कोणत्याही गोष्टीची सत्यासत्यता, इष्टानिष्टता आपल्या बुध्दीच्या, विचारशक्तीच्या कसाला लावून पाहणे, यालाच प्राचीन ग्रंथात तर्कशक्ती म्हटले आहे. भारताला पारतंत्र्यातून मुक्त करुन त्याची सर्वांगीण उन्नती कशी घडवून आणावी हाच त्यांच्या सुधारणा विचारांचा मूळ गाभा आहे. आगरकरांनी आपल्या सुधारणेमध्ये आंतरिक सुधारणेला म्हणजे सामाजिक सुधारणेला विशेष महत्व दिले आहे, त्यासाठी आगरकरांनी सर्व प्रकारच्या सुधारणांचा विचार केला आहे.

भारतीय जीवनाचे अधिष्ठान, हिन्दू धर्मावर अवलंबून असल्याने धर्माच्या शुध्द स्वरुपाची ओळख लोकांना करुन दिल्याशिवाय सामाजिक सुधारणेचे कार्य यशस्वी होणार नाही हे आगरकरांनी जाणले होते. म्हणून त्यांनी धर्म हया गहन, गुंतागुंतीच्या विवाद्य विषयासंबंधी लोकांना समजेल अशा सोप्या भाषेत धर्माचे विवेचन केले आहे. धर्म कल्पना ही मनुष्याच्या श्रध्दा स्थानाशी संबंधित असल्याने तिच्या विषयीच्या समाजाच्या भावना तीव्र व उत्कट असतात, हे लक्षात ठेवून त्यांनी धर्मविषयीची चर्चा शांत, समतोल, स्थिर व अनाग्रही सदसद्विवेक बुध्दीने केली आहे. पण लोकांच्या भावना, विचार दुखावतील म्हणून सत्य सांगायचे कधीच टाळले नाही. आपल्या बुध्दिवादी विचारांचे प्रतिपादन

करतांना ते म्हणतात की, "विचारी पुरुषांनी ही गोष्ट लक्षात ठेवली पाहिजे की, जे आचार चमत्कारिक धर्मकल्पनांवर बसविलेले असतात, ते विवेकाच्या कसाला लावून पाहण्यात काही अर्थ नाही. जे लोक तसल्या आचार विचारांचे अनुकरण करीत असतात, त्यांच्या मनात त्यांच्या औचित्याचा विचार कधीच येत नाही. पूर्वापार चालत आलेल्या गाढ विचार शृंखलांनी निगडित होऊन गेल्यामुळे मागून आलेले लोण डोळे मिटवून पुढल्यास नेऊन पोचविणे एवढेच ते आपले कर्तव्य समजतात. धर्ममंदिरांची रचाई श्रद्धेच्या किंवा विश्वासाच्या पायावर झालेली आहे, असे हिन्दू धार्मिकांचेच म्हणणे आहे असे नाही."[३९] मानवतेच्या विकासाच्या दृष्टीने धर्माचे मानवी जीवनातील स्थान उपेक्षणीय नाही हे आगरकरांना मान्य आहे. पण धर्म ही सुद्धा एक सामाजिक संस्था आहे. त्यामुळे काळाबरोबर तिचे स्वरूप बदलले गेले नाहीतर ती प्रगतीला मारक ठरते. पुकोच्या धर्मकल्पनेपेक्षा रूढी, परंपरेच्या स्वरूपात होणारी अंमलबजावणी मानवतेच्या दुःखाला अधिक कारणीभूत होते हे ओळखून त्यांनी समाजात प्रचलित असलेल्या अनेक अमानुष व हास्यास्पद रूढींवर हल्ले चढवून त्यांचा विरोध केला आहे.

अनेक शतकांचा या रूढी परंपरेला आधार असल्यामुळे त्या रूढी परंपरा प्रबळ बनलेल्या असतात आणि एखाद्या मदोन्मत्त भस्मासुरा-प्रमाणे त्यांचा उन्मत्त संचार समाजात सुरू असतो. प्राचीन काळातील ऋषींपेक्षा आपण शहाणे नाहीत अशा समजुतीने सामान्य व्यक्ती त्याविरुद्ध बंड करण्यास असमर्थ असतात. तेव्हा सामान्य लोकांचा दुबळेपणा नष्ट झाला पाहिजे. हिन्दूधर्मामध्ये आणि आचारविचारांमध्ये जे चांगले हितावह आणि निर्दोष आहे त्या विचार परंपरांना कसलीही भीती नाही. पण जे अहितकारक आहे ते काळाच्या गर्तेत होरपळून जाणार, पाश्चिमात्य ज्ञान प्राप्तीमुळे दोषी रूढीपरंपरेचे अस्तित्व नष्ट-

प्राय होणार हे जाणून त्यांनी बुध्दिवादी गतितत्वाचा पुरस्कार केला आहे. विश्व हे गतिशील आहे. स्थिती व गतीच्या मर्यादा ओळखून गतितत्व निश्चित करावे लागते. प्रत्येक तत्व अमर्याद आहे किंवा अमर्यादपणा हेच अत्यंत महत्वाचे तत्व आहे, असा हट्ट धरणाऱ्यांना हे बुध्दिवाद्यांचे गतितत्व पटण्यास कठीण जाते." कोठे आदळलात तरी हरकत नाही, पण कुठेतरी धावत चला." असला कारभार शास्त्रीय गतितत्वाला मान्य नाही. आगरकर हे शास्त्रीय गतितत्वाचे पुरस्कर्ते होते आणि कोणीही विचारी माणूस तसाच असणार हे उघड आहे."[४०] असे मा.दा. आळतेकरांनी आगरकरांच्या बुध्दिवादाच्या तत्वविचारांचे विश्लेषण करतांना म्हटले आहे.

आगरकरांच्या बुध्दिवादी व अज्ञेयवादी तत्वज्ञानामुळे ज्यांची अंधश्रध्दा डिवचली जात होती, ज्यांच्या मोठेपणाला धक्का पोहचत होता असे लोक आगरकरांचे कट्टर विरोधक बनल्यास विशेष नवल नव्हते. पण ज्यांनी मिल स्पेन्सरच्या तत्वज्ञानाचा अभ्यास केलेला होता असेही सुशिक्षित पुढारी त्यांच्या धर्मसुधारणेला विरोध करीत होते. त्यांच्या विचार शक्तीची मर्यादा इतकी कमी असावी याचे आगरकरांना आश्चर्य वाटत होते. आगरकरांना राजकीय गुलामगिरीची चीड इतरांप्रमाणेच स्वातंत्र्य-प्रिय, राष्ट्राभिमानी व्यक्तीप्रमाणेच येत होती. पण केवळ ते परकीय म्हणून त्यांचा राग करण्याचे कारण योग्य नव्हे तर ही गुलामगिरी आम्हाला आमच्या स्थितीप्रिय स्वभावामुळे प्राप्त झाली आहे हे समजून घेणे आवश्यक आहे असे आगरकरांना वाटत होते. इंग्लिश राज्यात पोटभर अन्न मिळत नाही, हे भीषण दृश्य त्यांनाही पदोपदी जाणवत होते. पण सामाजिक गुलामगिरीची उपेक्षा करून राजकीय पारतंत्र्य नष्ट होईल, या गोष्टीवर त्यांचा विश्वास नव्हता. तेव्हा बाहेरची गुलामगिरी नको असेल तर अगोदर घरातील गुलामगिरी नष्ट करण्याचा प्रयत्न केला

पाहिजे, हे आगरकरांच्या विचाराचे मूलसूत्र होते. या धरच्या पारतंत्र्यात धर्माचे प्राबल्य जास्त असल्याने धर्माचे जडत्व नष्ट करणे आवश्यक आहे. असे पूर्णपणे वाटत होते. अनेक धर्मबंधनामुळे समाजाची विकासगती कुंठीत झाली आहे. नीतीमूल्ये धर्मनिष्ठ असू नयेत, ती जीवननिष्ठय असली पाहिजेत. जीवन जसजसे बदलत जाईल तसतसा त्या मूल्यातही बदल होणे आवश्यक आहे, तरच समाजाचा, धर्माचाही विकास होत जाईल, अशी आगरकरांची विचारसरणी होती.

आगरकरांच्या काळातील सुधारकांनाही देवाधर्माच्या परंपरागत वेडगळ कल्पना वेडगळ वाटत होत्या. म्हणून त्यांनी आपल्या मनाचे समाधान करण्याकरीता धर्माच्या पुनरुज्जीवनाची आवश्यकता प्रतिपादित केली. आर्यसमाज, ब्राम्हो समाज, प्रार्थना समाज इ. विचार पंथाचा पुरस्कार करून त्यांनी हिन्दू धर्मातील अनेक भोळसर, खुळ्या धार्मिक कल्पनांचा त्याग करण्याचे धैर्य दाखविले पण ईश्वराचे अस्तित्व त्यांनी मान्य केले. ईश्वराच्या अस्तित्वाविषयी साशंक असलेल्या गौतम बुध्दालाच देवत्व देणाऱ्या समाजाचे मर्म ओळखून त्यांच्यावर आघात करण्याचे धाडस या पथांच्या विचारवंतामध्ये नव्हते. पण आकरकरांनी मात्र अज्ञेयवादाचा पुरस्कार करून त्यांच्यावर प्रहार करण्यास प्रारंभ केला. "विश्वाचा अफाट पसारा आणि आपले संकुचित बुध्दिसामर्थ्य यापुढे उभे राहणे आणि आपणास विश्वाच्या दृष्टा स्वरूपापलिकडे कधीही जाता येण्याचा संभव नाही, विश्वाचे आदिकरण काहीतरी असले पाहिजे, अशी खात्री झाली तरी जोपर्यंत ज्ञान प्राप्ती इंद्रियावलंबी आहे, तोपर्यंत त्यांच्याव्दारे जेवढे व जसले ज्ञान मिळेल, तेवढयातच समाधान करून घेतले पाहिजे, त्यापलिकडे भरारी मारणे व मला जगदादिकारणाचे खरे ज्ञान झाले आहे, असे म्हणणे म्हणजे बुध्दिचा भ्रम किंवा आग्रह आहे."[४१] आगरकरांच्या जीवनविषयक तत्वज्ञानात देव, दैव, परलोक, पुर्नजन्म यांना स्थान नाही.

ते सात्त्विक आणि ऐहिक जीवनाचे पुरस्कर्ते होते. ऐहिक सुखोपभोग हे मानवी जीवनाचे ध्येय असून त्याला तुच्छ मानून पारलौकिक सुखाच्या मागे मृगजळासारखे धावणे हा निष्फळ वेडेपणा आहे. धर्म म्हणजे रूढी परंपराचे पालन करणे नव्हे, तर मानवी जीवनाला मार्गस्थ करून त्याचा उत्कर्ष घडवून आणणारा एक जीवन प्रवाह आहे असे त्यांचे मत होते.

आगरकरांवर लहानपणी धार्मिक संस्कार झालेले होते. पण त्यांचे जीवन लहानपणापासून खडतर राहिले. शिक्षणासाठी अनेक प्रकारची कामे करावी लागली. त्यांच्या वास्तववादी, व्यवहारी जीवनाला लहानपणापासून सुरुवात झाल्याने परखडवृत्ती अंगी बाणली होती. त्यांचे विचार केवळ बौध्दिक चिन्तनातून निर्माण झालेले नव्हते तर परिस्थितीचे आघात झेलत सभोवतालच्या समाजाचे होणारे दर्शन, त्याचबरोबर इतिहास, तत्वज्ञान, समाजशास्त्र इ. विषयांच्या सखोल अध्ययनाने त्यांची ध्येयवादी वृत्ती बळावत गेली होती. अन्यायाविरुध्द लढण्याची प्रवृत्ती लहानपणापासून निर्माण होऊन त्यांची जीवननिष्ठा घडत गेली. हीच जीवननिष्ठा, झुंजारवृत्ती आयुष्यभर कायम राहिली. मिल्लच्या मानवतावादी न्यायीबुध्दी व स्वातंत्र्य, शास्त्रशुध्द, तर्कशुध्दतीने त्यांची विचारसरणी प्रभावित होती. त्यांची तर्कबुध्दी योग्य अयोग्यतेच्या सद्सद्विवेकाने भारावलेली असल्यामुळे पुष्कळदा आगरकर नास्तिक वाटत. कारण मिल्लसुध्दा नास्तिक म्हणून गाजलेले होते. पण धर्माचे मूळ स्वरूप आगरकरांना लक्षात आल्यामुळे ते धार्मिक अवडंबरावर स्पष्टपणे प्रखरतेने आघात करू शकले. मिल स्पेन्सरचा बुध्दी प्रामाण्यवाद अंगिकारून "माणसामाणसातील परस्पर व्यवहाराचे हे नियामक तत्व. अशा नियामक तत्वाच्या जोडीला स्वातंत्र्य [मन: पूतं समाचरेत्] मनाला जे पवित्र वाटेल ते आचरण्याचा अखत्यार यच्चयावत गोष्टींत हवा असा त्यांचा पुरस्कार असे. मिल्ल ज्याला न्याय म्हणत असे त्यात स्नेहाकर्षण, करुणा व आदरभावना यांचा मुख्यत्वेकरून समावेश असे."[४२] हे तत्व त्यांनी आत्मसात केले होते.

आगरकरांवर जॉन स्टुअर्ट मिल्ल व हर्बट स्पेन्सरच्या अज्ञेयवादाचा परिणाम इतका खोलवर झालेला होता की, लहानपणी मिळालेल्या धार्मिक संस्काराच्या शृंखला गळून पडलेल्या होत्या. विचार भावना व कृती यांच्या सुसंवादात जीवनाचे मर्म साठविलेले आहे, सृष्टीत उत्साह वर्धक व उव्देगजनक अशया अनेक गोष्टी आहेत. जीवनाच्या या दोन्ही बाजूंचे बुध्दीला आकलन झाल्यावर मग कर्तव्यपूर्तीच्या आणि प्रगतीच्या दृष्टीने मनुष्याने जीवनाच्या चांगल्या बाजूवर लक्ष केंद्रित करणे श्रेयस्कर ठरते."४३ ही मिल्ल यांची विचारसरणी आगरकरांच्या बहुतेक लेखांमध्ये आढळून येते.

आगरकरांनी निरनिराळ्या लोकसमूहांच्या धार्मिक जीवनातील अंधश्रध्दा समजुती, आचरणासंबंधी विश्लेषण स्पेन्सरच्या तत्त्वज्ञानाच्या आधारे बुध्दीवादी वृत्तीने केले आहे. आगरकरांच्या सुधारणावादाला तात्त्विक बैठक होती. त्यामुळे ते केवळ भावनात्मक दृष्टीने धर्माकडे, समाजाकडे पाहत नव्हते. समाजोध्दारासाठी आवश्यक अशा नवीन मूल्यांची गरज ओळखून त्याचा अंगिकार करण्यासाठी समाजजागृतीचे कार्य हाती घेतले होते. ते बुध्दीप्रामाण्यवाद, व्यक्तीस्वातंत्र्य, समता, विज्ञाननिष्ठा, ऐहिक जीवनाकडे पाहण्याचा शाश्वत दृष्टीकोन या दृष्टीने धर्माचे स्वरुप समाजापुढे ठेवण्याचा प्रयत्न करीत होते.

"आमचे काय होणार ?" या लेखमालेतील "धर्मविचार" मध्ये आगरकर धर्माच्या नैसर्गिक अवस्थेविषयी विश्लेषण करतांना म्हणतात की, "काम, क्रोध, मद, मत्सर, दया, अनुकंपा, लोभ वगैरे बऱ्यावाईट मनोवृत्ती जशया मनुष्यात नैसर्गिक आहेत, जशया इतर वासना किंवा वृत्ती तशी धर्मवृत्ती किंवा धर्मवासना समजली पाहिजे.------ दुसऱ्या कोणत्याही वृत्तीपेक्षा ह्या वृत्तीपासून मनुष्याच्या आचरणावर व विचारांवर विशेष

महत्वाचे परिणाम घडलेले आहेत.----- रानटी लोकांस ऊन, पाऊस, वारा, वीज, पूर वगैरे निर्जीव सृष्टपदार्थांपासून व व्याघ्रसिंहादि वन्यपशूंपासून आपला बचाव कसा करावा हे समजत नसल्यामुळे त्यांची भीती त्यांस उत्पन्न होते व ज्या कारणांनी आपले मनोविकार क्षुब्ध व संतुष्ट होतात त्याच कारणांनी त्यांचेही मनोविकार क्षुब्ध व संतुष्ट होत असतील असे वाटू लागते. या वाटू लागण्यातच धर्मकल्पनेचा मूळ आरंभ आहे."४४ आगरकरांनी अशी प्राचीन काळात मनुष्य प्राथमिक अवस्थेत असतांना त्याला नैसर्गिक सृष्टीचे आकलन न झाल्याने आपल्या अपूर्णतेची जाणीव होवू लागली व जीवन जगण्यासाठी अदृष्ट्य शक्तींचे सहाय्य आवश्यक वाटू लागल्यामुळे अनाकलनीय गोष्टींना त्याने देवाचे स्वरूप देवून धर्माची उत्पत्ती केली. सृष्टीवर, निसर्गावर आपले नियंत्रण मिळविण्यासाठी हळूहळू अग्रेसर राहिले व धर्माच्या सहाय्याने आपल्या जीवनाला स्थिरता प्राप्त करण्यात यश मिळविले होते, असे धर्माच्या स्वरूपासंबंधी आपले मत व्यक्त केले आहे.

मानवाच्या उर्जित अवस्थेमध्ये हळूहळू प्रगती होत असतांना त्याला निसर्गाचे आकलन होत जाते. तशी त्याची निसर्गाविषयी भीती कमी होवू लागल्यानंतर आपले विश्व निर्माण करण्या-या अज्ञात शक्तीचे आकर्षण वाढून त्याला देवत्वाचे स्वरूप देतो व समाजावर आपला प्रभाव निर्माण होण्यासाठी समाजाचे नियमन करण्यासाठी अज्ञात शक्तीच्या प्रकोपाची भयावहता दाखवून धर्माचे बंदिस्त स्वरूप निर्माण करतो. या तत्वज्ञाना-विषयी समाजाला सांगताना आगरकरांनी दैनंदिन जीवनातील घडामोडीचे व धार्मिक जीवनाचे उदाहरण देवून धर्माचे खरे स्वरूप प्रगट करण्याचा प्रयत्न केला. "आमचे काय होणार ?" याच लेखात "धर्मविचाराची वाढ" मध्ये लिहिले आहे की, "मनुष्याची शुध्द पशवावस्था किंचित नाहिशी होवून तो विचार करू लागला म्हणजे त्या त्या वस्तूंवरील धर्मश्रध्दा हळूहळू उडू लागते.----- अशा रितीने मनुष्याच्या धर्मकल्पनेत थोडा थोडा फरक

होता होता बहुतेक अचेतन व सचेतन पदार्थांतील देवतात्व नाहिसे होवून त्या सर्वांचे आदिकारण एक परमेश्वर आहे, असा बुध्दीचा ग्रह होतो. नंतर त्या परमेश्वराच्या गुणाविषयी व स्वरूपाविषयी नानात-हेच्या कल्पना निघू लागतात. पहिल्या मूर्तीपूजेचा अंमल अगदी नाहिसा न होता एकेश्वरापर्यंत धर्मकल्पना जाऊन थडकली, तर आचार आणि विचार यांचे व्दंव्द लागून विलक्षण त-हेचा धर्म उत्पन्न होतो."------ अशया रितीने धर्मकल्पनेची उत्पत्ती व अभिवृध्दी होते. आपल्या देशात धर्मसंबंधाने जसल्या विविध कल्पना रूढ आहेत, तसल्या इतर देशातही आहेत. सर्वांचा आरंभ पिशाच्च कल्पनेपासून झाला आहे. व प्रत्येक देवता मनुष्यांनी आपल्या स्वभावाच्या वळणावर नेली आहे."[४५] असे मानवी मनोवृत्तीचे वर्णन केले आहे.

मानवाने निर्माण केलेल्या देवाची कल्पना ही पिशाच्च कल्पनेतून आली असावी असे स्पेन्सरचे मत प्रतिपादित करतांना त्यांनी "धर्मकल्पना आली कोठून ?" या लेखात पुरातन काळातील लोकांनी प्राण्यांना देवत्वाचे रूप देवून त्यांच्या विषयी उदात्त विचार निर्माण करण्याच्या प्रयत्नात प्राण्यांचा गुणांचा संबंध मानवी मनोवृत्तीशी जोडून धर्मकल्पनेचे स्वरूप साकार केले आहे, असे म्हटले आहे. महादेवाला महापिशाच्च म्हटले आहे. ब्रम्हा विष्णू महेशाच्या व्यक्तित्वाचे विश्लेषण त्यांनी केले आहे. ह्या धर्मकल्पनांचे स्वरूप लक्षात आल्यानंतरही मनुष्य त्या गोष्टी त्याज्य कां मानत नाही, ह्या प्रश्नाचे उत्तर देतांना म्हणतात की, "शेकडा नव्याण्णव माणसे ज्याप्रमाणे आचारात त्याचप्रमाणे विचारांतही हाताला हात लावणारी असतात. शारीरिक श्रमापेक्षा मानसिक श्रम करण्याचा मनुष्याला जास्तच विशेष कंटाळा आहे. मळलेल्या वाटेने जाणे-येणे ज्याप्रमाणे शरिराला त्याचप्रमाणे मनालाही सुखावह असते, तेव्हा ती वाट सोडून देणे त्याला सहसा बरे वाटत नाही. तशात नवा

मार्ग आपणांस भलतीकडे घेऊन जाणारा आहे असा त्याचा बोभाटा झाला असेल तर त्याकडे लाखातला एक इसमसुध्दा ढुंकून पाहणार नाही." पिशाच्याविषयी आमच्या विलक्षण कारणापैकी एक व दुसरे कारण, त्या नाहीतशया न होऊ देण्यातच पुष्कळांचा फायदा असल्यामुळे ते आपल्या लेखांनी, भाषणांनी आणि कृत्यांनी त्या कायम करण्याचा होईल तेवढा प्रयत्न करीत असतात."४६ धर्मकल्पनांच्या उदयासंबंधी विश्लेषण केल्यानंतर आगरकर देवांच्या कल्पना पुढे कशा विकसित झाल्या त्यासंबंधी विश्लेषण त्यांनी पुढील लेखांत केले आहे. धर्मकल्पनेच्या उगमाचे आगरकरांनी चिकीत्सकपणे चर्चा करतांना स्पेन्सर मॉंटगोमरी ह्या तत्ववेत्यांच्या लिखाणाचे व अनुभवाचे दाखले दिलेले आहेत. याबाबत गं.बा. सरदार म्हणतात की, "त्यांचा हेतु धर्माच्या शुभ व अशुभ अशया दोन्ही बाजूंची लोकांना ओळख व्हावी हा होता. धर्म जसा सुसंस्कृत तसा रानटी प्रवृत्तीचाही असू शकतो. म्हणून धर्म निर्णयाच्या बाबतीत डोळसपणा हवा, विवेकशीलता हवी नाहीतर 'तुका म्हणे चुकले वर्म। केला अवघाचि अधर्म ॥ अशी स्थिती व्हायची."४७ म्हणजे जसजसा मानवाच्या बौध्दिक क्षेत्रात प्रगती होत जाते, तसतसे निर्माण केलेल्या कल्पनेचे विवेचन करतांना आपला दृष्टिकोन समाजासमोर ठेवतांना रुढ कल्पनांना प्राधान्य देतात. तेव्हा त्या विचारांत वास्तवाचे भान ठेवून कार्य केले तर ते योग्य मार्गाने जाऊ शकते, असे आगरकरांचे म्हणणे होते.

देव, परमेश्वरांच्या कल्पनाही मनुष्याने धर्माच्या क्षेत्रात शोधक बुध्दीचा वापर करुन सुचलेल्या आहेत. मानवी प्रगतीची बुध्दी जशी प्रगतीशील होत जाते तसतसे सचेतन व अचेतन वस्तूवरील देवत्वाची भावना नष्ट होवून सर्वज्ञ सत्ताधिश एकच ईश्वराची कल्पना समोर आणून एकेश्वरवादाचा पुरस्कार करण्यास सुरुवात होते तेव्हा देवतांच्या अगम्य अस्तित्वाचे महात्म्य प्रगट होवून त्यांची भक्ती, पूजा करण्याची कल्पना

पुढे येते आगरकरांनी हर्बट स्पेन्सरच्या Principals of Sociology च्या ग्रंथाच्या आधारे देवतांच्या कल्पनेचे विश्लेषण केले आहे. वास्तविक पाहता धर्म म्हणजे समाजाचे नियमन करणारी कल्पना होय. पण त्या धर्मकल्पनेला सजीव रूप देवून मानवापेक्षा श्रेष्ठ व्यक्तितत्व ही भावना समाजात रूजविण्यासाठी देवताचे प्रस्थ, निर्माण झाले. आगरकर"देवता" या अग्रलेखामध्ये म्हणतात की, "अज्ञानावस्थेत मनुष्यात आपल्यापेक्षा किंचित श्रेष्ठ अशा व्यक्तिविषयी येवढी भिती उत्पन्न होवून त्याची पूजा आरंभावी असे वाटू लागले. तर तो असता त्याचे पिशाच्च अधिक भीतीप्रद वाटून त्याला देऊळ बांधावे·----- आपणांमध्ये जो प्रचंड श्राध्दविधी माजला आहे त्यांचे सर्व बीज या प्रवृत्तीतच आहे. गतासू झालेल्या आप्तांच्या पिशाच्यांनी आपणांवर कुपित न होता, आपली कृपादृष्टी सदैव चालू ठेवावी आणि पोरांबाळांस त्रास होऊ देवू नये, हे सारे श्राध्दविधीच्या आणि पितृतर्पणांच्या ब-याच भागाचे गुह्य आहे·----- देवतात्वाचे पहिले पितृकत्व श्रेष्ठ मनुष्याकडे येते म्हणजे श्रेष्ठ मनुष्य देवता बनतो."[४८] प्रत्येक व्यक्तीला, समुहाला, समाजाला निरनिराळ्या कार्यामुळे निरनिराळ्या व्यक्तींना देवताचे स्वरूप देवून असंख्य देवदेवता, प्रेषित निर्माण केली गेली व त्यांचे विचार महात्म्य धर्मग्रंथाच्या रूपात पुढे नावारूपास आप्तांच्या त्या व्यक्तींचे अनुभव विचार मूलभूत स्वरूपात पाहिले तर सारखे वाटतात. पण आचरणाची पध्दती वेगवेगळी असल्याने त्यांतून अनेक पंथाची, उपासनेची निर्मिती झालेली दिसून येते. काळानुरूपे विचारपरिवर्तन होत गेल्याने धर्मविचारांमध्ये सुध्दा बदल झालेला आढळून येतो. याबद्दल आगरकरांनीही आपले विचार याबाबत स्पष्टपणे आपल्या लेखांमध्ये मांडले आहे.

हिन्दूधर्मातील अनेक देवतांच्या उत्पत्तीविषयी आगरकर "देवतोप्तत्ति" ह्या अग्रलेखामध्ये हिन्दू धर्मातील तेहत्तीस कोटी देवताविषयी विवेचन करून त्या देवतांमधून एकेश्वरवादाकडून अनेकत्वाकडे पुन्हा एकत्वाकडे

चळलेल्या धर्माचे विश्लेषण करतांना लिहितात की, "अनेकत्वनंतर एकत्वाची, स्थूलानंतर सूक्ष्माची, जडानंतर चिद्रूपाची, साकारानंतर निराकाराची, इंद्रियगोचरानंतर अतिंद्रियज्ञानाची व्यक्तानंतर अव्यक्ताची व गम्यानंतर अगम्याची कल्पना मनुष्याच्या अधिकाअधिक विकास पावत जाणा-या बुध्दित येणे अत्यंत स्वाभाविक आहे.------ मनुष्याच्या विचारस्म चाळणीत तेहत्तीस कोटी देव आणि त्याविषयी अगणित कल्पना हजारो वर्षे चाळण्यास घातल्या असल्यामुळे त्याचा अखेर परिणाम असा झाला आहे की, तेहत्तीस कोटी देवता आणि त्या संख्येच्या वर्गा-इतक्या त्याविषयी कल्पना, यापैकी फक्त एकीशिवाय बाकीच्या सा-या चाळात सापडून गेल्या आहेत. ज्या एकीची अशी दुर्दशा झाली नाही ती निर्गुण निराकारादि विशेषणांनी वर वर्णिलेली परमेश्वराची कल्पना होय.------ म्हणून सर्व धर्म कल्पनांच्या आणि देवतांच्या स्थूलमानाने मुळास स्वकुळातील पूर्णपूजा आहे असे म्हटल्याशिवाय कोणाही विचारी पुरुषास सहवणार नाही."[७९] ह्या अनेक देवतांची पूजा कशी करावी असा संभ्रम समाजात निर्माण झाला असता लोकांनी आपआपल्या सोयीनुसार एका देवतेचा अवलंब करुन आपल्या परीने धर्माचे आकलन करुन घेतले व त्याची उपयुक्तता व महत्ता पटविण्याचा प्रयत्नही ते करीत राहिले.

धर्माच्या आधारे समाजाचे नियमन करुन राज्यसंस्था सुरळीत चालविण्याचा प्रयत्न पुरातन काळात सुरु झाला. त्याचे प्रचलन कायम टिकून नंतर धर्माचे अस्तित्व स्थिर बनले. त्यामुळे धर्म म्हणजे समाजाचे नियमन करणारी, त्यावर संस्कार करणारी, त्याला मार्गदर्शन करणारी, समाजाला सामान्य पातळीवरुन उदात्ततेच्या पातळीवर नेऊन सोडणारी प्रेरणा बनली. पण काही वेळा धर्म समाजाची प्रगती खिळवून टाकतो, परंपरेनुसार चालणारे विशिष्ट आचारविचार, चालीरिती म्हणजे धर्म अशी चुकीची समजूत सामान्य मनुष्याच्या मनात रुजते. व ती टाकून

देण्यास किंवा त्यात बदल करण्यास सहसा समाज तयार होत नाही. उलट कुणी त्या भावनेला धक्का दिल्यास दुराग्रहाने त्याच परंपरांना चिकटून राहण्याची प्रवृत्ती असते. पण जसजसा समाज बदलत जातो तसतशी जीवनमूल्येही बदलत असतात. तेव्हा धर्म कल्पनेमध्ये सुध्दा परिवर्तन आवश्यक ठरते. पाश्चात्य शिक्षणाचा पहिला हादरा धर्म विचारांनाच बसलेला होता. हळूहळू समाजाच्या विचारामध्ये बदल घडून येण्याच्या प्रक्रीयेला सुरुवात झालेली होती. त्यामुळे वैचारिक मंथन निर्माण होवून लागले. धर्म व समाज प्रबोधनाच्या ह्या काळात ब्राम्हो, आर्य प्रार्थना समाजाने सनातन हिन्दू धर्माचे सुधारित स्वरुप टिकविण्याचा प्रयत्न केला. कारण ख्रिश्चन मिशन-यांच्या धर्मप्रसाराने हिन्दू धर्माला निर्माण झालेला धोका आधुनिक प्रबोधनकारांनी ओळखलेला होता. म्हणून त्यांनी समाजसुधारणा करण्याचे कार्य करतांना धर्मसुधारणेला प्राधान्य दिले होते. धर्माच्या शुध्द स्वरुपाची ओळख समाजाला करुन देण्याची गरज इतर सुधारकांबरोबरच आगरकरांनीही ओळखली होती म्हणून त्यांनी केसरी, सुधारकातून वेळोवेळी लेख लिहून धर्म कल्पनेचे खरे स्वरुप समाजाला ज्ञात करण्याचा प्रयत्न सुरु ठेवला होता. समाजजागृतीचे व्रत अंगिकारुन ते लिहितात की, "प्रत्येक शहरात, प्रत्येक गावांत, खेड्यांत या संबंधाने लोकमत तयार करण्यास झटले पाहिजे. प्रत्येक सभागृहात, बाजारात, चव्हाट्यावर, व्यासपिठावर किर्तनात, पुस्तकगृहात, जिकडे तिकडे याविषयी एकसारखी चर्चा चालू झाली पाहिजे."[५०] याप्रमाणे समाजात धर्मविषयी विचारकलह निर्माण होवून सत्य जाणून घेण्याची प्रवृत्ती मनुष्यात निर्माण होईल असा विश्वास आगरकरांना वाटत होता. मनुष्यामध्ये विचार जागृती निर्माण होण्यास ते जास्त आग्रही आहेत. आगरकर आपल्या "अथ आचार प्रकरणम्" या लेखात म्हणतात की, "समाजाची सुधारणा मुंगीच्या चालाने होत असते. म्हणून या पत्रासारख्या

पश्चात येणारे असामान्य विचार नवीन मंडळींच्या हातात पडल्याबरोबर ती आपले फार दिवसांपासून चालत आलेले धर्माचार, राज्याचार किंवा सामाजिक आचार एकदम टाकील. अशी भिती क्षणभर सुद्धा बाळगण्याची गरज नाही; असे होण्याचा संभव असेल तर आम्हांस त्यापासून फार आनंद होणार आहे, पण तसे मुळीच नाही. तथापि, कर्तव्य ते केलेच पाहिजे, असे समजून हा व्यवसाय आरंभिला आहे. आणि म्हणून कोणांस काही वाटले, तरी अशया विषयांविषयी जे सत्य व योग्य दिसेल ते लिहिणे भाग आहे."[५१] आगरकरांचा दृष्टिकोन यावरून दिसतो.

आगरकरांनी आपल्या अज्ञेयवादाची भूमिका स्पष्ट करतांना धर्म व देव यांची चिकीत्सकपणे चर्चा केली. अदित्यात आस्तिक व नास्तिकांच्या विचारसरणीचे दोन प्रवाह त्यांनी स्पष्ट केले आहेत. केवळ मूर्तीपूजा करणे म्हणजे श्रद्धाळू व जो पूजा न करता धर्माच्या आधारे मानवी जीवनाचे चालणारे नियमन लक्षात घेऊन रूढी परंपरा ज्या अनिष्ट आहेत, त्याचा विरोध करतो तो नास्तिक. ह्या लोकांच्या अदूर दृष्टीच्या विचारांच्या मानसिकतेची ओळख आगरकरांना झालेली होती. म्हणूनच ते लोकांना धर्माचे मानवी जीवनात काय स्थान आहे, ह्याची जाणीव करून देण्याचा प्रयत्न आपल्या लेखात करतांना दिसतात. ते स्वतः नास्तिक प्रवृत्तीचे नव्हते. त्यांना दोन्ही टोकाचे विचार कधीच मान्य नव्हते, तर ह्या दोन विचारांशिवाय तिसरा वर्ग जो तत्त्वचिंतकाचा होता, तो मार्ग त्यांनी पत्करलेला होता व त्याला मिल्ल स्पेन्सर च्या तत्त्वज्ञानाप्रमाणे अज्ञेयवाद म्हटले आहे. ह्याच अज्ञेयवादाच्या सहाय्याने धर्मकल्पनेतील विविध गोष्टीकडे पाहून भौतिकता, वास्तवतेच्या आधारे त्याचे निष्कर्ष काढण्याचा प्रयत्न करतात.

आगरकरांनी कुठलाही एक विशिष्ठ धर्म नजरेसमोर न ठेवता

जगातील हिन्दु, ख्रिश्चन, इस्लाम, बौध्द असे चार धर्म प्रमुख मानले गेले. धर्मांची चिकीत्सा केली.) ख्रिस्ती, इस्लाम धर्म सोडल्यास हिन्दू, बौध्द धर्मात मुर्तीपुजेला स्थान दिले आहे. प्राचीन काळापासून मूर्तीपुजेला महत्व दिले गेलेले आहे, पण आधुनिक काळात त्याचे प्रस्थ कमी झाले नाही. कारण मुर्तीपूजेचा उगमही मनुष्य स्वभाव, प्रवृत्तीमुळे झालेला आहे. मूर्तिपूजेविषयी लिहितांना आगरकर "मूर्तिपूजेचा उद्गम" ह्या अग्रलेखात म्हणतात की, "मूर्तिपूजा तीन प्रकारची आहे. जड वस्तूंची पूजा, वनस्पतीची पूजा व प्राण्यांची पूजा. नर्मदेतले दगड, वृंदावनातली तुळस व गोठ्यातली गाय ह्या तिन्हीही वस्तु आपल्या देवता या तीन वस्तूंस तीन प्रकारच्या मूर्तीचे प्रतिनिधी मानून त्यांचे तीन वर्ग अथवा गण मानले तरी चालेले.----- मूर्तिपूजेचे मुळ मनुष्याच्या स्वभावातच आहे. जसा लहान मुलाला प्रबुध्द व अप्रबुध्द आणि सजीव व निर्जिव यातला भेद नीटसा कळत नाही, त्याचप्रमाणेच प्रथमावस्थेतील प्रौढ मनुष्यांनाही तो कळत नाही."[५२] एखाद्या वस्तूंचा, वनस्पतीचा आणि प्राण्यांचा उपयोग मानवी जीवनात उपकारक ठरला तर त्याचे गुण निर्जीव मुर्तीत निहित करुन मूर्तीपूजा केल्यास मनुष्य प्रवृत्त होतो व मूर्तीच्या संरक्षणार्थ मंदिराची निर्मिती करतो. पण ह्या गोष्टींचे प्रस्थ वाढून आपल्या भावनेची एकाग्रता त्या वस्तू वनस्पती किंवा प्राण्याच्या गुणाकडून औपचारिक पूजेअर्चेत वळते. त्यामुळे धार्मिक विधींच्या अधिष्ठानाला महत्व देवून ख-या धर्मापासून मनुष्य दूर जावू लागतो. जसजशी मनुष्याला ज्ञानप्राप्ती होवू लागते, तसतसे त्याचा मूर्तीपूजेवरील विश्वास कमी होतो. परमेश्वर हाच जगाचा शास्ता आहे ही भावना प्रबळ होत जाते. जुन्या धर्मात व आधुनिक धर्मपंथामध्ये मूर्तीपूजेला विरोध केलेला आहे. तरी देखील त्यांच्या अनुयायी वर्गाचे धर्माच्या आचरणात मूर्तीपूजेचे अवशेष कोणत्या ना कोणत्या स्वरुपात आढळत असल्याने धर्मश्रध्देत सहसा बदल

होत नाही. त्यामुळे धर्मामध्ये अनीष्ट चालीरिती, परंपरा, अंधविश्वास निरर्थक धार्मिक विधीचे प्राबल्य धर्माच्या नावाखाली निर्माण होते, म्हणून आगरकर मूर्तीपूजेचा विरोध करतात. त्यांना प्रचलीत धर्म अमान्य आहे. आगरकरांना धर्माचे आजचे स्वरूप हे विकृत वाटत होते. ज्या दुष्ट परंपरांना कवटाळून समाज धार्मिक जीवन जगतो तो धर्म त्यांच्या कर्तव्यापासून, ऐहिक जीवनापासून परावृत्त करून निष्क्रीय जीवन जगण्याचा मार्ग दाखवितो आहे त्यामुळे समाजाची उन्नती होत नाही, याची त्यांना जाणीव असल्याने त्यांनी ह्या धर्मकल्पनेचा विरोध केलेला आहे. मूर्तीपूजेचा विरोध करतांना त्यांनी मूर्तीपूजेचा उगम कसा झाला याची चिकित्सक परिक्षण आपल्या वृत्तपत्रातून "धडगो व देवळे, मूर्तीपूजेचा उद्‌भव, मूर्तिपूजेचा प्रकार, देवोत्पत्ती विषयी पोपटचे चार शब्द"[43] इ. लेखांमध्ये केलेला आहे व त्यात ईश्वराची कल्पना मनुष्यानेच निर्माण केलेली प्रतिमा आहे असेही प्रतिपादित केले आहे. सर्व धर्मामध्ये असलेला काही प्रमाणातील सारखेपणा लोकांच्या नजरेत आणून देण्याचा प्रयत्न केला आहे. देव, धर्माबाबतच्या काही कल्पना काळानुसार कालबाह्य ठरल्याने त्यांचा त्याग करणे श्रेयस्कर मानले आहे. अंधश्रध्देविषयी लोकांचा भ्रमनिराश व्हावा, शाश्वत धर्माविषयी माहिती व्हावी, यासाठी त्यांनी धर्मकल्पनेची लेखमाला लिहून लोकांना जागृत करण्याचा प्रयत्न केला होता.

"देवोत्पत्तिविषयी पोपटचे चार शब्द" या लेखात ते म्हणतात की, वेद, पुराण बायबल वगैरे सर्व प्रकारच्या धर्मपुस्तकात आणि मनु, महम्मद, ख्रिस्ती, कनफ्युसियस वगैरे सर्व देशातील धर्मकर्त्यांच्या किंवा धर्मसंस्थापकांच्या डोक्यात ज्या कल्पना आल्या त्या मनुष्याच्या विशेष प्रकारच्या शारीरिक व मानसिक प्रकृतीमुळे आल्या म्हणूनच त्यात इतके साम्य आहे.---- "आकाशातून देव येथे कधी आले नाहीत व येथून

परत कधी गेले नाहीत. आम्हीच त्यांना येथल्या येथे निर्माण करतो, त्यांच्या गुणांचे पोवाडे गातो, आणि वाटेल तेव्हा त्यास नाहिसे करतो, जो जो बुध्दीचा विकास होत जावून कार्यकारणाचा संबंध चांगला कळू लागतो तो तो प्राथमिक व पौराणिक कल्पना मिथ्या भासू लागून भूत, पिशाच्च, देव दानव वगैरे शुध्द कल्पनेने उत्पन्न केलेल्या शक्तींची असत्यता प्रत्ययास येते, पूजेस व प्रार्थनेस आहोटी लागते आणि काही वेळ सर्व ब्रम्हांडास उत्पन्न करून त्याचे परिपालन व नाश करणा-या अशा एका परमात्म्याच्या कल्पनेचा उदय होतो. पण पुढे वेदान्त विचाराच्या कुंडात पेटलेल्या अग्नीत हे व्दैतहि खाक होऊन जाते आणि "अहं ब्रम्हास्मि" एवढा अनिर्वचनीय विचार मागे राहतो. व्यक्तीच्या व राष्ट्राच्या धर्मविचारांचा हा क्रम आहे. येथपर्यंत ज्याची मजल आली त्याला सर्व धर्म तुच्छ आहेत."[५४] असे धर्मकल्पनेविषयी विचार त्यांनी मांडले होते. हिन्दू धर्माचे खरे स्वरूप लोकांना दाखवून प्रचलीत असलेल्या धर्माच्या विकृतीवर त्यांनी टीका करून लोकांना धर्मनिरपेक्ष वृत्तीने जगण्यासाठी प्रेरित करण्याचा प्रयत्न केलेला आहे. धर्म हा केवळ वैयक्तिक जीवनापुरता मर्यादित ठेवून व्यक्तिवादी वृत्तीने कार्य केले तर समाजाचा पर्यायाने देशाचा विकास होईल व धर्माधर्मामधील संघर्ष, तंटे यांना वाव मिळणार नाही, असे त्यांना वाटत होते. मनुष्याने आपल्या ज्ञानाच्या कक्षा ओलांडून जे प्रश्न कधीच सुटत नसतात त्याबद्दल निष्कारण कथ्याकूट करू नये, असे स्पेन्सरप्रमाणे आगरकरांनाही वाटत होते. म्हणूनच त्यांनी पुर्नजन्मवादाचा विरोध केलेला आहे. ह्या जन्मातच चांगली कृत्ये करून समाधानी राहणे योग्य होईल. मनुष्याच्या मरणोत्तर जीवनाविषयी जिज्ञासा ठेवण्यापेक्षा भौतिक जीवन जगतांना आपले आयुष्य, आपले राष्ट्र, आपला देश याविषयी चांगले विचार ठेवून राष्ट्रोन्नती बरोबरच आपले जीवन सुखी करण्याचा प्रयत्न केला तरी देशाचा उत्कर्ष होईल, असे

त्यांना वाटत होते. "कुडीतून प्राण निघून गेला म्हणजे सर्व बाजार आटपला, जो मरतो त्याचा मागे किंवा पुढे काहीएक संबंध असत नाही. मेलेल्या मनुष्यास जशी पूर्वावस्था नव्हती, तशी उत्तरावस्थाही नाही म्हणजे पुर्नजन्मही नाही. या जगातील सुखदुःखाचा व इतर अनुभवांचा आरंभ वलय येथेच होतात.... मनुष्ये अस्तित्वात आली आहेत. व दिवसेंदिवस त्यांची संख्या वाढत आहेत. यावरूनच त्यांच्या नाशास अनुकूल अशा कारणांपेक्षा त्यांच्या अस्तित्वास व बुध्दीस अनुकूल अशी कारणे या पृथ्वीतील परमाणुसंघात निगुल आहेत हे सिध्द होते."[५५] असे असतांना अगोचर ऐहिक जीवनाकडे पाठ फिरवून मरणोत्तर जीवनाविषयी चिंता करणे अयोग्य आहे, असे आगरकरांचे म्हणणे होते.

धर्म म्हणजे समाजाचे नियमन करणारी, त्याला मार्गदर्शन करणारी आणि सामान्य पातळीवरून उदात्ततेच्या पातळीवर नेणारी प्रेरणा होय असे सर्वसाधारणत: धर्माचे विश्लेषण केले जाते. पण काही वेळा ही शक्ती समाजाची प्रगती कुंठीत करते. आणि तेव्हापासूनच धर्मामध्ये वेडगळ चालीरिती, अंधविश्वास, निरर्थक रूढी परंपरेचे स्तोम माजून समाज गतिहीन बनतो. अशा समाजाची प्रगती होणे अशक्य असते. सामान्य लोक या आचारांना धर्म मानतात. आगरकरांच्या या विचारांचे समर्थन करून, गं.बा. सरदार म्हणतात की, "समाजातील प्रत्येक रूढ कल्पना, परंपरा आचरण म्हणजे धर्म नव्हे, धर्मामध्ये मूलतत्व मीमांसा, ईश्वरविद्या, सामाजिक नीती, आचारसंहिता, उपासना पध्दती, मंत्रतंत्र, जादूटोना इ. अनेक गोष्टींचा आतापर्यंत अंतर्भाव होत आला आहे. विश्वाचे आदितत्व व परमेश्वराचे स्वरूप आणि साक्षात्कार याविषयीच्या तात्त्विक मतभेदातून जगातील निरनिराळे धर्म व पंथ उदयास आलेले आहे. पण सामाजिक नीतीमूल्यांचा प्रश्न निराळा आहे. करूणा, परोपकार सत्यनिष्ठा, समबुध्दी ही सनातन तत्वे प्रत्येक मोठ्या धर्मातील

संतमहंतांनी गौरविली आहेत. पण त्याच बरोबरच कितीतरी भ्रामक समजुती व अन्यायमूलक संस्था व रूढी यांना धर्माने पाठिंबा दिलेला आहे." धर्मजीवनातील या अपप्रवृत्तींना सुधारक विरोध करून शाश्वत नितीमुल्य समाजात रूजविण्याची गरज सुधारकांना वाटते. धर्माच्या नावाखाली माणुसकीला काळीमा लावणारे अनाचार नष्ट करून नवीन नीतीमूल्ये जनमानसात रूजविण्याची गरज निर्माण झालेली आहे. पण त्यासाठी धर्माचा आधार घेणे आगरकरांना योग्य वाटत नाही. समाज-हिताला बाजूला सारले जावून अवडंबर प्रथा म्हणून पाळली जाणारी गोष्ट विकृतीला पोहचण्याची शक्यता असते. म्हणून धर्मकल्पना व नीतीतत्वामध्ये फरक करणे आवश्यक आहे. "मनुष्याच्या आजपर्यंतच्या संचित अनुभवाने अत्यंत निर्दोष व हितकर ठरलेली तत्वे तीच चिरंतन नीतीतत्वे होत. व्यक्तीच्या मूलभूत प्रेरणा, अनुभव, विचार शक्ती ह्यांच्या सहाय्याने नितितत्वांचा निर्णय व प्रचार केला पाहिजे. धर्मातील पाखंडीपणाची लाट थोपवून धरण्यासाठी मुलांना शाळेतूनच शिक्षण मिळाले पाहिजे."[५६] यासाठी आगरकरांचा आग्रह होता.

आगरकरांना धर्माचे प्राबल्य समाजावर असणे अनिष्ट वाटत होते. धर्मभावना नैसर्गिक असल्याने मानवी जीवनातून त्याचे उच्चाटन होणे शक्य नाही, हे ते ओळखून होते. पण धर्म हे खाजगी आयुष्या-पर्यंत मर्यादित राहिले पाहिजे. आपल्या देशात अनेक धर्म, पंथ असल्याने धर्माच्या पायावर उज्वल भारताची निर्मिती होणे अशक्य आहे, असे आगरकरांना वाटत होते. उलट त्यातून धर्मकलह निर्माण होण्याची शक्यता जास्त आहे हे लक्षात घेवून आगरकरांनी शिक्षणाद्वारे विचार जागृती करून नीतीतत्व जोपासण्याचा मार्ग सांगितलेला आहे. कारण "एखाद्या मनुष्यास सक्तीने सद्गुणी करण्यात अर्थ नाही व त्या सद्गुणांचे

विशेष मोलही नाही. ज्या माणसाची मूळ प्रवृत्ती सद्गुणाकडे आहे त्याच्यावर शिक्षणाचे चांगले संस्कार झाल्यास ती द्विगुणीत होईल, उलट मनुष्य कितीही दुःप्रवृत्त असला तरी शिक्षणाने त्याला दूरगामी विचार करण्याची सवय लागेल आणि आपल्या वागणुकीचे पुढे काय परिणाम होतील याची जाणीव होऊन त्याच्या दुराचरणाला आळा बसेल."[५६] असे आगरकरांना वाटत होते. म्हणून त्यांनी नीतीतत्वाचा वापर मनुष्या जीवनात करण्याचा आग्रह धरलेला आहे ते समाजहिताकरिता योग्य आहे, असे त्यांना वाटत होते.

धर्म हा गतीशील असला तर समाजासाठी हितकारक ठरतो. ज्यांना समाजाच्या गतिनियमांचे ज्ञान अवगत असते असे लोक आपल्या आचरणात काळानुसार बदल करून समाजाला धर्माला प्रवाहित ठेवण्याचा प्रयत्न करीत असतात. त्यामुळे नवीन व जुन्या विचारांचा संघर्ष निर्माण होऊन धर्मकलह वाढतो. पण धर्मकलह वाढल्याने वैचारिक संघर्षातूनच चांगल्या निकोप राष्ट्राची निर्मिती होण्यास मदत होते. जगात झालेल्या धर्मयुद्धानेच पाश्चात्य राष्ट्र प्रगती करू शकले असे आगरकरांना वाटत होते. म्हणून ते म्हणतात, "धर्मग्लानीच्या ब-याच भागास आम्ही धर्मग्लानी न समजता धर्मोत्कर्ष समजतो. मूर्तीपूजा अजिबात नाहिशी होणे, यज्ञयागाचे थोतांड क्रमाक्रमाने शिथिल होत जाणे, वर्ण संकट होऊन पाहिजे त्याला, पाहिजे त्याच्याशी अन्नोदक व्यवहार करण्याची किंवा लग्न करण्याची परवानगी असणे, पाहिजे त्याने, पाहिजे त्या शास्त्रांचा किंवा धर्मग्रंथाचा अभ्यास करणे, स्त्री-पुरूषांनी हव्या त्या वयापर्यंत किंवा मुळीच अविवाहित राहणे, स्त्रियांस हवी ती विद्या संपादू देणे किंवा हवा तो धंदा करू देणे, ज्याचे त्याने आपल्या तब्येतीप्रमाणे लग्न करणे. ---- वगैरे गोष्टी प्रचारात आल्यास

कोणत्याही प्रकारची धर्मग्लानी होणार आहे असे आम्हांस वाटत नाही."७५ या विचारांचे आचरण झाल्यास समाज धर्मालाही प्रवाहित करण्यात यशस्वी होईल.

धर्मविचारांमध्ये काळाच्या प्रवाहात बदल होणे आवश्यक असते. आधुनिक काळाबरोबर मनुष्याची विवेक विचार शक्ती जागृत होत असतांना धर्मबंधनाने आपला विवेक घालविणे शहाणपणाचे नाही. ज्याला धर्मरक्षणाची खरी कळकळ असेल त्याने धर्माच्या अंतरंगाकडे लक्ष द्यावे. तेथे स्वातंत्र्य, समता, करुणा असे उच्चतर विचार तेवत असतात; त्याकडे लक्ष दिले पाहिजे. ग्रामण्ये, बहिष्कार व प्रायश्चित्त करण्याने धर्माचे रक्षण होत नसून धर्मबंधनाने समाज गतीहीन होण्याची शक्यता जास्त असते. ख्रिश्चन मिशन-यांच्या धर्मप्रचारामुळे धर्मरक्षणाची गरज धर्मपंडितांना वाटत असेल तर त्यांनीही ख्रिस्ती लोकांप्रमाणे परोपकारी कार्य करण्यास प्रवृत्त व्हावे, असा त्यांचा आग्रह होता. ख्रिश्चनांच्या धर्मप्रचाराने आपल्या धर्मावर संकट येत नसून लोकांची विचारशक्ती जागृत होण्याची शक्यता जास्त निर्माण होवून त्यांच्यात सारासारवृत्ती उपजू लागेल, तेव्हा चांगले काय? वाईट काय ? याची जाणीव होवून दुस-या धर्माचे आकर्षण कमी होईल. कारण सर्व धर्मात बहुतेक सारखीच तत्वे आहेत. फक्त त्यांच्या आचरण्याची पध्दत वेगवेगळी असल्याचे जाणवेल. त्यामुळे लोकच नवीन धर्म स्विकारण्याचे लोण थांबवतील. आगरकरांनी हिन्दू धर्माचे रक्षण करण्याची कळकळ असणा-यांना सल्ला दिला की, "ज्या दिवशी ख्रिस्ती लोकांप्रमाणे तुमच्या लोकांत वैदिक धर्माच्या प्रसाराकरिता व संरक्षणाकरीता प्रपंच सोडून हजारो स्त्री, पुरुष अविवाहित राहू लागतील, व ज्ञानसंपादनात आणि धर्मशिक्षणात आपली आयुष्ये कंठू लागतील व ज्या दिवशी धर्मासाठी गाठीचे हजारो रुपये सोडून अर्वाचिन

पद्दतीचे शिक्षण मठ स्थापण्यास हिन्दू लोक तयार होतील, ज्या दिवशी ख्रिस्ती पाद्र्यांच्या अंगी स्पष्टपणे दिसत असलेली धर्मश्रद्दा, शांतता, परोपकारित्व, दीर्घोद्योग, परचित्ताकर्षण कुशालता इ० सद्गुणांचा प्रादुर्भाव होऊन, परदुःख विमोचनासाठी डेमियनप्रमाणे महारोगासारख्या भयंकर व्याधीस आपले शरीरे बळी देण्याची तुमची तयारी होईल० त्या दिवशी इंग्रजी राज्यात हिन्दू धर्माचे संरक्षण करण्यासारखे काही सामर्थ्य तुमच्या अंगात आहे असे म्हणता येईल; शिळोप्याच्या वेळी चार सुखवस्तू लोकांच्या सह्या मागत फिरण्याने बुडत्या धर्माचा बचाव होत नसतो०"[५८] जे स्वतःला धर्माचे संरक्षक समजतात, त्यांच्या ढोंगीपणावर प्रहार करुन उदात्त जीवनांचा आदर्श ठेवण्यास सांगितले आहे०

आगरकरांनी ख्रिस्ती धर्मोपदेशकांच्या गुणाचा गौरव केला असला तरी धर्मान्तराला विरोध होता० प्रत्येक धर्मात चांगले व काही वैगुण्य आहेत० तेव्हा धर्मपरिवर्तनाने काहीही फरक पडत नाही० धर्माच्या शुद्द आचरणावर भर देवून धर्म स्वतःपुरता मर्यादित ठेवला तर स्वतःच्या धर्माचे रक्षण करणे सोपे जाईल असे त्यांना वाटत होते० धर्मान्तराला विरोध करतांना ते म्हणतात की, "आम्ही चालू हिन्दू धर्मावर कितीही तिक्ष्ण प्रहार केले, तथापि आमचा देश ख्रिस्ती व्हावा ही नुसती कल्पनाही आम्हास सहन होणार नाही० ----- सर्व धर्मात काहींना काही वैगुण्य आणि विधीनिषेधांचे अवडंबर हे आहेच० आमच्या भटांच्या वेडगळ धर्म समजुती अधिक उन्नत आहे असे आम्हास वाटत नाही० तेव्हा एक चुकीचा रस्ता सोडून दुस-या चुकीच्या रस्त्याने आमच्या लोकांनी अवलंब करावे असे आम्ही कधीच प्रतिपादणार नाही०"[५९] आगरकरांना हिन्दू धर्माविषयी प्रेम होते० पण धर्मातील अवडंबर नको होते, म्हणून त्यांनी या अवडंबरावर आपल्या लिखाणातून प्रहार करुन धर्माचे शुद्द

स्वरूप लोकशिक्षणाद्वारे समाजाच्या नजरेस आणून देण्याचा अविरत प्रयत्न केला होता. समाजाला खिळवून टाकणारी धर्मकल्पना त्यांना मान्य नव्हती. त्यांचा धर्माभिमान बुद्धीवादी मानवतावादी स्वरूपाचा होता. धर्माच्या नावाखाली स्त्रियांवर, शूद्रावर, सज्जनांवर होणारा अन्याय त्यांना मान्य नव्हता. जन्माधिष्ठीत जातीव्यवस्था व धर्मसंस्था ह्यांच्यामुळे व्यक्तिविकास खुंटतो आणि हळूहळू राष्ट्राचे तेजस्वीपण लोप पावते. अशा वेळी धर्मकल्पना राष्ट्राच्या दृष्टीने घातक ठरतात. तेव्हा पुन्हा एका धर्मकल्पनेचा पुर्नविचार होणे आवश्यक असते. त्यासाठी समाजसुधारकांना पुढे येवून समाजातील दोष दाखवून सन्मार्गाचा अवलंब करावा लागतो. समाज जागृती करण्याचे आपले कार्य किती खडतर आहे याची जाणीव आगरकरांना होती. तरीही त्यांनी निरपेक्षवृत्तीने आपले कार्य जन्मभर केले होते व लोकजागृती केली होती.

आगरकरांनी आपल्या लिखाणातून मांडलेले धर्मविषयक विचार न्या. रानडे यांनी पूर्वीच व्यक्त केले होते. पण त्यांनी प्राचीन धर्मग्रंथाचा आधार घेवून संतांच्या समता या शिकवणूकीचे महत्व लोकांना पटवून देण्याचा प्रयत्न केला होता. याउलट आगरकरांनी निरीश्वरवादाचा पुरस्कार करून ग्रंथप्रामाण्य धुडकावून लावले. डोळस भौतिकवादाचा आधार घेतल्याने समाजाने त्यांना प्रखर विरोध करून त्यांच्या जिवंतपणीच त्यांची प्रेतयात्रा काढून त्यांना समाजद्रोही ठरविले होते. त्यांचा बुद्धीवादी, अज्ञेयवाद लोकांना अगम्य ठरला. तरीही आगरकर आपले विचार समजावून सांगण्याचे कार्य करीतच राहिले. ज्या देशातील हजारो पिढ्यांनी अनेक गोष्टी मोठ्या कष्टाने केल्या. अनेक सुधारणांचे फळ आपणांस आयतेच प्राप्त झाले. अशा देशातील धर्माचा, रितीरिवाजांचा व लोकांचा सर्वस्वी त्याग करणाऱ्या मनुष्यास खऱ्या सुधारकांची पदवी कधीही

शोभणार नाही. स्वभूमित स्वलोकांत, स्वधर्मात, स्वाचारांत राहून अविचारी व अज्ञान देशबांधवांच्या निंदेस किंवा छळास न भिता, त्यांच्याशी कधी भांडून, कधी युक्तिवाद करून, कधी लाडीगोडी लावून, अथवा सामर्थ्य असल्यास कधी त्यांना दटावून त्यांची सुधारणा करणे यातच खरी देशप्रीती, खरी बंधुता, खरा देशाभिमान, खरे शहाणपण व खरा पुरुषार्थ आहे."[६०] असे आगरकरांनी आपल्या सुधारणेच्या व्रताचा पुनरुच्चार करतांना म्हटले. आपल्या कर्तव्याची जाणीव ठेवून आपले कार्य पुढील काळात अपयशी ठरणार नाही याची काळजी घेत लेखन केले आहे. हिन्दू धर्माबद्दल त्यांना आदर होता. पण त्याचे विडंबन नको होते. आपल्या लेखांमध्ये आपल्या धर्मसुधारणा कार्याचे उद्देश सांगताना "आर्यत्व न सांडिता" समाजसुधारणा करण्याचे ध्येय प्रगट केले होते. धर्मरूढींचा संबंध अज्ञानाशी जुळलेला असतो. ते अज्ञान दूर झाले तर धर्माचे सत्य स्वरूप समाजात प्रचलीत होवून समाजाचा विकास होवू शकतो. त्यासाठी लोकांमध्ये विचारशक्ती, विवेकबुध्दी जागृत झाली पाहिजे. विवेकबुध्दीच्या निकषावर आधारित रूढी, परंपरा, अंधश्रध्देचा विचार समाजात सुरू झाला तर समाज आपली उर्जित अवस्था प्राप्त करू शकतो असा विश्वास आगरकरांना वाटत होता. म्हणून ते अज्ञान दूर सारण्याचे कार्य अविरत करीत राहिले.

फर्ग्युसन कॉलेजमध्ये शिकवित असतांना आगरकर प्रसंगानुसार सुधारणेची तत्वे वर्गात पटवून देण्याचा प्रयत्न करीत असत त्यांचा तथाकथीत नास्तिकपणा जगजाहिर होता. न्यू ईंग्लिश हायस्कूल मध्ये शिकवित असतांना एका शनिवारच्या दिवशी मुलांनी त्यांना "सौ. आगरकर ह्या जोगेश्वरीच्या देवळात सुहासिनींची ओटी भरतांना दिसल्या तेव्हा त्यांनी आगरकरांना विचारले की, "सर, तुम्ही नेहमी

म्हणतात मूर्तीपूजा आता हे सगळं थोतांड आहे. मग मिसेस आगरकरांना देवळात का जाऊ देता ? तेव्हा आगरकर उत्तरले की, "मी म्हणजे मिसेस आगरकर नव्हे, नवरेपणाच्या जोरावर मी माझी मते त्यांच्यावर लादणार नाही. त्यांचे मत जोपर्यंत मला बदलता येत नाही, तोपर्यंत त्यांच्या Honest Conviction प्रमाणे त्यांना चालू दिले पाहिजे. आणि त्याकरीता जर काही खर्च लागला तर तो मला करायला हवा. हिन्दू समाजात स्त्रिया आर्थिकदृष्टया परावलंबी असतांना त्यांच्या Honest Conviction ची गळचेपी होऊ नये म्हणून मी कुटुंब-प्रमुख या दृष्टीने दक्ष आहे. मी त्यांना देवळात जाण्यात अर्थ नाही असे सांगत असतो. पण तिची श्रध्दा आहे. तिची मते बदलण्याची खटपट करतो. पण ती बदलण्यासाठी ती जाणती असल्याने तिच्यावर जुलूम करण्याचा अधिकार मला नाही."[६१] असे समर्पक उत्तर दिल्याने मुले शांत झाली. या प्रसंगावरुन आगरकरांनी धर्मसुधारणेचे कार्य करतांना सामाजिक नीतीमत्तेचे भान ठेवलेले आहे. आपले विचार सांगतांना जोर-जबरदस्ती करणे योग्य नाही, असे त्यांना वाटत असल्याने नवरेपणाचा हक्क दाखवून स्वतःच्या पत्नीच्या धार्मिक विचारांची कुचेष्ठा केली नाही. तिचे विचार बदलतील. ज्या गोष्टींवर त्यांचा विश्वास असल्याने दडपणाने तिने आपले विचार बदलावे असा आग्रह कधीच धरला नव्हता. पण सतत नवीन विचार पत्नीला सांगण्याचा प्रयत्न करुन तिचे मत परिवर्तन करण्याचा प्रयत्न केला. त्यांचे विचार त्यांच्या मृत्यूनंतर यशोदाबाईंनी अमलांत आणले होते. हेच त्यांच्या कार्याचे फलीत होते.

आगरकरांनी धर्मसुधारणांचे कार्य करतांना हिन्दू धर्माचा शाश्वत स्वाभिमानही जागृत ठेवला होता. अंधानुकरण करण्याला त्यांचा विरोध होता. जे काही नवीन स्विकारण्याची इच्छा असेल त्याचे सर्व गुण दोष,

उपयुक्तता जाणून घेवून नंतर स्विकारावे असे त्यांचे मत होते. केवळ एखादी गोष्ट पाश्चात्यांची आहे म्हणून घेवू नये. हे त्यांना कधीच मान्य नव्हते. तसेच आपल्यातही काही चांगले, वाईट आहे हे सुध्दा डोळसपणे मान्य केले पाहिजे व ते दोष कमी करण्याचा प्रयत्न केला पाहिजे, अशी त्यांची इच्छा होती. त्यांनी "भारतीय कलांचे पुराणत्व" यामध्ये जसा धर्माभिमान जागृत केला तसेच "आमचे दोष आम्हांस कधी दिसू लागतील. नाव्हावली, "आमचे ग्रहण अजून सुटले नाही."[६२] या लेखात आपल्या समाजातील न्यूनत्व सांगून ते सुधारण्याचा उपदेश लोकांना करतात. मानवी जीवन म्हणजे मानवाने ज्ञानाच्या सहाय्याने निसर्गावर मिळविलेला केवळ विजय नसून सत्य शोधनाच्या प्रेरणेमुळे अज्ञानाच्या कुंपनापलिकडे जाण्याची धडपड होय, अशी व्याख्या बुध्दीप्रामाण्याच्या तत्वावर प्रमाणित केली. त्यांनी हिन्दू धर्मातील "देवता मूर्तीपूजा, तंत्रमंत्र, स्नानसंध्या, गंधलेपन, नवस, सोवळे, प्रेतसंस्कार, स्पृश्यास्पृश्य,पुर्नजन्म" इ. अनेक विषय घेवून तर्कशुध्द ऐतिहासिक दाखले देऊन चिकोत्सकपणे आपले विचार मांडले आहे. त्यांनी धर्मावर टिकाच केली नाहीतर जे चांगले विचार आहेत त्याचा पुरस्कारही केला आहे.

"मि. अशाबरनर आणि अनाथ हिन्दू विधवा" या लेखामध्ये ब्रिटिशांनी हिन्दूवर केलेल्या अवाजवी आरोपांचीही दखल घेतली आहे. ते म्हणतात, "स्त्री दाक्षिण्याविषयी ज्यांची योग्य ख्याती जगभर आहे; अशा इंग्रजापैकी मि. अशाबरनर सारख्या अक्कलवंत, हुशार व नावाजलेल्या साहेबबहादूरांनी आपल्या पेनाच्या शिंतोड्यांनी आमच्या अनाथ गतभर्तृकांच्या अब्रूस डाग लावण्यास उद्युक्त व्हावे."[६३] हे बरे नव्हे. मि. अशाबरनरने National Review मासिकात स्त्रियांच्या वैधव्य

जीवनात त्या Chartered Libertiness या वापर करून स्वच्छंदी जीवन जगतात असा आरोप करण्याचा प्रयत्न केला तेव्हा आगरकरांनी त्यांची हजेरी घेतली होती. स्त्रियांविषयी त्यांची आदराची भावना यातून प्रगट झालेली दिसून येते. तसेच हिन्दू धर्मातील स्पृश्यास्पृश्य, जातीभेदावर आघात करतांना त्यांनी उच्चवर्णियांनी स्त्रियांवर केलेल्या अन्याय व अत्याचाराचे परखडपणे वर्णन केले आहे. अस्पृश्यांनी उच्च-वर्णियांवर बहिष्कार टाकला तर त्यांना जीवन जगणे कठीण होईल याची जाणीव आपल्या लेखांतून करून देतात. सामाजिक विषमता धर्माने दिली नाहीतर मानवाने निर्माण केली आहे हे सोदाहरण स्पष्ट करून सांगितले आहे. "कुके रे कुके अथवा बहिष्काराचे शुष्क अवडंबर" या लेखात ते म्हणतात की, "ब्राम्हणांना हे कसे समजत नाही की, आपल्या अंगात कोणत्याही प्रकारचे त्राण, योग्यता, अधिकार न राहिल्यामुळे ब्राम्हण्य करण्याचे, बहिष्कार घालण्याचे किंवा कोणाला वाळीत टाकण्याचे दिवस आता गेले आहे. उलट त्यांचेकडूनच ते बहिष्कृत होण्याचा संभव आहे."[६४] या विचारातून त्यांनी ब्राम्हण वर्गाच्या आचार व विचारातील विसंगती दाखविली आहे. ग्रामण्ये करून सामाजिक धार्मिक प्रश्न सुटणार नाहीत हे त्यांना सांगावयाचे होते. तत्कालीन समाजात चाललेल्या धर्मकलहामुळे सनातनींच्या अंधश्रद्धा पूर्ण वागल्यामुळे समाजात कटुता निर्माण होत आहे हे जाणून "धर्मसंग्राम व गृहकलह" या १७ ऑगस्ट १८९१ च्या लेखात त्यांनी लिहिले की, "ब्राम्हणाने ब्राम्हणेत्तर कोणत्याही हिन्दुच्या हातचे अन्नपाणी होवू नये या हट्टी मंत्राचा जप करीत बसणाऱ्या ब्राम्हणांचा प्रति दिवशी ह्या त्या हिन्दूशी प्रत्यक्ष प्रत्यक्ष समागम घडत आहे. तो जिन्नस, कुणाब्याच्या हातची शुक्रवारची काबुली, मुसलमान तांबोळ्याच्या दुकानातील ओला चुना याचा उघडपणे उपयोग करणे आणि त्यांच्याच हातची भाकर व पाणी यांना निषेध मानणे एकमेकांशी असंबद्ध नाही

काय ? ड्रैवरच्या दुकानातील औषध राजरोस घेण्यास प्रत्यवाय नाही तर ख्रिस्ती लोकांच्या हातचा चहा पिण्यास मनाई कां असावी ?" [६५] असा सवाल त्यांनी सनातनी लोकांना विचारला आहे. जीवनातील आवश्यक वस्तू हस्तानुपरत्वे घरी येतात त्या शुध्द असतील अशी खातर जमा करून त्याच्या वापरास नकार का दिला जात नाही, असाही प्रश्न केला आहे. केवळ स्वार्थासाठी धर्माचा सोयीस्कर अर्थ काढून धार्मिक अवडंबर माजविणे एवढेच त्यांचे ध्येय असेल तर त्यामुळे समाजात धार्मिक संघर्ष होणे अपरिहार्य ठरेल, यामुळे समाजात तंटे निर्माण होण्याची शक्यता नाकारता येत नाही. तेव्हा लोकांनी समजून उमजून रूढी, परंपरा चालीरितींचा अंमल चालवावा असे आगरकरांनी निक्षून सांगितले आहे.

आगरकरांचा धार्मिक संघर्ष स्वकीयांशीच असतांना त्यांनी त्यांच्याशी संवादही साधण्याचा प्रयत्न केला आहे. आपल्या समाजात सुधारणा घडून यावी म्हणून ते झटत राहिले. लोकांना त्यांची चूक दाखवून त्यांना ती चूक सुधारण्याचा आग्रहही करीत राहिले. आपला समाज मागासलेला आहे म्हणून त्याची लाज बाळगून समाजाशी अलिप्तपणाने, पांढरपेशा समाजाचा बुरखा पांघरून राहिले नाहीत. तर कधी युक्तीवादाने, कधी विनोदाने, तर कधी उघडपणे आपल्या समाजाचे दोष सांगून लोकांनी त्यात बदल घडवून आणावा, यासाठी प्रयत्नशील राहिले. सर्व सामान्यांचे विषय घेऊन जनजागृती करीत राहिले. मूर्तिपूजा नष्ट होणे, यज्ञयाग, कर्मकांडाचे अवडंबर नष्ट होणे हे आवश्यक वाटत होते. ते आंतर्जातीय विवाहास प्रोत्साहन देत तर उच्च-नीच भेदभाव नष्ट होणे जरूरीचे आहे असे त्यांचे मत होते. शाळा महाविद्यालयातून धार्मिक शिक्षण दिले जावू नये असे त्यांना वाटत होते. ग्रंथ प्रामाण्याला त्यांचा

विरोध होता. वेद, बायबल, कुराण ईश्वरनिर्मित आहे हे सनातन्यांचे मत त्यांना मान्य नव्हते. "कोणतेही आचार घालण्यास पूर्वीच्या ऋषींना जितका अधिकार होता तितकाच आम्हासही आहे. ---- बऱ्यावाईटाची निवडानिवड करण्याची जितकी बुद्धी त्यांना होती तितकी किंवा तीहून अधिक आम्हांसही आहे. सृष्टिविषयक व तत्कर्तृत्वविषयक ज्ञान जितके त्यास होते तितके किंबहुना त्याहून बरेच ज्ञान आम्हास आहे. सबब त्यांनी घालून दिलेल्या नियमांपैकी जेवढे हितकारक असतील तेवढयांचेच आम्ही पालन करणार व जे अपायकारक असतील ते टाकून देऊन त्यांचे जागी आम्ही निर्दोष वाटतील असे नवीन घालणार.----- एका ऋषीविरुद्ध दुसरा ऋषी हुडकीत बसण्यात व सा-यांचा मेळ घालण्याचा प्रयत्न करण्यात काही अर्थ नाही."[६६] असे आगरकरांचे म्हणणे होते. आम्हाला परिस्थितीनुसार ज्या रुढी परंपराचे पुनर्लोकन करुन नवीन रुढी परंपरा निर्माण करण्याची गरज आहे असे मत त्यांनी "स्वयंवर" या अग्रलेखात मांडले होते.

धर्मसंस्कारातील बारीकसारीक गोष्टींचा विचार त्यांनी आपल्या लेखांमधून मांडलेला आहे. मनुष्य जीवनाची सुरुवात होते, त्या वेळेपासून त्याच्यावर जे विधी केले जातात; त्याच्यातील चांगल्या वाईट संस्काराची चर्चा केली आहे. तसेच मनुष्य मेल्यानंतर त्याच्यावर होणा-या प्रेतसंस्कारांचाही विचार तर्कदृष्टया, व्यवहारीदृष्टया मांडला आहे. "शाहाण्यांचा मूर्खपणा अथवा आमचे प्रेतसंस्कार" या लेखात ते म्हणतात की, "मनुष्य मेल्यानंतर त्याच्या प्रेताची काहीतरी वाट लावलीच पाहिजे, नाहीतर ते सडून त्याला दुर्गंधी सुटेल, व त्यापाशी उभे रहावेनासे होईल. तेव्हा ज्याची तुमची मृत्यूने ताडातोड केली त्याचे शरीर तुम्हांस कितीही प्रिय असले, आणि त्याच्या संवर्धनार्थ तुम्ही कितीही खर्च व कष्ट केले असले तरी

त्यातला प्राण निघून गेल्याबरोबर, सर्व प्रेम एकीकडे ठेवून त्याचे दहन करण्याच्या, त्याला समाधी देण्याच्या, किंवा ते मूकोत्सेधीत अथवा निःशब्द मनो-यात [ Tower of Silence ] नेऊन ठेवण्याच्या तयारीस लागले पाहिजे. मनुष्याच्या सुधारणेत पाहिजे तेवढे फेरफार होवोत त्याचे हाती अमरत्व आल्याशिवाय हा दुःखकारक प्रसंग कोणत्याही रीतीने त्याला टाळता येणार नाही."[६७] प्रेतसंस्कार आगरकरांना आवश्यक वाटत असले तरी त्यानंतरचे क्षौरविधी निरर्थक वाटतात. तसेच एखादा पुरुष मेला असता त्याच्या पत्नीला जबरीने सती जाण्यास भाग पाडणा-या अमानुष प्रवृत्तीच्या लोकांच्या कार्यालाही त्यांचा विरोध आहे. तसेच केशवपनासारखे निर्दयी धार्मिक विधी त्यांना माणुसकीला काळोमा लावणारे वाटतात. स्वतः आगरकरांनी आपल्या आईच्या मृत्यूनंतर क्षौरविधी केले नव्हते. त्यांच्या पत्नींनीही आगरकरांच्या मृत्यूनंतर केशवपन केले नव्हते. आपल्या जीवनात त्यांनी अंधश्रद्धेला, कर्मकांडाला कधीच स्थान दिले नाही. स्वतःच्या आधुनिक क्रांतीकारक विचारांप्रमाणेच ते वागले. पण अंधानुकरण केले नाही. "स्त्रियांनी जाकीटे घातली पाहिजेत" असा अट्टाहास करणारा सुधारक असावेत या उत्सुकतेने पाहणा-या व्यक्तींची आगरकरांकडून निराशा होत असे. एकदा मुंबईला गेले असतांना आगरकरांना पाहून "हेच का ते सुधारक ? त्यांच्यातर पागोट्याचे बंद गळ्याला लोंबताहेत" असा अभिप्राय ऐकायला मिळाला तर त्यांना पाहण्याच्या उत्सुकतेने आलेल्या गृहस्थाला आगरकर आपल्याच घरी त्यांच्या समोर असतांना ओळखता आले नाही." धाबळीची बाराबंदी अंगात घातली आहे, एक पंचा नेसून दुसरा डोक्याला गुंडाळलेला आहे. आणि हातातल्या चिलमीचे मनसोक्त सेवन चालले आहे. अशा थाटात बसलेली मूर्ती त्याने पाहिली"[६८] तर त्याला आधुनिक विचार-सरणीचे, पाश्चात्य विचारांचे पुरस्कर्ते सुधारक आगरकर हेच असतील

असे वाटले नव्हते. इतके त्यांचे विचार लोकांना क्रांतीकारक वाटत होते कि ते ब्रिटिशांसारखेच राहत असावे. धार्मिकपणाचा लवलेशाही त्यांच्यात दिसत नसावा आणि भारतीयत्व त्यांच्यामधून प्रगट होत नसावे" असा गैरसमज लोकांमध्ये निर्माण झाला होता. त्यांच्या सुधारणावादी विचारांमध्ये व्यक्ति स्वातंत्र्याला अग्रस्थान असल्याने संयमीवृत्तीचे नसतील असेही वाटत होते. पण त्यांनी आपल्या आचारावर वागणूकीवर संयम ठेवून सुधारणा कार्य केले होते. आगरकरांच्या साधेपणात संयम व जबाबदारीचे तत्व दिसून येतात.

आगरकरांपूर्वीही अनेक सुधारक होवून गेलेत. पण आगरकरांसारखे त्यागी क्रांतीकारी जीवन फार थोडयांचे असतील. "आपले जीवन आंधळे पणाने जुन्या चाकोरीतून चालविण्याचा अट्टाहास करणे अत्यंत घातकीपणाचे आहे" हे त्यांच्याइतके पूर्णत्वाने कुणीच जाणले नव्हते. आणि कुणी जाणले असले तरी त्यांच्याइतक्या प्रामाणिकपणाने, परिणामकारकपणे समाजाला ते कुणीही समजावून देण्याचा प्रयत्न केला नाही. आपला समाज लाचारीचे जीवन जगत आहे. या समाजाला माणूसकीपूर्ण सुखाचा आणि स्वातंत्र्याचा उपभोग घ्यायचा असेल तर अनेक जुनाट गांजलेल्या धर्माच्या शृंखला त्याला तोडता आल्या पाहिजेत. धर्माने सत्यस्वरूप जीवनमूल्यांचा अंगिकार करण्याचे धाडस समाजात निर्माण करता आले पाहिजे. स्त्रियांना पुरूषांची प्रभावी जीवनस्फूर्ती मानले गेले आहे. पण धर्मातील संस्कारांनी तिला जखडून तिचे स्वातंत्र्यच नष्ट केले आहे हे तिला धर्मसष्टींनी "आगतीक कारूण्यमूर्ती" करून ठेवले आहे या बंधनातून स्त्रिया समाजाने बंधनमुक्त केले पाहिजे. नीती-अनीतीची मूल्ये स्त्रियांप्रमाणेच पुरूषांनाही लागू व्हावीत. जेवणासारखी रोजची जीवनाला अत्यावश्यक गोष्ट धर्मसष्टीने स्त्रीवरच लादली आहे. आपल्याला स्वयंपाक करता येत

नाही. हे अभिमानाने सांगणारी पुरुषप्रधान संस्कृती आगरकरांना कधीच मान्य झाली नव्हती. समाजाच्या सर्व थरांचा व त्यांच्या सर्व अंगाचा समतेच्या ज्ञानानुसार होणारा विकास हाच त्यांच्या दृष्टीने सुधारणेचा खरा अर्थ होता. जुन्या चांगल्या गोष्टींचे पुनरुज्जीवन करून त्याला धक्का लागणार नाही याकडे लक्ष देत नवीन चांगले आत्मसात करीत जाणे हा त्यांच्या सुधारणा मार्गाचा एक भाग होता. सर्वांगीण विकास हे समाजोध्दाराचे ध्येय त्यांनी आपल्यासमोर ठेवले होते. त्यानुसार भारतीयांच्या धार्मिक जीवनाचा सखोल विचार करून आपले क्रांतीकारी विचार समाजासमोर मांडण्याचे धाडस त्यांनी केले होते. सुधारणा ही मुंगीच्या पावलाने होणार हे त्यांना चांगले माहित होते. सहजासहजी लोक धर्मरूढी त्या कितीही वाईट असल्या तरी त्यांचा त्याग करण्यास धजावणार नाहीत, हे आगरकरांना माहित होते. तरीही त्यांच्या विचारांमध्ये परिवर्तन घडवून आणले तर त्या रूढी, परंपरेचे चांगले वाईटपण ओळखू शकण्याची कुवत लोकांमध्ये निर्माण होईल असा त्यांना विश्वास होता व हाच विश्वास पुढे त्यांना सुधारणा करण्यास प्रेरित करेल ह्या आशावादाने आगरकरांनी आपले धर्मविचार प्रांजळपणे निर्भिडपणे लोकांपर्यंत पोहचविण्याचा प्रयत्न केला होता.

# प्रकरण - ५ वे

## संदर्भ


१] M.G. Ranade, M. Writings, P.71.

२] ग.बा. सरदार, रानडेप्रणीत सामाजिक सुधारणेची तत्वमिमांसा, पृ. ५६.

३] कित्ता, पृ. ५७.

४] M.G. Ranade, Religious and Social Reform, (Bombay, 1901), P. 273.

५] M.G. Ranade, M. Writings, P.69.

६] वा.वा. ठाकूर, कै. नामदार न्यायमूर्ती माधव गोविंद रानडे यांचे चरित्र पृ. ६५-६९, उद्धृत. डॉ. भांडारकर यांचे धर्मपरलेख व व्याख्याने, पृ. ४७२-४७३

७] न.र. फाटक, न्या. रानडे यांचे चरित्र, पृ. १११-११४

८] रमाबाई रानडे (प्रकाशित), न्यायमूर्ती महादेव गोविंद रानडे ह्यांची धर्मपर व्याख्याने, (पुणे १९४०) पृ. १४० (पुढे या ग्रंथाचा उल्लेख न्या. रानडे यांची धर्मपर व्याख्याने असा येईल.)

९] कित्ता, पृ. ६८.

१०] बलराम नंदा, (अनुवादक) वसंत पळशीकर, गोपाळकृष्ण गोखले - ब्रिटिश राजवट व भारतीय नेमस्त युग, पृ. १३७.

११] न.र. फाटक, न्या. रानडे यांचे चरित्र, पृ. २१०

१२] [illegible], न्यायमूर्ती म.गो. रानडे यांची धर्मपर व्याख्याने, पृ. ७८-७९

१३] M.G. Ranade, Religious and Social Reform, (Bombay : 1902), P- 272.

१४] M.G. Ranade, M. Writings, P.115.

रमाबाई, १५] न्या॰ रानडे यांची धर्मपर व्याख्याने, पृ॰ १-२.

१६] कित्ता, पृ॰ ७

१७] कित्ता, पृ॰ ८

१८] कित्ता, पृ॰ १२-१४

१९] कित्ता, पृ॰ १५-१७

२०] कित्ता, पृ॰ १८-१९

२१] कित्ता, पृ॰ १९-२२

२२] कित्ता, पृ॰ २३-२५

२३] द.गो. कर्वे, स्वतंत्र भारताचे द्रष्टे - न्या. रानडे, पृ.४.

२४] रमाबाई रानडे, आमच्या आयुष्यातील काही आठवणी, पृ. २७

२५] गं.बा. सरदार, रानडेप्रणीत सामाजिक सुधारणेची तत्वमिमांसा, पृ.६३

२६] रमाबाई रानडे, (प्रकाशित) संकीर्ण लेखसंग्रह, पृ. २३३-२३५.

२७] न.र. फाटक, न्या. रानडे यांचे चरित्र, पृ. १९.

२८] गं.बा. सरदार, रानडे प्रणीत सामाजिक सुधारणेची मिमांसा, पृ.६७-६८.

२९] M.G. Ranade, Religious and Social Reform, P.21.

३०] कित्ता, पृ. २६१.

३१] M.G. Ranade, M. Writings, P.225.

३२] रमाबाई रानडे,[प्रकाशित] रानडे यांची धर्मपर व्याख्याने, पृ. २५४.

३३] कित्ता, पृ. ९८-९९.

३४] P.J. Jagirdar, Studies In Social thoughts of M.G. Ranade, (Nagpur : 1963), P. 22-23

३५] गोविंद तळवलकर, नौरोजी ते नेहरु, पृ. ९०-९१

३६] M.G. Ranade, M.Writings, P.232.

३७] इनामदार - गोसावी, आधुनिक भारतीय तत्वज्ञ, [पुणे : १९९०], पृ.३९

३८] M.G. Ranade, M. Writings, P.158.

३९] वि.स. खांडेकर, आगरकर - व्यक्ति आणि विचार, [पुणे : १९४९], पृ. २१-२२.

४०] मा.दा. आळतेकर, संपूर्ण आगरकर निबंध संग्रह, भाग पहिला, पृ.१६

४१] गं.बा. सरदार, आगरकरांचा सामाजिक तत्वविचार, पृ. ५५-५६

४२] पु.पां. गोखले, आगरकरांशी ओळख, पृ. ३१७-३१८.

४३] गं.बा. सरदार, आगरकरांचा सामाजिक तत्वविचार. पृ. ५०.

४४] ग.प्र. प्रधान, आगरकर लेखसंग्रह खंड १ ला, पृ. ८-१२.

४५] कित्ता, पृ. १४-१७.

४६] कित्ता, पृ. ३९-४०.

४७] गं.बा. सरदार, आगरकरांचा सामाजिक तत्वविचार, पृ. ५४

४८] ग.प्र. प्रधान, आगरकर लेखसंग्रह, खंड १ ला, पृ.४७

४९] कित्ता, पृ. ५०-५३.

५०] मा.दा. आळतेकर, आगरकर निबंधसंग्रह, भाग १ ला, पृ. १७१

५१] ग·प्र· प्रधान, आगरकर लेखसंग्रह, खंड १ ला, पृ· ५९·

५२] कित्ता, पृ· ६४·

५३] कित्ता, पृ· ६५-७९

५४] कित्ता, पृ· ७४

५५] गं·बा· सरदार, आगरकरांचा सामाजिक तत्त्वविचार, पृ· ६८·

५६] फडतरे [संपादित] निबंधसंग्रह, भाग २, पृ· ११६

५७] कित्ता, भाग ३, पृ· ५३

५८] कित्ता, पृ· ८९-९०

५९] कित्ता, पृ· ७८-७९

६०] आळतेकर, संपूर्ण आगरकर निबंधसंग्रह, भाग १, पृ· २११

६१] पुं·पां· गोखले, आगरकरांशी ओळख, पृ· १८-१९·

६२] नातू-देशपांडे, आगरकर वाङ्मय खंड १, पृ· २१२-२३५

६३] फडतरे [संपादित] निबंध संग्रह भाग १, पृ· ७०-७३

६४] कित्ता, भाग ३, पृ· ४०

६५] कित्ता, पृ· ४३·

६६] आळतेकर, संपूर्ण आगरकर निबंधसंग्रह, भाग १, पृ· ९५

६७] कित्ता, पृ· १६०

६८] वि·स· खांडेकर, आगरकर - व्यक्ति आणि विचार, पृ· १९-२०·

## प्रकरण सहावे

## समालोचन

एकोणिसाव्या शतकाच्या उत्तरार्धात भारतामध्ये ज्या काही सामाजिक प्रबोधनाच्या चळवळी घडून आल्या, त्यामधील विशेषतः महाराष्ट्रातील सामाजिक प्रबोधनामध्ये न्यायमूर्ती रानडे आणि प्राचार्य गो.ग. आगरकर यांनी केलेली बहुमोल कामगिरी ही त्यांच्या उज्वल देशप्रेमाला, विवेकनिष्ठ प्रगतीशील राष्ट्रनिष्ठेला अनुरुप अशीच होती. त्यांच्या काळापासूनच कृतीशील निस्वार्थ, त्यागी प्रवृत्तीच्या समाज सुधारणा कार्याला सुरुवात झालेली होती. रानडे आणि आगरकरांनी देशाच्या सर्वांगीण सुधारणेचा दृष्टीकोन समोर ठेऊन राजकीय, आर्थिक, सामाजिक, धार्मिक वाङ्मयीन इ. सर्व क्षेत्रात कार्य करण्यास सुरुवात केली. त्यामुळे त्यांचा कालखंड समाज प्रबोधनाच्या दृष्टीने महत्वपूर्ण ठरला. त्यांच्या भरीव कार्यामुळे राजकीय, आर्थिक, सामाजिक, धार्मिक सुधारलेला ख-या अर्थाने प्रारंभ झालेला आढळतो.

सर्वसाधारणतः सामाजिक सुधारणेचा इतिहास[१] संतांच्या कार्य काळापासून गणला जातो. मध्ययुगीन काळामध्ये हिन्दु-मुस्लीम धर्मीय समाजामध्ये समन्वय साधण्यासाठी आणि त्याचबरोबर समाजातील जातीभेद, धार्मिक कर्मकांडाचे अवडंबर, अंधविश्वास समाजातून नष्ट होण्यासाठी संतांनी जे सामाजिक प्रबोधन घडवून आणले ते मध्येकाळातील जडत्व धारण केलेल्या समाजाला प्रवाहित करण्यासाठी उपयुक्त ठरले होते. रामदासांचा अपवाद सोडता सर्व संतांनी अध्यात्मावर भर देऊन मानवतावादी संदेश दिलेला आढळतो. त्यानंतर ब्रिटिशांच्या काळापासून आधुनिक भारताचा कालखंड सुरु झाल्यानंतर सुशिक्षित, द्रष्टया सुधारकांनी सामाजिक सुधारणेचे कार्य हाती घेतले. राजाराम मोहन रॉयच्या कार्यापासून समाज सुधारनेला भारतात सुरुवात होवून, महाराष्ट्रात हे कार्य बाळ शास्त्री जांभेकरांच्या काळापासून सुरु झाले. जांभेकरांच्या काळापासून तर रानडे, आगकरांच्या काळापर्यंत या पन्नासवर्षांच्या कालखंडापर्यंत

अनेक सुधारकांनी जनजागरणाचे कार्य केले होते. पण त्यांचे कार्य एका मर्यादेपर्यंत सीमित होते. सामाजिक बहिष्कारांच्या भीतीने उघडपणे समाज कार्य करण्याचे ध्येय अपवाद वगळता फार थोडया व्यक्तींनी गाठलेले दिसते. त्यामुळे ज्योतिबा फुले, रानडे, आगरकरांचे कार्य तत्कालीन सुधारकांच्या कार्यापेक्षा वैशिष्ठयपूर्ण ठरले. त्यांनी समाजातील असलेली मरगळ दूर करुन समाजाला चैतन्यशील करण्याचा प्रयत्न केलेला होता. या दृष्टिकोनातून त्यांच्या कार्याचे महत्व लक्षात घेवून स्थूलमानाने रानडे आणि आगरकरांच्या कार्याचे मुल्यमापन करण्याचा प्रयत्न या प्रबंधात केला आहे.

त्याच प्रमाणे रानडे आणि आगरकरांच्या संपूर्ण जीवन कार्याचा तुलनात्मक अभ्यास करण्याचा प्रयत्न केलेला आहे. या प्रकारणामध्ये रानडे व आगरकरांमधील साम्य व भिन्नता दाखवुन त्या दोघांच्या कार्यातील समान तत्व शोधण्याचा प्रयत्न केला आहे.

सामाजिक प्रबोधनाचे कार्य करतांना दोन्ही सुधारकांनी वेगवेगळे कार्यक्षेत्र स्विकारले असले तरी "समाजाचा सर्वांगीण विकास" आणि "अखिल मानव जातीचे कल्याण" हेच त्यांच्या समाज सुधारणेचे ध्येय त्यांनी आपल्यासमोर ठेवलेले दिसते. सुधारणा म्हणजे केवळ आधुनिकीकरण नव्हे तर स्वतंत्र होतांना निकोप समाजाचे सक्षम व्यक्तिमत्व निर्माण होवुन एक प्रबळ राष्ट्र म्हणून जगासमोर भारताची प्रतिमा निर्माण व्हावी अशी रानडे आणि आगरकरांची इच्छा होती. आपले उद्देश साध्य करण्यासाठी लोकशिक्षणाचा व ज्ञानप्रसाराचा मार्ग त्यांनी अवलंबिला होता. कोणत्याही व्यक्तीचे राष्ट्रीय कार्य हे त्या कालखंडातील, त्या राष्ट्राच्या समाजातील परिस्थितीचा अपरिहार्य परिपाक असतो. त्या काळाच्या पार्श्वभूमीवरच त्या व्यक्तिंच्या कार्यांच्या दिशा निश्चितपणे ठरत असतात. समाजातील विविध घटक, त्यांचे प्रश्न, त्यांच्या आकांक्षा, जीवनमुल्ये जाणीवा या बाबतीत परिस्थितीनुरुप विभिन्नता आढळून येते.

रानडयांचा सार्वजनिक जीवनाचा कालखंड इ.स.१८७० ते १९०० म्हणजे तीस वर्षांचा कार्यकाळ होता तर आगरकरांचा सार्वजनिक जीवनाचा कालखंड इ.स. १८८० ते १८९५ म्हणजे केवळ पंधरा वर्षांचा होता. रानडे आणि आगरकरांचा जन्म इ.स.१८५७ च्या राष्ट्रीय उठावाच्या अगोदरचा म्हणजे रानडे इ.स. १८ जाने. १८४२ आणि आगरकर ~~२६ जून~~ १८५६ मधील होते. रानडे आगरकरामध्ये एका पिढीचे अंतर होते. कोणत्याही व्यक्ती जन्मतः परिपूर्ण नसतात. त्यांच्यामध्ये असलेल्या कर्तृत्वाला काळ आणि परिस्थिती यामुळे गती मिळत असते. विशिष्ठ वातावरणातून त्याच्या कर्तृत्वाला, सामर्थ्याला, दुष्टीला चालना मिळून त्या व्यक्तिंची जीवननिष्ठा तयार होत असते. त्यामुळे त्या व्यक्तीचे मुल्यमापन करतांना तत्कालीन परिस्थितीचाही विचार करावा लागतो. त्यांच्या कर्तृत्वाचे वेगळेपण त्यावर अवलंबून असते. रानडे व आगरकरांच्या जीवनकार्यांच्या बाबतीतही हे वेगळेपण जाणवते.

आधुनिक भारतातील पहिली पिढी ब्रिटिशांच्या आगमनाने प्रभावित झाली होती. या पिढीला हे आक्रमक मुस्लीम आक्रमकांसारखे विध्वंसक वाटले नव्हते तर ब्रिटिशांनी अराजकतेला दूर सारून शांतता व सुव्यवस्था निर्माण केली. त्या बरोबरच नवीन विचार आणि तत्वज्ञान दिल्याने त्यांच्याबद्दल आदर निर्माण झालेला होता. ब्रिटिश सत्तेमुळे होणारे हे परिवर्तन नवसमाज निर्मितीसाठी त्यांना उपयुक्त वाटत होते. हे सुधारक ब्रिटिशांच्या आगमनाचे स्वागत करीत असले तरी त्यांना आपण पारतंत्र्यात असल्याची खंत होती. हे पारतंत्र्य आपल्या लोकांच्या निष्क्रीयतेमुळे, त्यांच्या प्रतिगामी विचार सरणीमुळे त्यांच्या राजकीय उदासीन प्रवृत्तीमुळे प्राप्त झालेले आहे, याची जाणीवही त्यांना होती. म्हणून ही निष्क्रियता, उदासीनता, प्रतिगामी विचार सरणी या प्रवृत्तींना समाजातून नष्ट करणे आवश्यक आहे, असे या सुधारकांना वाटत होते. त्याशिवाय समाजाचा सर्वांगीण विकास होणार नाही हे स्पष्ट दिसत असल्याने त्यांनी सामाजिक व शैक्षणिक सुधारणेवर जास्त भर दिलेला आढळतो. या सुधारकांमध्ये पुनरुज्जीवनवादी सुधारक,

बहुजन समाजवादी सुधारक आणि सर्वांगीण सुधारक अशा सुधारकांच्या तीन पिढया प्रामुख्याने गणल्या जातात. त्यामध्ये विष्णुबुवा ब्रम्हचारी हे पुनरुज्जीवनवादी सुधारकाचे अग्रणी मानले जातात तर जोतिबा फुले यांना बहुजन समाजवादी सुधारकांचा मान दिला जातो, आणि सर्वांगीण सुधारणावादाचे जनकत्व न्या. रानडे आणि गो.ग. आगरकर यांच्याकडे जाते. बहुजन सुधारणावादी व सर्वांगीण सुधारणावादी नेत्यांना इंग्लिश राजसत्तेमुळे निर्माण झालेली स्थिरता व शांतता आपल्या समाजात धार्मिक व सामाजिक सुधारणा घडवून आणण्यास उपयुक्त वाटत होती. त्यानंतरच ते राजकीय स्वातंत्र्याचे समर्थन करीत होते. आपला समाज पूर्णपणे बदलल्याशिवाय राजकीय स्वातंत्र्याची अपेक्षा करणे त्यांना योग्य वाटत नव्हते. स्वातंत्र्यानंतरच्या भारताच्या इतिहासाचे अवलोकन केले तर हे सुधारक दूरदृष्टीचे भाष्यकार ठरतात. आज भारताला स्वातंत्र्य मिळून औद्योगिक, आर्थिक प्रगती झाली असली तरी सर्वांगीण सुधारणेवर आधारित नवसमाज निर्माण झाला नाही हे स्पष्ट झाले आहे.

न्या. रानडे यांना भारतात चैतन्यशील नव समाज निर्माण व्हावा असे वाटत होते. त्यांची नव समाजाची व्याख्या म्हणजे "त्यात बंधने नकोत, स्वातंत्र्य हवे, भोळसटपणा नको श्रद्धा हवी, जन्म प्राप्त पदवी नको, समान भुमिकेवरील व्यवहार हवा, जबरदस्ती नको युक्तिवाद हवा, विस्कळीतपणा नको, संघटना हवी, सत्याग्रह नको, सहिष्णुता हवी, आंधळा दैववाद नको, आत्मप्रत्यय हवा. सामाजिक विकासाचा मार्ग हा अर्थ आहे, मग तो व्यक्तीच्या दृष्टीने असो की वर्गाला अनुलक्षून असो[१] असा रानडयांचा सुधारणाविषयक दृष्टीकोन मूलगामी स्वरूपाचा होता. त्यांना समाजाचे आचार विचार हे परस्परांशी सुसंगत असावे असे वाटत होते. राष्ट्राच्या सर्वांगीण विकासाचा विचार करतांना सुधारकाचे कार्य चतुरस्त्र होण्यासाठी त्यांची प्रगतीशील विचारसरणी समाजाच्या राजकीय, आर्थिक, सामाजिक, धार्मिक आचार विचारांशी सुसंगत असणे आवश्यक आहे. आपले विचार प्रगट करतांना

रानडे म्हणतात की, "तुमच्या राजकीय हक्काचे पारडे जर हलके असेल तर तुमची समाजपध्दती चांगली असणे शक्य नाही." "तुमची समाजपध्दती विवेक व न्याय यावर आधारलेली असल्या शिवाय तुम्ही राजकीय अधिकार व हक्क यांचा उपभोग घेण्यात लायक ठरणार नाही. तुमची समाज व्यवस्था चांगल्या असल्या शेरीज तुमची आर्थिक संघटना चांगली असणे शक्य नाही. तुमची धर्म विषयक ध्येये जर हीन व निकृष्ट असतील तर सामाजिक, आर्थिक किंवा राजकीय क्षेत्रात तुम्हाला यश मिळणे शक्य नाही. हे परस्परावलंबन योगायोगाने आले नसून हा निसर्ग नियमच आहे.[२] असा त्यांचा सर्वकष सुधारणावादी दृष्टिकोन होता. याप्रमाणे सर्व दृष्टीने समाजाचा विचार केला आणि कार्य केले गेले तरच ख-या अर्थाने समाज सुधारणा होवून नवसमाज निर्मीती होईल असे रानडयांना वाटत होते तसेच आगरकरांनाही वाटत होते.

आगरकरांचा विचार ही सर्वसमावेशक स्वरूपाचा होता ते "प्रियाराधन" या आपल्या लेखात सर्वकष सुधारणेचे विश्लेषण करतांना म्हणतात की, "राष्ट्राची खरी मजबुती कुटुंबाच्या आणि त्यांतील व्यक्तींच्या मजबुतीवर सर्वस्वी अवलंबून आहे. त्या कुटुंबाची व त्याच्या लहानमोठया अवयवांची स्थिती जोपर्यंत आता आहे तशीच राहील, तो पर्यंत राज्य धर्म, नीति, उद्योग यापैकी कोणत्याही गोष्टीत आमचे पाऊल वास्तविकपणे पुढे पडेल असे कधीही म्हणता येणार नाही"[३] सुधारणा करायची असल्यास ती मुळापासून करण्यावर भर देऊन तिचे स्वरूप व्यापक ठेवण्याचा त्यांचा प्रयत्न असे. देशाला पारतंत्र्यातून सोडविण्यासाठी राष्ट्राची सर्व प्रकारे उन्नती कशी करता येईल, याचे सखोल विवेचन करून त्यांनी सामाजिक सुधारणेवर जास्त लक्ष केंद्रित केले. समाज सुधारणा ही सर्व सुधारणांची जननी आहे तेव्हा सामाजिक सुधारणा केल्याशिवाय इतर सुधारणा होणे कठीण आहे हे चांगले जाणल्यामुळे त्यांनी समाजसुधारणेवर भर दिला होता. रानडे व आगरकरांचा समाजात राहूनच समाजाची सुधारणा करणे हया तत्वावर अढळ विश्वास होता. आपले विचार कल्याणकारक आणि सत्य असल्याने आज ना उद्या समाज ते विचार आत्मसात

करतील, ऐकतील असा त्यांना विश्वास वाटत होता. न्या रानडे आणि आगरकरांच्या ध्येयामध्ये जरी समानता आढळत असली आणि समाजसुधारणेचे मार्ग सारखे वाटत असले तरी त्यांच्या विचारांमध्ये एका पिढीच्या विचाराचे अंतर होते. रानडे यांचा जन्म सुखवस्तु परिस्थितीत झाल्यामुळे त्यांचे बालपण सुखात गेले होते आणि त्यांना शिक्षणही उत्तम प्रकारचे मिळाले होते. यापेक्षा विपरीत स्थिती आगरकरांची होते. त्यांचे बालपण अत्यंत गरीब परिस्थितीत गेल्यामुळे त्यांना लहानपणापासूनच शिक्षणासाठी कष्ट करावे लागले. लहानपणापासून शिक्षणासाठी दुस-यांच्या घरी आश्रितासारखे रहाण्याचा प्रसंग आल्यामुळे समाजातील वास्तव परिस्थितीची जाणीव त्यांना लहानपणापासूनच होत गेली. शिक्षणाचे ध्येय गाठण्यासाठी त्यांना मिळेल ती नोकरी करून, नादारी पत्करून, निबंध नाटके लिहून शिक्षण पूर्ण करण्यासाठी प्रयत्न करावे लागले. सहजासहजी कुठलीही गोष्ट न मिळाल्याने कष्ट करण्याची प्रवृत्ती लहानपणापासून अंगी बाणली गेली. समाजाच्या वास्तव जीवनाचे चटके लहानपणीच त्यांना अनुभवायला मिळाल्याने समाजातील अनिष्ट रुढी, परंपरेतील न्यूनत्व जाणवले होते.

रानडयांना लहानपणी शाळेत, शेजारी, नोकरवर्गाच्या संपर्कात असतांना समाजातील विषमतेचे दर्शन झाले होते. उच्चनीचपणाचे समाजाचे नियम बालपणापासूनच त्यांना अव्यवहार्य वाटत होते. रानडयांच्या घरातील वातावरण सनातनी धार्मिकतेचे होते. त्यांच्यावरही धार्मिक संस्कार झाल्यामुळे त्यांचा कल ईश्वरभक्तीकडे वळलेला होता. स्वतःवर संयम ठेवण्याची वृत्ती बालपणातच त्यांनी अंगी बाणली होती. कर्मकांडाचा फोलपणा जाणवला असल्यामुळे त्यांची ईश्वरवादी प्रवृत्ती संतवाङ्‌मयाकडे आकर्षित झाली होती. गोपाळ कृष्ण गोखल्यांनी त्या संदर्भात इ.स. १८९७ च्या अमरावती कॉंग्रेस अधिवेशनाहून परत येतानाची आठवण सांगितली आहे संत तुकारामाचे अभंग सतत गुणगुणायची त्यांना सवय होती.[४] आगरकरांवरही धार्मिक संस्कार झाले होते पण धार्मिक जीवनातील अंधविश्वास कर्मकांडावर त्यांचा विश्वास नव्हता.

मुर्तीपूजेतील, कर्मकांडातील फोलपणा त्यांना लहानपणापासुन सतत जाणवत होता. त्यांना प्रत्येक गोष्ट बुध्दीच्या निकषावर तपासुन पाहण्याची सवय जडलेली होती. म्हणून तत्कालीन सनातनी लोकांना आगरकर नास्तिक वाटत होते तरी पण सामाजिक दृष्टीची न्यायी वृत्ती दोघांमध्ये सारखीच होती. अन्याय सहन न करण्याची विचार वृत्ती बालवयातच रुजल्यामुळे त्यांची अंतःकरणे सतत जागृत राहिली होती. पुढे हेच जागृतपणा त्यांच्या समाजकार्यात उपयुक्त ठरले होते.

शिक्षणाच्या बाबतीत रानडे जेवढे सुदैवी ठरले तसेच मात्र आगरकरांच्या बाबतीत झालेले दिसुन येत नाही. रानडयांनी शिक्षण क्षेत्रात विद्वान, पंडित व्यासंगी विद्यार्थी म्हणून नाव कमावले होते. विद्यार्थी दशेत विपुल प्रमाणात ग्रंथांचा अभ्यास विलक्षण रित्या करुन एक हुशार बुध्दीवादी व्यक्तित्वाची ख्याती प्राप्त केली होती. आगरकरांनी ही गरीब परिस्थितीवर मात करुन उच्च शिक्षण घेतले होते रानडयांप्रमाणेच इतिहास, अर्थशास्त्र, तत्वज्ञान हे त्याचे आवडते विषय होते. परंतु रानडयांप्रमाणे त्यांनी वाचलेल्या ग्रंथांची उपलब्धता किती प्रमाणात होती आणि त्यांनी कशा प्रकारे अभ्यास केला याबद्दल समकालीन साधनांमध्ये किंवा त्यांच्या लेखनात उल्लेख आढळत नाही.रानडयांवर बटलर, बेथेम, जॉन लॉक, कान्त, डर्क रिकार्डो, डिडेरो, स्मिथ इ. तत्व चिंतकांचा प्रभाव होतो तर आगरकरांवर गिब्ज, कांत, मिल, स्पेन्सर, मोर्ले या उदारमतवादी तत्व चिंतकांचा प्रभाव होता. दोघांचीही विचारसरणी उदारमतवादावर आधारीत होती. हा उदारमतवाद मानवी जीवनाच्या सर्वांगाला स्पर्श करणारा होता. पण रानडे धर्मनिष्ठ परंपराभिमानी नेमस्त समन्वयशील प्रवृत्तीचे होते. त्यांच्यात नेमस्तपणा अध्यात्मिकतेमुळे निर्माण झाला होता. तर आगरकर बुध्दीवादी, जहाल विचाराचे, व्यक्ती स्वातंत्र्याचे पुरस्कर्ते होते. दोघांची राहणी अत्यंत साधी होती. रानडयांना शारीरस्वास्थ्याचे वरदान त्यांच्या घराण्यातुन मिळाले होते तरी अति अभ्यासाने

त्यांचा एक डोळा अधू बनला होता. आगरकरांनी खडतर दारिद्र्यामुळे शिक्षणासाठी अपार कष्ट केल्याने त्याचा परिणाम त्यांच्या शरीर प्रकृतीवर झाला होता. बेताची तब्येत व दम्याच्या विकाराने त्यांचे कार्यक्षेत्र सीमित बनले होते. दोघांनाही विद्यार्थी दशेपासून समाजातील गतीहीनता दिसत होती. रानडे विद्यार्थी दशेत समाजकार्याकडे आकर्षित झालेले दिसत नसले तरी व्यावहारिक जीवनात पदार्पण केल्यानंतर त्यांनी समाजप्रबोधनाचे कार्य सुरु केले. शिक्षण क्षेत्रापासूनच त्यांच्या समाजकार्याला पाऊल वाट मिळालेली दिसते. पण त्या काळात त्यांचे ध्येय निश्चित ठरले नसलेले जाणवते. या उलट आगरकर महाविद्यालयीन शिक्षण घेत असतांनाच आपले सहाध्यायी, मित्र टिळकांबरोबर समाजकार्याचे ध्येय निश्चित करण्यात मग्न असलेले उपलब्ध साधनांवरून लक्षात होते. आपल्या आईला लिहिलेल्या पत्रांवरून नोकरी पेशा न पत्करता राष्ट्रीय कार्य करण्यासाठी त्यागी जीवनाचे ध्येय ठरविलेले होते. गरीबी अनुभवल्यानंतरही त्यांनी श्रीमंतीचा हव्यास न धरता, ऐश आरामी जीवनाची अपेक्षा न ठेवता पोटा पुरते कमावून आपले संपूर्ण जीवन समाज प्रबोधनाच्या कार्यात वाहून घेण्याचे निश्चित केलेले दिसते. त्या काळात एवढी निस्वार्थी, त्यागी राष्ट्रसेवा करण्याचा निर्धार म्हणजे समाजाला मानवी जीवनाच्या एका नव्या क्रांतीकारी आविष्काराचा परिचय होता. याबाबतीत ते रानडयांच्या एक पाऊल पुढे गेले होते.

रानडयांनी न्यायमूर्तीचे पद भूषवून तसेच आगरकरांनी प्राध्यापक, प्राचार्याचे पद सांभाळून समाजाच्या पर्यायाने राष्ट्राच्या जडणघडणीत हातभार लावलेला होता. रानडयांनी लोकशिक्षणाचे कार्य प्रार्थना समाज, वक्तृत्वोत्तेजक सभा, सार्वजनिक सभा, डेक्कन सभा, वसंत व्याख्यान माला, वेदशास्त्रोक्त सभा, राष्ट्रीय (सभा) सामाजिक परिषद इ. अनेक संघटना, संस्था उभारून धार्मिक सामाजिक राजकीय, आर्थिक आणि सांस्कृतिक क्षेत्रात भरीव कार्य केले. त्यांचे कार्य टिळकांनी म्हटल्याप्रमाणे एका थंड झालेल्या महाराष्ट्र रुपी गोळ्या मध्ये ऊब ठेवून त्यात चैतन्य निर्माण केले. आगरकरांनी राष्ट्रीय शिक्षणाचे कार्य

शाळेमधून सुरू करून, लोकशिक्षणाचे कार्य "केसरी", "सुधारक" या वृत्तपत्राचे संपादकत्व घेवून, सुशिक्षित लोकांना समाजाभिमुख करून जागृत करण्याचा प्रयत्न केला. त्यांनी राजकीय, आर्थिक, सामाजिक, धार्मिक, सांस्कृतिक, वाङ्मयीन विषयांवर लेख लिहून समाजप्रबोधनाचे कार्य केले होते. दोघांनीही समाजसुधारणेवर आपले लक्ष केंद्रीत केले होते. रानडयांनी सार्वजनिक जीवनात तत्वज्ञानावर विशेष श्रध्दा ठेवली होती. "माझ्या तत्वज्ञानातील दोन गोष्टींवर माझी अविचल श्रध्दा आहे, एक हा आपला देश हीच जगाची उध्दार भूमि आहे, आणि दुसरे हिन्दी जनताच त्या उध्दारकार्याकरिता ईश्वराने नियोजिलेली आहे."[५] आगरकरांची मानवाच्या बुध्दीवर, सत्प्रवृत्तीवर श्रध्दा होती. म्हणून त्यांनी समाजकार्य करण्याचे ध्येय निश्चित करतांना आत्मविश्वासाने म्हटले की, " टाकातून अर्थबोधक अक्षरे काढण्याचे सामर्थ्य असेल व ती वाचण्यात निदान एक इसम तयार असेल, तोपर्यंत तरी हे स्त्रैणाकर्मसुधारकाला स्पर्श करू शकणार नाही."[६] हेच ध्येयतत्व आपल्या डोळ्यासमोर ठेवून समाज प्रबोधनाच्या कार्याला स्वतःला वाहून घेतले.

रानडे व आगरकर हे महाराष्ट्रातील सुधारणावादाचे दोन प्रमुख प्रवर्तक मानले जातात. त्यांनी निरनिराळ्या सुधारणा प्रश्नांच्या संदर्भात उदारमतवादी तत्वांचा अवलंब करून समाजात होणा-या लहान सहान सुधारणेलाही महत्व दिले होते. कारण त्यांना माहित होते की, आपला समाज परंपरावादी रुढीपूजक आहे. तेव्हा कोणतीही नवीन गोष्ट स्वीकारण्यास लोक तयार होत नाहीत. अशा लोकांना बरोबर घेवून समाजसुधारणा करायचे झाल्यास समाजसुधारणा मुंगीच्या पावलाने होणार अशी खुणगाठ मनाशी बांधूनच त्यांनी कार्य सुरू केले होते. लोकांच्या पचनी पडेल अशाच अंदाजाने रानडे मत प्रदर्शन करीत असले तरी लोकांचा अनुनय करण्याची गरज त्यांना भासली नाही पण मुद्दाम लोकक्षोभ ओढवून घेणेही त्यांना मान्य नव्हते. समाज जागचा हालायला तयार नसतांना जर युक्ती-प्रयुक्तीने त्यांना थोडे बदलण्यास यश मिळाले तर तेवढयावरही ते समाधानी होते. उगीच वाद वाढवून विचार संघर्ष घडवून आणणे त्यांना मान्य नव्हते. तर आगरकरांनी आपल्या अंतिम

ध्येयाकडे लक्ष केंद्रीत करून समाज सुधारणेची वाटचाल केली. आपल्या कार्यात सुसंबद्धता व एकसूत्रीपणा ठेवून तत्कालीक सुधारणा आणि अंतिम ध्येय यांचा मेळ घालण्याचा प्रयत्न केला. त्यासाठी त्यांना समाजात वैचारिक संघर्ष निर्माण झाला तर हवाच होता. कारण यामुळे लोकांमध्ये विचार करण्याची प्रवृत्ती विकसित होऊन ते सुधारणेतील चांगले वाईट पण शोधण्याचा प्रयत्न करून ते आत्मसात करण्यास प्रवृत्त होतील असा विश्वास आगरकरांना होता.

रानडयांच्या मनावर भारतीय तत्वज्ञान व जीवनसरणीचे संस्कार झाले होते त्याचबरोबर युरोपिय तत्वज्ञानाच्या अनुभवावरून नव्या मुल्यांची उपयुक्तता जाणली होती. म्हणून जुन्या परंपरेवर एकदम आघात न करता सावधतेने सुधारणा वादाचा पुरस्कार करणे त्यांना योग्य वाटत होते. यासाठी रानडयांनी नवीन, जुन्या चांगल्या रुढी परंपराचा समन्वय साधून सुधारणेच्या कार्याला तात्विक अधिष्ठान मिळवून दिले. रानडयांची दृष्टी सुक्ष्म सर्वंकष असल्याने "जुन्या व नव्या" मुल्यांचा आशय अगदी भिन्न आहे. आणि व्यक्तिस्वातंत्र्य, सामाजिक समता, लोकशाही इत्यादी आधुनिक मुल्ये पत्करल्याखेरीज आपल्या समाजाची प्रगती होणे शक्य नाही"[७] हे रानडयांनी ओळखले होते असे गं.बा. सरदार म्हणतात रानडयांना सावधपणे लोकांना एकत्रित आणून सामोपचाराने सुधारणेचा पुरस्कार करणे श्रेयस्कर वाटले. आगरकरांना लोकसंग्रहाचा हा शिष्टसंमत मार्ग मान्य नव्हता. ब्रिटिश राजवटीमुळे समाजाच्या बाहय परिस्थितीत बदल होऊ लागला असला तरी सामाजिक जाणिवा मात्र जुन्याच मध्ययुगीन जीवन पध्दतीतील होत्या त्यामुळे सुशिक्षित समजला जाणारा समाजातील वर्ग स्थितिप्रिय आणि गतानुगतिकच राहिलेला होता. अशा समाजाला "कोणतरी अस्तित्वात असलेल्या लोकमतातील दोषस्थळे दाखविण्याचे व समाजातील बहुतेक लोकांस अप्रिय परंतु पथ्यकारक असे विचार त्यांच्यापुढे आणण्याचे अनभिमत काम करण्यास तयार झालेच पाहिजे. असे करण्यास लागणारे धैर्य ज्या समाजातील काही व्यक्तींच्या सुध्दा अंगी नसेल त्या समाजांनी वर डोके काढण्याची आशा कधीही करू नये"[८] असे त्यांचे मत होते. त्यासाठी लोकनिंदेची पर्वा न करता निर्भयपणे, जिद्दीने

आपले कार्य शेवटपर्यंत कर्तव्य भावनेने करीत राहिले. आगरकरांनी बुध्दीवादाच्या आधारे तर रानडयांनी अध्यात्मिक नैतिकतेच्या आधारे कार्य केले.

भारतात धार्मिक सुधारणेची चळवळ राजाराम मोहन रॉय पासून सुरु होवून पुढे रानडे, दयानंद सरस्वती, रामकृष्ण परमहंस यांनी सुरु ठेवली. हया सर्व चळवळी राष्ट्रीय स्वरुपाच्या होत्या व त्या सर्वांचा उद्देश हिन्दु धर्मातील दोष काढून समानतेच्या आधारावर नवसमाज रचना निर्माण करणे हा होता. भारतातील धार्मिक चळवळी म्हणजे ख्रिश्चन मिशनऱ्यांनी केलेल्या प्रखर ख्रिस्तप्रसाराला दिलेले उत्तर होते. रानडे व आगरकरांची हिन्दु धर्मावर श्रध्दा होती. रानडयांप्रमाणेच आगरकरांना ही मुर्तीपुजा, पुनर्जन्मावर विश्वास नव्हता. कर्मवाद मात्र रानडयांना मान्य होता व अध्यात्मिकता ही त्यांच्या जीवनातील प्राथमिकता होती. त्याचे मित्र ग.व्य. जोशी रानडे ईश्वरी प्रेरणेने कार्य करीत असत असे म्हणतात तर गोखले रानडयांना आपले गुरु मानीत. त्यांच्या विषयी बोलतांना गोखले म्हणतात, की, "हिन्दु भूमीवरील त्याचे प्रेम तीव्र व भावनोत्कट होते आणि तिच्या हिता करीता त्यांनी जन्मभर परिश्रम केले. ते अत्यंत श्रध्दावान व धर्मप्रवण होते आणि त्यांच्या सहवासात, मनावर प्रकर्षाने बिंबवणारी गोष्ट म्हणजे त्यांची सहज उदात्त व उत्कृष्ट ईश्वर निष्ठाच होय आपण त्या सर्वशक्तीमान परमेश्वराच्या सहवासातच नेहमी असतो आणि त्याच्याच कृपेमुळे लाभलेल्या प्रकाशात आपल्या शक्तीनुसार आपली कर्तव्ये करीत असतो, अशी त्यांची भावना असे."[९] त्यांनी निरनिराळ्या प्रकारचे सामाजिक प्रश्न ऐहिक दृष्टीने विश्लेषीत केले पण ते ही संयमी व सावधतेने. रानडयांच्या नेमस्तवृत्तीचे बीज याच धार्मिकतेत होते याबद्दल श्री. के.के. क्षीरसागर म्हणतात की," धार्मिक घडणीच्या मनात सामाजिक व राजकीय क्षेत्रातील क्रांतीस प्राधान्य मिळू शकत नाही. व्यक्तीच्या सौजन्या वर आणि ईश्वराच्या दयाळूपणावर भिस्त ठेवल्यास, अप्रिय प्रश्न आणि कठोर करणी टाळता येईल अगर टाळता यावी, ही मनाची पवित्र व प्रामाणिक मनिषा असते. रानडयांच्या सामाजिक व राजकीय नेमस्तपणाचे बीज या धार्मिक वृत्तीत होते."[१०] रानडे यांनी आपल्या धर्मव्याख्यानात आपले धार्मिक

तत्वज्ञान स्पष्ट केले आहे. त्यांची धार्मिक भावना संकुचित नव्हती म्हणूनच धर्मसुधारणेच्या कार्यात त्यांनी आगरकरांप्रमाणेच धर्मातील अनिष्ट रुढी, परंपरा, मुर्तीपुजा, यज्ञकर्मकांड, अंधविश्वास इ. गोष्टींविरुध्द समाज प्रबोधनाचे कार्य करण्यासाठी प्रार्थना समाजाच्या व्यासपीठाचा उपयोग करुन घेतला होता. आपल्या धर्मपर व्याख्यानातुन हिंदू धर्माच्या तत्कालिक अपभ्रष्ट स्वरुपावर प्रकाश टाकून धर्म सुधारणेची गरज प्रतिपादित केली होती. मानवतेच्या समानतेच्या दृष्टीकोनातुन समाजातील सर्व स्तरावरील व्यक्तींना समान वागणूक मिळावी याचा आग्रह रानडे व आगरकरांनी धरला होता. पण आगरकरांना त्यासाठी धर्माचा आधार श्रेयोयोग्य वाटत नव्हते. दोघांच्या धार्मिक विचारामध्ये तफावत असली तरी पण ख्रिश्चन धर्माचे हिन्दु धर्मावर होणारे आक्रमण दोघांनाही मान्य नव्हते म्हणूनच "शारदा सदन" प्रकरण सुरुवातीला स्त्री-सुधारणेच्या कार्याला हातभार लावण्याच्या दृष्टीकोनातुन सहकार्य केले. पण जेव्हा ही संस्था धर्म प्रसाराच्या कार्याला मदत करते आहे हे टिळकांनी पुराव्यासह नजरेस आणून देताच त्यांनी या संस्थेतुन आपला सहभाग काढून घेतला होता. आगरकर हिन्दु धर्मातील अनिष्ट रुढी परंपरेवर टिका करीत असले तरी त्यांनी मनुष्याच्या श्रध्दा धर्मवृत्ती विषयी कधी उपहासाने बोलले किंवा लिहिले नाही. आगरकरांची पत्नी धार्मिक प्रवृत्तीची होती. तिला आपले विचार पटवुन देण्याचा त्यांनी प्रयत्न केला पण जो पर्यंत तिची श्रध्दावादी वृत्ती जागृत होती तो पर्यंत तिच्या धार्मिक कार्याच्या आड कधी आले नाही. उलट तिला आर्थिक सहाय्य दिले. कधी चेष्टा करुन यशोदाबाईच्या धार्मिकतेला दुखविले नाही. रानडे स्वतः मुर्तीपूजक नव्हते. मात्र आपल्या संयुक्त कुटुंबातील व्यक्तींना त्यांनी त्यांच्या विचारापासुन परावृत्त करण्याचा विचार केला नाही पण स्वतः कर्मकांडापासुन दूर राहिले. रानडे यांनी वडिलांच्या मृत्युनंतर होणारे क्षैर विधी करण्यास नकार दिला होता तसेच आगरकरांनी आपल्या आईच्या मृत्युनंतरचे क्षौर विधी नाकारले होते. रानडयांची धार्मिकता नैतिकतेवर आधारित होती.

धर्मसंस्थेकडे पाहण्याची दृष्टी ही पूर्णतः ऐतिहासिक व समाजशास्त्रीय स्वरूपाची होती. धर्मांची उत्पत्ती ही समाज निर्मितीच्या प्रक्रियेशी निगडित असल्यामुळे मनुष्य विचारात त्यांच्या वैचारिक कुवती प्रमाणे जसे बदल होत गेले तशा धर्मकल्पना त्यांनी समाजात रुजविल्या. कालान्तराने त्या धर्मकल्पना कालबाह्य ठरल्या तरी त्यांचा त्याग केला गेला नाही आणि नवीन धर्मकल्पनांचा अंगिकार करण्यात समाजाची ग्रहणशक्ती कमी झाल्याने समाजाने जडत्व धारण करुन गतानुगतिकत्व पत्करले. त्यामुळे सतत परकीय राजवटी येत राहिल्या तरी समाज जीवनावर त्याचा परिणाम झाला नाही. ह्या धर्मांच्या समाजावरील वर्चस्वामुळे देशाचे नुकसान होवुन सामाजिक जीवन पारतंत्र्याचे प्रतिक बनले. आणि मानवी जीवन दुर्धर बनले म्हणून त्यांनी मानवी क्षमतांच्या स्वाभाविक विकासाच्या आड येणाऱ्या धर्मकल्पनांचा विरोध केला होता. आगरकरांना वाटत होते की, लोकांना जर विश्वातील सचेतन व अचेतन अशी कोणतीच वस्तु, गोष्ट स्थिर नाही हे सत्य कळले तर समाजाच्या विचारसरणीत बदल घडुन येण्यात मदत होईल. "जग सारखे बदलत चालले आहे अशी खात्री झाल्याने विचारी मनुष्यास एवढाच विचार करता येतो की, ज्या अर्थी स्थित्यंतराचे रहाटगाडगे सतत फिरत राहणार, त्याच्या गतीस कोणीही प्रत्यवाय करु शकत नाही, त्या अर्थी जेणे करुन त्याची गती आपणांस सुखावह होईल असे वर्तन करणे आपल्या ताब्यात असल्यास निदान तसे तरी करावे म्हणजे खरे सुख मिळेल"[११] असा विचार मनुष्य समाज करण्यात प्रवृत्त होईल.

रानडयांचा ईश्वरवाद हा समेट वृत्तीत समावलेला आहे. त्यांचा एकेश्वरवादही उदारधर्मांच्या विचारांवर आधारीत होता. त्यातुन नीतीत्वाच्या आधारे समाजाची नैतिकता उंचवता येते, असे रानडयांना वाटत असले तरी आगरकरांना विवेकनिष्ठा व आज्ञेयवादाच्या आधारे समाजात नितीमत्ता रुजवुन समाजाचा विकास घडवुन आणता येतो असे वाटते होते. त्यांना मनुष्याकडे केवळ मानव म्हणूनच पाहणारा एक धर्ममुक्त उन्नत मानव समाज निर्माण

करायचा होता म्हणून त्यांनी व्यक्तिस्वातंत्र्यावर भर दिलेला होता. यशावंत सुमन्त आगरकरांच्या विचाराचे विश्लेषण करतांना म्हणतात की, "व्यक्तिवादी असूनही आगरकर परहिताची उपेक्षा करीत नाही, उत्क्रांतीवादी असूनही सोशल डार्विनिस्ट होत नाहीत, अज्ञेयवादी असूनही उच्छृंखलवादी होत नाहीत, सुखवादी असूनही चंगलवादी बनत नाहीत, धर्मविरोधी असूनही श्रध्दाहीन होत नाही., उलट परहितैषि होणे हाच माणसाचा खरा धर्म मानतात. या सदधर्मांच्या आड सर्वच प्रचलित, रुढ धर्मश्रध्दा व धर्मव्यवस्था कमी अधिक प्रमाणात येतात. म्हणून त्यांना आगरकरांनी संपूर्ण नकार दिला. माणसाची ही नैतिकता धर्मांच्या कचाटयातून सुटावी ही आगरकरांची दृष्टी होती आणि म्हणून एका व्यापक धर्मप्राय श्रध्देतुन त्यांनी धर्मचिकित्सा केली."[१२] आगरकरांचा हा विचारधर्म लोकांना अनाकलनीय ठरला. एक नास्तिक व्यक्ती म्हणून त्यांची हेटाळणी केली गेली. स्वतःच्या व्यक्तिगत जीवनातही विचाराप्रमाणे आचार ठेवण्याचा प्रयत्न केला. त्यामुळे आगरकराचे व्यक्तिमत्व इतर सुधारकांहून वेगळे भासत होते.

समाजाची खरी सुधारणा होण्यासाठी मनुष्याच्या मूळ विचारांमध्ये बदल झाला पाहिजे असा रानडे आगरकरांचा आग्रह होता. पण त्यासाठी रानडयांना व्यक्ति समाजाला अंतर्मुख करुन तिच्यातील उदात्त भावनाचे संगोपन आणि संवर्धन करण्यासाठी धर्मभावनेची आवश्यकता वाटत होती. आत्मोन्नतीची प्रेरणा मनुष्याच्या अंतर्मनातुन स्फुरली पाहिजे. बाह्य नियमनाने लोकांमध्ये नैतिकमुल्य रुजविता येत नाही. भीतीने किंवा लालसेने होणारे आचरण म्हणजे नीतीमत्ता नव्हे त्यासाठी धर्मभावनेचे महत्व त्यांना जास्त वाटत होते. " This work of liberation must be the work of our own hands, each one working of himself for his own release. The strength of movite and the impulse to act up to it, must come from with in"[13] असे रानडयाचे मत होते.

आगरकरांना मात्र समाजसुधारणा करण्यासाठी लोकांमध्ये आत्मप्रेरणेने स्वतःमध्ये बदल घडवून आणण्यासाठी धर्माची आवश्यकता वाटत नव्हती. ते अज्ञेयवादी होते. त्यांच्या मते धर्मभावना मानवामानवामध्ये सख्य त्याचप्रमाणे वैर निर्माण करण्यास सारखीच कारणीभूत ठरलेली आहे. "कुटुंबात आणि समाजात एकी राखण्याचे हिच्या अंगी जितके सामर्थ्य आहे तितके त्यात दुही माजविण्याचेही आहे. मनुष्यांना प्रशस्त सत्कर्मे करण्यास हिने जितके प्रवृत्त केले आहे. तितकेच साहसाची दुष्ट कृत्ये करण्यासही प्रवृत्त केले आहे, सारांश हिचे स्वरुप जितके मनोहारी तितकेच बीभत्सही आहे" १४ असे आगरकरांना वाटत होते म्हणून त्यांनी धर्मभावनेचा आधार घेण्यास नकार दिला. कुठलाही विशिष्ठ धर्म डोळ्यापुढे ठेवून आगरकरांनी धर्मकल्पनेच्या इतिहासाचे दिग्दर्शन केले नव्हते. तर निरनिराळ्या समाजातील धार्मिक जीवनातील श्रध्दा, समजुती, आचाराचे मुल्य मापन करुन स्पेन्सरच्या तत्वज्ञानाच्या आधारे निष्कर्ष काढलेले आहेत.

विचार, भावना आणि कृती यांच्या सुसंवादात जीवनाच्या एकात्मतेचे मर्म साठवलेले आहे या मिलच्या विचारांचा पुरस्कार ज्याप्रमाणे आगरकरांनी केला होता. तसाच रानडयांनी केला होता. पण रानडे हे एकात्मतेचे मर्म धर्मांचे चिंतनात्मक आणि क्रियात्मक अंगाएवढेच महत्वपूर्ण मानतात त्यात एक सूत्रता आल्याशिवाय धर्मसाधना निर्दोष व फलदायी होणार नाही असे त्यांना वाटत होते. रानडयांनी धर्मावर श्रध्दा असली तरी त्यांची धर्मकल्पना भिन्न होती. त्यांनी भागवत धर्माचा पुरस्कार करुन धर्म विचारांच्या तत्व मीमांसेला आपल्या विचारांमध्ये प्राधान्य दिले आहे. आगरकरांनी धर्मकल्पनेला धक्का देणाऱ्या डार्विन, स्पेन्सरच्या विचारांना आपल्या तत्वचिंतनात महत्वाचे मानले होते. विकासक्रमाचे तत्व समाजालाही लागु केले होते. मनुष्य आपल्या कल्पनेप्रमाणे धर्मकल्पनाचे विचार मांडत असतो, त्याचे विचार विकासक्रमाने बदलत जातात असें त्यांना वाटत होते. आगरकरांनी त्या काळात "धर्म कल्पना पिशाच कल्पनेपासुन उत्पन्न झाली आहे.

"महादेव हा एक महापिशाच आहे", आमची उभी आडवी गंधे व आमच्या बायकांची निरनिराळ्या त-हांचा कुंकवे, आमच्या गोपीचंदनाचे टिळे, आमच्या वैष्णवांच्या कृष्णरेषा, आणि आमच्या शैवाचे भस्मार्चन – ही सारी दास्य सूचक चिन्हे आहेत" [१५] अशा प्रकारचे धाडसी विचार मांडले होते हे विचार पुराणमतवादी सनातनी लोकांना तर रुचले नाहीतच पण रानडे टिळक यांच्या सारख्या पुढारलेल्या विचारवंतानाही त्यांच्या या धर्मकल्पना मानवणे शक्य नव्हते आणि तत्कालीन समाजाच्या पचनी पडणे तर अशक्य होते. आजही त्याचे धर्म विषयक विचार शंभर वर्षांनंतरही समाजाला धाडसाचे वाटतात. आगरकरांचा हा मिलस्पेन्सरचा अज्ञेयवाद रानडयांना कधीच आवडलेला नव्हता. समाजाच्या उत्कर्षासाठी पाश्चात्य विचार आत्मसात करणे आवश्यक वाटत असले तरी हे विचार समाजात रुजविण्यासाठी धर्माची गरज त्यांना वाटत होती. डेक्कन कॉलेजच्या इ.स. १८८५ च्या वार्षिक स्नेहसम्मेलनात आगरकरांनी जेव्हा कोणत्याही धर्माचा आधार न घेताही संस्कृतीची आणि नीतीमुल्यांची जोपासना करता येते अशी बाजू मांडली तेव्हा रानडे कधी नव्हे ते संयमी वृत्ती सोडून संतापले होते असे विचार म्हणजे त्यांच्या मर्मस्थानावर आघात होता, रानडे त्यावेळच्या भाषणात मनाचा समतोलपणा सोडून रागाने "आधुनिक पाश्चात्य विचारांची नुसती पोपटपंची करणा-या सुशिक्षितांना आपल्या परंपरेची व परिस्थितीची बरोबर कल्पना नाही. विचारांची आयात हवी तेव्हा हवी तितकी करता येईल पण समाजाचे पूर्व संस्कार व तात्कालिक गरज याचे भान राखल्याखेरीज जनमानसात रुजविता येत नाही हे मिल स्पेन्सरच्या विचारांनी प्रभावित असलेल्या सुशिक्षितांच्या लक्षात येत नाही." [१६] असे रानडयांनी चिडून म्हटले होते. परंतु आगरकरांनी आपल्या विचार तत्वांमध्ये धर्म आणि समाजव्यवस्था यांना पुर्णपणे वेगवेगळे ठेवले होते. "औद्योगिक संस्कृतीच्या उदयानंतर आता आधुनिक समाज जीवनात धर्माचे कार्य संपलेले आहे. यापुढे कोणत्याही अति मानवी आणि अतर्क्य अशा गूढ दैवी सत्तेचा आधार न घेता समाजातील नीती अनीती, न्याय-अन्याय हित-अहित इ. गोष्टींचा निर्णय इहवादी मुल्यांच्या आधारे केला पाहिजे" [१७]

अशी आगरकरांची धारणा होती. ते विज्ञान निष्ठ दृष्टिकोनातून समाजव्यवस्थेतील व्यवहारिकतेचा विचार करीत असत. मानवजातीचे ऐहिक सुखवर्धन" त्यांच्या विचारांचा मध्यबिंदू होता. पण रानडयांना त्यांची धर्म निरपेक्ष इहवादी विचारसरणी योग्य वाटत नव्हती. रानडयांना वैयक्तिक व सामाजिक जीवनातील नैतिकता टिकविण्यासाठी धर्मश्रध्देची आणि ईश्वरनिष्ठेची आवश्यकता वाटत होती म्हणून त्यांनी प्रार्थना समाजामार्फत आपले धार्मिक विचारतत्व समाजासमोर मांडले होते. रानडे आणि भांडारकर टिळकां सारख्या सुधारकांना भौतिक वाद म्हणजे सुखवाद आहे असेच वाटत होते. रानडयांचा अध्यात्मवाद धार्मिक क्षेत्रापुरता मर्यादित होता. त्यांनी सामाजिक, राजकीय, आर्थिक व्यवहारात भौतिकवादी नैतिकता पूर्ण दृष्टिकोन स्वीकारला होता. पण रानडे, भांडाकर, टिळकांनी सुखवादाच्या तत्वज्ञानाला आपल्या विचारांमध्ये घेतले नव्हते. त्यामुळे रानडयांना आगरकरांची मानवतावादी ऐहिक सुखसंवर्धनाची विचारसरणी मान्य नव्हती व समाजानेही या त्यांच्या विचारांना नाकारलेले दिसून येते पण रानडयांची धार्मिकता व्यक्तीवादी होती. गांधीप्रमाणे समाजवादी नव्हती. नंतरच्या काळात पाश्चात्य समाज जीवनातील औद्योगिकरणाच्या तंत्राचा अंतर्भाव आपण आपल्या जीवनात केला असलातरी त्यांच्या क्रांतीकारक विचारतत्वाला दूर सारले. त्यांच्या या क्रांतीकारी विचार सांप्रदायापासून दूर राहिल्याने धार्मिकतेचे स्थान राजकारणातही तसेच टिकून राहिले. पुढे कांग्रेसच्या व्यासपीठावरून जरी लोकप्रिय नेते जातीधर्म निरपेक्ष राष्ट्रियत्वाचे गोडवे गात राहिले आणि धर्म व राष्ट्रियत्वाची सांगड घालून लोकांना राजकारणाकडे आकर्षित करण्याचा प्रयत्न केला गेला. पण जस जसा स्वातंत्र्यप्राप्तीचा काळ जवळ आला तसतशी देशातील धार्मिक व जातीय भांडणे विकोपाला जावून राजकारणात धर्माने अग्रस्थान प्राप्त केले आणि धर्माचे राजकारण सुरु झाले. ब्रिटिश राजवटीमुळे भारताचे बाहयांग आधुनिक झाले असले तरी समाजातील दैनंदिन जीवन मध्ययुगातीलच असल्यामुळे सुशिक्षित वर्गही धर्मरुढीतच गुंतून राहिलेला दिसून येतो. अशा लोकांच्या विचारतत्वांमध्ये बदल घडवून आणणे हेच आगरकरांच्या समाज प्रबोधनाचे ध्येय होते. त्यासाठी

रानडयांसारखा लोकसंग्रहाचा मार्ग चोखाळणे त्यांना जमणारे नव्हते. कारण लोकांचे दोष दाखवून त्यात सुधारणा घडवून आणण्याचे कार्य कधीच लोकप्रिय ठरणारे नव्हते.

इ.स. १८७० ते १८९५ हा काळ महाराष्ट्राच्या राजकीय जीवनातील महत्वाचा काळ ठरला. महाराष्ट्रात राजकीय चळवळी सुरु करण्याच्या उद्देशाने न्या. रानडे यांनी इ.स. १८७० ला सार्वजनिक सभेची स्थापनाकरुन सार्वजनिक काकांच्या मार्फत केलेले राजकीय कार्य महाराष्ट्रात नवचैतन्य निर्माण करण्यात कारणीभूत ठरले होते. रानडे यांचे राजकीय कार्य प्रबोधनाच्या स्वरुपाचे होते. स्वतःच्या समाजाला परिस्थितीची जाणीव करुन देणे, त्यांच्यामध्ये राजकीय सुधारणांबाबत आकांक्षा निर्माण करणे, या सुधारणांसाठी सरकारकडे निवेदने करणे व सरकारने आणलेल्या विधेयकावर अभ्यासपूर्ण निबंध तयार करणे अशा स्वरुपाचे राजकीय कार्य करतांना त्यांनी राजकीय विषयावर केलेले लेखन भारतीय राजकारणाला उपयुक्त ठरले होते. "राजाराम मोहन रॉय पासून न्या. रानडे यांच्या पर्यंतच्या काळात जे सर्वांगीण सुधारणावादी झाले त्यांच्या भाषणातील व लेखनातील काही भावना आज आपणांस जरी राष्ट्रीयत्वाशी विसंगत वाटल्या तरी एकंदरीने विचार करता आधुनिक भारताचा जन्म त्यांच्या प्रयत्नातून आणि प्रचारातून झाला आहे."[१८] या दृष्टिकोनातून रानडयांच्या राजकीय कार्याचे मुल्यमापन करणे आवश्यक आहे.कारण त्यांच्या राजकीय कार्याने महाराष्ट्राच्या राजकारणाला सुरुवात झालेली होती. रानडयांची विचारसरणी गतकाळाचा विचार करुन वर्तमानकाळाच्या परिस्थितीचे विश्लेषण करणे आणि भविष्य काळात कोणती ध्येये उपयुक्त ठरतील या दृष्टीकोनातून भारताच्या राजकारणाचा विचार करणारी होती. त्यांच्यामते भारतातील ब्रिटिश राज्य ही ईश्वरी योजना होय... मानवी जीवनाचा विचार वैयक्तिक विकास व्यक्ती स्वातंत्र्य, राजकीय आणि आर्थिक क्षेत्रात सर्व संग्राहक राष्ट्रीय धोरण व सामाजिक व्यवस्थेची पुर्नघटना यावर आधारलेली पाहिजे"[१९] भारतातील लोकांनी मानवी समाजव्यवस्थेसाठी आवश्यक असलेल्या राजकीय अंगाकडे दुर्लक्ष

केल्याने सतत गुलामगिरीत राहावे लागल्याची जाणीव लोकांना करुन देण्याचा प्रयत्न आपल्या लेखामधुन केला. राजकीय बाबतीत मागासलेले असल्याने जो पर्यंत स्वतः विचार करुन योग्य निर्णय घेण्याची कुवत जनतेत निर्माण होत नाही तो पर्यंत लोकांनी ब्रिटिश साम्राज्याशी एक निष्ठ रहावे व ब्रिटीश राज्यकर्त्यांनीही हिन्दी लोकांना समानतेने वागवावे असे त्यांना वाटत होते मॅग्नाचार्टीसनदेनुसार भारतीय लोकांना प्रतिनिधिक राज्यपध्दतीचे हक्क देऊन ब्रिटिश छत्राखाली स्वराज्य द्यावे अशी इच्छा रानडयांची होती. त्या विचारांमुळे ते नेमस्त राजकारणी मानले जातात. रानडे राजकारणाकडे धर्मशील संताच्या प्रवृत्तीतुन पाहत असल्याने गांधी प्रमाणे ते राजकीय संत मानले जातात. ब्रिटिशांच्या कुटील राजकारणाच्या उद्देशाकडे ते सौजन्याने पाहत असल्यामुळे राजकीय वास्तववादाचा पराजय त्यांच्या काळातच झालेला दिसतो. ब्रिटिशांचा आर्थिक स्वार्थ त्यांनी ओळखला असला तरी राजकारणातील ब्रिटिश सरकारचा धूर्त-मुत्सद्दीपणा व स्वार्थीपणा त ओळखु शकले नाहीत.

आगरकरांनी राजकीय सुधारणेला आपल्या विचारप्रणालीत अग्रस्थान दिले आहे. त्याचे राजकीय विचार स्पेन्सरप्रणीत विकासवादाच्या तत्वावर आधारलेले आहेत. टिळकांच्या शब्दात आगरकर पक्के "स्वाराज्यवादी" होते. आगरकरांना रानडयांप्रमाणे ब्रिटिश राज्य ईश्वरी देणगी वाटत नसली तरी ब्रिटिशांच्या साम्राज्यामुळे पाश्चत्य ज्ञानाचा व राजकीय तत्वप्रणालीचा परिचय भारतीयांना होत आहे, ही गोष्ट त्यांनी चांगली घटना वाटते. कारण इतर आक्रमकापेक्षा ब्रिटिश हे सुशिक्षित व सुसंस्कृत असल्याने त्यांच्या स्वार्थी पणातही सुसंस्कृत पणाचा भाग आहे असे त्यांना वाटते. पण तरीही आगरकर या ब्रिटिश साम्राज्याबरोबर लढा देपुन स्वराज्य परत मिळविण्यासाठी प्रयत्नशील दिसतात. पाश्चात्य संस्कृतीतील नवोदित मुल्ये आत्मसात करुन समाजव्यवस्थेच्या आधुनिकीकरणावर आगरकर भर देतात. सत्ता हे त्यांना अखेरचे ध्येय वाटते. पण ती सत्ता प्राप्त करण्यासाठी "ज्या उपायांनी राज्यसत्ता प्राप्त झाली असता तिचे संरक्षण व तिचा सदुपयोग करता येईल असे शिक्षण त्यांस अगोदर

दिले पाहिजे"[२०] असा प्राथमिक व आवश्यक विचार त्यांना राष्ट्रीय पुनरुत्थानाच्या चळवळीमध्ये महत्वाचा वाटतो. राजकीय संघर्षा इतकीच सर्वांगिण सामाजिक प्रबोधनाचीही आगरकरांना आवश्यकता वाटत होती. त्याचप्रमाणे आपले राष्ट्र गुलामाचे राष्ट्र बनले आहे. आपल्यामध्ये राष्ट्राचे ऐक्य व प्रगती होण्यास लागणारा एकही गुण नाही, तेंव्हा राजनिष्ठा यत्किंचितही ढळून देता राजकीय हक्क संपादन करण्यासाठी जे करणे आवश्यक आहे. त्यासाठी प्रयत्न केले पाहिजे असे आगरकरांना वाटत असले तरी रानड्यांप्रमाणे राजनिष्ठा हे पवित्र निरपवादमूल्य म्हणून त्यांनी स्वीकारलेले नव्हते. राज्यकर्ते आपली जबाबदारी नीट सांभाळत नसतील तर मग प्रजेवरही राजनिष्ठ असण्याचे बंधन राहत नाही. इतकेच नव्हे तर राजद्रोहाचा राजरोस अंगिकार करणे हे अशा वेळी देशभक्त प्रजाजनांचे कर्तव्य होऊन बसते"[२१] अशी आगरकरांची धारणा होती. आपली गुलामी स्थिती नष्ट होण्यासाठी तरुणांच्या मनावर देशाभिमान, स्वातंत्र्यप्रीती, सत्यनिष्ठा, विद्याव्यासंग, न्यायबुध्दी, निर्भयता, स्वार्थत्याग, युयुत्सुवृत्ती याचे सतत संस्कार केले पाहिजे असे आगरकरांना वाटत होते.

रानडे आगरकरांच्या काळात राजकीय सामाजिक चळवळी बाल्यावस्थेत होत्या. रानड्यांनी राष्ट्रीय सभेला प्रोत्साहन दिले होते. ह्युमसारख्या व्यक्तिंना रानड्यांच्या सहकार्याची गरजवाटत होती. इंडियन नॅशनल कॉंग्रेस हे नाव राष्ट्रीय सभेला देण्याची सूचना रानड्यांचीच होती.[२२] रानडे राष्ट्रीय कॉंग्रेसमध्ये सरकारी नोकरीच्या मर्यादेमुळे निरीक्षकाची भूमिका करीत होते. तरी त्यांनी राष्ट्रीय सभेच्या कार्याला हातभार लावुन राजकीय क्षेत्रात मोलाची कामगिरी केली होती. राष्ट्रीय सभा सर्व देशातील लोकांची प्रतिनिधिक सभा बनली होती. आगरकरांना राजकीय हक्काच्या प्राप्तीसाठी राष्ट्रसभेचे कार्य प्रशंसनीय वाटत होते. म्हणून त्यांनी राष्ट्रसभेला पाठिंबा दिला होता. पण त्यांचा रानड्यांप्रमाणे राणीच्या जाहिरनाम्यावर विश्वास नव्हता. ब्रिटिश न्यायप्रिय सुसंस्कृत असले तरी आर्थिक बाबतीत आपल्या हित संबंधाला

कधीच मूळ धरू देणार नाहीत याची जाणीव रानड्यांप्रमाणे आगरकरांनाही होती. पण रानड्यांनी त्यासाठी अर्ज विनंती करण्यावर भर दिला. पण आगरकरांनी आपल्या देशबांधवांना जागे करतांना "एका बाजूला बलाढ्य इंग्रज लोक आणि दुसऱ्या बाजूला आम्ही सारे दुर्बळ हिन्दू लोक आहोत. जेते आणि जित, शास्ते व शासित किंवा याचे हरण असते असते चालणार आहे व हळूहळू सर्व हिन्दूंची एकजूट होऊन रक्तस्त्राव न होता, कालान्तराने या रणाचा शेवट उभयपक्षास संतोष कारक असा होणार आहे."[२३] असा आगरकरांनी कृतीशील राजकारणी विचार प्रगट केला. रानड्यांच्या लिखाणातही देशाच्या उज्वल भविष्याचा आशावाद सर्वत्र आढळतो. "इंग्लडसारख्या प्रगत, पराक्रमी आणि स्वातंत्र्यप्रिय राष्ट्राशी त्याने आपली सांगड घालून दिली आहे. या संधीचा पुरेपूर उपयोग करून घेतला पाहिजे. इंग्रजांविषयीचा न्यूनगंडाचे पर्व आता संपले आहे. पाश्चात्यांनाही आता भारताच्या पुरातन विद्येची आणि संस्कृतीची महती कळून चुकली आहे. पौर्वात्य विद्याचा त्यांचा अभ्यास दोन्ही खंडातील देशांना उपकारक ठरणार आहे. परस्परांच्या संस्कृतीबद्दल आदर बुध्दी ठेवून तिच्यातील उत्कृष्ट अंश ग्रहण करण्यात आपण लवकरच उद्युक्त होवू अशी शुभचिन्हे दिसू लागली आहेत"[२४] असे आशावादी राजकीय विचार प्रगट केले आहेत.

एकोणिसाव्या शतकाच्या शतकाच्या शेवटी आधी सामाजिक की राजकीय असा वाद निर्माण झाला होता. टिळकांनी सामाजिक सुधारणे विरुध्द भूमिका घेवून राजकीय सुधारणांना अग्रक्रम दिला होता. त्यावेळी रानडे, आगरकरांनी मानवी जीवनाच्या सर्वांगिण सुधारणेसाठी धार्मिक सामाजिक, राजकीय, आर्थिक ह्या सर्व क्षेत्रातील प्रगती आवश्यक मानली होती. रानड्यांनी राष्ट्रसभेच्या राजकीय व्यासपीठावरून सामाजिक परिषदा भरविण्याचा प्रयत्न केला होता. आगरकरांचा रानड्यांच्या ह्या कार्याला पाठिंबा होता. राजकीय बरोबरच सामाजिक सुधारणेला सारखेच महत्व दिले होते. राजकीय जागृती बरोबरच सामाजिक सुधारणा घडवून आणण्यासाठी लोकमत तयार करणे हा उद्देश रानड्यांचा होता. आगरकरांनी राजकीय

सामाजिक सुधारणा घडवून आणण्याची गरज वाट होती. दोघांनीही ब्रिटिश राजवटीमुळे भारतीय समाजजीवनात आमूलाग्र बदल घडून येवू शकतो असा विश्वास व्यक्त केला होता. ब्रिटिशांच्या न्यायबुद्धीवर विश्वास ठेवून आपल्या देशाचा राज्यकारभार इंग्रज सरकार आपल्यामध्ये राजकीय योग्यता निर्माण झाल्यावर आपले राज्य आपल्याला परत सोपवतील असे रानडयांना वाटत होते. पण आगरकरांना राजकीय हक्कासाठी, स्वातंत्र्य मिळविण्यासाठी झगडावे लागणार. सहजासहजी ब्रिटिश सरकार आपले आर्थिक नुकसान करुन घेणार नाही याची जाणीव होती. तेव्हा राजकीय अधिकारासाठी त्यांना संघर्ष आवश्यक वाटत होता.

सरकारी सेवेच्या मर्यादेमुळे रानडे प्रत्यक्षात राजकीय कार्यात भाग घेवू शकले नाहीत पण राजकीय व आर्थिक क्षेत्रातील प्रबोधन आपल्या लेखनामार्फत केले होते. तसेच आगरकरांनीही प्रत्यक्ष राजकारणात भाग घेतला नव्हता. कमकुवत शारीरस्वास्थ्यामुळे त्यांचे राजकीय कार्य लेखनापर्यंत मर्यादित राहिले होते. आगरकरांनी राजकीय व आर्थिक विषयावर प्रसंगानुरुप वेळोवेळी "केसरी" "सुधारक" मधून लेख लिहून ब्रिटिश सरकारचे दृष्टिकोन लोकांसमोर मांडण्याचा प्रयत्न केला. असाच प्रकारे रानडे यांनीही सर्वाजनिक सभेच्या त्रैमासिकातून सभामध्ये लेख पाठवून, व्याख्याने देवून राजकीय व आर्थिक बाबतीत सरकारचे धोरण आणि आपल्या कर्तव्या विषयी लोकांमध्ये जनजागृती करण्याचा प्रयत्न केला. आगरकरांनी आपल्या अग्रलेखांमधून इंग्रज सरकारच्या चांगल्या कार्याची प्रशंसा करुन त्यांच्याबरोबर त्यांच्या स्वार्थी राजकारणी व आर्थिक धोरणावर कडाडून हल्ला केला होता. राजकीय बाबतीत ते जहाल विचारवंत मानले जातात.

न्या. रानडे दादाभाई नौरोजी यांच्या प्रमाणेच भारतातील अर्थशास्त्राचे प्रवक्ते होते. भारतातील अर्थकारणाचा त्यांनी सखोल अभ्यास केलेला होता. Essays on Indian Economics या आपल्या ग्रंथात त्यांनी

भारतातील आर्थिक प्रश्नांचा विचार शेती, आयातनिर्यात, व्यापार उद्योग-धंद्याची वाढ, स्वदेशीचा पुरस्कार इ. विषयीचे आर्थिक विचाराचे विश्लेषण केले आहे. भारताला शेती व्यवसाय ज्याप्रमाणे आवश्यक आहे, त्याचप्रमाणे व्यापारामुळे आपली आर्थिक अवनती विदेशी धोरणामुळे कशी होत आहे ह्याचे विवेचन त्यांनी केले आहे. अर्थशास्त्र हे एका अर्थाने समाज शास्त्रच आहे: असे रानडेंना वाटत होते. रानडे यांचे आर्थिक तत्वज्ञान हे त्यांच्या सर्वांगीण सुधारणेचे एक अंग होते. रानडयांनी ब्रिटिश सत्तेचे स्वागत केले असले तरी त्यांना ब्रिटिशांचे अर्थशास्त्र भारताला उपयुक्त वाटत नव्हते. उलट युरोप, अमेरिकेत प्रचलित अर्थशास्त्र भारताला उपयोगी पडेल असे त्यांना वाटत होते. कर्वे, रानडे यांचे विचार प्रगट करताना म्हणतात की, "व्यापार विषयक बाब ही अर्थ विषयक राष्ट्रीय धोरणाचेच एक महत्वाचे अंग असते. राष्ट्रामध्ये चाललेल्या आयात निर्यातीच्या बाबीपेक्षा व्यापक उत्पादक यंत्रांची हालचाल अधिक महत्वाची असते. समाजाच्या अर्थ विषयक शिक्षणाला सहाय्यक होणारी कोणतीही गोष्ट सुप्तावस्थेत असलेल्या भौतिक व मानवी साधन संपत्तीचे भांडार खुले करुन, औद्योगिक प्रगतीचा दर्जा वाढविण्यात कारणीभुत होते, हीच गोष्ट वस्तुत: अर्थशास्त्रदृष्टया फायदयाची आहे.."[२५] रानडयांनी अशा प्रकारे भारतीय अर्थशास्त्राचा विकसीत दृष्टिकोन लोकांसमोर ठेवला होता. रानडयांनी आपले मित्र श्री. गणेश व्यंकट जोशी ह्या थोर अर्थशास्त्रज्ञाशी विचार विमर्श करुन भारतीय आर्थिक धोरणाचा आढावा घेतलेला होता. भारताला हितकारक ठरणाऱ्या आर्थिक विचारांना मुर्त स्वरुप देण्यासाठी इ.स. १८९० ला इंडस्ट्रियल असोसिएशन ऑफ वेस्टर्न इंडिया" ही आर्थिक संस्था स्थापन करुन त्याला राष्ट्रीय पाठिंबा मिळावा म्हणून प्रयत्न केले व राष्ट्रीय सभेशी त्याचा संबंध जोडण्याचा प्रयत्न केला. पण सामाजिक परिषदेप्रमाणेच या औद्योगिक परिषदेलाही राष्ट्रीय पाठिंबा त्यांना मिळविता आला नाही, पी.के. गोपालनच्या शब्दात "हिन्दुस्थानातील रानडे हे पहिले अर्थशास्त्रज्ञ आहेत, की ज्यांनी हिन्दुस्थानच्या आर्थिक प्रगतीसाठी कोणते पर्याय हिन्दुस्थानात आवश्यक आहेत हे दाखवुन दिले त्याचप्रमाणे रानडे हे एक मोठे शास्त्रीयदृष्टया आर्थिक विचार करणारे आद्यप्रवर्तक होते. आर्थिक विकासांच्या प्रश्नांचा विचार करणाऱ्या आधुनिक अर्थशास्त्राचे ते संस्थापक होते"[२६] इतिहासाप्रमाणेच अर्थशास्त्र हा

विषय रानडयांचा विद्यार्थीदशेतील आवडता विषय असल्याने देशाच्या आर्थिक परिस्थितीचा अभ्यास त्यांनी सुक्ष्मरित्या केलेला होता. ब्रिटिशांच्या आर्थिक नीती मुळे होणारे नुकसान आणि त्याची कारणे मीमांसा व परिणाम स्पष्ट केले. ब्रिटिश सरकारची आर्थिक निती भारताला दारिद्र्याच्या खाईत टाकणारी वाटत असली तरी भारतातील उद्यमशीलता, कसब, गुणवत्ता, विज्ञान व तंत्रज्ञानाचा उपयोग भारतीय लोक करीत नसल्यामुळे देश आर्थिक दृष्टया रसातळाला जात आहे. त्यासाठी उद्योगधंदे कारखानदारीची वाढ करण्याची गरज त्यांना वाटत होती"[२७] आर्थिक दुर्बल अवस्थेला जसे ब्रिटिश सरकार कारणीभूत आहे तसेच भारतीयांची आळशी प्रवृत्ती कारणीभूत आहे असे त्यांना वाटत होते.

आगरकरांनाही ब्रिटिश सरकारच्या आर्थिक धोरणाच्या स्वार्थीपणावर टिका केली. ब्रिटिश राज्यकर्ते भारताचे आर्थिक शोषण पध्दतशीररित्या कसे करीत आहे ह्याचे विश्लेषण आपल्या लेखांमधून केले होते. भारताच्या दारिद्र्यात भर घालणाऱ्या, सर्व सामान्य माणसांच्या आर्थिक शोषणावर आपल्या देशाचे वैभव उभारणाऱ्या इंग्रजांच्या अत्याचारी राजवटीपासून देश मुक्त झाला पाहिजे अशी कळकळ आगरकरांना वाटत होती. आगरकरांनी दादाभाई नौरोजींचा ब्रिटिशांच्या आर्थिक शोषणाचा दृष्टिकोन आपल्या लेखांमधून स्पष्ट केला होता. तसेच रानडयांच्या आर्थिक विचारांचा आढावा घेतला होता. ब्रिटिशांकडून होणारे आर्थिक शोषण व राजकीय मुस्कटदाबी यावर परिणामकारक लेख लिहून लोकांना जागृत करण्याचा प्रयत्न केला होता. त्याचप्रमाणे व्यापार, उद्योगधंदे आपल्या हातात घेवून स्वदेशीचे तत्व अंमलात आणण्याचे आवाहनही लेखांमधून केले होते. लोकांच्या निष्क्रीयतेवर आघात करून लोकांना आर्थिकदृष्टया स्वावलंबी होण्याचा मार्ग त्यांनी आपल्या लिखाणाद्वारे लोकांना पटवून देण्याचा प्रयत्न केला. "हिन्दुस्थानातील अनान्न दशेचे परिणाम" या लेखामध्ये इंग्रजांच्या आर्थिक मनोवृत्तीवर प्रकाश टाकून "इंग्लिश लोक आमचा सगळा व्यापार फिरून आपल्या हाती देण्यापेक्षा आमचे राज्य ते आम्हास अधिक आनंदाने परत करतील" असे भाकीत केले होते. तसेच

"ब्रिटिश राज्यकर्ते येथील लोकांना धार्मिक, सामाजिक सुधारणा करण्यात गुंतवून ठेवून आपली राजकीय व आर्थिक हेतू साध्य करण्याच्या प्रयत्नात"[२८] असल्याच्या धोरणावर प्रकाश टाकला होता. राष्ट्रीय सभेचे लोकांना महत्व पटवून दिले. पण पुढील काळात आगरकरांनी समाजसुधारणेवर भर दिल्याने त्यांच्या राजकीय व आर्थिक कार्याकडे दुर्लक्ष झालेले दिसते. पण ते प्रसंगानुरूप आर्थिक विचार मांडत असत. त्यांनी राजकीय, आर्थिक क्षेत्रात संस्था, सभांची निर्मिती केली नसल्यामुळे आगरकर केवळ समाजसुधारक म्हणून ओळखले जातात. तरीही रानडे व आगरकरांचे राजकीय व आर्थिक कार्य राष्ट्रीय स्वरूपाचे व्यापक दृष्टीकोनातील दूरदृष्टीचे होते हे मान्य करावे लागेल. त्यांच्या राष्ट्रोद्धाराच्या तत्व विचारांमध्ये सर्वच सुधारणांना सारखे महत्व होते. सुधारणेच्या प्राथमिक अवस्थेत राजकीय, सामाजिक धार्मिक विचार आणि क्रिया एकमेकांमध्ये समावलेल्या असतात, यावर त्यांचा विश्वास होता. तत्कालीन परिस्थितीमध्ये प्रसंगानुसार जेव्हा सामाजिक प्रश्नामुळे वाद निर्माण होवु लागले तेव्हा रानडे आणि आगरकरांनी समाजसुधारणेच्या दृष्टीने या प्रश्नांमध्ये लक्ष घालुन आपले प्रगत विचार लोकांपुढे मांडले.

सुरवातीला भारतातील समाजसुधारणेची चळवळ सर्व समाजाची नवीन रचना या ध्येयाने प्रेरित झाली नव्हती तर प्रस्थापित समाजावर नवीन विचारांचा प्रभाव पाडणे आणि त्यानुसार नवीन जीवनाला सुरवात करणे या उद्देशाने प्रेरित झाली होती. एकोणिसाव्या शतकातील सुधारकांपैकी फक्त रानडे आणि आगरकरांनीच सर्वांगीण व सर्वंकष समाजसुधारणेचे स्वप्न पाहिले होते. समाजसुधारणा चळवळ ही सतत चालणारी प्रक्रीया आहे तेव्हा समाजात काही कालावधी नंतर नवीन दोष निर्माण होतात, ते दोष दूर करण्याचा प्रयत्न सुधारकांना करावा लागतो. हे निसर्गनियमाचे तत्व रानडे, आगरकरांनी जाणल्यामुळे आपल्या कार्याच्या मर्यादा ओळखुन कार्य केले. वास्तववादी दृष्टिकोन स्वीकारून आपल्या समाजातील समस्यांचे निराकरण करतांना नवीन विचार लोकांमध्ये रुजविण्याचा सतत प्रयत्न करीत राहिले. त्यांच्यामध्ये विचार जागृती निर्माण करून लोकांचे मतपरिवर्तन

करण्याचे कार्य करीत राहिले. त्यासाठी रानडे व आगरकर हे व्यक्ति स्वातंत्र्याला महत्व दिले होते. समाजसुधारणा केल्याशिवाय आपल्या देशाची उन्नती होणार नाही हे रानडे, आगरकरांना बौध्दिक दृष्टया पटले होते. राष्ट्राच्या उज्वल भवितव्यासाठी समाजाचे मागासले पण नष्ट होणे आवश्यक आहे असे त्यांना वाटत होते. लोकांमध्ये सतत नवीन चांगल्या, उपयुक्त विचारांचा प्रसार केला तर आपला समाज टप्प्या टप्प्याने प्रगती करेल असा विश्वास दोघांनाही होता. म्हणून दोघांनीही समाज सुधारणेच्या विविध मार्गापैकी लोकशिक्षण व ज्ञान प्रसाराचा मार्ग पत्करलेला होता. समाज सुधारणा करतांना त्यांना सनातनी रुढी परंपरे विरुध्द, धर्मशास्त्रा विरुध्द आणि जुन्या कालबाह्य ठरलेल्या समाजिक जाणीवां विरुध्द लढा द्यायचा होता. कारण सनातनी समाजामध्ये धर्म हा सनातन व नित्य आहे. हे जाणून घेण्याचे बौध्दिक सामर्थ्य राहिले नव्हते. दैवी साक्षात्कारातून उद्भवलेल्या धर्म शास्त्र ग्रंथांचा प्रभाव समाजावर निर्माण झालेला होता. प्राचीन काळापासून प्रस्थापित असलेल्या सामाजिक संस्था, रुढी परंपराचे अनुकरण करण्यातच खरा धर्म व नैतिकता आहे अशी लोकांची भावना बनली होती पण व्यवहारिक जीवनात अडथळे व प्रगती खुंटविणाऱ्या प्रथा परंपरांना डावलून पुढे जाण्याची हिंमत अज्ञानामुळे आणि पुर्वसंस्कारामुळे नष्ट झाली होती. ह्या अनिष्ट परंपरांना चिकटून राहणे म्हणजे बौध्दिक गुलामगिरी स्वीकारणे होय याची जाणीवही समाजातून नष्ट झाली होती. म्हणून आपल्या रुढ आचारविचारातील दांभिकता, अन्याय, शिथिलता लोकांच्या लक्षात आणून दिल्यास ते हळूहळू त्यापासून दूर जातील व हे कार्य लोकशिक्षण व ज्ञानप्रसाराच्या माध्यमाने होईल असे रानडे आगरकरांना वाटत होते. म्हणून रानडे व आगरकरांनी मूळ सामाजिक सुधारणेवर आपल्या विचार तत्वात विशेष महत्व दिले होते. ही समाजसुधारणा कुटुंबापासून सुरु व्हावी असे त्यांना वाटत होते. घरातील महत्वपूर्ण व्यक्ती म्हणून स्त्रीला तिचे योग्य स्थान मिळावे या दृष्टीकोनातून त्यांनी स्त्री सुधारणेचा विचार केला होता. समाज सुधारणेच्या पहिल्या टप्प्यातील बालविवाहाच्या सामाजिक रुढीविरुध्द सम्मतीवया बद्दल जेव्हा

संघर्ष सुरु होता तेव्हा रानडे व आगरकरांच्या विचारातील मुलभूत दृष्टिकोनाचा फरक जाणवला. बालविवाहाला धर्मग्रंथात सम्मती नाही. मुलगी वयात आल्यानंतर तिचा विवाह झाला तर तो शास्त्र संमत आहे हे सांगतांना रानडे जुन्या शास्त्री पंडितांची मदत घेतांना दिसतात. जुन्या नव्या विचारांचा संगम व्हावा हा त्यांचा दृष्टिकोन असला तरी ते धर्माचा आधार घेतांना दिसतात तर आगरकरांना विवाहाची वयोमर्यादा वाढविण्याची आवश्यकता विज्ञानाने नैसर्गिकतेच्या आधारावर ठरविली आहे. जी स्वयंवरे नाहीत ते सर्व बालविवाहच होय, सज्ञानवयात मुलामुलींना आपला जोडीदार निवडण्याचे स्वातंत्र्य असावे असे आगरकरांनी निक्षून सांगितले आहे. समाज सुधारणेच्या बाबतीत दोघांच्या तत्वप्रणालीत साम्य आढळते. दोघांनीही उदारमतवादाचा अवलंब आपल्या विचारात केला आहे. सम्मती वयाच्या कायद्याची आहे असे रानडयांना वाटत होते. म्हणून त्यांनी मलबारींना पाठिंबा दिलेला होता आगरकरांना मात्र सम्मती वयाच्या कायदयाचा फारसा उपयोग होणार नाही याची जाणीव होती. पण मुलामुलींच्या परस्पर संमतीच्या विवाहाची प्रथा समाजात रुजणे कठीण आहे व परकीय सरकार सम्मतीवयाचा कायदा करेल किंवा नाही अशी शक्यता निर्माण झाली असता आगरकरांनी सम्मती वयाच्या बिलाचे स्वागत आपल्या लिखाणामधून केले. या विवाहाची मर्यादा चौदा वर्षांची सुचविली गेली हा स्वयंवराच्या आधीचे एक पाऊल आणि प्रौढ विवाहाचा पहिला टप्पा त्यांनी आपला पाठिंबा जाहीर केला. पण यामुळे टिळक, आगरकरांचे मतभेद वाढून शेवटी आगरकरांना केसरी सोडून सुधारक वृत्तपत्र वेगळे काढावे लागले. पण आपल्या विचारांसाठी त्यांनी तडजोड करणे मान्य केले नाही.

रानडे व आगरकरांनी लोकशिक्षण व जनजागरणाचा उद्देश ठेऊन समाज प्रबोधन सुरु केले होते. रानडे यांनी लोकांचा कल ओळखून त्यांच्या विचारांना वळविण्याचा प्रयत्न करून वास्तवाकडून आदर्शाकडे समाजाला नेण्याच्या शांत सुधारकांची भूमिका घेतली तर आगरकरांनी रुढी प्रिय पुराणमतवादी समाजावर टिका करून विचार करण्यासाठी लोकांना प्रवृत्त

करण्याचा प्रयत्न केला. त्यांच्या परंपरागत विचारांवर आघात केले समाजाला प्रगतीसाठी लोकांना खडबडून जागे करणाऱ्या रुढी भंजक सुधारकाची भूमिका घेतली होती. त्यामुळे रानड्यांपेक्षा आगरकरांची समाजाने जास्त अवहेलना केली पण ह्या दोन्ही सुधारकांची आवश्यकता समाजाला होती. त्यांचे कार्य परस्परपूरकच ठरले. रानड्यांना व आगरकरांना रुढी प्रामाण्य, दैववाद, जन्म सिध्द उच्चनीच भाव, व धर्मभोळे पणा यांचे प्रस्थ कमी करुन व्यक्ती स्वातंत्र्य बुध्दी निष्ठा, प्रयत्नवाद, संमती व समानता या तत्वांच्या पायावर समाजाची पुनर्घटना करण्याचे कार्य महाराष्ट्रातील सुशिक्षित वर्गाने करावे असे वाटत होते. पण हा वर्ग ब्रिटिश शासनाशी एक निष्ठ राहिल्याने त्यांनी रानड्यांच्या कार्याला पाठिंबा दिला नाही. त्यामुळे त्यांनी कुटुंब सुधारणेवर लक्ष केंद्रित करुन स्त्री शिक्षण प्रौढ विवाह, पुनर्विवाह, केशवपनाच्या प्रथेचा विरोध, परदेशगमन इ. व गोष्टीसाठी आपले समाज कार्य मर्यादित ठेवले. समाज हा देशाच्या महत्वपूर्ण घटक असल्याने ह्या समाजातील कुटुंब या प्रमुख संस्थेला सुधारणा मार्गाकडे नेऊन निकोप नवसमाजनिर्मितीच्या कार्याचे उद्देश साध्य करण्याचे प्रयत्न त्यांनी केले होते.

रानड्यांना बालविवाहाचा विरोध करतांना त्यांच्या विचारांशी विसंगत अशा गोष्टीला सामोरे जावे लागले इ.स. १८७३ ला पहिल्या पत्नीच्या मृत्युनंतर त्यांच्या वडिलांच्या आग्रहाने त्यांना रमाबाई या अकरा वर्षांच्या मुलीशी वयाच्या एकत्तीसाव्या वर्षी नाईलाजास्तव विवाह करावा लागला. त्यामुळे त्यांचे समाजसुधारणेच्या बाबतीत एक पाऊल मागे पडले होते. त्यासाठी त्यांना लोकांची टिका ऐकून घ्यावी लागली. त्याचप्रमाणे पंच हौद मिशन प्रकरणात स्वत: चहा घेतला नसतांनाही मित्रांसाठी त्यांना प्रायश्चित घ्यावे लागले. त्यावेळी ते सामाजिक बाबतीत प्रतिगामी, धर्मवेडे आहेत असा आरोप त्यांच्यावर केला गेला.[२९] पण स्त्री-शिक्षणाचा पुरस्कार करतांना रानडे व आगरकरांनी आपल्या घरातूनच स्त्री शिक्षणाचा पाया रचला. स्वत: रानड्यांनी रमा बाईंच्या शिक्षणाला सुरुवात करुन त्यांना उच्च शिक्षण दिले

व आपल्याबरोबर समाजकार्यात सहभागी केले. आगरकरांनीही यशोदाबाईना लिहिता वाचता येईल येवढा शिक्षणाचा परिचय करुन दिला. स्त्री सुधारणेसाठी रानडयांनी घरीच स्त्रियांची शाळा काढली. व पत्नीला त्यात सहभागी केले. आगरकरांनी आर्थिक अडचणीमुळे यशोदाबाईना उच्च शिक्षण देऊन समाज कार्यात आणले नसले तरी त्यांच्या विचारांमध्ये परिवर्तन घडवून आणण्यात ते यशस्वी झाले होते. आगरकरांच्या मृत्यु नंतर त्यांनी केशवपन सारख्या अनिष्ट प्रथेला विरोध केला होता. "मला कुणाची मर्जी किंवा सांभाळण्याचे काही एक कारण नाही. ज्यांची मर्जी सांभाळावयाची होती त्यांची सांभाळली आजपर्यंत, पण ते ही निघुन गेले तरी त्यांच्या माघारी मी त्यांचीच मर्जी सांभाळणार, मग त्यापायी कुणाकुणाच्या कितीहि मर्ज्या तुटल्या तरी मला त्याची पर्वा नाही. अर्थात ह्यानंतर मला अनेकांनी प्रकारे समाजाच्या रोषाची भिती घातली व त्याप्रमाणे मला थोडा त्रासही सहन करावा लागला पण मी शेवटपर्यंत सोवळी झाले नाही"[30] आगरकरांच्या सुधारणावादी विचारांचा प्रभाव यशोदाबाईवर पडला होता. जसजसे आगरकराचे विचार त्यांना पटू लागले, तसतसे कालानुरुपत्वे त्यांच्या विचारांचा अंगिकार त्यांनी आपल्या जीवनात केला होता. रानडे व आगरकरांना विश्वास होता की स्त्रियां सुशिक्षित झाल्या तर त्या अर्थाजन करुन स्वावलंबी बनतील. त्यामुळे बालविवाहचे दु:परिणाम हळूहळू कमी होतील. सतीप्रथा बालविधवा, त्याचे निकृष्ट जीवन केशवपन सारख्या अमानवीय जीवन जगण्यास भाग पाडणाऱ्या सामाजिक प्रथाविरुध्द जनजागृती करुन स्त्रियाचे जीवन सुसहय बनविण्याचा त्यांनी प्रयत्न केला. विधवा विवाह, प्रौढ विवाह, पुनर्विवाह व घटस्फोटाचा अधिकार इ. सुधारणांचा पुरस्कार करुन स्त्रियांच्या बाबतीत मानवी दृष्टिकोनातुन विचार करण्यास पुरुष प्रधान समाजाला आग्रह धरला. रखमाबाई दादाजी प्रकरणात रखमाबाईची बाजू समाजाला समजावुन देण्याचा प्रयत्न केला. समाजातील आचारात जे चांगले आहे निर्दोष व हितावह आहे ते घेण्याचा आग्रह केला व जे अनिष्ट अहितकारक आहे त्याचा त्याग करुन पाश्चात्य संस्कृतीतील

चांगल्या मुल्यांचा स्वीकार करण्याचा आग्रह रानडे व आगरकर करतांना दिसतात.त्याच बरोबर भारतीयत्वाची जाण ठेवुन प्रगत संस्कृतीचा स्वीकार केल्यास समाज प्रगतीपथाकडे स्वतःचे वैशिष्ठ्य टिकावुन चालु शकेल असे त्यांना वाटत होते म्हणून भारतीयांची मुळ प्रकृती "भारतीय आर्यत्व न सांडिता" या तत्वाचे अनुकरण करण्याचा सल्ला दिला आहे. रंगपंचमी सारखे सण सोडुन देवुन दिवाळी सारख्या सणांचा पुरस्कार केला आहे. दिवाळी सारखे सण समाजामध्ये चैतन्य निर्माण करतात. म्हणून ते आगरकरांना आवश्यक वाटतात. त्याचप्रमाणे व्यक्ती विकास होण्यासाठी काळानुसार विभक्त कुटुंबाची गरज त्यांनी प्रतिपादित केली होती. समाजातील कुटुंबाला प्राधान्य देतांना कुटुंबाचा पूर्ण विकास त्यांना अभिप्रेत होता. इतके त्याचे विचार काळाच्यापुढे होते. समाजसुधारणा करतांना रानडे, आगरकरांवर समाजाने बहिष्काराचे अस्त्र उगारले तेव्हा दोघांनी ही परस्परांना पाठिंबा दिलेला होता. आगरकरांना रानडयांचे कार्य आदर्श वाटत होते तर रानडयांना आगरकरांच्या त्यागीवृत्तीच्या कार्याचे कौतुक वाटत होते.

रानडे भारतीयांचा स्वाभिमान आणि राष्ट्रीयत्व जागृत करण्यासाठी जन्मभर लढले. लोकांना आधुनिक जीवनपध्दतीच्या विचार सरणीचे ज्ञान करुन देऊन योग्य मार्गाने सोबत घेऊन जाण्याची उत्कंठा त्यांना होती "तत्व आणि व्यवहार यांची सांगड घालण्याच्या त्यांच्या धडपडीमधुन त्यांच्या विचार सरणीत काही दोष शिरले उणीवा राहिल्या. त्यात काळाची गरज किती आणि रानडयांची वैयक्तिक जबाबदारी किती हे ठरविणे कठीण आहे. मात्र रानडे हे त्या काळाचेच अपत्य असल्याने या दोषाचे ते काही प्रमाणात वाटेकरी असणार हे उघड आहे. तरी सुध्दा आधुनिक महाराष्ट्रातील सामाजिक तत्वज्ञानाचे आद्यप्रणेते म्हणून त्याचे जे मोठेपण आहे ते निर्विवाद आहे. त्यांनी आपले तत्वज्ञान इतक्या सौम्यपणे व सातत्याने मांडले, तरी आपल्या लोकांनी ते तत्परतेने स्विकारले नाही. त्यांनी पुरस्कारलेल्या काही सुधारणा कालान्तराने अमलांत आल्या. पण त्यांच्या मुळाशी असलेली व्यक्तीची

प्रतिष्ठा, सामाजिक न्याय आणि समता, परसहिष्णुता यासारखी तत्वे अजूनही आपण आत्मसात केली नाही"[३१] असे शं. बा. सरदार रानडयांच्या कार्याचे मुल्यमापन करतांना म्हणतात. तसेच आगरकरांच्या कार्याचे विचारप्रणालीचे मर्यादा व मोठेपण सांगतांना ते पुढे म्हणतात की, "आपल्या विचारांच्या मांडणीत त्यांनी व्यक्तिस्वातंत्र्य आणि समाजधारणा, व्यक्तिविकास आणि समाजोन्नती यांचा बेमालूम मेळ घालण्याचा प्रयत्न केला आहे. समाजाच्या सर्व थरातील लोकांना हरएकबाबतीत न्याय मिळाला पाहिजे. त्याचे नैसर्गिक हक्क त्यांना निर्वेधपणे उपभोगता आले पाहिजेत असे आगरकरांना उत्कटतेने वाटत होते. श्रमिकाचे आर्थिक प्रश्न व व्यावसायिक अडचणी आणि सामाजिक विषमतेमुळे होणारी शुद्रातिशुद्रांची कुचंबणा व मानहानी यांची त्यांनी प्रसंगपरत्वे दखल घेतली आहे. आणि त्याबाबत आपले मतव्यक्त करतांना त्यांनी सरकार व वरिष्ठ वर्ग यांची मुळीच भीडमुर्वत ठेवली नाही. तरी देखील त्यांच्या एकंदर लेखनातील बराचसा भाग उच्च वर्गातील मध्यमवर्गाच्या प्रश्नांनीच व्यापलेला आहे. त्यामुळे त्यांच्या विचारांना स्वाभाविकपणे मर्यादा पडल्या आहेत"[३२] समाजातील उच्चवर्णियांना आपले महत्व कमी करणारी आगरकरीय सुधारणा नको होती. म्हणून त्यांनीही त्यांची तत्वप्रणाली स्वीकारली नाही.

समाजात सतत दोषपूर्ण व्यवस्थेचे प्राबल्य वाढत राहते. त्याचे निर्मुलन करण्यासाठी, समाज सुधारकांना सतत प्रयत्न करावे लागतात. त्यामुळे समाज सुधारक समाजावरील मरगळ दूर करुन, समाजाला नवचैतन्य देण्याचे कार्य करीत असतो नवीन क्रांतीकारक असे काही करीत नसुन समाजात नवचैतन्य निर्माण करण्याची त्याची भूमिका क्रांतीकारी ठरते. या दृष्टीकोनातुन रानडे व आगरकर या सुधारकांची भुमिका विशुध्द सुधारकाचीच आहे. म्हणून रानडे सुधारकाची व्याख्या करतांना "समाज सुधारकाची भुमिका व कार्य हे को-या पाटीवर स्वतंत्रपणे मजकूर लिहिण्याचे नसुन आधी अर्धवट लिहिलेले वाक्य पूर्ण करावयाचे असते."[३३] तर आगरकर सुधारकाची भूमिका एखाद्या सुवर्णकाराप्रमाणे

मानतात. हि-याचे पैलु पाडण्याचे त्याचे जसे कार्य असते. तसेच समाजाला प्रवाहित करुन विकसनशील मार्गावर नेण्याचे कार्य सुधारकाला करावे लागते. "देशातील विचारी लोक हे कल्पक सुवर्णकार होत. व समाज हा त्यांच्या हाती आलेला पैलुदार खडा होय. या खड्यावर सरकारी सहाय्य, स्वतःचा प्रयत्न वगैरे हत्यारांनी ते त्यात मोहकपणा आणतात. सगळे पैलू साफ-झाल्याखेरीज समाज खडा कोहिनुर प्रमाणे कधीच चमकू लागणार नाही हे ज्याने त्याने ध्यानात वागवुन आपआपल्या पैलुवर होईल तितकीच मेहनत करीत असावे आणि मत्सर, क्षुद्रबुध्दी यांचा त्याग करुन दुस-यात होईल तितका हातभार लावावा. हाच सुधारणेचा प्रशस्त मार्ग होय"[३४] ह्याच विचारांनी आगरकर मानहानी सहन करुन समाजाला विचार प्रवण करण्यासाठी झगडले व रानडयांनी सुधारणेसाठी प्रयत्न चालविले.

न्या रानडे आणि आगरकराचे जीवन जवळुन पाहणा-या गोपाळ कृष्ण गोखले यांच्या नजरेत त्यांचे कार्य श्रेष्ठतम दर्जाचे होते. रानडयांच्या बाबतीत गोखल्यांची प्रवृत्ती विभुतीपुजका सारखी होती" युगायुगाला, निरनिराळ्या प्रसंगी युक्तमाकत, अडखळत चाललेल्या या दुबळ्या मानवजातीला मार्गावर आणण्याकरिता व प्रकाश दाखविण्याकरिता ज्या विभुति अवतीर्ण होतात त्यापैकी रानडे एक होत. त्यांच्या जीवनाचा संदेश आपण विशेषतः तरुण पिढीने पवित्र आणि बंधनकारक मानला पाहिजे. मनुष्य मात्रात अधिकाअधिक समता नांदावी आणि प्रत्येक मनुष्याची मनुष्य या नात्याने काही योग्यता आहे हे ओळखले जावे, या दोन तत्वांकरिता रानडे जन्मभर झटले. वातावरण अधुन मधुन कितीही निराशाजनक झाले तरी या दोन तत्वांचा विजय अखेरीला होणार हे निश्चित. तो विजय लवकर व्हावा म्हणून आपल्यात प्रयत्न करता येईल "स्वदेशाकरिता स्वार्थ त्याग आणि कार्य करीत राहा" हाच संदेश रानडयांनी आपल्याला दिलेला आहे."[३५] असे रानडे यांच्या कार्याचे उद्देश सांगुन त्यांचा संदेश दिला होता. आगरकरांनी गोखल्यांना समाजकार्याचा मार्ग दाखवुन आपल्या कार्यात सहभागी केले होते व त्यांच्या कर्तृत्वाला वळण देण्यासाठी गोखल्यांना रानडयांकडे त्यांना सोपविले होते. त्यामुळे गोखले आगरकरांना आपले पहिले गुरु मानतात. गोखले

आगरकरांच्या कार्याचे मुल्यांकण करतांना म्हणतात की "By dint of energy and preseverence and that stern purpose which was all through so prominent a feature of his carear, he achieved for himself in course of time, a distinguished place among the scholars and educationist of the presidency Mr. Agarkar was nothing, if not heroic. He always placed before himself high ideas and always tried his utmost to live up to those ideals. His sense of duty and his love of truth and of disipline were as great as his courage was unbending and his will undemitable. In private life he was extremely simple and gentile. This example must animate and sustain the collegues who remain to mourn the loss"[36] असे गोखल्यांनी आगरकरांच्या मृत्युनंतर काढलेले आदरादुगार होते.

लो. टिळक हे रानडयांच्या पुढील पिढीतील आणि आगरकराचे समकालीन मित्र, पुढारी होते. त्यांनी आपल्या कार्याला सुरुवात करण्यापूर्वी जेष्ठ विचारवंत, सुधारक, आदर्श व्यक्ती म्हणून रानडयांकडून आगरकरांबरोबर त्यांच्याकडे जावुन देशकार्याचे धडे घेतले होते. रानडयांनीही त्यांना प्रोत्साहन दिले होते. टिळक समाज सुधारणा करतांना देशाच्या परंपरेचा, धर्माचा स्वाभिमान बाळगुन ब्रिटिश सरकार विरुध्द जनजागृती करुन देशाच्या राजकीय कार्यात नवचेतना, निर्माण करणारे पुढारी ठरले. त्यांनी रानडे, आगरकरांच्या सामाजिक सुधारणांचा विरोध केला असलातरीही रानडे व आगरकरांच्या कार्याचे महत्व आणि कर्तृत्व ओळखुन होते. सनातनी वर्गाचे पुढारी म्हणून त्यांनी समाज सुधारणांना विरोध केला होता. तरीपण ते रानडयांना महाराष्ट्रातील सर्वांगीण सुधारणेचे प्रर्वतक मानतात. रानडयांचा मृत्यु १६ जाने. १९११ मध्ये झाला असता त्यांच्या बद्दल कृतज्ञता व्यक्त करतांना केसरीमध्ये रानडयांवर लिहिलेल्या मृत्यु लेखात ते म्हणतात की "माधवरावजी तर गेलेच, पण त्यांनी

घालून दिलेले उदाहरण डोळ्यापुढे ठेऊन सर्वजण जर यथाशक्ति देश कार्याकरिता झटण्याचा प्रयत्न करीतल, तर आपल्या सर्वांस जी गोष्ट हवी आहे, ती प्राप्त झाल्याखेरीज कधीही राहणार नाही" रानडयांना टिळक आपले गुरु मानत असले आणि रानडयांच्या सामाजिक कार्याबाबत त्याची मतभिन्नता असली तरी रानडयाचे कार्य राष्ट्रोद्धाराकरीता आवश्यक आहे याची जाणीव त्यांना होती. रानडयांचा विद्याव्यासंग, अखंड ज्ञानोपासना, नैतिकता, सतत सार्वजनिक कार्याची तत्परता आणि त्यांच्या समन्वय बुध्दीचे आकर्षण त्यांना होते. त्यांच्या व्यक्तिमत्वाचे वर्णन त्यांनी "सर्वज्ञ सहि माधव:" या शब्दात केली होती. टिळकांनी रानडयांच्या कर्तृत्वाबदल त्यांच्या मृत्यूलेखात पुढे लिहितांना म्हटले की," विद्वत्ता, मुत्सद्दीपणा, काम करण्याची हौस, सार्वजनिक हित कोणत्या उपायांनी करता येईल याबद्दल एकसारखा निदिध्यास, आणि लोकांनी नेहमी आपल्या उन्नतीच्या चळवळीत व्यग्र असावे अशी अनिवार इच्छा, इतके गुण अंगी वसत असलेले थोर पुरुष राष्ट्रात वारंवार निपजत नसतात.... त्यांनी आपल्या हयातीत आपल्या जन्मभूमीतील लोकांस शहाणे करुन सोडण्याचा क्रम अबधित चालु ठेविला होता. राष्ट्रामध्ये लिहिणारे व बोलणारे पुढारी जरी पुष्कळ असले तरी अशा रीतीने लोक समाजामध्ये जागृति उप्तन्न करण्याचे गुरुत्व ज्यांकडे देता येईल असे लोक फारच विरळा आहेत. माधवरावजी हे अशा विभूतीपैकीच एक होते"[३७].

टिळक आगरकराचे मित्र नंतरच्या काळातील विरोधक, टिकाकार म्हणून टिळक आगरकराचे संबंध प्रसिध्द असले तरी ते चांगले सहकारी होते. आगरकरांचा प्रखर बुध्दीवाद, विवेकनिष्ठा, अज्ञेयवाद त्यांना आवडत असला तरी सामाजिक कार्यासाठी हया गोष्टी त्याज्य वाटत होत्या. म्हणूनच, त्यांच्यामध्ये मतभिन्नता होवून शेवटी आगरकरांनी "मोडेन पण वाकणार नाही" या बाण्याने सुधारक काढून आपले समाजकार्याचे प्रबोधन सुरुच ठेवले होते. दम्याच्या विकराने १७ जुन १८९५ ला आगरकरांचा मृत्यू झाला त्यावेळी व्यथित होऊन टिळकांनी त्यांच्यावर मृत्यु लेख लिहिला होता हा लेख लिहितांना

टिळक ढसा ढसा रडल्याचा उल्लेख न. चि. केळकरांच्या लिखाणात सापडतो. आगरकरांबद्दल गौरवोद्गार काढतांना टिळक केसरीत "डी. ए. सोसायटीचा पायवा मृत्यू ह्या लेखांत लिहितात की, "परिस्थितीचा गुलाम न बनता परिस्थितीला आपल्या ताब्यात आणण्यात जो मनोनिग्रह, स्वार्थत्याग, निर्लोभीपणा आणि धैर्य बाळगावे लागते, ते ज्यांच्या अंगात आहे आणि दुःखाची अथवा संकटाची भीती अगर पर्वा न बाळगता जो आपल्या ठायी असणाऱ्या या सद्गुणांचा लोकोपयोगार्थ उपयोग करतो तोच मोठा म्हणवयाचा. गोपाळराव आगरकर या कोटीतले होते... आपल्या कर्तबगारीने व्यावहारिक उन्नती आपण करून घेवू असा निश्चित भरवंसा असता, मनोदेवतेस साक्ष ठेवून संकटे, विपत्ती, हालअपेष्टा सोसूनही मी आपले देशकार्याचे मनोगत पार पाडीन असे म्हणणारे आगरकरांसारखे पुरुष खरे धीर होत."[30] पण त्यांच्या कार्याचे चीज न झाल्याचे खंत यशोदाबाईंनी आपल्या आठवणीत लिहितांना म्हटले की, "आपल्या कार्यासाठी त्यांनी आपल्या जीवाचे रान केले. घर प्रपंच, पैसा, अडका, मानमरातब कशाकशाचीपर्वा केली नाही प्रसंगी स्वतःची कातडी देऊन दुसऱ्याची बचावली. म्हणतील ते करून दाखविले. पण काळच विपरीत पडला त्यांच्या श्रमाचे चीज झाले नाही"[31] असे म्हटले आहे.

सामाजिक स्वातंत्र्याच्या पोटातच राजकीय स्वातंत्र्य दडलेले असते ह्याची जाणीव रानडे, आगरकरांना असल्याने भारतीय समाजरचनेच्या प्रश्न त्यांच्या विचारांचा चिन्तनाचा एक भाग होता. - डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना या समाज सुधारकांच्या विचार प्रणालीचे सत्य पटलेले होते. रानडयांनी निर्माण केलेल्या सामाजिक परिषदेला राष्ट्रीय सभेच्या व्यासपीठावर आदराचे स्थान मिळाले असते तर स्वातंत्र्य लढयाला सामाजिक आशय निश्चित प्राप्त झाला असता असे आंबेडकरांना वाटत होते. रानडयांच्या कार्याचे विवेचन त्यांनी आपल्या "रानडे, गांधी ॲन्ड जिन्हा" या पुस्तकात केले आहे. डॉ. आंबेडकरांना त्यांच्या ज्ञानोपासनेच्या व्यासंगाने प्रभावित केले होते. त्याचे सर्वांगीण

सुधारणेच्या कार्याचे महत्व त्यांनी ओळखले होते. "Ranade had intellect of high calibre, He was not merely a lawyer and a Judge of high cort, he was a first class economist, a first class historian, a first class Divine and fisst class educationist He was not a politicianperhaps it is good that he was not. For if he had been, he might not have been a great man. Ranade though not a politicianwas a profound student of politics. Indeed it would be difficult to find in the history of India any man who could come up to Ranade in the width."[40] अशा शब्दात त्यांनी रानडयाचे मुल्यमापन केले आहे.

न्या. रानडे यांचा जन्मशताब्दी सोहळा इ.स. १९४२ मध्ये साजरा करण्यात आला होता. त्यावेळी "केसरी मराठा" संस्थेतर्फे प्रसिध्द होणा-या "सहयाद्रि" मासिकामध्ये जाने. १९४२ रानडे विशेषांकात रानडयांच्या कार्याचे पुनर्लोकन करण्यात आले होते व त्यांच्या स्मृतींना उजाळा देण्यात आला. त्या मासिकाचे पुनर्मुद्रण "नवभारत" मासिकाने जुले ते ऑक्टों. १९९३ ला केले आहे. या मासिकातील "रानडे आणि सामाजिक सुधारणा" या लेखात द.ल. सहस्त्रबुध्दे यांनी रानडे, आगरकरांच्या कार्याचे मुल्यमापन करतांना म्हटले की, "महाराष्ट्रात धार्मिक व सामाजिक सुधारणांची सांगड घालण्याला प्रयत्न रानडयांनी आपल्या सर्वसंग्रही स्वभावाने केला. आगरकर सामाजिक बाबतीत त्यांची व रानडयांची मते एक आहेत तेवढयापुरते सहकार्य करण्यात तयार असत व मते निराळी असली तर आपआपले मार्ग प्रत्येकाने आक्रमावेत असा आगरकरांचा विचार असे त्यांच्या बुध्दीवादी विचारामुळे त्यांचा प्रार्थना समाजाशी असा संबंध जडला नाही. या दोन गटात धार्मिक मतभेद असला तरी एकमेकांकडे सहानुभूतीने पाहण्याची दृष्टी असे."[४१] असा तुलनात्मक विचार दोघांबद्दल मांडलेला होता. रानडे आगरकरांची समाजाच्या सर्वांगीण सुधारणेसाठी तडजोडी भूमिका यातून स्पष्ट होते. रानडयांना एकत्र कुटुंबामुळे

ब-याच गोष्टींमुळे इच्छे विरूध्द तडजोड करावी लागे. त्यात मानसिक त्रास होत असला तरी मोठया मंडळींना वडिलांना दुखविणे त्यांना शक्य झाले नाही. त्यामुळे त्यांचे व्यक्तित्व संयमी बनले होते. आपले समाज कार्य करतांना दुस-यासाठी तडजोड करीत पण वैयक्तिक जीवनात विचार व आचारात फरक होवु देत नसत. त्यांच्या हया वृत्ती मुळे त्यांना समाजात मानाचे स्थान मिळाले होते. त्यांचे ब्रीद "वाकेन पण मोडणार नाही" या धर्तीचे बनले होते. रानडे व आगरकर सहसा वडीलधारी मंडळींना दुखविण्याचा प्रयत्न करीत नसत. वृध्द लोकांचे विचार बदलणे अशक्य आहे याची त्यांना जाणीव होती. पण तरूणांनी आपल्या आचार विचारांत परिवर्तन आणावे असे त्यांना वाटत होते. हयाच तरूणांच्या विचारामध्ये क्रांतीकारी बदल घडवुन आणण्यासाठी त्यांनी आपल्या लेखणीचा उपयोग केला होता. समाजाला आपले विचार बदलण्यासाठी आग्रह धरला होता. रानडयांच्या समन्वयवादी भूमिकेमुळे त्यांना समाजाने सन्मानित केले पण आगरकरांच्या आज्ञेयवादी भूमिकेमुळे त्यांच्या कार्याकडे दुर्लक्ष केले. इ.स. १९५६ मध्ये ज्यावेळी टिळकांची जन्मशताब्दी साजरी करण्यात आली त्याचवेळी आगरकरांचीही जन्म शताब्दी होती. पण त्यांच्या अज्ञेयवादी विचारांमुळे त्यांच्या कार्याची दखल घेतले गेली नाही. इ.स. १९९५ ला मात्र त्यांच्या कार्याचे महत्व ओळखुन आगरकरांची स्मृती शताब्दी साजरी करण्यात आली. या निमित्ताने टिळक स्मारकमध्ये १९ मार्च १९९५ ला झालेल्या चर्चा सत्रात डॉ. नलिनी पंडित यांनी म्हटले होते की, न्या रानडे यांच्या समाजकारणाचा, राजकारणाचा प्रभाव पडतो तेव्हा त्यांचे कोणते कार्य मोठे आहे असा प्रश्न उद्भवत नाही. त्यांचे सर्वच कार्य महत्वपुर्ण आहे. पण आगरकरांच्या कार्यांना मर्यादा पडलेल्या दिसतात. त्यांचे कार्य व्यक्तिवादाला प्राधान्य देणारे ठरले. त्यांचा आज्ञेयवाद तेव्हाही लोकांना अनाकलनीय ठरला व आजही त्यांचे विचार लोकांच्या पचनी पडण्यात असमर्थ झालेले दिसत आहेत." त्यांच्या प्रगत विचारांमधील पुरोगामीता काळाच्या बरीच पुढे होती. ते तत्कालीन समाजाचा विचार करतांना समाजाला पुढे

किती जावे लागणार हा दृष्टिकोन ठेवून आपले विचार मांडत याच चर्चासत्रात शास्त्रज्ञ डॉ. गोवारीकरांनी "सुधारक आगरकरांच्या विचारांचा आवाका संकल्पनेसारखा भविष्याचा वेध घेणारा होता. आधुनिक दृष्टि स्वीकारल्या शिवाय प्रगती नाही, याची जाणीव असलेले आगरकर हे अत्यंत विज्ञाननिष्ठ आणि भारतातील लोकशाहीचे आद्यप्रवर्तक होते. देव न मानणारा देव माणूस त्याच प्रमाणे वैज्ञानिक नसलेला पण विज्ञाननिष्ठेत आकंठ बुडालेला असा माणूस, विज्ञानाचा मेळ तत्वज्ञानाशी घालणारा सुधारक"[४२] या शब्दात त्यांचे मुल्यमापन केले. आगरकरांच्या स्मृतीशताब्दी निमित्त अनेक वृत्तपत्रातून सभांमधून चर्चासत्रातुन त्यांच्या कार्याचे मुल्यमापन केले गेले. ११ जुन १९९५ ला सकाळ, लोकसत्ता, महाराष्ट्र टाईम्स इ. वृत्तपत्रातुन आगरकरांच्या पुरोगामी विचारांचा पुरस्कार केला. त्यातील लोकसत्ता ऱ्या वृत्तपत्रामध्ये जे.व्ही. नाईक यांनी रानडे व आगरकर यांच्यातील वैचारिक द्वंद" यावर आपले विचार प्रगट केले आहे.[४३]. यात त्यांनी १० मे १८८५ मध्ये डेक्कन कॉलिजच्या वार्षिक स्नेहसम्मेलनात "धर्म, विज्ञान आणि तत्वज्ञान" या विषयावर चर्चेसंबंधी विश्लेषण केले आहे. यात रानडे आणि आगरकराचे वैचारिक तीव्र मतभेद प्रकर्षाने झालेले त्यासंबंधी दोघांच्या विचारतत्वातील फरक सेलबीच्या ग्रंथाच्या आधारे केला आहे. डेक्कन कॉलिजचे प्राचार्य आणि "बटलर्स मेथड ऑफ एथिक्स" या ग्रंथाचे लेखक फ्रान्सिस सेलबीच्या लिखाणावर रानडयांनी आक्षेप घेतला होता. आगरकर सेल्बी प्रमाणेच आज्ञेयवादी असल्यामुळे हा ग्रंथ म्हणजे आज्ञेयवादी तत्वज्ञानाचे प्राथमिक धडे देवु पाहणारे अनिष्ट पुस्तक" अशी रानडयांनी टिका केली तसेच आज्ञेयवादी विचारसरणी राष्ट्रजीवनाला धोकादायक आहेत असे मत स्पष्ट केले. तेव्हा न्या. रानडयांच्या पुस्तकातील परिक्षणावर आक्षेप घेवुन आगरकरांनी रानडयांनीच दिलेल्या गौतमबुध्दाच्या अपयशाचे उदाहरण देवुन "आज्ञेयवादी विचार राष्ट्रमनाची पकड घेवु शकत नाही अशी ज्यांची खात्री पटली असेल तर प्रा. सेलबीच्या किंवा दुसऱ्या एखाद्या प्राध्यापकाच्या तथाकथित लेखनाची रानडयांना भीती बाळगण्याचे कारण नाही" असे स्पष्ट केले. या वादविवादातुन मुख्यत: आस्तिक, नास्तिकपणाचा प्रश्न निर्माण झालेला होता.

त्यातून रानडयांच्या धार्मिक मनोवृत्तीला धक्का बसला असल्याने त्यांनी आगरकरांच्या विचारांना विरोध केला होता. पण तरीही त्यांना आगरकराचे कार्य राष्ट्रोध्दारासाठी महत्वपूर्ण वाटत होते.

महाराष्ट्रातच नव्हे तर भारतात सामाजिक सुधारकांचा पराजय पारतंत्र्याच्या काळातच झालेला दिसुन येतो. रानडे आगरकरा नंतर सुधारकांची पिढी हळू हळू कमकुवत झालेली आढळते. रानडे आगरकरांनंतर टिळकांच्या राजकीय कार्याकडे लोकाचे लक्ष केंद्रित झाल्याने समाज सुधारणांकडे दुर्लक्ष झाले. तो काळ वैचारिक संक्रमणाचा काळ असल्याने तत्कालीन सनातनी पण सुशिक्षित वर्गाने त्यांच्या कार्याकडे दुर्लक्ष केले. ईश्वरवादी विचारसरणीने केलेले रानडयांचे कार्य समाजाला रुचले पण बुध्दी प्रामाण्य, विवेकनिष्ठेच्या विचारांनी पुरस्कृत केलेली समाज सुधारणा तत्कालीन समाजाने नाकारली. त्यांना संपूर्ण आगरकर पचवीता आला नाही आजही आपल्या सर्वसामान्य लोकांच्या जाणीवा मध्ययुगीन कल्पना व संस्कारांमध्ये गुंतुन पडलेल्या दिसत आहेत. जुन्या परंपरागत जीवनाच्या ठरीव चाकोरीतुन आपल्या लोकांना बाहेर काढयासाठी न्या. रानडे यांनी सामाजिक प्रबोधनाची मुहुर्तमेढ रोवली. आगरकरांनी त्याज्य ठरलेल्या रुढी, परंपरावर आघात करुन लोकांच्या मनावरील मळभ दूर करण्याचा प्रयत्न केला. रानडयांनी समाजातील अनिष्ट रुढी परंपरेला वाईट ठरविले असले तरी त्यासाठी हिन्दू धर्मातील चांगल्या तत्वांचा आधार घेऊन प्रवाहित धर्मतत्वे अवलंबिण्यास सांगितले. त्यांच्या मधील संग्राहक वृत्ती व संघटनात्मक कार्यामुळे समाजाने त्यांच्या मागोमाग जाण्याचा काही प्रमाणात प्रयत्न केला. पण आगरकराचे स्फोटक विचार ग्राहय न झाल्याने त्यांची प्रेत यात्रा काढुनच आपला प्रखर विरोध जाहीर केला होता. त्यांचा बुध्दिवाद, अज्ञेयवाद लोकांना रुचला नाही. त्याचे विचार आजच्या काळातही उपयुक्त वाटतात. यावरुनच त्यांच्या विचारधनाची महती जाणवते. मानवी मर्यादेमुळे दोघांच्या कार्याला मर्यादा असल्यातरी काही प्रमाणात कमतरता असली तरी शंभर

वर्षापूर्वी लोकाभिमुख होवून विचार प्रबोधनाचे कार्य करणे धाडसाचे पाऊल ठरले. आपल्या कार्यातील खडतरपणा लक्षात घेवूनच त्यांनी आपले कार्य निस्वार्थीपणे प्रामाणिकपणे केले होते. परकीय सत्तेच्या काळात त्यांच्या कार्याला स्वकीयांकडूनच पाठिंबा मिळणे कठीण झाले असले तरी धैर्याने, निर्भिडपणे आपले कार्य केले होते यातच त्यांचे श्रेष्ठत्व सिध्द होते.

एकविसाव्या शतकाकडे वाटचाल करीत असतांना भारतीय समाजाने राजकीय आर्थिक, वैज्ञानिक व सांस्कृतिक दृष्टया विकसनशील राष्ट्रांच्या मालिकेत वैशिष्ठयपूर्ण स्थान प्राप्तकेले आहे. भारताने आधुनिकतेची बाहय तत्वे पूर्णपणे आत्मसात केली असली तरी सामाजीक, धार्मिक, कौटुंबिक जीवन दृष्टया सूक्ष्मतेने पाहिले असता भारतीय समाज अजूनही मानसिक गुलामगिरीत गुरफटलेला दिसून येते. रुढी परंपरांना कवटाळून बसलेला आणि निष्क्रियते कडे वळलेल्या स्वच्छंदी समाजाचे हे स्वरुप प्रकर्षाने जाणवते. त्यामुळे आजही फुले, रानडे, आगरकर यांच्या सारख्या समाजसुधारकांची, विचारवंतांची गरज भासते आहे. समाजपरिवर्तनाचा मुलभुत प्रश्न अजूनही महत्वाचा ठरलेला आहे. तत्कालीन समाजने रानडे व आगरकरांच्या तत्वविचारांना महत्वपूर्ण मानुन त्यांचे कार्य काही सुधारकांनी पुढे चालविण्याचा प्रयत्न केला असता तर सुधारणेच्याचळवळीने दिवसेंदिवस व्यापक स्वरुप धारण करणे शक्य झाले असते.

रानडे, आगरकरानंतर समाजसुधारणेचे कार्य पुढे चालविण्याचे प्रयत्न महर्षि कर्वे, राजर्षि शाहू महाराज, विठ्ठल रामजी शिंदे, डॉ. आंबेडकर, म. गांधी इ. अनेक समाजसुधारकांनी केला. पण त्यांच्या कार्याला राजकीय नेतृत्वाइतकी लोकप्रियता लाभली नाही. त्यामुळे त्यांचे चांगले कार्य दुर्लक्षित राहिले व पुढे त्यांच्या पाऊलावर पाऊल टाकून सुधारणा घडविण्याचा प्रयत्न करणारे एकनिष्ठ अनुयायी मिळाले नाहीत. त्यामुळे प्रगत समाजातही त्यांच्या काळातील कालबाहय रुढी परंपरा तशाच जडत्व धारण करुन

समाजात रुजलेल्या दिसत आहेत.

न्या. रानडे व प्रा. आगरकरांच्या काळातील सामाजिक कौटुंबिक प्रश्न काही प्रमाणात सुटले असले तरी आजच्या काळात नवीन समस्या निर्माण झालेल्या आहेत. स्त्री शिक्षण, प्रौढ विवाह, विधवा विवाह या सारख्या सुधारणांचा पुरस्कार समाजाने केला असला तरी आज हुंडाबळी, स्त्रियांवर होणारे मानसिक व शारीरिक अत्याचार, स्त्रियांचे समाज व कुटुंबातील गौणस्थान, लोकसंख्येचा प्रश्न, धर्मसंघर्ष, जातीभेद, सामाजिक नीतीमत्तेचे बदते स्वरुप या सारख्या समाजाला ग्रासणाऱ्या समस्येची उकल करण्यासाठी वैचारिक प्रबोधनाची गरज आहे. त्यासाठी सामाजिक चळवळी उभारणाऱ्या निस्पृह, त्यागी, निर्भिडपणे राष्ट्रनिष्ठेने कार्य करणाऱ्या सुधारकांची पिढी निर्माण होण्याची आवश्यकता जाणवते. आहे.

देशाला स्वातंत्र्य मिळविण्यच्या प्रयत्नातील राजकारणामुळे रानडे, आगरकरांच्या कार्याची तत्कालीन समाजाने उपेक्षा केली असली तरी त्याचे उपलब्ध विचारतत्व समाजामध्ये रुजविण्याचे कार्य करणे अपरिहार्य झाले आहे. सर्वसमावेशक दृष्टीने अखिल मानव जातीचे कल्याण या उद्देशाने निकोप समाज उभारणीसाठी वैचारिक प्रबोधनाचे कार्य करुन देशाला योग्य मार्गाने प्रगतीपथावर नेणाऱ्या नेतृत्वाची परंपरा निर्माण होण्याची योग्य वेळ पुन्हा एकदा आलेली आहे. म्हणून आजही रानडे आगरकरांच्या विचारांची गरज जाणवत आहे

## प्रकरण सहावे

### संदर्भ


१) रानडे, संकीर्ण लेख संग्रह, पृ. ११६-११७

२) द.गो. कर्वे, स्वतंत्र भारताचे द्रष्टे- न्या. रानडे, पृ. २६-२७.

३) नातु-देशपांडे, आगरकर वाङ्मय खंड १, पृ. ८८.

४) त्र्यं.कृ. टोपे, न्यायमूर्ती म.गो. रानडे-व्यक्ती, कार्य आणि कर्तृत्व,पृ.७९

५) रानडे, संकीर्ण लेखसंग्रह, पृ. १२५.

६) मा.दा आळतेकर, संपूर्ण आगरकर निबंधसंग्रह,भाग १, पृ. १५१

७) गं.बा. सरदार, आगरकरांचा सामाजिक तत्वविचार, पृ. १२

८) आळतेकर, संपूर्ण आगरकर निबंधसंग्रह,भाग १, पृ. ६.

९) गोविंद तळवळकर, विराटज्ञानी न्यायमूर्ती रानडे, पृ. ३०

१०) श्री. के. क्षीरसागर, "सह्याद्रि" रानडे विशेषांक मासिक, जाने १९४२ पृ. २०२

११) नातु-देशपांडे, आगरकर वाङ:मयखंड, भाग १, पृ.१५-१६

१२) यशवंत सुमंत, आगरकर स्मृती शताब्दी समिती परिसंवाद, १९ मार्च १९९५

13) Ranade, M. Writings, P.208

१४) आळतेकर, संपूर्ण आगरकर निबंधसंग्रह, भाग ३, पृ. १८३

१५) कित्ता, पृ. १८४-१८५.

१६) सरदार, रानडेप्रणीत सामाजिक सुधारणेची तत्वमिमांसा पृ. ६३

१७) सरदार, आगरकरांचा सामाजिक तत्वविचार, पृ. १८१

१८) शां.द. जावडेकर, आधुनिक भारत, पृ. २८.

19) P.J. Jagirdar, M.G. Ranade, P. 178

२०) आळतेकर, संपूर्ण आगरकर निबंधसंग्रह,भाग १, पृ. १८

२१) आगरकर, केसरीतील निवडक निबंध, भाग १, पृ. १८९-१९०.

22) P.J. Jagirdar, M.G. Ranade, P. 130

२३) आगरकर, केसरीतील निवडक निबंध, भाग ३, पृ. ९१

२४) Ranade, Religious and social reform, P.3

२५) द.गो. कर्वे, स्वतंत्र भारताचे द्रष्टे - न्या.म.गो. रानडे, पृ. ७७

२६) पी.के. गोपालन, सह्याद्रि, रानडे विशेषांक मासिक, जाने. १९४२.

२७) Ranade, Essays on Indian economics, P.106-107

२८) ग.प्र. प्रधान, आगरकर लेखसंग्रह,भाग १, पृ. २९७.

२९) Tucker, Ranade and Roots of Indian nationalism, P. 253

३०) यशोदाबाई आगरकर, आगरकरांच्या आठवणी, स्त्री, किर्लोस्करवाडी मे.-सप्टें. १९३८.

३१) सरदार, रानडेप्रणीत सामाजिक सुधारणेची तत्वमिमांसा, पृ. १०५-१०६

३२) सरदार, आगरकरांचा सामाजिक तत्वविचार, पृ. १८५

३३) Ranade, M.Writings. P.118

३४) पुं.पां. गोखले, आगरकरांशी ओळख, पृ. १९४.

३५) द.गो. कर्वे, स्वतंत्र भारताचे द्रष्टे - न्या.रानडे, पृ. २५०

३६) पुं.पां. गोखले, आगरकरांशी ओळख, पृ. ९०.

३७) ज.श्री. टिळक, (प्रकाशित), समग्र लोकमान्य टिळक, खंड ५, (पुणे:१९७६), पृ. १०५-१०६.

३८) कित्ता, पृ. ८७६-८७७.

३९) यशोदाबाई आगरकर, आगरकरांच्या आठवणी, स्त्री-किर्लोस्करवाडी मे.-सप्टें-१९३८.

४०) B.R. Ambedkar, Ranade, Gandhi and Jinnha, P.11

४१) द.ल. सहस्त्रबुध्दे, नव भारत, रानडे विशेषांक, जुलै-ऑटो. १९९३

४२) आगरकर स्मृती शताब्दी परिसंवाद समिती, टिळक स्मारक मंदीर, १९ मार्च १९९५.

४३) जे.व्ही. नाईक, लोकसत्ता, आगरकर विशेषांक लोकरंग पुरवणी.

## संदर्भ सूची

### अव्वल साधने (प्रकाशित)

### मराठी ग्रंथ

१) आगरकर गोपाळ गणेश, केसरीतील निवडक निबंध, पुस्तक पहिले, दुसरी आवृत्ती, पुणे, १९३७.

२) आगरकर गो.ग. केसरीतील निवडक निबंध, पुस्तक दुसरे, दुसरी आवृत्ती, पुणे, १९४०

३) आगरकर गो.ग. निवडक निबंध, भाग पहिला (सुधारकातील सामाजिक धार्मिक व राजकीय विषयांवरील निवडक निबंध) शिराळकर कंपनी प्रकाशित, पुणे : १८९५.

४) आगरकर गो.ग., डोंगरीच्या तुरुंगातील आमचे एकशे एक दिवस, दुसरी आवृत्ती, पुणे:१८८२.

५) आगरकर यशोदाबाई, (संपादित), आगरकरांच्या आठवणी, द.ना. आपटे संग्राहक, स्त्री-किर्लोस्करवाडी, मे-सप्टें. १९३८.

६) आळतेकर मा.दा., (संपादक) संपूर्ण आगरकर निबंध संग्रह, भाग पहिला पहिली आवृत्ती, पुणे १९३७.

७) आळतेकर मा.दा. (संपादक), संपूर्ण आगरकर निबंधसंग्रह, भाग दुसरा पहिली आवृत्ती, पुणे: १९३८.

८) आळतेकर मा.दा., (संपादक), संपूर्ण आगरकर निबंधसंग्रह, भाग तिसरा पहिली आवृत्ती, पुणे:१९४०.

९) प्रधान ग.प्र. (संपादित), आगरकर लेख संग्रह, भाग एक, प्रथम आवृत्ती दिल्ली: १९६०.

१०) प्रधान ग.प्र. (संपादित), आगरकर लेख संग्रह, भाग दोन, प्रथम आवृत्ती दिल्ली : १९७१

११) फडतरे विष्णु रामकृष्ण (प्रकाशीत) निबंध संग्रह, भाग पहिला, प्रथम आवृत्ती, पुणे, १९१९.

१२) फडतरे वि.रा. (प्रकाशित), निबंधसंग्रह, भाग दुसरा, प्रथम आवृत्ती, पुणे १९२७.

१३) फडतरे वि.रा.(प्रकाशित) निबंध संग्रह, भाग तिसरा, प्रथम आवृत्ती, पुणे, १९१८.

१४) नातु मं.ग. आणि देशपांडे दि.य. आगरकर वाङ्मय खंड एक, प्रथम आवृत्ती, मुंबई, १९८४

१५) नातु मं.ग. आणि देशपांडे दि.य. आगरकर वाङ्मय खंड दोन प्रथम आवृत्ती, पुणे १९८५.

१६) रानडे, रमाबाई, (संपादित), न्यायमूर्ती म.गो. रानडे यांची धर्मपर व्याख्याने, प्रथम आवृत्ती लोणावळा: १९०२.

१७) रानडे रमाबाई, (संपादित), संकीर्ण लेखसंग्रह, द्वितीयआवृत्ती, मुंबई १९४०

१८) रानडे रमाबाई, (संपादित), आमच्या आयुष्यातील काही आठवणी, सातवी आवृत्ती, पुणे:१९५३

## इंग्रजी ग्रंथ

1) Ranade M.G., Essays on Indian Economics, Third edition, Madras, 1916.

2) Ranade M.G., Miscellaneous writings, (Complied), First edition, Bombay, 1915.

3) Ranade M.G., Religious and Social Reform, (ed) M.B. Kolaskar, First edition, Bombay, 1902.

4) Ranade M.G., Rise of Maratha power, New Delhi, 1974.

## दुय्यम संदर्भ साधने

## मराठी ग्रंथ

१) आपटे-इनामदार, विजापूरकर, मराठ्यांच्या सत्तेचा उत्कर्ष, तिसरी आवृत्ती पुणे: १९२५.

२) इनामदार हे.वि. व मो.स. गोसावी, आधुनिक भारतीय तत्त्वज्ञ, प्रथम आवृत्ती, पुणे : १९९०.

३) कानीटकर रा.ग., आगरकर दर्शन, दुसरी आवृत्ती, पुणे; १९६३.
४) कर्वे द.गो., स्वतंत्र भारताचे द्रष्टे – न्यायमूर्ती म.गो. रानडे, प्रथम आवृत्ती, पुणे ; १९४२.
५) केळकर न.चिं., लोकमान्य बा.ग. टिळक यांचे चरित्र पूर्वार्ध, खंड दुसरा तिसरी आवृत्ती, पुणे;, १९२६.
६) करंदीकर म.आ., आधुनिक भारताचे शिल्पकार – बा.ग. टिळक, प्रथम आवृत्ती, दिल्ली ; १९७२.
७) खानोलकर गं.दे, एकोणिसाव्या शतकातील महाराष्ट्र, प्रथम आवृत्ती, मुंबई ; १९७५.
८) खांडेकर वि.स., आगरकर व्यक्ति आणि विचार द्वितीय आवृत्ती, पुणे ; १९४९.
९) गुरुजी कृ.आ. लोकमान्य बा.ग. टिळक यांचे पन्नास वर्षांचे चरित्र, भाग पहिला, प्रथम आवृत्ती, पुणे;१९०६.
१०) गुडेकर श्रीराम, म. ज्योतिबा फुले – विचार व वाङ्मय, प्रथम आवृत्ती पुणे;१९९२.
११) गोखले पु.पां., आगरकरांशी ओळख, दुसरी आवृत्ती, पुणे, १९६९.
१२) चिपळूणकर व.कृ., निबंधमाला, तिसरी आवृत्ती, पुणे ; १९९६.
१३) जावडेकर शं.द. आधुनिक भारत, तृतीय आवृत्ती १९६६.
१४) जांभेकर गं.ग. (संपादक), बा.ग. जांभेकर यांचे जीवनवृत्त व लेखसंग्रह खंड एक व दोन, प्रथम आवृत्ती, पुणे:१९५०.
१५) ग.भा जोशी, अठराव्या शतकातील महाराष्ट्राचे सामाजिक जीवन, पुणे;१९८०.
१६) तळवलकर गोविंद, नौरोजी ते नेहरु, प्रथम आवृत्ती, मुंबई;१९६९.
१७) तळवलकर गोविंद, विराटज्ञानी न्यायमूर्ती रानडे, द्वितीय आवृत्ती, पुणे;१९८९.
१८) टिपे पी.डी., आगरकर व टिळक आणि समाज सुधारणा, प्रथम आवृत्ती मुंबई;१९९२.

१९) देशपांडे सुनंदा, गोपाळ गणेश आगरकर, प्रथम आवृत्ती, पुणे;१९८३
२०) टिकेकर - पाध्ये, आजकालचा महाराष्ट्र, प्रथम आवृत्ती मुंबई;१९३५
२१) टिळक ज.श्री., समग्र लोकमान्य टिळक खंड पाचवा, पुणे;१९७४
२२) टोपे त्र्यं.कृ. न्यायमूर्ती म.गो. रानडे - व्यक्ती, कार्य आणि कर्तृत्व, प्रथम आवृत्ती, पुणे ; १९९२
२३) ठाकूर बा.बा. न्यायमूर्ती म.गो. रानडे यांचे चरित्र, प्रथम आवृत्ती इंदोर ; १९४२.
२४) पळशीकर वसंत (अनुवादक) नंदा बलराम, गोपाळकृष्ण गोखले - ब्रिटिश राजवट व नेमस्त युग, प्रथम आवृत्ती, मुंबई - १९८६
२५) पाध्ये प्रभाकर, तीन तपस्वी, प्रथम आवृत्ती, कोल्हापूर ; १९४६
२६) पाध्ये प्रभाकर, विचार धारा, पुणे ; १९५०
२७) पंडीत नलिनी, महाराष्ट्रातील राष्ट्रवादाचा विकास, प्रथम आवृत्ती, मुंबई;१९५५
२८) प्रियोळकर अ.का. लोकहितवादीकृत निबंध संग्रह, द्वितीय आवृत्ती, मुंबई ; १९६७.
२९) प्रियोळकर अ.का. परमहंस व तिचे अध्यक्ष रामचंद्र बाळकृष्ण (धर्मविवेचनसह) प्रथम आवृत्ती, १९६६
३०) प्रियोळकर अ.का. रावबहादूर दादोबा पांडुरंग, प्रथम आवृत्ती मुंबई ; १९४७
३१) फाटक न.र., न्यायमूर्ती म.गो. रानडे यांचे चरित्र, तृतीय आवृत्ती, पुणे;१९६६.
३२) फाटक न.र., लोकमान्य, प्रथम आवृत्ती, मुंबई;१९७२.
३३) फडके य.दि., शोध बाळ गोपाळांचा, प्रथम आवृत्ती, पुणे;१९७७
३४) फडकुले निर्मल, प्रबोधनातील पाऊलखुणा, प्रथम आवृत्ती, पुणे;१९७८
३५) बनहट्टी श्रीनिवास, टिळक आणि आगरकर, प्रथम आवृत्ती पुणे ; १९५६

३६) बर्वे दि.ह., स्वतंत्र भारताचे द्रष्टे न्यायमूर्ती म.गो. रानडे प्रथम आवृत्ती, मुंबई;१९४२.
३७) ब्रम्हचारी विष्णुबावा, वेदोक्त धर्मप्रकाश तृतीया आवृत्ती, मुंबई;१९५९.
३८) भोळे भा.ल. आधुनिक भारतातील राजकीय विचार, प्रथम आवृत्ती, पुणे;१९७८.
३९) रानडे मोरेश्वर गोविंद, महाराष्ट्रातील समाजविचार, १८१८-१८७८ प्रथम आवृत्ती, पुणे:१९७९.
४०) लेले रा.के, मराठी वृत्तपत्रांचा इतिहास, दुसरी आवृत्ती, पुणे;१९८४
४१) वाळींबे रा.शं. एकोणिसाव्या शतकातील सामाजिक पुनर्घटना, भाग एक, प्रथम आवृत्ती, पुणे ; १९६२.
४२) वैद्य द्वारकानाथ गो. न्यायमूर्ती म.गो. रानडे यांची धर्मपर व्याख्याने चौथी आवृत्ती, पुणे;१९४०.
४३) शिखरे दा.न. सुधारककर्ते आगरकर, प्रथम आवृत्ती, मुंबई ;१९५९.
४४) सहस्त्रबुद्धे पु.ग. केसरीची त्रिमूर्ती, प्रथम आवृत्ती, पुणे;१९७४.
४५) सरदार गं.बा. रानडे प्रणीत सामाजिक सुधारणेची तत्वमीमांसा, प्रथम आवृत्ती, पुणे ; १९७३.
४६) सरदार गं.बा., आगरकरांचा सामाजिक तत्वविचार, प्रथम आवृत्ती, पुणे; १९७५.

## इंग्रजी ग्रंथ

1) Ambedkar B.R., Ranade, Gandhi and Jinnah, First edition, Bombay ; 1943.
2) Bhandare L.S.,M.G. Ranade - A social reformer, second edition, Bombay ; 1942.
3) Chintamani C.Y., Indian social reform, First edition Madras ; 1901.

4) Gidmal Dayaram, Beheramji M. Malbari, First edition Bombay ; 1888.

5) Gokhale G.K., The late Mr. Justice M.G. Ranade, First edition, Bombay ; 1903.

6) Jagadishan T.N. (ed), The wisdom of A Modern Rishi Madras ; 1923

7) Jagirdar P.J, M.G. Ranade, First eidition, New Delhi ; 1972.

8) Jagirdar P.J., studies in the social thoughts of M.G. Ranade, First edition, Bombay, 1963.

9) Kellock James, M.G. Ranade - Patriot and social servent, First edition, Culkatta ; 1926.

10) Karve and Ambedkar (ed) speeches and writings of G.K. Gokhale, First edition, Pune:1967.

11) Keer Dhananjay, L. Tilak - Father of the Indian freedom struggle, Bombay, 1969.

12) Mankar G.A. sketch of life and work of the late Mr. Justice M.G. Ranade, VOL I-II, Bombay ; 1902

13) Parvate, T.V. M.G. Ranade - A Biography, First edition, Delhi; 1967.

14) Natarajan S.A., Century of social Reform In India, Reprint, Bombay ; 1959.

15) Sen S.P. (ed), social and Religious Reform movement in the Ninteeth and Twenteeth Centuries, Bombay ; 1979

16) Tucker Richard P., Ranade and the Roots of Indian nationalism, First edition (India) 1977.

17) Vora R. Liberal thoughts in Maharashtra, First edition Pune ; 1978.

नियत कालिके, मासिके

१) अमृत मासिक, आगरकरांचे विचार, ग.प्र. प्रधान, सप्टें १९९५.
२) केसरी विशेषांक, टिळक, आगरकर आणि सुधारणांचा प्रश्न, गोवर्धन पारिख, ऑगस्ट, १९७०
३) महाराष्ट्र साहित्य, गो.ग. आगरकर - वसंत नाईक, जुलै-ऑगस्ट १९२१
४) मनोरंजन, गो.ग. आगरकर, वि.मो. महाजनी, जुलै १९१६.
५) मनोरंजन, आगरकरांचे धर्मविषयक काही विचार, वसंत नाईक ऑक्टो-डिसें. १९२६.
६) मनोरंजन, न्यायमुर्ती म.गो. रानडे, वसंत नाईक, जाने. १९२७.
७) नवभारत, डेक्कन कॉलेजातील दोन क्रांतिकारक, जावडेकर शं.द., ऑगस्ट, १९५६
८) नवभारत, न्यायमुर्ती म.गो. रानडे, वसंत नाईक, जाने १९२७
९) नवभारत, आगरकर विशेषांक, मे-ऑगस्ट, १९५६.
१०) समाज प्रबोधन पत्रिका, लो.बा.ग. टिळक - नेतृत्वाची उभारणी, १९७३.
११) सह्याद्रि, रानडे विशेषांक, जाने. १९४२, पुर्नमुद्रण नवभारत, १९९२.
१२) मिलिंद शान्यालणी, आगरकरांची अहर्निश-नंदिनी आत्मासिद्ध दिवाळी विशेषांक ऑक्टो. नोव्हे १९९८.

वृत्तपत्रे

१) तरुण भारत, आगरकर व गुलामगिरी - एक विवेचन, मनोहर कल्लावार, १४ जुलै १९९२.
२) महाराष्ट्र टाईम्स, दिसो लागे मृत्यु - आगरकर, य.दि. फडके, पुणे ; ११ जुन १९९५.
३) महाराष्ट्र टाईम्स, जो लोक कल्याण साधावया जाण, म.वा. धोंड पुणे ; ११ जुन १९९५.
४) लोकसत्ता विशेषांक, आगरकर व रानडे यांच्यातील वैचारिक द्वंद्व जे.व्ही नाईक, पुणे, मुंबई, १९९५
५) लोकसत्ता, विशेषांक, कुटुंबव्यवस्थेत सुधारणा सुचविणारा द्रष्टा अरविंद गणाचारी, पुणे-मुंबई, ११ जुन १९९५

६) लोकसत्ता विशेषांक, अक्कांचा मृत्यु, य. दि. फडके, पुणे, मुंबई, ११ जुन, १९९५

७) लोकसत्ता विशेषांक, सुधारणावादी की पाश्चात्यवादी, श्री. ना. चापेकर, पुणे-मुंबई – १९९५.

८) सकाळ, सुधारकांचे अग्रणी, प्रा. शिवाजीराव भोसले फलटण, पुणे, २१ मार्च १९९३.

९) सकाळ, थोर दार्शनिक – न्यायमूर्ती रानडे, प्रा. शिवाजीराव भोसले, पुणे ; एप्रिल १९९३.

१०) सकाळ, आगरकरांचे विचार व आजची परिस्थिती, डॉ. सतीश सप्तर्षी, पुणे ; १ एप्रिल, १९९५.

११) सकाळ, आगरकरांच्या विचारांचा मूलभूत पाया, अरविंद पारसनिस, पुणे ; १८ मार्च, १९९५

१२) सकाळ, आगरकर – भारतातील लोकशाहीचे प्रवर्तक, डॉ. वसंत गोवारीकर, पुणे ; २० मार्च, १९९५

१३) सकाळ, सामाजिक प्रबोधनाचे तत्त्वचिंतक, स. मा. गर्गे, पुणे ; २३ फेब्रु. १९९५

१४) सकाळ, आगरकरांचा सुधारणावाद, स. मा. गर्गे, पुणे ; ११ जुन १९९५.

## चर्चा, परिसंवाद

१) गो.ग. आगरकर स्मृती शताब्दी समारंभ, डॉ. तारकुंडे, डॉ. मंगुडकर, श्रीकृष्ण पाडे, महाराष्ट्र राज्य संशोधन प्रशिक्षण मंडळ पुणे ; २५ फेब्रु. १९९५.

२) आगरकर शताब्दी चर्चासत्र, विश्वास नाईक मते, विद्याबाळ, स.मा.गर्गे, ग.प्र. प्रधान, मराठी इतिहास संशोधक मंडळ, पुणे ; ११ मार्च, १९९५

३) आगरकर स्मृती शताब्दी समिती परिसंवाद, डॉ. गोवारीकर, जयंतराव टिळक, डॉ. केळकर, डॉ. पारसनिस, सत्यरंजन साठे, डॉ. सरोजिनी वैद्य, रत्नाकर महाजन, डॉ. जयंत नारळीकर, डॉ. नलिनी पंडीत, शंकरराव खरात, डॉ. धनागरे, डॉ. घाणेकर, प्रा. शमसुद्दीन तांबोळी, टिळक स्मारक मंदिर, पुणे, १९ मार्च १९९५.

परिसंवाद-शोधनिबंध

१) सरोजिनी वैद्य – आगरकरांचे हिन्दुत्व.
२) यशवंत सुमन आगरकर प्रणीत धर्मचिकित्सेचा आशय.
३) जयंत नारळीकर – आजच्या भारतात आगरकरांची भूमिका.
४) अरविंद पारसनिस – आगरकरांच्या विचारांचा मुलभूत पाया.
५) रत्नाकर महाजन – पक्के स्वराज्यवादी आगरकर.

४) आगरकर जन्म शताब्दी समारंभ, वसंत व्याख्यानमाला साधनाकला मंच, ग.प्र. प्रधान, डॉ. ए.एम्. देशपांडे, विद्या बाळ किर्लोस्कर कम्युन्स हॉल, कोथरूड, पुणे, १८ एप्रिल १९९५.

५) आगरकर स्मृती शताब्दी समारोह, डॉ. सदानंद मोरे, विश्राम बेडेकर आशुतोष भोपटकर, स.मो. गर्गे, ग.प्र. प्रधान, डॉ. विश्वास मेहेंदळे, फर्ग्युसन कॉलेज, ॲम्फी थिएटर, पुणे ; १७ जुन १९९५.